॥ श्रीगुरुःशरणम् ॥


॥ ॐ श्रीमद् अमृतमूर्तये श्रीदत्तवासुदेवाय नमः ॥

* थोरलेस्वामीमहाराज *

श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य श्रीवासुदेवानन्दसरस्वती
टेंबेस्वामीमहाराज यांचे चरित्र

(पूर्वार्ध – साधनाखण्ड)

खण्ड पहिला



-: लेखक :-

द. सा. मांजरेकर

सर्वभूतीं तो जाणून।
सर्वां द्यावें अभयदान।
हेचि त्याचें पूजन।
पुन्हा जनन न ये दे जे॥

॥श्रीभौरखेस्वामीमहाराज॥

केशव रामचंद्र जोशी

दि. १०।५।१९८८

॥ श्रीगुरुःशरणम् ॥


॥ ॐ श्रीमद् अमृतमूर्तये श्रीदत्तवासुदेवाय नमः ॥

★ श्रीथोरलेस्वामीमहाराज ★

श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य श्रीवासुदेवानन्दसरस्वती टेंबेस्वामीमहाराज यांचे चरित्र

(पूर्वार्ध – साधनाखण्ड)

खण्ड पहिला



-: लेखक :-

द. सा. मांजरेकर

प्रकाशक :
व्यवस्थापक,
सिद्धयोग प्रकाशन,
२६।२०२ लक्ष्मीनगर, पुणे ९.
पिन ४११००९



मुद्रक :
ज. प. खरे,
आदित्य मुद्रण,
१४४२ शुक्रवार पेठ, पुणे २.
पिन ४११००२



प्रकाशन काल :
इ. स. १९८६



मूल्य ५० रुपये

समर्पण :—

हा ग्रंथ माझे गुरुदेव परमपूजनीय
योगिराज श्रीसंत गुळवणीमहाराज
यांच्या पावन स्मृतींना समर्पण असो.

—द. सा. मांजरेकर

धन्यता :—

आजि आनंद आनंद। मनीं भरला पूर्णानंद ॥ १ ॥
वाचे बोलतां तो नये। बुद्धिबोध स्तब्ध राहे ॥ २ ॥
नित्यानंद सद्गुरुरूपा। पाहतां हरल्या जन्मखेपा ॥ ३ ॥
तया माझा नमस्कार। जेणें हरलों आपपर ॥ ४ ॥
ते हे वासुदेव चरण। हृदयीं येतां झालें धन्य ॥ ५ ॥

★ ★ ★

तूची आर्यसंरक्षक। तूची अनार्यं शिक्षक।
तूची हे ग्रंथ–कौतुक। करविसी लोक तारावया।

★ ★ ★

॥ श्रीगुरु:शरणम् ॥

॥ ॐ श्रीमद् अमृतमूर्तये शिववामनाय नमः ॥

प्रस्तावना :–

सदा संतांपाशीं जावें । त्यांचें जवळीं बैसावें ।
उपदेश ते न देती । तरी ऐकाव्या त्या गोष्टी ।
तेचि उपदेश होती । त्याही कष्ट नष्ट होती ।
वासुदेव म्हणे संत । संगे करिती पसंत ॥

श्रीमन् सिद्धयोगाचार्यवर्य महायोगी श्रीसन्त सद्‌गुरू श्रीवामन दत्तात्रेय गुळवणीमहाराज यांच्या अपार व अलौकिक प्रेमकृपावलाने आज त्यांचे श्रीसमर्थ सद्‌गुरू "श्रीथोरलेस्वामीमहाराज" अर्थात् परमहंस परिव्राजकाचार्य श्रीवासुदेवानन्दसरस्वती टेम्बेस्वामीमहाराज यांचे, माझे गुरूबन्धू श्री. द. सा. मांजरेकर यांनी लिहिलेले, हे विस्तृत चरित्र प्रसिद्ध करण्याचा योग येत आहे, ही परमभाग्याची गोष्ट आहे.

श्रीगुरुमहाराजांनी माझ्याकडून त्यांच्या चरणांची जी १८ वर्षे सेवा करवून घेतली, त्या काळात रात्रंदिवस जर मी कोणते पुराण त्यांच्या मुखातून ऐकले असेल; तर ते त्यांच्या सद्‌गुरूंचेच होय ! महर्षी व्यासांनी जशी त्या त्या देवतांची १८ पुराणे लिहून, ज्याप्रमाणे सामान्यजनांपुढे कर्म, भक्ती, ज्ञान, योग, उपासना इत्यादी नानाविध साधनांचे उद्‌घाटन करून त्यांना मार्गदर्शनपर आदर्श, त्यातील विविध भक्तांच्या व उपासकांच्यारूपाने उपस्थित करून दिले आहेत, त्याप्रमाणेच हे "श्रीवासुदेवमाहात्म्य" किंवा "श्रीवासुदेवपुराण" आहे. ज्याप्रमाणे पुराणें ही वेदातील साधनरहस्य सामान्यजनांना सुलभतेने समजावे व मनुष्यजन्माचे ध्येय किंवा हेतू परमार्थप्राप्ती किंवा सामरस्यात्मक आत्मस्वरूपप्राप्ती हेच आहे हे कळावे म्हणून कथा व तत्त्वज्ञान यांच्या अपूर्व मिलाफाचे स्वरूप घेऊन साकार होऊन प्रकट झाली आहेत त्याप्रमाणेच श्रीस्वामी-

महाराजांच्या रूपाने अवतरलेल्या या तृतीय योगिराज नावाच्या श्रीदत्तात्रेयांच्या अवताराचे आत्तापर्यंन्त लिहिल्या गेलेल्या त्यांच्या सर्व चरित्रग्रंथांचे व इतरही उपलब्ध झालेल्या साधनांचे आलोडन करून आजच्या काळातील लोकांनां रुचेल अशा सरळ, सोप्या व गोष्टीरूप भाषेत,अत्यल्प अशा बोधरूप तत्त्वज्ञानाचा मिलाफ करून, हे चरित्र लिहिले आहे. त्यामुळे या चरित्राचा सर्व लोक मोठ्या प्रेमाने व भक्तीने आस्वाद घेतील अशी खात्री आहे.

श्रीगुरुचरणकमलसेवारत असताना एकदा त्यांनी त्यांच्या जवळ असलेली, श्री. गंगाधरपंत वैद्य यांनी श्रीस्वामीमहाराजांच्या चरित्रातील विविध घटनांसंबंधी टिपणे केलेली, एक वही मोठ्या सुहास्य वदनाने व अमोलिक ठेव्याच्या रूपाने माझ्याकडे दिली होती. त्याचप्रमाणे त्यांनी आपल्या स्वतःच्या पूजेतील श्रीस्वामी-महाराजांचे एक छायाचित्रही मला अत्यंत प्रेमाने दिले होते. या दोन्ही गोष्टी मिळाल्यापासू न आपणही हृदयस्थ श्रीगुरुचरणांच्या श्रीगुरुदेवांचे एक विस्तृत चरित्र लिहून आपली अल्पशी वाङमयीन सेवा उभयतांच्या चरणकमली प्रस्तुत करून त्यांच्या कृपाकटाक्ष-मात्रेकरून धन्य व्हावे अशी कल्पना कितीतरी दिवस माझ्या हृदयपुष्करिणीवर तरंगत राहिली होती. ही कल्पना दृढमूल होण्यास दुसरेही असे एक कारण घडले की, ज्यावेळी "श्रीगुरुदेव-चरित्र" या श्रीस्वामीमहाराजांच्या चरित्राची प्रथमावृत्ती वाचनात आली त्यावेळी त्याच्या प्रस्तावनेत श्रीगुरुदेवांनी असे लिहिलेले आढळले की, "श्रीमहाराजांचें विस्तृत चरित्र पुढें व्हावयाचेच आहे. सावंतवाडी येथील श्रीमहाराजांचे परमभक्त कै. गणेशपंत सातवळेवर यांनी बरेच परिश्रम घेऊन श्रीमहाराजांचे चरित्राची रूपरेषा उत्तम तयार करून ठेवली आहे. त्यावरून चांगले चरित्र सविस्तर लिहवून त्यावर लेखक म्हणून आपल्या पिताजींचें नांव

घालावे अशी इच्छा कै. सातवळेकर यांचे चिरंजीवांनीं पत्रद्वारां मंडळास कांहीं दिवसांपूर्वी कळविली होती. ती श्रीगुरुमहाराजांचे कृपेनें लवकरच पूर्ण होईल यांत शंका नाहीं." परंतु कालौघात श्रीगुरुमहाराज देहदृष्टचा तिरोहित झाल्यामुळे व त्यांनी समक्ष सोपविलेल्या संप्रदायप्रवाह अविच्छिन्न राखण्याच्या कार्यात व तदंगभूत वाङमयीन सेवेतच आपला बहुतांश काळ निघून जाईल, हे लक्षात घेऊन माझे गुरुबन्धू श्री. द. सा. मांजरेकर यांना हे विस्तृत चरित्र लिहिण्याची विनंती केली व त्यांनी ती विनंती मान्य करून हे बृहत् कार्य पूर्ण केले. श्री. मांजरेकर हे श्रीसद्गुरू गुळवणी-महाराज यांच्या भक्तांनी व साधकमंडळींनी स्थापन केलेल्या "महायोग मंडळ, मुंबई," या रजिस्टर्ड संस्थेचे कार्यवाह असून ते श्रीगुरुचरणांचे परमप्रेमी व श्रीस्वामीमहाराजांच्या चरणकमलांचे उत्कट भक्त आहेत. त्यामुळे या उभयतांच्या आंतरिक कृपासूचने-प्रमाणे हे विशाल वाङमयीन सेवाकार्य त्यांच्याकडे गेले हे योग्यच झाले, असे त्यांनी लिहिलेले हे चरित्र वाचले की, लक्षात आल्या-वाचून राहणार नाही. त्यांची ही सेवा श्रीगुरुचरणी रुजू राहून त्यांच्या प्रेमाचे छत्र त्यांच्यावर व त्यांच्या कुटुंबीय मंडळींवर अखड राहील यात काहीच शंका नाही आणि तसे ते राहावे म्हणून श्रीगुरुचरणी प्रार्थना आहे.

हा श्रीथोरल्यास्वामीमहाराजांच्या जीवनचरित्राचा पहिला खण्ड असून त्यात त्यांच्या जन्मापासून म्हणजे शके १७७६ अर्थात् इ. स. १८५४ ते त्यांनी शके १८१३ अर्थात् इ. स. १८९१ मध्ये संन्यास ग्रहण केला, येथपर्यंतचे जीवन चित्रित केले आहे. एकप्रकारे त्यांच्या जीवनाचा पूर्वार्ध यात सामाविलेला आहे, असेच म्हणणे योग्य होईल.

ज्यावेळी श्रीस्वामीमहाराजांनी संन्यासानंतर दंड ग्रहण केला त्यावेळी श्रीदत्तप्रभूंनी "आज सर्वत्र वर्णाश्रमधर्माचा लोप झालेला

आहे; तरी यापुढे सर्व भरतखंडात पायीच संचार करून सर्व लोकांना उपदेश करावा व धर्ममार्गाची स्थापना करून ईश्वरनिष्ठा व स्वधर्मनिष्ठा जागृत करावी," अशी त्यांना आज्ञा करून, त्यांच्या अवताराचा हेतू त्यांना स्पष्ट करून सांगून, त्याप्रमाणे पुढील कार्यास प्रवृत्त केले. या अपूर्व, लोकोत्तर, अलौकिक, अद्‌भुत, असामान्य व एकमेवाद्वितीय अशा कार्यसिद्धीसाठी कर्म, भक्ती, ज्ञान, वेद, वेदांगे, शास्त्रे आणि तदनुषंगिक उपासना व अभ्यास यांनी संपन्न अशी सर्वांग परिपूर्ण साधना श्रीदत्तप्रभूंनी त्यांच्या आयुष्याच्या किंवा जीवनाच्या पूर्वार्धात करवून घेतल्याचे दिसते. वास्तविकपणे श्रीस्वामीमहाराज स्वतःसिद्धच होते; पण लौकिक भूमिकेवर उतरून त्यांनी या भरतखंडातील समस्त साधकांच्या पुढे एक आदर्श उपस्थित व्हावा म्हणून अशा प्रकारे आपले जीवन श्रीदत्तप्रभूंनी घडविले असे दाखविले. एका अर्थाने हा खण्ड म्हणजे साधकांचे साधकजीवन कसे असावे याचा अत्युत्तम नमूना असल्यामुळे हा "साधना खण्ड" झाला आहे. मात्र पुढील सर्व "सिद्ध खण्ड" असून त्या काळात वर्णाश्रमधर्मप्रतिष्ठापनेचे कार्य श्रीस्वामीमहाराजांनी कसे सिद्धीस नेले, हे चित्रित केले आहे. या दृष्टीने या साधना खण्डाकडे पाहिले म्हणजे हे सर्व लिखाण अपूर्व असेच झाले आहे, असे दृष्टोत्पत्तीस आल्यावाचून राहत नाही. गुरुभक्त श्री. द. सा. मांजरेकर यांनी या कालखंडात घडलेल्या कथा विस्तृत व प्रवाही अशा भाषाशैलीने सांगून शेवटी त्यांचे तात्पर्यही स्पष्ट केले आहे. त्यावरून साधकांनी कोणता बोध घ्यावयाचा याची वाचकांना उत्तम कल्पना येते.

श्रीथोरल्यास्वामीमहाराजांच्या साधनकालातील जीवनचरित्राला बहुविध पैलू आहेत. या सर्व पैलूंनी नटलेले त्यांचे हे अनर्घ्यरत्नरूपी साधनजीवनचरित्र, हा सर्व साधकांना मार्गदर्शन

करणारा एक अपूर्व दीपस्तंभ आहे, असे म्हटले; तर त्यात यत्किंचितही अतिशयोक्ती होणार नाही. या दृष्टीनेच माझे हृदयस्थ श्रीसद्गुरुनाथ श्रीगुळवणीमहाराज यांनी "श्रीगुरुदेवचरित्र" या नावाच्या श्रीमत् प. प. श्रीस्वामीमहाराजांच्या चरित्राच्या द्वितीय आवृत्तीला लिहिलेल्या प्रस्तावनेत असे म्हटले आहे की, "कर्म, उपासना, योग व ज्ञान या सर्व साधनांची पूर्णता दर्शविणारें हें श्रीमहाराजांचें चरित्र आहे. "तांस्तितिक्षस्व भारत" या भगवद्वचनाप्रमाणें परमार्थ साधनाचा पाया तितिक्षा आहे. ती पूर्ण बाणली असेल तरच "सोऽमृतत्वाय कल्पते" हे फल पदरांत पडते. उपनयन झाल्याबरोबर सुरू झालेली श्रीमहाराजांची वैदिक कर्मनिष्ठा, शेवटपर्यंत यत्किंचितही कमी झाली नाहीं. याकरितां लागणारी तितिक्षा, सात्त्विक धैर्य, नित्यानित्यविवेक, तीव्रविरक्ति इत्यादि साधनें श्रीमहाराजांचे जवळ किती विपुल प्रमाणात होती हें या चरित्रावरून सर्व साधकांना कळून येईल आणि आपणाकडून होणाऱ्या अल्प साधनाबद्दल मनांत उत्पन्न होणारा दंभ आपोआप नष्ट होईल. "दम्भं महदुपासया" – महापुरुषांचा आदर्श पाहून दंभ जिकावा अशी थोरांची आज्ञा आहे; कारण दंभ हा आसुरी संपत्तीपैकी असून तो उत्कर्षाला प्रतिबंध कराणारा आहे. "स्वधर्मप्रकटीकरणं दम्भः" अशी त्याची व्याख्या, भगवान् श्रीशंकराचार्य करतात. याचेंच स्पष्टीकरण "आपुली आपण स्तुति करी। तो एक मूर्ख ॥" असें श्रीसमर्थांनी केलें आहे. "पूज्यता डोळां न देखावी। स्वकीर्ती कानीं नायकावीं। हा अमुका ऐसी नोहावी। सेचि लोकां ॥" असें अमानित्वाचें वर्णन श्रीज्ञानराज करतात. याच्या विरुद्ध मानित्व हें दम्भी माणसाजवळ असते. तसेंच रसास्वाद दोषही दंभातून निर्माण होतो. तो ब्रह्मजिज्ञासूला अत्यंत घातक

ठरणारा आहे. याप्रमाणे सर्व साधनांचा विघातक दंभदोष घालविण्याकरिता महापुरुषांच्या दिव्य चरित्राचें समालोचन, हा महत्त्वाचा उपाय आहे. श्रीमहाराजांच्या ठिकाणी असणारे दिव्य गुण, विचारी साधकांच्या समोर आल्यास, आपण अशा महात्म्यांच्या दृष्टीनें किती हीन आहोत हे लक्षात येऊन तो साधक "दंभो दर्पोऽभिमानश्च क्रोधः पारुष्यमेव च।" या अनर्थ परंपरेतून बाहेर पडून सन्मार्गाला लागेल. "जन्मकर्म च मे दिव्यम्" या भगवद्वचनाप्रमाणे भगवान् व भगवद्भक्त यांचें दिव्य चरित्राचा प्रसार जनतेमध्ये करण्याचा मुख्य उद्देश; पसरणाऱ्या आसुरी संपत्तीला पायबंद घालणें हाच आहे. हाच भगवत्सूचित उद्देश लक्षांत घेऊन, या दिव्य चरित्राचें पुनर्मुद्रण केलें जात आहे." श्रीगुरुमहाराजांनी येथे व्यक्त केलेल्या विचारांचा मागोवा घेतला म्हणजे आपल्या हें लक्षात येईल की, त्यांच्या अपार कृपाबलाने व तीव्रतम संकल्पानेच हे विस्तृत चरित्र साकार झाले आहे, यात तिलप्राय शंका राहणार नाही.

श्रीथोरल्यास्वामीमहाराजांच्या जीवनचरित्रातील सर्वात् महत्त्वाचा पैलू "अप्राकृत भक्ती" हाच आहे. यालाच पराभक्ती असे म्हणतात. परा म्हणजे श्रेष्ठ अर्थात् अप्राकृत भक्ती आणि अपरा म्हणजे गौण अर्थात् प्राकृत भक्ती असे भक्तीचे दोन प्रकार आहेत. देवर्षी श्रीनारदांनी आपल्या भक्तिसूत्रात "यथा व्रजगोपिकानाम्।" असे सूत्र लिहून अप्राकृत भक्तीचे जे एकमेवाद्वितीय उदाहरण देऊन अशा प्रकारच्या भक्तिप्रेमाच्या परमोत्कर्षाचा जो उल्लेख केला आहे, तेच दिव्य अप्राकृत प्रेम व भक्ती आपणास श्रीस्वामीमहाराजांच्या जीवनचरित्रात पाहावयास मिळते. गौणी अगर अपरा भक्तीमध्ये देवर्षी श्रीनारदांनी राजस, तामस व सात्त्विक असे तीन प्रकार केले असून श्रीमद्भगवद्गीतेत सांगितल्याप्रमाणे आर्त, जिज्ञासू व अर्थार्थी असे ते तीन प्रकार आहेत. अशा प्रकारच्या

स्थूल किंवा प्राकृत भक्तीतून बाहेर पडून दिव्य व अप्राकृत प्रेमात आपली गती व्हावी म्हणूनच अशा रीतीने श्रीस्वामीमहाराजांचे विस्तृत जीवनचरित्र लिहिण्याचा लेखकाने प्रपंच केला आहे, हे प्रस्तुत चरित्र वाचले म्हणजे लक्षात आल्यावाचून राहणार नाही. या अप्राकृत भक्तीच्या रहस्याचा भेद व्हावा हा या चरित्र लेखनाचा आंतरिक हेतू असला; तरी ही पराकाष्ठेची कठीण अशी गोष्ट आहे. असे असले; तरी श्रीसमर्थं रामदासस्वामीमहाराजांनी "दासबोधात" म्हटल्याप्रमाणे "आपण असतां अनन्यभावें। देव तात्काळचि पावे। आपण त्रास घेतां जीवें। देवहि त्रासे ॥ ४·८·१३॥" ही स्थिती जेव्हा हे चरित्र वाचताना आपल्या लक्षात येते तेव्हा उपरोक्त भक्तीचा आपणास थोडासा तरी मागोवा घेता येतो. एवढेच नव्हे; तर "देवावेगळें कोणी नाहीं। ऐसें बोलती सर्वही। परंतु त्यांची निष्ठा कांहीं। तैसीचि नसे ॥ ४·८·१९॥ म्हणोनि ऐसें न करावें। सख्य तरी खरेंच करावें। अंतरीं सदृढ धरावें। परमेश्वरासी ॥ २०॥ आपुलिया मनोगताकारणे। देवावरी क्रोधासी येणें। ऐसीं नव्हेत कीं लक्षणें। सख्यभक्तीचीं ॥२१॥ देवाचें जें मनोगत। तेंचि आपुलें उचित। इच्छेंसाठीं भगवंत। अंतरूं नये कीं ॥ २२॥ देवाचें इच्छेनें वर्तावें। देव करील तें मानावें। मग सहजचि स्वभावें। कृपाळू देव ॥२३॥" अशी श्रीस्वामीमहाराजांची प्रत्यक्ष स्थिती पाहिली म्हणजे त्यांच्या चरणाश्रयाने आपणासही ही स्थिती प्राप्त करता येईल अशी खात्री वाटू लागते व भक्ति-प्रेमाच्या रंगात स्वतःला बुचकळून काढण्यासाठी व अपराभक्तीच्या उत्कंठेने लालायित होऊन या अपूर्व जीवनगंगेचे पान अधिकाधिक तीव्रतेने व वारंवार करू लागते, यात तिळमात्र संशय नाही.

या दृष्टीने या चरित्राचे वारंवार वाचन केले म्हणजे "जयासि वाटे सुखचि असावें। तेणें रघुनाथभजनीं लागावें। स्वजन सकळहि

त्यागावें । दुःखमूळ जे ॥ दासबोध ३·१०·६३ ॥ " हे श्रीस्वामीमहाराजांच्या चरित्राचे साररूप रहस्य हाती येईल. त्याचप्रमाणे श्रीसमर्थ रामदासस्वामीमहाराजांच्या "दासबोधातील" पुढील ओव्या वाचल्या म्हणजे श्रीस्वामीमहाराजांचे "साधन खण्डातील" साररूप चरित्रच तात्त्विक दृष्टीने चित्रित झाले आहे असे आढळून येईल. ते म्हणतात–

भगवंत भावाचा भुकेला । भावार्थ देखोनि भुलला ।
संकटीं पावे भाविकांला । रक्षित असे ॥ ३·१०·१० ॥
जया भगवंत आवडे । तयाचें देवास सांकडें पडे ।
संसारदुःख समूळ झडे । निजदासांचें ॥ ११ ॥
जे अंकित ईश्वराचे । तयांसि सोहळे निजसुखाचें ।
धन्य तेचि दैवाचे । भाविकजन ॥ १२ ॥
जैसा भाव जयापाशीं । तैसाचि देव तयापाशीं ।
जाणे भाव अंतरसाक्षी । प्राणिमात्रांचा ॥ १३ ॥
जरी भाव असला मायिक । तरी देव होय महा ठक ।
नवल तयाचें कौतुक । जैशासि तैसा ॥ १४ ॥
जैसें जयाचें भजन । तैसेंचि दे समाधान ।
भाव होतां किंचित न्यून । आपणहि दुरावें ॥ १५ ॥
दर्पणीं प्रतिबिंब दिसे । जैशासि तैसें भासें ।
तयाचें सूत्र असे । आपणाचपाशीं ॥ १६ ॥
जैसें आपणा करावें । तैसेंचि तेणें व्हावें ।
जरी डोळे पसरोनि पाहावें । तरी तेंही टवकारे ॥ १७ ॥
भ्रुकुटीस घालूनिया गांठी । पाहतां तेंहि क्रोधें उठी ।
आपण हास्य करितां पोटीं । तेंहि आनंदे ॥ १८ ॥
जैसा भाव प्रतिबिंबला । तयाचाचि देव झाला ।
जो जैसा भजेल त्याला । तैसाचि बोळे ॥ १९ ॥

भावें परमार्थाचिया वाटा। वाहती भक्तीचिया पेंठा।
भरला मोक्षाचा चोहटा। सज्जनसंगें॥ २०॥
भावें भजनीं जे लागले। ते ईश्वरीं पावन झाले।
भावार्थबळें उद्धरलें। पूर्वज तेही॥ २१॥
आपण स्वयें तरले। जनांसिही उपयोगा आले।
कीर्तिश्रवणें झाले। अभक्त भावार्थी॥ २२॥
धन्य तयांची जननी। जे लागले हरिभजनीं।
त्यांहींच एक जन्म जनीं। सार्थक केला॥ २३॥
तयांची वर्णू काय थोरी। जयांचा भगवंत कैवारी।
कांसे लावूनि उतरी। पार दुःखाचा॥ २४॥
बहुत जन्मांच्या शेवटीं। जेणें चुके आटाआटी।
तो हा नरदेह भेटी। करी भगवंतीं॥ २५॥
म्हणोनि धन्य ते भाविक जन। जींहीं जोडलें हरिनिधान।
अनंत जन्मांतरींचे पुण्य। फळासि आलें॥ २६॥
आयुष्य हेंचि रत्नपेटी–। माजीं भजनरत्नें गोमटीं।
ईश्वरीं अर्पुनियां लुटी। आनंदाची करावी॥ २७॥
हरिभक्त वैभवें कनिष्ठ। परी तो ब्रह्मादिकां वरिष्ठ।
सदासर्वदा संतुष्ट। नैराश्यबोधें॥ २८॥
धरूनि ईश्वराची कांस। केली संसाराची निराश।
तया भाविका जगदीश। सबाह्य सांभाळी॥ २९॥
जया संसाराचें दुःख। विवेकें वाटे परम सुख।
संसारदुःखाचेनि पढतमूर्ख। लोंधोनि पडती॥ ३०॥
जयांचा ईश्वरी जिव्हाळा। ते भोगिती स्वानंद सोहळा।
जयांचा जनांवेगळा। ठेवा अक्षयी॥ ३१॥

श्रीथोरल्यास्वामीमहाराजांनी आपल्या जीवनात भूत, प्रेत, पिशाच्चादींनी पछाडलेल्या कितीतरी लोकांना मुक्त करून सुखी

केले, असा त्यांच्या चरित्रात वारंवार उल्लेख आला आहे. श्रीस्वामीमहाराजांच्या जीवनाचा हा तिसरा महत्त्वाचा पैलू आहे. समाजामध्ये जे लोक अशा प्रकारच्या योनीतील लोकांच्या तडाख्यात सापडून आपल्या प्रारब्धभोगचक्रात फिरत राहून निम्नतम अवस्थेत पडून राहतात त्यांना त्या अवस्थेतून वर काढून चांगले जीवन प्रदान करण्याची व भक्तिमार्गाला किंवा योगमार्गाला लावून उन्नतावस्थेला नेण्याची अपूर्व किमया श्रीस्वामीमहाराजांनी केली. वास्तविक पाहता ही किमया इतकी लोकोत्तर, अद्‌भुत, अलौकिक व असामान्य आहे की, त्याला कसलीही तोड नाही, असे म्हटले तर त्यात यत्किंचितही अतिशयोक्ती होणार नाही; कारण जे लोक उपरोक्त कारणांमुळे स्थूल पातळीच्याही खाली आहेत त्यांना आपल्या सामर्थ्याने स्थूल पातळीवर आणून; मग त्यांना काही साधनमार्ग सांगून, हळूहळू अस्थूल अर्थात् उच्च पातळीवर खेचत नेण्यासाठी रात्रंदिवस प्रयत्नशील राहणे व वर्णाश्रमधर्माप्रमाणे शुचिर्भूत आचरण ठेवून "ब्राह्मणस्य हि देहोऽयं क्षुद्रकामाय नेष्यते। कृच्छ्राय तपसे चेह प्रेत्यानन्तसुखाय च ॥" या श्रीमद्‌भागवत महापुराणाच्या वचनाप्रमाणे उपरोक्त कार्यसिद्धीसाठी आपल्या जीवनाची सिद्धी झाली पाहिजे, असा त्यांचा दृढ संकल्प झालेला होता. ब्राह्मणाचा देह हा अत्यन्त महत्त्वाचा व दुर्लभ आहे. यासाठी क्षुद्र इच्छा धरून तत्पूर्तीप्रीत्यर्थ त्या देहाला खर्ची घालू नये; मात्र अत्यन्त कठीण अशा कृच्छ्रादी तपामध्ये त्याचा विनियोग करावा व परोपकार करून समाजाला सुखी झालेले पाहावे अशा लोकोत्तर धारणेपोटी भूतदया, कनवाळूपणा, प्रेम इत्यादींचा जो अथांग सागर श्रीस्वामीमहाराजांच्या अंत:करणात दृष्टीस पडतो, तसा तो इतरत्र कोठेही दृष्टीस पडणे सुतराम् शक्य नाही, हे अक्षरश: खरे आहे. त्यांचें या कार्याचे साररूपाने वर्णन करावयाचे झाले; तर

श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी " जयांचें ऐहिक धड नाहीं । तयांचे परत्र पुससी काई ॥ ४·१५४ ॥ असे म्हणून ज्ञानेश्वरीत ज्यांचे वर्णन केले आहे, त्या समस्त लोकांचे ऐहिक जीवन सुधारून त्यांना परत्रासाठी मार्गस्थ करण्याचे महान् कार्य त्यांनी केले, अशा शब्दातच ते करावे लागेल. श्रीस्वामीमहाराजांनी स्थूलात्मक दृष्टीने तळागाळात गेलेल्या लोकांसाठी जे परिश्रम घेऊन त्यांचे ऐहिक चांगले करण्याचा जो अपूर्व प्रयत्न केला, तो पाहिला म्हणजे श्रीसंत तुकाराममहाराजांच्या पुढील अभगाची आठवण झाल्याशिवाय राहात नाही. ते म्हणतात–

जे कां रंजले गांजले । त्यांसी म्हणे जो आपुलें ॥
तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि जाणावा ॥
मृदु सबाह्य नवनीत । तैसें सज्जनांचे चित्त ॥
ज्यासि आपंगिता नाहीं । त्यासि धरि जो हृदयीं ॥
दया करणें जे पुत्रासी । तेचि दासा आणि दासी ॥
तुका म्हणे सांगूं किती । तोचि भगवंताची मूर्ती ॥

अशा रीतीने श्रीस्वामीमहाराजांनी भूत, प्रेत, पिशाच्चादी योनींच्या तडाख्यातून लोकांना सोडविण्याचे अद्वितीय कार्य केले असले; तरी अशा प्रकारची योनी आहे किंवा कसे अशी नेहमीच अनेकांच्या मनात शका येते. त्याचे उत्तर पृष्ठ २७१ वर आलेल्या कथेतून मिळेलच.

येथपर्यंत श्री. द. सा. मांजरेकर यांनी लिहिलेल्या श्रीस्वामीमहाराजांच्या चरित्रातील काही वैशिष्टयांचे यावच्छक्य दिग्दर्शन केले. वास्तविक पाहता आणखो कितीतरी वैशिष्टये या चरित्रात दडलेली असून त्यांचा आस्वाद साधक–भक्तांनी घ्यावा अशी त्यांना विनंती आहे.

सारांश, हे चरित्र म्हणजे समस्त साधक-भक्त-जनांना " चेतना

चिंतामणीचे गांव" च आहे. प्रत्येक साधक-भक्ताने आजच्या या घोर अशा कलियुगात आपल्या सभोवार पसरलेल्या भीषण माया-जालातून स्वतःला वारंवार वाचविण्यासाठी व आपल्या ध्येया-वरील दृष्टी ढळू न देण्यासाठी या चिंतामणीच्या गावातच मुक्काम केला पाहिजे. असे केले म्हणजे अखंड चेतनत्व प्राप्त होऊन जगताच्या वरवरच्या आकारचित्राने भुलून जाऊन अधोगतीप्रत न जाता मनोरूपी पट फाटून जाऊन सामरस्याच्या राउळात महा-सुखाची दिवाळी भोगण्यास जीव समर्थ झाल्याशिवाय राहणार नाही. अशा रीतीने श्रीस्वामीमहाराजांचे व त्यांच्या चरित्राचे कितीही वर्णन केले; तरी ते अपुरेच ठरेल. यामुळे श्रीसंत तुकाराम-महाराज यांच्या शब्दात एवढेच म्हणता येईल की–

काय वानूं आतां न पुरे हे वाणी। मस्तक चरणीं ठेवीतसें ।।
थोरीव सांडिली आपुली परिसें। नेणो सिवों कैसें लोखंडासी ।।
जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति। देह कष्टवीती उपकारें।
भूतांची दया हें भांडवल संता। आपुली ममता नाहीं देहीं ।।
तुका म्हणे सुख पराविया सुखें। अमृत हें मुखें स्त्रवतसें ।।

आता ज्यांचे या चरित्राच्या छपाईसाठी साहाय्य झाले व होत आहे त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण हे माझे कर्तव्य आहे. सौ. शालिनीताई बळीराम पुरव, श्री. अनिल द. मांजरेकर, श्री. शामकान्त द. मांजरेकर, श्री. अशोक रा. खेर, श्रीमती मंदाकिनी-ताई ना. भागवत, श्री. गोपाळ बा. पोळ, श्री. मधुकर द. मयेकर, श्री. आनंदराव नेरूरकर, श्री. त्र्यंबकराव रामचंद्र बेलापूरकर, श्री. कृष्णाजी शिवराम आठवले, सौ. विजयाताई रघुवीर माटेगावकर, श्री. गोपाळराव सदाशिव खांडेकर, श्री. श्रीराम गोपाळराव खांडेकर, श्री. परमानंद नैलवाल, श्री. रघुनाथ राजाराम आपटे, श्री. शरद सीताराम अत्रे, श्री. अरुण प्रभाकर राजे, श्री. यशवन्त गजानन

ताटके, श्री. उत्तमराव दिनकरराव पाटील, सौ. हेमलता उत्तमराव पाटील, श्री. कमलाकर गजानन पाटील, श्री. चंद्रकांत रघुनाथ पाटील, श्री. शिरीष इच्छाराम चौधरी, श्री. सुरेश रामचंद्र मल्लापूर, श्री. श्रीधर दिनकर खांडेकर, श्री. सूर्यकान्त काशीनाथ भावे, श्रीमती पद्मजा प्रशान्त सोनारीकर, श्री. प्रभाकर धोंडोपंत अजोतीकर, श्री. सुभाष दिनकर खांडेकर, सौ. कान्ताबेन प्राणुभाई देसाई, सौ. उषाताई कुलकर्णी, श्री. दादासाहेब यंदे, श्रीमती लक्ष्मी-बाई कोटक, श्री. अरुण शंकर वाघ, श्री. दामोदर दत्तात्रेय पोळ, श्री. मुलतोजीराव दौलतराव विचारे (अॅडव्होकेट) व सौ. हेमांगी-ताई मुलतोजीराव विचारे (अॅडव्होकेट) या सर्व गुरुबन्धू, गुरु-भगिनी, साधक व प्रेमी मंडळींचे या चरित्राच्या पहिल्या खण्डाच्या छपाईसाठी अपरंपार साहाय्य झाले असून पुढील सर्व खण्डांसाठी हे व इतरही सर्व प्रेमीमंडळी साहाय्य करणार आहेत, ही श्रीस्वामी-महाराजांची व श्रीगुरुचरणांची अपार कृपा आहे, यात काहीच शंका नाही. या सर्वांच्या साहाय्याविना हा पहिला चरित्रखंड छापून प्रसिद्ध होणे कदापीही शक्य झाले नसते व पुढील खण्डही छापून होणे शक्य नाही, हे नितांत सत्य आहे. अर्थात् या सर्वांचे साहाय्य हे इतके निरपेक्ष आहे की, त्यांचा येथे केलेला उल्लेख त्यांना आवडणार नाही. यासंबंधी मी एवढेच म्हणेन की, त्यांनी केलेली ही सेवा श्रीगुरुचरणी रुजू राहील.

या चरित्रग्रंथात माणगाव येथील जी विविध चित्रे छापली आहेत, त्यांची सर्व मूळ छायाचित्रे श्री. मोहनराव पाटकर, माण-गाव, यांनी मोठ्या आत्मीयतेने व आपुलकीने समक्ष आणून दिली. त्यांची ही सेवा श्रीगुरुचरणी व श्रीस्वामीमहाराजांच्या चरणी रुजू होऊन, त्यांनी आपले प्रेमकृपाछत्र त्यांच्यावर अखंड धारण करावे म्हणून उभयतांच्या चरणी प्रार्थना आहे.

या चरित्रग्रंथाच्या पहिल्या खण्डाची छपाई माझे मित्र व श्रीस्वामीमहाराजांचे सांप्रदायी श्री. ज. प. खरे यांनी आपले स्वतःचे काम आहे असे समजून केली व पुढील सर्व खण्डांची छपाई ते मोठ्या आत्मीयतेने करून देणार आहेत, याबद्दल मी जेवढी कृतज्ञता व्यक्त करीन व त्यांना धन्यवाद देईन तेवढे थोडेच आहेत. त्याचप्रमाणे आदित्य मुद्रणामधील काम करणाऱ्या सर्वांचे अपरिमित साहाय्य झाले व होत आहे, हे नमूद करणे माझे कर्तव्य आहे. या सर्व कर्मचारी बंधूंना माझे हार्दिक धन्यवाद आहेत !

याशिवायही कित्येकांचा या चरित्रग्रंथाच्या कार्यासाठी हातभार लागला आहे. असे जे नामोल्लेखरहित गुरुबंधू, भगिनी, प्रेमी, सज्जन व साधक आहेत, त्यांचाही मी अंतःकरणपूर्वक आभारी आहे. त्यांच्या अनुल्लेखाबद्दल त्यांनी मला क्षमा करावी.

इत्यलम् । अमृतस्वरूप, शिवशक्तियुक्त व श्रीवासुदेवरूप श्रीगुरुचरण विश्वात्मक व विश्वोत्तीर्णावस्थेत स्थिरावले असल्याने त्यांच्या नित्य व अखंड स्मरणाने सामरस्याची अंतिम प्रेमानन्दावस्था प्राप्त करून जीवन धन्य करावे ही प्रार्थना.

केशव रामचंद्र जोशी

॥ ॐ ॥

मनोगत :-

श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य श्रीवासुदेवानन्दसरस्वती टेंबे-स्वामीमहाराज यांची बरीच चरित्रे छापली गेली आहेत. त्यांपैकी तीनचार तरी आज उपलब्ध आहेत. त्यामुळे त्यांमध्ये आणखी एका चरित्रग्रंथाची भर टाकण्याचे प्रयोजन काय ? असा प्रश्न सहजच निर्माण होतो. भगवान् श्रीकृष्णाचे अनेक चरित्रग्रंथ झाले आहेत. गौतम बुद्धाच्या चरित्रग्रंथांची संख्या काही कमी नाही. श्रीमदाद्य शंकराचार्यांची अनेक चरित्रे आहेत. श्री. रामकृष्ण परमहंसांच्या चरित्राचे एकट्या इंग्रजी भाषेमध्ये अनेक ग्रंथ आहेत. असे असूनही या थोर महात्म्यांच्या चरित्रातील ताजेपणा अद्याप कायम आहे. प्रत्येक वेळी त्यांच्या चरित्राचा काहीतरी नवीन पैलू वाचकांना सापडतोच. प. प. श्रीटेंबेस्वामीमहाराजांच्या चरित्राचेही तसेच आहे. त्यांचे व्यक्तिमत्त्व हिमालयासारखे महान् आणि सागरा-सारखे गंभीर होते. त्यामुळे त्यांचे चरित्र पूर्णत्वाने जाणण्यासाठी आणखी शेकडोशे ग्रंथ लिहिले तरी ते अपुरेच पडतील. या ग्रंथा-मध्ये त्यांचे व्यक्तिमत्त्व समजावून घेण्याच्या प्रयत्नापेक्षा त्यांच्या लीलांचे गायन करून आनंद प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न केला आहे. ईश्वराचे गुणगान कितीही वेळा केले; तरी त्याची गोडी अवीट असते हेच खरे !

माझे गुरुदेव परमपूजनीय योगिराज श्रीगुळवणीमहाराज यांनी आपले सद्गुरू श्रीटेंबेस्वामीमहाराज यांच्या जन्मशताब्दीवर्षामध्ये श्रीस्वामीमहाराजांनी रचिलेले (व उपलब्ध असलेले) सर्व ग्रंथ प्रकाशित करून महान् गुरुसेवा केली. त्यावेळी त्यांच्या मनामध्ये श्रीस्वामीमहाराजांचे एक विस्तृत चरित्र छापून प्रसिद्ध करावे असे

होते. त्यासाठी त्यांनी श्रीस्वामीमहाराजांविषयी जी जी माहिती, पत्रे, आठवणी वगैरे मिळाल्या त्यांचा संग्रह करण्यास सुरुवात केली होती. श्रीस्वामीमहाराजांचे बृहत् चरित्र छापण्याची आपली तीव्र इच्छा त्यांनी गुरुभक्त डॉ. केशवराव जोशी यांच्याकडे बोलून दाखविली होती. आपल्या गुरुदेवांची ही इच्छा पूर्ण व्हावी अशी तळमळ डॉ. केशवराव यांना लागून राहिली होती. त्यांच्या प्रेरणेने परमपूजनीय श्रीगुळवणीमहाराज यांनी संग्रहीत केलेल्या साहित्याचा वापर करून व प. प. श्रीस्वामीमहाराजांनी वास्तव्य केलेल्या काही ठिकाणांना त्यांच्या विषयी माहिती गोळा करण्यासाठी भेट देऊन, हे चरित्र लिहिले आहे.

श्रीस्वामीमहाराजांनी केलेल्या साधनेला, तपश्चर्येला व त्यांच्या शास्त्रशुद्ध आचरणाला तोड नाही. अलीकडच्या काळातील प्रगाढ विद्वान्, तंत्रशास्त्राचे जाणकार, थोर साधक व बनारस हिन्दू विद्यापीठाचे भूतपूर्व उपकुलगुरू म. म. श्रीगोपिनाथ कविराज यांनी श्रीस्वामीमहाराजांचा अत्यंत आदरपूर्वक उल्लेख करताना असे म्हटले आहे की, " आद्य शंकराचार्यांनंतर सनातन धर्माचे व संन्यासाश्रमाचे शास्त्रशुद्ध पालन करणारा एकमेव वैराग्य संपन्न आदर्श म्हणून प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वती टेंबस्वामीमहाराजांचा उल्लेख करावा लागेल. "

सर्व साधकांनी आणि भक्तांनी सतत चिंतन करावे असे श्रीटेंबेस्वामीमहाराजांचे चरित्र आहे. परमपूजनीय श्रीगुळवणीमहाराजांच्या संप्रदायातील सिद्धयोगाच्या साधकांना स्फूर्तिदायक ठरावे, तसेच इतर दत्तभक्तांना या चरित्रग्रंथाच्या वाचनाने स्थूलात्मक दत्तभक्तीचा आदर्श मिळावा या हेतूने प्रेरित होऊन हे चरित्र लिहिले आहे. मात्र स्थूलातून सूक्ष्माकडे जाण्यास हे चरित्र त्यांना प्रेरित करील, असा विश्वास वाटतो.

या ग्रंथामध्ये प. प. श्रीटेंबेस्वामीमहाराजांचा "श्रीस्वामीमहाराज व श्रीथोरलेमहाराज" असा उल्लेख केलेला आहे. या मागील पूर्वपीठिका अशी आहे. परमपूजनीय श्रीगुळवणीमहाराज यांच्याकडून शक्तिपात दीक्षा घेतल्यानंतर त्यांच्या श्रीचरणांचा आश्रय करण्याचा ज्या ज्या वेळी योग आला त्या त्या वेळी त्यांच्या तोंडून आपल्या गुरुदेवांचा "थोरलेमहाराज" असा उल्लेख होत असताना ऐकले होते. आम्ही परमपूजनीय श्रीगुळवणीमहाराज यांचा "महाराज" असा उल्लेख करीत असू. त्यामुळे त्यांचे गुरू ते "श्रीथोरलेमहाराज" हे ओघानेच आले!

हे चरित्र लिहिण्यासाठी डॉ. केशवराव जोशी मला प्रेरणा करूनच थांबले नाहीत; तर ते मला वारंवार उत्साहित करीत, स्फूर्ती देत आणि प्रसंगी माझ्यातील आळस, अज्ञान वगैरे उणेपणा उदारबुद्धीने सहन करीत. त्यांनी हे चरित्र लेखनाचे कार्य माझ्याकडून पूर्ण करून घेतले. खरे म्हणजे या चरित्रलेखनाचे श्रेय त्यांचेच आहे.

या वेळी माझे ज्येष्ठ बंधुतुल्य गुरुबंधू कै. नानासाहेब भागवत यांच्या माझ्यावरील अकृत्रिम प्रेमाची मला प्रकर्षाने आठवण येते. त्यांच्यामुळेच मला श्रीगुरुचरणांचा लाभ झाला आणि साहित्यातील धडेसुद्धा मी त्यांच्याकडूनच घेतले. त्यांचे माझ्यावर अनंत उपकार झाले आहेत.

डॉ. केशवराव यांनी मला श्रीस्वामीमहाराजांचे चरित्र लिहिण्याची प्रेरणा दिली खरी ; पण चाळीत राहाणारा मी—मला श्रीस्वामीमहाराजांसारख्या थोर व्यक्तीचे चरित्र लिहिण्यासाठी योग्य निवांतपणा मिळेना. ती गरज माझे गुरुबंधू श्री. बळीराम श्रीधर पुरव व त्यांच्या प्रेमळ पत्नी (गुरुभगिनी) सौ. शालिनीबाई पुरव यांनी भागविली. त्यांनी चरित्र लिहिण्यासाठी मला

आपल्या बंगल्यात बसण्याची सोय करून दिली. त्यांचे आणि माझे गुरुबंधू – भगिनीचे नाते; पण त्यांचे चिरंजीव श्री. अरुणराव व श्री. अरुणरावांच्या पत्नी सौ. मोहनाताई पुरव यांनी त्या बंगल्यातील आपल्या जागेत टेबल, खुर्ची वगैरे लेखन करण्यास लागणाऱ्या सर्व सुविधा पुरविल्या. त्याचप्रमाणे गडबड करून मला थोडा सुद्धा त्रास द्यावयाचा नाही, अशी आपल्या मुलांना सूचना देऊन, हे दांपत्य आपली सर्व जागा माझ्या स्वाधीन करून ऑफिसला जात असे. त्यांनी माझी लेखन करण्यासाठी सोय तर करून दिलीच; पण दिवसातून दोन वेळा चहाफराळाचीही सोय केली. दोघेही ऑफिसातून आल्यावर प्रथम मला चहा फराळाचे देत आणि मग आपल्या घरातील कामाला लागत असत. दोन वर्षे मी दिवसाकाठी पाच-सहा तास त्यांच्या घरी हे चरित्र लिहीत बसत असे. या दांपत्याने माझ्यावर हे जे उपकार केले ते मी विसरू शकणार नाही.

या चरित्रग्रंथामध्ये ब्राह्मणकुटुंबात होणारे सोहळे, व्रते, सण वगैरेंची संपूर्ण माहिती मला माझे गुरुबंधू श्री. विठ्ठल नरहर गोगटे व त्यांच्या पत्नी सौ. राधाबाई गोगटे यांनी पुरविली आहे. चरित्र लेखनासाठी मला वारंवार उत्तेजन देण्याचे काम श्री. अण्णासाहेब गोगटे यांनी केले आहे. त्यांच्या ऋणाचा मी येथे नम्रपणे उल्लेख करतो.

ब्राह्मणकुटुंबामध्ये होणारे शोडषसंस्कार वगैरे विषयी शास्त्रीय माहिती मला श्री. प्रद्युम्नशास्त्री काजरेकर यांनी पुरविली. प्रसंगी पाहिजे असलेले शास्त्रीय ग्रंथही त्यांनी मला वापरण्यासाठी दिले. त्यांच्याही मदतीचा मी नम्रपणे उल्लेख करतो.

आता हे सर्व करण्यासाठी संसारात राहून मी वेळ कसा काय काढू शकलो हे कोडे राहतेच. माझी पत्नी सौ. उमा हिने गेल्या

दहा वर्षांहून अधिक काळ मला संसाराच्या बंधनातून मुक्त करून या कार्याला वाहून घेण्यास मोकळीक दिली. संसाराच्या सर्वच जबाबदाऱ्या तिने आपल्या एकटीच्याच शिरावर घेतल्या म्हणून तर मी दिवसाकाठी पाचसहा तास लेखन करू शकलो. अर्थात् माझ्या पत्नीचे मी आभार मानीत नाही.


हे चरित्र लिहिण्याची प्रेरणा देऊन डॉ. केशवराव यांनी मला श्रीस्वामीमहाराजांच्या चरित्राशी एकरूप होण्यासाठी लागणारी साधना करण्याची संधी प्राप्त करून दिली. त्यामुळे श्रीस्वामी-महाराजांबद्दल माझ्या हृदयात उत्कट भक्ती निर्माण झाली. हा मला मिळालेला फार मोठा लाभ आहे. श्रीथोरल्यास्वामीमहा-राजांच्या या वाङ्मयीन सेवेने श्रीगुरुदेव संतुष्ट होऊन जीवन धन्य व कृतार्थ व्हावे म्हणून त्यांच्या चरणी विनम्रभावाने प्रार्थना आहे.

श्रीथोरलेस्वामीमहाराज यांच्या या चरित्राच्या सर्व खंडांच्या पहिल्या व पुढील सर्व आवृत्तीच्या प्रकाशनाचे हक्क व्यवस्थापक, सिद्धयोग प्रकाशन यांना दिले आहेत.

श्रीगुरुचरणसेवाकांक्षी
द. सा. मांजरेकर

अनुक्रमाणिका


श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य
श्रीवासुदेवानन्दसरस्वती टेम्बेस्वामीमहाराज





इंदूरच्या राणी इंदिरादेवी होळकर यांनी श्रीथोरलेस्वामी-महाराज यांच्या माणगाव येथील जन्मस्थानावर बांधलेले एकमजली घर (पृ. २८७)

श्रीक्षेत्र नरसोबावाडी
श्री. प. प. श्रीनारायणस्वामीमहाराज यांचे मंदिर





श्रीमन् सिद्धयोगाचार्यवर्य महायोगी श्रीसन्तगुळवणीमहाराज श्रीक्षेत्र नरसोबावाडी येथील श्रीथोरलेस्वामीमहाराज यांच्या मंदिरातील पादुकांची पूजा करीत असताना.


सिद्धमहापुरुषाची गुहा




माणगाव जवळील 'जांभळीची आड' नावाच्या ज्या डोंगरा-वरील गुहेत बसून श्रीथोरलेस्वामीमहाराज साधना करीत असत ती गुहा (पृ. १२३ ते १२६)



श्रीदेवीयक्षिणी – ग्रामदेवता माणगाव (पृ. १९०)




श्रीथोरलेस्वामीमहाराज ज्या जागी जन्माला आले त्या खोलीच्या आतील दृश्य. चौथऱ्यावर श्रीस्वामीमहाराजांच्या पादुका स्थापन केल्या आहेत. मागे श्रीदत्तात्रेयांचे, त्याच्यावर श्रीस्वामीमहाराजांचे व त्यांच्या डाव्या हाताला श्रीसीताराम-महाराजांचे छायाचित्र.



श्रीदत्तदेवस्थान माणगाव – गाभाऱ्यातील दृश्य (पृ. २८७)

योगिराज सद्‌गुरु
श्रीसंत वामनरावजी गुळवणीमहाराज



शक्तिपाताचा महामेरू। बहुत जनांसी आधारू।
ब्रह्मस्थितीचा निर्धारू। शांभव योगी॥

॥ श्रीगुरुःशरणम् ॥

॥ ॐ श्रीमद् अमृतमूर्तये श्रीदत्तवासुदेवाय नमः ॥

★ श्रीथोरलेस्वामीमहाराज ★

श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य श्रीवासुदेवानन्दसरस्वती टेंबेस्वामीमहाराज यांचे चरित्र

प्रास्ताविक

महापुरुषांच्या जीवनाचा उद्देश व हेतू :-

महापुरुषांची चरित्रे सामान्यांना खऱ्या अर्थाने आकलन होणे कठीण असते. त्यांच्या जीवनचरित्राचा–मानवी लीलांचा–उद्देश आमच्या जाणिवेपलीकडे असतो. ईश्वरी इच्छेने त्यांनी देह धारण केलेला असतो. ईश्वर नियोजित कार्य पार पाडण्यासाठी त्यांचा जन्म असतो. काही जणांचे असे मत आहे की, असे महापुरुष जन्मतःच परिपूर्ण असतात. त्यांच्यामध्ये जन्मजातच कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम् असे सामर्थ्य असते. साधना करून पूर्णता प्राप्त करून घेण्याची त्यांना आवश्यकता नसते. या उलट काही जणांचे असे म्हणणे आहे की, मानव देह धारण केल्यावर त्या देहाला उचित अशा उणिवा या अवतारी पुरुषांमध्ये सुद्धा असतात; परंतु सामान्य लोकांना ज्या साधना करणे अत्यंत कठिण असते अशा साधना सहजगत्या करून हे महापुरुष – हे ईश्वरी अवतार – देव पदाला पोहोचतात. अशा महामानवांच्या जीवितकार्याचे मूल्यमापन आम्ही आमच्या बुद्धीच्या कुवतीप्रमाणे करीत असतो. श्रीमद् आद्य शंकराचार्यांनी मायावादाचा पुरस्कार करून अद्वैत वेदान्ताचे प्रतिपादन केले म्हणून आचार्य कठोर वेदान्ती होते असे काहीजण मानतात; तर त्यांनी रचलेली भक्तिपूर्ण स्तोत्रे वाचून ते कोमल हृदयाचे भक्तोत्तम होते असे इतरांचे म्हणणे आहे. श्रीरामदासस्वामींचा अवतार राम-

भक्तीची पताका महाराष्ट्रामध्ये फडकविण्यासाठी झाला असे एक पक्ष मानतो; तर महाराष्ट्रामध्ये हिंदवी स्वराज्याची स्थापना करून हिन्दू धर्माचे रक्षण करणे हाच समर्थांच्या जीवनाचा प्रमुख उद्देश होता असे दुसरे कित्येकजण मानतात.

श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य श्रीवासुदेवानंदसरस्वती टेंबेस्वामीमहाराज यांच्या जीवनाकडे पाहताना सुद्धा आम्ही असाच दृष्टिकोन ठेवून त्यांच्या जीवितकार्याचे भिन्नभिन्न अर्थ लावीत आलो आहोत. सनातन धर्माचा प्रचार करण्यासाठी आणि त्याचे काटेकोर पालन करण्याचा आदर्श लोकांसमोर ठेवण्यासाठी श्रीस्वामी-महाराजांचा अवतार झाला असे एक मत आहे. श्रीस्वामीमहाराजांनी दत्तभक्तीचा प्रसार आसेतुहिमाचल केला. त्यामुळे त्यांच्या जीविताचे प्रमुख कार्य भक्तीचा मळा फुलविणे हेच होते असा निष्कर्ष कोणी कोणी काढतात. कर्मठपणाच्या नावाखाली होणाऱ्या अन्यायांवर कठोर प्रहार करून वैदिक धर्माचे शुद्ध स्वरूप लोकांपुढे ठेवणे हेच त्यांच्या जीविताचे कार्य होते असे दुसरे कोणी म्हणतात. त्यांनी रचलेल्या दत्तपुराण, दत्तमाहात्म्य इत्यादी ग्रंथांमध्ये ठिकठिकाणी योगाची महती वर्णन केलेली आहे. श्रीस्वामीमहाराजांनी स्वत: हठयोगामध्ये प्रावीण्य मिळविले होते. उत्तर आयुष्यात त्यांनी अनेक जणांना योग शिकविला. त्यांचे शिष्य श्रीगोविंदराव पंडित, शिप्रीकर हे हठयोग समाधीमध्यें फार पुढे गेले होते. योगबळाने त्यांनी लोकांचे असाध्य रोग बरे केले होते. असे म्हणतात की, समाधी अवस्थेमध्ये असताना भगवान् शंकर त्यांच्याशी बोलत असत. असे शिष्य निर्माण करून हठयोगाचा प्रसार करणे हा सुद्धा श्रीस्वामीमहाराजांच्या जीवितकार्याचा एक भाग होता असे काहीजण मानतात. तसेच श्रीमद् आद्य शंकराचार्यांच्या नंतर संन्यास धर्माचे काटेकोर पालन करणारा एकमेव वैराग्यसंपन्न संन्यासी असे श्रीस्वामीमहाराजांचे

काही विद्वानांनी वर्णन केले आहे. तेव्हा संन्यास धर्माचा खरा आदर्श लोकांसमोर ठेवणे हे सुद्धा त्यांच्या जीविताचे उद्दिष्ट होतें असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. श्रीस्वामीमहाराजांनी मोठी धार्मिक ग्रंथ रचना करून ठेवली आहे. त्यामुळे महर्षी व्यासांप्रमाणे धार्मिक ग्रंथ रचना करून धर्म रक्षणाचे कार्य करणे हे सुद्धा त्यांचे जीवितकार्य होते असे म्हणता येईल. अनेक मुमुक्षू जीवांना अनुग्रह देऊन श्रीस्वामीमहाराजांनी त्यांच्या जीविताचे सोने केले. प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वती टेंबेस्वामीमहाराजांच्या जीविताचे असे हे अनेक पैलू होते. या विविध पैलूंनी त्यांचे जीवनरत्न चमकून गेले.

दत्तावतार प. प. श्रीटेंबेस्वामीमहाराज हे सर्व काही होते व या पलीकडे पुष्कळ काही होते. त्यांच्या जीवनाचा जेवढा भाग आम्हाला आकलन झाला असे वाटते त्यावरून त्यांच्या अवतार ग्रहणाचे उद्दिष्ट आम्ही ठरविले आहे. खरे म्हणजे सत्पुरुषांचे अवतरण या पृथ्वीवर का होते ते चिकित्सक बुद्धीला कधीच समजणार नाही. नद्या का वाहतात, दिवसरात्र का होतात, ऋतुचक्र का पालटते आणि एका युगामागून दुसरे युग का येते हे कोण सांगू शकणार ? ह्या सृष्टिक्रम आहे एवढेच आम्ही म्हणू शकतो. तीच गोष्ट सत्पुरुषांच्या पृथ्वीवरील अवतरणाची आहे. प. प. श्रीटेंबेस्वामी-महाराजांचा जन्म ईश्वरी योजनेनुसार झाला होता. एका सामान्य कुटुंबात जन्म घेऊन लहानपणापासून साधनारत राहून त्यांनी स्वतःचा अवतारी पुरुष म्हणून विकास करून घेतला. किंबहुना असेही म्हणता येईल की, जन्मजात परिपूर्ण असून सुद्धा त्यांनी सामान्यांना आदर्श घालून देण्यासाठी आपणही सामान्य आहोत असे भासवून कठोर साधना करून देवकळा प्राप्त करून घेतली.

भारतवर्षाच्या या पुण्यभूमीमध्ये जे अवतारी पुरुष होऊन गेले किंवा जे थोर सत्पुरुष होऊन गेले त्यांच्या चरित्रांचा आढावा

घेताना एक गोष्ट प्रामुख्याने आपल्या नजरेला येते की, सामान्य माणसांप्रमाणेच त्यांना सुद्धा षड्‌रिपू, अष्टपाश या मानवदेहसुलभ विकारांनी छळले होते. मात्र स्वतःच्या मनावर, भावनांवर तावा मिळविण्यासाठी रात्रंदिवस युद्धाच्या प्रसंगाला तोंड देत, या सर्व शत्रूंवर मात करून ते नराचे नारायण झाले. महापुरुष झाले. महामानव, सत्पुरुष व थोर भक्त या पदवीला प्राप्त झाले.

खरे पाहता सत्पुरुषांच्या, अवतारी पुरुषांच्या जीवनाकडे मानवी दृष्टिकोनातून पाहणेच आमच्या हिताचे ठरेल. त्यामुळे ते आमच्या सारखेच होते व आमच्या मध्ये आहेत तशा कमतरता सुरुवातीला त्यांच्या मध्येही होत्या, या जाणिवेने आम्हाला ते अधिक जवळचे व अनुकरणीय वाटतील. मर्यादा पुरुषोत्तम भगवान् श्रीरामचंद्र आणि पूर्णावतार भगवान् श्रीकृष्ण हे विष्णूच्या दहा अवतारांपैकी दोन अवतार आम्हाला आधिक प्रिय व अधिक जवळचे वाटतात. त्यामागील कारण हेच आहे की, या दोन अवतारांमध्ये पुष्कळ ठिकाणी मानवसुलभ भावनांचे दर्शन घडते. प्रभू रामचंद्रांच्या चरित्राचे अनुशीलन केल्यावर त्यांच्या जीवनामध्ये ठिकठिकाणी मानव डोकावताना दिसतो. राजा दशरथाने कैकयीला दिलेल्या वरांच्या प्रभावाने यौवराज्य पदला मुकलेला राम, भ्राता लक्ष्मणासमोर त्राग्याचे उद्‌गार काढणारा राम आणि सीतामाईच्या वियोगामुळे शोक करणारा राम हा भगवान् रामचद्रांपेक्षा राजा-राम म्हणूनच आपल्याला जवळचा वाटतो. श्रीकृष्णाच्या बाललीला आमच्याच बालपणात घडलेल्या आहेत असे आम्हाला वाटते. गवळ्यांच्या घरी दह्या-दुधाची चोरी करणे, खोडया करणे, सवंगड्यांबरोबर गायी राखीत असताना यमुनेच्या काठी खेळ खेळणे, या सर्व लीला मानव देहाला उचित अशाच आहेत. त्यांमध्ये विलक्षण असे काही नाही. त्यामुळेच श्रीकृष्णांच्या चरित्रातील विलक्षण

अशा भागापेक्षा वर वर्णन केलेला भागच आपल्याला अधिक आवडतो.

प. प. श्रीटेंबेस्वामीमहाराजांच्या चरित्राकडे आपल्याला या दृष्टिकोनातून पाहता आल्यास एका निष्ठावन्त पण गरीब ब्राह्मण कुटुंबामध्ये जन्म घेऊन सर्वस्वी प्रतिकूल परिस्थितीशी झगडत व मानवी शरीराला अनुरूप अशा आंतरिक शत्रूंशी सामना देत, त्यांनी आपले अवतारकार्य कसे पूर्ण केले याचे आपल्याला थोड्यातरी प्रमाणात आकलन होऊन, त्यांच्या पावलांचा मागोवा घेत, त्यांनी जी साधना व कठोर तपश्चर्या केली तशी अल्पप्रमाणात आपणही करावी या सद्हेतूने आम्ही प्रेरित होऊ शकू.

या भूतलावर भारतवर्ष ही खरोखरच साधुपुरुषांची भूमी आहे. प्राचीन काळापासून दैवी संपत्तीची जोपासना याच भूमीमध्ये होत आली आहे. भारताच्या कोणत्याही भागाचा इतिहास घ्या. प्रत्येक ठिकाणी थोर साधुमहात्म्यांनी भारताची ही परंपरा प्राचीन काळापासून चालू ठेवली आहे. हिमालयासारखी श्रेष्ठ तपोभूमी आणि गंगा, यमुना, गोदा, नर्मदा, कृष्णा– इत्यादी पापक्षालन करणाऱ्या नद्या–या महान् नैसर्गिक देणग्यांमुळे भारतामध्ये दैवी गुणांची जोपासना व्हावयाला योग्य अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. भारताचा हा आध्यात्मिक वारसा महाराष्ट्रानेही घेतला आहे. महाराष्ट्राच्या या पुण्यभूमीमध्ये ज्ञानेश्वर–तुकारामांसारखे थोर ज्ञानी व भक्त होऊन गेले. याच भूमीमध्ये भक्तिवेडा नाम्या आपल्या पदन्यासांनी पंढरीचे वाळवंट पुनीत करून गेला. याच महाराष्ट्रामध्ये जनाबाईसंगे देवाने दळणकांडण केले. "समर्थाचिया सेवका वक्र पाहे। असा सर्व भूमंडळी कोण आहे।।" अशी ग्वाही समर्थांनी येथेच दिली. महाराष्ट्राचे नंदनवन म्हणून प्रसिद्ध असलेला कोकण प्रांतसुद्धा हा वारसा मिरवीत आहे.

तपोभूमी कोकण व त्याची देणगी :--

भगवान् श्रीपरशुरामाने आपल्या तपःसामर्थ्याने कोकण भूमी निर्माण केली. त्यामुळे कोकण ही तपोभूमी झाली आहे. या भूमीच्या पूर्वेला सह्याद्री पर्वत आणि पश्चिमेला सर्व नद्या ज्यामध्ये विलीन झाल्या आहेत असा सिंधू सागर आहे. त्या सागराच्या निनादाने पुलकित झालेल्या या पवित्र भूमीतून भारताला ललामभूत झालेली नररत्ने निर्माण झाली आहेत. ज्वलंत राष्ट्रभक्तीने प्रेरित झालेले थोर देशभक्त आणि क्रान्तिकारक, थोर समाज सुधारक, अध्यात्मशास्त्रातील शिरोमणी, आपल्या कुशाग्र बुद्धीने शास्त्रांमध्ये गगन भरारी मारणारे आचार्य, संगीत आदी ललितकलांमध्ये प्रावीण्य मिळविलेले कलावन्त, प्रतिभासंपन्न चित्रकार आणि साहित्यिक या तपोभूमीने भारताला दिले आहेत. सर्वश्री वासुदेव बळवन्त, विष्णुशास्त्री चिपळूणकर, आगरकर, गोखले, लोकमान्य टिळक, हरिभाऊ आपटे, क्रान्तिवीर सावरकर यांच्या या कोकणात रत्नागिरी जिल्ह्याच्या दक्षिण टोकाला (आजचा सिंधुदुर्ग जिल्हा) सावंतवाडी संस्थानात निसर्गरम्य माणगाव या खेड्यात प. प. श्रीटेंबेस्वामीमहाराज यांचा जन्म झाला. श्रीटेंबेस्वामीमहाराज ही कोकणाची म्हणजेच पर्यायाने महाराष्ट्राची भारतवर्षाला एक महान् देणगी आहे.

रामायण घ्या किंवा महाभारत घ्या, श्रीमद् भागवत घ्या किंवा इतर कोणताही पुराण ग्रंथ घ्या, या ग्रंथांमध्ये भारताच्या त्या काळच्या वैभवाचे फार सुंदर वर्णन केलेले आढळते. वनसंपत्ती, शेती आणि पुष्ट गायींची खिल्लारे हीच त्या काळी राष्ट्राची पहिल्या दर्जाची संपत्ती मानण्यात येई. त्या काळातील पर्वतराजी, तालतमाल, कदंब, साग, जांभूळ, आम्र इत्यादि फळाफुलांनी बहरलेल्या वृक्षांनी नटलेली असे. या वृक्षांना वेढे देऊन त्यांच्या अंगावर रुळणाऱ्या, चित्रविचित्र फुलांनी युक्त अशा वल्लरींनी त्या

वनांची शोभा अधिकच वाढत असे. भुंग्यांचे थवे पुष्पातील मधाचे पान करून गुंजारव करीत फिरत असत. मोर, कोकिळा, रावे, सारस आदी पक्षी या वृक्षराजींमध्ये स्वच्छंद विहार करीत असत. मधून मधून हरिणांचे कळप निर्भयपणे वागडताना दिसत असत. मध्ये मध्ये स्वच्छ जलांनी परिपूर्ण अशी सरोवरे कल्हार, कुमुद, उत्पल इत्यादी प्रकारच्या दशदल, शतदल कमळांनी भरलेली दिसत असत. कुठे कुठे स्वच्छ पाण्याचे निर्झर खळखळ आवाज करीत अनिर्बंधपणे दौडत, लतावलयांशी फुगड्या खेळत नद्यांना जाऊन मिळत. पर्वतांच्या पायथ्याशी असणारी हिरवीगार कुरणे, त्यांमध्ये चरणाऱ्या सुदृढ गायीवासरांच्या खिल्लारांनी शोभून दिसत असत. ऋषीमुनींच्या आश्रमातून ऐकू येणारे धीरगंभीर वेदघोष आणि यज्ञवेदीतून येणारा यज्ञधूम यांनी आसमंत भरून जात असे. वर्षाकाळी भरपूर पर्जन्य पडून सस्यशामल भूमीतून सुगीच्या वेळी मोत्यांसारख्या दाण्यांचे भरपूर पीक येत असे. राष्ट्राचे खरे वैभव ते हेच होय ! याच वैभवाने माणूस सुखी होतो आणि ज्याच्या कृपेने आपणाला हे वैभव प्राप्त झाले त्या परमेश्वराचे त्याला यामुळेच वारंवार स्मरण होते.

सत्पुरुषांच्या जीवनगाथा वाचीत असताना एक गोष्ट विशेषत्वाने आपल्या नजरेला येते की, बहुतेक सत्पुरुषांचा जन्म निसर्गाच्या कुशीत झाला. ते निसर्गाबरोबर वाढले. पक्षांबरोबर कूजन करीत आणि हरिणांबरोबर बागडत त्यांचे बालपण गेले. निसर्गावर त्यांचे प्रेम होते. निसर्गाशी हितगुज करण्यात त्यांना आनंद वाटत असे. त्यामुळे जीविताकडे पाहण्याची त्यांची दृष्टी कवीची म्हणजे द्रष्ट्याची झाली. प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वती टेंबेस्वामीमहाराजांचे बालपण माणगाव-सावंतवाडीच्या निसर्गरम्य परिसरात गेले. भावी आयुष्यात सर्वात्मभावाने वावरणाऱ्या श्रीस्वामींच्या स्वभावाचे रहस्य हे

असे असावे.

तत्कालीन महाराष्ट्राची सामाजिक व धार्मिक परिस्थिती :–

ज्या काळी श्रीटेंबेस्वामीमहाराजांचा जन्म झाला त्या काळी सह्याद्रीच्या कुशीत वसलेले सावंतवाडी संस्थान वर वर्णन केलेल्या भारताच्या वैभवाचा वारसा मिरवीत होते. तेथील वनश्री साग, पळस, आंबा, काजू इत्यादी वृक्षांनी समृद्ध झालेली होती. घराघरा भोवती नारळी–पोफळीच्या बागा होत्या. वेळेवर पर्जन्यवृष्टी होऊन लोकांचा उदरनिर्वाह होण्याएवढी शेती पिकत असे. या समृद्धीचे कारण असेही असू शकेल की, ज्या भूमीमध्ये सत्पुरुषाचे आगमन व्हावयचे असते तेथे निसर्ग अगोदर पासूनच आपल्या औदार्याची खैरात करीत असतो. त्या देवमानवाच्या स्वागतासाठी निसर्गच सर्वप्रथम सिद्ध होतो. सृष्टीमध्ये सगळीकडे प्रसन्नता, तृप्ती, समाधान आणि आनंद भरलेला असतो. भगवान् श्रीकृष्णाचे बालपण ज्या प्रदेशात गेले तेथील निसर्गाचे आणि लोकांच्या सुखी व समृद्ध जीवनाचे अशाच प्रकारचे वर्णन त्यांच्या जीवनचरित्रात केलेले आढळते. प. प. श्रीटेंबेस्वामीमहाराजांच्या जन्माचे स्वागतही निसर्गाने अशाच प्रकारे केले. श्रावणातील कृष्ण पंचमीला सूर्योदया-पासून सव्वीस घटिकांनी या युगपुरुषाचा अवतार झाला. वासुदेव श्रीकृष्णाच्या जन्म वेळप्रमाणेच याही वेळी आकाशात कृष्णमेघांनी दाटी करून माणगावच्या पुण्यभूमीवर अनंत धारांनी अमृत वर्षाव केला म्हणूनच की काय या योगी पुरुषाचे नाव वासुदेव असे ठेवण्यात आले.

ज्या काळची गोष्ट आम्ही सांगत आहोत त्या काळी प्रत्येक गाव आपल्यापरीने स्वयंपूर्ण असे. कोकणात त्या काळी प्रत्येक गावामध्ये ब्राह्मण, शेतकरी, तेली, लोहार, सुतार, कोष्टी, महार, चांभार इत्यादी लोक वाडीवाडीतून गुण्यागोविंदाने राहत असत.

भटवाडी, सुतारवाडी, महारवाडा अशी या वाड्यांची ज्ञातिसूचक नावे असत. गावाच्या प्रमुख दैवताच्या देवळाजवळ देऊळवाडी असे. तेथे मंदिराचे मानकरी, पुजारी व देवळी यांची घरे असत. गावाच्या विकासाचा आपण एक घटक आहोत, ही जाणीव ठेवून प्रत्येकजण आपापले कर्तव्य आनंदाने पार पाडीत असे.

स्ववर्णाश्रमोचित । फलाभिमान रहित ।
कर्मे करिता सतत । शुद्धचित्त होय नर ।।

श्रीस्वामीमहाराजांच्या या शब्दांमध्ये त्यावेळच्या समाजाचे यथार्थ वर्णन केलेले आहे. प्रत्येक जात जमात आपापले कर्तव्य पार पाडीत असल्यामुळे गावामध्ये सुख व समाधान नांदत असे. ब्राह्मणाचा जेवढा आदर होत असे तसाच आदर लोहार, सुतार आदी जमातींचा होत असे; कारण या कृषिप्रधान देशात शेतीची अवजारे बनविणारे हे कारागिर शेतकऱ्याचे खरे साहाय्यकर्ते होते. पावसाळ्यापूर्वी सुतार नांगर बनवून देत असे. लोहाराला औताला फाळा बनवून द्यावा लागे व सुगीच्या दिवसात विळ्याकोयत्यांना धार लावून द्यावी लागे. पुष्कळ गावात सुतारच लोहाराचे काम करीत. कोकणातील लोकांची अंगावरच्या वस्त्रांची गरज विशेष मोठी नाही. पुरुषांना नेसावयला चवाळी पंचा, डोक्याला टापशी व उत्तरीय म्हणून आणखी एखादा पंचा पुरत असे. ही वस्त्रे गावचे कोष्टीच विणीत आणि गावच्या पेठेत स्वस्त दराने विकीत. बायकांसाठी बांडलुगडी व खण कणकवलीच्या पेठेतून येत. शेतकरी आपण पिकविलेल्या धान्याचा थोडातरी भाग, जे शेती करीत नसत, त्यांना देत असत. ब्राह्मणवर्ग ब्रह्मकर्म करून आपला समाज धारणेचा वाटा उचलीत असे. आपल्या घरी वर्षातून एक वेळ ब्राह्मण भोजन होऊन मंत्रघोष व्हावा अशी प्रत्येक गावकऱ्याची इच्छा असे. वर्षाकाठी एक

वेळ भट वाढावयाची– वाढवळीची– प्रथा अजूनही कोकणात आहे. घरातील लहान-थोर सर्व मंडळी भल्या पहाटे उठून, सुस्नात होऊन, अंगण व सर्व घर झाडून सडासंमार्जन करीत. सारविलेल्या जमिनी-वर ओल्या खडीने रांगोळी काढीत. आपल्या घरी भट जेवणार त्याची ही पूर्व तयारी. ब्राह्मणांना स्वयंपाकासाठी आपल्या परसातील ताज्या भाज्या तोडून, चिरून, मांडव घातलेल्या अंगणामध्ये अथवा गुरांच्या गोठ्यात किंवा कावणामध्ये एका बाजूला, घासूनपुसून स्वच्छ केलेल्या पितळेच्या भांड्यांमध्ये ठेवण्यात येत. माडावरून नारळ पाडून त्याचे खोवरे खोवून ठेवण्यात येत असे. एका बाजूला तांदूळ, डाळ, गूळ, मीठ-मसाला, चिंच, दूध, तूप वगैरे प्रसादाच्या सामुग्रीची सिद्धता केलेली असे. चूल मांडण्यासाठी दगड व सर्पणा-साठी लाकडे तयार ठेवलेली असत. जेवण्यासाठी फणसाच्या किंवा वडाच्या ताज्या पानांच्या बनविलेल्या पत्रावळी व द्रोण तयार असत. ब्राह्मणाने स्वतः विहिरीवरून पाणी आणून यजमानाच्या घरचे देव-कार्य करावयाचे. ब्राह्मण स्वतः स्वयंपाक शिजवून भोजन करीत. स्वयंपाक शिजत असताना नवीन मांडलेल्या चुलीतून जळत्या लाकडांचा वास व धूर निघे. तो यज्ञधूमाप्रमाणे पवित्र मानला जाई. यजमानाला वाटे– "आज आपल्या घरबाटातील देवदेवता संतुष्ट झाल्या. त्यामुळे आपली शेती चांगली पिकेल व आपल्या घरात रोगराई येणार नाही." ब्राह्मण जेवून झाल्यावर शिल्लक राहिलेला स्वयंपाक प्रसाद म्हणून यजमान आणि त्यांचे कुटुंबीय ग्रहण करीत. ब्राह्मणांना भरपूर दक्षिणा मिळे. ब्राह्मणभोजनानंतर मंत्रघोष होई. दहा-बारा वैदिक ब्राह्मणांनी सस्वर केलेला तो मंत्रघोष आसमंतात घुमत असे आणि तेथील वातावरण अधिकच पवित्र करीत असे.

तया देशीचे लोक सकळ । पुण्यमार्गगामी केवळ ।
निज वर्णाश्रमधर्म निवळ । पाळिती दयाळ सर्व भूतीं ।।

असे त्या वेळच्या सामाजिक परिस्थितीचे वर्णन गुरुभक्त श्रीगांडामहाराज यांनी केले आहे.

गावातील सणांना गुढीपाडव्यापासून सुरुवात व्हावयची. गुढीपाडव्याला घरोघर गुढया उभारल्या जात व गोडधोड जेवण होई. वसताचे आगमन झालेले असे. आंब्या काजूंनी मोहर टाकून फळे धारण करावयला सुरुवात केलेली असे. यावेळी वातावरणात एक प्रकारचा आनंद भरलेला असतो. कोकणामध्ये सुगीच्या दिवसा एवढेच हेही दिवस आनंदाचे असतात. या दिवसान निसर्ग आपले वैभव अनंत हातांनी देत असतो. आंबा, काजू, फणस ही तर कोकणची मुख्य फळे. यांच्याबरोबर रातांबी, जांभूळ, करवंदे, रामफळे, बोरे वगैरे पुष्कळ प्रकारच्या सुमधुर फळांची समृद्धी होत असते. त्यानंतर येतो पावसाळा. हे शेतकऱ्याचे कामाचे दिवस. कोकणात शेतकऱ्याला शेतीसाठी फार श्रम करावे लागतात. शेतीच्या कामातून तो थोडा मोकळा होतो न होतो एवढ्यात सणासुदीचा श्रावणमास येतो. सगळी सृष्टी हिरवेगार वस्त्र ल्यालेली असते. पिवळ्याधमक उन्हातून पावसाचे टपोरे थेंब पडताना पाहून फार आनंद होतो. शिगोशिग भरलेल्या तळ्यामध्ये जेव्हा हे थेंब पडतात तेव्हा पाण्यात बुडबुड्यांचा विलक्षण खेळ सुरू होतो. तळ्यात फुललेल्या कमळांना जेव्हा हे थेंब हेलकावे देऊन हैराण करतात तेव्हाची ती शोभा पाहून मन हरखून जाते. श्रावणात येते नागपंचमी. त्या अगोदरची ज्येष्ठातील वटपौर्णिमा व श्रावणातली नागपंचमी हे महिलांचे आनंदाचे सण. मग नारळी पौर्णिमा. पावसाळ्यात हर्षातिरेकाने बेभान झालेल्या सागराच्या पूजेचा सण. नंतर दहीकाल्याचा सण. श्रावणानंतर भाद्रपदात गणेश चतुर्थी येते. कोकणात गणेश चतुर्थीचा सण सर्वात मोठा सण मानण्यात येतो. घरोघरी गजाननाची मंगलमूर्ती स्थापून पाच दिवस तरी हा सण

मोठ्या आनंदाने साजरा केला जातो. नवरात्र व दिवाळी हे सण कोकणात विशेष मोठ्या प्रमाणात साजरे केले जात नाहीत. मोठ्या दिवाळीत तुलसीविवाह हा वाडीवाडीमध्ये साजरा होणारा सामुदायिक सण. वाडीतील सर्व मंडळी एकत्र जमून प्रत्येक घरासमोरील तुळशीचा विवाह पार पाडतात. यावेळी पोहे, कुरमुरे व उसाचे करवे प्रसाद म्हणून वाटण्याची चाल आहे. आणि शेवटी होळी. प्रत्येक गावात एक मुख्य गावहोळी होते. होळीचा अथवा शिमग्याचा सण हा कोकणातील दुसऱ्या क्रमांकाचा मोठा सण. या सणात शेबय मागण्याची रीत आहे. या दिवसात खेळे सोंगे घेऊन घरोघरी जाऊन नाच करून दाखवितात. गावात रात्री दशावतारी नाटके होतात. दशावतारी नाटके करणाऱ्या मंडळींमध्ये पुरुषच स्त्री भूमिका करतात. पिढ्यान् पिढ्या ते तोच व्यवसाय करीत असतात. शिमग्यामध्ये होणाऱ्या नाटकांमध्ये भरपूर ग्राम्य विनोद असतो. पण विनोद करण्याचेच हे दिवस असल्यामुळे त्या सणाचा एक भाग म्हणूनच सर्वजण या विनोदाचा स्वीकार करतात. वर्षाकाठी गावाचे एक गावभोजन होई. यावेळी गावाच्या सीमेवर आकाशाखाली स्वयंपाक करून सर्वांनी जेवावयाचे असते. या सर्व सणांमध्ये गावातील लोक आनंदाने भाग घेत असत.

अशा या आनंदी समाजरचनेमध्ये प. प. श्रीटेंबेस्वामीमहाराजांनी अवतार घेतला होता.

माणगाव व आसपासचा परिसर :—

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या पर्वातील ही गोष्ट आहे. भारतावर परकीयांची सत्ता आपले पाय घट्ट रोवून बसली होती; तरी सुद्धा श्रीज्ञानेश्वरमहाराजांपासून श्रीतुकाराम, श्रीरामदास इत्यादी संतांच्या लोक जागृतीच्या कार्यामुळे महाराष्ट्रामध्ये स्वधर्मनिष्ठा आणि राष्ट्राभिमान जागृत होता. वाडवडिलांनी घालून

दिलेल्या आचार विचारांची अजूनही जोपासना होत होती. अखंड दारिद्र्याशी झगडत स्वधर्मावर अधिष्ठित जीवनमूल्यांची शक्य तेवढी जोपासना करीत, मराठी माणूस जगत होता. महाराष्ट्रामध्ये कोकण ही कष्टाळू लोकांची भूमी आहे. दोन वेळचा पोटाचा प्रश्न सोडविण्यासाठी आजही येथील भूमिपुत्राला निसर्गाशी झगडावे लागते. खरे म्हणजे निसर्गाने जेवढे दिले तेवढे कृतज्ञतेने स्वीकारून त्यातच तो समाधान मानतो. जो निसर्ग आपणास अनंत हातांनी देतो तो जेव्हा कृपण होतो किंवा रुद्ररूप धारण करून आपणापाशी असेल नसेल ते हिरावून घेतो, तेव्हा ती ईश्वराचीच इच्छा आहे, असे तो मानतो. आजही कोकणामध्ये अशा अर्थाची म्हण प्रचलित आहे की, " राजाने मारले आणि पावसाने झोडपले, तर सांगायचे कुणाला ? " त्या मागील भूमिका हीच आहे.

कोकणामध्ये रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग व ठाणे या चार जिल्ह्यांचा समावेश होत असला, तरी कोकण म्हटल्यावर रत्नागिरी जिल्हाच प्रामुख्याने नजरे समोर येतो. या रत्नागिरी– आता सिंधुदुर्ग–जिल्ह्याच्या दक्षिण टोकाला सावंतवाडी नावाचे संस्थान होते. आज हे संस्थान संघराज्यात विलीन झाले आहे. सावंतवाडी संस्थान जणू सह्याद्रीच्या कुशीतच वसले आहे. त्याच्या सभोवार सह्याद्रीच्या लहान मोठ्या टेकड्यांमध्यें दऱ्याखोरी व सपाट प्रदेश आहे. या सपाट प्रदेशावर लहान लहान गावे वसली आहेत. येथील राजघराणे खेमसावंत यांचे आहे. राजधानीचे गाव सावंतवाडी आहे. सावंतवाडीपासून आठ-दहा मैलांवर माणगाव वसले आहे.

माणगाव हे खोरे आहे. या खोऱ्यात साळगाव, झारापी, कोलगाव, माणगाव, आकेरी तसेच आंबेरी, शिवापुरी वगैरे गावे आहेत. सभोवारच्या सह्याद्रीच्या टेकड्यांवर घनदाट वनश्री आहे. वसंतऋतूमध्ये ज्यावेळी ही वनश्री विविध रंगांची नवीन पालवी धारण

करते त्यावेळी ही पर्वतश्रेणी नवरंगांची उधळण केल्याप्रमाणे शोभिवन्त दिसते. वसंतऋतू सुरू व्हावयाच्या अगोदरच त्या ऋतुराजाच्या आगमनासाठी उताविळा झालेला कोकिळ पंचमात ताना मारायला सुरुवात करतो. मधूनच कवड्याची आर्त लकेर ऐकू येते, तर भारद्वाज पक्षी अधून मधून गूढ साद देत असतो. ऋतू कोणताही असो, दयाळ, बुलबुल वगैरे पक्षांच्या स्वैर ताना येथे नेहमीच ऐकू येतात. माकडाची हुप्प आजूबाजूच्या दऱ्याखोऱ्यांत घुमते आणि तेथील शांततेची अधिकच तीव्रतेने जाणीव करून देते.

माणगाव खोऱ्यात काळ्या रंगाच्या विविध आकारांच्या प्रचंड शिळा सगळीकडे पसरलेल्या आहेत. पावसाच्या आणि वाऱ्याच्या माऱ्याने त्यांचे पृष्ठभाग अगदी गुळगुळीत झाले आहेत. कित्येक शिळा मध्येच दुभंगल्यामुळे त्यांनी अजस्त्र देवमाशांप्रमाणे तोंडे उघडली आहेत असे वाटते. अशाच दोन प्रचंड शिळा आकाशात एकमेकीला भिडल्यामुळे जांभळीची आड या डोंगरामध्ये एक गुहा निर्माण झालेली आहे. माणगाव हे बारा वाड्यांचे टुमदार गाव असून तेथील वस्ती आज चार ते पाच हजारांची आहे. गावात हिंदू, मुसलमान व ख्रिश्चन लोक आहेत. आज ब्राह्मणांची आठ दहा घरे आहेत. माणगाव हे सुपीक खोरे असल्यामुळे येथील लोक दोन वेळा पोटभर अन्न खाऊन सुखी आहेत. सध्या कुडाळ–सावंतवाडी मार्गे जाणाऱ्या मुंबई–गोवा हमरस्त्याला दोन फाटे फुटून ते माणगावाला जातात. एक रस्ता सावंतवाडी–आकेरी–माणगाव असा आहे. हा रस्ता पक्का डांबरी आहे. या रस्त्याच्या दुतर्फा मनोहर निसर्ग सौंदर्य आहे. दुसरा रस्ता कुडाळवरून झाराप़ी–साळगाव–माणगाव असा आहे. हा रस्ता कच्चा आहे व पावसाळ्यात तो बस गाड्यांना बंद असतो. या मार्गावरून राज्य परिवहन मंडळाच्या बसगाड्या धावतात. सावंतवाडीवरून येणारी बस माणगाव वरून

पुढे हणमंत गडापर्यंत जाते. प. प. श्रीटेंबेस्वामीमहाराजांच्या जन्मस्थानाकडे जाणारी पाऊलवाट मुख्य रस्त्याला जेथे मिळते तेथे बसचा विनंती थांबा (रिक्वेस्ट स्टॉप) आहे. माणगावचे खोरे पूर्वीपासून तापसरीचे खोरे म्हणून प्रसिद्ध आहे. आजही येथील पाणी नवागताला बाधल्याशिवाय राहत नाही.

ज्यावेळची गोष्ट आम्ही सांगत आहोत त्यावेळी दोन पायावाटा— पाणंदी— माणगावच्या मुख्य रस्त्यापासून निघून देऊळवाडीला येऊन मिळत. एक यक्षिणीच्या देवळाजवळ व दुसरी सध्या जेथे दत्तमंदिर आहे त्याच्या पाठीमागे. आज या दोन्ही वाटा अस्तित्वात नाहीत. त्या ऐवजी या दोहोंच्या मध्यावरून एक साधारण पक्की वाट शंकराच्या देवळाजवळ देऊळवाडीला मिळते. गावाच्या उत्तरेकडे पूर्वपश्चिम वाहिनी निर्मला नदी आहे. ही नदी सह्याद्रीमध्ये शिवापुरीच्या जवळपास उगम पावून माणगावरून पश्चिमेला वाहत जाते. भंगसाळ जवळ आणखी दोन प्रवाह या नदीला मिळतात. या संगमाला येथे तिसव म्हणतात. तेथून ती कर्ली नदीला मिळून पुढे देवबाग—मालवण येथे अरबी समुद्राला मिळते. या नदीला पूर्वी नाव नव्हते. माणगावची नदी म्हणूनच ती ओळखली जात असे. तिला निर्मला नदी हे नाव श्रीवासुदेवशास्त्री टेंबे यांनीच दिले. एकदा श्रीशास्त्रीबुवा श्रीक्षेत्र नरसोबाच्या वाडीवरून माणगावला परतत होते. त्या दिवशी ते नरसोबाच्या वाडीहून परत येणार हे गावातील लोकांना ठाऊक होते म्हणून ते भजनी मंडळी घेऊन बुवांना सामोरे जाण्याच्या तयारीत होते. संध्याकाळ व्हावयाला अजून बराच अवकाश होता. अशा वेळी श्रीशास्त्रीबुवा माणगावला येऊन पोहोचले. बुवा प्रथम आले ते नदीवर. ते तेथे पोहोचतात एवढ्यात नदीतून एक दिव्य स्त्री बुवांसमोर आली. ती हिरवे लुगडे नेसलेली असून तिच्या पायात नूपुर, कंबरेला रत्नजडित

सुवर्णाची मेखला, कानात कुंडले व मस्तकावर सुवर्णाचा मुकुट होता. त्या स्त्रीच्या शरीरातून निघालेले दिव्य तेज आसमंतात पसरले होते. बुवांसमोर उभे राहून ती म्हणाली, "आज माझे नामाभिधान केल्यावाचून पुढे जाऊ नका." बुवांनी तिला ओळखले. "आज पासून तुझे नाव निर्मला. लोकांच्या पापाचा मळ धुऊनही तू निर्मळ आहेस." हे ऐकल्यावर ती दिव्य स्त्री गुप्त झाली. एवढ्यात गावातल्या लोकांची दिंडी वाजत गाजत तेथे आली. बुवा लोकांना म्हणाले, "आज पासून या नदीचे नाव निर्मला नदी. माणगावची नदी नव्हे."

माणगावची मुख्य देवता यक्षिणी. येथील लोकांच्या भाषेत जखीण. हे दैवत जागृत आहे अशी आजही लोकांची समजून आहे. या देवीवर लोकांची फार श्रद्धा आहे. कोणत्याही महत्त्वाच्या कामाला सुरुवात करण्यापूर्वी, तसेच अडीअडचणीच्या वेळेला, देवीला कौल लावून प्रसाद घेण्याची येथे प्रथा आहे. देवीचा प्रसाद घेण्यासाठी आजूबाजूच्या गावातून तसेच नजीकच्या गोवे प्रांतातून सुद्धा लोक या जखिणीच्या देवळामध्ये येतात. देवीचे देऊळ हेमाडपंथी थाटाचे आहे. पुष्कळ ठिकाणी डागडुजी केल्यामुळे मूळ थाटात सध्या थोडासा बदल झाला आहे. सभामंडपातील लाकडी खांबांवर सुरेख कोरीव काम केलेले आहे. आज हे खांब जीर्ण होत आलेले असले तरी त्यांच्या वरील कोरीव काम अद्याप स्पष्ट दिसते. छताच्या लाकडी फळ्यांवर सुद्धा देव देवतांची रेखीव चित्रे कोरलेली आहेत. हे देऊळ गावाच्या दक्षिण सीमेलगत असून ते पश्चिमाभिमुख आहे. गाभाऱ्यात देवीची काळ्यापाषाणाची साधारण दोन फूट उंचीची उभी मूर्ती आहे. मूर्तीच्या सभोवार अंदाजे दोन इंच रुंदीची पितळी प्रभावळ आहे. देवीचे मूल्यवान अलंकार रामनवमी, दसरा वगैरे उत्सवांच्या दिवशी देवीच्या अंगावर चढविण्यात

येतात. एरवी ते मानकऱ्यांच्या ताब्यात बंदोबस्तात असतात. देवीचें मानकरी मराठा आणि पुजारी ब्राह्मण जातीचे आहेत. पुजाऱ्यांचे आडनाव कोनकर असे होते. सध्या येथील पुजारी श्री. उकिडवे हे आहेत. येथील मानकरी आणि पुजारी यांची नेमणूक वंशपरंपरागत आहे असे सांगतात. देवीला कौल लावून प्रसाद घेण्याचे काम मानकरी करतात. या भागात बारमाही फुलणाऱ्या पटकुळीच्या लाललाल फुलांचे लांव देठ खुडून, दोन दोनच्या संख्येने ती फुले देवीं भोवतालच्या प्रभावळीवर पाण्यात ओली करून चिकटवितात. भक्त आपले गाऱ्हाणे मानकऱ्याला सांगतो. मानकरी ते देवीपुढे मांडताना असे म्हणतो की—

"आवशी ह्यां लेकरूं तुज्या पायांजवळ इला आसा. तेकां यंदाच्या वर्साक मठी बांधूची आसा. योजल्या ठिकाणावर मठी बांधली तर लेकराक् सूख लाभान् एकाचे एकवीस होतील तर उजवो कौल दीं वघुया. नाय झाल्या डावो दी. माते कृपा कर. लेकरू ताटकळत आसा."

भक्त आणि मानकरी दोघेही हात जोडून देवीसमोर बसतात व देवी काय कौल देते ते उत्सुकतेने पाहतात. कौल मिळावयाला कित्येकदा फार वेळ लागतो. उजव्या बाजूचे फूल गळून पडले तर अपेक्षित कौल झाला. अन्य फूल गळून पडले तर त्यावर योग्य असें भाष्य मानकरी करतो व काही उपाय सुचवितो.

या देवळापासून साधारण एक फर्लांगावर जांभळीची आड हा डोंगर आहे. हा डोंगर गावाच्या दक्षिण सीमेला असून तो पूर्व पश्चिम आहे. या डोंगराच्या पश्चिम टोकाला वळसा घातल्यावर पलीकडच्या बाजूला भटवाडी व खेमसावंतांची घरे आहेत. आज यक्षिणीच्या देवळाच्या पाठीमागे व डावीकडे ब्राह्मणांची घरे

आहेत. डावीकडे देवळाच्या आवाराला लागून श्रीथोरल्यास्वामी-महाराजांचे घर आहे. हे घरसुद्धा पश्चिमाभिमुख आहे. याच्या थोडे पुढे कोनकरांचे घर आहे. श्रीस्वामीमहाराजांच्या काळात कोनकरांचे घर भटवाडीमध्ये होते.

आजूबाजूच्या गावातील भिक्षुक मंडळी लग्नसराईच्या दिवसात माणगावमध्ये येत असत; कारण येथें भिक्षुकी मिळण्याची नेहमीच शक्यता असे. लग्नसराईच्या दिवसात गरजू लोक ब्राह्मण शोधावयाला माणगावमध्ये येत असत.

असे हे माणगावचे व त्याच्या आसपासच्या परिसराचे चित्र होते व आहे.

अध्याय पहिला

पूर्वज :–

सन १८६३–६४ च्या दरम्यानची गोष्ट असेल. उन्हाळ्याचे दिवस होते. भरदुपारची वेळ होती. डोक्यावर सूर्य तळपत होता. पायाखालची पुळण तापली होती. पन्नाशी उलटलेला एक ब्राह्मण डोक्यावरील टापशी पुढे मागे सरकवीत, कठोर उन्हाचा मारा चुकवीत देऊळवाडीच्या रोखाने चालला होता. देऊळवाडीकडे जाणारी पाणंद तापली होती. दुतर्फा लावलेली लिंगडीची व कडू मेंदीची झुडपे कशीबशी चार पाने धारण करून उभी होती. ब्राह्मणाच्या पायातील वाहणांचा करंर करंर आवाज रस्त्यावरील धुळीमध्ये दबला जात होता. यक्षिणीच्या देवळासमोरं येऊन त्याने देवीला भक्तिभावाने नमस्कार केला आणि भास्करभट ओळकरांच्या घरासमोर येऊन त्याने हाक मारली, "भास्करभट ! अहो भास्करभट ! !" घराचा दरवाजा आड केलेला होता. आतून कोणीही प्रतिसाद दिला नाही. घरामध्ये मांजराची मियाँव–मियाँव व आत

वावरणाऱ्या माणसांची हालचालही ऐकू येत होती. शेजारच्या झाडावर बसून एक कावळा रुक्षपणे काव–काव करीत होता. ब्राह्मणाने पुन्हा हाक मारली. " भास्करभट आहेत का घरात ?"

" कोण आहे ते ? मामंजी घरी नाहीत. होते नव्हते ते भटाभिक्षुकांना वाढून, आमच्या पदरी हे दारिद्र्याचे कष्ट ठेवून, घर सोडून गेले आहे, पुढे व्हा. इतके दिवस बरा पुख्खा मारला सर्वांनी."

विचारा ब्राह्मण ! हे उद्गार ऐकून अगदी सर्द झाला. आज काही वर्षांचा त्याचा क्रमच होता की, माणगावला आल्यावर आपली पथारी भास्करभटांच्या ओसरीवर पसरावयाची. भास्करभट मोठा आतिथ्यशील माणूस. दुपारच्या जेवणापूर्वी आलेल्या अतिथीला आपल्या पंगतीचा लाभ दिल्याशिवाय त्यांना घास जात नसे. पण आज हे काय ? ब्राह्मण तसाच मागे परतला व यक्षिणीच्या देवळालगत टेंब्यांच्या घरासमोर आला. समोरच ओटीवर एक बालमूर्ती कसली तरी पोथी वाचीत बसली होती. त्याची देहयष्टी सावळी असून चेहरा तेजस्वी दिसत होता. त्याची मुंज झालेली होती; कारण त्याच्या डाव्या खांद्यावर यज्ञोपवीत दिसत होते. त्याच्या कपाळावर भस्माचा पट्टा होता. व डोक्यावरील शेंडीची घट्ट गाठ मारलेली होती. अंगणात उपस्थित झालेल्या ब्राह्मणाला पाहून बटू उठून त्यांना सामोरा गेला.

" यावे."

" कोणरे तू ? हरिभटांचा नातू वासुदेव वाटते ! बाळ बरा आहेस ना ? हरिभट कुठे आहेत ? "

" आजोबा गावात गेले आहेत आणि बाबा देवघरात पोथी वाचीत आहेत." वासुदेव एवढे बोलून थांबला नाही. धावत आत जाऊन त्याने मातोश्री रमाबाईंना घरी अतिथी आल्याची वर्दी दिली. रमाबाईंनी दाराआडून पाहिले व भटजींना ओळखले.

" बसावे. मामंजी बाहेर गेले आहेत. एवढ्यात येतीलच. तोपर्यंत स्नान, संध्या आटोपून घ्या. बाळ वासुदेव आजोबांना आंघोळीला पाणी काढून दे."

एवढ्यात हरिभटसुद्धा आले. हातातील पडशी वासुदेवाच्या स्वाधीन करून त्यांनी हातपाय धुऊन घेतले.

" कसे काय जगू भटजी, कुशल आहे ना ? "

" हो सर्व क्षेम आहे. आज आपल्या घरचा पाहुणचार घेण्याचा योग आला आहे."

" तुमच्या सारख्यांच्या पंगतीचा लाभ घडत आहे हें आमचे भाग्य आहे."

" भास्करभट कुठे बाहेर गावी गेलेत की काय ? "

" भास्करभट घरदार सोडून गेलेत. सध्या कारभार सुनेच्या हाती आहे. भास्करभटांचे कुटुंब निवर्तले आणि काही दिवसांनी ते स्वतःच घरदार सोडून निघून गेले. तुम्ही बरेच दिवस इकडे फिरकला नाही वाटते ? "

" जवळ जवळ एक वर्षाने येतो आहे इकडें. आमच्या सारख्या परगावच्या लोकांना आश्रय होता भास्करभटांचा ! पत्नी वारली आणि आता तेही निघून गेले म्हणता ! फार वाईट गोष्ट झाली. आज तुमच्या या नातवाने आग्रह करून ठेवून घेतले. मुलगा मोठा तेजस्वी आहे. अध्ययन कोठपर्यंन्त झाले ? "

" शिक्षा व अष्टाध्यायी झाली. स्तोत्रेही करून घेतली. समासचक्र, शब्दरूपावली, अमरकोश हे सर्व घरीच माझ्यापाशी शिकला. भास्करभटजींकडेसुद्धा थोडे अध्ययन झाले. संहितेला सुरुवात झाली होती.आता विष्णुशास्त्री उकिडव्यांनी संथा देण्याचे मान्य केलेआहे."

" वा ! म्हणजे मणिकांचन योगच की ! अशा गुरूला असाच शिष्य मिळावयाला हवा." . . . .

टेंब्यांचे घराणे मूळचे माणगावचे नव्हे. सावंतवाडीच्या सीमेवर एका लहानशा खेड्यात हरिभट टेंब्यांचे पूर्वज राहत. टेंभ्यावर घर करून राहणारे म्हणून टेंबे असे त्यांचे उपनाव पडले. "टेंभ्यावरती गृह बांधोन। पूर्वज त्यांचे रहाती। म्हणून त्यांचे घराणे। टेंभे ऐशा उपनावाने। आजपर्यंत परंपरेने। प्रसिद्ध आहे त्या गावी।" असे स्वामिभक्त श्री. धुंडीराज वापट सोमयाजी यांनी म्हटले आहे. टेंब्यांची वृत्ती भिक्षुकीची होती. त्या लहानशा गावात भिक्षुकी नीट चालेना म्हणून हरिभट प्रथम माणगाव पंचक्रोशीत व्यवसाय शोधण्यासाठी आले.

हरिभट उत्तम वैदिक होते आणि याज्ञिकीसुद्धा ते चांगल्या प्रकारे जाणत असत. अंगी समाधानी वृत्ती पूर्णपणे बाणलेली असल्यामुळे यजमानाकडून मिळालेल्या दक्षिणेवर ते नेहमीच संतुष्ट असत. मिळणाऱ्या दक्षिणेकडे नजर न ठेवता अंगिकारलेले कार्य यथाशास्त्र करावे याकडे त्यांचा विशेष कटाक्ष असे. यामुळे माणगाव व आजुबाजूच्या पंचक्रोशीत पुरोहित म्हणून ते लोकप्रिय झाले होते. लग्नसराईच्या दिवसांमध्ये त्यांना भरपूर मिळकत होत असे. या दिवसांमध्ये हरिभट आपल्या गावी येऊन जाऊन असत. या वेळपर्यंत त्यांचे कुटुंब, पत्नी मुलगा गणेश व कन्या काशी एवढेच मर्यादित होते. दिवाळी ते वैशाख या दिवसांमध्ये केलेल्या भिक्षुकीच्या मिळकतीवरच त्यांचा वर्षाचा उदरनिर्वाह चाले. पावसाळ्यात नदीनाले फुगल्यावर आपले गाव सोडून दूरवर जाणे त्यांना नेहमीच जमत नसे.

अशाच एका मुंजीच्या सोहळ्याच्या वेळी, एका सधन यजमानाच्या घरी हरिभट टेंबे व सीतारामपंत कोनकर यांची गाठ पडली. ओळख झाली. स्वभावाला स्वभाव जुळला व हरिभटांचे सीतारामपंताच्या घरी येणे जाणे होऊ लागले. सीतारामपंत कोनकर

हे माणगावचे वतनदार होते. त्यांच्या मालकीची काही स्थावर मिळकत होती. कोनकर सात्त्विक वृत्तीचे होते. ते विधुर असून त्यांना येसूबाई नावाची एक कन्या होती. मात्र पुत्र सुख नव्हते. त्यामुळे त्यांची वृत्ती विरक्त बनली होती. सात्त्विक वृत्तीच्या हरिभटांशी त्यांचे चांगलेच सूत जमले. त्यांना आपले हृदय उघडे करावयाला कोणीतरी समानशील व्यक्ती पाहिजेच होती. यानंतर हरिभट माणगावमध्ये असताना कोनकरांच्या घरी त्यांचा बराच वेळ जाऊ लागला. हरिभट कोनकरांपेक्षा वयाने मोठे होते. कोनकर जमीनदार असूनही हरिभटांना आदराने वागवीत. प्रेमळ स्वभावाच्या हरिभटांचा सहवास आपणाला अधिकाधिक लाभावा असे त्यांना वाटू लागले, म्हणून त्यांनी केलेल्या विनंतीला मान देऊन हरिभट सराईचे दिवस संपेपर्यंत कोनकरांच्याच घरी राहत. अशीच काही वर्षे गेली. एक दिवस सीतारामपंत कोनकर हरिभटांना म्हणाले, 'अशा तऱ्हेने ये जा करीत राहण्याऐवजी माणगावलाच कां बिऱ्हाड करीत नाही तुम्ही ? येथील लोक तुम्हांला माणगावचे रहिवासीच समजतात. माझ्या घराचा बराचसा भाग रिकामा आहे. कायम स्वरूपाची सोय होईपर्यंत येथेच बिऱ्हाड करा. माझा विधुराचा संसार तुम्ही पाहतच आहात. मी आणि माझी मुलगी येसू असे दोघेच घरात आहोत. भातुकली खेळावयाच्या वयात तिच्यावर संसार चालविण्याची जबाबदारी येऊन पडली. ती आईविना वाढलेली पोर आहे. तिच्या जीवनातील रुक्षपणा तुमच्या कुटुंबियांच्या संगती मध्ये कमी होईल असे वाटते. तुमच्या कुटुंबामध्ये ती आनंदाने समरस होऊन जाईल."

हरिभटांना ही गोष्ट पटली आणि रुचलीही. आपला गोगलगायीचा संसार पाठीवर घेऊन, पत्नी व मुलांसह एका शुभमुहूर्तावर त्यांनी माणगावसाठी आपले वडिलार्जित घर कायमचे सोडले

आणि अशा तऱ्हेने अध्यात्मशास्त्रातील एका महान् पर्वाची मुहूर्त-मेढ रोवली गेली.

लौकिकदृष्टया आश्रित आणि आश्रयदाते असे या दोघांचे संबंध होते. हरिभट माणगावला कायमचे रहिवासी म्हणून आल्यावर दोन्ही कुटुंबांचा स्नेह दिवसेंदिवस वृद्धिगत होत गेला. हरिभट काही दिवस भटवाडीमध्ये कोनकरांच्या घरीच आपला संसार मांडून होते. योग्य संधी प्राप्त होताच देऊळवाडीमध्ये यक्षिणीच्या देवळाला लागून डाव्या अंगाला जमिनीचा एक लहानसा तुकडा खरेदी करून तेथे हरिभटांनी आपले घर उभे केले व आपला संसार कायम स्वरूपात थाटला. याच परमपवित्र वास्तूमध्ये प. प. श्रीटेंबेस्वामी-महाराजांचा जन्म झाला.

चिखलाच्या ओबडधोबड भिंती असलेली व माडाच्या झापांनी शाकारलेली ती झोपडी तत्कालीन सर्वसामान्य लोकांच्या घराचा एक नमुना होता. त्या काळची सर्व घरे साधारण एकाच नमुन्याची असत. दक्षिणोत्तर दोन बाजूंना पडव्या, समोर ओटा, पाठीमागे स्वयंपाक घर, मध्ये चौक व देवघर असे. पुष्कळ ठिकाणी गुरांचा गोठा घरा लगतच असे. घराच्या पाठीमागच्या भिंतीला आणि क्वचित् दक्षिणोत्तर भिंतींना झरोकावजा एक खिडकी असे. तांवडी माती आणि चिकणमातीच्या मिश्रणाने बनविलेल्या भिंतींना वर्षातून एकवेळ गेरूचा गिलावा काढण्यात येत असे गिलावा काढलेल्या भिंतीवर खडूच्या ओल्या रंगाने दोरा मारण्यात येई. ज्या घरी सुतका-सारखे अशौच असे त्या घराला वर्षभर दोरा मारीत नसत. घर माडाच्या वळलेल्या झापांनी शाकारलेले असे. सुखवस्तू कुटुंबांची घरे झापांऐवजी भट्टीमध्ये भाजलेल्या तांबड्या मातीच्या नळयांनी शाकारलेली असत. वर्षातून एक वेळ "मिरगा पूर्वी" (मृगनक्षत्र लागण्यापूर्वी) घराच्या छपराची जुनी झापे काढून नवीन झापांनी

शाकारणी करावी लागे. नळचांनी शाकारलेल्या घरांचे नळे पावसाळचापूर्वी परतून घ्यावे लागत. प. प. श्रीटेंबेस्वामीमहाराजांच्या दत्तमंदिरालगत डाव्या बाजूला त्यावेळी बांधलेली धर्मशाळा कालपरवा पर्यंत अस्तित्वात होती. या धर्मशाळेच्या भिंती चिखलाच्या होत्या व छपरावर मातीचे नळे होते. अर्थात् श्रीस्वामीमहाराजांच्या वेळीच बांधलेली ही धर्मशाळा होती असे नक्की सांगता येणार नाही; पण त्या काळच्या घरांचा एक नमुना म्हणून त्या वास्तूचा निर्देश करता येईल.

हरिभटांच्या सौभाग्यवती भल्या पहाटे उठून भूपाळ्या म्हणत दारासमोर सडासंमार्जन करीत. अंगणाच्या चारही बाजूंना आणि कोपऱ्यांवर, तसेच तुळशी वृंदावनाभोवती रांगोळी काढीत. ज्या पवित्र वास्तूमध्ये प. प. श्रीटेंबेस्वामीमहाराजांचा जन्म झाला ती वास्तू आज अस्तित्वात नाही. त्या वास्तूच्या पायावर आता स्वामिभक्त राणी इंदिरादेवी होळकर यांनी टुमदार एक मजली चिरेबंदी घर बांधले आहे. हे घरसुद्धा मूळ वास्तूप्रमाणे पश्चिमाभिमुख आहे. तळमजल्यावर दोन मोठ्या खोल्या आणि वरच्या मजल्यावर तशाच दोन खोल्या व सज्जा आहे. खोल्यांना नवीन पद्धतीचे दरवाजे व रुंद खिडक्या आहेत. श्रीस्वामीमहाराजांच्या दत्तमंदिराचे पुजारी व विश्वस्त श्री. नारायणभट उकिडवे यांना ही नवीन वास्तू बांधून पूर्ण झाल्यावर तेथे राहण्याची विनंती करण्यात आली होती. श्री. नारायणभट उकिडवे यांना श्रीस्वामीमहाजांचे दर्शन घेण्याचे भाग्य लाभले होते. श्रीमहाराजांबद्दल वाटणाऱ्या आत्यंतिक आदरापोटी किंवा संन्याशाच्या घरामध्ये संसारी माणसाने वास्तव्य करणे योग्य नव्हे असे वाटल्यावरूनही असेल कदाचित् श्री. नारायणभटजींनी या घरामध्ये राहणे पसंत केले नाही. काही असो, आज या वास्तूमध्ये कोणीही राहत नाही. तळमजल्यावरील उजवीकडच्या

खोलीत, भिंतीला लागून तीन फूट उंचीचा चौथरा बांधून त्यावर श्रीस्वामीमहाराजांच्या पादुकांची स्थापना करण्यात आली आहे.

सीतारामपंत विधुर होते; पण त्यांचे वय तसे फारसे झालेले नव्हते. संसाराबद्दल त्याना अद्याप ओढ होती. आपल्या मालमत्तेला वारस असावा अशी इच्छा त्यांच्या हृदयात कोठेतरी खोल दडून होती. कोनकरांपेक्षा दहा पावसाळे अधिक काढलेल्या हरिभटांच्या लक्षात ही गोष्ट यावयाला वेळ लागला नाही. एक दिवस अशाच दोघांच्या शिळोप्याच्या गोष्टी चाललेल्या असताना हरिभटांनी विषय काढला. " सीतारामपंत एक गोष्ट विचारू का ? "

" हा संकोच का ? बोला ना ! "

" आपल्या संसाराचा हा एवढा व्याप पडला आहे. कन्या हे परक्याचे धन. येसू आपला संसार किती दिवस सांभाळणार ? आपल्या उतार वयात या संसाराकडे लक्ष द्यावयाला कोणीतरी आपले माणूस पाहिजे आहे असे मला वाटते. "

हरिभटांनी सीतारामपंतांच्या चेहऱ्याकडे निरखून पाहिले. सीतारामपंतांची मुद्रा थोडीशी गोंधळलेली दिसली. पण त्यांच्या नजरेमध्ये औत्सुक्य भरलेले होते. ती संध्याकाळची शांत वेळ होती. यक्षिणीच्या देवळासमोरील पिंपळाच्या पानांची संध्याकाळच्या मंद वाऱ्यावर नाजुक सळसळ होत होती. कोणीतरी देवीच्या देवळातील घंटा वाजविली. तो आवाज दूरवर पसरत मंद मंद होत हवेत विरून गेला. संध्याकाळी घरट्याकडे परतणाऱ्या पक्षांचे थवे किलबिलाट करीत आकाशात त्वरेने उडताना दिसत होते. कशाच्या आठवणीने कोण जाणे, सीतारामपंतांनी एक अगदी हलका निश्वास टाकला. अशाच एखाद्या प्रशांत सायंकाळीची स्मृती त्यांच्या मनात जागृत झाली असावी. ते काही वेळ स्तब्ध राहिले. त्यांच्या अंतश्चक्षूंसमोरून

गतकाळातील अनेक दृश्ये येऊन जात होती आणि चालू काळातील काही समस्या त्यांच्या मनासमोर उभ्या राहत होत्या.

" आपल्या मनात या वेळी कोणते विचार घोळत आहेत आहेत याची मला कल्पना आहे. आपल्याशी द्वितीय संबंधाची सोयरीक जोडायला कितीतरी वधुपिते आज आनंदाने तयार होतील." हरिभट म्हणाले.

एका दीर्घ उसासा टाकून सीतारामपंत म्हणाले की, " संसारामध्ये माझे मन आता पूर्वीसारखे रमेल असे मला वाटत नाही; परंतु तुम्ही म्हणता त्याप्रमाणे कर्तव्य म्हणून काही गोष्टी करणे आवश्यक आहे हे मला पटते; पण या बाबतीमध्ये कोणाही वधुपित्याचे उंबरठे झिजविण्याची माझी तयारी नाही."

हे ऐकताच हरिभट सीतारामपंतांना म्हणाले की, " बोलण्याचे धाडस करतो म्हणून गैरसमज नसावा. आमची काशी कशी काय वाटते आपणाला ? "

कोनकर चमकले आणि म्हणाले, " काशी ! आमच्या दोघांच्या वयातील अंतराचा तुम्ही विचार केला आहे काय ? "

हरिभट म्हणाले, " मी पूर्ण विचारांतीच बोलत आहे. वीसबावीस वर्षांचे अंतर ठेवूनही अशा प्रकारचे विवाह आपल्या समाजात होतात. यामध्ये शास्त्राच्या विरुद्ध काहीसुद्धा नाही. खरे म्हणजे मलाच लोक नावे ठेवतील. कोनकरांच्या मालमत्तेकडे लक्ष ठेवून टेंब्यांनी हा योग जुळवून आणला असे म्हणतील; पण माझ्या अंतर्यामीची भावना श्रीदत्तप्रभूच जाणतात. या माणगावात आल्यापासून आपण आमच्यावर केवढे तरी उपकार करून ठेवले आहेत. आमच्या हातून आपली काही सेवा घडावी हीच माझी इच्छा आहे. उपकाराची फेड करावी अशी मात्र भावना नाही."

कालौघात हा योग जुळून आला. एका शुभमुहूर्तावर चि. सौ.

कां. काशीवाई टेंबे सौभाग्यवती अन्नपूर्णाबाई कोनकर झाल्या. काशी मूळचीच गौरवर्णाची व ठसठशीत बांध्याची होती. आता सौभाग्य चुड्याने आणि सौभाग्य अलंकारांनी ती लक्ष्मीसारखी शोभून दिसू लागली. आपल्या लाडक्या कन्येला या सौभाग्य अलंकारात पाहून हरिभट टेंब्यांच्या पत्नीचा ऊर आनंदाने भरून आला.

वसंत ऋतूला सुरुवात झाली. जांभळीची आड या डोंगरातील वृक्षांनी नवीन पालवी धारण करावयाला सुरुवात केली. आंब्या काजूंच्या मोहराचा धुंद वास आसमंतात भरून राहिला होता. चैत्र शुद्ध तृतीयेला अन्नपूर्णाबाईंनी घरात देवीची स्थापना करून मंगळवारच्या दिवशी चैत्री हळदी-कुंकू वाटले. वसंतपंचमीला जोडप्याने ब्राह्मणांची पूजा करून सर्वांना वसंत पेय दिले.

सावत्र आईला आपली सावत्र मुलगी डोळ्यात सलते अशी सर्व साधारण जगरहाटी आहे. पण येथे उलटा प्रकार होता. काशी आणि येसू जिवलग मैत्रिणी. "आंबा पिकतो, रस गळतो। कोकणचा राजा झिम्मा खेळतो।"– म्हणत आतापर्यंत एकत्र खेळणाऱ्या या दोन मुली आता मायलेकीच्या नात्याने अधिक जवळ आल्या होत्या. हरिभटांच्या पत्नीच्या देखरेखीखाली अन्नपूर्णाबाई व येसू सीतारामपंत कोनकरांच्या संसाराचा गाडा हाकू लागल्या.

हरिभटांनी व्यक्त केलेल्या शंकेप्रमाणे माणगावातील बऱ्याच ब्राह्मणांनी या संबंधाबद्दल आपापसात कुजबूज सुरू केली; पण सीतारामपंत कोनकरांच्याबद्दल उघडपणे बोलण्याची कोणाचीच छाती झाली नाही. या कुजबुजीला कायमचा आळा बसावा म्हणून की काय सीतारामपंत कोनकरांनी आपली एकुलती एक कन्या येसू हरिभटांच्या ज्येष्ठ पुत्राला– गणेशला– देण्याचा आपला मनोदय हरिभटांकडे व्यक्त केला. गणेशची प्रकृती मूळचीच किरकोळ होती आणि त्याला जन्मापासून फेफऱ्याची व्याधी होती. त्यामुळे त्याच्या

विवाहाबद्दल हरिभट नेहमी चिंतेमध्ये असत. सीतारामपंताचा हा निर्णय ऐकल्यावर "दत्तप्रभूंची इच्छा" असे म्हणून त्यांनी समाधानाचा श्वास सोडला. अशा तऱ्हेने काशी सौ. अन्नपूर्णाबाई कोनकर व येसू सौभाग्यवती रमाबाई टेंबे झाल्या.

लक्ष्मीनारायण आणि उमामहेश यांच्याच संसाराची उपमा देता येईल असे हे दोन संसार आनंदाने चालले होते. फावल्या वेळात एकत्र येऊन या दोन मैत्रिणी आई मुलीचे नाते विसरून गळचात गळा घालून आपापली सुखदु:खे एकमेकींच्या कानामध्ये कुजबुजत असत. वटपौर्णिमेला आपापले सौभाग्य अलकर लेऊन या दोघीं वटवृक्षाची पूजा करीत. आपल्यावर लादलेले प्रौढपण विसरून या मायलेकी श्रावणात मनमुराद फुगडचा खेळत असत.

अशा तऱ्हेने काही वसंत ऋतू आले आणि माणगावचा आसमंत फुलाफळांनी बहरवून गेले. पावसाळे आले आणि अनंत अमृतधारांनी माणगावची भूमी पुनीत करून गेले. दिवाळीचे दिवस आले आणि घरोघर आनंदाचे दीप उजळून गेले; पण अन्नपूर्णाबाईंची कूस काही उजवली नाही. जीं एकमेव आशा मनामध्ये बाळगून हरिभटांनी हा लग्नयोग जुळवून आणला होता आणि त्याच दृष्टिकोनातून ज्याला सीतारामपंतानी संमती दिली होती, त्या आशेला फळ येण्याचे चिन्ह दिसेना. आणि अकस्मात् एक दिवस सीतारामपंतानी अल्पशा आजारानंतर आपली इहलोकीची यात्रा संपविली. अन्नपूर्णाबाईंवर आकाशाची कुऱ्हाड कोसळली. मायलेकी गळचात गळा घालून रडल्या. एक आपल्या पतीसाठी तर दुसरी आपल्या पित्यासाठी. आपल्या मुलीचे वैधव्यामुळे पांढरे फटफटीत झालेले कपाळ पाहून हरिभटांच्या पत्नीला काय वाटले असेल त्याची कल्पना मातृहृदयच करू शकेल. गावकऱ्यांची दातकसाळ बाधली अशी त्यांची ठाम समजूत झाली. दैवाची ही विचित्र लीला पाहून बिचारे हरिभट वृद्ध

दिसू लागले. आता दोन्ही कुटुंबांच्या संसाराचा गाडा हाकण्याची नैतिक जबाबदारी त्यांच्यावर येऊन पडली आणि ही नैतिक जबाबदारी कायदेशीर व्हावी म्हणूनच की काय अन्नपूर्णाबाईंनी आपली संपूर्ण मालमत्ता आपली सावत्र कन्या सौ. रमाबाई टेंबे यांच्या नावे करून टाकली. हरिभटांनी आपल्या मूळगावची वडिलार्जित जमीन विकून टाकली आणि आता ते खऱ्या अर्थाने माणगावकर झाले.

माणगावमध्ये वास्तव्य केल्यावर हरिभटांना गणेश व काशी यांच्यानंतर आणखी पाच अपत्ये झाली होती. रामकृष्ण, बाळकृष्ण व विष्णू असे तीन मुलगे व भीमा, यमुना, अशा दोन मुली त्यांना झाल्या. संसाराचा व्याप वाढला तशी सगळ्यांच्या पोषणाची जबाबदारीही वाढली. आता तर त्यांना दोन कुटुंबांचे संसार चालवावयाचे होते म्हणून त्यांनी हाताखाली गडी ठेवून शेतीचा व्यवसाय सुरू केला.

गणेशपंतांच्या जन्मजात अशक्तपणामुळे व अपस्माराच्या व्याधीमुळे हरिभट त्यांना घर सोडून दूरवर जाऊ देण्यास राजी नसत. गणेशपंत मुळचेच विरक्त होते. या व्याधीमुळे त्यांना दिवसाकाठी बराच वेळ घरातच एकलकोंडेपणात बसून राहवे लागे. त्यामुळे त्यांची वृत्ती दिवसेंदिवस अंतर्मुख होऊ लागली व ईश्वर भक्तीकडे वळली. अशा तऱ्हेने त्यांचा आजारच त्यांना वरदान ठरला. रोग नोहे तो ईश्वर कृपेचा । मार्ग लाधला असे साचा । नियमही असे हा देहाचा । कृपामृताचा लाभ जया ।।" असे उद्‌गार स्वामिभक्त श्रीगांडामहाराज यांनी त्यांच्यासंबंधी काढले आहेत. हरिभट दत्तभक्त होते. दररोज सकाळी स्नानसंध्या उरकून श्रीगुरुचरित्राचा एक अध्याय वाचावयाचा त्यांचा क्रम होता. हरिभटांचे हस्ताक्षर मोत्यासारखे सुंदर होते व व्यवसाय म्हणून ते श्रीगुरुचरित्राच्या हस्तलिखित पोथ्या तयार करून देत. शके १७५२ मध्ये त्यांनी

लिहिलेली श्रीगुरुचरित्राची पोथी प. प. श्रीस्वामीमहाराजांच्या महासमाधीनंतर बरेच दिवस चांगल्या स्थितीमध्ये होती. वरील सर्व गोष्टींचे योग्य असेच संस्कार गणेशपंतांवर झाले होते. वडिलांचा दत्तभक्तीचा वारसा मुलाने बरोबर उचलला. गणेशपंत दररोज दत्तपादुकांची पूजा करीत व श्रीगुरुचरित्राचे वाचन करीत. तासन् तास ते दत्तपूजेमध्ये रंगून जात. हळूहळू पूजेमध्ये त्यांची एकाग्रता होऊ लागली. पूजा करीत असताना आपल्या समोरील पादुका व पूजासाहित्य या शिवाय बाहेरच्या जगाचे त्यांना भान राहत नसे. पूजा करता करता ते स्वतःला पूर्णपणे विसरून जात. यामुळे त्यांना दिव्यदर्शने होऊ लागली. दिव्य ध्वनिश्रवणाचाही अनुभव येऊ लागला. आपणाला होणारी ही दर्शने आणि इतर अनुभव या सर्व साधनेतील आध्यात्मिक अनुभूती आहेत, की आपल्या दुबळ्या प्रकृतीमुळे आपणामध्ये काही काही शारीरिक विकृती उत्पन्न होत आहेत हे त्यांना कळेना; पण त्यांचा सर्व भार श्रीदत्तप्रभूंवर असल्यामुळे सर्व बाबतींमध्ये ते निश्चित असत. माणगावचे सृष्टि-सौंदर्य माणसाला परमेश्वराच्या चिंतनामध्ये गुंतवून ठेवील असेच होते. संध्याकाळच्या वेळी जवळच्या जांभळीची आड या डोंगराच्या पायथ्याशी एखाद्या शिळेवर बसून ज्यावेळी सूर्यास्ताच्या बरोबर विविधरूपे धारण करणाऱ्या सृष्टीकडे ते पाहत तेव्हा त्यांचे मन अंतर्मुख होई व ते सृष्टीच्या त्या बदलत्या रूपाशी एकरूप होऊन जात. संध्याकाळच्या मंद वाऱ्याबरोबर डोलणारे वृक्ष मावळत्या सूर्याच्या किरणांमध्ये जेव्हा सोनेरी रंगाची पालवी धारण करीत त्यावेळी मावळत्या सूर्याच्या हिरण्मय पात्रातून ही सुवर्णाची उधळण अखिल सृष्टीवर होत आहे आणि आपले अस्तित्वसुद्धा त्या हिरण्मयाचाच एक अंश आहे असे त्यांना वाटे.

दिवसेंदिवस गणेशपंत अधिकच विरक्त बनत चालले. तरुण

सुशील पत्नी त्यांना संसारामध्ये बांधून ठेवू शकत नव्हती. तसे पाहता रमाबाई त्यांना अपरिचित नव्हत्या. विवाहापूर्वी काही वर्षे ते दोघे एकाच घरात राहत होते. दोन्ही कुटुंबांचा आत्यंतिक घरोबा असल्यामुळे दिवसातून अनेक वेळा त्या दोघांची नजर भेट होत असे. त्या वेळी येसूच्या मनामध्ये स्त्रीसुलभ जागृत होत असतीलही कदाचित्; पण गणेशपंतांच्या मनावर मात्र अशा तऱ्हेचा परिणाम कधी झाला नाही. आई वडिलांच्या शब्दाबाहेर ते कधी वागत नसत. लग्न हा पुरुषाच्या आयुष्यांतील अनेक संस्कारांपैकी एक आवश्यक संस्कार आहे या भावनेनेच ते विवाहाला उभे राहिले. त्यामुळे विवाहोत्तर त्यांचे मन तरुण पत्नीच्या पाशात अडकून पडू शकले नाही. कोठे तरी एकान्त स्थानी जाऊन आपले मन ईश्वर भक्तीत लीन करावे असे त्यांना वाटू लागले. जांभळीची आड या डोंगराचा एकान्त आता त्यांना पुरेसा वाटेना. एकान्त आणि तोही पवित्र स्थळी घडावा असे त्यांच्या मनाने घेतले. त्यासाठी तीर्थ-यात्रा करणे हा एक पर्याय होता; पण हरिभट त्यांना माणगाव सोडून बाहेर जाण्यास परवानगी देणे शक्य नव्हते.

भल्या पहाटे उठून गणेशपंत आता ध्यानधारणा करू लागले. मनश्चक्षूंसमोर श्रीदत्तात्रेयांची सगुण मूर्ती कल्पून ते मानसपूजेत रंगून जात. प्रथम प्रथम ईश्वराचे सगुण रूप अंतश्चक्षूंसमोर उभे करणे फार कष्टदायक होते. मनाने कल्पिलेले ते रूप सारखे लपा छपीचा खेळ खेळते. क्षणभर त्या सगुण रूपाचा एखादा अवयव नजरेपुढे उभा राहावा, क्षणार्धात तो गुप्त व्हावा, पुन्हा सगळीकडे काळोख, पुन्हा दुसराच अवयव दिसावा, असे होता होता संपूर्ण सगुण रूप क्षणमात्र अंतर्दृष्टीसमोर स्थिरावते व पुन्हा अकस्मात् लोप पावते. पण या लपंडावामध्ये साधक हळूहळू रंगून जातो व त्याच्या आर्ततेप्रमाणे कमी अधिक वेळात त्याची इष्ट देवता त्याच्या

ध्यानमंदिरामध्ये स्थिरावते. गणेशपंताना सुद्धा हाच अनुभव आला.

दिसे मूर्ती आजानूकर। सर्वावयवी सुंदर।
अतर्क्य मनोहर। दिगंबर विशालाक्ष।
प्रफुल्ल कमळ मुख। रूप दिसे सुरेख।
कंबुकंठ त्रिनेत्र। पहाता सुख अपार।।

भावजगतामध्ये वावरणाऱ्या त्या सगुण मूर्तीची षोडशोपचारांनी मानसपूजा करण्यात ते एवढे रंगून जात की, वेळेचे त्यांना कधी भानच राहत नसे. त्यांचे अष्टसात्त्विक भाव जागृत होत. या तंद्रीतून, या भावजगतातून, ते जेव्हा भानावर येत, त्यावेळी त्यांचे वक्षस्थळ डोळ्यातून वाहणाऱ्या अश्रूंनी भिजून गेलेले असे. असे कित्येक दिवस निघून गेले. पहाट कधी होते आणि आपण त्या सगुण ध्यानामध्ये कधी एकदा रंगून जातो असे त्यांना व्हावयाचे. यामुळे कित्येक रात्री त्यांना झोपसुद्धां येत नसे. सदासर्वदा ती सात्त्विक मूर्ती त्यांच्या नजरेसमोर असावयाची आणि मुखी सदा "श्रीदत्त जयदत्त" असे. अहोरात्र तोच एक छद त्यांना लागला होता. निद्रतून भल्या पहाटे जाग आल्यावर "श्रीदत्त जयदत्त" या मंत्र्याचा जप आपल्या आतून आपोआपच होत आहे अशी स्पष्ट जाणीव होऊन नाभीच्या आसपास कोठेतरी हे शब्द साकार होऊन ते वरवर हृदयापर्यंत चढत आहेत आणि आपल्या सर्वांगाने आपणास ते ऐकू येत आहेत असे त्यांना स्पष्ट जाणवत असे. प्रथम त्यांना वाटले, "आपणाला हे काय होत आहे?" स्वतःची इच्छा नसताताासुद्धा हा जो जप चालू झाला तो ऐकून त्यांना नवल वाटले आणि एका अवर्णनीय आनंदाचा त्यांना लाभ होऊ लागला. दैनंदिन व्यवहार करीत असतानासुद्धां आपले सर्व शरीर हलके हलके होऊन आपण जणू हवेत तरंगत आहोत असे त्यांना वाटत असे. त्यामुळे त्यांना एक प्रकारची भीतीसुद्धा वाटत असे. अशातऱ्हेने चालताना तोल जाऊन

आपण पडणार तर नाही ना! असा त्यांना प्रश्न पडत असे.

एका पहाटे स्वत:चे अस्तित्व पूर्णपणे विसरून ते सगुण ध्यानामध्ये रंगून गेले असताना त्याना असे स्पष्टपणे ऐकू आले की, "तू गाणगापुरी येऊन निर्गुण पादुकांचे दर्शन घे." गणेशपंतांना वाटले आपण आपल्या कानांनी नव्हे; आपल्या सर्व शरीरानेच ते शब्द ऐकले आहेत. आपले सर्व शरीरच आपली कर्णेंद्रिये झाली आहेत, असा त्यांना प्रत्यक्ष अनुभव आला. एक दिव्य शक्ती आपल्या सर्वांगातून चमकून गेली असे त्यांना वाटले. जाणिवेच्या क्षणी शरीराला एक मोठा आघात व्हावा तसे झाले आणि ते पूर्ण भानावर आले. त्यांच्या सर्वांगावर रोमांच दाटले. आपणाला आलेला हा अनुभव प्रत्यक्ष श्रीदत्तप्रभूंचाच आदेश होता अशी त्यांची खात्री झाली. त्यांना आता स्वस्थ राहवेना. ते हरिभटांना म्हणाले, "बाबा! आपण मला कितीही जपले तरी प्रारब्धामध्ये जे लिहिले आहे ते कोणी टाळू शकेल काय? मी येथे आपल्या जवळ असलो काय किंवा दूर तीर्थयात्रेला गेलो काय, कुठेही असलो तरी नशिबाचे भोग मला भोगलेच पाहिजेत. तीर्थयात्रा, साधुसंग आणि जप यांच्या बळावर माणसाचे प्रारब्धही बदलू शकते, असे मला वाटते. श्रीदत्तप्रभूंचा मला गाणगापुरी जाण्यासाठी आदेश झाला आहे. श्रीक्षेत्र गाणगापुरी जाऊन श्रीपादुकांची सेवा घडेल असा मला आशीर्वाद द्या." असे म्हणून आपणाला पहाटे झालेला श्रीदत्तप्रभूंचा साक्षात्कार त्यांनी हरिभटांना सांगितला. साधूच्या खुणा साधूलाच समजतात. हरिभट काय समजावयाचे ते समजले. तेही श्रीदत्तोपासकच होते. गाणगापुरचा एवढा दूरचा प्रवास एकट्याने करावयाला त्यांनी एरवी गणेशपंतांना जाऊच दिले नसते; पण आता श्रीदत्तप्रभूंची आज्ञा झाल्यावर ते मुलाला रोखू शकत नव्हते. पण प्रश्न त्यांच्या

एकटयाच्या संमतीचा नव्हता. गणेशपंतांच्या आईचीही संमती मिळविणे आवश्यक होते आणि ती तर फार कठीण गोष्ट होती. बालपणापासून आईने गणेशाला आपल्यापासून दूर होऊ दिले नव्हते; पण हरिभटांनी आपल्या पत्नीची समजूत घातली. "प्रत्यक्ष भगवान् श्रीदत्तात्रेयांच्या कृपेचे छत्र आपल्या मुलावर असताना आपण माणसांनी त्याच्या योगक्षमाची चिंता का करावी ?" गणेशपंतांच्या आईला हा युक्तिवाद पटला. सौ. रमाबाईंची संमती घेण्याचा प्रश्नच उद्‌भवत नव्हता; कारण सौ. रमाबाई तशा अजून लहानच होत्या आणि त्यांचे हित–अहित सासुसासरेच पाहत होते. मुलाने जर गुपचूप गृहत्याग केला; तर तो घरी पुन्हा परत येणे कठीण आहे या भीतीने आणि "होणारी ईश्वरी करणी। निमित्त मात्र होती प्राणी" हेच खरे असा पोक्त विचार करून माता-पित्यांनी योग्य सोबत पाहून गणेशपंतांना श्रीक्षेत्र गाणगापूरास जाण्यास अनुज्ञा दिली. पिंजऱ्यामध्ये अडकलेला पक्षी मोकळा झाला. आईने हातावर ठेवलेली दही कवडी खाऊन व तिने बांधून दिलेले भूक लाडू, तहान लाडू, उत्तरीय वस्त्रामध्ये बांधून गणेशपंतांनी एका शुभदिनी श्रीक्षेत्र गाणगापुरासाठी प्रस्थान ठेवले.

स्वतःच्या एकलेपणाची जाणीव नष्ट करण्यासाठी भगवान् भक्तरूप होतात आणि भक्तीच्या मिषाने स्वतःचे कौतुक करून घेतात. भगवान् श्रीदत्तात्रेय आता भक्त रूपाने अवतार घेणार आहेत आणि माणगावच्या पवित्र भूमीवर भक्त आणि भगवान् यांच्या अलौकिक दिव्य संबंधाचे नाटय घडणार आहे. प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वती टेंबेस्वामीमहाराजांच्या रूपाने अत्रिनंदन दत्तात्रेयांचा अवतार होणार आहे. ते अत्रिनंदन भगवान् श्रीदत्तात्रेय आपणा सर्व भक्तवृंदांचे कल्याण करोत.

अध्याय दुसरा

जन्मः—

माणगाव व आसपासच्या परिसरातील वारकरी एकत्रित होऊन गाणगापूरची मार्गशीर्षवारी करावयला निघाले होते. वीस, पंचवीसजणांचा समुदाय सावंतवाडीचा परिसर पार करून आजरे, कोल्हापूर, नरसोबाचीवाडी या मार्गे गाणगापूरच्या वाटेला लागला. ज्या काळची ही हकिगत आहे त्या काळी प्रवासासाठी आगगाडी किंवा मोटारबस अशा सोयी सर्वत्र झाल्या नव्हत्या. सधन लोकांना प्रवासासाठी बैलगाडी असे; पण वारकरी अशा प्रकारच्या वाहनांचा उपयोग करीत नसत. प्रवास पायीच, अनवाणी होत असे. राना-वनातून मार्ग आक्रमण करावा लागे; त्यामुळे हिंस्र श्वापदांची भीती तर असेच, शिवाय वाटमारीचे भयसुद्धा असे. दिवसा झेपेल तेवढा प्रवास करावयाचा आणि रात्री विश्रांतीसाठी कोणत्या तरी गावातील देवळाचा किंवा धर्मशाळेचा आश्रय घेऊन ईश्वरचिंतन करीत झोपावयाचे व पुन्हा सकाळी श्रीदत्तनामाचा घोष करीत पुढील मार्गाला लागावयाचे असा त्यांचा क्रम होता.

चाळिशी उलटलेल्यांचाच या मेळाव्यामध्ये जास्त भराणा होता. अपवाद होता फक्त गणेशपंत टेंब्यांचा! ते वयाने लहान पण श्रीदत्तभक्तीमध्ये महान् असून श्रीदत्तध्यानात पूर्णपणे रंगून गेलेले होते. त्यांच्या मुखातून "श्रीदत्त जयदत्त" या मंत्राचा सारखा जप चालू होता आणि उत्साहाने त्यांची पावले भराभर पडत होती. आजूबाजूच्या रम्य निसर्गाकडें पाहण्याचे त्यांना भान नव्हते; पण निसर्गच त्यांच्या वृत्तीशी एकरूप होऊन आनंदी झाला होता. शरद ऋतूचे दिवस संपून सुखद हेमंताला सुरुवात झाली होती. हवेमध्ये शरीराला नवचैतन्य देणारा गारठा होता. पावसाळ्यात अंगावर

ल्यालेला साज वनश्रीने नुकताच कुठे उतरून ठेवावयाला सुरुवात केली होती. नद्यानाले अद्याप रोडावले नव्हते. अशा या "मासानां मार्गशीर्षोऽहम्" असे भगवंतानी वर्णन केलेल्या महिन्यातील आल्हादकारक वातावरणामध्ये श्रीदत्तभक्तीने वेडे झालेले हे जीव मोठ्या आनंदाने आणि उत्साहाने गाणगापूरची वाट आक्रमित होते. शरीरे थकली होती; पण मने ताजीतवानी होती. एकाएका पावलागणिक आपण भक्तवत्सल श्रीदत्तप्रभूंच्या अधिकाधिक जवळ जात आहोत, या भावनेने प्रत्येकाला अधिक जोम येत होता.

कित्येक दिवसांच्या दीर्घ प्रवासानंतर श्रीक्षेत्र गाणगापूरच्या सीमा दिसू लागल्या, तेव्हां थकल्या भागल्या पावलांमध्ये नवा जोम आला. गाणगापूर हे एक लहानसे गाव आहे. गावाच्या मध्यभागीच श्रीमन्नृसिंहसरस्वतीस्वामीमहारांच्या निर्गुण पादुकांचे मंदिर आहे; मात्र गावापासून संगमावरील पादुका–मंदिर बरेच दूर आहे. वारकऱ्यांच्या दिंड्या पादुका मंदिराच्या दिशेने "श्रीदत्त जयदत्त" या मंत्राचा घोष करीत चालल्या होत्या. मध्येच "श्रीगुरुदेव दत्त" या मंत्रोच्चाराने आसमंत निनादून जात होता. वारकऱ्यांनी प्रथम लांबूनच श्रीनृसिंहसरस्वती – पादुका – मंदिराच्या कळसाचे दर्शन घेतले व मंडळी संगमावर स्नानाला गेली. पावसाळ्यात दुथडी भरून वाहणाऱ्या भीमेला अजूनही भरपूर पाणी होते. ते अद्याप गढूळच होते. इतक्या दिवसांच्या दीर्घ प्रवासाचा शीण आता जाणवू लागला होता. गणेशपंतांनी नदीच्या उबदार पाण्यात मनसोक्त स्नान करून हा शीण घालविला. भीमा – अमरजेच्या पाण्याने त्यांच्या देहाचा सारा शीण जणू आपल्या पोटात ओढून घेतला. वाहत्या पाण्याबरोबर तरंगता तरंगता गणेशपंतांना क्षणभर वाटले, आपण लहान झालो आहोत आणि आपल्या प्रेमळ मातेच्या कुशीत विसावलो आहोत. नदीच्या पाण्यातून त्यांचा पाय बाहेर निघेना.

अगोदरच उशीर झाला होता. आता लवकर आटोपणे आवश्यक होते. स्नानानंतर संध्या विधी उरकून त्यांनी संगमावरील औदुंबराला व अश्वत्थाला प्रदक्षिणा घातल्या. याच अश्वत्थ वृक्षाखाली दत्तावतार श्रीनृसिंहसरस्वतीस्वामीमहाराज अनुष्ठानाला बसत. अष्टतीर्थांचे दर्शन घेत मंडळी श्रीगुरुपादुका–मंदिराकडे निघाली. ज्या पतितपावन भगवंताच्या दर्शनासाठी आतुर होऊन ते गाणगापूरला आले होते त्या दत्तस्वरूप भगवान् श्रीनृसिंहसरस्वतींच्या निर्गुण पादुकांचे दर्शन घेतल्यावर गणेशपंतांच्या आनंदाला सीमा राहिली नाही. त्यांचे हृदय भरून आले आणि त्यांच्या ठिकाणी अष्टसात्त्विकभाव जागृत झाले.

मध्यान्हीची महापूजा व आरती आटोपली व घंटानादाने माधुकरीची सूचना झाली. गणेशपंतांनी सर्व वारकऱ्यांबरोबर पाच घरी माधुकरी मागितली व देवांना नैवेद्य अर्पण करून स्वतःचे भोजन उरकले. दुपारी श्रीदत्तनामाचा जप करीत थोडावेळ विश्रांती घेतली. इतर वारकऱ्यांच्या गाठीभेटी झाल्या. संध्याकाळच्या आरतीला सुरुवात झाली. देवांना धूप दाखविला गेला. समोरच्या सभामंडपामध्ये पिशाच्चबाधा झालेल्या माणसांची आरतीच्या घंटानादाबरोबर होणारी करुण हालचाल पाहून गणेशपंतांचे हृदय द्रवले या दुर्दैवी जीवांना या पैशाची यातनातून मुक्त करता आले तर आपल्या जीविताचे सार्थक होईल, असा विचार त्यांच्या मनात आला. त्यांना काय कल्पना की, त्यांच्या या इच्छेच्या पूर्तीसाठी प्रत्यक्ष भगवान् श्रीदत्तात्रेय पुत्ररूपाने त्यांच्या घरी अवतार घेऊन अशा शेकडोशे जीवांना दुःखमुक्त करणार आहेत !

संध्याकाळी पूजा व आरती होईपर्यंत गणेशपंत मंदिरामध्येच असत. मंदिराभोवतालच्या अश्वत्थ, गणेश आदी देवतांच्या आरतीच्या वेळी ते सेवेकऱ्यांबरोबर देवळाभोवती तीन प्रदक्षिणा घालीत.

मंदिरामध्ये कापूर आरती झाल्यावर विडा, शेजारती व करुणाष्टके होत. एवढा वेळ होईपर्यंत बरीच रात्र होत असे. गणेशपंत सर्व कार्यक्रम होईपर्यंत देवळामध्ये असत. दर गुरुवारी पालखी निघे. देवळाभोवती पालखीच्या तीन प्रदक्षिणा व्हावयाला बराच वेळ लागत असे. गणेशपंत एकभुक्त राहून मंदिरातील कार्यक्रम आटोपल्यावर धर्मशाळेत जाऊन श्रीदत्तनामस्मरण करीत बरीच रात्र होईपर्यंत जागे राहत असत. नंतर ते निद्रेच्या अधीन होत व पुन्हा पहाटे तीन वाजण्यापूर्वीच उठून, शौच मुखमार्जन करून, मंदिरामध्ये काकड आरतीसाठी जात. प्रथम काकड आरती होई. नंतर तेथील पुजारी स्वत: श्रीमन्नृसिंहसरस्वतीस्वामीमहाराजांनी आपल्या स्वत: जवळील तेथे ठेवलेल्या श्रीचक्रांकित शिवलिंगाला अभिषेक करून श्रीपादुकांना केशर कस्तुरी लेपन करीत असत. त्यानंतर मंदिरा भोवतालच्या देवतांची पूजा होत असे व तदनंतर प्रात:काळची आरती होई. आरतीनंतर तीर्थपंचामृत घेऊन गणेशपंत स्नानाला जात. स्नानसंध्या उरकल्यावर श्रीगुरुचरित्राचे वाचन होई. दुपारपासून संध्याकाळपर्यंतचा वेळ नामस्मरणात घालवावयाचा, कोणाशीही वादविवाद किंवा शास्त्रचर्चा करण्यात वेळ घालवावयाचा नाही, असा गणेपतांचा दैनंदिन कार्यक्रम ठरून गेला होता. कधी कधी धर्मशाळेमध्ये विद्वान् संन्यासी येत व ते शास्त्रांवर निरुपणे करीत. ही निरुपणे गणेशपंत अगदी तन्मय होऊन ऐकत. जोपर्यंत आत्मसाक्षात्कार होत नाही तोपर्यंत शास्त्रांचा खरा अर्थ व शास्त्रांचे मर्म आकलन होणे शक्य नाही याची त्यांना दिवसेंदिवस खात्री पटू लागली व ते आपली साधना अधिक तीव्रतेने करू लागले.

गणेशपंतांचा असा दैनंदिन कार्यक्रम चालला होता. त्यामध्ये कधी खंड पडला नाही. त्यांच्या बरोबर आलेली मंडळी मार्गशीर्षवारी करून आपापल्या घरी परतली. "आपले घर" हा शब्दच

मुळी गणेशपंत विसरून गेले होते. त्यामुळे घरी परतण्याचा प्रश्नच उद्भवत नव्हता. गाणगापुरामध्ये ते आनंदात होते. दिवस कधी उगवला व कधी मावळला याचे त्यांना भान नव्हते. श्रीदत्तभक्तीमध्ये ते स्वतःला पूर्णपणे विसरून गेले होते. आजवरच्या तपश्चर्येमुळे त्यांच्या चेहऱ्यावर एक दिव्य तेज उजळून दिसत होते. त्यांच्याकडे पाहणाऱ्याला त्यांच्या बद्दल आदर वाटत असे. गणेशपंत मुळचेच मितभाषी असल्यामुळे त्यांचे कोणाशी विशेष बोलणे होत नसे; पण जे लोक त्यांना पाहत त्यांच्या हृदयामध्ये गणेशपंतांबद्दल आदरयुक्त प्रेम निर्माण होत असे. या अवधीमध्ये त्यांचा जन्मजात शत्रू असलेला अपस्माराचा आजारही त्यांच्या जवळ येऊ शकला नाही. तो जवळ येऊ शकणार तरी कसा? शरीर म्हणून आपणास काही आहे याची त्यांना जाणीवच नव्हती. शरीरबोधराहित्य हीच निरोगी जीवनाची गुरुकिल्ली आहे. गणेशपंतांच्या मनामध्ये आता संन्यास घेण्याचे विचार येऊ लागले. मानवी जीवनाचा परमोच्च आदर्श संन्यासाश्रमामध्येच सामावलेला असल्यामुळे आपणही त्या चतुर्थ आश्रमामध्ये प्रवेश करून, या भारतभूमीतील पवित्र तीर्थक्षेत्रांमध्ये वास करीत, संन्यासाचे अंतिम साध्य– आत्मसाक्षात्कार–प्राप्त करून, आपल्या जीविताचे सार्थक करावे असे त्यांना वाटू लागले.

अशा तऱ्हेने महिन्याहून अधिक दिवस लोटले; पण गाणगापूर सोडून घरी जाण्याचे विचार गणेशपंतांच्या मनात येईनात. घरी आपले वृद्ध आईवडील आणि सुशील नवयौवना पत्नी डोळ्यात प्राण आणून आपली मार्ग प्रतीक्षा करीत असतील याची त्यांना कधी जाणीवच झाली नाही; पण भक्तकामकल्पद्रुम भगवान् श्रीदत्तात्रेयांना माणगावामधील त्या तीन जीवांच्या हृदयांची तळमळ कळत होती. एका रात्री श्रीदत्तप्रभूंनी गणेशपंतांना स्वप्नामध्ये आदेश दिला, "तुझी येथील सेवा आता पुरे झाली. घरी जा व संसार

कर." या दृष्टांतामुळे गणेशपंतांना आनंद झाला आणि वाईटही वाटले. भगवान् श्रीदत्तात्रेयांची आपणावर कृपा आहे याची त्यांना पुन्हा एकदा खात्री पटली; परंतु त्याच बरोबर हा पुण्यपरिसर सोडून आपणास जावे लागणार याचा त्यांना खेद झाला. एका शुभदिवशी सोबत पाहून त्यांनी जड अंतःकरणाने गाणगापूरचा निरोप घेतला. गाणगापूरला येताना जो प्रवास त्यांना सुखावह वाटला होता तोच परतीचा प्रवास या खेपेला त्यांना तापदायक वाटला.

गणेशपंत गाणगापूरला निघून गेल्यापासून त्यांच्या पत्नी सौ. रमाबाई यांनी तपस्विनीचे व्रत आचरावयाला सुरुवात केली होती. त्या पहाटे उठून घरासमोर झाड–लोट करीत व सडासंमार्जन करून स्नान झाल्यावर हरिभटांना नमस्कार करून श्रीगुरुचरित्राच्या पोथीला प्रदक्षिणा घालीत. मग यक्षिणी देवीच्या मंदिरात जाऊन त्या देवीला नमस्कार करीत व देवळासमोरील अश्वत्थाला प्रदक्षिणा घालीत. यावेळी यक्षिणी देवीबद्दल त्यांच्या मनांत विशेष भक्ती निर्माण झाली होती. कदाचित् असेही असू शकेल की, स्त्री हृदयाच्या व्यथा दुसरी स्त्रीच अधिक आपुलकीने जाणू शकते. काही झाले तरी यक्षिणी देवी ही स्त्रीमूर्ती होती. ज्या व्यथा रमाबाईंनी आपल्या आईच्या कुशीत तोंड खुपसून तिला सांगितल्या असत्या त्या व्यथा रमाबाई आता मूक शब्दांनी यक्षिणी देवीला सांगत होत्या. त्यांना वाटावयाचे यक्षिणी देवीचे चमकणारे डोळे आपले दुःख ऐकून पाणावत आहेत. यावेळी रमाबाईंना सहानुभूतीचे अश्रूच पाहिजे होते.

रमाबाईंची त्यांचे सासरे हरिभट यांच्यावर फार श्रद्धा होती त्या त्यांना आपल्या पित्याच्या ठिकाणी मानीत असत. सासूपेक्षा आपला सासराच आपले दुःख अधिक आपुलकीने जाणतो, याची त्यांना खात्री होती. रमाबाईंची ही जी साधना चालली होती,

तिला हरिभटांची मूक संमती होती. ते आपल्या सूनबाईंच्या व्यथा जाणत होते; पण ते तरी तिचे दुःख हलके करण्यासाठी काय करू शकत होते? दोघेही समदुःखीच नाही काय? एकीला पतिविरहाचे दुःख तर दुसरीला पुत्रविरहाचे. सासूला स्वयंपाकपाण्यात मदत करून फावल्या वेळात रमाबाई सहस्रवाती वळणे, पोथ्या वाचणे अशा तऱ्हेची साधना करीत असत. एकभुक्त राहून, मनामध्ये पतीचे चरण आठवीत, रात्री त्या डाळीच्या (चटईच्या) एका तुकड्यावर झोपत. हे सर्व तप करीत असताना "आपला पती लवकरात लवकर परत येवो" या शिवाय त्या देवाजवळ आणखी काय मागणार?

गणेशपंतांची आणि रमाबाईंची ही जी तपश्चर्या चालली होती ती पुढे होणाऱ्या दिव्य घटनेची पूर्व तयारी होती. ज्यांच्या उदरी परमेश्वराचा अवतार व्हावयाचा असतो त्या मातापित्यांना, त्या अवतारी पुरुषाच्या आगमनासाठी, सर्व प्रथम स्वतःचा देह तपश्चर्येने झिजवून योग्य असा करण्यासाठी पुण्यसंचय करावा लागतो. रामकृष्णादी अवतारी मातापित्यांच्या चरित्रांचे अवलोकन केल्यावर एक गोष्ट आपल्या निदर्शनाला येते की, त्या भाग्यवान् दांपत्याला दुःखाशी झगडत एक प्रकारची तपश्चर्या करावी लागली होती. भगवान् श्रीकृष्णाचे जन्मदाते आईवडील तुरुंगाच्या खाईमध्यें खितपत "आठव्याचे" ध्यान करीत, आपले दिवस कंठीत होते. गौडदेशीय अवतारी महापुरुष श्रीकृष्ण चैतन्य-गौरांग महाप्रभू यांचे मातापिता दारिद्र्याशी झगडत महाप्रभूंच्या आगमनाची वाट पाहत होते. अलीकडच्या काळामध्ये भगवान् श्रीरामकृष्णांच्या आई-वडिलांच्या नशिबी हाच दारिद्र्ययोग होता; पण त्या दुःखाच्या काळामध्ये या थोर मातापित्यांनी आपली धर्मावरील निष्ठा कधीही

ढळू दिली नाही. त्यांनी आपल्या आचारधर्मामध्ये कुठेही शिथिलता येऊ दिली नाही. तेच दुःख, तेच क्लेश आता गणेशपंत आणि सौ. रमाबाई यांना सहन करावे लागत होते.

गणेशपंत गाणगापूरहून माणगावला परतले ते प्रथम देवीच्या दर्शनाला गेले. त्यावेळी रमाबाई यक्षिणीच्या मंदिरासमोरील अश्वत्थाला प्रदक्षिणा घालीत होत्या. गणेशपंतांनी आपल्या पत्नीला प्रदक्षिणा घालताना पाहिले; पण रमाबाईंना मात्र आपले पतिदेव परत आले याची कल्पना नव्हती. त्या मान खाली घालून एकाग्र मनाने प्रदक्षिणा घालीत होत्या. रमाबाईंना पाहिल्यावर गणेपंतांना भगवान् श्रीदत्तात्रेयांच्या आदेशाची आठवण झाली. देवांनी आपणाला संसार करण्याची आज्ञा केली आहे, याची त्यांना आठवण झाली. पण अद्यापही त्यांचे मन संसारात रमण्यास तयार नव्हते. घरी जाऊन त्यांनी आपल्या मातापित्यांना नमस्कार केला आणि पुन्हा त्यांचा दैनंदिन कार्यक्रम पूर्वीप्रमाणे सुरू झाला. गाणगापूरचा मोह मात्र त्यांना काही केल्या सुटत नव्हता.

त्यानंतर गणेशपंतांनी गाणगापूरच्या अनेक वाऱ्या केल्या. या अवधीमध्ये गणेशपंतांना दोन मुली झाल्या. भगवंतानी अवतार घेण्यासाठी योग्य वेळ अद्याप यावयाची होती. ज्या भाग्यवान् दांपत्याच्या नशिबी भगवंताच्या मातापित्यांचे अधिकार यावयाचे होते त्यांची त्या दैवी लाभासाठी आवश्यक साधना अद्या र अपुरी होती. गाणगापुरच्या प्रत्येक वारीच्या शेवटी भगवान् श्रीदत्तात्रेयांनी गणेशपंतांना घरी जाण्याचा आदेश द्यावा व आदेश पालनार्थ गणेशपंतांनी घरी परतावे असा क्रम चालला होता. एकवेळ भगवंतानी आपल्या या भक्ताची कसोटी पाहवयाचे ठरविले. गणेशपंत गाणगापूरला होते. दिवसांमागून महिने आले आणि महिन्यांची वर्षे झाली; तरी गणेशपंतांना घरी परतण्याचा आदेश

काही होईना. गणेशपंतांना तर घरची कधी आठवणही होत नसे. ते आपल्या भक्तीमध्ये तल्लीन असत. अशा तऱ्हेने बारा वर्षे गेली. आपली पृथ्वीवरील अवतरण्याची वेळ जवळ येऊन ठेपली आहे या जाणिवेने भगवंतांनाच भक्तापुढे नमते घ्यावे लागले. " सगुण सुंदर पतिव्रता । अनुकूल मिळालिया कांता । जो विसंबेना भगवत्पथा । भागवत मुख्यता या नांव ॥ या श्रीएकनाथमहाराजांच्या कथना-प्रमाणे गणेशभटजी हे भागवतोत्तम असल्यामुळे त्यांच्या पोटी जन्म घेऊन आपला अवतारकार्याचा हेतू सिद्धीस न्यावा असा विचार करून, रात्री गणेशपंतांना स्वप्नामध्ये देवांचा असा दृष्टांत झाला की, " तुम्हा उभयतांच्या भक्तीने मी संतुष्ट झालो आहे. या पुढे तुला गाणगापुरी येण्याची आवश्यकता नाही. मीच माझी भक्तीची हौस पुरी करून घेण्यासाठी तुमच्या घरी पुत्ररूपाने येणार आहे."

या गर्भारपणामध्ये रमाबाईंची कांती काही विशेषच उजळून निघाली होती. त्यांच्या मूळच्याच गौर कांतीवर दैवी तेज आले होते. पाहणाराला वाटावे, " बाई कशी देवीसारखी तेजस्वी दिसते आहे ! " आणि असे वाटावे की, यांच्या चरणांवर नतमस्तक होऊन धन्य व्हावे. रमाबाईंच्या अंतर्यामीची गोष्ट तर विलक्षणच झाली होती. घरकाम करता करता मध्येच विमनस्क होऊन त्यांची शून्यात नजर लागून त्या स्तब्ध होत. पाहणाराला वाटावे यांची समाधी लागली आहे. मंद वाऱ्याबरोबर डोलणाऱ्या वृक्षवल्लरीं-कडे पाहता पाहता त्या देहभान विसरून जात. झाडांच्या सळ-सळणाऱ्या पानांमध्ये जादू भरली आहे असे त्यांना वाटत असे. समोर सृष्टीचे जे जे रूप दिसत असे त्या त्या रूपाबद्दल त्यांना आताशा विलक्षण आपुलकी वाटू लागली होती. सृष्टीतील यच्च-यावत् वस्तुमात्राबद्दल त्यांना प्रेम वाटू लागले होते. या चराचर सृष्टीमध्ये त्यांना परमेश्वराचे दर्शन होत असे. जसजसे महिने

जाऊ लागले तसतशी त्यांची ही वृत्ती अधिकच दृढ बनू लागली आणि एकप्रकारचे वैराग्य त्यांच्या हृदयामध्ये प्रवेश करू लागले. जनसंपर्कापासून दूर जाऊन अरण्यात वास करावा, रानावनात स्वच्छंदपणे डोलणाऱ्या वृक्षलतांचे मनोगत समजून घ्यावे, आपले हृदय त्यांच्यापाशी मोकळे करावे असे त्यांना वाटू लागले. पावसाळ्याला सुरुवात झाली आणि आकाशामध्ये घनदाट काळ्या मेघांची ये जा सुरू झाली; तशी रमाबाईंच्या हृदयामध्ये एक अनामिक हुरहुर जागृत झाली. आकाशात स्वच्छंदपणे विहारकरणाऱ्या त्या मेघांप्रमाणे आपणही संसाराची बंधने झुगारून कोणाच्या तरी भेटीसाठी सुसाट धावत सुटावे असे त्यांना वाटू लागले. कोणाच्या भेटीसाठी ते त्यांनाच उमजेना. वास्तविक ज्याच्या भेटीची त्यांना तळमळ लागली होती तो त्यांच्याच उदरामध्ये पुत्ररूपाने वाढत होता हे त्यांना कसे कळावे? पुढील महान् घटनेची ही नांदी होती.

मर्यादा पुरुषोत्तम प्रभू रामचंद्राच्या जन्मापूर्वी कौसल्यामातेची अशीच अवस्था झाली होती. ज्या कार्यासाठी श्रीरामाचा अवतार होणार होता त्या कार्याची तळमळ जणू गर्भाच्या मातेला लागली होती. "माझे धनुष्यबाण आणा, त्या दुष्ट रावणाचा मी वध करते." असे म्हणून त्या कोणातरी अज्ञात व्यक्तीच्या अंगावर धावून जात. कंसाच्या बंदिवासामध्ये देवकी मातेचीही अशीच अवस्था झाली होती. तशीच येथेही आता देवांच्या अवतार कार्याची जाणीव गर्भाच्या मातेला झाली होती. रमाबाईंच्या हृदयामध्ये वैराग्य आणि सर्वसंगपरित्यागाची संन्यस्त वृत्ती यांचा उदय झाला होता. गणेशपंतमात्र यामुळे थोडे सचिंत झाले होते. आपल्या पत्नीची या वेळेला अशी काय अवस्था होत आहे याची त्यांना कल्पना करता येईना. पण भगवान् श्रीदत्तात्रेयांवर त्यांचा पूर्ण

भरवसा असल्यामुळे ते निश्चिंत राहिले. हरिभटांनी आणि त्यांच्या पत्नीने जाणले की, भावी घटनेचे मातेला लागलेले हे डोहाळे आहेत. ज्येष्ठ महिन्यात रमाबाईंनी वटसावित्रीचे त्रिरात्री व्रत केले. तीन दिवस प्रतिदिन उपोषण व पूजा करून वटपौर्णिमेच्या दिवशी त्यांनी सोवळ्याने वटवृक्षाची पूजा करून वडाला सुताचे तीन वेढे गुंडाळले. ब्राह्मणांना सुपातून आंब्या-गऱ्यांचे वायन देऊन आपणाला जन्मोजन्मी हाच पती लाभो अशी प्रार्थना केली. दाही दिशा पावसाळी वातावरणाने धुंद करणारा आषाढ महिना संपला आणि सणांचा श्रावण मास सुरू झाला. नागपंचमीचा सण आला आणि घरोघरी लाकडाच्या पाटावर हळदीचंदनाच्या रंगाने नऊ नागांबरोबर नागिणीचे चित्र काढून नागदेवतेची भक्तिभावाने पूजा झाली. नवविवाहिता सुवासिनी नवीन वस्त्रे परिधान करून व सौभाग्य अलंकार लेऊन, ताटामध्ये पूजा साहित्य घेऊन खेळी-मेळीच्या गोष्टी करीत नागपूजेसाठी वारुळाला निघाल्या. माण-गावमध्ये सगळीकडे आनंदाचे वातावरण होते. आकाशात मेघांचा पाठशिवणीचा खेळ चालला होता. पिवळ्या धमक उन्हामध्ये पोटरीवर आलेली भाताची शेते वाऱ्यावरोबर डोलत होती. नवोढा गर्भिणीसारखी त्यांची गती मंद झाली होती. वृक्षांना बिलगून फोफावलेल्या वेली विविध रंगांची फुले धारण करून काळ्या, लाल, पिवळ्या रंगांच्या फुलपाखरांना खुणावून आपल्याकडे बोलावीत होत्या. मधूनच एखादी श्रावणसर येऊन सर्वांची त्रेधा तिरपीट उडवून देत होती. यावेळी पूजेसाठी निघालेल्या महिलांच्या होणाऱ्या धांदलीमध्येसुद्धा एक प्रकारचा अल्लड आनंद दिसून येत होता. वातावरणामध्ये एक गोड उल्हास भरून राहिला होता.

रमाबाईंच्या हालचाली अगदी मंद झाल्या होत्या. त्यांच्या शरीराला एक प्रकारचा जडपणा आला होता. त्यांना खूप वाटत

होते की, आपणही या चारचौघींप्रमाणे जरा बाहेर जावे. देवीच्या देवळात जाऊन गाभाऱ्यात पूजा द्रव्यांचा जो एक मंदवास पसरलेला असतो, तो श्वासाबरोबर नसानसांमध्ये भरून घ्यावा. पण ही सर्व त्यांची मनोराज्येच होती. त्यांना घराबाहेर जावयाला सासूबाईंनी मनाई केली होती. नारळी पौर्णिमा झाली आणि श्रावणाचा एक पंधरवडा संपला. आता कृष्णपक्षाला सुरुवात झाली होती. कालाष्टमीचा दिवस जवळ येत होता. श्रीकृष्णजन्माचा सोहळा कोकणामध्ये मोठ्या उत्साहाने पार पाडला जातो. दिवसभर गावच्या देवळामध्ये भजन चालू असते. निरनिराळ्या भजनी मेळ्यांच्या भजनाच्या बाऱ्या होतात. रात्री बारा वाजल्यानंतर श्रीकृष्णजन्माचा सोहळा होतो. दुसऱ्या दिवशी गोपाळकाला होतो. माणगावत या उत्सवाची तयारी देऊळवाडीमध्ये जोरात चालू होती; कारण गावचे प्रमुख सार्वजनिक उत्सव यक्षिणी देवीच्या सभामंडपात होत असत.

पारंपारिक रीत्या अष्टमीला श्रीकृष्णजन्म साजरा होण्यापूर्वीच माणगावच्या गोकुळामध्ये श्रावण कृष्ण पंचमीच्या दिवशी भगवान् श्रीकृष्णाने दत्तरूपाने गणेशपंत टेंब्यांच्या घरी अवतार घेतला. त्या दिवशी सकाळपासूनच वातावरण प्रसन्न होते. आकाशात अधून मधून एखाद्या दुसऱ्या कृष्ण मेघाची धावपळ सुरू झाली होती. सूर्याच्या उन्हामध्ये ही धावपळ मोहक दिसत होती. गावाच्या मध्यावर येताच या कृष्णमेघातून टेंब्यांच्या घरावर अमृतवर्षाव होत होता. आकाशातून चमकत पडणारे ते थेंब सूर्याच्या उन्हात पुष्कराज रत्नाप्रमाणे चमकून दिसत होते.

रमाबाई भरल्या डोळ्यांनी ते दृश्य आपल्या हृदयामध्ये साठवून ठेवीत होत्या. आज त्यांच्या शरीरामध्ये फारच जडपणा आल होता. त्यांना अमळ बेचैन वाटत होते. दिवस जसजसा वर येऊ

लागला तसतशी त्याची बेचैनी वाढू लागली. त्यांना वाटले आपल्या उदरामध्ये प्रसववेदना सुरू होत आहेत. त्या अवस्थेतच मध्यान्हीचा सूर्य डोक्यावर आला. सर्वांची जेवणे झाली. रमाबाईंनी आपणास भूक नाही म्हणून सांगितले व त्या अमळ वळकटीवर लवंडल्या.

त्या दिवशी दुपारपासून आकाशामध्ये पुन्हा एकदा कृष्णमेघांची दाटी झाली. जोरदार वृष्टी होऊ लागली. आसमंत धुंद होऊन गेले. जणू काही आता पृथ्वीवर अवतार धारण करणाऱ्या महापुरुषाच्या स्वागतासाठीच पंचमहाभूते अहमहमिकेने एकापुढे एक दाटी करीत होती. दिवसाचा तिसरा प्रहर संपला आणि आकाशात मेघांच्या आड दाटी करून असलेल्या देवदेवतांनी हरिभट टेंब्यांच्या घरावर फुले उधळली. सत्पुरुषाच्या आगमनाची ती पूर्व सूचना होती. देवर्षींनी आकाशातून पवित्र अशा वेदमंत्रांचा घोष केला. सगळीकडे एक मंद सुगंध पसरला होता. गावातील नदी दुथडी भरून वाहू लागली. जणू कृष्ण दर्शनासाठी उत्सुक यमुनाच! नदीला आता पूर येतो की काय अशी भीती निर्माण झाली. पण गणेशपंत टेंब्यांच्या घरावरून वाहणारे पाणी पाणंदीतून धो धो वाहत जेव्हा या नदीच्या पाण्यात जाऊन विसावले तेव्हा कुठे ती शांत झाली! टेंब्यांच्या घरातून नवजात बालकाच्या रडण्याचा आवाज ऐकू आला. त्या दिव्य शिशूच्या पृथ्वीवरील आगमनामुळे धरणी पुलकित झाली. त्यावेळी शके १७७६ चे आनंदनाम संवत्सर होते. या आनंदनाम संवत्सरामध्ये श्रावण वद्य पंचमीला सूर्योदयापासून सव्वीस घटिकांनी, म्हणजे दुपारी ४-४। वाजण्याच्या सुमारास, पृथ्वीवर आनंदाची उधळण करीत भगवान् श्रीदत्तप्रभूंनी रमबाईंच्या पोटी जन्म घेतला.

घराच्या बाहेरच्या ओसरीमध्ये मनातील उत्सुकता दडविण्याचा प्रयत्न करीत बसलेल्या टेंबे पितापुत्रांनी तो नवजात बालकाच्या

रडण्याचा आवाज ऐकला. सुईण दारा आडून म्हणाली, "मुलगा झाला हो!" आणि गणेशपंताना धन्य झाल्यासारखे वाटले. पुत्र-जन्माचा आनंद त्यांना झाला होता.

ज्या अनंतकोटी ब्रह्मांडनायक परमेश्वराच्या नरदेहातील लीलांनी माणगावचा परिसर पवित्र व्हावयाची शुभमंगल वेळ आता येऊन ठेपली आहे, त्या प. प. श्रीमत् वासुदेवानंदसरस्वती टेंबे-स्वामीमहाराजरूपी भक्तकामकल्पद्रुम अनसूयागर्भरत्न भगवान् श्रीदत्तात्रेयांनी आपणा सर्व साधुवृंदांचे कल्याण करावे अशी त्यांच्या चरणी प्रार्थना आहे.

अध्याय तिसरा

बालपण :—

श्रावण वद्य पंचमीच्या संध्याकाळचे दिवे लागले. घरोघरी "शुभंकरोति" झाले. दिव्याच्या मंद प्रकाशामध्ये गणेशपंतांनी स्नान करून पुत्राच्या मुखाचे अवलोकन केले. सहाणेवर मधातुपाच्या मिश्रणामध्ये सुवर्णाचे चार वेढे उगाळून त्या मिश्रणाचे चाटण "प्रते ददामि" मंत्र म्हणून आपल्या अनामिकेने बाळाच्या मुखात घातले. बाळाच्या कानावर सुवर्ण ठेऊन "सूर्य, सरस्वती व अश्विनीकुमार या देवता अनुकूल होऊन तुला तीव्र अशी धारणाशक्ती देवोत" असे म्हणून त्याच्या दोन्ही खांद्यावर आपले हात ठेवून, त्यांनी मंत्र म्हणून जातकर्म विधी केला. कित्येक वर्षांनंतर आज आपल्या कुटुंबा-मध्ये मुलगा जन्मला या आनंदाने हरिभटांनी सर्वांना साखर वाटली.

बाळाचे जातक यथाविधी वर्तविले गेले व बाराव्या दिवशी मोठ्या थाटाने त्याचे बारसे केले. बाळाचे नाव वासुदेव ठेवले. जसजसा बाळ वासुदेव शुक्लेंदुवत वाढू लागला तसतसा रमाबाईंना त्याचे करता करता दिवस पुरा पडेना. त्याला तेल माखणे, न्हाऊ

घालणे, त्याच्यासाठी आंगडे-टोपडे शिवणे व त्याला अंथरापांघराव-यला लहान लहान गोधडया शिवणे, यांमध्ये रमाबाईंचा दिवस निघून जात असे. वासुदेवाच्या वयाला चार महिने झाले आणि त्याच्या निष्क्रमणाचा विधी पार पाडण्यात आला. रमाबाईंनी त्याला नवीन वस्त्रालंकार घालून, त्याच्या भाळी काळी तीट लावली व त्याला यक्षिणीच्या देवळात नेऊन देवीच्या पायांवर घातले. सहाव्या महिन्यानंतर त्याचा अन्नप्राशन विधी झाला. त्या दिवशी देवांना नैवेद्य दाखवून गणेशपंतांनी बाळ वासुदेवाला आपल्या मांडीवर घेऊन दही, मध व तूप मिश्रित पातळ भाताचा घास "अन्नपने" मंत्र म्हणून त्याच्या मुखात घातला.

मुलाच्या बाललीला पाहून त्याचे कौतुक करण्यात घरच्या लोकांना आनंद वाटे; पण गणेशपंतांपेक्षा हरिभटच त्याचे अधिक कौतुक करीत असत. गणेशपंत आपल्या दैनंदिन कार्यक्रमामध्ये दंग असल्यामुळे घरचा सर्व भार हरिभटांवरच पडला होता. कुटुंब-पोषणाचा भार निव्वळ भिक्षुकीवर पेलण्यासारखा नव्हता, म्हणून हरिभट गडी ठेऊन शेती करीत. भिक्षुकीसाठी गावात गेल्यावर किंवा शेतीची कामे करून घेण्यासाठी शेतावर गेल्यावर आपण कधी घरी परततो आणि लहानग्या वासुदेवाला जवळ घेऊन त्याचे कौतुक करतो असे हरिभटांना व्हावयाचे. वासुदेवाची होणारी शारीरिक व मानसिक वाढ हरिभट अगदी आवडीने पाहत असत. त्याचे आनंदाने हातपाय हलवून खेळणे, पालथे पडणे, पुढे सरकणे, रांगणे आणि मग हळूहळू भिंतीचा आधार घेऊन एकएक पाऊल टाकीत चालावयाला शिकणे ही त्याची सर्व प्रगती हरिभट मायेच्या नजरेने पाहत होते. हळूहळू तो स्वतःचे नाव ओळखू लागला आणि वर्षभरामध्ये "आईबाबा" या शब्दांबरोबर "आजोब्बा" हा शब्द सुद्धा बोलावयाला शिकला.

अशा आनंदामध्ये ग्रीष्म संपून वर्षाऋतू आला. श्रावणमास सुरू झाला आणि वासुदेवाच्या वयाला एक वर्ष पूर्ण झाले. त्याचा पहिला वाढदिवस हरिभटांनी थाटाने साजरा केला. वासुदेवाला तिलोदकाने स्नान घालून रमाबाईंनी स्वतःच्या हातांनी शिवलेले आंगडे टोपडे त्याला घातले. कपाळी कुंकुमतिलक लावला, डोळ्यात काजळ घातले आणि त्याला कोणाची दृष्ट लागू नये म्हणून त्याच्या दोन्ही भुवयांमध्ये व गालाला काळी तीट लावली. मग हरिभटांनी एका पाटावर सोळा अक्षतराशी घालून त्यावर कुलदेवता, जन्मनक्षत्र-देवता, पितर, प्रजापती आदी देवतांना आवाहन केले. सर्व देवतांची षोडशोपचारांनी पूजा करून यष्टिदेवतेस दहिभाताचा नैवेद्य अर्पण केला. वासुदेवाला चांगले आयुरारोग्य लाभावे व तो प्रज्ञावन्त व्हावा म्हणून सर्व देवतांची प्रार्थना करण्यात बाली व तिळगूळ मिश्रित दूध त्याला पाजले. त्या दिवशी हरिभटांनी आपल्या नात्यातील सर्व लोकांना आणि शेजाऱ्यांना भोजन दिले. वासुदेवाच्या वयाला तीन वर्षे झाल्यावर चूडाकरण विधीने त्याचे केस नापिताकडून वस्ताऱ्याने उतरवून त्याच्या डोक्यावर शेंडी राखण्यात आली अाणि त्याच वर्षी विजया दशमीला श्रीशारदेची पूजा करून हरिभटांनी वासुदेवाला "श्रीगणेशाय नमः" व "ॐ नमोसिद्धम्" ही धुळाक्षरे गिरविण्यास शिकविले. शेजारच्या याक्षिणीच्या देवळात वाडीतील मुलांची शाळा भरत असे. वासुदेवाला या शाळेत दाखल करण्यात आले.

वासुदेव नित्यनियमाने शाळेत जाऊ लागला. त्याची धारणाशक्ती चांगली होती. पंतोजींनी शिकविलेला धडा आत्मसात करावयाला त्याला फारसा वेळ लागत नसे. अशा तऱ्हेने एक वर्षाच्या आतच त्याची मुळाक्षरे व बाराखड्या पूर्ण झाल्या व शंभरापर्यंत पाढेही तो शिकला. त्यावेळच्या शिक्षणपद्धतीप्रमाणे त्याच्याकडून पावकी-निमकीपासून औटकी-अकरकीपर्यंन्त सर्व पाठ करून घेण्यात आले.

वासुदेवाचे अक्षर वळणदार होते आणि लिहिण्याची त्याला हौस होती. एकदा तर त्याने कोळसा घेऊन घराची भितच मंत्रमय करून टाकण्याचा उद्योग सुरू केला; पण आजोबांनी त्याला प्रेमळ शब्दात समज दिली की, घराच्या भितीवर कोळशाने लिहू नये, तसे करणे अशुभ मानतात.

हरिभट टेंब्यांचे घर पवित्र वातावरणाने भरून गेलेले होते. तेथे दररोज वेदमंत्रांचा घोष होत असे. घरातील प्रत्येक व्यक्ती दैवी गुणांनी संपन्न होती. हरिभट देवदेवतार्चन करून शास्त्रीय नियमांचे पालन करीत, अंगावर आलेल्या जबाबदाऱ्या पार पाडीत होते; तर गणेशपंत दत्तभक्तीमध्ये तल्लीन होते आणि रमाबाई पतिसेवा हीच देवसेवा समजून आपला संसार सांभाळीत होत्या. अशा या पवित्र वातावरणामध्ये वाढणाऱ्या बालकाच्या शरीरावर व मनावर किती पवित्र संस्कार झाले असतील याची कल्पनाच केलेली बरी!

वासुदेव पाच वर्षांचा झाला आणि शालेय शिक्षणाबरोबरच, हरिभटांच्या देखरेखाली त्याचे संस्कृत शिक्षणही सुरू झाले. आपणापाशी असलेली सर्व विद्या आपल्या लाडक्या नातवाला द्यावयाला हरिभट उत्सुक होते. संस्कृत भाषेचे व शास्त्राचे पायाशुद्ध शिक्षण व्हावे म्हणून त्यांनी वासुदेवाला समासचक्र, शब्दरूपावली, अमरकोश, अष्टाध्यायी यांच्याबरोबर नित्यनेम, स्तोत्रे वगैरे शिकविण्यास सुरुवात केली. वासुदेव मुळातच कुशाग्रबुद्धीचा व एकपाठी असल्यामुळे एकदा ऐकलेली गोष्ट त्याला पुन्हा सांगावी लागत नसे. त्याची ती तीव्र धारणाशक्ती पाहून हरिभटांना अचंबा वाटून ते त्याला अधिक उत्साहाने पुढील अभ्यास शिकवीत असत. या अभ्यासक्रमाने संस्कृतचा पाया दृढ झाल्यावर त्यांनी वासुदेवाला उपग्रंथ शिकवावयाला सुरुवात केली.

समवयस्क मुले ज्या वेळी विटी-दांडू व लगोऱ्या खेळण्यात

किंवा शेजारच्या डोंगरातून येणाऱ्या पक्षांच्या आणि वानरांच्या आवाजांची नक्कल करण्यात आपला वेळ दवडीत, त्यावेळी वासुदेव शास्त्राध्ययन, स्वाध्याय व चिंतन यांमध्ये रमलेला असे. त्याचे कोणाही मुलाशी कधी विशेष सख्य जमले नाही. त्याचा पिंडच वेगळा होता. इतर मुले ज्यावेळी आंबा काजूच्या हंगामात कैऱ्या पाडण्यात व बोंडूच्या बिया पिरगाळण्यात दंग असत किंवा पक्षांच्या आवाजाचा मागोवा घेत त्यांना पकडण्यासाठी झाडाझुडपातून लपतछपत धावत असत त्यावेळी वासुदेव निसर्गाच्या दिव्य रूपाकडे पाहत, या विलक्षण कलाकृतीचा निर्माता कोण असेल, कोठे असेल, याचा आपल्या मनात शोध घेण्याचा प्रयत्न करीत असे. त्याच्या वयाच्या मानाने हे विचार प्रौढ होते. घरचे वातावरण आणि हरिभटांकडून मिळालेले शिक्षण यांमुळे त्याची वृत्ती हळूहळू अंतर्मुख होऊ लागली होती. वास्तविक पाहता पाचसहा वर्षांच्या मुलामध्ये अशा तऱ्हेची मानसिक उन्नती होणे ही असाधारण गोष्ट होती; पण वासुदेवाच्या सर्वच गोष्टी असाधारण होत्या. या कोवळ्या-वयामध्ये त्याच्यामध्ये एक प्रकारचा प्रौढपणा आणि गांभीर्य दिसून येत होते. मेधावी बालके गंभीर प्रकृतीची असतात; कारण तत्त्व-ज्ञानाचे अवतरण त्यांच्या ठिकाणी फार लवकर झाल्यामुळे त्यांच्या सर्व वृत्तींना एक अलौकिक स्थिरता प्राप्त झालेली असते. अर्थात् वासुदेवाच्या या गंभीर वृत्तीमध्यें त्याच्या आजोबांच्या व वडिलांच्या आदर्शाचाही वाटा होता. सीतारामपंत कोनकरांच्या मृत्यूपासून हरिभटांच्या जीवनामध्ये एक प्रकारची औदासीन्याची छटा आली होती. त्यामुळे ते नेहमी गंभीर असत. वासुदेवाला शिकविताना मात्र त्याच्या वृत्ती उल्हसित होत असत; पण ते सर्व अंतर्यामी होते. बाह्यतः गांभीर्याचा मुखवटा ते कधीच बाजूला करू शकले नाहीत.

माणगाव शेजारच्या भटवाडीमध्ये जावयाला जांभळीची आड या

डोंगराला वळसा घालून जावे लागत असे. डोंगरातील दाट झाडीची आणि त्या झाडीमध्ये दबा धरून बसलेल्या हिंस्र श्वापदांची वासुदेवाला कधीच भीती वाटली नाही. तो कधीकधी एकटाच या डोंगरामध्ये व डोंगराच्या पायथ्याशी फिरत असे. डोंगरावर जाण्याची त्याला फार उत्सुकता होती. त्याने असे ऐकले होते की, जांभळीची आड या डोंगरामध्ये सिद्धमहापुरुषाची एक गुहा असून या गुहेमध्ये तप करणाऱ्याचे मनोरथ पूर्ण होतात. वासुदेवाला वाटावयाचे आपणही या गुहेमध्ये वसून ध्यान करावे; पण कसल्या इच्छापूर्तीसाठी आपण ध्यान करावे ते त्याला कळेना.

वासुदेव वयाने लहान असूनही त्याला फार चांगली समज आली होती. त्याच्यासमोर जे आदर्श होते ते एकेका गुणाचे उत्कर्ष होते. आजोबांकडून त्याने धर्माचरण आणि कर्तव्यपालनाचा धडा घेतला होता; तर वडिलांकडून अनन्य भक्ती आणि मातेकडून यच्चयावत् प्राणिमात्रांवर प्रेम करण्याचा आदर्श त्याने घेतला होता. श्रीस्वामीमहाराजांच्या चरित्रकारांनी मातोश्री रमाबाईंची व्यक्तिरेखा कोठेही स्पष्टपणे अंकित केलेली नसली; तरी श्रीस्वामीमहाराजांसारख्या महापुरुषाचे मातृत्व ज्या थोर स्त्रीला लाभले ती महासती अनसूयेचीच प्रतिमा असली पाहिजे. ज्या मातेच्या हातामध्ये भगवद्अवतार प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराजांच्या पाळण्याची दोरी होती, त्या महासतीचे चरित्र वेगळ्या प्रकारे वर्णन करण्याची आवश्यकताच नाही. श्रीस्वामीमहाराजांच्या त्या मातोश्री होत्या यातच त्यांचे सर्व वर्णन आले. असो. एवढ्या लहान वयातही बाळ वासुदेव आपल्या समोरील या आदर्शांचे सूक्ष्म निरीक्षण करीत असे. त्याचे मन अत्यन्त संवेदनशील असल्यामुळे या तीनही वडील माणसांच्या आचरणाचे संस्कार त्याच्या मनावर होत होते. आपले आजोबा एवढे वृद्ध असूनसुद्धा कुटुंब पोषणासाठी त्यांना करावे

लागणारे सायास, हे सायास करीत असताना दिसून येणारी त्यांची समाधानी वृत्ती, हाती घेतलेले काम ईश्वरार्पण बुद्धीने करण्याची त्यांची सवय इत्यादी सर्व गोष्टींचा वासुदेवाच्या मनावर खोल परिणाम होत राहिला. इतर कोणापेक्षाही त्याचे आजोबा त्याला अधिक प्रिय होते. संसारामध्ये सुखापेक्षा दुःखाचेच क्षण अधिक असतात हे आपल्या आजोबांचे चरित्र पाहून त्याला दिसत होते. हे सर्व अनुभव वासुदेवाची मूर्ती टाकीचे घाव घालून घडवावी तशी घडवीत होते. या सर्व प्रकाराच्या संस्कारांमुळे त्याच्या भावी आयुष्याचा पाया दृढ होत होता. पुढील आयुष्यामध्ये प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराज यांच्या आचरणामध्ये जे कठोर कर्माचरण, अनन्य ईश्वरभक्ती आणि दुःखितांबद्दल अनुकंपा व प्रेम यांचा आदर्श सर्व समाजाला दिसून आला त्याची मुहूर्तमेढ अशा तऱ्हेने त्यांच्या बालपणातच रोवली गेली होती.

भल्या पहाटे उठून गणेशपंतांचे आन्हिक सुरू झालेले वासुदेव पाहत असे. गणेशपंतांनी "श्रीगुरुदेवदत्त श्रीगुरुदेवदत्त" असा मोठ्याने घोष केल्यावर वासुदेवाला जाग येत असे. तोही आपला अभ्यास करण्यासाठी लवकर उठत असे; पण एवढ्या लवकर उठून बसण्याची त्याला मनाई असल्यामुळे अंथरुणाच्या उबेतच जागा राहून तो आपल्या वडिलांची प्रत्येक हालचाल कानोसा घेऊन ऐकत असे व पाहत असे. रमाबाई यापूर्वीच उठून घरात झाडलोट करून घरकामाला लागत असत. बाहेर अंगणामध्ये हरिभट "अनुदिन अनुतापे तापलो रामराया" ही करुणाष्टके म्हणत असत. पहाटेच्या नीरव शांततेमध्ये त्यांचा आवाज दूरवर ऐकू जात असे आणि ऐकणाऱ्यांच्या हृदयामध्ये वैराग्ययुक्त भक्ती निर्माण करीत असे. बाहेर फटफटायला लागले की, रमाबाई वासुदेवाला हाक मारून उठवीत असत.

त्रैलोक्यपालक भगवान श्रीदत्तात्रेय अनसूया मातेचे स्तनपान

करून संतुष्ट झाले होते; पण मातृप्रेमाची त्यांची हौस भागली नव्हती. ती पूर्ण करून घेण्यासाठी ते आतां वासुदेवरूपाने, रमाबाईंच्या उदरी जन्म घेऊन माणगावमध्ये बाललीला करीत आहेत. भगवान् श्रीदत्तात्रेयांच्या त्या बाललीला आम्हा सर्व भक्तवृंदांचे कल्याण करोत.

अध्याय चवथा

मौजीबंधन व वेदशास्त्राध्ययन :–

ते चैत्र महिन्याचे दिवस होते. वसंताच्या आगमनाला जागा करून देत मावळणाऱ्या शिशिर ऋतूची सकाळची गुलाबी थंडी माणगावमध्ये अजूनही जाणवत होती. आज देऊळवाडीमध्ये टेंब्यांच्या घरी सकाळपासून उत्साहाचे वातावरण होते. घरासमोरील अंगणात माडाच्या झापांनी शाकारलेला मंडप घातला होता. घरातील आणि अंगणातील जमीन गोमयाने सारवून त्यावर सुंदर रांगोळी काढली होती. मंडपाच्या चारही बाजूंना आंब्याच्या पानांची तोरणे बांधली होती. प्रवेश द्वारावर दोन केळीचे खांब बांधले होते. त्यातील पोसवलेल्या केळीचा लोंगर हंस पक्षाच्या मानेप्रमाणे कमान टाकून लोंबकळत होता. घरापासून थोडचा अंतरावर केलेल्या आडोशा खाली वाजंत्री वाजविणाऱ्यांची खास सोय करण्यात आली होती. सनईवर सकाळच्या भूप रागाचे धीरगंभीर सूर ताशाच्या नाजूक ठेक्यावर घुमत होते. वातावरणामध्ये प्रसन्नता होती. आज हरिभटांच्या घरी त्यांच्या लाडक्या नातवाच्या मुंजीची तयारी चालली होती. वासुदेवाच्या वयाला सात वर्षे पूर्ण होऊन आठवे लागले होते चैत्रातील पहिल्याच मुहूर्तावर त्याचा व्रतबंध संस्कार करण्याचे हरिभटांनी ठरविले होते. मुंज करावयाला निघावयाचे म्हणजे लग्नाचीच तयारी करावी लागते. या शुभ दिवसाची तयारी हरिभट कित्येक दिवस अगोदर पासून करीत होते.

उपनयन संस्कार म्हणजे पित्याने किंवा पालकाने बटूला अध्ययनाकरिता आचार्यांकडे घेऊन जाणे होय. चूडाकर्मापर्यंतचे बालकाचे सर्व संस्कार त्याच्या पित्यानेच करावयाचे असून उपनयन हा संस्कार अध्ययन सांगणाऱ्या गुरूने करावयाचा असतो. पुरातन काळी बालक जेव्हा विद्याभ्यास ग्रहण करण्याच्या वयाचा होत असे त्यावेळी त्याला योग्य गुरूच्या आश्रमात नेले जात असे. गुरू त्याचा विद्यार्थी म्हणून स्वीकार करून त्याला शौच. आचार आणि वेद यांचे शिक्षण देत असत. हा उपनयन संस्कार झाला. विद्यार्थी विद्या ग्रहण करून गुरूच्या आज्ञेने जेव्हा स्वगृही परतत असे तेव्हा त्याचा समावर्तन संस्कार करीत. आज हे तिन्ही संस्कार जवळ जवळ एकाच वेळी करण्यात येतात. विद्वान्, ब्रह्मनिष्ठ व श्रोत्रिय ब्राह्मणावाचून उपनयन संस्कार दुसऱ्या कोणी करू नये असा दंडक आहे; परंतु गुरुगृही जाऊन विद्याभ्यास करण्याची प्रथा बंद पडल्यापासून पित्यानेच पुत्राचा उपदेशकर्ता होऊन उपनयन करण्याची चाल सुरू झाली. वेदाध्ययनाला सुरुवात या दृष्टीने गायत्री मंत्राच्या उपदेशाला या विधीमध्ये फार महत्त्व आहे.

उद्याच्या मुहूर्तावर वासुदेवाला यज्ञोपवीत संस्कार होणार होता. आज रमाबाईंनी नवीन वस्त्रे व अलंकार घातले होते. शेजारच्या भटवाडीतील बायका आपले ठेवणीतले कपडे नेसून, गोठपाटल्या घेऊन रमाबाईंच्या घरी वासुदेवाच्या मुंजीचा घाणा भरावयाला आल्या होत्या. प्रथम वासुदेवाला तेल हळद लावण्यात आली. नंतर स्नान घालून त्याला नवीन वस्त्र देण्यात आले. रमाबाईंनी त्याच्या भाळी कुंकुमतिलक लावला व कपाळावर फुलांच्या मुंडावळ्या बांधल्या. बायकांनी हातामध्ये मुसळ धरून ओव्या म्हणावयाला सुरुवात केली.

आम्हा घरी कार्य। सिद्धी ने गणेशा

तुझा भरवसा आहे आम्हा ॥१॥

गौरीचा बाळ । गजानन लहान
सर्वां आधी मान मागितला ॥२॥
आधी मूळ धाडा । आंबेयांच्या टाळा
गौरीच्या बाळा आमंत्रण ॥३॥
आधी मूळ धाडा । घुंगुरांची गाडी
शालजोडीचा वऱ्हाडी गजानन ॥४॥
आधी मूळ धाडा । दूर दुरीचीये
आम्हा कुळींचीये योगेश्वरी ॥५॥
घाणा भरियेला । विडा ठेवियेला
आधी नमियेला गणराज ॥६॥
घाणा भरियेला । खंडीये गव्हाचा
मांडवी देवांचा दणका थोर ॥७॥
घाणा भरियेला । खंडीये भाताचा
मांडवी गोताचा दणका थोर ॥८॥
ओल्या हळदीचे । वाळवण दारी
केळवण घरी वासू तुला ॥९॥

या मंगल गीतांना सनईचे सूर पार्श्वसंगीताची साथ देत होते. गणेशपंतांनी व्रतबंध संस्काराचा यथाविधी संकल्प करून उदक सोडले. गणेशपूजनानंतर पुण्याहवाचन झाल्यावर बटूला व त्याच्या मातापित्यांना सुवासिनींनी मंगल दीपांनी ओवाळले. मातृकापूजन, नांदीश्राद्ध व ब्रह्मयज्ञ यथासांग पार पडल्यावर ब्राह्मण भोजन झाले. संध्याकाळी अक्षत मिरविली व ग्रामदेवतेला आणि आप्तेष्टांना उद्याच्या मुंजीचे आमंत्रण देण्यात आले.

मुहूर्ताचा दिवस उजाडला. गावातील विद्वान् वैदिक ब्राह्मणांना बटूला आशीर्वाद देण्यासाठी आमंत्रण करून बोलाविण्यात आले

होते. आमंत्रित मंडळी मंडपामध्ये आपापल्या आसनावर बसली होती. दुसऱ्या बाजूला घरातील तशाच इतर आमंत्रित स्त्रिया शुभवस्त्रालंकार लेऊन मंगल गाणी म्हणत होत्या. मंडपाच्या बाहेर मुलांची दंगल चालली होती. अधूनमधून त्यांची वडीलधारी माणसे त्यांना दटावून शांत राहण्यास सांगत होती. आज आनंदाचा दिवस असल्यामुळे सर्वजण खुशीत होते. या असल्या गोड दिवसाची बातमी आजूबाजूच्या लोकांमध्ये अगोदरच पसरते. आमंत्रित मंडळी आपणास आज गोडधोड खावयास मिळणार म्हणून सकाळपासूनच जमा झाली होती. गावातील कोणा थोरामोठ्यांच्या घरी लग्नमुंजी-सारखे सोहळे झाले तर गावाला गावजेवण मिळत असे. त्यावेळी समाजामध्ये तशी प्रथा होती. महार, चांभार, धनगर वगैरे लोकांना घरात शिजलेले अन्न पत्रावळीवर वाढण्याची —वाडो देण्याची— पद्धत होती.

यथासमय वासुदेवाचे क्षौर करून, त्याला मंगलस्नान घालून मंडपा-मध्ये आणले. आईच्या मांडीवर बसून त्याचे तिच्या सांगत जेवण झाले.

रामवदनी ग्रास घाली। कौसल्यासुत दशरथनंदन ।।
करी व्रतबंध, लगबग झाली। रामवदनी ग्रास घाली ।।

हरिभटांच्या देखरेखीखाली गणेशपंतच आचार्य झाले होते. वासु-देवाला पूर्वेला तोंड करून वेदीसमोर बसविण्यात आले. ब्राह्मणांनी उपनयन मंगलाष्टके म्हणावयाला सुरुवात केली.

श्रीशैलाद्रि निवासिनं पशुपतीं नत्वा मृडानीयुतम् ।
स्कंदं विघ्नहरं प्रणम्यच तथा लक्ष्मीसहायं हरिम् ।
एवं वर्णनमाकरोति रुचिरं तस्यावतारोद्भवम् ।
नत्वा वामन पादपंकज युगम् । कुर्यात् बटोर्मंलम् ।।
मौंजी दंडकमंडलु वर शिखा । कृष्णाजिनं विभृतम् ।
दृष्ट्वा वामन रूपमाशु मुनयः । सर्वेगता विस्मयम् ।

ऊचुस्ते बलिराजमस्य भवता। विध्युक्तवत् पूजयम्।
कर्तव्यं सकलोपचार सहितम्। कुर्यात् बटोर्मंगलम्॥
बट्वाचार्ययोः शुभं भवतु–सावधान
अंजिनदंड कमंडलु मेखला-सावधान
बटुते गणनाथ चिंतन करविजे सुमुहूर्त सावधान
बटुते ब्रह्मसावित्री चिंतन करविजे सुमुहूर्त सावधान
बटुते इष्टदेवता, कुलदेवता, ग्रामदेवता चिंतन करविजे
सुमुहूर्त सावधान, सावधान, सावधान . . . .

सावधान सावधानच्या घोषात सर्वांनी हरिद्रामिश्रित अक्षता वासुदेवाच्या मस्तकावर टाकल्या व ब्राह्मणांनी

ये यज्ञेन दक्षिणयासमक्ता इंद्रस्य सख्यममृतत्वामानश

या मंत्राचा घोष केला.

मंडपाच्या मध्यभागी स्थंडिल स्थापन करण्यात आले होते.

अस्मिन्नन्वा हितेग्नौ जातवेदसमग्निमिध्मेन
प्रजापतींचाधार देवते आज्येन। अग्निषोमौ चक्षुषी आज्येन।

इत्यादी मंत्रानी त्या स्थंडिलामध्ये अग्नी स्थापन करण्यात आला. कौपिन धारण करण्यासाठी त्रिगुणित असे कापसाचे सूत्र वासुदेवाच्या कंबरे भोवती बांधून त्याला चार बोटे रुंदीची लंगोटी नेसविण्यात आली.

" हे मित्रावरुण हो ! तुम्ही छिद्ररहित व आच्छादनास योग्य अशी वस्त्रे धारण करता. तुमची सृष्टी अविच्छिन्न व मननीय आहे. तुम्ही असत्यरूप पापे नाहीशी करून सत्यरूप साधनाने आम्हाला युक्त करा. "

अशी मित्रावरुणांची स्तुती करून वासुदेवाच्या अंगाभोवती एक शुभ्रवस्त्र गुंडाळून दुसऱ्या एका पिवळ्या वस्त्राचे त्याला पांघरूण घालण्यात आले.

" निर्मल सृष्टी, स्थिरता, बल, तेज, यज्ञ प्रौढता, उत्कर्ष, निर्वैर, आच्छादन, पातकनाशक व अन्न हे गुण या मृगचर्मामध्ये असल्यामुळे हे पांघरणाराला सर्व गुण मिळतात म्हणून मी अजिन धारण करतो." असे वासुदेवाकडून म्हणवून त्याला हरिणाजिन धारण करविले. या नंतर यज्ञोपवित धारण करण्याचा विधी झाला.

"यज्ञोपवीतं परमं पवित्रम्"–"अत्यंत पवित्र असे जे पूर्वी प्रजापतीसह उत्पन्न झाले आहे, आयुर्वर्धक वस्तूंमध्ये जे श्रेष्ठ आहे व जे निर्मल, शुभ्र आहे ते तू धारण कर. तेच तुझे बल व तेज असो व ते तुझ्या अज्ञानाचा नाश करो"–असे म्हणून आचार्यांनी वासुदेवाचा उजवा हात वर उचलून त्याच्या डाव्या खांद्यावरून शुभ्र असे यज्ञोपवीत त्याला धारण करावयाला लावले. नंतर स्थंडिलामध्ये स्थापन केलेल्या अग्नीमध्ये समंत्रक तुपाच्या आहुती देण्यात आल्या.

"ॐ अग्नआयुंषि पवस आसुवोर्जमिषंचनः।"

"हे अग्ने! तू आमची आयुष्ये रक्षण करतोस म्हणून बल व इष्ट अन्न आम्हाला दे आणि दुष्टवासना आमच्या पासून दूर व नाहीशा कर."

घृताची आहुती पडताच स्थंडिलातून सहस्र जिभा नाचवीत अग्नी वर आला. जणू वासुदेवाची प्रार्थना ऐकून तो संतुष्ट झाला होता.

"सर्व ठिकाणी पाहणारा, निषादादी पंचवर्णांचा हितकर्ता आपणापुढे आहवनीय अशा रूपाने स्थापन केलेल्या या अग्नीपाशी आम्ही धनादिकांची याचना करतो." असे म्हणून घृताची दुसरी आहुती देण्यात आली. त्या बरोबर त्या पवित्र अग्नीने अधिकच वर उसळी मारली.

"उत्कृष्ट कर्म करणाऱ्या अग्ने! आम्हाला वीर्यसंपन्न तेज दे, धन दे, पुष्टी दे. स्वाहा, स्वाहा."

आपल्या सर्वांचा जो मूळ प्रजापती त्याला बटू अर्पण करणे हा

जो ऐतिहासिक व अत्यंत महत्त्वाचा भाग त्याला सुरुवात झाली.

"आदित्याय वटुं ददामि"—असे म्हणून सूर्याचे अवलोकन करून "ब्रह्मचर्याश्रमामध्ये प्रवेश केलेला हा वटू मी प्रजापतीला अर्पण करीत आहे." असे म्हणून आचार्यांनी मनाने वासुदेवाला प्रजापतीच्या हवाली केले.

"प्रजापती देवतेचा तू ब्रह्मचारी आहेस."

"वायूचा तू ब्रह्मचारी आहेस."

"प्रजापती तुला आपल्याजवळ घेत आहेत, म्हणून मी तुला प्रजापतीला अर्पण करतो."

"सुंदर वस्त्रे धारण केलेला, कृष्णाजिन बांधलेला हा तरुण ब्रह्मचर्य आश्रमात गेला."

वासुदेवाने आज दुसऱ्या जन्मात प्रवेश केला; आज तो द्विज झाला.

"दुसऱ्या जन्मात जाणारा हा वटू विद्या वगैरे शिकून चांगला होवो आणि तपस्वी व योगी लोक याला उत्कर्षाला नेवोत." असे म्हणून गणेशपंतांनी वासुदेवाच्या हृदयाला स्पर्श करून त्याच्यामध्ये शक्तिपात केला.

यानंतर आचार्यांनी बटूला ब्राह्मणाच्या मुख्य उपास्य देवतेची—अग्नीची—उपासना सांगितली. आचार्यांपासून विधियुक्त स्वीकारलेली ही अग्नीची उपासना वासुदेवाने पुढे संसारात पदार्पण करीपर्यंत चालविली.

"मी महान्, धनवान् व बुद्धिमान् अशा अग्नीला समिधा देतो. हे अग्ने! तू समिधेने प्रदीप्त हो, स्वाहा." असे म्हणून वासुदेवाने अग्नीमध्ये समिधा वाहिल्या. गणेशपंतांनी वासुदेवाचा हात धरून "आजपासून अग्नी हाच तुझा आचार्य समजून त्याची तू सेवा कर." असा त्याला उपदेश केला. नंतर वासुदेवाने—"परमवंद्य हे

गुरुदेव ! अत्रिगोत्रोत्पन्न, मी वासुदेव, अनन्य होऊन शिष्यभावाने आपणाला प्रणाम करतो." असे म्हणून आचार्यांच्या चरणांना गुढग्यापर्यंत स्पर्श करीत अभिवादन केले व आचार्यांनी "आयुष्यमान् भव सौम्य सोमदत्त"—असा त्याला आशीर्वाद दिला. वासुदेवाने ब्रह्मांजुली करून—"आपण मला सावित्री मंत्राचा उपदेश द्या." अशी आचार्यांना विनंती केली. आचार्यांनी एका वस्त्राचा आडोसा करून वासुदेवाच्या कानात प्रणव आणि व्याहृतिपूर्वक गायत्री मंत्राचा पुढीलप्रमाणे उपदेश केला.

"ॐ भूर्भुवःस्वः ॐ तत्सवितुर्व्वरेण्यम्भर्गोदेवस्य धीमहि। धियोयोनः प्रचोदयात ॐ ।। हा मत्र तीन वेळा कानात सांगून त्याचा वासुदेवाच्या मुखावाटे उच्चार करवून घेतला व पुढीलप्रमाणे त्याचा अर्थही सांगितला. "जो सविता आम्हाला धर्मविषयक बुद्धीची प्रेरणा करतो त्या सवितृ देवतेचे व श्रेष्ठ, प्रार्थनीय, पापनाशक आणि तेजोमय रूपाचे आम्ही ध्यान करतो."

या मंत्राच्या उपदेशाबरोबर वासुदेवाच्या शरीरातून एक दिव्य तेजाचा प्रवाह त्याच्या पायापासूत मस्तकापर्यंत चमकून गेला. त्याचे सर्वांग शहारले, रोमांचित झाले. त्याला असे दिसले की, वेदमाता गायत्री आपणाला आशीर्वाद देत आहे व दिव्य सुवर्णाक्षरांनी ती आपल्या वक्षस्थळावर गायत्रीमंत्र लिहीत आहे.

तीन वेदांचे प्रतीक असे मुंज दर्भाने तयार केलेले मेखलेचे तीन वेढे वासुदेवाच्या कमरेभोवती बांधण्यात आले आणि त्याच्याकडून इंद्रियदमनाची शपथ घेववून इंद्रियदमनाचे प्रतीक असा त्याच्या कानापर्यंत येईल एवढ्या उंचीचा पळसाचा दंड त्याच्या हाती दिला. वासुदेव हे सर्व विधी अत्यंत गंभीरपणे करीत होता. जणू या विधीतील प्रत्येक पदाचे खऱ्याखऱ्या अर्थाने तो ग्रहण करीत होता. आचार्यांनी उच्चारलेल्या प्रत्येक मंत्राचा संस्कार त्याच्या देहावर

आणि मनावर होत होता.

आचार्यांनी वासुदेवाला ब्रह्मचर्यव्रताचा उपदेश केला.

" तू ब्रह्मचारी आहेस. "

वासुदेव म्हणाला, " ॐ बाढम् । "

" संध्या उपासना वगैरे करीत जा. "

" दिवसा निजू नकोस. "

" आचार्यांच्या ताब्यात राहून वेद शिकत जा. सायंकाळी व सकाळी भिक्षा मागत जा. संध्याकाळी व सकाळी अग्नीमध्ये समिधेचा होम करीत जा. "

" बारा वर्षे (वेद शिकेपर्यंत) ब्रह्मचर्यव्रताचे पालन कर. "

उपदेशाच्या प्रत्येक आज्ञेबरोबर " ॐ बाढम् " म्हणून वासुदेवाने आपण या सर्व आज्ञा पाळू असे आचार्यांना आश्वासन दिले. आपणाला पुढे असे दिसून येईल की, श्रीवासुदेवशास्त्र्यांनी हे वचन गृहस्थाश्रमामध्ये प्रवेश करीपर्यंत अक्षरशः पाळले.

स्विष्टकृत विधी उरकून अनुप्रवचनीय होमासाठी आणि ब्राह्मण भोजनासाठी पुरतील एवढ्या तांदुळांची भिक्षा गोळा करावयाची होती. पंचाची दोन टोके एकत्र बांधून तयार केलेली झोळी वासुदेवाने हातात घेतली. नुकतेच क्षौर केलेल्या डोक्यावरील शेंडीची घट्ट गाठ बांधलेली, भाळी कुंकमतिलक लावलेला, नवीनच धारण केलेले यज्ञोपवीत डाव्या खांद्यावरून उजव्या बाजूला रुळत आहे व नवीन रेशमाच्या वस्त्राची चार बोटे रुंदीची लंगोटी नेसलेला असा वासुदेव या वेळी साक्षात् वामन मूर्तीसारखा शोभत होता. मूळच्याच तप्तताम्रवर्णासारख्या त्याच्या देहकांतीवर नुकत्याच झालेल्या संस्कारामुळे आता एक अवर्णनीय तेज चमकू लागले व ते त्याच्या चेहऱ्यावरून ओसंडून बाहेर पडत आहे असे भासू लागले. एका हाती दंड व दुसऱ्या हाती झोळी घेऊन वासुदेव आपल्या

मातोश्रीसमोर येऊन उभा राहिला व म्हणाला–

"ॐ भवति भिक्षां देहि ॥"

आपल्या आयुष्यातील ज्या अत्यंत आनंदी क्षणाची रमाबाई आतुरतेने वाट पाहात होत्या तो हाच क्षण होता. त्यांचे नेत्र आनंदाश्रूंनी भरून आले. ओंजळभर तांदुळांमध्ये एक सुवर्णाची मुद्रा घालून ती पहिली भिक्षा त्यांनी वासुदेवाच्या झोळीमध्ये अत्यंत कृतार्थतेने घातली व आपले दोन्ही हात त्याच्या गालावरून फिरवून हाताची बोटे कडकड वाजविली. आपली स्वत:चीच दृष्ट या वटूला लागू नये असे त्यांना वाटले असावे. यथासमय अनुप्रवचनीय होम करून ब्राह्मणांना भोजन देण्यात आले. आलेल्या इतर सर्व मंडळींना हरिभटांनी यथेच्च मिष्टान्न भोजन दिले. वासुदेवाला आशीर्वाद देण्यासाठी आलेले ब्राह्मण आकंठ जेवून तृप्त झाले. महिलांच्या पंगतीमध्ये एकमेकींना आग्रह करीत, उखाणे घेत, सर्वांनी भोजन केले. सुवासिनी स्त्रियांनी जेवताना आंबाड्यात खोवलेल्या त्यांच्या नथी थट्टा विनोदाच्या वेळी हालतानाचे दृश्य मोठे मजेदार दिसत होते.

चवथ्या दिवशी पळसुल्याचा विधी झाला. वासुदेवाच्या जीवनामध्ये आता एका नवीन पर्वाला सुरुवात झाली होती. मूळचाच गंभीर प्रकृती वासुदेव आता वटूच्या वेषात अधिकच गंभीर दिसू लागला. आतापर्यंत ज्या गोष्टी कराव्याशा वाटत असूनही त्याला करण्याची अनुज्ञा नव्हती, त्या गोष्टी आता करण्यायोग्य तो झाला होता. आता त्याने दुसऱ्या जन्मामध्ये प्रवेश केला होता. तो आतां द्विज झाला होता. वासुदेवाची मुंज झाली आणि त्याच्या ब्रह्मचर्याश्रमाला सुरुवात झाली. सकाळ, दुपार आणि संध्याकाळ संध्योपासना सुरू झाली. ब्रह्मचर्याश्रमातील अतिशय महत्त्वाची साधना जी अग्निपरिचर्या ती सुद्धा त्याने सुरू केली. अग्नीसमोर उभे राहून अग्नीत समिधा देऊन "मयि मेधां मयि प्रजां मय्यग्निस्तेजो दधातु–"

म्हणून वासुदेव अग्नीची प्रार्थना करू लागला. त्याने अग्नीकडे जे जे काही मागितले ते ते सर्व अग्नीने त्याला सढळ हातांनी दिले, याची प्रचीती प. प. श्रीटेंबेस्वामीमहाराजांचे चरित्र वाचताना पदोपदी येते. टेंबे हे ऋग्वेदातील शाकल शाखेचे ब्राह्मण होते. वासुदेवाला आता ऋग्वेदाची संथा घ्यावयाची होती. शेजारच्या भास्करभट ओळकरांकडे हरिभटांनी त्याला ऋग्वेदाची संथा घेण्यासाठी पाठविण्याचे ठरविले. भास्करभट जसे विद्वान् होते तसे ते प्रेमळही होते. वासुदेवासारख्या मेधावी शिष्याला ऋग्वेदाची संथा देण्याचे त्यांनी आनंदाने कबूल केले.

ओळकरांच्या घरांत ओटचावर भास्करभट शुचिर्भूत होऊन आसनावर बसले होते. समोर दर्भासनावर वासुदेव बसला होता. जणू काही हातात दर्भ घेऊन, गुरुजींनी आपणाला वेदाभ्यास शिकवावा म्हणून तो समित्पाणि होऊन त्यांची प्रार्थना करीत होता. सकाळीच स्नानसंध्या उरकून तो आला होता. त्याने शेंडीची गाठ बांधलेली होती. त्याच्या सर्वांगावर भस्माचे पट्टे असून त्याने स्वच्छ लंगोटी नेसली होती. नुकताच सूर्योदय झाला होता. ओळकरांच्या घरासमोरील वृक्षांवर पक्षांची गोड किलबिल सुरू झाली होती. पहाटे पासून आरवून थकलेला कोंबडा अजूनसुद्धा दूरवर कोठेतरी मधूनच कुकूच कू करीत होता. परसातल्या फुलझाडांवर फुललेल्या फुलांचा सुवास सकाळच्या मंद वाऱ्याबरोबर हळूहळू सगळीकडे पसरत होता. वातावरण प्रसन्नच नव्हे; तर एक प्रकारच्या दिव्य जादूने भारावून गेल्यासारखे जाणवत होते. जणू काही आता पठण व्हावयाच्या वेदमंत्रांच्या देवता अदृश्य रूपाने तेथे वावरत होत्या.

भास्करभटांनी वासुदेवाला ऋग्वेदाची थोडक्यात माहिती करून दिली व त्याला वेदमंत्रांची संथा द्यावयाला सुरुवात केली. ऋग्वेदाची

संथा घेण्यापूर्वी वासुदेवाने पादोपसंग्रहण केले.

" हं, वासुदेव ! म्हण ॐ अग्निमिळे पुरोहितम् "

" ॐ अग्निमिळे पुरोहितम् "...

वासुदेवाचा आवाज स्पष्ट आणि खणखणीत होता. उच्चार बिनचूक होते. आपल्या कानांचे प्राण करून गुरुमुखातून बाहेर पडणारा प्रत्येक शब्द तो ऐकत होता. ओळकर गुरुजींच्या मुखातून बाहेर पडणाऱ्या मंत्राची कंपनेसुद्धा जशीच्या तशी वासुदेवाच्या मुखातून येत होती. वैदिक काळात ज्या भावनेने आणि श्रद्धेने शिष्य गुरुगृही वेदाभ्यास शिकण्यासाठी जात असत, त्याच श्रद्धेने आणि त्याच शिकण्याच्या व शिकविलेली विद्या आत्मसात करण्याच्या भावनेने वासुदेव गुरुगृही आला होता. सकाळच्या त्या पवित्र आणि प्रसन्न वातावरणामध्ये गुरुशिष्यांच्या मुखातून निघत असलेल्या पवित्र वेदमंत्रांनी तेथील आसमंत भरून गेले होते. वेद म्हणजे शब्दब्रह्म होय. या शब्दब्रह्मातूनच सृष्टीची उत्पत्ती झाली आहे. गुरुशिष्यांच्या मुखातून बाहेर पडणाऱ्या त्या वेदवाणीशी ओळकरांच्या घरासभोवतालची सृष्टी एकरूप होऊन गेली होती. जणू आपल्या मूळरूपामध्ये विलीन होण्यासाठी सृष्टीची समाधी लागली होती.

वासुदेवाच्या मुखातून बाहेर पडणारे मंत्रोच्चार ऐकून भास्करभट चकित झाले. एवढे सुस्पष्ट उच्चार, न अडखळता होणारे अनुकरण व एकपाठीवृत्ती इत्यादी त्याच्या सर्वच गोष्टी अपूर्व होत्या. भास्करभटांच्या उभ्या आयुष्यात असा शिष्य त्यांना कधी लाभला नव्हता. मोठ्या आनंदाने आणि उत्साहाने आपली सर्व विद्या या मेधावी शिष्याला दान करण्यास ते आता उत्सुक झाले होते.

अखंड जगाचे गुरू होण्याचा अधिकार असूनही दत्तावतार श्रीनृसिंहसरस्वतीस्वामीमहाराजांनी आपले मौंजिबंधन संस्कार होईपर्यंत " विश्वगुरू " ही आपली उपाधी झाकून ठेवली होती.

त्याचप्रमाणे व्रतबंध संस्कार पूर्ण होऊन, आता विश्वगुरू होऊन, सर्व जगाला पावन करावयाला सिद्ध झालेले श्रीटेंबेस्वामीमहाराजस्वरूप भगवान् श्रीदत्तात्रेय आपणा सर्व भक्तजनांचे कल्याण करोत.

अध्याय पाचवा

अध्ययन आणि अध्यापन :–

वासुदेवाला ऋग्वेद शिकविण्याचे भाग्य भास्करभट ओळकरांना फार दिवस लाभले नाही. त्यांच्या पत्नीचे अकस्मात् निधन झाले आणि घरचा सर्व व्यवहार सुनेच्या हातात आला. सासू गेल्यावर सुनेचा सासुरवास इतरांना सहन करावा लागतो. भास्करभटांच्या मानी स्वभावाला हा सासुरवास सहन होईना. एक दिवस कोणालाही न कळविता त्यांनी गृहत्याग केला. वासुदेवाचे अध्ययन येथेच संपावयाचे; पण त्याच्या भवितव्याची काळजी हरिभटांना होती. जांभळीची आड या डोंगरापलीकडे भटवाडीमध्ये वे. शा. सं. विष्णुभटतात्या उकिडवे राहत होते. हरिभटांचे आणि त्यांचे स्नेहसंबंध चांगले होते. हरिभटांनी श्री. उकिडवेशास्त्र्यांना वासुदेवाला ऋग्वेदाची संथा देण्याची विनंती केली आणि शास्त्रीबुवांनी ती आनंदाने मान्य केली.

विद्यार्जन हेच वासुदेवाच्या जीविताचे आता मुख्य कर्तव्य झाले होते. त्याला आता सकाळीच उठून नित्यकर्म आटोपून, अर्ध्या मैलाहून अधिक फेरा घेत भटवाडीमध्ये जावे लागे. वेदविद्येबद्दल नितान्त आदर आणि अध्ययनाची दांडगी हौस यामुळे सकाळची ही भटवाडीची प्रभात फेरी त्याला कधीच कंटाळवाणी वाटली नाही.

पूर्वजन्माच्या बलवत्तर संस्कारामुळे वासुदेवाची प्रज्ञाशक्ती अत्यन्त तीव्र झाली होती. त्यामुळे आठ नऊ वेळा संथा घेतली की, त्याचे सर्व पाठ होत असे. गुरुगृही शिकलेले वेदमंत्र वासुदेव घरी आल्यावर पुन्हा म्हणत असे. यावेळी हरिभटांचे त्याला फार

साहाय्य होत असे. संथा म्हणत असताना जर कोठे चूक झाली; तर गणेशभटजी "बाळ ! पोथीमध्ये पाहून म्हणत जावे," एवढीच सूचना प्रेमाने करीत असत. वासुदेवाचे वेदाध्ययन नित्य सोवळ्याने व स्त्रीशूद्रादिकांपासून दूर राहूनच होत होते. त्यामुळे वेदमंत्रातील शक्तीची सिद्धी त्याला बालवयातच झाली होती. वेदालाच श्रुती असे म्हणतात. श्रुतीचा अर्थच असा आहे की, गुरूने शिष्याला मंत्र सांगावयाचे व ते त्याने श्रवण करून पुनःपुन्हा म्हणून कंठस्थ करावयाचे. त्यामुळे वेदविद्या ही पुस्तकी विद्या नसून ती परंपरेने प्राप्त होणारी विद्या आहे. हजारो वर्षांपासून भारतात वेदविद्येची हीच परंपरा चालू असून या अत्यन्त महान् व सर्वात् श्रेष्ठ अशा विद्येचा अभ्यास वासुदेव अत्यन्त निष्ठेने करीत असे.

वेदाध्ययनाच्या काळात वासुदेवाला काही दिवस सकाळचे भोजन कोनकरांच्या घरी भटवाडीमध्ये करावे लागत असे. यावेळी स्वतःच सोवळ्याने भात शिजवून, नैवेद्य वैश्वदेव करून, नंतरच भोजन करण्याचा वासुदेवाचा नित्यक्रम होता. "आचरः प्रथमो धर्मः" या वचनाप्रमाणे आचार हेच धर्माचे मूळ आहे किंबहुना आचार हेच धर्माचे एकमात्र अधिष्ठान आहे, अशी वासुदेवाची दृढ धारणा या वयातच तयार झाली होती. शास्त्राने आचारावर व कर्मावर जो अत्यधिक भर दिला आहे, त्याचा हेतू मनोमालिन्य नाहीसे व्हावे व ब्राह्मतेज वृद्धिगत होऊन ते धारण करण्यास शरीर योग्य व्हावे हाच आहे, ही त्याची श्रद्धा या वयातच पक्की झाली. एवढेच नव्हे; तर ब्राह्मणाने कर्ममार्गाच्या द्वारा धर्माचे यथाविधी आचारण करून आपले ब्राह्मतेज वाढविले पाहिजे व "ब्राह्मणस्यहि देहोऽयं क्षुद्रकामाय नेष्यते। कृच्छ्राय तपसे चेह प्रेत्यानन्तसुखाय च ॥" या श्रीमद् भागवत महापुराणाच्या वचनाप्रमाणे आपल्या जीवनाची सिद्धी झाली पाहिजे, असा त्याचा दृढ संकल्प झाला

होता. ब्राह्मणाचा देह हा अत्यन्त महत्त्वाचा व दुर्लभ आहे. यासाठी क्षुद्र इच्छा धरून तत्पूर्तीप्रीत्यर्थ त्या देहाला खर्ची घालू नये; मात्र अत्यन्त कठीण अशा कृच्छ्रादी तपामध्ये त्याचा विनियोग करावा, परोपकार करून समाजाला सुख झालेले पाहवे व शेवटी अनन्त आनन्दस्वरूप मोक्षाची प्राप्ती करावी. यासाठीच ब्राह्मणदेहाची योजना आहे, ही वासुदेवाने या वयात आपल्या ठिकाणी मुरविलेली वृत्ती पुढे आमरणान्त राहिली असे पुढील चरित्रावरून दिसून येते.

मध्यन्तरीच्या काळात वासुदेव भटवाडीमध्ये श्री. उकिडवे-शास्त्र्यांच्या घरी वेदाध्ययनासाठी जात असल्यामुळे पुष्कळदा रात्रीच्या वेळी तो आपल्या विधवा आत्याबरोबर कोनकरांच्या घरी राहत असे व भल्या पहाटे उठून अध्ययनासाठी श्री. उकिडवे गुरुजींच्या घरी जात असे. बहुधा तो पहाटे गुरुजी उठण्यापूर्वीच उठून अंधारातच त्यांच्या चरणकमलांजवळ जाऊन बसत असे. त्यावेळी शास्त्रीबुवा झोपेतच असत. एखाद्या वेळी त्यांचा पाय वासुदेवाला लागला तर ते एकदम विचारीत असत की, "कोण आहे ?" त्यांचा हा प्रश्न ऐकताच "मी वासुदेव" असे तो उत्तर देत असे. त्याचे हे उत्तर ऐकताच ते त्याला असे म्हणत असत की, "वासुदेवा ! अजून बरीच रात्र आहे. पहाट व्हावयाला खूप अवकाश आहे. तोपर्यंत नीज." गुरुजींच्या आज्ञेप्रमाणे वासुदेव पुन्हा थोडा वेळ झोपून राहत असे.

त्या काळात रात्री दिव्याची सोय नसल्यामुळे नैसर्गिक उजे-डाचाच जास्त उपयोग करून घ्यावा लागत असे. वासुदेवही रात्री अंगणात तुळशीवृंदावनाजवळ बसून वेदाभ्यास करीत असे. एखाद्या वेळी मध्येच झोप आली तर तो तेथेच झोपत असे व पहाटे उठून पुन्हा म्हणण्यास सुरुवात करीत असे. "वेदाभ्यासो हि विप्रस्य तपः परमिहोच्यते" म्हणजे वेदाभ्यास करणे हेच ब्राह्मणाचे सर्वश्रेष्ठ

तप होय, असे जे मनुस्मृतीत म्हटले आहे, त्याची परिपूर्ण जाणीव वासुदेवाला झाली होती, हे यावरून दिसून येते. इतकेच नव्हे; तर ब्राह्मणाने विनाकारण व कोणतीही अपेक्षा न ठेवता वेदाभ्यास करावा या शास्त्रवचनानुसार त्याचे हे मोठे तपच चालू होते. कोणत्याही प्रकारच्या व्यावहारिक उपयुक्ततावादाच्या दृष्टीने वेदाभ्यास न करता तो केवळ आत्मकल्याणाच्या दृष्टीनेच करावयाचा असा जो आदर्श लक्षावधी वर्षे भारतीयांनी जोपासला आहे, त्याचे वासुदेव हे मूर्तिमंत साकार रूप होते, असे म्हटले तर तेच अधिक योग्य ठरेल.

वासुदेवाला आजोबांच्या मायेचे छत्र फार दिवस लाभले नाही. त्याच्या वयाच्या दहाव्या वर्षीच हरिभटांनी किरकोळ आजाराने आपली इहलोकीची यात्रा संपविली. त्यांनी आयुष्यभर उद्योगरत राहून आपल्या कुटुंबाचे भरण पोषण केले होते. आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांच्यावर दोन कुटुंबांच्या पोषणाची जबाबदारी येऊन पडली होती. ज्या वयामध्ये विश्रांती घ्यावयाची त्याही वयामध्ये, घरी कर्तीसवरती मुले असूनही, हरिभट संसाराच्या गाड्याला जुंपलेले होते. मोठा मुलगा गणेशपंत याच्या पाठीवर रामकृष्ण, बाळकृष्ण व विष्णू अशी त्यांना तीन मुले होती. पण या तिघांपैकी कोणाचाही विशेष उल्लेख श्रीस्वामीमहाराजांच्या चरित्रामध्ये सापडत नाही. भिक्षुकीच्या पेशाला लागणारे वैदिकीचे आणि याज्ञिकीचे शिक्षण टेंब्यांच्या कुटुंबामध्ये परंपरेने आलेले होते. गणेशपंतांचे हे शिक्षण हरिभटांच्या देखरेखीखाली झाले होते. हरिभटांच्या इतर मुलांचे शिक्षण याच रीतीने झालेले असणार; कारण प्रत्येक ब्राह्मण कुटुंबातील ती परंपरा होती. गणेशपंत ईश्वरभजनी लागलेले व संसाराविषयी विरक्त होते; पण बाकीच्या तीन मुलांनी हरिभटांना संसारामध्ये होणाऱ्या धडपडीत काही मदत केल्याचा

कोठे उल्लेख नाही. त्यामुळे असे अनुमान काढता येते की, हरिभटांनी आपल्या मुलांपासून सुखाची अपेक्षा केली नसावी. वासुदेव मात्र मुंज झाल्यापासून अधूनमधून आपल्या आजोबांना भिक्षुकीच्या कामामध्ये मदत करीत असे. आजोबांचा हा कर्मयोग अगदी जवळून पाहण्याचे भाग्य त्याला लाभले होते. त्यामुळे भावी आयुष्यात त्याच्या सांसारिक जीवनावर त्याचा फार मोठा प्रभाव पडला होता. सतत उद्योगरत राहून आपणावर येऊन पडलेली जबाबदारी ही परमेश्वराचीच इच्छा मानून ती पार पाडावयाची हे बाळकडू त्याने आपल्या आजोबांपासून घेतले होते. मुंज झाल्यापासून दोन वर्षेपर्यंत वासुदेवाचे जीवन तसे पाहिले तर संसारातील कोणत्याही प्रकारच्या जबाबदारीपासून मुक्त होते. खूप अध्ययन करावे, पूजाअर्चा वगैरे साधना करावी हाच त्याचा प्रमुख व्यवसाय होता. पण हरिभटांच्या निधनानंतर त्याच्यावर अकस्मात् मोठी जबाबदारी येऊन पडली. आधीच गंभीर प्रकृतीच्या वासुदेवाचा स्वभाव त्यामुळे अधिकच गंभीर झाला.

हरिभट निवर्तले त्यावेळी गणेशपंत गाणगापूरमध्ये होते. वडिलांचे और्ध्वदेहिक धाकटे चिरंजीव बाळकृष्णभट यांनीच केले. हरिभटांच्या मृत्यूसमयी घरात कोणीही वडिलधारे माणूस नसल्यामुळे बाळकृष्णभटांनी घरातील पुष्कळ चीजवस्तू लांबविली. शिवाय कुटुंबावर पाचशे रुपयांच्या कर्जाचा बोजाही करून ठेवला. बाळकृष्णभट घर सोडून गेले; पण ते कोठे गेले याचा उल्लेख सापडत नाही. ते पितृगृही राहत नव्हते एवढे निश्चित अनुमान काढता येते. कदाचित् बाळकृष्ण व विष्णू या दोघा भावांनी वेगळे बिऱ्हाड केले असावे. बाळकृष्णभटजी निघून गेल्यावर घरात कोणीतरी कर्तासवरता पुरुष असावा म्हणून अन्नपूर्णाबाई व रमाबाई या मायलेकींनी नारायणभट ऊर्फ नाना कोनकर यांना बोलावून घरची व्यवस्था

पाहुण्यासाठी सोबत ठेवून घेतले. हे नाना कोनकर अन्नपूर्णाबाईंचे दूरचे नातलग लागत. रमाबाईंची चुलतबहीण दुर्गामावशी याही यावेळी टेंबे कुटुंबाबरोबर राहत होत्या. नाना कोनकरांनी या कुटुंबावरील फारच मोठा जबाबदारीचा भार कमी केला. त्याकरिता त्यांनी कुटुंबावरील कर्जफेडीपोटी आणि स्वत:ला कुटुंबासाठी करावा लागलेला खर्च वसूल करण्यासाठी अन्नपूर्णाबाईंकडून वतनी इस्टेट खरेदी म्हणून लिहून घेतली. त्यामुळे या कुटुंबाला इस्टेटीची काळजी करण्यासारखे काही राहिलेच नाही. राहिला तो फक्त दैनंदिन जीवन कसे जगावे हा प्रश्न! आणि या तातडीच्या प्रश्नाकडे लक्ष घालावयाला घरात फक्त वासुदेव होता. ही जब बदारी पार पाडावयाला त्याचे वय अद्याप लहान होते. तरीही कुटुंबपोषणाची ही जबाबदारी त्याने यथाशक्ती पार पाडली.

श्री. उकिडवेशास्त्री यांच्याकडील वेदाध्ययनाचा व याज्ञिकाचा अभ्यास पूर्ण झाल्यावर वासुदेव वेदशास्त्रसंपन्न श्री. शंभूशास्त्री साधले यांच्याकडे संस्कृत व ज्योतिष शिकावयाला जात असे. मात्र महाकवी कालिदासाच्या रघुवंश काव्याच्या दुसऱ्या सर्गातील सात श्लोक व ज्योतिषाचा काही भाग इतकाच अभ्यास श्री. साधलेशास्त्री यांच्याकडे झाला. वासुदेव गुरुमुखातून एवढेच संस्कृत शिकला होता. पुढील काळात कोणा नातलगाच्या मृत्यूमुळे प्राप्त झालेल्या दहा दिवसाच्या अशौच अर्थात् सुतकाच्या काळामध्ये दुसरा काही उद्योग नसल्यामुळे त्याने अमरकोश पाठ केला होता. वासुदेवाचे पारंपरिक शिक्षण एवढेच झाले होते.

श्री. शंभूशास्त्री साधले यांच्याकडे चाललेले वासुदेवाचे शिक्षण एके दिवशी पुढे घडलेल्या प्रसंगामुळे अकस्मात् बंद झाले. श्री. शंभूशास्त्री यांची त्यांच्या ज्योतिष विषयक ज्ञानाबद्दल अत्यंत प्रसिद्धी होती. त्यामुळे पुष्कळ लोक त्यांच्याकडे ज्योतिष विचारा-

वयाला येत. एके दिवशी एक गृहस्थ शंभूशास्त्र्यांकडे घर बांधण्यासाठी मुहूर्त विचारावयाला आले. पंचांग काढून आणि गणित मांडून शास्त्रीबुवांनी एक मुहूर्त काढून दिला. वासुदेव बाजूलाच बसला होता. सहसा आपले तोंड मध्ये न खुपसणारा वासुदेव शास्त्रीबुवांना असे म्हणाला की, " मध्ये बोलण्याचे धाडस करतो म्हणून क्षमा असावी. आपण आता जो मुहूर्त काढून दिला त्याचे गणित पुन्हा तपासून पाहावे." शंभूशास्त्र्यांच्या आश्चर्याला सीमा राहिली नाही. आपण काढलेला मुहूर्त चूक असणे शक्य नाही अशी त्यांना खात्री होती; तरी पण मांडलेले गणित त्यांनी पुन्हा एकदा तपासून पाहिले. खरोखरच अनवधानाने गणित मांडण्यात आपण चुकलो आहोत हें त्यांच्या ध्यानात आले. त्या गणिताप्रमाणे काढलेल्या दिवशी कुयोग होता. त्यांनी दुसरा मुहूर्त काढून दिला. भेटावयास आलेले गृहस्थ परत गेल्यावर शंभूशास्त्री वासुदेवाला म्हणाले की, " वासुदेव ! उद्यापासून तू आमच्याकडे शिकावयाला यावयाचे नाही. आज तुझं येथील शिक्षण संपले. " शास्त्रीबुवा का रागावले हे वासुदेवाला पहिल्याने कळलेच नाही. मग त्याच्या असे लक्षात आले की, शास्त्रीबुवांच्या गणितातील चूक आपण त्यांच्या नजरेला आणली हा उपमर्द झाला, असे त्यांना वाटले; पण वासुदेवाच्या मनात तसे काही सुद्धा नव्हते. गुरुजींनी अंगिकारलेल्या पद्धतीमुळे एक शास्त्रीय अनुमान चूक ठरणार व तसे झाले; तर त्या शास्त्राचा अवमान होईल याच भावनेने वासुदेवाने आपले मत मांडले होते. पण त्याचा परिणाम त्याचे शिक्षण संपुष्टात येण्यात झाला. त्यानंतर काही अडचण आलीच तर वासुदेव सावंतवाडीला वेदशास्त्रसंपन्न श्री. विष्णुभट अळवणी यांच्याकडे जाऊन आपले शंकासमाधान करून घेई.

श्री. शंभूशास्त्री साधले यांनी " शिष्यादिच्छेत पराजयम् " या

न्यायाने शिष्याकडून आपला पराजय व्हावा म्हणजे तो आपल्यापेक्षा श्रेष्ठ व्हावा अशी उदार, निर्मत्सर व विशाल मनोवृत्ती ठेवून वासुदेवासारख्या बुद्धिमान् शिष्याचे कौतुक करून त्यास प्रोत्साहन द्यावयास हवे होते; परन्तु घडले मात्र उलटच. हातचे काहीही राखून न ठेवता शिष्याला आपली सर्व विद्या देणारे, निर्मत्सरतेने त्याच्या गुणांचे व बुद्धीचे कौतुक करणारे व त्याची कीर्ती वृद्धिगत करणारे गुरुजी या भूतलावर फार दुर्मिळ असतात हेच या प्रसंगावरून दिसून येते.

वासुदेव शरीराने कृश व सावळ्या वर्णाचा होता. त्याचे वरील पुढचे दोन दात जरा पुढे आलेले होते. त्याच्या चेहऱ्यावर तेज व करारीपणा दिसत असे आणि त्याची वृत्ती निर्भय असल्याचे प्रत्ययास येई. वयाच्या दहाव्या वर्षापासूनच तो पुराण सांगू लागला व वयाच्या पंधराव्या वर्षांपासून त्याने विद्यादान करावयाला सुरुवात केली. असे हे दिव्य जीवन पाहिले की, श्रीमद्भगवद्गीतेतील अशा प्रकारच्या जीवनासंबंधी सूचित केलेले श्लोक व त्याचा श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी प्रकट केलेला भावार्थ आठविल्याशिवाय राहत नाही.

अथवा योगिनामेव कुले भवति धीमताम् ।
एतद्धि दुर्लभतरं लोके जन्म यदीदृशम् ॥ ६.४२ ॥
तत्र तं बुद्धिसंयोगं लभते पौर्वदेहिकम् ।
यतते च ततो भूयः संसिद्धौ कुरुनन्दन ॥ ४३ ॥

याचा अर्थच असा आहे की, किंवा तो योगभ्रष्ट बुद्धिमान् दरिद्रयांच्याच कुलात उत्पन्न होतो. या लोकी जे हे अशा प्रकारचे जन्मदरिद्री योग्यांच्या घरी झालेले जन्म ते अतिशय दुर्लभ आहेत. त्या दरिद्रीयोग्यांच्या कुलात त्या योगभ्रष्ट पुरुषाला पूर्वदेहातील बुद्धियोग प्राप्त होतो. आणि हे कुरुनन्दना ! योगसिद्धीसाठी पूर्व जन्मातील अभ्यासाच्या संस्कारामुळे किंवा त्याहून अधिकच तो यत्न करतो.

याचा भावार्थ प्रकट करताना श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी असे म्हटले आहे की –

अथवा ज्ञानाग्निहोत्री । जे परब्रह्मण्यश्रोत्री ।
महासुखक्षेत्रीं । आदिवंत ॥६.४४९॥
जे सिद्धांताचिया सिंहासनीं । राज्य करिती त्रिभुवनीं ।
जे कूजती कोकिल वनीं । संतोषाच्या ॥ ४५० ॥
जे विवेकद्रुमाचे मुळीं । बैसले आहाति नित्य फळीं ।
तया योगियांचिया कुळीं । जन्म पावें ॥ ४५ ॥
मोटकी देहाकृति उमटे । आणि निजज्ञानाची पाहांट फुटे ।
सूर्यापुढें प्रगटे । प्रकाशु जैसा ॥ ४५२ ॥
तैसी दशेची वाट न पाहतां । वयसेचिया गांवा न येतां ।
बाळपणींच सर्वज्ञता । वरी तयातें ॥४५३॥
तिये सिद्धप्रज्ञेचेनि लाभें । मनचि सारस्वतें दुभे ।
मग सकळ शास्त्रें स्वयंभें । निघती मुखें ॥ ४५४ ॥
ऐसें जे जन्म । जयालागीं देव सकाम ।
स्वर्गीं ठेले जप होम । करिती सदा ॥ ४५५ ॥
अमरीं भाट होईजे । मग मृत्युलोकातें वानिजे ।
ऐसें जन्म पार्था गा जे । तें तो पावे ॥ ४५६ ॥

याचा अर्थ असा आहे की, अथवा जे ज्ञानरूप अग्नीमध्ये हवन करतात, जे परब्रह्मानुभूती संपन्न व वेदसंपन्न आहेत, जे परब्रह्म-सुखरूप गावाचे वतनदार आहेत, जे एकमेवाद्वितीय अशा अद्वैताच्या सिंहासनावर बसून त्रिभुवनाचे राज्य करतात, जे संतोषरूप वनात मधुर ध्वनी करणारे कोकिळ आहेत आणि जे विचारवृक्षाच्या मुळापाशी बसून ब्रह्मरूप नित्य फळाचे सेवन करतात, अशा योग्यांच्या कुळात त्या योगभ्रष्ट पुरुषास जन्म मिळतो. तेथे जन्म घेतल्यावर लहान वयातच त्याच्या ठिकाणी आत्मज्ञानाची पहाट

होते. ज्याप्रमाणें सूर्य उगविण्याच्या अगोदर चहूकडे अरुणोदयाची प्रभा फाकते त्याप्रमाणे योग्य अवस्थेची वाट न पाहता व प्रौढवयरूपी गावाला न येता बाळपणीच त्याला सर्वज्ञता अर्थात् सर्व विषयांचे आद्योपान्त ज्ञान प्राप्त होते. अशा प्रकारे पूर्व जन्मामुळे प्राप्त झालेल्या सिद्धप्रज्ञेच्या साहाय्याने त्याचे मनच सर्व विद्यांना प्रसवते व त्याच्या मुखातून सर्व शास्त्रे स्वयंभूपणे आपोआप स्वतःच प्रकट होऊ लागतात. असे जे उत्तम कुळात प्राप्त होणारे जन्म आहेत ते प्राप्त होण्याकरिता स्वर्गवासी देव देखील मनात हेतू धरून नेहमी जप व होम करीत असतात. पार्था! देवांनी स्तुतिपाठक होऊन मृत्यूलोकाचे अर्थात् या मृत्युलोकातील ज्या ज्ञानसंपन्न योगी कुलाचे वर्णन करावे अशा उत्तम कुलात तो योगभ्रष्ट पुरुष जन्म पावतो.

उपरोक्त सर्व सिद्धान्तांचा प्रत्यय हे चरित्र वाचताना पदोपदी आल्यावाचून राहत नाही. वास्तविक पाहता अवतारी पुरुषांची तसेच थोर सत्पुरुषांची अंतर्प्रज्ञा जन्मतःच जागृत असते. तसे नसते तर आद्यशंकराचार्यांनी वयाच्या सोळा वर्षांमध्येच प्रस्थानत्रयीवर भाष्य लिहिले नसते व श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी सोळाव्या वर्षी ज्ञानेश्वरीसारखी गीतेवरील अद्वितीय भावार्थ टीका लिहिली नसती. याशिवाय या गोष्टींची अन्यप्रकारे कारण मीमांसा देता येणार नाही. ज्ञानेश्वरी वाचल्यानंतर आपणास असे दिसून येते की, श्रीज्ञानेश्वरमहाराजांना सर्व शास्त्रांचे परिपूर्ण ज्ञान होते. तसेच काव्य, नाट्य, अलंकार व ध्वनी हे विषयही त्यांना उत्तम प्रकारे अवगत होते. ज्ञानेश्वरीच्या पहिल्या अध्यायातील नमनावरून ही गोष्ट स्पष्ट होते. समाजाने बहिष्कृत केलेल्या या मुलांच्या मुंजीही झाल्या नव्हत्या. मग त्यांना वेदांचा आणि शास्त्रांचा अभ्यास करण्याची संधी कधी प्राप्त झाली याचे कोडे पडते. पारंपरिकरीत्या त्यांनी हा अभ्यास कधीच केला नव्हता; असाच निष्कर्ष आपणाला काढावा

लागेल. वेद, सर्व शास्त्रे, पुराणे, काव्य, अलंकार, व्याकरण इत्यादी सर्व प्रकारच्या अपरा विद्यांचे म्हणजे थोडक्यात अखिल विश्वातील यच्चयावत् ज्ञान त्यांच्यामध्ये जन्मापासूनच जागृत होते, असे म्हणणेच संयुक्तिक ठरेल. तीच गोष्ट विदर्भातील थोर संत श्रीगुलाबरावमहाराज यांची आहे. जवळ जवळ जन्मांध अशा या सत्पुरुषाला अपरिचित असा विषयच नव्हता. त्यांचे प्रत्येक विषयाचे ज्ञान पराकोटीला पोहोचलेले होते. त्यांनी काही ग्रंथांचे विशेषतः पाश्चात्य तत्त्वज्ञान्यांच्या ग्रंथांचे–वाचन इतरांकडून करवून घेतले होते; पण सर्वच शास्त्रांचे ज्ञान त्यांनी या जन्मी संपादन केल्याचा उल्लेख कुठेच सापडत नाही.

अगदी हीच गोष्ट प. प. श्रीटेंबेस्वामीमहाराजांच्या बाबतीमध्ये-सुद्धा सत्य आहे. वयाच्या आठव्या वर्षी त्यांची मुंज झाली, दहाव्या-वर्षी त्यांचे आजोबा निवर्तले आणि कुटुंब पोषणाची जबाबदारी त्यांच्यावर येऊन पडली. श्रीस्वामीमहाराजांचे ऋग्वेदाचे शिक्षण झाले होते. उपग्रंथही ते शिकले होते. त्याच बरोबर ज्योतिषशास्त्र व वैद्यकी या विषयांचे ज्ञान त्यांनी संपादन केले होते; पण त्यांच्या विविध ग्रंथांवरून दिसून येणारे त्यांचे यच्चयावत् विषयांचे ज्ञान पाहून आपणाला आश्चर्य वाटते की, हे सर्व ज्ञान त्यांनी कधी प्राप्त केले असावे ! यावरून आपण असा निष्कर्ष काढू शकतो की, त्यांची अंतर्प्रज्ञा जन्मतःच जागृत होती. भगवान् श्रीदत्तात्रेयांनी श्रीस्वामीमहाराजांना ग्रंथ सांगितले आणि त्यांनी ते लिहून काढले ही वरील सत्य सांगण्याची एक वेगळी पद्धत आहे एवढेच !

मुंज झाल्यापासून वासुदेवाने त्रिकाळ स्नान व संध्या करा-वयाला सुरुवात केली. त्याचबरोबर श्रीगुरुचरित्राचे वाचन, देवतार्चन, पादुकापूजन, पंचायतनपूजा असा त्याचा दैनंदिन कार्यक्रम ठरून गेला होता. त्याच वेळी त्याने अग्निपूजासुद्धा घेतली होती.

त्यामुळे त्याच्या दैनंदिन कार्यक्रमात प्रातर्होमही होत असे. स्मार्त व भागवत अशा दोन्हीही एकादशींच्या दिवशी कडकडीत उपोषण करून तो एकादशीचे व्रत अत्यन्त कडकपणे पाळीत असे. या दोन्ही दिवशी तो रात्री जागरण करीत असे. एवढेच नव्हे; तर मध्येच झोप येऊ नये म्हणून तो आपल्या शेंडीला दोरी बांधून ती खुंटीला बांधून ठेवीत असे. त्यामुळे रात्रीच्या वेळी मध्येच डुलकी आली तर शेंडीला हिसका बसून मध्येच जाग येई. त्याचप्रमाणे द्वादशीच्या दिवशीही तो दुपारी झोपत नसे. व्रत कसे करावे याचा उत्तम आदर्शच त्याने आपण स्वतः व्रत आचरून लोकांपुढे उपस्थित केला आणि अशा प्रकारे अत्यन्त व्यवस्थितपणे व शास्त्रोक्तरीतीने व्रताचरण व व्रतपरिपालन केले तरच त्याचा योग्य तो परिणाम होऊ शकतो हे सिद्ध करून दाखविले.

आपले आचरण शास्त्राला अनुसरून शुद्ध असावे यावर वासुदेवाचा फार कटाक्ष असे. एकदा त्याला माणगावाहून दुसरीकडे जाण्याचा प्रसंग आला. परन्तु मार्गामध्येच सूर्यास्ताची वेळ झाली. त्यावेळी त्याने रस्त्यातील एका झऱ्यावर स्नान करून सायंसंध्या केली व मगच तो पुढे मुक्कामाला गेला. पुढे आजोबा निवर्तल्यावर गृहप्रपंच चालविण्यासाठी वासुदेव यजमानांच्या घरी पौरोहित्य कर्मं करण्यास जाऊ लागला. त्यावेळी तो यजमानांचे सर्व कर्म यथासांग करून देऊन घरी येत असे व नैवेद्य, वैश्वदेव करून मगच जेवत असे. त्याने परान्न कधीही घेतले नाही. जर जेवताना रजस्वला किंवा अत्यंज यांचा शब्द त्याच्या कानावर पडला तर तो जेवण सोडून उठत असे. वासुदेवाला परान्न हे प्राणसंकटाप्रमाणे वाटत असल्यामुळे त्याने परान्न कधीही घेतले नाही व तो श्राद्धादी भोजनासही कधी गेला नाही. त्याच्या या अशा कडक नियमांमुळे काही काही वेळेला त्याला दोन दोन उपवासही पडत असत.

श्रीगुरुचरित्र या ग्रंथावर वासुदेवाची फार निष्ठा होती. दररोज श्रीगुरुचरित्राचा एक तरी अध्याय वाचल्याशिवाय तो अन्नग्रहण करीत नसे. श्रीगुरुचरित्र सिद्धग्रंथ असून, हा संपूर्ण ग्रंथ म्हणजे एक मालामंत्रच आहे अशी त्याची धारणा होती. शिवाय या ग्रंथात वेदाची व वेदविहित ब्राह्मणकर्मांची माहिती आली असल्यामुळे या ग्रंथाचे वाचन ब्राह्मणांशिवाय स्त्री-शूद्रादी इतरांनी करू नये असा त्याचा कटाक्ष असे. इतरांनी अशाप्रकारे वाचन करू नये हे सांगण्यामध्ये त्यांच्या कल्याणाचाच हेतू होता, हे नितांत सत्य आहे; कारण ज्यांना अधिकार नाही, अशा स्त्री–शूद्रादी समस्त अनधिकारी व्यक्तींनी श्रीगुरुचरित्राचे वाचन करणे म्हणजे " पुण्य करिता पाप घडे " हेच खरे आहे, अशी त्याची शास्त्राला अनुसरून धारणा होती. त्याची ही धारणा " तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते " या श्रीमद्भगवद्गीतोक्त वचनाप्रमाणेच होती. कर्तव्य व अकर्तव्य यांच्या निश्चयाविषयी शास्त्र हेच प्रमाण आहे व तेच सकल मानवजातीच्या हिताचे आहे असे त्याला वाटत असे. " शास्त्र म्हणेल जें सांडावें। तें राज्यही तृण मानावें। जें घेववी तें न म्हणावें । विषही विरु।। " असे जे श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी ज्ञानेश्वरीत म्हटले आहे ते वासुदेवाचे रूपान्तर श्रीवासुदेवानन्दसरस्वती स्वामीमहाराज यांमध्ये झाल्यावर शेवटच्या क्षणापर्यंन्त त्यांनी जे आचरण केले त्यावरून स्पष्टपणे दृग्गोचर होते. मात्र या शास्त्रपरिपालनाच्या तीव्रतेमुळे उभ्या आयुष्यभर वेळ प्रसंग पडला की, वासुदेवाला कठोरपणा पत्करून लोकांशी वागावे लागले.

ही काटेकोर शास्त्रपरिपालनाची तीव्रता हा केंद्रबिंदू लक्षात घेतला की, वासुदेवाच्या स्वभावाचे इतर पैलू स्पष्ट होत जातात. "वादो नावलम्ब्यः।" या देवर्षी श्रीनारदांनी सांगितलेल्या न्यायाने त्याने कोणाबरोबर कधीही वादविवाद केला नाही. "सर्वदा

स्वहितमाचरणीयं किं करिष्यति जनो बहुजल्पः । " ही वृत्ती ठेवून तो नेहमी स्वहिततत्पर राहून सत्कर्मात काल घालवीत असे. "सत्यं वद", "नानृतंवदेत्" या शास्त्राज्ञांप्रमाणे वासुदेव नेहमी सत्य बोलत असे. असत्य कधीही बोलत नसे. तो पायात जोडा न घालता नेहमी अनवाणीच चालत असे. दारिद्र्यामुळे त्याच्या जवळ पुरेशी वस्त्रे नसल्यामुळे तो नेहमी नेसावयास एक पंचा व उत्तरीय म्हणून पांघरावयास एक पंचा वापरीत असे. जर एखादा पंचा अधिक मिळाला तर तो डोक्याला बांधण्यासाठी वापरीत असे. त्याने वाहनाचा व छत्रीचा वापर कधीही केला नाही. रात्री तो एखाद्या गवताच्या चटईवर किंवा पांघरण्याचा पंचा अंथरून झोपत असे. अशा प्रकारे शास्त्राज्ञा परिपालनाच्या बंधनात स्वतःला जखडून घेतल्याशिवाय माणसाची कधीही उन्नती होत नसते, या महान् सत्याची जाणीव वासुदेवाला अगदी लहान वयातच झाली होती, हे वरील स्वभावनिदर्शनावरून दिसून येईल.

अशा तऱ्हेच्या आचरणामुळे वासुदेव एखाद्या बालऋषीसारखा तेजस्वी दिसू लागला. त्याच्या मूळच्याच तेजस्वी चेहऱ्यावर संध्योपासना, अग्निकार्य आणि शास्त्रशुद्ध आचरण यामुळे अधिकच उजाळा आला. चालताना सहसा तो खाली पाहून चालत असे. त्याची कोणाशी दृष्टादृष्ट झालीच; तर समोरील माणूस त्याच्या डोळ्यातील तेज पाहून दिपून जात असे. या बालवयातच तो त्या वैराग्यामुळे परम तेजस्वी दिसत असे. आजोबांच्या संगतीमध्ये भिक्षुकीची कामे करीत असल्यामुळे, त्यांच्या मृत्यूनंतर ही कामे स्वतंत्रपणे करताना त्याला विशेष त्रास पडला नाही. पळीभांडे हातात घेऊन, भस्मचर्चित वासुदेव आपल्या पावलांकडे नजर ठेवून जेव्हा यजमानाच्या घरी जाई त्यावेळी त्याची ती तेजःपुंज मूर्ती पाहून यजमानांना असे वाटत असे की, आज आपल्या घरी वेदमंत्र

जागृत होणार आहेत. वासुदेवाचा एकूण नूरच असा काही वेगळा होता की, एवढ्या लहान वयातही त्याच्याबद्दल लोकांच्या मनात आदर निर्माण झाला होता.

श्री. गंगाधरपंत वैद्य यांनी श्रीस्वामीमहाराजांच्या तोंडून ऐकलेल्या त्यांच्या बालपणातील काही आठवणी लिहून ठेवल्या आहेत. एका ठिकाणी त्यांनी असा उल्लेख केला आहे की, वासुदेवाने वयाच्या दहाव्या वर्षी, एक यजमान निवर्तले असता, त्यांच्या घरी जाऊन गरुड पुराण सांगितले. तसेच वयाच्या अकराव्या वर्षी चार विद्वान् ब्राह्मणांसमोर एका यजमानाच्या मुलीच्या विवाहाचा प्रयोग यथाविधी केला. वयाच्या बाराव्या वर्षी ऋग्वेद संहितेतील पदे इत्यादी शिकून वासुदेव दशग्रंथी ब्राह्मण म्हणून प्रसिद्ध पावला. श्री. गंगाधरपंत वैद्यांनी पुढे असे म्हटले आहे की, दशग्रंथांचे अध्ययन केल्यावर वासुदेवाने (श्रीस्वामीमहाराजांनी) त्या सर्व पोथ्या रुमालात बांधून ठेवल्या. त्या पोथ्या पुन्हा वाचण्याचा प्रसंग त्याला आला नाही; कारण एकदा पाठ केलेला ग्रंथ त्याला मुखोद्गत होत असे. याचा अनुभव त्यावेळी व पुढेही अनेकांना आला होता.

वासुदेवाबरोबर आणखीही काही विद्यार्थी श्री. उकिडवे गुरुजींकडे संहिता शिकण्यासाठी येत असत. एक दिवस क्रमपाठ चालू असताना गुरुजी मध्येच उठून माजघरात गेले. वासुदेवाच्या शेजारचा विद्यार्थी क्रमपाठामध्ये एके ठिकाणी चुकत होता. त्याने चुकीचा उच्चार केला की, वासुदेव “ ऊंहू ” असे म्हणत असे. आपली चूक त्या विद्यार्थ्याच्या ध्यानात येईना, उलट वासुदेव आपणाला विनाकारण त्रास देत आहे असे वाटून त्याला राग आला आणि त्याने माजघरात जाऊन ही हकीकत गुरुजींना सांगितली. क्रमपाठाला नुकतीच सुरुवात झाली होती. अशा वेळी शिकणारा एक विद्यार्थी पाठातील

चूक काढतो ही कल्पनाच गुरुजींना करता येईना. त्यांनाही त्या विद्यार्थ्याची तक्रार खरी असावी असे वाटले. ते स्वतः पाठशाळेत गेले व त्यांनी त्या विद्यार्थ्याला पाठ म्हणावयाला सांगितले. पाठामध्ये चुकीची पुनरावृत्ती होताच वासुदेव "ऊंहू" म्हणाला व त्या विद्यार्थ्याची चूक गुरुजींच्याही नजरेला आली. श्रीस्वामीमहाराजांचे एक भक्त श्री. रामभाऊ बापट एकदा आपल्या गुरुमाऊलीचे जन्मगाव पाहण्यासाठी माणगावला गेले होते. त्यावेळी ही हकीकत त्यांना तेथील मंडळींनी सांगितली व बापटांकडून ती निसारपूर येथे श्री. वैद्यांना समजली.

श्रीवासुदेवशास्त्र्यांबद्दल वयोवृद्ध ब्राह्मणांच्या मनामध्ये फार आदर होता. त्यांच्या विद्वत्तेबद्दल लोकांची एवढी खात्री होती की, शास्त्रविषयक काही कूट प्रश्न निर्माण झाल्यास, वयाने आपल्यापेक्षा लहान असलेल्या श्रीवासुदेवशास्त्र्यांचे मत विचारून निर्णय घेणे शास्त्रीमंडळी पसंत करीत. ज्योतिषशास्त्र व वैद्यकशास्त्र यांमध्येही श्रीवासुदेवशास्त्र्यांची विशेष प्रगती दिसून येत असे.

श्रीवासुदेवशास्त्र्यांचा मुळापासूनच शास्त्रांवर अढळ विश्वास होता. वेदमंत्रांचा अर्थ त्यांना जसा समजू लागला तसे मंत्रांच्या सामर्थ्याच्या साक्षात्काराबरोबर त्यांचे सर्वांग रोमांचित होऊ लागले. आपल्या पूर्वजांनी व ऋषीमुनींनी केवढ्या मोठ्या ज्ञानाचे भांडार आपणासाठी खुले करून ठेवले आहे, या जाणिवेने ते सद्‌गदीत होत. आपण आत्मसात केलेल्या मंत्रशक्तीची प्रचीती पाहण्याची श्रीवासुदेवशास्त्र्यांना इच्छा होत असे; पण तसाच प्रसंग आल्याशिवाय कोणतीही गोष्ट मुद्दाम करून लोकांचे लक्ष आपणाकडे वेधून घेणे ही गोष्ट त्यांना कधीच आवडली नाही; मात्र ज्या ज्या वेळी मंत्रशक्तीचा पडताळा पाहण्याची संधी त्यांना प्राप्त झाली त्या त्या वेळी मंत्रप्रयोग करून त्यांनी मंत्रसामर्थ्याबद्दल

स्वतःची खात्री करून घेतली होती. त्यामुळे मंत्रशक्तीवरील त्यांचा विश्वास अधिक दृढ झाला. आपल्या उत्तर आयुष्यात श्रीस्वामी-महाराज कधी कधी आपल्या पूर्वायुष्यातील काही आठवणी आपल्या शिष्यांना सांगत. एकदा संवत् १९६५ मध्ये श्रीस्वामी-महाराजांनी आपल्या शिष्यमंडळीसमोर असे सांगितले की, "वेदाध्ययनाच्या वेळी वेदांचा अर्थ नीटसा लक्षात येत नसे आणि अर्थ समजावयालाही वेळ लागत असे; पण आता वेदोच्चाराबरो-बरच वेदमत्रांचा अर्थ लक्षात येतो. वेदातील उदाहरणे पाहून वाईट मनाचे लोक आपली अवनती करून घेतात, तर त्याच उदाहरणां-वरून शुद्धमनाचे लोक आपली उन्नती करून घेतात." ही हकीकत ज्यावेळी श्रीस्वामीमहाराजांनी सांगितली त्यावेळी तेथे श्री. गंगाधरपंत वैद्य व इतर बरीच मंडळी होती.

सूर्ये अधिष्ठिली प्राची। जगा राणीव दे प्रकाशाची ॥ या न्यायानें वैदिक मंत्रावर अढळ श्रद्धा, मंत्रांचे यथाविधी निष्ठापूर्वक पठण, जप, भगवान् श्रीदत्तात्रेयांवरील निस्सीम भक्ती आणि शास्त्रशुद्ध आचरण या सर्वांचा परिपाक श्रीवासुदेवशास्त्र्यांना दिव्यदृष्टी प्राप्त होण्यात झाला होता. समोर आलेल्या व्यक्तीचे भूत व भविष्य एखाद्या चलत्‌चित्रपटाप्रमाणे त्यांच्या नजरे समोरून जात असे. एवढेच नव्हे; तर त्याची पूर्व जन्मातील कर्मे सुद्धा त्यांना कळून येत. विचार ही एक शक्ती आहे. शब्दांकन झाले म्हणजे ध्वनिरूप शब्दां-मध्ये तेच विचार सामान्यांना कळतात; पण समोरील व्यक्तीच्या-मनातील विचार शब्दरूपाने साकार होण्यापूर्वीच श्रीस्वामी-महाराजांना एखाद्या देखाव्याप्रमाणे दिसत. दुःखी व व्यधिग्रस्त व्यक्तीकडे पाहताक्षणीच त्या व्यक्तीचे पूर्वकर्म श्रीशास्त्रीबुवांना दिसून येत असे. त्यामुळे व्यधिग्रस्ताच्या व्याधीचे मूळ कारणच त्यांना समजून येई. अशावेळी त्या व्याधीवर श्रीस्वामीमहाराजांनी

सांगितलेला उपाय व्याधीच्या मुळावरच प्रहार करणारा असे.

"पूर्वपापे सर्व रोग होती।प्रायश्चित्ते पापे शमती" अशी व्याधींची मीमांसा श्रीस्वामीमहाराजांनी श्रीदत्तमाहात्म्य या आपल्या ग्रंथात केली आहे. पिशाच्च पीडित व्यक्ती श्रीशास्त्रीबुवांच्यासमोर आल्यास त्या व्यक्तीला ज्या पिशाच्याने पछाडले असे, ते पिशाच्च व्यधिग्रस्त शरीराचा तावा घेऊन वावरत असलेले त्यांना स्पष्ट दिसत असे आणि ते पिशाच्चही आपल्या रोषाचे कारण श्रीवासुदेव-शास्त्र्यांना सांगत असे. कागलची श्रीदत्तमूर्ती माणगावला स्थापन झाल्यावर एक वर्षपर्यंत लोकांच्या पीडा दूर करण्यासाठी श्रीवासुदेव-शास्त्री आपल्या अंगच्या शक्तीचा वापर करीत असत. पण ज्यावेळी भगवान् श्रीदत्तात्रेयांनी "काय वाजार मांडला आहेस ? पुरे कर," असे त्यांना सांगितले त्या वेळेपासून त्यांनी या कामासाठी आपल्या अंगच्या शक्तीचा वापर करणे बंद केले.

श्रीवासुदेवशास्त्री रस्त्याने जाऊ लागले की, इतर लोक त्यांना वाट करून देत व त्यांच्याकडे मोठ्या आदराने पाहत असत. या आदराला कारणही होते. आपल्या अंगच्या विद्वत्तेमुळे शास्त्री मंडळींच्या आदराला ते पात्र होतेच; शिवाय कळत न कळत त्यांच्या हातून ज्या काही चमत्कृतिजन्य, असाधारण गोष्टी घडत, त्या या ना त्या मार्गाने लोकांच्या कानी येत असत. त्यामुळे त्यांच्या बद्दलचा लोकांच्या मनातील आदर वाढला होता. त्या काळातील बहुतेक सर्वच ब्राह्मणांचे थोड्या फार प्रमाणात शास्त्राध्ययन झालेले असे; पण जे मंत्र यज्ञयागाच्या वेळी, पूजेच्या वेळी अथवा अन्य गृह्यसंस्कारांच्या वेळी आपण म्हणतो ते सर्व मंत्र सिद्धमंत्र असून त्यांच्या मधील शक्तीची प्रचीती आपणास आलीच पाहिजे ही भावना कितीजणांमध्ये होती हा प्रश्नच आहे. मात्र श्रीवासुदेव-शास्त्र्यांमध्ये ही भावना होती; कारण मंत्रशक्तीच्या अस्तित्वाचा,

जागृतीचा अनुभव त्यांना आलेला होता. ही गोष्ट माणगांवमध्येच नव्हे; तर माणगाव बाहेरच्या लोकांना ठाऊक झाली होती. असे सांगतात की, एक दिवस श्रीवासुदेवशास्त्री आपल्या विवाहित बहिणीला भेटावयाला गेले होते. संध्याकाळची वेळ होती, त्यांची बहीण दुभत्या गायीची धार काढावयाचा प्रयत्न करीत होती; पण ती गाय काही केल्या कासेला हात घालू देईना. पाडसालाही ती जवळ येऊ देईना. दोन दिवसांपासून हे असे चालले होते. सडातील दूध पिळून टाकले नाही; तर गाईच्या आरोग्यालाही धोका होता. श्रीवासुदेवशास्त्र्यांची बहीण त्यांना म्हणाली, " वासू पहा बरे, दोन दिवसांपासून ही तांबू आचळाला हात लावू देत नाही, की वासराला जवळ करीत नाही. "

श्रीवासुदेवशास्त्र्यांनी क्षणभर गाईकडे दृष्टी लावून पाहिले. हातपाय धुऊन चिमूटभर अंगारा अभिमंत्रित करून त्यांनी गाईच्या डोक्याला लावला व तिच्या पाठीवर एक थाप देऊन आचळाला हात घातला. दोन दिवसांपासून कोणालाही स्पर्श करू न देणारी गाय आता शांत उभी राहून तिने पान्हा सोडला. सर्वांना अचंबा वाटला. श्रीवासुदेवशास्त्र्यांना मात्र आश्चर्य वाटले नाही. ज्या मंत्राचा त्यांनी प्रयोग केला त्या मंत्राच्या शक्तीबद्दल त्यांना खात्री होती.

याचा परिणाम असा झाला की, गावामध्ये कुठेही काही अघटित घडले की, श्रीवासुदेवशास्त्र्यांना बोलवणे यावयाचे. कुठे कुणाला पिशाच्चबाधा झाली, काही रोगबाधा झाली किंवा सर्प दंश, विंचू दंश झाला, तर लोक श्रीवासुदेवशास्त्र्यांकडे धाव घेऊ लागले. अर्थात् ही एक उपाधीच सुरू झाली होती; पण आपण जे मंत्र शिकलो त्यांच्या शक्तीची प्रचीती पडताळून पाहावयाला ही एक प्रकारे प्रयोगशाळाच श्रीवासुदेवशास्त्र्यांना उपलब्ध झाली होती. शिवाय दुःखितांचे दुःख निवारण करणे हा त्यांचा स्वभाव बनला होता.

श्रीवासुदेवशास्त्र्यांचा शास्त्रांवर दृढ विश्वास होता. शास्त्रांनी घालून दिलेला आचारधर्म पाळण्यावर त्यांचा कटाक्ष होता, हे आपण पाहिलेच आहे. निव्वळ शास्त्र शिकून त्यांचे कधीच समाधान झाले नाही. शास्त्रांची शिकवण प्रत्यक्ष आचरणात आणण्यावर त्यांचा भर होता. जो शास्त्रांप्रमाणे आपले आचरण ठेवतो तोच खरा विद्वान् व तोच खरा सत्पुरुष असे महाभारतकारांनी सांगितले आहे. शिकलेल्या मंत्रांच्या शक्तीची प्रचीती येण्यासाठी तसे आचरणही ठेवावे लागते याची जाणीव किती जणांना असते ?

श्रीवासुदेवशास्त्र्यांच्या पुढील आयुष्यात ते प. प. श्रीवासुदेवानंद-सरस्वतीस्वामीमहाराज म्हणून लोकांच्या आदरास पात्र झाले त्या-वेळची एक गोष्ट आहे. श्रीस्वामीमहाराजांचा नरसोबाच्या वाडीमध्ये वास होता. ते कुरुंदवाडच्या घाटावर सायं–संध्येला जात. त्यावेळी त्यांच्यावरोबर बरीच मंडळी असत. तेथे नेहमीच शास्त्रचर्चा होत असे. त्यावेळी श्रीस्वामीमहाराज लोकांच्या शंकांचे निरसन करीत असत. कधी कधी ते तेथे प्रवचनही देत असत. एक दिवस श्रीस्वामी-महाराजांचे प्रवचन ऐन रंगात आले असताना श्रोत्यांमध्ये चुळबूळ सुरू झाली. एका इसमाला विंचू चावला होता. विंचवाच्या नांगीच्या वेदना ज्याच्या त्यालाच ठाऊक ! वेदनांनी विव्हळणाऱ्या माणसाला श्रीस्वामीमहाराजांनी जवळ बोलाविले व विंचू चावला होता त्या जागेवर चिमूटभर भस्म अभिमंत्रून लावले. वेदना कमी झाल्या आणि थोड्या वेळाने तो माणूस श्रीस्वामीमहाराजांचे प्रवचन तन्मयतेनें ऐकू लागला. प्रवचन संपल्यावर काही जणांनी विंचवाचे विष उतरविण्याचा मंत्र आपणास सांगावा अशी श्रीस्वामीमहाराजांना विनंती केली. त्यावेळी श्रीस्वामीमहाराज म्हणाले, "अहो... तो मंत्र तुम्हालाही ठाऊक आहे!" असे म्हणून श्रीस्वामीमहाराजांनी तो मंत्र सांगितला. पुष्कळ जणांना तो मंत्र ठाऊक होता. "मग

आम्ही त्या मंत्राचा प्रयोग केल्यावर विंचवाचे विष का उतरत नाही ?" असे त्यांनी श्रीस्वामीमहाराजांना विचारले. मंत्रशक्तीची प्रचीती येण्यासाठी शास्त्रशुद्ध आचरण ठेवावे लागते. मंत्रांची उत्तमरीतीने पाळणूक केली; तरच त्या मंत्राची शक्ती आपल्या आवाहनाला प्रतिसाद देते." असे श्रीस्वामीमहाराजांनी त्यांना सांगितले. असो. पुन्हा एकदा माणगाव.

भूत, पिचाच्च वगैरे अमानुष योनींचा आणि कोकण प्रांताचा काहीतरी विशेष संबंध असावा. पिशाच्च बाधेचे प्रकार इतर कोणत्याही प्रांतांपेक्षा कोकणातच जास्त प्रमाणात आढळतात. निदान श्रीवासुदेवशास्त्रांच्या माणगावमधील वास्तव्यात पिशाच्च बाधा झालेली पुष्कळ माणसे बाधामुक्त होण्यासाठी श्रीशास्त्रीबुवांकडे येत असत. एवढेच नव्हे; तर श्रीवासुदेवशास्त्र्यांच्या उत्तर आयुष्यात त्यांचे वास्तव्य चिखलदा वगैरे ठिकाणी असताना पिशाच्च बाधेतून सुटका करून घेण्यासाठी लोक कोकणातून श्रीस्वामीमहाराज असतील तेथे जात असत.

श्रीवासुदेवशास्त्री एकदा आपल्या दुसऱ्या बहिणीला भेटावयाला गेले असताना एक रात्र त्यांना तिच्या घरी राहण्याचा प्रसंग आला. रात्री अकस्मात् शेजारच्या घरातून मोठ्याने रडल्याचा आवाज ऐकू येऊ लागला. श्रीशास्त्रीबुवांना चौकशीअंती समजले की, गेले सहा महिने त्या घरातून रात्रीच्या वेळी असा रडण्याचा आवाज येत असतो. आजूबाजूच्या लोकांना त्या पैशाचिक रडण्याचा त्रास होत होता. ज्या घरातून हा आवाज येई ते एक पडिक घर होते. तेथे कोणीही राहत नसे. तेथील भुताटकीचा बंदोबस्त करण्यासाठी पुष्कळ उपाय झाले. पण सहा महिने झाले तरी तो त्रास चालूच होता. श्रीवासुदेवशास्त्र्यांनी तावडतोब तांदूळ मंत्रून त्या घरात टाकले आणि तो आवाज कायमचा बंद झाला.

एकदा श्रीवासुदेवशास्त्री वगैरे मंडळी शेजारच्या गावी काहीं अनुष्ठान करण्यासाठी निघाली होती. डोंगराच्या पायथ्यालगत होऊन पाऊल वाट जात होती. मार्ग बराचसा खडकाळ व निर्जन होता. सर्वजण गप्पा मारीत चालले होते. श्रीवासुदेवशास्त्री मात्र खाली मान घालून निमूटपणे चालले होते. कारणाशिवाय वडवड करावयाची नाही असा त्यांचा स्वभाव होता. सकाळची वेळ होती. सूर्याचे कोवळे ऊन सुखावह वाटत होते; पण उन्हाची ऊब हळूहळू वाढत होती. त्या निर्जन रस्त्याच्या बाजूला एका शिळेच्या आडोशाला एक किरडू त्या उन्हात चमकून उठले. पिवळ्या रंगाचा तो जातिवंत नाग होता. तो दिसताच सर्व मंडळी थबकली. कोकणात नागाबद्दल लोकांच्या मनात मोठी भीती वास करते. नागाला टाळून तसेच पुढे जावयाचे धैर्य त्या मंडळींना होईना. तो नागही चमकून दबा धरून तसाच शिळेच्या आडोशाला राहिला. जो तो किंकर्तव्य-मूढ होऊन गेला. तेवढ्यात प्रसंगावधान राखून श्रीवासुदेवशास्त्री पुढे झाले व पडशीतील मूठभर तांदूळ सर्पबंधन मंत्राने त्यांनी झटदिशी त्या सर्पाभोवती वर्तुळाकार पेरले. जनावर हतबुद्ध झाले व त्या अभिमंत्रित रिंगणातच पडून राहिले. आपण केलेल्या मंत्रप्रयोगाच्या प्रभावाची खात्री पटल्यावर श्रीवासुदेवशास्त्री म्हणाले, "चला, नाग आता या जागेवरून हलणार नाही किंवा डूख धरून तो आपला पाठलागही करणार नाही." लोकांनी पाहिले की, नाग काही सुद्धा हालचाल करीत नाही, तेव्हा थोडे घावरत, वारंवार मागे वळून पाहात सर्वजण पुढे निघून गेले.

अंगिकारलेले कार्य पूर्ण करून घरी परतावयाला सर्व जणांना बराच उशीर झाला. घरी पोहोचेपर्यंत रात्र होऊ नये म्हणून मंडळी जवळच्या आड वाटेने घरी परतली. आपण एका मुक्या जनावराला मंत्रबद्ध करून जखडून ठेवले आहे याची श्रीवासुदेवशास्त्र्यांना

आठवण राहिली नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी आपले आन्हिक उरकीत असताना त्यांना अकस्मात् आदल्या दिवशीची आठवण झाली. जवळ जवळ चोवीस तास तो नाग बंधनात पडलेला आहे या जाणिवेने श्रीवासुदेवशास्त्र्यांना फार वाईट वाटले. ते तडक उठले आणि आदल्या दिवशीच्या वाटेने जाऊ लागले. वाटेत त्यांना आदल्या दिवशीचे काही सोबती भेटले. तेही त्याच वाटेने निघाले होते. "आज एवढ्या तातडीने कोणाच्या घरी निघाला आहात!" असे त्यांनी श्रीवासुदेवशास्त्र्यांना विचारले. श्रीवासुदेवशास्त्र्यांनी चोवीस तासापूर्वी बंधन करून ठेवलेल्या त्या नागाची त्यांना आठवण करून दिली. तो नाग अद्याप त्या रिंगणातच असेल हे कोणाला खरे वाटेना; पण श्रीवासुदेवशास्त्र्यांना खात्री होती की, तो नाग तेथेच असणार आणि अगदी तसेच झाले. कालच्या त्याच ठिकाणी शिळेच्या बाजूला तो नाग मृतवत् पडला होता. त्याची ती दशा पाहून श्रीवासुदेवशास्त्र्यांना फार वाईट वाटले. त्यांनी विमोचन मंत्राचा प्रयोग करून त्या प्राण्याला बंधनापासून मुक्त केले. विमोचन प्रयोगासरशी तो नाग विजेच्या गतीने जवळच्या झाडीत पळून गेला. या प्रसंगाचा श्रीवासुदेवशास्त्र्यांच्या मनावर एवढा परिणाम झाला की, त्यानंतर कधी सुद्धा त्यांनी सर्पबंधन मंत्राचा प्रयोग केला नाही. यावेळी श्रीवासुदेवशास्त्र्यांचे वय फार नव्हते. अजून त्यांची पौगंडावस्थाच होती. पण जे ईश्वरीतत्त्व त्यांच्या देहाच्या आश्रयाने वावरत होते, त्या तत्त्वाला वयाचे बंधन थोडेच असणार! तरी सुद्धा त्यांच्या मधील ईश्वरीतत्त्व प्रगट व्हावयाला श्रीवासुदेवशास्त्र्यांना कठोर श्रम व तेवढीच कठोर तपश्चर्या करावी लागली. लोखंडाचे चणे खाल्याशिवाय देवकळा प्राप्त होत नाही असा जनसामान्यांचा समज आहे ना!

श्रीवासुदेवशास्त्र्यांचे आपल्या मातुश्रींवर फार प्रेम होते. तसेच मातुश्रींबद्दल त्यांना अतिशय आदर वाटत असे. आई कोठेही दिसली तरी थांबून तिला नमस्कार केल्याशिवाय ते पुढे जात नसत. त्यांचे वडील गणेशपंत संसाराबद्दल उदास असल्यामुळे भावांच्या मुंजी आणि बहिणींची लग्ने पार पाडावयाची जबाबदारी श्रीवासुदेवशास्त्र्यांवरच पडली होती. आता त्यांना भिक्षुकीमध्ये बरीच कमाई होऊ लागली होती. त्यामुळे त्यांनी कुटुंबपोषण आणि इतर सर्व जबाबदाऱ्या उत्तम प्रकारे पार पाडल्या. सांपत्तिक स्थिती सुधारली; तरी त्यांच्या स्वतःच्या आचारात आणि पोषाखात काहीसुद्धा फरक पडला नाही. नेसावयाचा एक पंचा व अंगावर एक उत्तरीय एवढाच त्यांचा पोषाख असे. ते नेहमी अनवाणीच चालत असत.

त्यांचे आपल्या भावंडांवर फार प्रेम होते. धाकटा भाऊ सीताराम याच्यावर त्यांची विशेष माया होती. "भल्या! भलोबा!" हे आवडीचे नाव त्यांनी सीतारामाला दिले होते. भलोबाला गायन वादनाची हौस होती म्हणून त्यांनी एका सुशिक्षित कलाकाराकडे त्याची गायन वादन शिकण्याची सोय करून दिली होती. भलोबाचे शास्त्रीय शिक्षण श्रीशास्त्रीबुवांच्याच देखरेखीखाली झाले. संस्कृतचे शिक्षण मात्र त्याने पुढील काळात ग्वाल्हेरच्या संस्कृत पाठशाळेत घेतले. भलोबाने म्हणजे श्रीसीतारामपंत टेंब्यांनी पुढील काळात योगाचेही शिक्षण घेतले होते. भावी काळात त्यांचे अग्रजच त्यांचे गुरू झाले होते. गुरुमुखातून वेदमंत्र श्रवण करून वेदाचे अध्ययन करण्याची श्रीसीतारामपंतांची इच्छा मात्र अपुरीच राहिली. ज्या-वेळी माणगावमध्ये श्रीदत्तमंदिर स्थापन होऊन त्याला तीर्थक्षेत्राचे महत्त्व व वैभव आले त्यावेळी मंदिरात आरतीच्या वेळी तबला वाजविण्याचे काम भलोबाच करीत असत. श्रीस्वामीमहाराजांनी

रचलेल्या पंचपदी वगैरे भक्तिरसपूर्णपदांना भलोबांनीच चाली लावल्या होत्या. पुष्कळदा भलोबांनी सांगितलेल्या रागदारीमध्ये श्रीस्वामीमहाराजांनी पद्यरचना करून दिली होती. श्रीसीतारामपंत गौरवर्णाचे होते. त्यांच्या गोऱ्या भालप्रदेशावर श्रीवासुदेवशास्त्र्यांनी स्वतःच्या हाताने तुळशीच्या रसाने गोंदविले होते. लहानपणी सीतारामाची पत्रिका पाहून त्याचा विवाह करू नये असे श्रीवासुदेवशास्त्र्यांनी आपल्या आईला सांगितले होते. श्रीसीतारामपंतांना लहान वयातच वैराग्य प्राप्त झाले व त्यांनी वयाच्या बाराव्या वर्षी गृहत्याग केला असे त्यांच्या चरित्रकारांनी नमूद केले आहे. श्रीवासुदेवशास्त्री व श्रीसीतारामपंत यांच्यामध्ये पुढे गुरुशिष्याचे नाते निर्माण झाले याचा उल्लेख वर आलाच आहे. त्यांनी ब्रह्मावर्त येथे श्रीस्वामीमहाराजांकडून अनुग्रह घेतला होता. श्रीस्वामीमहाराजांकडून संन्यास घ्यावयाची त्यांची इच्छा होती; पण श्रीस्वामीमहाराजांनी त्यांना संन्यास दिला नाही. श्रीसीतारामपंत टेंबे पुढे श्रीसीताराममहाराज म्हणून प्रसिद्धीस आले. श्रीसीतारामम‌हाराजांनी आपले गुरू प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराज यांच्यावरोबर उत्तर आयुष्यात पुष्कळ ठिकाणी संचार केला. चातुर्मासात श्रीस्वामीमहाराजांच्या संगतीमध्ये असताना जेथे जेथे मोठे याग झाले, समाराधना झाल्या, त्यांची सर्व व्यवस्था ठेवण्याची जवाबदारी श्रीसीताराममहाराजांनी अतिशय कुशलतेने पार पाडली. श्रीस्वामीमहाराजांच्या पवनी येथील चातुर्मासात श्रीसीताराममहाराज त्यांच्या बरोवर होते. या चातुर्मासात पवनीला झालेला चातुर्मास फारच गाजला. या स्वाहाकाराची सर्व जबाबदारी श्रीसीताराममहाराजांनीच पार पाडली. या यज्ञामध्ये हजारोंनी पान होत असे. भोजनाला लागणाऱ्या सर्व सामुग्रीची व्यवस्था श्रीसीतारामम‌हाराज पाहत असत. दररोजच्या भोजनामध्ये प्रत्येकाला एक द्रोण

तूप, एक द्रोण आमटी किंवा कढी, तुरीच्या डाळीचे वरण, साधा भात, गव्हाची पोळी, दोन भाज्या व दोन चटण्या हे पदार्थ असत. सणावाराला अनुरूप अशी पक्वान्ने होत. श्रीसीतारामहाराज पंगतीमध्ये फिरून प्रत्येकाला काही हवे नको ते जातीने विचारीत. या सर्व मुक्कामांमध्ये या दोघा बंधूंचे परस्परांवरील प्रेम हा लोकांच्या कौतुकाचा विषय झाला होता. प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराजांनी गरुडेश्वरी महासमाधी घेतल्यानंतर श्रीसीतारामहाराज गुरुवियोगाच्या दुःखाने व्यथित होऊन भ्रमण करीत राहिले. शेवटी त्यांनी आपल्या आयुष्याची उर्वरित सोळा वर्षे, श्रीस्वामीमहाराजांचे हिंगोली येथील एकनिष्ठ भक्त श्री. हेमराज मारवाडी यांना संकल्पपूर्वक दान केले, असे त्यांच्या चरित्रामध्ये सांगितलेले आहे. श्रीसीतारामहाराजांनी शके १८४० मध्ये बढणेरी, जि. अमरावती, येथे देह ठेवला. तेथे त्यांची समाधी आहे.

श्रीवासुदेवशास्त्र्यांचे दुसरे बंधू श्री. हरिभट यांच्याविषयी विशेष माहिती उपलब्ध नाही. त्यांनी घरी राहून प्रपंच केला व पुष्कळ लोकांना सन्मार्गाला लावले, एवढाच उल्लेख आढळतो. श्रीवासुदेवशास्त्री माणगाव सोडून गेल्यावर तेथील श्रीदत्तमंदिराची व्यवस्था श्री. हरिभट पाहत असत. मातुश्री रमाबाईंच्या निधनानंतर टेंबे कुटुंबाकडे आलेली कोनकरांची मिळकतही हरिभटांच्या अधिकारात आली. शके १८२४ मध्ये श्री. हरिभट आपले अग्रज श्री. वासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराजांना भेटावयाला ब्रह्मावर्त येथे गेले असताना श्रीस्वामीमहाराजांनी त्यांना असे सांगितले होते की, "कोनकरांची मिळकत शापित असल्यामुळे ती तुम्ही सोडून द्यावी. मातुश्री निवर्तल्यामुळे तेथील पुण्याई संपली आहे, म्हणून माणगावला आता काही राहणार नाही." पण मिळकतीचा मोह आवरता न आल्यामुळे ती शापित मिळकत श्री. हरिभट करीतच राहिले. परिणामी टेंबे

कुटुंबाचा वंश माणगावमध्ये राहिला नाही. श्री. हरिभटांच्या पश्चात् माणगाव येथील व्यवस्था त्यांचे जामात श्री. धुपकर हे पाहत असत.

वर्णाश्रमधर्मातील पहिला आश्रम जो ब्रह्मचर्याश्रम त्याचे यथाशास्त्र पालन करण्याचा परमोच्च आदर्श घालून देण्यासाठी माणगाव क्षेत्रामध्ये श्रीवासुदेवशास्त्री टेंबे यांच्या रूपाने क्रीडा करणारे अनंतकोटी ब्रह्मांडनायक भगवान् श्रीदत्तात्रेय आपणा सर्व साधुजनांचे कल्याण करोत.

अध्याय सहावा

गृहस्थाश्रम :–

रांगणगडचे बाबाजीपंत गोडे पोलीस खात्यात हवालदार होते. त्यांचा दबदबाही मोठा होता. त्यांची एकुलती एक मुलगी बायो वर्णाने काळी, एका पायाने बरीच अधू आणि सामान्यपणे कुरूप या सदरात मोडणारी होती. मुलीच्या लग्नाच्या बाबतीमध्ये बाबाजीपंतांना जिथे तिथे पड खावी लागत होती. मोठ्या हुंड्याची लालूच दाखवूनही मुलगी खपविणे त्यांना जड जात होते; पण बाबाजीपंतांचे दैव बलवत्तर होते आणि नाना कोनकरांच्या रूपाने ते त्यांच्या साहाय्याला धावून आले. तसे पाहिले तर नाना हे टेंबे आणि कोनकर घराण्यातील वडीलधारे माणूस आणि दोन्ही कुटुंबांचे हितचिंतक होते. मात्र टेंबे व कोनकरांच्या कुटुंबांचे भले करण्याच्या प्रयत्नामध्ये या दोन्ही कुटुंबांचे अहित होऊन नाना कोनकरांनी स्वार्थ साधला ही गोष्ट वेगळी. एखाद्या गोष्टीकडे पाहण्याच्या दृष्टिकोनाचा हा फरक होता. त्याला बिचारे नाना तरी काय करणार! एका संध्याकाळी बाबाजीपंत गोड्यांच्या घरी जाऊन नाना कोनकर ओटीवर स्थानापन्न झाले. हजार भानगडी करणारा माणूस म्हणून

नानांची ख्याती बाबाजीपंतांच्या कानावर आलीच होती. त्यामुळे नानांचे स्वागत त्यांनी थोडच्या साशंक मुद्रेनेच केले.

" काय नाना, आज या बाजूला कोणीकडे ? "

" आलो होतो शेजारच्या गावकऱ्यांच्या घरी ! म्हटले जाताना आपल्या घरावरून जावे. सर्व क्षेम आहे ना ? "

" हो, देवदयेने सर्व काही ठीक आहे. काळजी आहे ती फक्त पोरीच्या लग्नाचीच. "

" का, कोठे जमले नाही वाटते ? " वास्तविक तिचे कोठे जमले नाही, हे नानांना ठाऊक होते.

" अंगाने थोडीशी अधू आहेना, त्यामुळे जिथे तिथे अडथळा येतो. कोठे एखादे ठिकाण लक्षात आहे का ? "

" आहेही आणि नाहीही ! " नानांनी थोडी कूट भाषा वापरावयाला सुरुवात केली.

" मी नाही समजलो आपले बोलणे. " एखादे स्थळ नजरेसमोर असेल तर सांगा. प्रयत्नात कमतरता पडू देणार नाही. "

" वासुदेवशास्त्री टेंब्यांचे विवाहाचे वय झालेले आहे आणि त्यांची आई त्यांच्या लग्नाचा विचार करीत आहे. अर्थात् त्या कुटुंबाचा हितचिंतक म्हणून माझ्यावरही थोडी जबाबदारी पडतेच."

" अहो ऐकलं का ? " बाबाजीपंत गोडे आपल्या कुटुंबाला उद्देशून म्हणाले, " थोडे फराळाचे आणा. हे नाना कोनकर आले आहेत. बऱ्याच दिवसांनी भेट होत आहे." एवढे बोलून नानांना उद्देशून ते म्हणाले, " हे पाहा नाना ! मुलीची पत्रिका घ्या आणि वासुदेवशास्त्र्यांच्या आईशी बोलणी करा." बाबाजीपंताना वाटले हा संबंध जूळून आला तर आई यक्षिणीच प्रसन्न झाली म्हणावयाची ?

नाना कोनकरांनी पुढे आलेल्या फराळावर ताव मारला आणि आपण प्रयत्नांची शिकस्त करतो असे सांगून चि. सौ. कां. बायो

हिची पत्रिका घेऊन ते उल्हसित मनाने घरी परतले. कोणाच्या अळवाला किती कोकम लावावयाचे ही कला नानांना चांगलीच साधली होती. त्यांनी मुलीची पत्रिका रमाबाईंकडे नेलीच नाही; किंवा श्रीवासुदेवशास्त्र्यांनाही ते काहीच बोलले नाहीत. त्यांनी आपला मोर्चा सरळ श्री. विष्णुशास्त्री उकिडवे यांच्या घरी वळविला. श्री. उकिडवेशास्त्री हे श्रीवासुदेवशास्त्र्यांचे गुरू होते. श्रीविष्णुशास्त्र्यांना नाना म्हणाले, " वासुदेवशास्त्री आता एकवीस वर्षांचे झाले आहेत. त्यांच्या विवाहाचा आता विचार करावयाला हवा. गणेशपंत सदासर्वकाळ गाणगापूरलाच फेऱ्या घालीत असल्यामुळे एकटच्या रमाबाईंवर ही मोठी जबाबदारी पडत आहे. वासुदेवशास्त्र्यांचे गुरू म्हणून आपणालाही या बाबतीमध्ये खटपट करावी लागेल."यावर श्री.उकिडवेशास्त्र्यांनी या बाबतीमध्ये लक्ष घालण्याचे नानांना आश्वासन दिले नेमके याच सुमारास बाबाजीपंत गोडे मुलीची पत्रिका घेऊन श्री. उकिडवे गुरुजींकडे आले. दोन्ही पत्रिका जमतात याची खात्री त्यांना नाना कोनकरांनी अगोदरच दिली होती. आश्चर्य म्हणजे या लग्नाच्या बाबतीमध्ये रमाबाई किंवा श्रीवासुदेवशास्त्री यांना काही सुद्धा विचारण्यात आले नाही. हे लग्न त्या दोघांच्या संमतीशिवायच नक्की करण्यात आले. लग्नाचा मुहूर्त निश्चित झाल्यावरच ही गोष्ट रमाबाईंच्या कानावर घालण्यात आली. श्रीवासुदेवशास्त्र्यांची या लग्नाला संमती आहे असेही त्यांना सांगण्यात आले. हे ऐकताच रमाबाईंना आश्चर्याचा धक्काच बसला. आपली कोणत्याही प्रकारे संमती न घेता मुलाने आपले स्वत:चे लग्न ठरविले याचा त्यांना खेद झाला. मुलाला त्यांनी याचा जाब विचारला. लग्नाबद्दल आपणाला काहीसुद्धा ठाऊक नाही व सध्या आपणाला लग्न करावयाचे नाही असे श्रीवासुदेवशास्त्र्यांनी आईला सांगताच रमाबाईंच्या आश्चर्याला सीमा राहिली नाही.

चौकशी अंती ही सर्व नाना कोनकरांची कारवाई असल्याचे त्यांना समजले. लग्न तर ठरले होते, मुहूर्तही निश्चित झाला होता आणि ऐनवेळी श्रीवासुदेवशास्त्र्यांनी विवाहाचे आपणास कर्तव्य नाही असे सांगितले. हा योग जुळून आला तर श्रीवासुदेवशास्त्र्यांचे भले होईल व वेळ प्रसंगी आपल्या पाठीशी गोडच्यांचा मोठा आधार राहील इत्यादी गोष्टी नाना कोनकरांनी रमाबाईंना पटवून दिल्या. मुलाचे भले होत असेल तर त्यात आपणाला समाधान आहे असे म्हणून त्यांनी या विवाहाला संमती दिली.

आता प्रश्न राहिला तो श्रीवासुदेवशास्त्र्यांचा. एक दिवस श्री. उकिडवे गुरुजींनी श्रीवासुदेवशास्त्र्यांना बोलाविणे पाठविले. श्रीवासुदेवशास्त्री अगदी अगत्याने आपल्या गुरुजींना भेटावयाला भटवाडीमध्ये गेले. श्रीविष्णुशास्त्र्यांना नमस्कार करून श्रीवासुदेव शास्त्री म्हणाले, "आपण बोलावणे केलेत ? माझ्यासाठी काय सेवा आहे ?"

"वासुदेवशास्त्री तुम्ही आता गुरूच्या तोडीचे विद्वान् झाला आहात. यात आम्हाला भूषणच वाटते. विद्वानांच्या समाजामध्ये तुम्हाला मान मिळत आहे. तेव्हा तुम्हाला बरोबरीच्या नात्याने वागविणे हेच योग्य आहे."

श्रीवासुदेवशास्त्री खाली मान घालून अतिशय विनयाने असे म्हणाले की, "मी आपली काय सेवा करावी ते आपण मला सांगावे."

"वासुदेवशास्त्री ! तुम्ही आमच्यापाशी वेदाध्ययन केले. खूप मोठे झालात हे पाहून आमच्या श्रमांचे चीज झाले असे वाटते. आता तुम्ही विवाहयोग्य झाला झाला आहात. तेव्हा तुमच्या लग्नाचाही विचार आता करावयाला हवा." असे गुरुजी म्हणाले. हे ऐकताच श्रीवासुदेव-शास्त्री म्हणाले, "विवाह करण्यास योग्य परिस्थिती अजून निर्माण झालेली नाही. या गोष्टीची एवढयात घाई कशाला ?"

"वासुदेव वेळेवर वेळ आणि– या म्हणीप्रमाणे प्रत्येक गोष्ट योग्य वेळीच झाली पाहिजे. तुमच्या कुटुंबियांच्या आग्रहास्तव मी एक स्थळ पाहिले आहे. पत्रिका जमतात. तेव्हा या लग्नाला तुम्ही संमती दिली पाहिजे. वधुपित्याला मी शब्द दिला आहे. तुम्ही माझा शब्द खाली पडू देणार नाही अशी खात्री आहे."

श्रीवासुदेवशास्त्री अवाक् झाले. काय बोलावे हेच त्यांना समजेना. ते गप्प बसले. श्रीवासुदेवशास्त्र्यांचे मौन हीच मूक संमती समजून श्री. उकिडवे गुरुजींनी त्यांच्या हातावर साखर ठेवली व हा विवाह पक्का झाल्याचे जाहीर केले.

श्रीवासुदेवशास्त्र्यांच्या मुंजीचा सोहळा जेवढ्या धुमधडाक्याने साजरा झाला होता, त्या मानाने त्यांचा विवाह अगदी सामान्यपणे साजरा झाला. एकतर हा विवाह त्यांच्या मर्जी विरुद्ध होता आणि त्यांची आईसुद्धा या विवाहाच्या बाबतीत मनोमन असंतुष्ट होती. प्रत्येक माणसाच्या देहावर जन्मल्यापासून जे धार्मिक संस्कार व्हावयाचे असतात, त्यांपैकी विवाह हा एक आवश्यक संस्कार आहे, या विचाराने श्रीवासुदेवशास्त्री लग्नाला उभे राहिले होते. त्यांनी लग्नानंतर ताबडतोब स्मार्ताग्नी घेतला.

माणगावमध्ये आता एका नवीन पर्वाला सुरुवात होणार होती. माणगाव आता एक महान् तीर्थक्षेत्र होणार होते. श्रीदत्तप्रभू आपल्या भक्ताला निमित्त करून स्वतःच अद्‌भुत लीला करणार होते. त्यामुळे लोकांमध्ये भक्तीची अशी एक लाट निर्माण होणार होती की, त्या लाटेच्या ओघामध्ये अभक्तीचे सर्व प्रवाह कुठल्याकुठे वाहून जाणार होते. स्वतःच निर्माण केलेल्या या खेळाचा भगवान् श्रीदत्तात्रेय स्वतःच उपसंहार करणार होते. श्रीवासुदेवशास्त्री एक मोठे विद्वान् मांत्रिक आणि फलज्योतिषी म्हणून प्रसिद्धीस येऊन या अद्‌भुत

पर्वाची नांदी अगोदर पासून सुरू झालेलीच होती; पण त्या पर्वाला अद्याप योग्य ती गती प्राप्त झाली नव्हती. त्यासाठी जी भूमी तयार होणें आवश्यक होते त्याला श्रीवासुदेवशास्त्र्यांच्या विवाहाने सुरुवात झाली.

ब्रह्मचार्याश्रम संपवून श्रीवासुदेवशात्र्यांनी आता गृहस्थाश्रमात पदार्पण केले. भावी आयुष्यात त्यांना जी महान् कार्ये करायची होती ती करण्यासाठी योग्य तो शक्तिसंचय त्यांनी ब्रह्मचर्याश्रमात केला होता. या शक्तिसंचयाचा परिणाम आता लोकांच्या नजरेला येऊ लागला होता. श्रीवासुदेवशास्त्र्यांनी प्रथम आपल्या घरी गृह्याग्नी स्थापन केला. लग्नामध्ये ज्या अग्नीवर लाजा होम केला जातो तोच अग्नी आपल्या घरी आणून, त्यांनी स्वत: तयार केलेल्या मातीच्या कुंडामध्ये त्याची स्थापना केली. दररोज सकाळसंध्याकाळ होम करून त्यांनी अग्नीची परिचर्या सुरू केली. ब्राह्मणांची देवता गायत्री हीच आहे. त्यांनी गायत्रीची उपासना सुरू केली व एक गायत्री-पुरश्चरणही केले गृहस्थाश्रमाला सुरुवात केल्यावर दर प्रतिपदेला स्थालिपाक व अमावास्येला पिण्डपितृयज्ञ असा त्यांचा कार्यक्रम ठरून गेला होता. त्यांनी गृह्याग्नीवर सात पाकसंस्थाही पार पाडल्या. पुढील आयुष्यात गुरुपदी आरूढ होऊन श्रीवासुदेवशास्त्र्यांना फार मोठी जबाबदारी पार पाडावयाची होती. यासाठी श्रीदत्तप्रभूंनीच प्रत्येक आश्रमामध्ये उचित अशी सर्व कर्मे श्रीवासुदेवशास्त्र्यांकडून शास्त्रोक्तपणे करवून घेतली. कशातही न्यून राहू दिले नाही.

रमाबाई मुलाच्या लग्नामुळे नाखूष होत्या. सुनेबद्दल त्यांचा प्रथम पासूनच वाईट ग्रह आला होता. मुलाने स्वत:चे लग्न ठरविण्यापूर्वी आपली संमती घेतली नाही या गैरसमजुतीचा योग्य खुलासा जरी त्यांच्या आईपुढे करण्यात आला होता, तरी या लग्नामध्ये नाना कोनकरासारख्यांनी मध्यस्ती केली ही गोष्ट कदाचित् त्यांच्या

सुनेबद्दलच्या दुराग्रहाला कारणीभूत झाली असेल किंवा कदाचित् सून आपल्या मुलाच्या तोलामोलाची नाही असेही त्यांना वाटले असेल. काही असो; पण लग्नसोहळा संपला आणि लवकरच या असंतोषाला वाचा फुटावयाला लहानसहान गोष्टींवरून सुरुवात झाली. सासूसुनेचे पटेनासे झाले. मोठ्या हौसेने नववधूचे अन्नपूर्णा असे आजेसासूचे नाव ठेवण्यात आले होते; पण त्या नावाचा आदर ठेवणेही रमाबाईंना जमेना. अन्नपूर्णाबाईंनी केलेल्या प्रत्येक गोष्टीमध्ये त्यांना दोष दिसू लागला आणि हा दोष त्या शब्दांनी व्यक्त करू लागल्या. सासूसुनेचे जे संबंध आपल्या कुटुंबसंस्थेमध्ये ऐतिहासिक काळापासून प्रसिद्ध (!) आहेत ते संबंध आता टेंब्यांच्या कुटुंबामध्ये दिसून येऊ लागले. नववधू अन्नपूर्णाबाई सोशीक वृत्तीच्या होत्या. सासूची वाक्ताडणे त्या निमूटपणे सहन करीत; पण हा सासुरवास त्या जसजसा सहन करू लागल्या तसतसे रमाबाई अधिकच कठोर आघात करू लागल्या. प्रथम प्रथम ही गोष्ट श्रीवासुदेवशास्त्र्यांच्या लक्षात आली नाही; पण जेव्हा रमाबाईंचे शब्द कठोर होऊन दुसऱ्यांच्या कानी जाण्या एवढ्या मोठ्याने उच्चारले जाऊ लागले तेव्हा ते श्रीवासुदेवशास्त्र्यांच्याही कानावर येऊ लागले. सासूसुनेमध्ये धुसपूस सुरू झाली ही गोष्ट त्यांच्या नजरेला यावयाला वेळ लागला नाही. हळूहळू त्या घरातील शांती आणि समाधान कमी होत होत अगदी नष्ट होण्याच्या मार्गावर आले. श्रीवासुदेवशास्त्री मातृभक्त असल्यामुळे त्यांनी सासूसुनेच्या या भांडणामध्ये कधीही लक्ष घातले नाही; पण या प्रकारांमुळे मुळचेच विरक्त प्रकृतीचे श्रीवासुदेवशास्त्री अधिकच विरक्त बनू लागले. ते आपल्या कुटुंबाबरोबर कधी बोलतही नसत. काही काम सांगावयाचे झालेच तर ते आईला सांगत असत. यामध्ये आपल्या आईबद्दल वाटणारा आदर तर होताच; पण तिच्या बद्दल वाटणारी

एक प्रकारची भीतीसुद्धा होती.

पावसाळ्यातील गोष्ट. गणेश चतुर्थीचा दिवस होता. घरात श्रीगणेशाच्या मूर्तीची विधिपूर्वक स्थापना करून व शोडषोपचारे पूजा करून दुसऱ्या दिवशी श्रींचे विसर्जन करावयाचे होते. पूजा-साहित्याची सर्व तयारी घरातील मंडळींनीच करून ठेवावयाची असल्यामुळे श्रीवासुदेवशास्त्री जेव्हा पूजा साहित्य पाहू लागले, तेव्हा पूजा साहित्याची काहीसुद्धा तयारी नसल्याचे त्यांना दिसून आले.

"आज श्रीगणेशचतुर्थी आणि पूजेची काहीच तयारी नाही?" श्रीवासुदेवशास्त्री अप्रत्यक्षपणे आपल्या पत्नीला म्हणाले. झाले, रमाबाई तेवढ्याचीच वाट पाहत होत्या. त्यांनी सुनेवर इतके तोंडसुख घेतले की, आज सणाचा दिवस आहे हेही त्या निसरल्या. श्रीवासुदेवशास्त्र्यांना फार वाईट वाटले आणि त्यांचे मन अगदी उद्विग्न होऊन गेले. त्यावेळी त्यांनी श्रीगणेशाची पूजा मिळेल त्या साहित्याने करून घेतली आणि दुसऱ्या दिवशी मूर्तीचे विसर्जन केले. या आणि अशाच गोष्टींमुळे त्या घरातील शांती नष्ट झाली. आपला जास्तीत जास्त वेळ बाहेर घालवावा असे श्रीवासुदेव-शास्त्र्यांना वाटू लागले.

कुटुंबाचा वाढता खर्च गावातील भिक्षुकीवर भागण्यासारखा नव्हता. त्यामुळे श्रीवासुदेवशास्त्र्यांना पुष्कळदा कामानिमित्त दूरच्या गावी जावे लागत असे. एकदा त्यांना शेजारच्या गोवे प्रातांत जाण्याचा योग आला. ते गोव्यातील पेडणे या गावी एका गृहस्थां-बरोबर गेले. गोव्यात जाण्याचा हा त्यांचा पहिलाच प्रसंग होता. तेथे त्यांची कोणाशी ओळख नव्हती. त्यामुळे या गृहस्थाने श्रीशास्त्रीबुवांचा पेडण्यातील एका श्रीमंत यजमानाच्या घरी परिचय करून दिला.

"ह्यो माणगावचो वासुदेवशास्त्री. व्हडलो भट. दशग्रंथी आसा.

हेका सगळे खबर आसा. ह्यो वऱ्यापैकी जोतिशी आनि व्हाटुलो वोऱ्हात मानुस आसा. तशेच हेका वैजाचे चांगले ज्ञान आसा." त्या दिवसांमध्ये गोव्यातील धनिक हिन्दू लोक विद्वानांचा यथोचित आदर आणि सन्मान करीत असत. श्रीवासुदेवशास्त्री गोव्यात नवीनच आल्यामुळे त्यांच्या विद्वत्तेची पारख करण्याच्या उद्देशाने यजमान म्हणाले की, "शास्त्रीबुवा! आपण ज्योतिषशास्त्रात पारंगत आहात, मग सांगा बरे माझ्या मुठीत काय आहे ते?" असे म्हणून त्यांनी आपली मूठ श्रीशास्त्रीबुवांसमोर धरली.

श्रीवासुदेवशास्त्र्यांच्या ज्ञानाला हे आव्हानच होते. त्यांनी आपल्या कुलदेवतेचे स्मरण केले आणि तेथेच मातीमध्ये प्रश्न-कुंडली मांडली. थोडावेळ विचार करून ते म्हणाले, "श्रीमान्! आपल्या हातात एक नाणे आहे." यजमानांच्या मुठीत खरोखरच एक नाणे होते. श्रीवासुदेवशास्त्र्यांची या वयातील ज्योतिषशास्त्रातील प्रगती पाहून यजमान खूष झाले. त्यांनी श्रीवासुदेवशास्त्र्यांना आग्रहाने गोव्यात राहवून घेतले आणि गोमंतकातील त्या काळचे प्रसिद्ध ज्यातिषी श्री. नीळकंठशास्त्री पद्ये यांच्याकडे ज्योतीषविद्येतील अधिक अध्ययन करण्याची त्यांची सोय करून दिली. त्यावेळी त्यांनी श्रीवासुदेवशास्त्र्यांना अत्यन्त कळकळीने असे सांगितले की, "आपण श्री. पद्येशास्त्री यांच्याकडे काही दिवस राहून अध्ययन करा म्हणजे आपली ज्योतिषशास्त्रात यापेक्षाही अधिक प्रगती होईल." श्रीवासुदेवशास्त्र्यांच्या दृष्टीने ही एक पर्वणीच होती. श्रीशंभूशास्त्री साधल्यांकडे खंडित झालेले ज्योतिषाचे शिक्षण त्यांनी श्री. नीळंभट पद्येशास्त्री यांच्याकडे सुरू केले. येथे त्यांना भरपूर कामही मिळू लागले व शिकण्याचीही सोय झाली अशा तऱ्हेने काही दिवस ते घरच्या कटकटी विसरून गेले. सहा महिनेपर्यंत हा कार्यक्रम चांगल्या तऱ्हेने चालला होता. त्यानंतर एक दिवस घरी आपले वडील

फार आजारी असल्याचे कळल्यावर श्रीवासुदेवशास्त्री तातडीने माणगावला जावयाला निघाले. श्रीवासुदेवशास्त्र्यांची कुशाग्र बुद्धी, अलौकिक ग्रहणशक्ती, विद्वत्ता, आणि वैराग्य पाहून श्री. नीळंभट पद्ये यांची त्यांच्यावर फार माया जडली होती. त्यांनी आणखी काही दिवस ज्योतिषाचे अध्ययन करावे अशी श्री. पद्येशास्त्र्यांची इच्छा होती; पण यावेळी ते श्रीवासुदेवशास्त्र्यांना अडवू शकले नाहीत. परंतु त्यांनी पुन्हा गोव्याला यावे म्हणून श्री. पद्येशास्त्र्यांनी त्यांचे काही सामान मुद्दामच मागे ठेवून घेतले; पण श्रीवासुदेव-शास्त्र्यांना गोव्यामध्ये पुन्हा येणे जमले नाही. श्री. गणेशपंतांचा आजार सारखा वाढतच गेला आणि शके १७९९ च्या भाद्रपद कृष्ण द्वितीयेच्या दिवशी ते श्रीदत्तस्वरूपी विलीन झाले. श्रीवासुदेव-शास्त्री जरी आपल्या आजोबांच्या एवढे आपल्या वडिलांशी एकरूप झालेलं नव्हते, तरी वडिलांवर त्यांचे प्रेम होते आणि त्यांच्या बद्दल त्यांना आदर वाटत होता. मात्र त्यांना आपल्या वडिलांचा जो नैतिक आधार होता तो आता नाहीसा झाला. यावेळी श्रीवासुदेव-शास्त्र्यांचे वय तेवीस वर्षांचे होते. म्हणजे त्यांच्या विवाहानंतर दोन वर्षांनी श्री. गणेशपंत त्यांना सोडून गेले.

असे सांगतात की, गणेशपंत इच्छामरणी होते. आपला अंतकाळ जवळ आल्याचे पाहून त्यांनी गावातील एका प्रतिष्ठित व अत्यंत परिचित अशा गृहस्थाला जवळ बोलावून असे सांगितले होते की, "आपला इहलोकीचा व्यवहार संपलेला आहे. आपण लवकरच देहत्याग करणार आहोत. तरी आपल्या मृत्यूनंतर घरात कोणालाही रडू देऊ नको." त्या गृहस्थाला गणेशपंतांचे बोलणे चमत्कारिक वाटले; पण आजारी माणसाचे मन दुखवू नये म्हणून त्याने गणेश-पंतांना त्यांच्या इच्छेप्रमाणे करीन असे आश्वासन दिले. प्रत्यक्षात गणेशपंतांच्या मृत्यूसमयी हा गृहस्थ काही महत्त्वाच्या कामाकरिता

बाहेर गेल्यामुळे तेथे नव्हता. त्यामुळे त्यावेळी घरात सुरू झालेली रडारड तो थांबवू शकला नाही. घरातील रडारड ऐकून तो धांवत आत आला. तोपर्यंत गणेशपंतांनी पुन्हा डोळे उघडले आणि त्या गृहस्थाला ते असे म्हणाले की, "मी मुद्दाम तुला बजावून सांगितले होते; पण ऐनवेळी तू बाहेर गेलास आणि नको ते घडले. आता तरी तेथून जाऊ नकोस. येथेच बैस व माझ्या सांगण्याप्रमाणे वाग. मी आता जातो." गणेशपंतांनी डोळे उघडून बोलावयाला सुरुवात करताच अर्थात्‌च सर्वांचे रडणे थांबले व सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद दिसू लागला; पण क्षणभरातच तो मावळला. गणेशपंतांनी पुन्हा डोळे मिटले ते कायमचेच. या वेळी मात्र त्या गृहस्थाने कोणाला रडू दिले नाही. मृत्युसमयी गणेशपंतांचे वय ५६।५७ वर्षांचे होते.

श्री. गणेशपंत टेंबे आणि त्यांचे सुपुत्र श्रीवासुदेवशास्त्री टेंबे या दोघांचा जीविताकडे पाहण्याच्या दृष्टिकोनामध्ये बरेच साम्य होते. गणेशपंत संसाराविषयी जेवढे उदास होते, तेवढ्याच उदासीनपणे श्रीवासुदेवशास्त्रीसुद्धा संसाराचा गाडा हाकीत होते. फरक एवढाच की, गणेशपंतांनी संसाराकडे कधीच लक्ष दिले नाही. त्यांच्या वडिलांनीच त्यांचा सर्व संसार सांभाळला. गणेशपंतांच्या जीविताचे सारसर्वस्व श्रीदत्तभक्ती हेच होते. श्रीदत्तभक्तीपुढे इतर सर्व गोष्टी त्यांनी गौण मानल्या. त्यांनी लग्न केले; पण संसारात ते गुरफटून राहिले नाहीत. श्रीवासुदेवशास्त्र्यांनीही लग्न केले, संसार केला आणि तदनुषंगिक कर्तव्ये यथाशास्त्र पार पाडली. त्यात कोठेही न्यून राहू दिले नाही. मात्र त्यांनी हे सर्व उदासीनपणे, निर्लिप्तपणे केले. पितापुत्रांच्या जीवनामध्ये उदासीनता हा समान धर्म होता. या उदासीनतेच्या पोटी एकाने संसाराच्या जबाबदाऱ्या टाकून दिल्या; तर दुसऱ्याने त्यांना सामोरे जाऊन त्यांचा स्वीकार केला.

यानंतर देऊळवाडीतील वर्दळ बरीच वाढू लागली. टेंब्यांच्या

घराकडे जाणारी पाणंद आता दिवसभर गजबजलेली असे. यक्षिणीच्या दर्शनाला येणारी मंडळी आता बाजूच्या टेंब्यांच्या घरी पायधूळ झाडू लागली होती. कोणी वास्तुशांतीचा मुहूर्त विचारण्यासाठी तर कोणी बाहेरची बाधा झालेल्या आपल्या मुलासाठी अंगारा मागण्यासाठी येत असे. कोणी विंचवाच्या विषावर उतारा मागण्यासाठी तर कोणी लग्न जमत नसलेल्या आपल्या मुलीची पत्रिका घेऊन येत. अशा रीतीने आपापल्या संसारातील अडचणी दूर करण्यासाठी व वेगवेगळ्या कामासाठी लोक सतत श्रीवासुदेवशास्त्र्यांच्या घरी येत असत. प्रत्येकाला असे वाटावयाचे की, श्रीवासुदेवशास्त्रींच्या जवळ आपल्या दुःखासाठी इलाज आहे. सकाळच्या वेळी शास्त्राध्ययन करण्यासाठीसुद्धा विद्यार्थी येत असत. एक मांत्रिक आणि ज्योतिषी म्हणून श्रीवासुदेव-शास्त्र्यांची आजूबाजूच्या गावात खूपच प्रसिद्धी झाली होती. एक दिवस तालुक्याच्या गावचे फौजदार श्रीवासुदेवशास्त्र्यांच्या घरी सरकारतर्फे आले. फौजदारांच्या मागून गावातील कुटाळ मंडळी आली होती. काही जणांना वाटले टेंब्यांच्या घरावर काहीतरी किटाळ आले.

"शास्त्रीबुवा आहेत का घरात ?" फौजदारांनी विचारले. श्रीवासुदेवशास्त्री पुढे आले आणि त्यांनी फौजदारांना बसावयाला घोंगडी आंथरली. पाठीमागून आलेल्या सर्व वच्यांना पिटाळून लावल्यावर फौजदार म्हणाले–

"शास्त्रीमहाराज ! आज मी सरकारी कामाकरिता म्हणून आपल्या भेटीला आलो आहे. इतर पीडितांसारखा मी काही पीडित नाही. मला काही व्याधी किंवा बाधा झालेली नाही. माझे दुखणे वेगळेच आहे. आज-याच्या गोविंद राण्यांचा पंधरा दिवसा-पूर्वी खाजगी आदावतीवरून खून झाला. खून कोणी केला ते

आम्हाला कळले आहे; पण खुनी फरारी आहे. खात्याने जंगजंग पछाडले; पण खुन्याचा पत्ता लागत नाही. खुनी टोळीपैकी अनेकांना आम्ही पकडले आहे; पण मुख्य आरोपी काही केल्या हाती लागत नाही. कृपा करून तो कोठे सापडेल ते सांगा."

श्रीवासुदेवशास्त्र्यांनी प्रश्न कुंडली मांडली. गणित केले. थोडा वेळ विचारमग्न होऊन ते म्हणाले, "आरोपी दक्षिणेच्या बाजूने गेलेला आहे; पण तो आठ दिवसांच्या आत अनायासाने तुमच्या ताब्यात येईल. तुम्हाला अधिक शोध करण्याचे कारण नाही."

फौजदारांचा या भाकितावर किती विश्वास बसला हे सांगता येणार नाही; कारण श्रद्धा आणि सरकारी काम यांची सांगड घालणे फार कठीण होते. अगदी नाइलाज झाला म्हणूनच फौजदार श्रीवासुदेवशास्त्र्यांकडे आले होते. त्यांची इभ्रत पणाला लागली होती. आजूबाजूच्या दहावीस गावातील लोकांचा श्रीशास्त्रीबुवांच्या भविष्य कथनावर विश्वास होता. आपणालाही श्रीशास्त्रीबुवांवर विश्वास ठेऊन काही दिवस थांबावयाला हरकत नाही असा विचार फौजदारांनी केला; पण आरोपीच्या शोधाचे प्रयत्न त्यांनी चालूच ठेवले होते.

आरोपी दूरच्या एका गावी आपल्या मित्राकडे लपून बसला होता. हातपाय मोकळे करण्यासाठी तो रात्रीच्या वेळी चोरून घराबाहेर पडत असे. एका रात्री तो असाच लपून छपून फिरत असताना तेथील पोलीस अधिकाऱ्याने त्याला पाहिले व ओळखले. त्याला पकडून ताबडतोब पोलीस ठाण्यावर हजर करण्यात आले व तेथून दुसऱ्या दिवशी गुन्हा घडला त्या गावी पाठविण्यात आले. गुन्हेगाराला चतुर्भुज करून ठाण्यावर आणलेला पाहून फौजदारसाहेबांना श्रीवासुदेवशास्त्र्यांच्या शब्दांची आठवण झाली. त्यांचे भविष्यकथन

शब्दशः खरे झाले होते.

याचा परिणाम असा झाला की, एखादा गुन्हेगार अधिकाऱ्यांच्या हातावर तुरी देऊन पळून गेला की, अधिकारी श्रीवासुदेवशास्त्र्यांकडे जात. शेजारच्या एका गावी सारख्या चोऱ्या होत असत. चोर संघटितपणे डाका घालीत. अधिकाऱ्यांनी डोळ्यात तेल घालून पाळत ठेवली होती; पण चोर काही सापडेनात. शेवटी अधिकाऱ्यांनी श्रीवासुदेवशास्त्र्यांकडे धाव घेतली. श्रीवासुदेवशास्त्र्यांनी चोरांचे वर्णन करून ते कितीजण आहेत, कोठे राहतात, केव्हा बाहेर पडतात वगैरे सविस्तर माहिती अधिकाऱ्यांना सांगितली. या माहितीच्या आधारे अधिकारी सर्व चोरांना पकडू शकले.

याच सुमारास एकदा श्रीवासुदेवशास्त्री मातुश्रींसह नाशिकला गेले होते. तेथे त्यांना श्री. देव मामलेदार या सत्पुरुषांच्या भेटीचा योग आला. श्रीस्वामीमहाराजांच्या चरित्रातील पुष्कळ गोष्टी सत्यकथा असूनही आख्यायिकांच्या स्वरूपात प्रसृत झाल्या आहेत. त्यामुळे अशा गोष्टींचा कालक्रम लावता येत नाही. प्रस्तुत गोष्टीत ढोबळमानाने एवढेच सांगता येईल की, श्रीवासुदेवशास्त्र्यांची श्री. देव मामलेदारांशी नाशिक येथे झालेली भेट त्यांच्या विवाहानंतर; पण माणगावचे श्रीदत्तमंदिर स्थापन होण्यापूर्वी झालेली असावी

श्री. देव मामलेदारांच्या साधुत्वाच्या गोष्टी त्यावेळी महाराष्ट्रामध्ये सर्वश्रुत झाल्या होत्या. त्यामुळे साधुपुरुषाच्या दर्शनासाठी म्हणून श्रीशास्त्रीबुवा मातुश्रींना घेऊन नाशिकला गेले.

श्री. देव मामलेदारांच्या वाड्यात भेटावयाला आलेल्या लोकांची गर्दी झाली होती. त्या गर्दीमध्ये एका बाजूला श्रीवासुदेवशास्त्री बसले होते. त्या गर्दीतूनही श्री. देव मामलेदारांचे लक्ष श्रीशास्त्रीबुवांच्याकडे गेले. श्रीशास्त्रीबुवा कोठेही गेले तरी त्यांच्या वेषात कधी फरक पडत नसे. नेसावयाला एक पंचा व उत्तरीय म्हणून

एक वस्त्र एवढेच अंगावर असे. पायात काहीही न घालण्याचा नियम असल्यामुळे ते नेहमी अनवाणीच चालत असत.

श्रीशास्त्रीबुवा जरी वर वर्णन केल्याप्रमाणे अगदी साध्या वेषात असले तरी श्री. देव मामलेदारांनी त्यांना ओळखले. हे स्फुल्लिंग आहे हे त्यांच्या तात्काळ लक्षात आले. रत्नपारख्याला रत्नाची पारख करावयाला वेळ लागत नाही हेच खरे !

" शास्त्रीबुवा ! आपले येणे कोठून झाले ? आपला परिचय झाला तर आनंद होईल ! आपले शिक्षण कोठपर्यंन्त झाले." श्री. देव मामलेदारांनी विचारले.

हे ऐकताच श्रीशास्त्रीबुवा त्यांना असे म्हणाले की, " मी वासुदेव गणेश टेंबे. कोकणात सावन्तवाडी जवळील माणगावी राहतो. आपली कीर्ती ऐकून आईला बरोबर घेऊन आज मुद्दाम आपल्या दर्शनासाठी आलो आहे. माझे तसे काही फारसे शिक्षण झालेले नाही. गावात भिक्षुकी करून राहत असतो."

श्रीशास्त्रीबुवांनी असे सांगताच श्री. देवमामलेदारांनी त्यांच्याकडे एकदा पाहिले व तेथे जमलेल्या सर्व लोकांना उद्देशून ते असे म्हणाले की, " ऐकले का मंडळी ! हे शास्त्रीबुवा म्हणतात की, माझे फारसे शिक्षण झालेले नाही. पण हे तर सर्व शिकलेले आहेत. यांचा अधिकार फार मोठा आहे. अहो ! वेद यांच्या मुखाने बोलत असतात. हे राखेखाली झाकलेले स्फुल्लिंग आहे." इतके सर्व लोकांना उद्देशून त्यांच्या संबंधी सांगून झाल्यावर ते त्यांच्याकडे वळून असे म्हणाले की, " शास्त्रीबुवा ! आम्ही आपल्याला ओळखले आहे !"

सर्व लोकांच्या नजरा श्रीशास्त्रीबुवांकडे वळल्या. या दोघांच्या संभाषणाचा नीटसा अर्थबोध लोकांना झाला नाही. श्री. देव मामलेदारही आधिक काही बोलले नाहीत; पण ज्याअर्थी श्री. देव मामलेदारांसारखा साधुपुरुष यांची प्रसंशा करीत आहे त्याअर्थी हे

सुद्धा साधुपुरुष असावेत असे लोकांना वाटले. लोकांच्या नजरा टाळण्यासाठी श्रीवासुदेवशास्त्री श्री. देव मामलेदारांना नमस्कार करून बाहेर आले. श्री. देव मामलेदारांनी देऊ केलेली दक्षिणाही श्रीशास्त्रीबुवांनी स्वीकारली नाही.

पिशाच्चबाधा झालेल्या अनेक लोकांची बाधा श्रीवासुदेव शास्त्र्यांनी मंत्रसामर्थ्याने दूर केली होती. यामुळे पुष्कळदा त्यांना स्वतःला त्रासही सहन करावा लागला; पण आपले लोकसेवेचे कार्य त्यांनी थांबविले नाही. माणगाव मधील एका बाईची पिशाच्चबाधा घालविल्यावर त्यांना असाच त्रास झाला. त्या बाईला एक पिशाच्च अनेक प्रकारे छळीत असे. पिशाच्चाच्या लीलांनी कधी कधी सोसाट्याचा वारा सुटून ती बाई आकाशात फेकली जात असे. या त्रासाने गांजून गेलेली ती स्त्री शेवटी श्रीवासुदेवभटजींना शरण आली. तिची ती दयनीय अवस्था पाहून त्यांना तिचा अतिशय कळवळा आला. या बाधेचे निवारण करण्यासाठी त्यांनी भूर्जपत्रावर एक यंत्र लिहून, ते ताईतामध्ये घालून, त्या बाईला गळ्यात बांधावयाला सांगितले. श्रीशास्त्रीबुवांनी सांगितल्याप्रमाणे त्या बाईने ते यंत्र आपल्या गळ्यात बांधताच त्या पिशाच्चाचे बंधन होऊन त्याला काहीही करता येईना. अशा रीतीने त्या बाईच्या मागची पीडा गेली; पण त्या पिशाच्चाने त्याच रात्री श्रीवासुदेवशास्त्र्यांचा गळा दाबून धरून त्यांना त्रास द्यावयास सुरुवात केली. पिशाच्चाने रात्रीच्या वेळी अशा प्रकारे गळा दाबून धरल्यामुळे जीवन-मरणाचा मोठा भयानक प्रसंग त्यांच्या समोर उभा राहिला. या अकस्मात् कोसळलेल्या संकटामुळे त्यांची वाचाच बसून गेल्यामुळे त्यांच्या तोंडून शब्दही फुटेना. काही क्षण अशा अवस्थेत गेले असतील नसतील तोच त्यांनी श्रीदत्तनामस्मरण करण्यास सुरुवात केली. त्या बरोबर थोडा त्रास कमी झाला खरा; पण त्या पिशाच्चाच्या

कचाटचातून त्यांची पूर्णपणे सुटका झाली नाही. इतक्यात या सर्व प्रकारामुळे उडालेल्या गडबडीने श्रीशास्त्रीबुवांची आई जागी होऊन नेमके काय झाले आहे हे पाहण्याकरिता त्यांच्याकडेच आली. आई आपल्याकडेच येत आहे हे पाहून त्यांना फार बरे वाटले. अद्याप पिशाच्चाने गळा दाबून धरलेला असल्यामुळे त्यांना बोलावयाला येत नव्हते त्यामुळे त्यांनी आईला खूण करून थोडे तांदूळ मागवून घेतले व ते मिळाल्याबरोबर अभिमंत्रित करून घरात सर्व दिशेला टाकले. त्याबरोबर तो त्रास कमी झाला. त्या बाईचे पिशाच्च काढण्याचा प्रयोग करण्यापूर्वी आत्मसंरक्षणाचा विधी प्रथम करावयाचा राहून गेल्यामुळे आपल्याला हा त्रास भोगावा लागला असे श्रीवासुदेवशास्त्र्यांच्या मागाहून लक्षात आले.

अशा तऱ्हेने श्रीवासुदेवशास्त्र्यांची कीर्ती सगळीकडे पसरत होती; तर इकडे घरी त्यांची मन:शांती पार बिघडून गेली होती. घर हें प्रेम, शांती, आणि विरंगुळा यांचे ठिकाण मानले जाते; पण सासू-सुनेच्या दररोजच्या वाढत्या कटकटीमुळे श्रीवासुदेवशास्त्र्यांना आपल्या घरी शांती, समाधान व सुख लाभणे कठीण होऊ लागले. त्यांची आपल्या आईवर फार भक्ती असल्यामुळे घरच्या भांडणामध्ये त्यांनी कधीच लक्ष घातले नाही; पण त्यामुळे त्यांना होणारा उद्वेग, मनस्ताप थोडाच थांबणार होता? एक दिवस त्यांना शेजारच्या गावी काही कामानिमित्त जायवयाचे होते म्हणून आईला स्वयंपाक लवकर करावयाला सांगून ते आपल्या नित्याच्या आन्हिकाला व अनुष्ठानाला बसले. त्या दिवशी अन्नपूर्णाबाईंना ताप आल्यामुळे त्या झोपूनच होत्या. सासूला वाटले सून ढोंग करीत आहे.त्यामुळे स्वयंपाक करावयाचे सोडून त्या गोठ्यात गुरांना चारापाणी 'करण्यात गढून गेल्या. श्रीवासुदेवशास्त्र्यांचे अनुष्ठान सपल्यावर त्यांनी मातुश्रीला जेवण वाढावयाला सांगितले. स्वयंपाक घरातून आवाज येईना

म्हणून त्यांनी डोकावून पहिले; तर स्वयंपाक घर थंडगार होते. अजून चूलच पेटली नव्हती. श्रीवासुदेवशास्त्र्यांना नवल वाटले. हाक मारून त्यांनी आईला विचारले "आई, स्वयंपाक झाला का?" हे ऐकताच आई एकदम उसळून त्यांना असे म्हणाली की, "तुझ्या बायकोलाच विचार की ! स्वयंपाक करावा लागेल म्हणून ढोंग करून झोपून राहिली आहे. गुरांचे कोण करील ! त्यांना नको का चारापाणी करावयाला ?"

अन्नपूर्णाबाई माजघरात एक गोधडी टाकून झोपल्या होत्या. घरची सून, आपली पत्नी दिवसाउजेडी विनाकारण झोपून राहणार नाही अशी श्रीवासुदेवशास्त्र्यांना पक्की खात्री होती. त्यांनी आपल्या पत्नीच्या अंगाला हात लावून पाहिले तेव्हा ती तापाने फणफणली आहे असे त्यांना आढळून आले. आपला कयास खरा ठरला असे पाहून ते आपल्या आईला असे म्हणाले की –

"आई ! ही ढोंगी आहे असे कसे म्हणतीस ? हिला तर सडकून ताप चढला आहे. तुला खोटे वाटत असल्यास तू स्वतः हिच्या अंगाला हात लावून पाहा म्हणजे तुझी खात्री होईल."

मुलाने असे म्हणताच मग काही विचारण्याची सोयच राहिली नाही. मातुश्री एकदम संतप्त झाल्या व रागाच्या भरातच त्याला वाक्‌ताडन करताना असे म्हणाल्या की, "तर. तर म्हणे तिला ताप चढला आहे ! आणि नाही का काही होत. आजकाल तू बायकोच्या नादी लागल्यामुळे तिचा कैवार घेऊन मला उलट बोलू लागला आहेस. आता तुला आईची किंमत कशाला वाटेल ? मी अडचण झाले आहे ना तुम्हाला ? मीच कुठेतरी निघून जाते म्हणजे झाले. मग खुशाल होऊ द्या संसार राजाराणीचा !"

अशाप्रकारे त्या दिवशी रमाबाईंनी मुलावर व सुनेवर खूपच तोंडसुख घेतले; परंतु त्यांनी आपल्या मातुश्रीचे व सूनबाई सौ.

अन्नपूर्णाबाईंनी सासूचे सर्व वाक्‌प्रहार मोठ्या शांतचित्ताने व धैर्याने सहन केले. आपणाला कोठून दुर्बुद्धी सुचली आणि आपण स्वयंपाक लवकर करावयाला सांगितले असे श्रीवासुदेवशास्त्र्यांना झाले. शेवटी मुकाट्याने उठून न जेवताच ते त्या दिवशी कामासाठी निघून गेले.

हा मनस्ताप श्रीवासुदेवशास्त्र्यांना जसा होत होता तसा अन्नपूर्णाबाईंनासुद्धा होत होता. रमाबाईंचा स्वभाव सून घरात आल्यापासून रागीट झाला होता. या ना त्या कारणावरून त्या सुनेवर तोंडसुख घेत असत. अन्नपूर्णाबाई तशा सालस व सोशीक स्वभावाच्या होत्या. त्यांना सासूची भीतीही वाटत असे. त्यामुळे त्यांनी सासूला कधीच प्रत्युत्तर केले नाही. होणारा सर्व जाच त्या निमूटपणे सहन करीत असत; पण दिवसेंदिवस वाढत जाणारा हा जाच सहन करणे त्यांच्या शक्तीपलीकडे जात होते. घरातील ही स्फोटक परिस्थिती लक्षात घेऊन श्रीवासुदेवशास्त्री आपल्या पत्नीशी कधी बोलतही नसत. अन्नपूर्णाबाईंना वाटे की, नवऱ्याने मध्ये पडून सासूच्या जाचातून आपली सुटका करावी; पण श्रीवासुदेवशास्त्र्यांची या बाबतीतील मूकवृत्ती पाहून त्यांचा स्वभाव हळूहळू थोडा बंडखोर होऊ लागला. सासूच्या बोलण्याला त्या प्रत्युत्तर करू लागल्या. परिणामी घरामध्ये सासूसुनेचे नेहमी खडाष्टक होऊ लागले. भांडणाचे पर्यवसान नेहमीच सुनेचे मागीलदारी बसून अश्रू ढाळण्यात होत असे.

एकदा आग्रायणेष्टी करण्याचे ठरवून श्रीवासुदेवशास्त्र्यांनी संकल्पाच्या वेळी पत्नीला आपल्या सोबत बसण्यासाठी बोलाविले. सकाळीच सासूसुनेच्या खडाष्टकाचा प्रयोग झाला होता व अन्नपूर्णाबाई वैतागल्या होत्या. रागाचा स्फोट कोठेतरी व्हावयाचा होता. तो श्रीवासुदेवशास्त्र्यांवर झाला. संकल्पाच्या वेळी शेजारी

बसावयाला बोलावताच त्या फणकाऱ्याने म्हणाल्या, "मी संकल्पाला येत नाही. मी तुमची कोण? कोण बायको असेल तिला बोलवा. मी तुमची बायको असते; तर माझा हा असा छळ तुम्ही होऊ दिला नसता." श्रीवासुदेवशास्त्रांनी ती इष्टी पत्नीशिवायच केली.

घरातील वातावरण दिवसेंदिवस एवढे असह्य होऊ लागले की, आता जास्तीत जास्त वेळ घराबाहेर राहूनही श्रीवासुदेवशास्त्र्यांचे मन शांत होईना. कोठेतरी दूर निघून जावे व या कटकटीपासून सुटका करून घ्यावी असे आता त्यांना वाटू लागले. काही दिवस श्रीक्षेत्र नरसोबाच्या वाडीला जाऊन राहावे असे त्यांना वाटू लागले. आत्तापर्यंत कोणतीच गोष्ट त्यांनी आईच्या संमतीशिवाय केली नव्हती; पण श्रीक्षेत्र नरसोबाच्या वाडीला जाण्यासाठी आईची संमती विचारावयाला त्यांना धीर होईना; कारण आई संमती देईल याची त्यांना खात्री नव्हती. श्रीवासुदेवशास्त्री घरातील त्रासाला कंटाळले होते. त्यांच्या ठिकाणी वैराग्य उत्पन्न झाले होते; पण त्यांनी आपली मनःशांती मात्र कधी ढळू दिली नाही.

अयाचित वृत्ती अंगीकारून व आदर्श संसार करून, परमार्थातील परमोच्च स्थान गाठणारे श्रीवासुदेवशास्त्री टेंबेस्वरूप अनसूयागर्भरत्न अत्रिनंदन भगवान् श्रीदत्तात्रेय त्रितापाने पोळलेल्या आर्त जनांचे कल्याण करण्याची आता लीला करणार आहेत.

अध्याय सातवा

साधकावस्था :

श्रीवासुदेवशास्त्री आता घरातील कटकटींना फारच कंटाळले होते. संन्यास घ्यावा आणि दूर कोठेतरी निघून जावे असे त्यांना वाटू लागले. नियतीने हे सर्व अगोदरच ठरवून ठेवले होते. कोणतीही

महान् घटना घडण्यास निमित्त म्हणून एखादे क्षुल्लक कारणही पुष्कळदा पुरेसे होते. भगवान् श्रीदत्तात्रेयांचा एकनिष्ठ भक्त सहस्रार्जुन भगवंताच्या कृपेने पूर्णकाम असूनही त्याच्या मनामध्ये जमदग्नी ऋषींच्या आश्रमातील कामधेनूची अभिलाषा उत्पन्न झाली नसती; तर परशुरामाचे अवतारकार्य अपुरेच राहिले असते. ऐनवेळी राणी कैकेयीच्या हृदयामध्ये मंथरेच्या रूपाने मत्सराने प्रवेश केला नसता; तर रामायण घडले नसते व रावणाचा वध झाला नसता. शकुनी मामाच्या किमयेने मायावी फासे निर्माण झाले नसते; तर भारतीय युद्ध झाले नसते व "परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्" ही भगवंताची उक्ती खरी ठरली नसती आणि श्रीमद्‌भगवद्‌गीतेचा जन्म झाला नसता. तशीच गोष्ट येथेही घडली. वास्तविक रमाबाई फार प्रेमळ व सौजन्यशील होत्या म्हणून तर त्यांनी आपल्या सुनेला "सासुरवास" करावा हे चमत्कारिक वाटते. पण पुढे भक्तिसंप्रदायात एक इतिहास घडावयाचा होता. एक महापुरुष जगासमोर यावयाचा होता. अशावेळी सासूसुनेमध्ये कलहाने जन्म घेतला नसता; तर श्रीवासुदेवशास्त्र्यांच्या मनामध्ये वैराग्य उत्पन्न झाले नसते आणि सनातन धर्माच्या एका महान् आदर्शाला आपण मुकलो असतो. खरे म्हणजे श्रीवासुदेवशास्त्री ईश्वरावतार होते; कारण त्यांना श्रीदत्तात्रेयांचा योगिराज या नावाचा चवथा अवतार मानतात. त्यांच्यामध्ये कमतरता कशाची असणार? संसारातील कटकटींमुळे त्यांच्या हृदयामध्ये वैराग्य उत्पन्न झाले असे म्हणणे बरोबर नाही; कारण श्रीवासुदेवशास्त्री म्हणजे मूर्तिमंत वैराग्य! असे असूनही सामान्यांसाठी त्यांना जो आदर्श निर्माण करावयाचा होता तो सामान्यांच्या दृष्टिकोनातून व त्यांना पटण्यासारख्या परिस्थितीतून निर्माण होणे

आवश्यक होते. “न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन। नानवाप्तमवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि।” असे श्रीमद्‌भगवद्‌गीतेत भगवंतांनी सांगून आपणास या तिन्ही लोकात कसलेही कर्तव्य नसले, काही मिळवावयाचे नसले व काही अप्राप्तही नसले तरी मी कर्मातच राहतो हा सिद्धान्तच खरा आहे आणि म्हणूनच कौटुंबिक कटकटींमुळे श्रीवासुदेवशास्त्र्यांच्या हृदयात तीव्र वैराग्य उत्पन्न झाले व त्यांच्या मनामध्ये संसार सोडून देऊन श्रीक्षेत्र नरसोबावाडीला जाऊन राहावे असे विचार वारंवार येऊ लागले.

श्रीवासुदेवशास्त्री उद्विग्न झाले म्हणजे पुष्कळदा सावंतवाडीतील श्री. आळवणी वैद्यांच्या घरी जात. श्रीवासुदेवशास्त्र्यांना वैद्यकीचे ज्ञान होते; पण त्यात अधिकाधिक भर घालावी असे त्यांना वाटत असे. श्री. आळवणी उत्तमदर्जाचे वैद्य म्हणून प्रसिद्ध होते. त्यामुळे श्री. आळवणी वैद्यांच्या घरी निरनिराळ्या रोगांवर विविध रसायनांची आणि वनस्पतींच्या रसांची चिकित्सा करण्यात दोघांना वेळेचे भान राहत नसे. आज श्रीवासुदेवशास्त्री घरच्या कटकटींमुळे त्रासलेल्या मनस्थितीत, डोक्यावर भर दुपारचा सूर्य तळपत असतानाही श्री. आळवणी वैद्यांच्या घरी जावयाला निघाले. ते तेथे पोहोचले तेव्हां श्री. आळवणी वैद्य बाहेर जावयाच्या तयारीत होते.

“या वासुदेवशास्त्री! अगदी वेळेवर आलात. बाहेर जावयाच्या विचारातच होतो. कदचित् चुकामूक झाली असती. या, बसा.” श्री. आळवणी म्हणाले.

“तसे काही विशेष काम नव्हते. सहज आलो होतो. आयुर्वेदातील एका रसायनाबद्दल चर्चा करण्याची इच्छा होती. तुम्ही बाहेर निघाला आहात तर मग मीही परत जातो. येईन पुन्हा केव्हातरी.”

“शास्त्रीबुवा! तुम्ही येत असाल तर चला माझ्या बरोबर. मी

सावन्तवाडीला विष्णुपंत आणावकरांकडे चाललो होतो. तुम्ही आणावकरांबद्दल ऐकलेच असेल. तुम्हाला काहीतरी नवीन पाहावयला मिळेल. आणावकरांच्या अंगात पिशाच्च योनीत गेलेला त्यांचाच एक पूर्वज येतो आणि तो त्यांच्या तोंडून बोलतो. मग अनेक कूट प्रश्नांची उकल ते सहजपणे करतात. भविष्य काळात घडावयाच्या गोष्टी ते आधीच सांगतात. मुख्य म्हणजे अडलेल्या प्रश्नावर ते योग्य सल्ला सुद्धा देतात. आणावकरांच्या या अलौकिक सामर्थ्यामागे सत्य काय आहे ते तुम्ही शोधून काढू शकाल."

श्रीवासुदेवशास्त्र्यांनी आणावकरांबद्दल खूप ऐकले होते; पण त्यांच्याकडे जाण्याचा योग त्यांना कधीही आला नव्हता. त्यामुळे मोठ्या कुतूहलानेच ते वैद्यबुवांबरोबर आणावकरांच्या घरी जावयाला निघाले.

ते तेथे पोहोचले तेव्हा दिवसाचा दुसरा प्रहर टळला होता. सावंतवाडीमध्ये आणावकरांच्या घरातील पुढच्या पडवीमध्ये बरीच मंडळी बसली होती. त्यात संसारातील त्रिविध तापांनी पोळलेले पुरुष होते तशा बायकाही तेथे जमल्या होत्या. प्रत्येकाला कोणत्या ना कोणत्यातरी चिंतेने ग्रासले होते. समोर एका कांबळ्यावर आणगावकर बसले होते. सर्वजण त्यांच्या चेहऱ्याकडे उत्सुकतेने पाहत होते. श्री. आळवणी वैद्यांचा आणि आणाकरांचा पुष्कळ दिवसांचा परिचय होता. वैद्यबुवांना पाहून आणावकरांच्या चेहऱ्यावर स्मित चमकले. त्यांनी श्री. आळवणी वैद्यांना आपल्या शेजारी बसावयाला सांगितले. श्री. आळवणी आणि श्रीवासुदेवशास्त्री त्यांच्या समोर थोड्या अंतरावर बसले. आणावकर श्रीवासुदेवशास्त्र्यांच्या चेहऱ्याकडे एकटक पाहू लागले. सगळीकडे शांतता पसरली. आणावकरांचे अंग एकदोन वेळा शहारल्यासारखे झाले. नासिकेद्वारा भस्त्रिका-प्राणायामाप्रमाणे जोरदार श्वासप्रश्वास सुरू झाले आणि

काही वेळाने आणावकर शांत झाले. क्षणात त्यांच्या चेहऱ्याचे परिवर्तन झाले. डोळ्यातील भाव बदलले. दृष्टी कोठेतरी दूर, अज्ञातात लावल्याप्रमाणे, लक्षहीन बिन्दूवर स्थिर झाली आणि त्यांच्या तोंडून थोडे तुटक पण स्पष्ट शब्द येऊ लागले.

"माणगावचे श्रीवासुदेवशास्त्री फार मोठी आसामी आहे," असे म्हणून त्यांच्याकडे वळून पाहत ते म्हणाले, "शास्त्रीबुवा! या वेळी तुम्ही खिन्न मनस्थितीमध्ये आहात. तुमच्या मनामध्ये संन्यास घ्यावयाचे विचार येत आहेत ना? याच विचारात आता आपण घरून निघालात, पण अजून अवकाश आहे. संन्यास घेण्यासाठी योग्य परिस्थिती अद्याप निर्माण झालेली नाही. या ठिकाणी तुमच्या हातून मोठे कार्य व्हावयाचे आहे. ते पूर्ण झाल्याशिवाय तुम्ही माणगाव सोडून जाऊ शकत नाही."

आणावकरांच्या या शब्दांनी श्रीवासुदेवशास्त्री आश्चर्यचकित झाले. या गोष्टी आणावकर कसे सांगू शकले याचे त्यांना नवल वाटले. आणावकरांना विचारल्याशिवाय त्यांना राहवेना. "तुम्ही हे सर्व कसे सांगू शकता? भविष्यकाळातील घटना तुम्हाला कशा सांगता येतात?"

"मला त्यात काही कठीण नाही. आपल्या चरित्राचा पटच मला दिसत आहे. सर्वच गोष्टी स्पष्ट करण्याची मला आज्ञा नाही. आपल्या शरीराच्या आश्रयाने जे तत्त्व वावरत आहे त्या तत्त्वाच्या आज्ञेपलीकडे मी जाऊ शकत नाही."

"तुम्ही खरोखर कोण आहात? ही भूतभविष्यवाणी सांगण्याची शक्ती तुम्हाला कशी प्राप्त झाली?"

"मी कोण आहे? मी या कुडीच्या पूर्वजांपैकीच एक आहे. पूर्व जन्मात मी एक उत्तम वैदिक ब्राह्मण होतो. आमच्या घरच्या मागील दारात दुसऱ्याची एक गाय आलेली मी पाहिली. त्या

गायीने घरात घुसून काही नासधूस न करता निघून जावे म्हणून मी तिला सहज एक मोठा धोंडा फेकून मारला; पण तो तिच्या वर्मी लागल्यामुळे ती तात्काळ मरण पावली. हे असे घडलेले पाहून माझ्या अंत:करणाचा थरकापच उडला. त्या भीतीपोटी माझ्या हातून झालेली ही गोहत्या मी कोणालाही सांगितली नाही. आपल्या हातून घडलेले हे पाप लोकांना कळू नये म्हणून मी त्याबद्दल प्रायश्चित्तही घेतले नाही."

"पुढे माझा मृत्यू झाल्यानन्तर मी यमदरबारात गेलो. माझ्या पापाचा पाढा चित्रगुप्ताने यमापुढे वाचल्यावर यमराजांनी मला असे विचारले की, "तू गोहत्त्येचे पाप केले आहेस. अशा प्रकारचे पाप करणाऱ्या पाप्याला वाघाच्या योनीत तरी जन्म घ्यावा लागतो किंवा त्याला पिशाच्च योनीत तरी जावे लागते. तुला कोणती योनी पसंत आहे ते सांग म्हणजे त्याप्रमाणे तुझी व्यवस्था करू." यमराजांनी दिलेल्या पर्यायाबद्दल विचार करून मी असे ठरविले की, व्याघ्रयोनीत जाण्यापेक्षा पिशाच्च योनीच बरी; कारण त्या योनीत मागील जन्मातील ज्ञानाचे स्मरण तरी राहील. माझी ही पसंती मी यमराजांना सांगितल्यावर त्यांनी माझी पिशाच्च योनीत रवानगी केली. सध्या मी अनेक पिशाच्चांवरील मोठा अधिकारी आहे. मानव जन्मामध्ये माझे जे वेदाध्ययन व शास्त्राध्ययन झाले होते त्या सर्वांची मला उत्तम स्मृती आहे. या योनीत जन्माला येऊन मला आत्तापर्यन्त २५० वर्षे होऊन गेली. पापामुळे या योनीत आलेल्या जीवाला त्याच्या पापाच्या प्रमाणात राहावे लागत असले; तरी जास्तीत जास्त पिशाच्च योनीत दहा हजार वर्षे काढावी लागतात. पिशाच्चयोनीमध्येही सुष्ट आणि दुष्ट अशा दोन्ही प्रवृत्तीची पिशाच्चे असतात. पिशाच्चांचे साम्राज्य हे एक प्रकारे अत्यंत शिस्तबद्ध असे साम्राज्य आहे. पूर्वजन्माच्या ऋणानुबंधा-

शिवाय कोणातेही पिशाच्च उगीचच कोणालाही त्रास देत नाही. मानवाचे काहीतरी भले करावे या उद्देशानेच या कुडीचा आश्रय घेऊन मी प्रगट होतो आणि लोकांना त्यांच्या दुःखातून थोड्याफार प्रमाणातरी मुक्त करण्यासाठी मी त्यांच्या दुःखावर उपाय सांगतो. अशा तऱ्हेने लोकांच्या उपयोगी पडल्यामुळे माझी या योनीतून लवकर मुक्तता होईल. वासुदेवशास्त्री ! आपण फार भाग्यवान् आहात. आपला भविष्यकाळ मला स्पष्ट दिसत आहे; पण सर्वच गोष्टी सांगण्याचा मला अधिकार नाही."

ही सर्व हकीकत ऐकल्यानंतर आणावकरांच्या अंगामध्ये समंध येतो याबद्दल श्रीवासुदेवशास्त्री यांची खात्री पटली विष्णुपंत आणावकर तसे शास्त्र वगैरे फारसे शिकलेले नव्हते आणि इतर विद्यांचेही त्यांना ज्ञान नव्हते. ज्योतिषशास्त्राचे ज्ञान तर नव्हतेच नव्हते; पण ज्यावेळी हा समंध त्यांच्या अंगात येत असे त्यावेळी त्यांची भाषा पार बदललेली असे. त्यांचे बोलणे संस्कृतप्रचुर व विद्वत्तापूर्ण असे. ऐकणाराला वाटावे की, हे कोणी मोठे पंडित किंवा शास्त्री आहेत. या अवस्थेमध्ये त्यांचे ज्योतिषाचे ज्ञान अचंबा करण्यासारखे अचूक असे. श्रीवासुदेवशास्त्र्यांच्या मनामध्ये पिशाच्च योनीबद्दल आदर नव्हता. कोणाही माणसाच्या मनामध्ये तो नसतो; पण आणावकरांच्या अंगात येणाऱ्या पिशाच्चाने आता सांगितलेल्या हकीकतीमुळे श्रीवासुदेवशास्त्र्यांना या समंधाबद्दल आदर वाटू लागला. पुढील काही भेटीमध्ये आपण ज्या योनीमध्ये वावरतो त्या योनीबद्दल पुष्कळ माहिती त्याने श्रीवासुदेवशास्त्र्यांना सांगितली.

यानंतर आणावकरांच्या घरी झालेल्या अशा एखाद्या कार्यक्रमाला श्रीवासुदेवशास्त्री हजर असले म्हणजे त्यांची व त्या समंधाची पुष्कळ विषयांवर चर्चा होत असे. पुढे कालौघात आणावकरांना मुलगा झाला. विष्णुपंत आणवकरांनी श्रीवासुदेवशास्त्र्यांना

आपल्या या मुलाचे जन्मटिपण तयार करण्यास सांगितले. त्यामध्ये मुलाचे आयुष्यमान् अगदी अल्प म्हणजे आणखी महिनाभर आहे असे आढळून आल्यामुळे श्रीवासुदेवशास्त्र्यांनी गणित मांडलेली पाटी पालथी घालून ते स्वस्थ राहिले. एवढ्यात आणावकरांच्या अंगामध्ये समंधाने प्रवेश केला व तो म्हणाला, "शास्त्रीबुवा खिन्न का होता ? मुलाच्या जन्मवेळेचे आपण घेतलेले दिनमान बरोबर नाही. त्याच्या जन्मवेळचे दिनमान मी सांगतो त्याप्रमाणे घेऊन पुन्हा गणित मांडा." श्रीवासुदेवशास्त्र्यांनी समंधाच्या सांगण्याप्रमाणे दिनमान घेऊन गणित मांडले. त्याप्रमाणे मुलाला एक महिनाभर क्लेश होते; पण मृत्युयोग नव्हता, असे आढळून आले. त्यानन्तर त्या समंधाच्या सांगण्यावरून श्रीवासुदेवशास्त्र्यांनी त्या मुलाच्या आईला काही विशेष उपाय सांगितल्यामुळे त्या मुलाला आईचे भरपूर दूध मिळावयास लागून त्याचे पुढे कल्याण झाले. अशा प्रकारे आणावकरांच्या समंधाचे श्रीवासुदेवशात्र्यांना पुष्कळदा साहाय्यसुद्धा होत असे.

श्रीवासुदेवशास्त्र्यांना संन्यास घ्यावयाची तीव्र इच्छा होती; पण आणावकरांच्या समंधाच्या भाकितानंतर ती त्यांच्या मनाच्या एका कोपऱ्यात जाऊन राहिली. संन्यास घेण्याचा विचार त्यांच्या मनातून गेला नाही. आपणास संन्यास घेण्यासाठी सध्या अनुकूल वेळ नाही हे समजल्यावर त्यांनी तो विचार तात्पुरता बाजूला ठेवला; पण त्यांच्या चित्तातील वैराग्य मात्र तीळभरही कमी झाले नाही. त्यांच्याकडून दिवसभरात जे व्यवहार घडत त्याबद्दल आता त्यांना बिलकूल रस वाटेना; पण त्यांनी आपल्या कर्तव्यात मात्र काही कमी पडू दिले नाही. संसाराची सर्व कामे करीत असताना त्यांचे मन पूर्णपणे ईश्वरचरणी लागून राहिलेले असे. शरीर दैनंदिन कामे करीत होते; पण मन मात्र ईश्वरचरणी लीन झालेले होते. आत्म-

साक्षात्कारासाठी त्यांचे मन तळमळत होते.

श्रीवासुदेवशास्त्र्यांची साधना पक्व व्हावयाची वेळ आता आली होती. श्रीसंततुकाराममहाराजांच्या कुटुंबामध्ये जशी पांडुरंगाची भक्ती आणि पंढरीची वारी परंपरेने चालत आली होती तशी श्रीदत्तभक्ती श्रीटेंबेस्वामीमहाराजांच्या घरात तीन पिढ्यांपासून चालत आलेली होती. श्री. हरिभट टेंबे श्रीदत्तभक्त होते. श्रीगुरुचरित्रावर त्यांची फार श्रद्धा होती. गणशेपंताना श्रीदत्तभक्ती आणि गाणगापूरवारी याशिवाय दुसरे काही सुचतच नव्हते. तोच श्रीदत्तभक्तीचा वारसा आता श्रीवासुदेवशास्त्र्यांकडे आला होता. त्यांच्यामधील दत्तभक्तीचा विकास व्हावयाची वेळ आता आली होती. हळूहळू त्यांच्या मधील श्रीदत्तभक्ती अशा परिणतीला येऊन पोहोचली की, श्रीदत्तात्रेयांच्या कृपेने त्यांना आध्यात्मिक अनुभव यावयाला सुरुवात झाली. भगवान् श्रीदत्तात्रेय त्यांना आदेश देऊन त्यांच्याकडून लोककल्याणाची कामे करून घेऊ लागले. श्रीवासुदेवशास्त्र्यांचे संपूर्ण जीवन देवांनी आपल्या ताब्यात घेतले होते. अमुक करावे किंवा अमुक करू नये असे देव त्यांना आदेश देऊन सांगू लागले. कधी हे आदेश त्यांना स्वप्नात होत तर कधी जागेपणी आकाशवाणीच्या रूपाने ते ऐकू येत. मात्र इतरांना श्रीशास्त्रीबुवांच्या शेजारी असूनही ही दैवीवाणी ऐकू येत नसे. आता श्रीवासुदेवशास्त्र्यांकडून आचरणात झालेला कोणत्याही प्रकारचा ढिलेपणा देवांना खपत नसे. त्यांच्याकडून अनवधानानेही काही प्रमाद घडल्यास श्रीवासुदेवशास्त्र्यांना त्याचा परिणाम भोगावा लागे; आणि मग त्यांच्या ध्यानात येई की, आपल्याकडून काहीतरी चूक झाली आहे. श्रीवासुदेवशास्त्र्यांनाच असे परिणाम भोगावे लागत असे नसून त्यांच्या कुटुंबातील कोणाकडूनही चूक झाली तरी त्या व्यक्तीला आपल्या चुकीचे प्रायश्चित्त भोगावे लागे.

भगवान् श्रीविष्णूंनी कृष्णावतार घेऊन भूतलावर येण्यापूर्वी, आपल्या अवतार कार्याच्या पूर्तीसाठी कोणीकोणी भूतलावर यावयाचे ते अगोदरच ठरवून, त्याप्रमाणें थोर भगवद्भक्त ऋषी-मुनींनी गोकुळात जन्म घेतला. भगवान् श्रीरामकृष्ण परमहंसांची सेवा करण्यासाठी राणी रासमणीचे जामात मथुर बाबू जन्मले होते. तीच गोष्ट याही अवताराच्या वेळी घडली. श्रीस्वामीमहाराजांच्या अवतारकार्यात ज्या भाग्यवंतांनी आपापला भाग उचलला त्यांमध्ये सावंतवाडीचे श्री. रामभाऊ सवनीस यांचा आदराने उल्लेख करावा लागेल. माणगावला ज्यावेळी भूवैकुंठाचे स्वरूप आले होते त्यावेळी तेथे होणाऱ्या सर्व उत्सवांची व्यवस्था ठेवण्याची जबाबदारी व देवांपुढे जमा होणाऱ्या जिनसांची योग्य प्रकारे विल्हेवाट लावावयाचे जोखमीचे काम श्री. रामभाऊ सवनीस यांनी निरलसपणे केले. धन्य त्यांची स्वामीभक्ती ! त्यांनी श्रीशास्त्रीबुवांची सेवा कोणत्याही फळाच्या अपेक्षेने केली नव्हती. ती अगदी निरपेक्ष व निरलस होती. श्रीशास्त्रीबुवा प्रत्यक्ष ईश्वरी अवतार आहेत अशी त्यांची खात्री झाली होती.

श्री. रामभाऊ सरकारी अधिकारी होते. त्यांचा आणि श्रीवासुदेवशास्त्र्यांचा परिचय अगदी सहज झाला होता. भटजी म्हणून श्रीवासुदेवशास्त्र्यांची कीर्ती गोवे प्रांतापर्यंत पसरली होती. श्री. रामभाऊ सवनीसांचा आणि त्यांचा याच निमित्ताने परिचय झाला होता. पुढे ज्योतिषशास्त्रातील श्रीवासुदेवशास्त्र्यांचा अधिकार लोकांच्या नजरेस आला आणि त्या निमित्ताने पुष्कळ लोक त्यांच्याकडे येऊ लागले. श्री. रामभाऊ सवनीसांच्या मुलाची पत्रिका श्रीवासुदेवशास्त्र्यांनी बनविली होती. श्रीशास्त्रीबुवा नरसोबाच्या वाडीला जावयाला निघाले तेव्हा अगदी ऐनवेळी मुलाची पत्रिका

वनविल्यावद्दलचे अडीच रुपये श्री. सवनीसांनी श्रीशास्त्रीबुवांना आणून दिले होते. त्यामुळे श्रीवासुदेवशास्त्र्यांचा वाटखर्चाचा प्रश्न मिटला होता. एकदा श्री. सवनीसांवर नोकरीमध्ये काही आरोप येऊन त्यांना नोकरीतून काढून टाकण्यात आले. संकटाच्या वेळी श्री. रामभाऊंचे आश्रयस्थान श्रीवासुदेवशास्त्री टेंबे हेच होते. श्री. रामभाऊंनी श्रीशास्त्रीबुवांचे पाय धरले. श्रीशास्त्रीबुवांनी त्यांना योगिनी मंत्राचा जप करण्यास सांगितले. "जपाला सुरुवात केल्यापासून ८२ दिवसांनी तुम्हाला पुन्हा आपल्या नोकरीवर परत बोलावणे येईल," असे श्रीशास्त्रीबुवांनी त्यांना सांगितले होते. श्री. रामभाऊंनी श्रद्धेने मंत्राचा जप केला व श्रीशास्त्रीबुवांच्या सांगण्याप्रमाणे ८२ दिवसांनंतर त्यांना पुन्हा नोकरीवर बोलाविण्यात आले.

श्री. रामभाऊ सबनीसांचा मुलगा प्रकृतीने किरकोळ असून तो नेहमी काहीना काही आजाराने पछाडलेला असावयाचा. एकदा तो बराच आजारी झाला तेव्हा श्री. रामभाऊंनी श्रीशास्त्रीबुवांना त्याची पत्रिका पाहवयाला दिली. पत्रिकेप्रमाणे मुलाचे ग्रहमान चांगले नव्हते म्हणून दोष निवारणार्थ श्रीशास्त्रीबुवांनी मुलाच्या नावाने सत्पात्र ब्राह्मणाला गोप्रदान करण्यास सांगितले. टेंब्यांच्या कुटुंबातील ब्राह्मणापेक्षा अधिक सत्पात्र ब्राह्मण शोधून सापडणे कठीण असा विचार करून श्री. सवनीसांनीं श्रीवासुदेवशास्त्र्यांचे कनिष्ठ बंधू श्री. सीतारामपंत यांना दक्षिणापूर्वक गाय दान केली. गाय घेऊन श्री. सीतारामपंत घरी येतात न येतात तोच त्यांना सपाटून ताप चढला व तो उत्तरोत्तर वाढत गेला. श्रीवासुदेवशास्त्र्यांचे श्री. सीतारामपंतांवर फार प्रेम होते. बंधूंच्या आजाराची हकीकत कळतांच ते त्वरित त्यांना पाहावयाला गेले.

"भलोवा! सवनीसांकडून तू गोप्रदान घेतलेस ही वाईट गोष्ट

झाली. त्याचा परिणाम म्हणून तुला हा ताप आला आहे. हा भोग तुला भोगलाच पाहिजे." असे ते म्हणाले खरे; पण आपल्या लाडक्या बंधूंच्या वेदना त्यांना पाहवेनात. त्यांनी श्रीदत्तप्रभूंची करुणा भाकली. "ती गाय दुसऱ्या कोणाही ब्राह्मणास दान देऊन टाकल्यावरच ज्वर उतरेल," असे देवांकडून सांगणे झाले. त्याप्रमाणे दुप्पट दक्षिणा देऊन ती गाय दुसऱ्या ब्राह्मणाला दान केल्यावरच श्री. सीतारामपंतांचा ज्वर उतरला. श्री. रामभाऊ सवनीसांचा मुलगा त्यांच्याच कुटुंबात दत्तक गेला होता. श्रीस्वामीमहाराज गरुडेश्वरी असताना तो गुजराथेत मामलेदाराच्या हुद्यावर होता. श्रीस्वामीमहाराजांच्या अखेरच्या दिवसात तो गरुडेश्वरी त्यांच्या जवळ होता. श्रीस्वामीमहाराजांची त्याच्यावर एवढी मर्जी होती की, त्यांनी आपण होऊन एक दिवस त्याला योग सांगितला व काही आसने शिकविली श्रीस्वामीमहाराजांच्या पश्चात गरुडेश्वर संस्थानच्या विश्वस्तांच्या यादीत श्री. सवनीसांच्या या मुलाचे नाव होते.

श्रीवासुदेवशास्त्री आपल्या साधनकाळात जांभाळीची आडाया डोंगरात "सिद्धमहापुरुषांची गुहा" म्हणून प्रसिद्ध असलेल्या एका गुहेत साधना करीत असत. ही गुहा श्रीवासुदेवशास्त्र्यांच्या पुष्कळ पूर्वी सावतवाडी परिसरात प्रसिद्ध असलेल्या एका सिद्ध महापुरुषाने शोधून काढली होती असे म्हणतात. त्याने या गुहेमध्ये भगवान् श्रीदत्तात्रेयांच्या पादुका स्थापन केल्या होत्या. तेथे वसून तो साधना करीत असे. त्यामुळे त्याला सिद्धी प्राप्त झाल्या होत्या. येथे अद्यापही असा समज आहे की, या गुहेत वसून साधना करणाऱ्याचे मनोरथ पूर्ण होतात. जांभळीची आड या डोंगराच्या माथ्यापासून जवळ जवळ मध्यावर ही गुहा आहे. रस्ता अतिशय चढणीचा असल्यामुळे अवघी दहापंधरा मिनिटांची ही विकट चढण चढताना हिमालय

चढून गेल्यासारखे वाटते व धाप लागते. आजसुद्धा येथे मळलेली पायवाट नाहीच. दगडा-धोंड्यांवर पाय ठेवीत, बाजूच्या झुडपांचा आणि बळकट वेलींचा आधार घेत वर चढावे लागते. पायाखालचा एखादा दगड सरकला; तर चढणाऱ्याला गडगडत खाली मूळपदावर जखमी अवस्थेमध्ये पोहोचावे लागेल. या गुहेच्या बाजूला दाट झाडी आहे. अधून मधून माकडांची हूप व रानपाखरांचे कर्कश आवाज तेवढे ऐकू येतात. बाकी येथे अगदी शांतता असते. या प्रांतात शेतजमिनीपासून तो डोंगरमाथ्यापर्यंत ठिकठिकाणी मोठमोठे काळे पाषाण आहेत. अशा दोन शीलाखंडाची ही गुहा बनलेली आहे. एकमेकापासून साधारण पंधरावीस फूट दूर असलेल्या आणि साधारण पन्नास फूट उंच व तीस चाळीस फूट रुंदीच्या भरीव त्रकोणी शंकूच्या आकाराच्या या शिळा आहेत. त्यांचे तळ खाली व टोके वर आकाशात गेली आहेत व तेथेच आकाशात हे दगड कलंडून एकमेकावर टेकले आहेत. त्यामुळे खालच्या बाजूला दोन्ही बाजूंची तोंडे उघडी असलेली अशी ही नैसर्गिक गुहा झाली आहे. साधारण पूर्वेला असलेल्या उघड्या बाजूने गुहेत प्रवेश करावा लागतो. मागील बाजूचे तोंड (उघडा भाग) दगड रचून वर अर्ध्यापर्यंत बंद करण्यात आले आहे. पूर्वी गुहेत साधारण चार फूट उंचीचा मातीचा चौथरा केलेला होता. आता तो सिमेंटने बांधण्यात आलेला आहे. या चौथऱ्यावर भगवान् श्रीदत्तात्रेयांच्या दगडी पादुका आहेत. या पादुकांसमोर बसून श्रीशास्त्रीबुवा साधना करीत असत. ही गुहा दगडांच्या राशीत आणि झाडांझुडपांमध्ये दडलेली आहे. माहीतगाराखेरीज येथे गुहा आहे हे समजून येत नाही. गुहा एवढ्या उंचीवर आहे की, गुहेच्या तोंडाशी उभे राहिल्यास अर्ध्या अधिक माणगाव खोऱ्याचे दर्शन घडते. श्रीस्वामीमहाराजांचे भक्तगण माणगावला आल्यावर या गुहेला भेट दिल्याशिवाय परत जात

नाहीत. सध्या महिन्याच्या दर पौर्णिमेला येथे पूजा व अभिषेक होतो. वर्षातून एकदा श्रीसत्यदत्ताची पूजा होते.

या गुहेसंबंधी श्रीस्वामीमहाराजांच्या एका निष्ठावन्त भक्ताला आलेला अनुभव येथे नमूद करण्यासारखा आहे. हे साधक प. पू. श्रीगुळवणी महाराज यांचे अनुग्रहीत आहेत. काही वर्षांपूर्वीची ही गोष्ट आहे. श्रीस्वामीमहाराजांच्या जन्मस्थानाचे दर्शन घेऊन तेथील पवित्र वातावरणामध्ये काही दिवस राहून साधना करण्यासाठी हे साधक आपल्या कुटुंबीयांसह माणगावला गेले होते. एक दिवस सकाळी सर्वांनी जांभळीची आड या डोंगरावरील सिद्ध महापुरुषाच्या गुहेत बसून काही वेळ साधना करावयाचे ठरविले. वसंतऋतूतील एका प्रसन्न सकाळी सर्वजण अंगातून घामाच्या धारा निथळत असताना डोंगरावर जाऊन पोहोचले. गुहेचे दर्शन घेऊन आजूबाजूला पाहता पाहताच सर्वांच्या वृत्ती अंतर्मुख होऊ लागल्या. काहीजण दाटी दाटीने गुहेमध्ये साधनेला वसले. तीन माणसांनाच साधनेला बसण्याएवढी जागा असल्यामुळे इतर काही जण बाहेरच बसले.

साधनेला बसताच या भाग्यवान् साधकाचे डोळे मिटले व मिटल्या डोळ्यांसमोर त्या गुहेचे रूपांतर एका पन्नासेक हात लांब अशा चौकोनी चांदीच्या सभामंडपामध्ये झाले. चांदीच्या देदीप्यमान खांबावर सभामंडप उभा होता. त्याला सगळीकडे रत्नजडित खांब असून भिंती व कळस नव्हता. सगळीकडे दिव्य प्रकाश भरून राहिला होता. हा प्रकाश नेत्रांना सुखदायक वाटत होता. त्या प्रकाशाची आभा सगळीकडे पसरली होती. या मंडपाच्या मध्यभागी एका मोठ्या रत्नजडित चौथऱ्यावर दगडी पादुका होत्या. त्या सभामंडपाखेरीज तेथे काहीसुद्धा नव्हते. झाडे-झुडपे किंवा कोणी प्राणीही नव्हते. त्या अथांग अवकाशात फक्त हा सभामंडप होता. अकस्मात् त्या साधकाच्या कानी शब्द आले, "या गुहेचे हेच खरे स्वरूप आहे. ही

गुहा चैतन्य स्वरूप आहे. स्थूल किंवा भौतिक नाही. याच रूपामध्ये ही गुहा येथे आहे. या गुहेचा आणि गिरनार पर्वतावरील श्रीदत्त-स्थानाचा साक्षात् संबंध आहे. ती दोन वेगवेगळी स्थाने नाहीतच. दोघांचे चैतन्यमय रूप एकच आहे."

या गुहेमध्ये वसून पुष्कळवेळा श्रीवासुदेवशास्त्री साधना करीत असत. आत्मसाक्षात्काराशिवाय दुसरा कोणता हेतू त्यांच्या मनात असणार? असे वरेच दिवस झाले आणि एक दिवस ध्यान केल्यावर गुहेबाहेर येताच त्यांना समोर एक वाघ वसलेला दिसला. श्रीशास्त्रीबुवा घाबरून गेले व पुन्हा गुहेत जाऊन वसले. मग पुष्कळ वेळाने वाघ निघून गेल्याची खात्री झाल्यावर ते वाहेर आले व घरी गेले. यानन्तर " पुन्हा गुहेत जाऊन साधना करू नकोस " असा देवांनी त्यांना आदेश दिल्यावर त्यांचे गुहेत जाणे बंद झाले.

काम पडल्यास केव्हाही रात्री अपरात्री श्रीवासुदेवशास्त्री बाजूच्या गावामध्ये जात असत. भीती त्यांना ठाऊक नव्हती. एक दिवस मोठी गम्मत झाली. संध्याकाळ टळून रात्रीचा समय झाला होता. अशा वेळी काही तातडीच्या कामानिमित्त त्यांना शेजारच्या गावी जावे लागले. वाट डोंगरातून जात होती. अर्ध्या वाटेवर रस्त्यामध्ये एक मोठा वाघ वसलेला श्रीशास्त्रीबुवांच्या दृष्टीस पडला. वाघाला पाहून ते थांवले व त्याच्याकडे पाहात उभे राहिले. वाघ काही केल्या रस्त्यातून वाजूला होईना. त्यामुळे श्रीशास्त्रीबुवांना पुढे जाता येईना. एवढ्यात वाघाची दृष्टी श्रीशास्त्रीबुवांवर पडली आणि त्याने आपली शेपटी जमिनीवर आपटून डरकाळ्या फोडण्यास सुरुवात केली. ज्या श्रीवासुदेवशास्त्र्यांना भीती कधी ठाऊक नव्हती त्यांची यावेळी भीतीने गाळण उडाली. धावतच त्यांनी जवळचे एक झाड गाठले व त्यावर ते झरझर चढून गेले. त्यांचे नशीव थोर की, ते झाड वरेच उंच होते. एका आडव्या फांदीचा आश्रय घेऊन ते

झाडावर वसले व तेथून मदतीसाठी मोठमोठ्याने ओरडू लागले. त्याचवेळी श्री. आत्माराम जड्ये नावाचे एक धाडसी ब्राह्मण जवळून जात होते. त्यांनी श्रीवासुदेवशास्त्र्यांचे ओरडणे ऐकले व धावत येऊन वाघाला पिटाळून लावले. श्रीवासुदेवशास्त्र्यांना झाडावरून उतरून घेऊन श्री. जड्यांनी त्यांना घरी पोहोचविले. यावेळी श्रीवासुदेवशास्त्री एवढे घावरले होते की, भीतीमुळे त्यांना भरलेले कापरेही काही केल्या थांबेना. शेवटी वाघरें काढल्यांवर त्यांचे कापरे बंद झाले. या गोष्टीतला वाघोबा खरोखरीचा वाघ नव्हता. श्रीवासुदेवशास्त्र्यांना एक दिवस दृष्टांत देऊन देवांनी असे सांगितले की, "आपण स्वतःच वाघाचे रूप घेऊन, तुम्ही रात्री अपरात्री रानातून हिंडता म्हणून, तुम्हाला भीती दाखविली." श्रीवासुदेवशास्त्री रात्रीअपरात्री बाहेर जात ते बंद व्हावे म्हणून देवांना हा व्याघ्रावतार घ्यावा लागला होता.

अशीच एक स्वतःच्या पूर्वायुष्यातील वाघासंबंधीची गोष्ट प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामीमहाराजांनी कातरखेडा येथे आपल्या भक्तांना सांगितली होती. त्यावरून पुढे श्रीस्वामीमहाराजांची वृत्ती पूर्ण निर्भय झाली होती आणि त्यांच्या हृदयामध्ये अखिल प्राणिमात्रांबद्दल प्रेमभावना निर्माण झाली होती असे दिसून येते. माणसाच्या हृदयात सर्व प्राण्यांबद्दल प्रेम, अनुकंपा आणि निर्वैर वृत्ती उत्पन्न झाली म्हणजे हिंस्र श्वापदे देखील त्याच्याशी निर्वैर भावनेने वागतात या गोष्टीची सत्यता श्रीस्वामीमहाराजांचे उदाहरण पाहिले की पटते. श्रीस्वामीमहाराजांनी सांगितलेली ही हकिगत त्यांचे एक भक्त श्री. गंगाधरपंत वैद्य यांनी लिहून ठेवलेल्या आठवणींमध्ये आहे. त्यावेळी कातरखेडा येथे श्रीस्वामीमहाराजांसमोर बरीच मंडळी बसली होती. त्यात श्री. गंगाधरपंत वैद्यही होते. श्रीस्वामीमहाराज केव्हा केव्हा विनोद करीत असत. एखादी गोष्ट

सांगताना गोष्टीतील व्यक्तीची किंवा प्राण्याची नक्कल करून लोकांना हसविणे त्यांना फार आवडत असे. श्रीस्वामीमहाराजांनी असे सांगितले की, "एक दिवस आम्ही दहावाराजण माणगावहून नरसोवाच्या वाडीला जात होतो. उन्हाळ्याचे दिवस होते. ती शुद्ध पक्षातील रात्र होती. आम्ही बोलत बोलत चाललो होतो. एवढ्यात समोर वाटेवर एक मोठा वाघ जीभ वाहेर काढून वसलेला दिसला." (या ठिकाणी श्रीस्वामीमहाराज चतुष्पादासारखे गुडघे व हात जमिनीवर टेकून वसले. तळहात गुडघ्याशेजारी टेकून, जीभ बाहेर काढून त्यांनी वाघाचे सोंग अगदी हुबेहूब वठविले. खेचरी मुद्रेसाठी त्यांचे जिव्हाशिरच्छेदन (जीभेच्या खालील जोडणाऱ्या शिरेचे छेदन) झालेले असल्यामुळे त्यांची जीभ मुखावाहेर वरीच लांब येत असे.) वाघाच्या समोरून जाण्याची कोणाला छाती होईना. वाघ अशा तऱ्हेने रस्त्यावर वसला होता की, त्याच्या पुढे व पाठीमागे दोनदोन फुटांचा रस्ता मोकळा होता. पाठीमागच्या बाजूला त्याचे पुच्छ जमिनीवर हलत होते कोणाही प्राण्याला त्याचा हिंस्र स्वभाव टाकून द्यावयाला लावण्यासाठी आपल्या मनात त्याच्या विषयी प्रेम व निर्वैर वृत्ती वाळगणे हाच उत्तम उपाय आहे. हा उपाय करून मी त्या वाघासमोर त्याच्या नजरेला नजर भिडवून उभा राहिलो व एका एका माणसाला हाताने खुणावून वाघोवाच्या शेपटीकडील वाजूने रस्ता पार करावयाला सांगितले. सर्वजण पार झाल्यावर मी त्याच रस्त्याने पुढे निघून गेलो. एवढे होईपर्यंत वाघ तेथेच वसून होता. त्याने आम्हाला आडवावयाचा थोडा सुद्धा प्रयत्न केला नाही."

असो, पुन्हा एकदा माणगाव. आपणाला प्राप्त झालेल्या शक्तीचा वापर श्रीवासुदेवशास्त्री परोपकारासाठी व परहितासाठीच करीत. स्वत:साठी या शक्तीचा वापर त्यांनी कधीही केला नाही. माणगावच्या एका गृहस्थाची संतती जगत नसे. त्याने सर्व दैवी उपाय

करून पाहिले; पण काही उपयोग झाला नाही. शेवटी तो माणूस श्रीवासुदेवशास्त्र्यांकडे आला. त्याला पिशाच्चदोष होता ही गोष्ट श्रीशास्त्रीबुवांच्या ताबडतोब लक्षात आली. त्यांनी त्या गृहस्थाला पिशाच्चाच्याच पादुका करून पूजेत ठेवण्यास सांगितले. या उपायाने त्याची संतती जगू लागली. पुढे या गृहस्थाचा एक मुलगा फार अशक्त निपजला. मुलाच्या आजीने नातवाला चांगले आयुरारोग्य लाभावे म्हणून त्याला श्रीवासुदेवशास्त्र्यांच्या पायावर घालून त्यांची प्रार्थना केली. श्रीशास्त्रीबुवा म्हणाले, "आजीबाई ! तुमच्या जिवात जीव असेपर्यंत याला भीती नाही. तुम्ही चिंता करू नका." पण कांही दिवसांनी तो मुलगा वराच आजारी पडल्यामुळे म्हातारीचा जीव घावरा झाला. तिने ही गोष्ट श्रीवासुदेवशास्त्र्यांच्या कानावर घालून मुलाला पाहून जाण्याची त्यांना विनंती केली. श्रीवासुदेव-शास्त्र्यांनी पाहिले की, मुलगा खरोखरीच निपचीत पडला आहे. त्यांनी थोडे पाणी अभिमंत्रित करून भगवान् श्रीदत्तात्रेयांचे स्मरण करून, मुलाच्या अंगावर शिंपडले. मुलगा सावध झाला व त्याने डोळे उघडून पाहिले. त्यानंतर त्या मुलाची प्रकृती सुधारत गेली.

श्रीवासुदेवशास्त्र्यांना योगाभ्यासाची लहानपणापासून फार आवड होती. हठयोगाची साधना करून निर्विकल्प समाधीचा लाभ करून घ्यावा अशी त्यांची तीव्र इच्छा होती. त्यासाठी योग जाण-णारा कोणी भेटल्यास त्याच्याकडून योगाभ्यास शिकण्यास ते उत्सुक असत. त्या दिवसांमध्ये उत्तरेकडून साधुबैरागी, कानफाटे वगैरे लोक समुद्र किनाऱ्याने दक्षिणेची यात्रा करीत. अशांपैकी कोणी मंडळी माणगावच्या आसपास सावंतवाडीस किंवा जवळपासच्या ठिकाणी आल्याचे कळल्यास श्रीवासुदेवशास्त्री त्यांच्या भेटीला जात व त्यांच्या गरजेच्या काही वस्तू त्यांना पुरवून त्यांची सेवा

करीत. त्यांच्यामध्ये एखादा योगाभ्यास करणारा साधू आढळल्यास ते त्याच्याकडून योग शिकून घेत. या बाबतीमध्ये त्यांची पुष्कळदा निराशाही होत असे.

श्रीस्वामीमहाराजांचे सच्छिष्य प. पू. श्रीगुळवणीमहाराज यांच्या तोंडून एकलेली व त्यांना श्रीस्वामीमहाराजांनी स्वतः सांगितलेली आपल्या पूर्वायुष्यातील एक हकीकत येथे नमूद करण्यासारखी आहे. माणगावला एक साधू आला होता. तो यक्षिणीच्या देवळात समाधी लावून बसे. आपणास समाधी लावण्यास शिकवावे अशी श्रीशास्त्रीबुवांनी त्याला विनंती केली. त्यावर तो साधू म्हणाला, " अरे ! तू नेहमी योगाभ्यास करतोस ना ? ठीक, आता तू विडी ओढावयाला सुरुवात कर. विडी ओढल्यावर समाधी लवकर लागते. " श्रीशास्त्रीबुवांनी विड्यांचे एक बंडल विकत आणले व एकामागून एक सर्व विड्या फुंकून टाकल्या व ते ध्यानाला बसले. त्यांना वाटले आता आपणाला लवकर समाधी लागेल. पण कुठले काय ? समाधी तर नाहीच, उलट त्या दिवशी ध्यानही बरोबर जमेना ; शिवाय विड्या ओढल्यामुळे त्यांना फार त्रासही झाला.

साधुबैराग्यांपासून योग शिकण्याच्या बाबतीत पुष्कळदा त्यांची अशा प्रकारे निराशाच होत असे. एकदा एका बैराग्याने श्रीवासुदेवशास्त्र्यांना ध्यानाला बसण्यापूर्वी गांजा ओढीत जा म्हणून सांगितले. गांजा ओढणारे लोक प्रथम गांजा पाण्यात भिजवून डाव्या तळहातावर मळतात. नंतर उजव्या हाताच्या अंगठ्याने दाबून त्याची कोरडी गोळी बनवितात व ती गोळी थोड्या तंबाखू बरोबर चिलमीत भरून, चिलमीभोवती ओली छापी गुंडाळून, चिलमीवर निखारा ठेऊन झुरका मारतात. या सर्व विधीचे श्रीवासुदेवशास्त्र्यांनी सूक्ष्म निरीक्षण केल्यावर तशा तऱ्हेने गांजा भरून त्यांनी चिलमीचा झुरका मारला. यापूर्वी कधी गांजा ओढला नसल्यामुळे त्यांना

ठसका लागला व डोळ्यातून पाणी येऊ लागले; पण योग शिकण्यासाठी हे दिव्य केलेच पाहिजे, असे म्हणून तो सर्व गांजा ओढून संपवून ते ध्यानाला वसले. रोज ध्यानामध्ये चित्ताचे स्थैर्य लवकर होत असे; पण त्या दिवशी गांजा ओढल्यामुळे चित्ताचे स्थैर्य होईना. दुसऱ्या दिवशीसुद्धा त्यांनी हा प्रयोग केला; पण त्या दिवशीही चित्ताची चंचलता वाढली व आसनावर बसल्यानंतर थोड्या वेळाने त्यांच्या नाकातून रक्त पडू लागले. त्या दिवशी श्रीवासुदेवशास्त्र्यांना कळून चुकले की, गांजा ओढल्याने ध्यान लागत नाही. त्या रात्री देवाजवळ आपल्या अपराधाची क्षमा मागून त्यांनी रात्री बराच वेळ भजन केले देवांनी रात्री त्यांना स्वप्नात असे सांगितले की, "पुनश्च गांजा ओढू नकोस. ध्यानाला बसण्यापूर्वी दोन तोळे तूप सेवन करून ध्यानाला बसत जा." देवांच्या या आज्ञेप्रमाणे वागल्यावर त्यांच्या नाकातून रक्त पडणे बंद झाले व चित्ताची चंचलताही कमी झाली.

त्यानंतर मात्र श्रीवासुदेवशास्त्र्यांनी साधनेसाठी पुन्हा कधीही मादक पदार्थांचे सेवन केले नाही. उत्तर आयुष्यात, संन्यासाश्रमात असतानाची, त्यांची एक आठवण श्री. गंगाधरपंत वैद्यांनी लिहून ठेवली आहे. श्रीस्वामीमहाराज सावनेर गावी होते. ते उन्हाळ्याचे दिवस होते. सावनेरला फार कडक उन्हाळा असतो. अशा कडक उन्हाळ्यामध्ये थंडाई घेण्याची तेथील लोकांना सवय होती. एक दिवस वेदशास्त्रसंपन्न श्री. गणपतीबुवा थंडाईचा एक पेला श्रीस्वामी महाराजांपुढे ठेऊन असे म्हणाले की," थंडाई आहे." थंडाई म्हणजे भांग हे श्रीस्वामीमहाराजांना ठाऊक होते; म्हणून श्री. गणपतीबुवांच्या बोलण्याकडे लक्ष न देता ते आपल्या कामात मग्न राहिले. श्री. गणपतीबुवांनी तीन वेळा महाराजांचे लक्ष त्या थंडाईच्या पेल्याकडे वेधण्याचा प्रयत्न केला. शेवटी श्रीस्वामीमहाराज त्यांना असे म्हणाले की. "तुमच्याकडे प्रायश्चित्ताचे पुस्तक असल्यास

घेऊन या." त्यांनी ते पुस्तक आणल्यावर मादक पदार्थ सेवन केल्यास कोणते प्रायश्चित घ्यावे लागते हा विषय काढून तो मजकूर श्रीस्वामीमहाराजांनी श्री. गणपतीबुवांना वाचावयाला सांगितला. श्रीस्वामीमहाराजांनी हा विषय काढण्यास का सांगितले ते गणपती-बुवांच्या ध्यानात आले नसावे. त्यांनी पुनश्च श्रीमहाराजांना थंडाई घेण्याचा आग्रह केला. तेव्हा श्रीमहाराज कठोर स्वरात म्हणाले, "मी भांगेचे सेवन करणार नाही. धर्माविरुद्ध वागल्याने दोष लागतो. मोठ्यांचे आचरण पाहून अज्ञानी लोक त्याप्रमाणे वागण्यास प्रवृत्त होतात. हा भांगेचा पेला घेऊन परत जा," अशा रीतीने घडणाऱ्या काही प्रसंगांमुळे श्रीवासुदेवशास्त्री सकृद्दर्शनी गंभीर व कठोर दिसत; पण त्यांच्याशी ज्यांचा संबंध आला त्या सर्वांनी असे म्हटले आहे की, त्यांचा स्वभाव काहीसा विनोदी होता व ते अंतः-करणाचे फार प्रेमळ होते. आपल्या पूर्वायुष्यात कठोर परिस्थितीशी झगडत; गंभीर प्रसंगाना तोंड देत त्यांना जीवन जगावे लागले. त्यांचे वैवाहिक जीवनही सुखी नव्हते. घरात दररोज सासूसुनेची भांडणे होत; त्यामुळे श्रीवासुदेवशास्त्र्यांची मनस्थिती बिघडून जाई. याचा परिणाम मुळातच गंभीर स्वभावाच्या श्रीवासुदेवशास्त्र्यांचा चेहरा अधिकच गंभीर व काहीसा कठोर दिसण्यात झाला होता; पण अंतर्यामी ते विनोदी व कोमल वृत्तीचे होते.

श्रीशास्त्रीबुवा फार हुन्नरी होते. त्यांचे श्रीशास्त्रीमहाराज हे नांव सार्थ होते; कारण ते सर्व शास्त्रांमध्ये प्रवीण होते. तसेच ते सर्व प्रकारची बारीक सारीक कामे करण्यामध्ये हुशार होते. पत्रावळी लावणे, भाज्या चिरणे असली सामान्य कामेसुद्धा ते चांगल्या तऱ्हेने करीत. प. पू. श्रीगुळवणीमहाराज सांगत की, ते श्रीस्वामीमहाराजां-बरोबर श्रीक्षेत्रनरसोबावाडीला असताना एकदा श्रीमहाराजांनी त्यांना पत्रावळी लावण्यास शिकविले व त्यांच्याकडून पत्रावळी

लावून घेतल्या. श्री. गंगाधरपंत वैद्यांनी असे लिहून ठेवले आहे की, श्रीस्वामीमहाराजांना सूत काढणे, पत्रावळी लावणे, गोफ करणे, वस्त्र बनविणे अशा पुष्कळ कला अवगत होत्या. एवढेच नव्हे; तर ते जेवढे काम स्वतः करीत त्याच्या एक अष्टमांश काम इतरांकडून होत नसे. श्रीस्वामीमहाराजांना बुद्धिबळे, गंजिफा इत्यादी खेळांचीही चांगली माहिती होती; पण त्यांनी आपला वेळ या खेळात कधीही खर्च केला नाही. तरीसुद्धा दूर राहून दुसऱ्यांना ते डाव समजावून देत असत. त्यामुळे त्या माणसाला डावात हमखास यश येई. श्रीशास्त्रीमहाराज संबंध दिवस उद्योगरत असत. आळस त्यांना ठाऊक नव्हता. पहाटे चार वाजण्यापूर्वीपासून रात्री बारावाजेपर्यंत, कधीकधी त्याहूनही उशीरापर्यंत, ते अव्याहत उद्योगरत असत. त्यांच्या बरोबर राहण्याचे भाग्य ज्यांना लाभले त्या सर्वांनीं त्यांचा हा दिनक्रम पाहिलेला होता.

श्रीस्वामीमहाराजांच्या सूक्ष्म निरीक्षणाची आणि अचूक गणिती ज्ञानाची एक गोष्ट श्री. गंगाधरपंत वैद्य यांनी लिहून ठेवली आहे. पूर्वायुष्यात माणगावला असताना त्यांना जमिनीची मोजणी करण्याचे काम शिकावेसे वाटले.त्याप्रमाणे मोजणी करणाऱ्या एका कारकुनाला त्यांनी आपणास ही विद्या शिकविण्याची विनंती केली. हा कारकून स्वार्थी व आतल्या गाठीचा होता. त्याने श्रीशास्त्रीबुवांना मोजणीचे काम शिकविण्याचे कबूल केले. एक दिवस तो श्रीशास्त्रीबुवांना घेऊन जंगलामध्ये मोजणी करावयाला गेला. त्याने शंकू वगैरे साहित्याचा वापर करून मोजणीच्या कामाला सुरुवात केली. श्रीशास्त्रीबुवा बारकाईने त्याची प्रत्येक कृती पाहात होते. या कामासंबंधी एखादा प्रश्न विचारल्यास तो उत्तर द्यावयाची टाळाटाळ करीत होता. "समजेल हळूहळू. हे काम फार कठीण आहे. उच्च गणित जाणणारालाच ते कळेल." वगैरे उत्तरे देऊन तो पुढील

कामाला लागे. मोजणीचे सर्व काम संपल्यावर आपल्या वहीमध्ये नकाशा, मापे वगैरे लिहून तो घरी परतला.

श्रीशास्त्रीबुवांनी ओळखले की, या माणसाला मनातून आपणास काहीसुद्धा शिकवावयाचे नाही. त्यांचे स्वतःचे गणिताचे ज्ञान उत्तम होते ब्रह्मसिद्धांतापर्यंत त्यांना गणिताची माहिती होती कारकुनाने घेतलेली मापे व नकाशा या गोष्टी त्यांनी नीट ध्यानात ठेवल्या होत्या. त्यामुळे घरी आल्यावर त्यांनी स्मरणानेच गणित करून, त्या जागेची मोजणी स्वतः तयार करून ठेवली. मोजणीदाराने जेवण उरकून विश्रांती झाल्यावर श्रीशास्त्रीबुवांना हाक मारून लिहून आणलेल्या मापांप्रमाणे गुणाकार करण्यास सुरुवात केली. सर्व गणित करण्यास त्याला बराच वेळ लागला. त्यावेळी तो श्रीशास्त्रीबुवांना म्हणाला, "पाहिलेत भटजी, किती कठीण काम आहे ते!" श्रीशास्त्रीबुवा म्हणाले, "हे सर्व गणित मी अगोदरच करून ठेवले आहे." मोजणीदाराचा यावर विश्वास बसेना. मोजणीचे काम न शिकलेल्या माणसाला हे सर्व गणित अचूक करता येईल हे त्याला पटेना. त्याने श्रीवासुदेवशास्त्र्यांनी केलेले गणित पाहिले. ते अगदी अचूक होते. गणित करण्याची ती पद्धत आपणास शिकवा असे त्याने श्रीशास्त्रीबुवांना सांगितले. त्यावर श्रीशास्त्रीबुवा म्हणाले, "कोणतीही विद्या दुसऱ्याला शिकविल्याने ती सत्कार्यी लागते. दुसऱ्याला विद्या शिकविण्याएवढे दुसरे श्रेष्ठ काम नाही. जो आपली विद्या दुसऱ्याला शिकवीत नाही त्याची विद्या वायफळ जाते व तिचा कधी प्रसारही होत नाही. तुम्ही स्वतःची विद्या दुसऱ्याला शिकविण्यास तयार नाही. तुम्हाला आणखी विद्या शिकवून काय उपयोग ?"

श्रीवासुदेवशास्त्र्यांनी केलेल्या योगसाधनेचा परिपाक त्यांना अल्प वयातच योगसिद्धी प्राप्त होण्यात झाला होता. परकाया प्रवेश करण्याची सिद्धी त्यांना माणगावमध्येच प्राप्त झाली होती असे

श्री. गंगाधरपंत वैद्य यांनी लिहून ठेवले आहे. स्वतःचे सामर्थ्य श्रीवासुदेवशास्त्री कोणाला दाखवीत नसत. एका विशिष्ट आसनावर बसून एका विशिष्ट मंत्राचा जप केला की, परकाया प्रवेश करता येत असे. एकदा त्यांनी हा प्रयोग केल्यावर त्याच रात्री भगवान् श्रीदत्तात्रेयांनी त्यांना स्वप्नात असे सांगितले की, "तुला बाजार भरवावयचा आहे काय ?" त्या दिवसापासून श्रीवासुदेवशास्त्र्यांनी परकाया प्रवेशाचा प्रयोग कधीही केला नाही व इतरही योगसिद्धींचा वापर केला नाही.

श्रीवासुदेवशास्त्र्यांच्या मनात श्रीक्षेत्रनृसिंहवाडी—नरसोबावाडी येथे जाण्याचे बरेच दिवसांपासून होते; पण तसा योग काही अजून आला नव्हता. नरसोबाच्या वाडीची महती श्रीशीस्त्रीबुवा लहान-पणापासून ऐकत होते. श्रीगुरुचरित्रामध्ये या क्षेत्राचा महिमा वर्णन केलेला ते नेहमी वाचीत होते. याच ठिकाणी दत्तावतार प. प. श्रीनृसिंहसरस्वतीस्वामीमहाराजांनी बारा वर्षे तप केले. श्रीनृसिंह-सरस्वतीस्वामीमहाराजांनी या क्षेत्रात केलेल्या लीला वाचून त्या पवित्र स्थानाला भेट द्यावी, कृष्णापंचगंगेच्या पावन संगमामध्ये स्नान करावे, पंचगंगेच्या ज्या घाटावर भक्तश्रेष्ठ प प. श्रीनारायण-स्वामीमहाराजांना श्रीनृसिंहसरस्वतीस्वामीमहाराजांनी दंड दिला त्या घाटावर जाऊन आपल्या अंतःकरणातील सर्व क्लेश धुऊन काढावे, महाराजांच्या ध्वज, कमळ आणि वज्रांकुशयुक्त मनोहर पादुकांचे दर्शन घ्यावे, चतुःषष्टीयोगिनीतीर्थ पाहावे, श्रीगुरुचरित्रां-तील कथेत वर्णन केलेला तो प्रसिद्ध घेवड्याचा वेल औरवाड गावा-तील ज्या ब्राह्मणाच्या घरासमोरील अंगणात तोडून टाकला, तेथील पवित्र धूळ मस्तकी धारण करावी व तेथील अमरेश्वराचे दर्शन घ्यावे असे श्रीवासुदेवशास्त्र्यांना नेहमी वाटत असे.

श्रीनारायणस्वामींची कथा त्यांना लहानपणी दुर्गा मावशीकडून

कळलेली होती. श्रीनारायणस्वामींची समाधी नरसोबावाडीला आहे व तेथे प्रतिवर्षी चैत्रमहिन्यात त्यांची पुण्यतिथी साजरी होते, हे त्यांना ज्ञात होते. श्रीनारायणस्वामीच्या पुण्यतिथीला हजर राहावे असे त्यांना तीव्रतेने वाटत असे. श्रीनारायणस्वामींची भक्ती व तपश्चर्या यांबद्दल श्रीवासुदेवशास्त्र्यांना फार आदर वाटत असे. काय ती श्रीनारायणस्वामींची भक्ती ! भगवान् भक्तीचा भुकेला हेच खरे! जनाबाईबरोवर दळणकांडण करणारा भक्तवत्सल भगवान् आपल्या ब्रीदाला नेहमी जागतो म्हणून तर त्याने एकदा श्रीनारायण-स्वामी समाधीत मग्न असताना त्यांच्या लहान मुलींना शौचाला नेऊन त्यांना धुतलेही. अशीच भक्ती करून आपणही भगवान् श्रीदत्तात्रेयांच्या कृपेला पात्र व्हावे; मग ते भक्तवत्सल भक्ताभिमानी भगवान् श्रीदत्तात्रेय आपल्याही भक्तीला पावतील आणि आपण भक्तीच्या डोहात सदा डुंबत राहू असे त्यांना नेहमी वाटत असे; पण आतापर्यंत ही त्यांची मनोराज्येच राहिली होती. श्रीक्षेत्र नरसो-बाच्या वाडीला जाण्याचा योग त्यांना अद्याप आला नव्हता. श्रीवासुदेवशास्त्री आपल्या आईच्या संमती वाचून कोणतीच गोष्ट करीत नसत. आपणास नरसोबाच्या वाडीला जाण्यासाठी आईची संमती मिळेल याबद्दल श्रीवासुदेवशास्त्र्यांना खात्री नव्हती; कारण घरांत सासूसुनेच्या भांडणामुळे एक प्रकारे गंभीर आणि स्फोटक वातावरण निर्माण झाले होते. श्रीवासुदेवशास्त्री आपल्या बायकोची बाजू घेतात असा त्यांच्या आईने गैरसमज करून घेतला होता. अशा परिस्थितीमध्ये श्रीक्षेत्र नरसोबाच्या वाडीच्या यात्रेला जाण्यासाठी आईला विचारावयाला जाऊन तिचा क्षोभ ओढवून घ्यावयाची श्रीवासुदेवशास्त्र्यांना इच्छा नव्हती.

श्रीनारायणस्वामीच्या उत्सावाच्या दिवस जवळ येत होता. या उत्सवाला हजर राहता आल्यास किती चांगले होईल हा विचार

श्रीवासुदेवशास्त्र्यांच्या मनात सारखा घोळत होता. श्रीशास्त्रीबुवांच्या आयुष्यातील सर्व घटना श्रीदत्तप्रभूंनी आगाऊ आखून ठेवलेल्या होत्या. त्यामुळे योग्य वेळी योग्य घटना आपोआप घडून येत असत. त्या रात्री श्रीवासुदेवशास्त्री रामरक्षा म्हणत झोपी गेले. रात्रीच्या शेष प्रहराला त्यांना एक स्वप्न पडले. स्वप्नात कृष्णा नदीचा पवित्र प्रवाह दिसत होता. काठावर औदुंबराच्या आणि कडुनिंबाच्या दाट पर्णराजीमधून दिसणारे श्रीपादुका मंदिर होते. हजारो भाविक पादुकांना प्रदक्षिणा घालीत आहेत आणि आपण मात्र एका बाजूला उभे राहून ते दृश्य अनिमेष नेत्रांनी पाहत आहोत असे त्यांना दिसले. यात्रेकरूंच्या आनंदात आपण सहभागी होऊ शकत नाही, या गोष्टीचा असंतोष त्यांना आपल्या चेहऱ्यावर दिसत होता. तेवढ्यात त्या गर्दीतून वाट काढीत शुभ्र वस्त्रे परिधान केलेला एक तेजस्वी ब्राह्मण त्यांच्या जवळ येऊन त्यांना असे म्हणाला की, "का हो शास्त्रीबुवा ! या लोकांबरोबर तुम्ही प्रदक्षिणा का घालीत नाही ? असे एकटे बाजूला का उभे राहिलात ? तुम्हाला नरसोबाच्या वाडीला जावे असे वाटते; तर तिकडे जात का नाही ?

"काय करावे ? मला वाडीला जाण्यासाठी आईची परवानगी मिळत नाही. आईच्या अनुमतीशिवाय मी काही करीत नाही." असे श्रीवासुदेवशास्त्र्यांनी स्वप्नातच उत्तर दिले.

"आईने तुम्हाला वाडीला जाऊ नको असे सांगितले का ?" ब्राह्मणाने त्यांना पुन्हा विचारले.

"नाही, तसे नाही. पण आईला विचारावयाचे धैर्य मला होत नाही. यावेळी ती मला अनुमती देईल असे वाटत नाही."

"आईचा नकार तुम्ही गृहीत धरून का चालता ? उद्याच

आईला विचारा. मला खात्री आहे की, ती तुम्हाला नरसोबाच्या-वाडीला जावयाला अनुमती देईल." एवढेच नव्हे; तर तुम्हाला सोबत मिळून तुमच्या खर्चाचीही सर्व सोय होईल.

एवढ्यात श्रीवासुदेवशास्त्र्यांची निद्रा भंग पावली. ते दत्तनामाचे भजन करीत अंथरुणावर बसले. सकाळी प्रातर्विधी उरकून आपले आन्हिक संपल्यावर ते आईला असे म्हणाले की, "लवकरच नरसोबाच्या वाडीमध्ये श्रीनारायणस्वामींच्या पुण्यतिथीचा उत्सव होणार आहे. त्या उत्सवाला हजर राहावे असे म्हणतो." असे म्हणून रात्री पडलेले स्वप्न त्यांनी तिला सांगितले."

नरसोबाच्या वाडीला जावयाची इच्छा असल्यास जा बापडा, माझी काही आडकाठी नाही; पण हे घराचे काम हाती घेतले आहेस त्याची व्यवस्था कोणावर तरी नीट सोपवून जा म्हणजे झाले."

कोणत्याही प्रकारची कुरबुर न करता आईने त्यांना नरसोबाच्या वाडीला जावयाला अनुमती दिली. या गोष्टीचे श्रीवासुदेवशास्त्र्यांना आश्चर्यच वाटले. रात्री पडलेल्या स्वप्नाच्या खरेपणाबद्दल त्यांची खात्री पटली. आपण नरसोबाच्या वाडीला जावे अशी ईश्वराचीच इच्छा दिसते असे त्यांना वाटले.

जसजसे दिवस जात होते तसतशी श्रीशास्त्रीबुवांची खात्री पटत चालली होती की, कोणती तरी अदृश्य शक्ती कळसूत्री बाहुलीप्रमाणे आपणास नाचवीत आहे. आपल्या मनाप्रमाणे वागण्याचा आपण कितीही प्रयत्न केला; तरी कोणतीही गोष्ट आपल्या इच्छेप्रमाणे घडून येत नाही. आपल्या देहाकडून जे व्यवहार घडून येतात ते कोणीतरी मुद्दाम घडवून आणीत आहे असे त्यांना आढळून आले. हळूहळू श्रीवासुदेवशास्त्र्यांची अशी खात्री पटत चालली की, आपल्या आजोबांपासून ज्या भगवान् श्रीदत्तात्रेयांची भक्ती आपल्या कुटुंबात चालत आलेली आहे तेच भक्तकामकल्पद्रुम भगवान् श्रीदत्तात्रेय

आपल्या जीविताची सर्व सूत्रे स्वतः चालवीत आहेत. श्रीवासुदेव-शास्त्र्यांच्या पुढील आयुष्याकडे पाहिल्यावर ही गोष्ट स्पष्ट होते की, श्रीस्वामीमहाराज अवतारी पुरुष होते. आपण कोण आहोत याची जाणीव त्यांना होत असावी. मानवदेह धारण केल्यावर त्या देहाला अनुरूप अशी बंधने व मर्यादा आपोआप येतातच! देहधारी जीवासमोर मायेचा एक कमी अधिक प्रमाणात विरळ असा पडदा असतो.अवतारी महात्म्यांच्या बाबतीमध्ये हा पडदा हळूहळू अधिकाधिक विरळ होत जातो. अधूनमधून तो पूर्णपणे बाजूला झाल्यासारखा भासतो. अशावेळी त्या अवतारी पुरुषांमधील अलौकिकत्वाची प्रचीती आम्हाला येते. असे नसते; तर श्रीस्वामीमहाराजांनी ज्यावेळी काही गोष्टी श्रीदत्तप्रभूंच्या आज्ञेविरुद्ध केल्या त्यावेळी-त्यांचे फळही शिक्षारूपाने त्यांना भोगावे लागले. याचा अर्थ असा की, ज्या ज्या वेळी मायेने निर्माण केलेला हा पडदा जाड होता त्या त्या वेळी श्रीस्वामीमहाराजांनी मानवदेह सुलभ काही गोष्टी करण्याचा प्रयत्न केला व ईश्वरी इच्छेपुढे सर्वस्वी शरणागती पत्करली नाही, असे दिसून येते.

श्रीक्षेत्र नरसोबाच्या वाडीला जावयाला निघण्यापूर्वी श्रीशास्त्रीबुवांनी घर बांधावयाला घेतले होते. वडिलार्जित घर त्यांच्या आजोबानी बांधलेले होते व ते आतां अगदी मोडकळीला आले होते. त्या घराची दुरुस्ती करावी, की त्याच चौथऱ्यावर नवीन घर बांधावे याचा विचार श्रीवासुदेवशास्त्री करीत होते. त्यावेळी श्रीशास्त्रीबुवांचे एक स्नेही श्री. पोतनीस यांनी नवीन घर बांधण्याचा सल्ला दिला व घराला लागणारे लाकूड सामान देऊन प्रत्यक्ष खर्चासाठी पैशांची मदतही केली. जुने घर पाडून त्याच्या चौथऱ्यावर नवीन घर बांधावयाला सुरुवात झाली. त्यामुळे घरबांधणीची नीट व्यवस्था करून मगच श्रीक्षेत्र नरसोबाच्या वाडीला जावयाला आईचे

श्रीवासुदेवशास्त्र्यांना अनुमती दिली. त्यामुळे घरच्या बांधकामाची जबाबदारी श्री. रामभाऊ सबनीसांवर सोपवून श्रीशास्त्रीबुवा नरसोबाच्या वाडीला जावयाची तयारी करू लागले. हे नवे घर गडबडीमध्ये अवघ्या दोन महिन्यात बांधण्यात आले. तांबड्या चिकणमातीच्या भिंती व छप्पर शाकारण्यासाठी माडाची झापे वापरण्यात आली होती. गडबडीमध्ये घराचा पायाही नीट झाला नव्हता व भिंतींची मातीसुद्धा पक्की तयार झाली नव्हती. त्यामुळे ते घर पुढे३०–४०वर्षांनी पडून गेले. आता त्या जागेवर स्वामीभक्त राणी इंदिराबाई होळकर यांनी छानदार, दुमजली, चिरेबंदी घर बांधले आहे. असो. श्रीवासुदेवशास्त्री श्रीक्षेत्र नरसोबाच्या वाडीला जावयाला निघण्यापूर्वी घरबांधणीच्या कामावरील देखरेखीचा प्रश्न सुटला. अशाच एकेक अडचणी आपोआप दूर होत गेल्या. श्रीशास्त्रीबुवा श्रीक्षेत्र नरसोबाच्या वाडीला जाणार हे कळल्यावर त्यांचे एक शेजारी त्यांच्या बरोबर वाडीला जावयाला निघाले. त्यांना श्रीक्षेत्र नरसोबाच्या वाडीला जाण्याचा रस्ता माहीत होता. श्रीशास्त्रीबुवांनी मागे श्री. रामभाऊ सबनीसांच्या मुलाची पत्रिका बनविली होती. त्याचे अडीच रुपये द्यावयाचे राहिले होते. आयत्यावेळी श्री. सबनीस हे पैसे घेऊन आले. अशा रीतीने वाटखर्चाचा प्रश्नही सुटला. हा हा म्हणता आणखी काही मंडळी श्रीशास्त्रीबुवांबरोबर या यात्रेला जावयाला निघाली. परमेश्वर भक्तीचा केवढा भुकेला आहे पाहा ! आपल्या भक्ताने आपल्या भेटीला यावे यासाठी केवढी तयारी करावी लागली श्रीदत्तप्रभूंना ! श्रीशास्त्रीबुवांच्या आईची संमती मिळवून द्यावी लागली, प्रवासा मध्ये सोबत मिळवून द्यावी लागली व वाटखर्चाचीही सोय करावी लागली.

देवांचे आता माणगावला आगमन होणार आहे. आपल्या माणगावमधील वास्तव्यासाठी लागणारी सर्व तयारी देव स्वतःच करून घेणार

आहेत. ज्या श्रीवासुदेवशास्त्र्यांवरील अतीव प्रेमामुळे देव हे सर्व करणार आहेत ते श्रीवासुदेवशास्त्री टेंबे म्हणजेच भक्तकामकल्पद्रुम अत्रिनंदन योगिराज श्रीदत्तात्रेय आपल्या सर्व भक्तांचे कल्याण करोत.

अध्याय आठवा

साधकावस्था – भक्तीच्या ओघाची सुरुवात :–

"श्रीदत्त जयदत्त, श्रीदत्त जयदत्त" असे म्हणत वारकरी श्रीक्षेत्र नरसोबावाडीच्या दिशेने चालले होते. पन्नास वर्षांपूर्वी अशीच एक वारकऱ्यांची दिंडी माणगावहून "श्रीदत्त जयदत्त" या मंत्राचा घोष करीत गाणगापूरच्या यात्रेला गेली होती. आज या दुसऱ्या पिढीतील मंडळी त्याच प्रसिद्ध श्रीदत्तमंत्राचा जप करीत श्रीक्षेत्र नरसोबावाडी या दुसऱ्या प्रसिद्ध श्रीदत्तस्थानी जावयाला निघाली होती. ही मंडळी भविष्यकाळात श्रीक्षेत्र नरसोबाच्या वाडीची वारंवार यात्रा करून खऱ्या अर्थाने वारकरी होणार होती. आजची ही सुरुवात होती. अग्रभागी श्री. गणेशपंत टेंबे यांचे सुपुत्र श्रीवासुदेवशास्त्री टेंबे हे होते. श्री. गणेशपंतांनी गाणगापूरहून जी श्रीदत्तभक्तीची गंगोत्री आणली होती तीच भक्तीची कावड घेऊन आज श्रीवासुदेवशास्त्री श्रीक्षेत्र नरसोबाच्या वाडीला निघाले होते.

श्रीवासुदेवशास्त्र्यांनी आईला नमस्कार केला. नंतर यक्षिणीच्या देवळात जाऊन देवीचा आशीर्वाद घेतला आणि सर्व मंडळी निर्मला नदीला धानवळ जवळ उतार घेऊन आंबोरी, शिवापूर मार्गे हणुमंत घाटातून कोल्हापूरच्या वाटेला लागली. सकाळचा प्रहर होता. सूर्याचे कोवळे ऊन हळूहळू वाढत होते. श्रीवासुदेवशास्त्र्यांचा नेहमीचाच पोषाख होता. नेसावयाला एक पंचा व अंगावर उत्तरीय म्हणून दुसरा पंचा होता. काखेच्या संपुष्टात नित्य पूजेचे देव होते. त्यांच्या डोक्यावर वस्त्र किंवा शिरस्त्राण नव्हते आणि पायात वहाणाही नव्हत्या. हणुमंत घाटातील चढण सोपी नव्हती व मार्गेही

सुगम नव्हता. सकाळच्या कोवळ्या उन्हात सुद्धा अंगातून घामाच्या धारा चालल्या होत्या. मात्र घाटांत विशेष ऊन अंगावर पडतच नव्हते; कारण रस्त्याच्या दुतर्फा घनदाट झाडी होती. जंगलाच्या अंतरभागातून अजूनही रातकिड्यांची किर्र्र ऐकू येत होती. सगळीकडे मोठमोठे वृक्ष, त्यांना बिलगून वाढलेल्या आणि काही ठिकाणी या वृक्षांना अजगरासारखा वेढा दिलेल्या जाडजूड रानवेली आणि ठिकठिकाणी मोकाट वाढलेली झुडपे यांची गर्दी झालेली होती. मार्गात ठिकठिकाणी मोठमोठ्या दरडी ओलांडून जावे लागत होते. जंगलामध्ये श्वापदांची भीती होतीच. शिवाय साप-किरडू यांचीही भीती होतीच. कुठे सळ्ळ् झाले की, छाती धडधडायची. कुठे झाडीतून एखादे जनावर बाहेर पडते की काय, अथवा पायाखालच्या पाचोळ्यातून एखादा विषारी नाग डोके वर काढतो की काय, अशी भीती वाटावयाची; पण श्रीवासुदेवशास्त्र्यांना मात्र त्याचे काहीच नव्हते. त्यांच्या मुखात श्रीदत्तनाम होते व वृत्ती श्रीदत्तस्वरूपी लीन झालेली होती. त्यांना आजुबाजूचे भान नव्हते. सभोवतालचा निसर्गच त्यांच्याशी एकरूप झाला होता. मार्गातील वृक्ष आपल्या फांद्या वाकवून त्यांना वारा घालीत होते व त्यांच्यावर छाया करून त्यांचा प्रवासाचा शीण थोडातरी कमी करण्याचा प्रयत्न करीत होते. पक्षी मधुर कूजन करून त्यांचे मन रिझविण्याची शिकस्त करीत होते. श्रीवासुदेवशास्त्री तदाकार झाले होते. विश्वमय झाले होते. आजूबाजूच्या वृक्षवेलींच्या रूपाने तेच नटले होते. पक्षीही तेच आणि पशूही तेच ! तेथे त्याना भीती कशाची आणि कोणाची ?

श्रीवासुदेवशास्त्र्यांची ही दिंडी मजल दरमजला करीत सह्याद्री ओलांडून कोल्हापूरला येऊन पोहोचली. त्यावेळी कोल्हापूर हे एका प्रगत संस्थानच्या राजधानीचे शहर होते. तसेच ते देवीच्या

साडेतीन पीठांपैकी एक पूर्ण पीठही आहे. श्रीशास्त्रीबुवांनी देवळात जाऊन देवीचे डोळे भरून दर्शन घेतले. हिरव्या रंगाच्या लुगड्यामध्ये सजविलेली व सोन्याच्या अलंकारांनी नटलेली देवी जणू आपणाकडे पाहून हास्य करीत आहे असे श्रीशास्त्रीबुवांना वाटले. सर्वांनी देवीच्या देवळाला प्रदक्षिणा घातल्या. श्रीचक्राच्या पायावर बांधलेल्या मंदिराचे भव्य काम पाहून श्रीवासुदेवशास्त्र्यांचे हृदय भरून आले. कोकणामध्ये अशी भव्य देवालये नाहीत. गोमंतकातील देवालये सुद्धा या मंदिराच्या मानाने त्यांना लहानच वाटली. सर्वांनी धर्मशाळेत मुक्काम केला. रात्री देवळाच्या पटांगणात सर्वांनी भजन केले आणि दुसऱ्या दिवशी पहाटे उठून श्रीक्षेत्र नृसिंहवाडीची वाट धरली.

श्रीक्षेत्र नृसिंहवाडी ही भाविकजनांमध्ये नरसोबाची वाडी म्हणून प्रसिद्ध असून, कृष्णा-पंचगंगेच्या पवित्र संगमावर वसलेले ते एक निसर्गरम्य क्षेत्र आहे. नृसिंहवाडीचे श्रीक्षेत्र असे वर्णन करण्यात आले आहे, गाव म्हणून नव्हे. भगवान् श्रीदत्तात्रेयांचे द्वितीय अवतार प. प. श्रीनृसिंहसरस्वतीस्वामीमहाराज यांनी, "याकारणें श्रीगुरुमूर्ति। नृसिंहमंत्रे उपासना करिती॥" असे श्रीगुरुचरित्रग्रंथात श्रीसरस्वती गंगाधर यांनी कथन केल्याप्रमाणे, या ठिकाणी बारा वर्षे तप केले म्हणून या ठिकाणाला तीर्थक्षेत्राचे स्वरूप प्राप्त झाले. असे सांगतात की, या ठिकाणी तप करीत असलेल्या श्रीरामचंद्र योगी नावाच्या सत्पुरुषांना दर्शन देण्यासाठीच भगवान् श्रीदत्तात्रेयांचे श्रीनृसिंहसरस्वतीस्वामींच्या रूपाने येथे आगमन झाले. या ठिकाणी कृष्णानदी वेण्यानदीसहित दक्षिण वाहिनी असून येथे तिला शिवा, भद्रा, भोगावती, कुंभी आणि सरस्वती अशा महापातके हरण करणाऱ्या पाच नद्या, पंचगंगा नदीच्या नावाने एकत्रितरूपाने मिळतात. अशा तऱ्हेने येथे सात नद्यांचा संगम

झाला आहे. भगवान् श्रीविष्णूच्या शरीरापासून निर्माण झालेल्या कृष्णेला या ठिकाणी भागीरथी गंगेचे महत्त्व प्राप्त झाले आहे. वेण्णा–वेणी ही मुद्धा भगवान् शंकराच्या शरीरापासून उत्पन्न झालेली नदी आहे.

श्रीवासुदेवशास्त्री श्रीनारायणस्वामींच्या उत्सवाचा सोहळा पाहण्यासाठी श्रीक्षेत्र नरसोबावाडीला आले होते. जे एक स्वप्न आपण गेली काही वर्षे उराशी बाळगले होते ते आज सत्यस्वरूपात आले म्हणून श्रीशास्त्रीबुवांनी समाधानाचा निश्वास टाकला. कृष्णा-माईच्या घाटावर जाऊन त्यांनी हात पाय धुतले व पादुकांसमोर साष्टांग नमस्कार घालून त्यांचे दर्शन घेतले. श्रीनृसिह-सरस्वती-स्वामीमहाराजांच्या त्या मनोहर पादुका डोळे भरून पाहताच त्यांचे अष्टसात्त्विकभाव जागृत झाले व त्यांची भावसमाधी लागली. श्रीपादुकांचे दर्शन घेतल्यावर ते श्रीगोविंदस्वामींची चौकशी करावयाला निघाले; कारण या प्रवासात बोरगाव येथे मुक्काम झाला असताना रात्री स्वप्नात श्रीदत्तमहाराजांनी त्यांना वाडीला गेल्यावर तेथे श्रीगोविंदस्वामी या सत्पुरुषाचे दर्शन घेण्यास सांगितले होते. ज्यांचा निर्देश देवांनी सत्पुरुष असा केला होता त्यांची महती फार मोठी असणार असा विचार श्रीशास्त्रीबुवा करीत आहेत तोच स्वतः श्रीगोविंदस्वामीच खाली आले आणि श्रीनारायणस्वामींच्या मंदिरात श्रीशास्त्रीबुवांची चौकशी करू लागले. श्रीशास्त्रीबुवांची भेट झाल्यावर श्रीगोविंदस्वामी त्यांना एखाद्या चिरपरिचिताप्रमाणे असे म्हणाले की, "काय वासुदेवशास्त्री ! केव्हा आला ? वर माडीवर प्रथम आमच्या येथे राहावयास चला. मग स्नान वगैरे करून या." असे म्हणून ते त्यांना ब्रह्मानन्दांच्या माडीवरील आपल्या राहत्या ठिकाणी घेऊन गेले. श्रीगोविंदस्वामी संन्यासी होते. त्यांना पाहताक्षणीच व त्यांनी आपल्याला प्रथमदर्शनीच

ओळखून नावाने हाक मारल्याचे पाहून, क्षणभर जरी त्यांना आश्चर्य वाटले; तरी देवांच्या सांगण्याची प्रचीती येऊन त्यांचा अधिकार फार मोठा आहे हे श्रीशास्त्रीबुवांना कळून चुकले. श्रीगोविंदस्वामींनी श्रीशास्त्रीबुवांची राहण्याची सोय आपणांबरोबर माडीवर केली.

दुसऱ्या दिवशी पहाटे प्रार्तविधी उरकून श्रीशास्त्रीबुवा घाटावर स्नान करावयाला गेले. स्नानानंतर ते श्रीपादुकांवर पाणी घालावयाला गेले. श्रीशास्त्रीबुवांची देहयष्टी कृश होती व अंगावर कोकणातील लाला मातीने मळलेला पंचा होता. त्यामुळे पुजाऱ्यांचा त्यांच्याबद्दल असा ग्रह झाला की, हे ब्राह्मण तरी आहेत की नाहीत ? कोण जाणे ! या संशयामुळे पुजाऱ्यांनी श्रीशास्त्रीबुवांना पादुकांवर पाणी घालू दिले नाही. श्रीदत्तप्रभूंच्या आज्ञेने ज्यांनी ही श्रीक्षेत्र-नरसोबाच्या वाडीची यात्रा केली होती त्यांच्यावर असा प्रसंग यावा हे आश्चर्यच नव्हे काय ? पण भविष्यकाळातील एका महान् पर्वाची ती नांदी होती. या प्रसंगामुळे एक महान् सत्य लोकांसमोर यावयाचे होते. श्रीवासुदेवशास्त्री हातातील लोटी घेऊन, काहीसुद्धा न बोलता, माघारी फिरले. त्यांनी वर नजर करून पुजाऱ्यांकडे पाहिले सुद्धा नाही. पण खरोखरच तसे झाले असते; तर त्यांच्या नजरेतील ब्राह्म-तेज पाहून बिचारे पुजारी दिपून गेले असते. श्रीवासुदेवशास्त्री नुसते दर्शन घेऊन मुकाट्याने श्रीगोविंदस्वामींच्या मठाकडे जाण्यासाठी वळले; इतक्यात श्रीगोविंदस्वामी आपले नित्याचे अनुष्ठान सोडून ब्रह्मानन्दांच्या माडीवरून खाली मंडपात येऊन स्वतःच श्रीशास्त्री-बुवांच्या समोर येऊन उभे राहिले; कारण त्यावेळी त्यांना श्रीदत्त-प्रभूंनी असे सांगितले की, "आपण येथे पोथी वाचण्याचे सोडून खाली मंडपात काय चालले आहे ते पाहा. इतक्या लांबून माझ्यासाठी

भक्तीने व प्रेमाने आलेल्या ब्राह्मणाला पुजारी पाणी घालू देत नाहीत" श्रीदत्तप्रभूंच्या या आज्ञेबरोबर श्रीगोविंदस्वामींनी आपले पोथीचे वाचन बंद केले व ते उठून खाली देवाच्या मंडपात आले.

त्याच वेळी श्रीवासुदेवशास्त्री खिन्न चित्ताने वर येत आहेत असे त्यांना दिसले. त्यांना पाहताच श्रीगोविंदस्वामी असे म्हणाले की, "शास्त्रीबुवा! पुजाऱ्यांनी आपणाला पादुकांवर पाणी घालू दिले की नाही?" हा प्रश्न ऐकताच श्रीशास्त्रीबुवांनी मंडपात घडलेली सर्व हकीकत त्यांना सांगितली.

ही हकीकत एकताच श्रीगोविंदस्वामी श्रीशास्त्रीबुवांना असे म्हणाले की, "पुजाऱ्यांनी आपणास ओळखलेले दिसत नाही. आपण माझ्या बरोबर चला म्हणजे आपली श्रीपादुकांवर पाणी घालण्याची इच्छा पूर्ण होईल."

इतके म्हणून श्रीगोविंदस्वामींनी आपला दंड श्रीशास्त्रीबुवांच्या हातात दिला व ते स्वत: त्यांना घेऊन पादुकांपाशी आले.

श्रीशास्त्रीबुवांच्या हातात आपला दंड देऊन प्रत्यक्ष श्रीगोविंदस्वामींच्यासारखा महात्मा त्यांच्या बरोबर आला आहे हे पाहून पुजारी मंडळींची शंका दूर झाली.

श्रीशास्त्रीबुवांनी श्रीगुरुपादुकांना पाणी घातले. त्यावेळी श्रीगुरुकृपेची अगाध लीला अनुभवून त्यांना अत्यन्त समाधान वाटले.

श्रीगोविंदस्वामींनाही श्रीशास्त्रीबुवांनी देवाला पाणी घातल्यावर खूप संतोष झाला. श्रीशास्त्रीबुवांच्या हातात दंड देऊन त्यांच्या अपूर्व अधिकाराचा मोठा अभिनव परिचय मौनानेच त्यांनी सर्व पुजारी मंडळींना करून दिला होता. श्रीशास्त्रीबुवांचा परिचय शब्दांपलीकडे होता. त्यांचा परिचय लवकरच सर्व वाडीकरांना होणार होता. पुढे ज्यावेळी श्रीशास्त्रीबुवांच्या अपूर्व अधिकाराचा परिचय श्रीक्षेत्र वाडीकरांना झाला त्यावेळी त्या सर्वांनीच त्याची

मोठ्या भक्तिभावाने सेवा व पूजा केली. पुढील काळात श्रीशास्त्रीबुवांच्या महिम्याचा ठसा वज्रलेपाप्रमाणे वाडीक्षेत्रावर उमटला आणि तो या क्षेत्राच्या महिम्याप्रमाणे चिरकालीन होऊन राहिला. भगवान् आपल्या भक्तासाठी किती उद्विग्न, उतावीळ होतात व त्यांना आपल्या भक्ताचा व त्याच्या प्रेमाचा किती अभिमान असतो हेच यावरून दिसून येते.

यावेळी श्रीशास्त्रीबुवांचा श्रीक्षेत्र नरसोबाच्या वाडीमध्ये एक महिना मुक्काम झाला. दररोज सकाळी कृष्णामाईमध्ये स्नान करावे, श्रीपादुकांवर पाणी घालावे व त्यांना प्रदक्षिणा घालाव्यात, असा त्यांचा रोजचा कार्यक्रम असे. या कार्यक्रमात त्यांना वेळेचेही भान राहत नसे. भगवान् श्रीविष्णूच्या शरीरापासून निघालेली कृष्णा व महादेव शंकराच्या शरीरापासून निघालेली वेणा यांच्या या पवित्र संगमात स्नान केल्यामुळे आपल्या मनावरील अविद्येचे एकएक आवरण गळून पडत असून पावित्र्याचा आणि ज्ञानाचा लख्ख प्रकाश आपल्या हृदयामध्ये पडत आहे असे त्यांना वाटू लागले. वास्तविक श्रीवासुदेवशास्त्री म्हणजे मूर्तिमंत पावित्र्य ! पण या संगमाबद्दल त्यांच्या मनात एवढी श्रद्धा होती की, त्या श्रद्धाभक्तीच्या पोटीच त्यांना आपले जीवन अधिक पवित्र होत आहे असे वाटत असे.

श्रीक्षेत्र नरसोबाच्या वाडीमध्ये श्रीमन्नृसिंहसरस्वतीस्वामीमहाराजांच्या मनोहर पादुकांना कृष्णावेणीपंचगंगासंगमात स्नान करून पाणी घालून त्यांचे दर्शन घेणे ही श्रीवासुदेवशास्त्र्यांच्या दृष्टीने सर्वश्रेष्ठ गोष्ट असली; तरी श्रीगोविंदस्वामींचा सत्संग हे त्यांचे येथील दुसरे मोठे व महत्त्वाचे आकर्षण होते. श्री. गोविंदस्वामींच्या ठिकाणी श्रीवासुदेवशास्त्र्यांचा जीव जडला होता. यांच्या दृष्टीने श्रीगोविंदस्वामी हे एक मोठे गूढ होते. त्यांच्या

शरीराच्या आश्रयाने खुद्द श्रीदत्तप्रभूच वावरत आहेत असे श्रीवासुदेवशास्त्र्यांना वाटत होते. श्रीशास्त्रीबुवांचा स्वभाव चौकस नव्हता. सकाळी स्नान करून श्रीपादुकांवर पाणी घालावयाचे, पादुकांना प्रदक्षिणा घालावयाच्या, आपले आन्हिक उरकावयाचे व बाकीचा वेळ श्रीगोविंदस्वामींच्या सहवासात घालवावयाचा असा त्यांचा क्रम ठरून गेला होता. संन्यास घेण्याचे विचार श्रीशास्त्रीबुवांच्या मनातून दूर झाले नव्हते. त्यांनी एक दिवस श्रीगोविंदस्वामींना अशी विनंती केली की, "आपण मला संन्यास देऊन कृतार्थ करावे." पण "तुम्हाला संन्यास देण्याचा अधिकार मला नाही" असे श्रीगोविंदस्वामींनी त्यांना सांगितले. श्रीस्वामींच्या या नकाराने श्रीवासुदेवशास्त्री फार खिन्न झाले. त्यातल्या त्यात त्यांना एवढेच समाधान वाटत होते की "तुम्ही संन्यास घेऊ नका" किंवा "तुम्हाला संन्यास घेता येणार, नाही" अगर "तुम्हाला संन्यासाचा अधिकार नाही" असे श्रीस्वामी म्हणाले नाहीत ; कारण श्रीस्वामींची वाणी म्हणजे श्रीदत्तप्रभूंचीच वाणी असल्यामुळे ती वज्रलेपाप्रमाणे खरी ठरते अशी श्रीवासुदेवशास्त्र्यांची धारणा व खात्री होती.

या मुक्कामातच एके दिवशी त्यांना रात्रीच्या वेळी अकस्मात् श्रीमन्नृसिंहसरस्वतीस्वामीमहाराजांचे दर्शन घडले. श्रीक्षेत्र नरसोबा-वाडीस असा नियम आहे की, रात्री शेजारती झाल्यावर देवाच्या कट्टयावर देवापाशी कोणीही जावयाचे नाही. परन्तु हा नियम श्रीवासुदेवशास्त्र्यांना माहीत नव्हता. एके दिवशी रात्री श्रीशास्त्री-बुवा हातपाय धुण्यासाठी श्रीकृष्णानदीवर गेले होते. त्यावेळी शेजारती होऊन गेली होती. हातपाय धुऊन झाल्यावर जाताजाता देवदर्शन करून वर जावे म्हणून ते देवासमोर आले; पण त्यापूर्वीच श्रीपादुका मंदिराचा दरवाजा बंद झाला होता. तेव्हा आता निदान श्रीपादुकांना

प्रदक्षिणा करून झोपावयास जावे असा विचार करून त्यांनी प्रदक्षिणा घालावयाला सुरुवात केली. प्रदक्षिणा घालीत जेव्हा श्रीशास्त्रीबुवा दक्षिण दरवाजापाशी आले तेव्हा तेथे त्यांना काषाय वस्त्रे परिधान केलेल्या एका दिव्य, भव्य व तेजःपुंज संन्याशांचे दर्शन झाले. त्यावेळी श्रीशास्त्रीबुवांना त्यांनी रागाने असे विचारले की, "शेजारती झाल्यावर येथे कोणीही येऊ नये असा येथील नियम तुला ठाऊक नाही काय? तू या वेळी येथे का आला आहेस?" हे ऐकताच, "क्षमा असावी. मी येथे प्रथमच आलो आहे, मला येथील नियम ठाऊक नाहीत." असे म्हणून श्रीशास्त्रीबुवांनी त्या दिव्य संन्यासी महात्म्यांना साष्टांग नमस्कार घातला. त्यानंतर ते उठून पाहतात तो त्यांना संन्यासीमहाराज कोठेच दिसेनात! या प्रकारामुळे श्रीशास्त्रीबुवा विस्मयचकित झाले. त्या अवस्थेतच देवाला प्रदक्षिणा पूर्ण करून ते वर आले. वर आल्यावर झालेला सर्व प्रकार त्यांनी श्रीगोविंदस्वामींना सांगितला. त्यावेळी हे संन्यासी महापुरुष म्हणजे दुसरे तिसरे कोणी नसून साक्षात् श्रीनृसिंहसरस्वतीस्वामीमहाराजांच्या रूपाने भगवान् श्रीदत्तात्रेयच होते, असे श्रीगोविंदस्वामींनी त्यांना सांगितले. अशा रीतीने घडलेल्या दर्शनाचा उलगडा करण्याचे अपूर्व सामर्थ्य श्रीगोविंदस्वामींच्या जवळ होते; कारण ते एक महासिद्ध व समर्थ असे अधिकारी पुरुष होते. यांनाच ब्रह्मग्यास्वामी असे म्हणत असत.

त्यावेळी श्रीमौनीस्वामीसुद्धा तेथे होते. हा प्रसंग ऐकून दोघाही स्वामींची अशी खात्री पटली की, श्रीवासुदेवशास्त्री श्रीदत्तप्रभूंच्या कृपेला पूर्णपणे पात्र आहेत. त्यामुळेच देवांनी त्यांना दर्शन दिले.

श्रीगोविंदस्वामींनी केलेल्या खुलाशामुळे संधी असूनही आपणास देवांच्या श्रीचरणावर मस्तक ठेवण्याचे भाग्य लाभले नाही याचे श्रीवासुदेवशास्त्र्यांना सारखे वाईट वाटत होते. आपल्या मनातील

हे विचार त्यांनी श्रीगोविंदस्वामींना बोलून दाखविले. त्यावेळी "आपली इच्छा श्रीदत्तमहाराजांच्या आशीर्वादाने पूर्ण होईल." असे आश्वासन श्रीस्वामींनी त्यांना दिले.

यावेळी श्रीक्षेत्र नरसोबावाडीस असताना एकदा श्रीशास्त्रीबुवांना देवांचा असा स्वप्नदृष्टान्त झाला की, "मिरजेस शंकरभटजी म्हणून एक सज्जन दत्तभक्त आहेत. त्यांच्याकडून श्रीगुरुचरित्राची पोथी आणून सप्ताह करा."

देवांच्या आज्ञेप्रमाणे दुसऱ्या दिवशी सकाळी उठून श्री. शास्त्रीबुवा मिरजेला गेले व त्यांनी श्री. शंकरभटजींचे घर शोधून काढले. आपणास झालेला दृष्टान्त त्यांनी श्री. शंकरभटजींना सांगितला व पोथी देण्याची विनंती केली; पण श्री. शंकरभटजींनी त्यांना पोथी दिली नाही. त्यामुळे श्रीशास्त्रीबुवा रिक्तहस्तेच वाडीला परत आले. दृष्टांताप्रमाणे सप्ताह होईपर्यंत अन्न ग्रहण करावयाचे नाही असा त्यांनी निश्चय केला. दुसऱ्या रात्री त्यांना पुन्हा दृष्टांत झाला. "पोथी मिळेल, पुन्हा एकदा मिरजेला जा." यावेळी श्री. शंकरभटजींनाही पोथी देण्यासाठी दृष्टांत झाला होता; कारण दुसऱ्या दिवशी श्री. शंकरभटजींनी श्रीशास्त्रीबुवांना आदराने पोथी दिली. मग श्रीशास्त्रीबुवांनी दृष्टांताप्रमाणे सप्ताह केला. त्यानंतर काही दिवसांनी श्रीगोविंदस्वामींची आज्ञा घेऊन ते माणगावला परतले. एक महिन्याचा काळ केव्हा गेला ते त्यांना कळले सुद्धा नाही.

श्रीवासुदेवशास्त्री नरसोबाच्या वाडीहून परत येईपर्यंत त्यांचे बांधावयाला घेतलेले घर पूर्ण झाले होते. बांधकाम घाईघाईने उरकल्यामुळे घराचे काम कच्चेच राहून गेले. घर तयार झाले. आता त्याची वास्तुशांती करून गृहप्रवेश करावा म्हणून श्रीवासुदेव शास्त्र्यांनी वास्तुशांतीचा मुहूर्त ठरवून तयारी करविली; पण याच सुमुहूर्तावर सासूसुनेचा खडाष्टक प्रयोग सुरू झाला होता. त्यामुळे

सौ. अन्नपूर्णाबाई वास्तुशांतीसाठी ठरविलेल्या मुहूर्तावर आल्याच नाहीत. या प्रकारामुळे श्रीवासुदेवशास्त्री फार उद्विग्न झाले. त्यामुळे त्यांनी आईला रागानें असे सांगितले की, "या घरात कोणी नांदणार नाही. येथे धर्मशाळा होईल." अलीकडेपर्यंत श्रीवासुदेव शास्त्र्यांच्या या घराचा धर्मशाळा म्हणूनच उपयोग केला जात होता.

शांततेचे मेरुणमी श्रीवासुदेवशास्त्री यांच्या मुखातून अशी शापवाणी बाहेर पडावी ही दैवाची पूर्वनियोजित योजनाच नव्हे काय? नाहीपेक्षा या घराच्या वास्तुशांतीच्या बाबतीत जे काही घडले ते ईश्वराच्याच इच्छेने घडले. एरवी "स्वानुसंधान ठेऊनी ज्ञानी। स्वप्नापरी प्रारब्ध भोग मानी। म्हणोनीं तो न शिणे मनीं। राहे जनीं उदासीन।" – अशी ज्यांची वृत्ती त्यांनी अशा तऱ्हेचा शाप कां द्यावा? असो. नंतर धाकटे बंधू श्री हरिभट यांच्या कडून श्रीशास्त्रीबुवांनी त्या घराची वास्तुशांती करवून घेतली.

संसारातील या कटकटींना कंटाळून श्रीवासुदेवशास्त्र्यांचे मन संसारातून पूर्णपणे उठले. या स्थितीत आपल्या पापांचे क्षालन करण्याकरिता व आपल्याला ईश्वराची प्राप्ती व्हावी म्हणून त्यांनी स्वतःच प्रायश्चित्त घ्यावयाचे ठरविले व त्याप्रमाणे चांद्रायण व्रतास आरंभही केला. हे व्रत करताना मध्येच देहपात झाला तरी हरकत नाही असे त्यांनी ठरविले. असे घडले तर देह ईश्वराला समर्पण होईल आणि घरचा मनस्तापही चुकेल अशी हे व्रत करताना त्यांची धारणा होती.

चांद्रायण हे खरोखर एक महा कठीण असे व्रत आहे. त्याचे दोन प्रकार आहेत. पहिल्या प्रकारात आरंभी उपवास करून महिन्याच्या शुक्ल पक्षात शुद्ध प्रतिपदेला एक घास अन्न घ्यावयाचे. अशा रीतीने रोज एकेक घास अन्न वाढवीत पौर्णिमेला पंधरा घास अन्न घ्यावयाचे. पुढे कृष्ण पक्षात प्रतिपदेपासून या पंधरा घासा-

तील एकएक घास कमी करीत अमावास्येला एक घास भोजन करून शेवटी उपोषण करावयाचे, असा हा पहिला प्रकार आहे. दुसराही एक चांद्रायणाचा प्रकार आहे. यात शुक्ल पक्षात शुद्ध प्रतिपदेस पंधरा घास भोजन करून पुढे रोज एकएक घास कमी करीत पौर्णिमेस एक घास घ्यावयाचा व पुढे अमावास्येपर्यन्त एक-एक घास वाढवीत अमावस्येला पंधरा घ्यास घावयाचे, असा क्रम आहे. यालाच पिपीलिकामध्यचांद्रायण अशी संज्ञा आहे.

या दोन प्रकारातील एका प्रकारच्या चांद्रायणव्रताचा अवलंब करून श्रीशास्त्रीबुवांनी चांद्रायणव्रत सुरू केले. त्या काळात ते रोज त्रिकाल स्नान करीत असत. सबंध दिवस ते एकाच वस्त्रावर राहत असत. रात्री जमिनीवर निजत असत. यावेळी त्यांनी मौन धारण केले होते. या व इतरही त्यांनी स्वीकारलेल्या नियमांचे ते स्वत:च अत्यंत कसोशीने व कटाक्षाने पालन करीत असत.

हे व्रत चालू असताना श्रीशास्त्रीबुवांनी घरातील सर्व मंडळींना व मातुश्रीस अशी ताकीद देऊन ठेविली होती की, हे व्रत चालू असताना आपण बेशुद्ध पडलो, आणि प्राण जावयाचा प्रसंग आला तरी कोणीही आपल्या तोंडात पेज वगैरे काहीही घालू नये, उलट हे व्रत पूर्ण होण्या-साठी आपणास सर्वांनी साहाय्य करावे. अशा प्रकारचे हे खडतर व्रत चालू असताना श्रीशास्त्रीबुवांचे रोजचे सर्व अनुष्ठान वेळेवर चालूच होते. या व्रताच्या अखेर अखेर त्यांचे रक्त पडू लागले व त्यांना तापही येऊ लागला. यामुळे त्यांना एवढा अशक्तपणा आला की, त्यांच्या अंगी एक पाऊलही टाकण्याची ताकद राहिली नाही; परन्तु ईश्वरकृपेने त्यांच्या हातून हे व्रत पूर्ण झाले. यानन्तर लवकरच श्रीदत्तजयंतीचा उत्सव जवळ येत होता. त्यामुळे अशाही परिस्थिती-मध्ये श्रीशास्त्रीबुवा श्रीक्षेत्र नरसोबावाडीला जावयास निघाले. त्यावेळी त्यांच्या मातुश्री सोबतीला म्हणून त्यांच्या बरोबर गेल्या.

श्रीशास्त्रीबुवांनी एकदा एखादी गोष्ट पूर्ण करावयाची व तडीस न्यावयाची ठरविली की, ती ते मोठ्या कृतनिश्चयाने, अपार धैर्याने व कठोर परिश्रमाने पूर्ण करीत असत, असेच त्यांनी जे चांद्रायणव्रत केले त्यावरून दिसून येते. अशा प्रकारच्या युद्धात नेहमीच अजिंक्य ठरलेले व कधीही पराभूत न झालेले असे उभ्या भारतवर्षातील ते एकमेवाद्वितीय लोकोत्तर महापुरुष होते हेच खरे ! " कार्यं वा साधयेयम् देहं वा पातयेयम् " अशा दृढ मनोनिग्रहाचे एक मूर्त स्वरूप त्यांच्या रूपाने आपल्या डोळ्यांसमोर मूर्तिमन्त उभे राहते.

यावेळी श्रीशास्त्रीबुवांचा श्रीक्षेत्र नरसोबावाडीला चार महिने मुक्काम झाला. वाडीसारखे त्रिभुवनैक दुर्लभ असे पवित्र तीर्थक्षेत्र आणि श्रीगोविंदस्वामी व श्रीमौनीस्वामी यांच्यासारख्या साक्षात्कारी संतांची संगती असल्यामुळे या काळात दिवस कधी उजाडला आणि कधी मावळला याचे भान श्रीशास्त्रीबुवांना राहत नसे. एक दिवस श्रीगोविंदस्वामींनी श्रीशास्त्रीबुवांना श्रीदत्तोपासना स्वीकारण्यास सांगितले. त्यावेळी ब्राह्मणांना वेदशास्त्राने सांगितलेली अग्नी व सूर्य यांची नित्य उपासना आपण करीत असताना आणखी वेगळी उपासना कशाला करावयाची असा संदेह श्रीशास्त्रीबुवांच्या मनात उत्पन्न झाला व तो त्यांनी श्रीगोविंदस्वामींना बोलूनही दाखविला. त्यांचे हे म्हणणे ऐकताच श्रीगोविंदस्वामी पुढे काहीच बोलले नाहीत.

दुसऱ्या दिवशी प्रातःकाळी स्वप्नात श्रीवासुदेवशास्त्र्यांना भगवान् श्रीदत्तात्रेयांचे दर्शन झाले. " तीन शिरे सहा हात " असे ते मूर्तिमंत आनंदाचेच घडविलेले रूप पाहून स्वप्नातही श्रीशास्त्री-बुवांना कृतकृत्य झाल्यासारखे वाटले.

" माला कमंडलु अधःकरीं । डमरूत्रिशूळ मध्य करीं । शंखचक्र-ऊर्ध्वकरीं धरी । भक्त कैवारी त्रिमूर्त्यात्मक । " अशी ती प्रभूची

मूर्ती श्रीवासुदेवशास्त्र्यांसमोर उभी राहिली. सगळीकडे कोटिभानू तेज पसरले. मोतिया रंगाचे ते तेज नेत्रांना आल्हाद देणारे होते. प्रभूंच्या चेहऱ्यावर स्मितहास्य झळकत होते. पीतांबराचे तेज त्यांच्या शरीराला अधिकच शोभा देत होते. पायांच्या नखांचे तेज पैलू पाडलेल्या हिऱ्यांप्रमाणे दिसत होते. श्रीवासुदेवशास्त्र्यांनी देवांना साष्टांग नमस्कार घातला. त्यांचे अष्टसात्त्विक भाव जागृत झाले. देवांची स्तुती करण्यासाठी त्यानी तोंड उघडण्याचा प्रयत्न केला; पण भक्तीच्या अतिरेकामुळे त्यांचा कंठ रुद्ध झाला होता. त्यांच्या मुखातून शब्द बाहेर येईनात.

'श्रीवासुदेवशास्त्री ! काल आम्ही तुमची परीक्षा पाहिली. आज आम्ही तुम्हाला मंत्रोपदेश देत आहोत," असे म्हणून देवांनी श्रीवासुदेवशास्त्र्यांच्या कानात मंत्रोपदेश दिला व त्यांच्याकडून त्या मंत्राचा त्रिवार उच्चार करून घेतला. "मंत्राचा विधी श्रीगोविंद-स्वामींकडून घ्यावा व ते सांगतील तसे वागावे." असे सांगून देव अंतर्धान पावले.

इकडे देव अंतर्धान पावल्याबरोबर श्रीगोविंदस्वामींनी हे सर्व जाणून आपल्या निजलेल्या जागेवरूनच असे विचारले की, "शास्त्रीबुवा मंत्र मिळाला ना ? आता देवांनी आज्ञा केल्याप्रमाणे याचे सर्व सांग विधान उद्या तुम्हाला सांगू." श्रीगोविंदस्वामींची ही सर्वज्ञता श्रीवासुदेवशास्त्र्यांना अनेकवेळा अनुभवास आल्यामुळे त्यांची त्यांच्यावर अत्यन्त श्रद्धा बसली व ते त्यांना आपले गुरू समजू लागले.

श्रीशास्त्रीबुवा जागे झाले त्यावेळी त्यांच्या अंत:करणात रात्री देवांनी सांगितलेला मंत्र आपोआप जपला जात होता व स्वप्नात त्यांना जे रूप दिसले होते ते त्यांच्या जाणिवेमध्ये भरून राहिले होते. अशा भारावलेल्या अवस्थेतच नेहमीप्रमाणे आपले सकाळचे

आन्हिक उरकून श्रीशास्त्रीबुवा श्रीगोविंदस्वामींच्या जवळ आले व त्यांनी त्यांना साष्टांग नमस्कार घातला. त्यावेळी श्रीगोविंदस्वामी त्यांना असे म्हणाले की, "शास्त्रीबुवा! ही पोथी घ्या. या पोथीत तुम्हाला मिळालेल्या मंत्राचे सांग विधान आहे. ते लिहून घ्या व त्याप्रमाणे मंत्रजप सुरू करा. त्याचप्रमाणे उपनिषद्भाष्यही रोज वाचीत जा." त्या दिवसापासून श्रीगोविंदस्वामींच्या आज्ञेप्रमाणे श्रीशास्त्रीबुवांनी मंत्रजप करण्यास व उपनिषद्भाष्य वाचण्यास सुरुवात केली.

श्रीवासुदेवशास्त्री नित्यनियमाने पंचायतन पूजा करीत असत. श्रीगोविंदस्वामींनी त्यांना एकदा श्रीदत्तपादुकांची पूजा करण्यास सांगितले. त्यावेळी "देवाची इच्छा असेल तर देवच जेव्हा आपणास श्रीदत्तपादुकांची पूजा करण्यास सांगतील तेव्हा आपण ती करू," असे श्रीशास्त्राबुवांनी सांगितले व ते स्वस्थ राहिले. असे काही दिवस गेल्यानंतर देवांनी त्यांना स्वप्नात दृष्टान्त देऊन श्रीदत्त-पादुकांची पूजा करण्यास सांगताच ते त्याप्रमाणे रोज पूजा करू लागले. वरील पूजेप्रमाणेच एकदा पार्थिवपूजा करण्याविषयी देवांनी श्रीवासुदेवशास्त्र्यांना सांगितले. जरी असा दृष्टान्त देवांनी दिला; तरी प्रथम त्यांनी या सांगण्याकडे दुर्लक्ष केले. श्रीशास्त्रीबुवा आपल्या म्हणण्याकडे कानाडोळा करीत आहेत असे पाहून देवांनी त्यांना पुन्हा दृष्टान्त देऊन पार्थिवपूजा करण्यास सांगितले. त्यावेळी "पूजेचे विधान माझ्याजवळ नाही." असे श्रीशास्त्रीबुवांनी सांगताच "या पूजेचे विधान कवीश्वरबुवांकडे मिळेल." असा आदेश झाला. देवांच्या इच्छेप्रमाणे पार्थिव पूजेचे विधान घेऊन श्रीशास्त्रीबुवा पार्थिवपूजा करू लागले. पण थोडयाच दिवसांनी "ही पूजा आता बंद करावी." असा त्यांना देवांचा पुन्हा आदेश झाला. अशा तऱ्हेने श्रीशास्त्रीबुवांची पार्थिव पूजा बंद झाली.

संन्यास घेण्याचे विचार श्रीशास्त्रीबुवांच्या मनामध्ये वारंवार येत असत. याही वेळी त्यांनी संन्यास घ्यावयाची आपली इच्छा श्रीगोविंदस्वामींच्या कानावर घातली. त्यावेळी श्रीमौनीस्वामी तेथेच होते. ते त्यांना असे म्हणाले की, "तुम्हाला संन्यास घ्यावयाला अद्याप वराच अवकाश आहे. माणगावचे आणि तुमचे ऋणानुबंध अद्याप संपलेले नाहीत; तुम्हाला आणखी काही दिवस माणगाव-मध्येच राहवयाचे आहे" श्रीमौनीस्वामींची श्रीवासुदेवशास्त्र्यांवर फार मर्जी होती. श्रीशास्त्रीबुवा सुद्धा या महान् अशा ब्रह्मनिष्ठ सत्पुरुषाचा मान ठेवीत असत. श्रीमौनीस्वामी हे मूळ सोलापूरकडील राहणारे होते. आत्मसाक्षात्काराच्या इच्छेने लहान वयातच ते घरा-बाहेर पडले होते. त्यांनी पायीच सर्व तीर्थयात्रा केल्या होत्या. कडू-निंबाचा पाला व रस या आहारावर त्यांनी आपल्या आयुष्यातील बराच काळ काढला होता. त्यांनी काशीरामेश्वराची यात्रा अनेक वेळा पायीच केली होती. वयाच्या पंचवीसाव्या वर्षी त्यांनी संन्यास घेतला होता. संन्यासाश्रमातील त्यांचे नाव प्रद्युम्नसरस्वती असे होते. बरेच दिवस ते मौन धारण करून राहिले होते म्हणून लोक त्यांना श्रीमौनीस्वामी असे म्हणत असत. ते ब्रह्मनिष्ठ पुरुष असूनही नेहमी बालवृत्तीने राहत असत. लहान मुलांशी खेळणे व त्यांना खाऊ वाटणे हे त्यांना फार आवडत असे. श्रीमौनीस्वामींच्या वाणीने भगवान् श्रीदत्तात्रेयच बोलतात, ते बोलतील ते खरे होते व प्रत्यक्ष देवसुद्धा त्यांच्या शब्दाला मान देतात अशी लोकांची श्रद्धा होती.

या मुक्कामात भगवान् श्रीदत्तात्रेयांनी श्रीवासुदेवशास्त्र्यांना दृष्टान्त देऊन असे सांगितले की, "या पुढील सात वर्षे आपण माणगावमध्ये राहणार आहोत." आणि त्याच दिवसापासून भक्तीच्या इतिहासातील एका महान् पर्वाला सुरुवात झाली. भक्त आणि भगवान् यांच्यामधील दिव्य लीला आपल्याला नामदेव आणि

पंढरीचा विठोबा यांच्यामध्ये दिसते. आधुनिक काळात श्रीरामकृष्ण परमहंस आणि भगवती काली यांच्यामध्ये पुन्हा एकदा आपल्याला ती दिसली. तीच दिव्य लीला आता आपल्याला माणगावमध्ये पाहावयाला मिळणार आहे. देवांच्या आज्ञेमुळे माणगावला भूवैकुंठाचे स्वरूप प्राप्त झाले आणि कोकणातील जनता दत्तभक्तीने वेडी होऊन गेली.

देवांच्या या आदेशाप्रमाणे संन्यासाचा बेत रहित करून पुढील तयारी करण्याच्या उद्देशाने श्रीवासुदेवशास्त्री माणगावला परत येण्यास निघाले. कोल्हापूरला भगवती महालक्ष्मीचे दर्शन घेऊन कागलमार्गे ते घरी जावयाला निघाले. त्यावेळी त्यांच्या मनात असा विचार आला की, "आपणापाशी श्रीदत्तात्रेयांची एक लहानशी मूर्ती असती तर किती चांगले झाले असते!" सत्पुरुषाच्या मनातील इच्छा होती ती! ती पूर्ण होण्यासाठीच निर्माण झालेली होती सत्पुरुषांच्या मनात एखादी इच्छा निर्माण होताच तिच्या पूर्तीची तजवीज होत असते. परतीच्या या प्रवासात श्रीवासुदेव-शास्त्री कागलच्या बाजारपेठेतून चालले असताना एक मूर्तिकार आपल्या दुकानातून बाहेर धावत आला व श्रीशास्त्रीबुवांना साष्टांग नमस्कार घालून त्यांना असे म्हणाला की, "आपणाला श्रीदत्तात्रे-यांची एक मूर्ती देण्याचा मला दृष्टांत झाला आहे. काही दिवसां-पूर्वी आपणाला अगदी याच वेषात मी स्वप्नात पाहिले होते. तेव्हापासून दररोज समोरून येणाऱ्या जाणाऱ्या वाटसरूकडे मी दुकानातून निरखून पाहत असे. आज आपले पुण्यदर्शन घडले. आपणाला कोणत्या प्रकारची दत्तमूर्ती पाहिजे ते सांगा. तशी मूर्ती मी लवकरात लवकर घडवून देतो." या प्रकारामुळे श्रीशास्त्री-बुवांना परमेश्वराच्या अगाध लीलेचा पुन्हा एकदा प्रत्यय आला.

श्रीशास्त्रीबुवांच्या सांगण्याप्रमाणे सातबोटे उंचीची, सिद्धासन

घातलेली, द्विभुज व वराऽभयकर अशी पितळेची सुंदर मूर्ती त्या कारागिराने एक आठवड्यात तयार करून दिली. कोणतीही वस्तू विनामूल्य घ्यावयाची नाही असा श्रीशास्त्रीबुवांचा बाणा होता. आपणापाशी असलेला एक रुपया मूर्तिकाराला देऊन "तूर्त मी एवढीच रक्कम देऊ शकतो," असे त्यांनी सांगितले. खरे म्हणजे, येथे मोबदला पाहिजे होता कोणाला? श्रीशास्त्रीबुवांना मूर्ती द्यावी असा देवांचा दृष्टांत मूर्तिकाराला झाला होता. त्याप्रमाणे मूर्ती स्वीकारून श्रीशास्त्रीबुवांनी आपणास धन्य केले असेच त्या मूर्तिकाराला वाटले; पण श्रीशास्त्रीबुवांनी दिलेला रुपया त्याने आदराने स्वीकारला व या अभूतपूर्व प्रसंगाची आठवण म्हणून तो ठेवून घेतला. त्यावेळी दुकानात असलेल्या मंडळींच्या मनात असे आले की, आपणही या देवकार्याला हातभार लावून पुण्याचा वाटा उचलावा. त्यांनी तेथल्या तेथे वर्गणी गोळा करून पंचवीस रुपये मूर्तिकाराला दिले. ज्यावेळी कागलला मिळालेली श्रीदत्तमूर्ती घेऊन श्रीशास्त्रीबुवा माणगावात आले त्यावेळी ते आपल्या घराच्या पश्चिमेच्या बाजूला थोड्या अंतरावर असलेल्या जागेवर आले. तेथे आल्यावर त्यांच्या मनात अशी तीव्र वृत्ती उत्पन्न झाली की, या जागेतच आपण आणलेल्या या श्रीदत्तमूर्तीची स्थापना करावी; कारण या कामाकरिता हीच सर्वोत्तम जागा आहे. परन्तु जरी त्यांच्या ठिकाणी असे स्फुरण झाले असले; तरी ती जागा एका विधवा जमीनदारबाईची असल्यामुळे, त्यांनी हा विचार आपल्या मनातच ठेवून, ते मूर्ती घेऊन घरी आले. घरातच त्यांनी एक स्वतंत्र जागा करून तेथे ती मूर्ती ठेवली.

श्रीशास्त्रीबुवांनी एक सुंदर व मनोहर श्रीदत्तमूर्ती श्रीक्षेत्र नरसोबावाडीवरून येताना आपल्या बरोबर आणली आहे असे कळताच त्यांच्या मातुश्रींना अत्यन्त आनन्द झाला. ती मूर्ती

पाहताच त्यांच्या मनाला अतीव समाधान वाटले व घरातच या मूर्तीची स्थापना करावी अशी आपली इच्छाही त्यांनी श्रीशास्त्री-बुवांना बोलून दाखविली. परन्तु मातुश्रींची ही इच्छा त्यांना मान्य झाली नाही; कारण श्रीशास्त्रीबुवांना असे वाटत होते की, आपणाला आतून जे स्फुरण झाले आहे, त्याप्रमाणे त्या जागेवरच मंदिर उभे राहावे व तेथेच आपण आणलेल्या श्रीदत्तमूर्तीची प्रतिष्ठापना व्हावी. आणि ही इच्छा पूर्ण होणार यासंबंधी श्रीशास्त्रीबुवांना यत्किंचितही काळजी नव्हती; कारण प्रत्यक्ष श्रीदत्तप्रभूंनीच "आपण सात वर्षे माणगावात येऊन राहणार आहोत," असे त्यांना सांगितले होते.

हळूहळू श्रीशास्त्रीबुवांच्या मनाप्रमाणे सर्व गोष्टी जुळून येऊ लागल्या; कारण श्रीदत्तप्रभूंनाच आपल्या भक्ताचे माहात्म्य वाढवून भक्तीच्या एका अपूर्व लीलेचा आविष्कार माणगावामध्ये घडवून आणावयाचा होता. ज्या जागवर श्रीशास्त्रीबुवांना मंदिर उभारावेसे वाटत होते, ती जागा म्हणजे माणगावजवळील एक लहानशी वाडी असून, त्या जागेचा मालक निवर्तल्यानंतर त्याची पत्नीच त्या वाडीचा सर्व व्यवहार पाहत होती.

एके दिवशी देवांनी त्या विधवाबाईला स्वप्नात तिची जमीन ब्राह्मणाला दान देण्यास सांगितले; पण स्वप्नाचा नीटसा अर्थ त्या बाईला समजला नाही, म्हणून ती श्रीवासुदेवशास्त्र्यांकडे गेली त्यावेळी रमाबाईंशीच तिची प्रथम भेट झाली. श्रीशास्त्रीबुवांना भेटण्याचा आपला उद्देश बाईंनी रमाबाईंच्या कानावर घातला. त्या-वर रमाबाई म्हणाल्या, "आमच्या वासुदेवाला दत्तमूर्तीची स्थापना करण्यासाठी देऊळ बांधावयाचे आहे. त्याला देवळासाठी जागा हवी आहे. तुमची ही जमीन या कामाला सोईस्कर होईल. तुम्हाला ही जमीन ब्राह्मणाला दान द्यावयाची असेल; तर वासुदेवाला या कार्यासाठी तुम्ही ती द्या; म्हणजे तुमचे कल्याण होईल." त्या जमीन-

दारबाईने रमाबाईंच्या म्हणण्यास लगेच होकार देऊन ती जमीन देऊळ बांधण्याकरिता श्रीवासुदेवशास्त्र्यांना दान देऊन टाकली. इतकेच नव्हे; तर पुढे त्या बाईंनी तेथेच आसपास असलेली आपली दोनतीन खंडी उत्पन्नाची जमीनही देवास दिली.

पुढील सातवर्षामध्ये जेथे भक्तीची पंढरी निर्माण व्हावयाची होती व जेथील भूमी भक्तांच्या पदरवाने निनादित होणार होती तेथील मंदिराची मुहूर्तमेढ अशा प्रकारे रोवली गेली. देवांनाच तेथे राहवयाचे होते म्हणून देवांनी स्वतःच पुढील सर्व कामे पूर्ण करून घेतली. कोणी दगड आणून दिले, कोणी लाकडे पुरविली तर कोणी पैशाच्या रूपाने आपली सेवा रुजू केली आणि अवघ्या सात दिवसात देऊळ बांधून झाले. तीन दिवसामध्ये देवळासमोर विहीर खोदून व बांधून झाली. देवळाचे तोंड पूर्वेकडे होते. पुढे मोकळी पडवी, मागच्या बाजूला एक खोली व मधल्या भागात गर्भागार अशी देवळाची रचना केली. श्रीशास्त्रीबुवांनी आपल्या हातांनी विटा बनवून गर्भागार बांधून काढले. वैशाख शुक्ल पंचमी शके १८०५ मध्ये कागलहून आणलेल्या श्रीदत्तमूर्तीची स्थापना या मंदिरात झाली. देवळाच्या पाठीमागच्या खोलीत श्रीशास्त्रीबुवांच्या स्मार्ताग्नीची व स्वयंपाकगृहाची जागा होती.

शके १८०५ च्या वैशाख शुक्ल पंचमीपासून पुढे सात वर्षे श्रीदत्तप्रभूंचे या देवळात वास्तव्य झाले; त्यामुळे या स्थानाची पुढे फारच भरभराट झाली. आता श्रीवासुदेवशास्त्र्यांनी पूर्वीपेक्षा अधिक काटेकोर आणि कडक अनुष्ठान चालू केले. येथून पुढे श्रीवासुदेवशास्त्री यांना “शास्त्रीबुवा” या नावाऐवजी फक्त “बुवा” या नावानेच संबोधले जाऊ लागले. यानंतर श्रीशास्त्रीबुवा देवळात राहू लागले. मंदिराच्या उत्तरेच्या बाजूला एक पडवी काढली होती. त्या पडवीमध्ये श्रीशास्त्रीबुवा आपली दिनचर्या

चालवीत. गृहस्थाश्रम स्वीकारण्यासाठी देवांची आज्ञा झाल्यावर याच पडवीमध्ये श्रीशास्त्रीबुवा गृहस्थाश्रमाला उचित अशा सर्व गोष्टी करीत असत. श्रीवासुदेवशास्त्र्यांची वृत्ती एखाद्या ऋषी-सारखी होती. त्यांची राहणीसुद्धा तपोवनात वास करणाऱ्या मुनीला साजेशीच होती. सर्व प्राणिमात्रांवर परमेश्वर भावनेने प्रेम करणे हा त्यांच्या स्वभावाचा स्थायीभाव होता. मत्सर, द्वेष व वैर हे शब्द त्यांच्या कोशात नव्हते. ज्यांच्या दृष्टीने मी-तू हा भेदभाव नष्ट झाला होता व खरोखरच ज्यांची वृत्ती " हें विश्वांच माझें घर " अशी झाली होती त्यांच्या मनात वैर, मत्सर, द्वेष हे संकुचित भाव येणार तरी कसे ? त्यामुळं श्रीवासुदेवशास्त्र्यांच्या या निवास-स्थानाला आणि मंदिराच्या एकूण परिसराला पवित्र अशा आश्रमाचे स्वरूप आले होते. तेथे प्रवेश करणाऱ्याला असे वाटत असे की, आपण एका निराळ्याच वातावरणामध्ये आलो आहोत. या ठिकाणी येणाऱ्या प्रत्येक माणसाच्या ठिकाणी पावित्र्य, निर्वैरता व सर्वांभूती प्रेम याच भावना उचंबळून येत असत. माणसांची गोष्ट तर सोडाच; पण इतर प्राणीसुद्धा आपापसातला वैरभाव विसरून तेथे वावरत असत. श्रीशास्त्रीबुवा जेवावयाला बसले की, त्यांनी ठेवलेला भात खावयाला तेथे उंदिर येत व पूर्ण निर्भयतेने व शांतपणे तो भात खात; पण परका माणूस तेथे आल्यास मात्र ते लपून जात. एक नाग दोन महिने एखाद्या पाहुण्यासारखा देवळातच राहत असे. लोकांना तो इकडे तिकडे फिरताना दिसे; पण त्याने कोणाला इजा केली नाही. एक मोठी धामण देवळाच्या उंबरठ्यावर डोके टेकून निजत असे. लोकांनी घाबरून तिला मारावयाचे ठरविले, तेव्हा ती जंगलात निघून गेली. या सर्व प्राण्यांच्या सहवासात श्रीशास्त्रीबुवा निश्चिंत मनाने वावरत, निद्रा घेत; पण श्रीशास्त्री-

बुवांना कोणाही प्राण्याने कधीही त्रास दिला नाही. एकदा एक नाग देवळात आला व देवांचे दर्शन घेऊन परत जाऊ लागला. बुवांच्या सांगण्यावरून लोकांनी त्याला दिव्याने मार्ग दाखवून बाहेर दूरपर्यंत पोहोचविले.

विसाव्या शतकाच्या अखेरच्या पर्वात राहणाऱ्या आजच्या आङ्ग्लविद्याविभूषित माणसांना या गोष्टी परिकथेतील गोष्टींसारख्या कपोलकल्पित वाटतील; कारण आजच्या गणकयंत्रयुगातील मानवाला दया, क्षमा, शांती आदी गुणांचा परमोत्कर्ष मानवामध्ये होऊ शकतो हे कळणे दुर्घटच आहे. माणसाच्या अधीन राहणारी हिंस्र जनावरे त्याने फक्त सर्कशीमध्येच पाहिलेली असतात. "हें विश्वचि माझें घर" ही त्यांच्या दृष्टीने एक कविकल्पनाच असते; परन्तु श्रीशास्त्रीबुवांच्यारूपाने हे सर्व अमूर्त गुण त्यांच्या आश्रयाला येऊन समूर्त झाले होते. बुवा आता पहाटे चार वाजता उठून प्रात:स्मरण करून योगाभ्यास करीत. खरे म्हणजे आता योगाभ्यास तरी कशासाठी करावयाचा? आता त्यांचा संबंध प्रत्यक्ष भगवान् श्रीदत्तात्रेयांशीच येत होता. योगाभ्यास करून जो आत्मसाक्षात्कार साधावयाचा तो बुवांना आता साधला नव्हता असे म्हणण्याचे धाडस कोण करू शकेल? पण त्यांनी नेहमीचा योगाभ्यास चुकविला नाही. पूर्णावतार भगवान् श्रीकृष्णसुद्धा ब्राह्ममुहूर्तावर उठून योगसाधना करीत असत. खेचरीमुद्रा आणि वज्रोलीमुद्रा यांचा अभ्यासमात्र बुवांनी आपला गृहस्थाश्रम संपल्यावर केला. एका रामनवमीची गोष्ट सांगतात. त्या दिवशी सकाळी बुवांनी नदीवर जाऊन बस्तीची क्रिया केली. बस्ती करण्यासाठी ते पपईची नळी वापरीत. पोटातील मळ जाऊन पोट अधिक शुद्ध व्हावे म्हणून त्यांनी पुन्हा एकदा बस्तीचा प्रयोग केला. त्यामुळे पोटातील सर्व मळ बाहेर पडून त्यांना फार थकवा आला. चक्कर येऊन ते तासभर बेशुद्ध होऊन पडले.

शुद्धीवर आल्यानंतर त्यांना रामनवमीची आठवण झाली. अंगात शक्ती नसल्यामुळे थोडावेळ चालत व थोडावेळ थांबत ते मंदिरामध्ये येऊन पोहोचले व देवासमोर निजून राहिले. देवासमोर काही फळे होती. ती खाल्ल्यावर त्यांना हुशारी आली.

योगाभ्यासानंतर शौच, मुखमार्जन व स्नानसंध्यादी आटोपून बुवा मंदिरामध्ये श्रीदत्तमूर्तीची पूजा करीत असत. भगवान् श्रीदत्तात्रेय त्यांच्याशी बोलत असत. इतकेच नव्हे; तर देव भक्ताकडून आपले कोडकौतुक करून घेत होते ही गोष्ट आपल्याला पुढे दिसून येईल. मंदिराच्या पाठीमागे व उत्तरेच्या बाजूला बुवांनी फुलझाडे व तुळशी लावल्या होत्या. त्यांच्याजवळ विद्याभ्यास शिकण्यासाठी येणारे विद्यार्थी या फुलझाडांची काळजी घेत. पूजेसाठी ताजी फुले व तुळशी बुवा स्वत: खुडून आणीत. जमिनीवर गळून पडलेले फूल देवांना चालत नसे. सुरुवाती सुरुवातीला रोज महान्यास करून देवाला रुद्रैकादशिनी होत असे. पुढे जसजसा तेथील व्याप वाढू लागला तसतसे दररोज एकच रुद्रावर्तन होऊ लागले. पुढेपुढे तर फक्त पुरुषसूक्तानेच अभिषेक होऊ लागला. अर्थात् हे सर्व बदल देवांच्याच आज्ञेने होत गेले. हे पाहिले म्हणजे भक्ताची काळजी देवाशिवाय कोणास असणार! या वचनाची प्रचीती आल्याशिवाय राहत नाही.

जप वगैरे रोजचे कर्म पूजा झाल्यावर होत असे. अगदी सुरुवातीला देवांना नैवेद्य समर्पण करून बुवा जेवण्यासाठी घरी जात. पण तेथे गुरुद्वादशीचा पहिला उत्सव झाल्यादिवसापासून बुवांनी घरी जाणे बंद केले. त्यानंतर त्यांनी कोरडी भिक्षा मागण्यास सुरुवात केली. ते भिक्षा एकाच घरी मागत असत. भिक्षेहून येताना स्वयंपाकाला लागणारे सर्पण स्वत: गोळा करून आणावयाचे असा बुवांचा दररोज क्रम होता. भिक्षेला जाताना रजस्वला स्त्री किंवा अंत्यज दृष्टीस पडल्यास त्या दिवशी भिक्षा न करता ते उपोषण करीत असता.

भिक्षेहून आल्यावर स्नान करून मध्यान्हसंध्या, ब्रह्मयज्ञ वगैरे आटोपून मूर्तीची पूजा करावयाची व आणलेल्या भिक्षेतून वैश्वदेव नैवेद्य करून मग स्वत:चे भोजन करावयाचे असा त्यांचा नियम होता. तांदूळ व मुगाची डाळ एकत्र करून बुवा स्वतः स्वयंपाक करीत. मंदिराला कोणीतरी एक गाय दिली होती. तिचे दूध व तूप ते स्वयंपाकाला वापरीत असत. शिजविलेल्या अन्नातून गोग्रास व अतिथीसाठी भोजन बाजूला काढून उरलेला भाग बुवा स्वतः ग्रहण करीत. स्वयंपाकाची भांडी ते स्वत:च घाशीत. पुढे पुढे बुवांचा एक भाचा त्यांच्या बरोबर राहत असे. त्याला बुवांच्या स्वयंपाकाची भांडी घासावयाचे भाग्य लाभले होते. कोणी काही विचारावयाला आले तर त्यांच्या प्रश्नांची उत्तरे बुवा दुपारी देत. कधी पुराण सांगत. संध्याकाळी स्नान संध्या झाल्यावर देवांना धूप घालून आरती करीत. रात्री मंत्रपुष्प होऊन शेजारती झाल्यावर देवांना पलंगावर निजविण्यात येत असे. त्यानंतर बुवांचे ग्रंथवाचन होत असे. नंतर पुन्हा योगाभ्यास करून मग ते झोपावयास जात असत. बुवा देवळातच झोपत असत. त्यांचे अखंड नामस्मरण चालू असे. या काळात ते पूर्णपणे ब्रह्मचर्यवृत्तीने राहिले होते. देवांची आज्ञा झाल्याशिवाय गृहास्थाश्रम सुरू करावयाचा नसल्यामुळे देवांची आज्ञा होईपर्यंत त्यांनी स्वस्त्रीसंबंध मुळीच केला नाही. अपूर्व व कठोर आत्मसंयम करून ते राहिले. मात्र सौ अन्नपूर्णाबाईंचा रोज सकाळी देवापुढे सारवून, रांगोळी घालून जाण्याचा व दुपारी जेवण्यापूर्वी देवदर्शन करून, तीर्थप्रसाद घेऊन जाण्याचा नियम होता.

एखाद्या स्थानाचे महत्त्व निश्चित झाल्यावर बाकीच्या तदनुषंगिक सर्व गोष्टी आपोआपच जमून येतात. अगोदरच श्रीवासुदेवशास्त्र्यांची एक साधुपुरुष म्हणून ख्याती पसरली होती. आता श्रीदत्तमंदिराची स्थापना झाल्यापासून लोकांची ये जा वाढली होती.

दररोज काकड आरती, पूजा, नैवेद्य, धूप व शेजारती हे सोपस्कार आपोआपच सुरू झाले. दिवसेंदिवस भाविकांची गर्दी वाढतच गेली. भक्तमंडळींनी एक सुंदर लाकडी पालखी तयार करून मंदिराला अर्पण केली. पालखी आतल्या बाजूने मखमली कपड्याने मढविलेली होती. त्यात गादी व तक्या होता. वर छानपैकी पितळी छत्र होते. पालखीचा दांडा रेशमी कापड वेष्टून सजविला होता. दर शनिवारी पालखी निघू लागली. त्यामुळे प्रत्येक शनिवारी माणगावला फार मोठा समारंभच होऊ लागला.

ही पालखीची प्रथा अगदी सहज सुरू झाली. एका भाविकाने एकदा नम्रपणे बुवांना असे सांगितले की, "शनिवारी पालखी निघावी अशी भक्तांची इच्छा आहे." त्याचे हे म्हणणे ऐकताच बुवांनी मोठ्या आनंदाने या गोष्टीला होकार दिला. त्यामुळें त्यांच्या संमतीने दर शनिवारी त्यांच्याच देखरेखीखाली पालखी निघू लागली.

दर शनिवारी सायंकाळी धूप झाल्यावर तेथे जमलेले सर्व उत्साही लोक खूप आरत्या म्हणत असत. त्यामुळे आरतीचा कार्यक्रम वाढत असे. आरत्या संपल्यानतर उत्सवमूर्ती पालखीत ठेवून देवळाभोवती तीन प्रदक्षिणा घालीत असत. ही पालखी निघण्यापूर्वी ग्रामदेवता श्रीयक्षिणीची पालखी प्रथम देवळाजवळ येत असे आणि त्यानन्तर श्रीदत्तमहाराजांची पालखी निघत असे. परन्तु श्रीयक्षिणीदेवीची पालखी श्रीदत्तमंदिराकडे आणण्यास प्रथम प्रथम त्या देवतेच्या मंदिराच्या व्यवस्थापकांचा विरोध होता. हा विरोध दूर व्हावा म्हणून बुवांनी जाऊन श्रीदेवीची प्रार्थना केली. त्यामुळे श्रीदत्तमंदिराकडे पालखी नेण्याबद्दल व्यवस्थापकांना दृष्टान्त झाला. त्याप्रमाणे सर्व विरोध दूर होऊन नियमाने पालखी येऊ लागली.

अशा रीतीने दर शनिवारी दोन्ही पालख्या मंदिराबाहेर काढून तीन प्रदक्षिणा घालण्यास सुरुवात होत असे. पालखीबरोबर काठी

घेणारे, चवरी व मोरचेल धरणारे आणि पदे म्हणणारे अशी नित्याची दहा-पंधरा मंडळी असत. शिवाय त्यावेळी इतर लोकांचाही चार-पाच हजारापर्यन्त समाज एकत्र जमत असे. पालखी सुरू झाली की, उत्सवमूर्तीपुढे अनेक भक्तिपर पदे, अभंग, स्तोत्रे इत्यादी म्हटली जात. यावेळी संगिताची बाजू भलोबा म्हणजे श्रीशास्त्रा-बुवांचे धाकटे बंधू श्री. सीतारामबुवा सांभाळीत असत. त्यावेळी भलोबांचे वय सहा वर्षांचे होते. पालखीच्या तीन प्रदक्षिणा पूर्ण होण्यास पाच ते सात तास लागत, एवढा लोकांचा उत्साह मोठा असे. एकंदरीत हा पालखीचा सोहळा अत्यन्त चित्ताकर्षक, प्रेक्षणीय व मनमोहक असा वाटत असे.

पालखीच्या सोहळ्याचा उत्साह दिवसेंदिवस वाढतच चालला होता. या सोहळ्यासाठी असंख्य भक्तगण देवासमोर पेढे, बर्फी, खारिक, नारळ, उदबत्ती, कापूर इत्यादी इतक्या अपार प्रमाणात जिनसा आणून ठेवीत असत की, त्यांचा जणू काही पर्वतप्राय ढीगच पडला आहे असे वाटत असे. पालखी संपल्यावर देवापुढे आलेले सर्व पदार्थ प्रसाद म्हणून सर्वांना वाटीत असत. देवापुढे धान्यसुद्धा खूप मोठ्या प्रमाणावर जमत असे. या जमा झालेल्या धान्याचा भंडारा होऊन सर्वांना प्रसाद मिळत असे.

वास्तविकपणे देवाचे वैभव अशा प्रकारे दिवसेंदिवस वाढत होते; तरी पूजा, अर्चा सोडून इतर कोणत्याही बाबतींमध्ये बुवा लक्ष घालीत नसत. ते अगदी अनासक्त वृत्तीने सर्व व्यवहार करीत असत. सर्वच बाबतीत बुवांची वृत्ती अत्यंत निःस्पृह होती व आपण स्वतः घालून घेतलेल्या व इतरांना घालून दिलेल्या नियमांचे काटे-कोरपणाने पालन व्हावे या बाबत त्यांचा कटाक्ष असे. एकदा श्री. रामभाऊ सवनीसांनी बुवांना एक धोतराचे पान दिले. बुवा नेहमी पंचा वापरीत असत. त्यामुळे श्री. रामभाऊंनी दिलेल्या धोतराचे

त्यांनी फाडून पंचे केले व ते वापरले.

अशा प्रकारे देवाच्या इच्छेप्रमाणे माणगाव येथील अर्चन फारच उत्तम प्रकारे व व्यवस्थित रीतीने चालू होते. त्याचप्रमाणे भगवान् श्रीदत्तात्रेयांच्या सांगण्याप्रमाणे व आदेशाप्रमाणे येणाऱ्या पीडित व आर्त लोकांना त्यांच्या त्यांच्या कामाप्रमाणे योग्य ते अनुष्ठानादी उपासना व उपाय सांगून बुवा, त्यांना त्यांची अडचण दूर होऊन, त्यांचे कार्य पूर्ण होईल असे आश्वासन देत असत. बुवांना श्रीदत्तात्रेय भगवन्ताचा वरप्रसाद असल्यामुळे त्यांच्या कृपेमुळे सर्व लोकांच्या कामना पूर्ण होत असत. भगवान् श्रीदत्तात्रेयांनी या देवस्थानच्या संरक्षणार्थ आपले गण ठेविले होते. त्यामुळे तेथे येणाऱ्या लोकांपैकी कोणीही कसलाही गुन्हा केला; तरी तो तात्काळ उघडकीस येत असे.

या काळात प्रतिवर्षी श्रीगुरुद्वादशीस व श्रीदत्तजयंतीस माणगाव येथे मोठा उत्सव होऊ लागला. त्यावेळी या उत्सवांमध्ये आठ ते दहा हजारांपर्यंत अन्नसंतर्पण होत असे. श्रीयक्षिणी देवीच्या धर्मशाळेत उत्सवाच्या वेळी स्वयंपाक करण्याची प्रथा होती. जर एखाद्या वेळी आचारी मिळाला नाही; तर गावातील सर्व मंडळी मिळून स्वयंपाक करून सर्वांना अन्नदान करीत असत. हे सर्व कार्य अत्यन्त प्रेमाने व अगदी व्यवस्थित रीतीने चालेले होते.

या दोन्ही उत्सवांच्या वेळी पालखी पूर्ण होण्यास एखाद्या वेळी पहाटही होत असे. पालखीचा अपूर्व सोहळा पाहण्यासाठी भक्त लोकही इतके जमत असत की, प्रसाद वाटण्याकरिता तीन-चारशे नारळ फोडले; तरी प्रसाद पुरत नसे. पालखी संपली की, आरतीला सुरुवात होत असे. त्यावेळी शंभर-दोनशेपर्यन्त पिशाच्चग्रस्त स्त्री-पुरुषांच्या अंगात येऊन ते आरडाओरड करीत असत व तेथील खांबांना चिकटून राहत असत. आरती संपल्यावर सर्वांना सारखा प्रसाद वाटण्यात येत असे. प्रसादाच्या बाबतीत पक्षपात करण्याचे

धैर्य कोणालाही होत नसे; कारण तशा प्रकारे प्रसाद वाटताना कोणी पक्षपात केल्यास देव लगेच बुवांना इशारा देऊन अशा प्रकारे पक्षपात करणाऱ्याची कानउघाडणी करीत असत. हे सर्वांना माहीत असल्यामुळे बुवांचा सर्वांना फार दरारा वाटत असे.

श्रीभगवान् दत्तात्रेय बुवांना जे जे आदेश ज्या ज्या वेळी देत असत ते ते आदेश अंमलात आणून त्या त्या वेळी माणगाव येथील कार्यक्रम बुवा करीत असत. हे आदेश कधी कधी स्वप्नात; तर केव्हा केव्हा जागेपणीही मोठ्या आकाशवाणीच्या किंवा अन्यही काही प्रकारांनी होत असत व त्या आदेशांप्रमाणे बुवा वागत असत. मात्र काही आदेशांबद्दल व त्याच्या कार्याबद्दल संशय उत्पन्न झाला की, बुवा देवाजवळ प्रार्थना करीत असत. अशा प्रकारे त्यांनी प्रार्थना केली की, त्यांच्या प्रश्नाला लगेच उत्तर मिळत असे. केव्हा केव्हा या आदेशांबद्दलचे काही निर्णय आणावकर पिशाच्चाकडूनही होत असत. देवच आपल्या भक्ताची महती वाढविण्याकरिता अशा प्रकारे आदेश देऊन त्याप्रमाणे विविध कार्ये करवून घेत होते यात काही शंकाच नाही.

बुवांची अशी श्रद्धा व भावना होती की, माणगावातील देवस्थानाचा उगम हा श्रीक्षेत्र नरसोबावाडीच्या देवस्थानामधूनच झाला असल्यामुळे ते त्याच्या अंतर्गतच आहे. त्यामुळे रुपयाच्या आतील उत्पन्न ते माणगाव येथील देवस्थानच्या खर्चा करिता ठेवून घेऊन त्याच्या वरील उत्पन्न श्रीक्षेत्र नरसोबावाडीस पाठवीत असत. बुवांचे श्रीक्षेत्र नरसोबावाडीवर जे अत्यधिक व उत्कट प्रेम होते त्याचे हे प्रतीकच होते.

पालखीचे दिवस वगळले तर दररोज रात्री देवापुढे भजन होत असे. बुवा भजनामध्ये उत्साहाने भाग घेत असत. भक्तीमध्ये ते केव्हा केव्हा एवढे तल्लीन होत असत की, त्या अवस्थेमध्ये ते

देवापुढे अत्यंत प्रेमाने, आनंदाने व उत्साहाने नाचत असत. बुवांची ही भक्ती पाहून भजन करणाऱ्यांच्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागत. आपणही बुवांच्या प्रमाणेच देवाची भक्ती तल्लीन, बेभान व एकरूप होऊन केली पाहिजे असे त्यांना वाटत असे. भक्तीचा एक अपूर्व आदर्श त्यांच्यापुढे मूर्तिमंत होऊन नाचत होता. देवही सदेह होऊन भक्तिप्रेमाने त्यांच्या बरोबर नाचत असावेत असे वाटे. देवाच्या सेवेसाठी त्यांच्या भक्तीला अखंड बहर आलेला होता. बुवांच्या अंत:करणातून भक्तीचे स्रोत रात्रंदिवस वाहत आहेत व त्यात आपण आकंठ बुडत आहोत, असेच दृश्य तेथील लोक सतत अनुभवीत होते; कारण देवाच्या पूजेच्या वेळी सर्व उपचार ते अत्यंत व्यवस्थितपणे समर्पण करीत असत. त्यात थोडीसुद्धा हयगय ते होऊ देत नसत. या भक्तीच्या पोटीच एक वर्षी त्यांनी रोज स्वत:च्या हातांनी नवे जानवे तयार करून ते देवाला समर्पण करावयाचे असे ठरविले व हा नियम त्यांनी खंड न पाडता शेवटास नेला. देवानेही भक्ताने आपल्यासाठी केलेल्या या नियमाची पूर्तता व्हावी म्हणून आंतरिक साहाय्य देऊन त्याने ठरविलेले व्रत पूर्ण करवून घेतले.

देवळाच्या परिसरात पंचवीस-तीस कुत्री जमा झाली होती. देवाच्या परिवारात जशी माणसे असतात तशीच ही कुत्री आहेत असे मानून या दृष्टीनेच त्यांच्याकडे लक्ष दिले जात असे. या कुत्र्यांना कोणीही मारीत नसे. त्यांना अत्यंत प्रेमाने वागविले जाई. त्यांना तेथे खावयालाही भरपूर मिळत असे. या शिवाय एका भक्ताने आणून दिलेल्या दोन गायीही तेथे होत्या. या कुत्र्यांची व गायींची सर्व सेवा एक सेवेकरी नित्य करीत असे. या गायींचे दूध व तूप देवाच्या पूजेसाठी व नैवेद्यासाठी वापरण्यात येत असे.

देवाचे वैभव चढते वाढते असावे व त्याच्या भक्तिप्रेमाचा सर्वांना लाभ व्हावा म्हणून गृहस्थाश्रमी माणसाच्या घरातून जसे सणवार केले जातात तसे सर्व सणवार येथे चैत्र पाडव्यापासून साजरे केले जात असत. बायकानांही त्यांच्या सणाच्या वेळी बोलावून आणून त्यांना हळदी-कुंकू देणे, त्यांच्या ओटचा भरणे इत्यादी सर्व कार्यक्रम मोठ्या उत्साहाने व हौशीने बुवा करवून घेत असत. या सर्व गोष्टींमुळे स्त्रियाही देवस्थानच्या कार्यक्रमात अत्यंत भक्तिभावाने व प्रेमाने रस घेत असत.

बुवांचा सर्व दिवस देवाच्या सेवेत व भक्तीत जात असल्यामुळे घरचा खर्च चालविण्यासाठी त्यांना उत्पन्नासाठी दुसरा कोणताही व्यवसाय करणे शक्य नव्हते व अशा प्रकारे उत्पन्नासाठी काही व्यवसाय किंवा भिक्षुकी करणे त्यांच्या स्वभावाला पटत नव्हते व मनाला मानवत नव्हते. भक्तिप्रेमात रंगून गेल्यामुळे घर, संसार, उत्पन्न इत्यादी सर्व गोष्टी त्यांच्या लेखी अगदी नगण्य होऊन गेल्या होत्या. वास्तविकपणे देवापुढे नारळ, केळी, धान्य वगैरे पदार्थांचे ढीगच्या ढीग पडत असत; परन्तु बुवांनी या पदार्थांकडे कधी ढुंकूनही पाहिले नाही. जरी घरी उत्पन्नाचे इतर कोणतेही साधन नसले; तरी बुवा पूर्णपणे निर्लोभी, निरभिलाषी व अनासक्त होते. हे सर्व अमूर्त गुण समूर्त होण्यासाठी बुवांच्या आश्रयाला येऊन राहिले होते. त्यांच्या या अपूर्व व अलौकिक गुणांमुळे बुवांचे साधुत्व कोटीसूर्यप्रमाणे सर्वत्र झळाळत होते. असे असले; तरी तेथील सर्व व्यवस्था पाहणारे सर्वश्री सवनीस, आणावकर इत्यादी मंडळी व अन्य प्रेमी मंडळी मोठ्या आग्रहाने मंदिरातील श्रीदत्तमूर्तीपुढे येणाऱ्या उत्पन्नातील चौथा हिस्सा बुवांच्या घरी पाठवून देत असत.

श्रीक्षेत्र गाणगापूर येथे गेल्यावर पिशाच्चग्रस्त लोकांची पीडा जाते तसाच अनुभव त्यावेळी लोकांना माणगावच्या श्रीदत्तमंदिरात

येऊ लागला होता. दररोज आरतीच्या वेळी धूप घातल्यावर, तेथे आलेल्या शे–दीडशे पिशाच्चग्रस्त लोकांची एकच आरडाओरड सुरू होई. बुवांनी मंदिराच्या दक्षिणेला आणि उत्तरेला, असलेल्या जमिनीत एकेक खांब रोवला होता. ही माणसे त्या खांबांना चिकटून राहत असत. शके १८०५ मध्ये बांधण्यात आलेले मंदिर फार लहान होते. नंतर आवश्यकतेनुसार त्यात बदल व वाढ करण्यात आली. जुन्या देवळाचा राणी इंदिराबाई होळकर यांनी जीर्णोद्धार केला. त्यामुळे मूळ देवळाचा आता मागमूसही राहिला नाही, असे म्हटले तरी चालेल. मात्र देवळाच्या दक्षिणेला आणि उत्तरेला रोवलेले हे दोन खांब राहिले आहेत. हे खांब साधारण चार फूट उंचीचे, जाडजूड व दीर्घकाल टिकणाऱ्या शिशवीसारख्या लाकडाचे असावेत. त्यामुळेच आजपर्यंत ऊनपावसाचा मारा खात त्यांनी टिकाव धरला असावा. हे खांब आता फार जुने झाले आहेत. त्यातील लाकडाचे तंतून् तंतू स्पष्ट दिसावयाला लागले आहेत. तरी सुद्धा ते अद्याप बळकट आहेत. राणीने मंदिरासमोर ऐसपैस सभामंडप बांधला आहे. मंदिराच्या वर जावयाला समोरच्या बाजूने लोखंडी जिना आहे. मंदिराच्या गर्भागारात श्रीदत्तात्रेय, प. प. श्रीटेंबेस्वामी-महाराज यांच्या दोन संगमरवरी मूर्ती आहेत. श्रीशंकराचार्यांचीही एक मूर्ती तेथे आहे. देवालयामध्ये आणि सर्व परिसरात विजेचे दिवे आहेत. जुनी विहीर आता चुनासिमेंटने पक्की बांधून तिच्यावर विजेचा पंप बसविण्यात आला आहे. गुरुद्वादशीसारख्या उत्सवांच्या वेळी बराच स्वयंपाक होतो. त्याकरिता ईशान्य बाजूला गोमंतका-तील एक भक्ताने एक धर्मशाळा बांधली आहे. ही धर्मशाळा अद्याप अस्तित्वात आहे. धर्मशाळेच्या भिंती चिकणमातीच्या, ओबडधोबड व फार जाड आहेत. छप्पर जुन्या पद्धतीच्या कौलारू नळयांनी शाकारलेले आहे. अर्थात् आज अस्तित्वात असलेले सगळे नळे

श्रीस्वामीमहाराजांच्या वेळेचे नसतील. या धर्मशाळेच्या स्वयंपाक घराचा भाग सोडला; तर सर्व धर्मशाळा एक लांबलचक सभागृहच आहे. मध्ये वाटोळे व पुरुषाच्या कवेत मावतील एवढे मोठे दगडी खांब आहेत. सध्याच्या मंदिराचे पुजारी श्री. उकिडवे या धर्मशाळेचा निवासस्थान म्हणून काही दिवस उपयोग करीत होते. श्रीस्वामीमहाराजांच्या मूळ घराच्या चौथऱ्यावर होळकरांच्या राणीने जे माडीचे चिरेबंदी घर बांधले आहे त्याचा वापर सध्या कोणीही करीत नाही. तळमजल्यावर श्रीस्वामीमहाराजांच्या पादुका असून हे घर बंद असते. माडीला दोन्ही बाजूंना गच्ची आहे. सध्याचे पुजारी श्री. विष्णू गणेश उकडिवे यांच्या पितामहांना श्रीथोरल्यास्वामीमहाराजांना पाहण्याचे भाग्य लाभले होते. राणीने नवीन वास्तू बांधल्यावर पुजारी श्री. उकिडवे यांना तेथे राहण्याचा आग्रह केला होता. श्रीस्वामीमहाराजांबद्दल वाटणाऱ्या आदरापोटी व कदाचित् सन्याशाच्या घरात गृहस्थाश्रमी माणसाने राहणे योग्य नाही या भावनेने श्री. उकिडव्यांनी श्रीस्वामीमहाराजांच्या घरात राहणे पसंत केले नाही. मंदिराच्या ईशान्येकडच्या धर्मशाळेचाच ते वापर करीत असतात.

बुवांनी बांधलेल्या देवळासमोर एक औदुंबर वृक्ष आपोआप उगवला होता. तो मोठा झाल्यावर त्याला पार बांधून तेथे श्रीदत्तपादुकांची स्थापना करण्यात आली. हा औदुंबर आजही अस्तित्वात आहे. हा वृक्ष फळांनी सदा बहरलेला असतो. या औदुंबराच्या पारावर ज्या पादुका स्थापन करण्यात आल्या आहेत त्यांची नित्यपूजा झाल्यावर त्यांच्यावर इतर लोकांच्या पूजा, अभिषेक वगैरे ब्राह्मणाकडून सोवळ्यात करून घेण्यात येत असत. मात्र मंदिरातील मूर्तीशी बुवांवाचून इतर कोणाचा संबंध येत नसे.

एक दिवस नित्याप्रमाणे बुवा या पादुकांची नित्याची पूजा करीत

होते. एवढ्यात एक मोठा साप तेथें आला. सापाला पाहताच आजूबाजूचे लोक भिऊन पळून जाऊ लागले. त्यांना धीर देऊन बुवा असे म्हणाले की, "अरे असे घाबरून पळता काय? तो सुद्धा तुमच्यासारखेंच देवाचे दर्शन घ्यावयाला आला आहे. दर्शन घेऊन तो निघून जाईल." बुवांच्या हृदयात सर्व प्राण्यांबद्दल जी निर्वैर भावना होती त्या भावनेचा परिणाम त्या सर्पावर होऊन तो कोणालाही न दुखविता निघून गेला.

या औदुंबराला कोणी शिवू नये असा दंडक होता. फक्त ब्राह्मण मंडळी सोवळ्याने त्याची पूजा करीत असत. एकदा बुवांच्या अनुपस्थितीत मराठ्याचा एक मुलगा त्या औदुंबराला शिवला. त्याबरोबर कोठून कोण जाणे, एक सर्प तेथें आला आणि त्याने त्या मुलाला दंश केला. मुलगा तात्काळ बेशुद्ध होऊन पडला. बुवा परत आल्यावर त्यांना ही गोष्ट कळली. तोपर्यंत मुलाला तेथेच ठेवले होते. बुवांनी मुलाच्या पालकांना देवांची क्षमा मागावयाला सांगून देवांची अशी प्रार्थना केली की, "मुलाकडून अजाणतेपणी अपराध घडला आहे. करुणानिधान अशी आपली बिरुदावली आहे. आपण या बालकाला क्षमा करावी" अशी प्रार्थना करताच एवढा वेळ बेशुद्ध असलेला तो मुलगा शुद्धीवर आला व पुढे चांगला बरा झाला.

आश्विन वद्य द्वादशीच्या दिवशी माणगावच्या श्रीदत्त मंदिरामध्ये पहिली गुरुद्वादशी साजरी होणार होती. मंदिरामध्ये भल्या पहाटेपासून कामाला सुरुवात झाली होती. सकाळपासून श्रीदत्तमंदिराकडे लोकांची रीघ लागली होती. पूजेसाठी हजारोंचा जनसमुदाय लोटला होता. नेहमीच्या शनिवारच्या पालखीला चारपाच हजारांचा समुदाय जमत असे. आजच्या गर्दीची गोष्ट वेगळीच होती. सकाळचे आन्हिक उरकून बुवा मंदिरामध्ये श्रींची पूजा करीत होते. यक्षिणी देवीच्या धर्मशाळेत भंडाऱ्याचा प्रसाद शिजत होता. गावातील लोकच

सेवाभावाने आचाऱ्याचे आणि वाढप्याचे काम करीत असत. पूजा आटोपली. नैवेद्यासाठी आज पुरणपोळी केली होती. बुवांनी देवाला नैवेद्य दाखवावयाला सुरुवात केली आणि ते कासावीस झाले. त्यांचा श्वास रोखला गेला. काय होत आहे हे कोणालाच कळेना. अतिश्रमांनी बुवांना थकवा आला असेल असे लोकांना वाटले. पण बुवा घशामध्ये काहीतरी अडकल्यासारखे करीत होते. एकच धावपळ झाली; पण गर्भागारात जाऊन चौकशी कशी करावयाची? आत बुवांशिवाय दुसऱ्या कोणालाच प्रवेश नव्हता. त्यामुळे सर्वांनी मिळून देवांची प्रार्थना करावयास सुरुवात केली. एवढ्यात कोणीतरी ओरडले "देवांच्या नैवेद्यात पुरणपोळीबरोबर तूप ठेवलेले नाही." तुपाची वाटी नैवेद्यात ठेवताच बुवांचा घसा मोकळा झाला. देवांना कोरडा नैवेद्य दाखविला म्हणून बुवांच्या घशाला त्रास झाला होता. आपले बुवांच्यावर किती प्रेम आहे व देवभक्ताचे ऐक्य कसे असते याचे सर्व समाजाला दर्शन घडावे म्हणून देवांनीच ही अघटित घटना घडवून आणली होती.

कोकणात आश्विन महिन्यात पुष्कळदा पाऊस पडतो. महाराष्ट्रात इतरत्रही तो पडतो. माणगावमध्ये प्रथमच साजऱ्या होणाऱ्या या गुरुद्वदशीचा प्रसाद घेण्यासाठी आलेल्या हजारो लोकांच्या पंक्ती दत्तमंदिरापासून यक्षिणीच्या मंदिरापर्यंत व आजूबाजूला बसल्या होत्या. जेवणाला सुरुवात होणार एवढ्यात बारीक बारीक पाऊस पडू लागला व त्याचा जोर उत्तरोत्तर वाढू लागला. यामुळे सर्व लोक अत्यंत चिंताग्रस्त झाले. आता पावसामुळे जेवणाचा सर्व कार्यक्रम विस्कळीत होणार असे सर्वांना वाटू लागले. त्यावेळी सर्व मंडळींनी पावसाचे हे संकट दूर करण्याबद्दल बुवांना विनंती केली. लोकांना पक्की खात्री होती की, बुवा यावर काहीतरी उपाय काढतीलच व या संकटातून मार्ग निघेलच. लोकांची

विनंती ऐकून बुवा असे म्हणाले की, "तुम्ही ज्याप्रमाणे प्रसाद घेण्यासाठी आला आहात त्याप्रमाणे प्रत्यक्ष पर्जन्यराजच येथे प्रसाद घेण्यासाठी आला आहे. तो आला तर आपण सर्वांनी त्याचे स्वागतच केले पाहिजे. बरे तर ! काही हरकत नाही. एक मोठा नैवेद्य वाढून तो त्याला दाखवा म्हणजे तो जाईल." बुवांनी असे सांगितल्यावर एक मोठा नैवेद्य पावसाला दाखविण्यासाठी आणला. बुवांनी नैवेद्य वरुणराज देवतेला दाखवून त्या देवतेची अशी प्रार्थना केली की, "आपण यावेळी येथे आलात तर सर्वांचे फार हाल होतील व भोजन–प्रसादाचा सर्व कार्यक्रम विस्कळीत होऊन सर्व लोकांचा मोठा विरस होईल. तरी आपण लोकांची निराशा करू नये व सर्वांनी प्रसाद ग्रहण करीतपर्यंत येथे वृष्टी करू नये." ही प्रार्थना करताच त्या परिसरात इतरत्र सगळीकडे पाऊस पडला; पण देऊळवाडीमध्ये मात्र सर्वांचे भोजन उरकेपर्यंत पावसाचा एक थेंबही पडला नाही. वेदांमध्येही इंद्र, वरुण, उषा सूर्य इत्यादी देवतांच्या ऋषि मुनींनी प्रार्थनाच केल्या आहेत. त्यांच्या या प्रार्थनां-मध्ये इतके अपार बल सामाविलेले होते की, या सर्व देवतांवर त्यांची अधिसत्ता प्रस्थापित होऊन, त्यांच्या आज्ञेत राहून, ते म्हणतील त्याप्रमाणे वागण्यास त्या कटिबद्ध होत्या असे दिसून येते. या घटनेवरून हेही दिसून येते की, भारतातील ऋषिमुनींच्या दिव्य, अलौकिक व लोकोत्तर परंपरेतील बुवा हे एक महान् व अद्वितीय महापुरुष होते. त्याचप्रमाणे एकाग्रचित्ताने व मनापासून केलेल्या प्रार्थनेत इतके अपार बळ सामाविलेले असते की, देवताही त्यामुळ वश होऊन इष्टसिद्धी देण्यास तयार होतात. अत्यधिक नम्रतेने व करुणेने केलेल्या प्रार्थनेत अपार बळ असते हेच खरे !

याच काळात देवांनी बुवांना मराठीतील गुरुचरित्र हा ग्रंथ संस्कृतमध्ये लिहिण्याची आज्ञा केली. देवांची ही आज्ञा ऐकताच,

" हे काम माझ्याकडून कसे होईल ? " अशी शंका बुवांनी देवांपाशी प्रदर्शित केली. त्यावेळी देवांनी त्यांना असे सांगितले की, " तुम्ही लेखनिकाचे काम करा म्हणजे झाले. बाकी सर्व आम्ही पाहून घेऊ. ग्रंथ रचनेच्या कर्तृत्वाचा भार तुमच्यावर कशाला ? "

अशा प्रकारे देवांनी आश्वासन दिल्यावर ग्रंथ लिहिण्याचे काम बुवांनी सुरू केले. हे काम सुरू असताना एकदा श्री. नारोपंत उकिडवे तेथे आले. बुवा अत्यंत जलदगतीने एकामागून एक श्लोक लिहीत असल्याचे पाहून ते अगदी आश्चर्यचकित झाले. ते पाहून त्यांनी बुवांना असे विचारले की, "बुवा ! इतक्या जलद गतीने तुम्ही ग्रंथ लिखाणाचे काम कसे करू शकता ? मी तर असे लिखाण करताना अद्याप कोणालाही पाहिले नाही. आपली ही लिखाणाची गती पाहून मी अगदी दिङ्मूढ होऊन गेलो आहे." त्यांचे हे म्हणणे ऐकताच बुवा त्यांना असे म्हणाले की, " मी लिहिण्यास बसलो की, मला माझ्या दृष्टीसमोर मी जे श्लोक लिहीत आहे त्यातील अक्षरे स्पष्ट व स्वच्छ दिसू लागतात. ती मी लिहून काढतो. वास्तविकपणे या लिखाणात माझा काही संबंध नाही. " बुवांचे हे उत्तर ऐकताच श्री. नारोपंत उकडिवे व तेथे जमलेल्या सर्वांनाच मोठे आश्चर्य वाटले.

हा ग्रंथ लिहिण्याचे काम पूर्ण झाल्यावर एके दिवशी देवांनी बुवांना असे सांगितले की, "संहितेयं द्विसाहस्री." या वाक्याचा खूप विचार केल्यावर बुवांच्या असे लक्षात आले की, हे ग्रंथाचे नाव देवांनी सांगितले असून ही दोन हजार श्लोकांची श्रीगुरुचरित्र संहिताच आहे देवांच्या वाक्याचा हा अभिप्राय लक्षात घेऊन बुवांनी नूतन ग्रंथाची श्लोकसंख्या मोजून पाहिली; परंतु ती काही दोन हजार भरली नाही. त्यामुळे देवांच्या वरील उक्तीचा बोध होण्यासाठी बुवांनी पुन्हा देवांची प्रार्थना केली. त्यावेळी देवांनी असे सांगितले की, "दुर्गासप्तशती ग्रंथाप्रमाणे मोजून पाहावे. " देवांची

ही आज्ञा ऐकताच बुवांनी उवाच, अर्धे श्लोक इत्यादी सर्व घेऊन गणना केली तेव्हा ती संख्या बरोबर दोन हजार इतकी भरली. हे सर्व पाहताच बुवांना फार समाधान वाटले.

काही दिवसांनी द्विसाहस्री हा ग्रंथ बुवांनी पुन्हा एकदा वाचून पाहिला. त्यावेळी त्यांच्या असे लक्षात आले की, या ग्रंथात व्याकरणदृष्टचा काही चुका राहून गेल्या आहेत. त्या दुरुस्त करण्याचे ठरल्यावर देवांनी बुवांना असे सांगितले की, "पाणिनीचे व्याकरण एवढे एकच व्याकरण आहे का? सहस्ररश्मी सूर्यापाशी मारुतीने एकूण नऊ व्याकरणांचा अभ्यास केला होता. त्या व्याकरणांच्या दृष्टीने या ग्रंथात काहीही अशुद्ध नाही. सर्व शुद्धच आहे. हा ग्रंथ आम्हाला फार आवडला आहे. आता त्यात कोणताही फेरफार करण्याचे कारण नाही." देवांच्या आज्ञेप्रमाणे बुवांनी या ग्रंथात पुढे कोणताही वदल केला नाही.

ऋषिमुनी हे वेदांचे द्रष्टे होते; कारण जसे त्यांना वेदांचे दर्शन झाले तसे त्यांनी ते प्रकट केले. बुवांनीही द्विसाहस्री हा ग्रंथ या प्रमाणेच लिहिला. यावरून हे लक्षात येते की, द्विसाहस्री हा ग्रंथ वेदतुल्य असून त्याचे कर्तृत्व बुवांनी आपल्याकडे घेतले नाही. साधुपुरुष हे आपल्याकडे कोणत्याही लहानमोठ्या कर्माचे कर्तृत्व न घेता अनासक्त वृत्तीने ते देवाकडे कसे देतात हे या गोष्टीवरून दिसून येते व यातच त्यांचे साधुत्व दडलेले असते.

बुवांच्या ठिकाणी शास्त्रनिष्ठा, धर्मनिष्ठा, भक्तिप्रेम, साधु-सत्पुरुषांशी सौजन्यपूर्ण व्यवहार इत्यादी अनेक गोष्टींचा अपूर्व मिलाफ झाला होता. पुढील दोन-तीन गोष्टींवरून हे विशेषत्वाने दिसून येते.

दरवर्षी श्रीक्षेत्र नरसोबाच्या वाडीला जाताना बुवा आजऱ्यास

जाऊन तेथे श्री. आजरेकरबुवांना भेटून, त्यांच्यावरील प्रेमामुळे त्यांच्याकडे दोन-चार दिवस मुक्काम करून, मगच पुढे जात असत. श्री. आजरेकरबुवांचाही बुवांच्यावर अत्यंत लोभ होता. आपण कनोजी ब्राह्मण असल्यामुळे आपल्या हातचे खाणे बुवांना चालत नाही ही गोष्ट लक्षात घेऊन ते कोणाकडून तरी सांडगे, पापड, कुरडया इत्यादी बुवांना चालण्यासारखे व त्यांना आवडतील असे विविध पदार्थ तयार करवून घेऊन सोवळयात बाजूला ठेवून देत असत. बुवा मुक्कामाला आले की, या पदार्थांच्या द्वारा ते त्यांचा पाहुणचार करीत व बुवाही मोठ्या प्रेमाने त्याचा स्वीकार करीत असत. शास्त्रनिष्ठेचे पालन करीत असतानाही सौजन्याने व प्रेमाने व्यवहाराशी त्याची सांगड कशी घालावी हेच यावरून शिकण्यासारखे आहे.

अशाच प्रकारे एकदा श्रीक्षेत्र नरसोबावाडीस जात असताना बुवांना संध्याकाळी मुरगुड गावी मुक्काम करावा लागला. सायंकाळी संध्येची वेळ झाली म्हणून बुवा नदीवर संध्या करावयाला निघाले होते. वाटेत जाताता समोरून बरीच ब्राह्मण मंडळी संध्या करून बोलत बोलत परत येत असलेली दिसली. तो सर्व ब्राह्मण मंडळींचा समुदाय जवळ येताच बुवांनी तेथल्या तेथे रस्त्यातच त्या सर्वांना साष्टांग नमस्कार घातला. त्या सर्व मंडळींना बुवांचा उत्तम परिचय असून त्यांच्या योग्यतेची पूर्ण जाणीव होती. त्यामुळे अशा प्रकारे बुवा आपणा सर्वांना साष्टांग नमस्कार घ लून आपला सन्मान का करीत आहेत हे त्या मंडळींना समजले नाही व त्यामुळे त्यांना फार संकोच वाटला. त्या सर्वांनी, "अशा प्रकारे आपण आम्हा सर्वांना नमस्कार का केला ?" असे विचारताच बुवांनी त्यांना "विप्रौघदर्शनात् क्षिप्रे क्षीयंते पापराशयः ।" हा श्लोक म्हणून दाखवून ब्राह्मण मंडळींच्या समुदायाच्या दर्शनाने माणसाच्या पापराशी तात्काळ जळून जात असल्यामुळे त्यांना साष्टांग नमस्कार घालावा

असे शास्त्रवचन असल्याचे सांगून त्या सर्वांचे समाधान केले. या सर्व प्रकारावरून बुवांची शास्त्रनिष्ठा व त्यांचा ब्राह्मणांच्या बद्दलचा आदर किती पराकोटीच्या होता हे दिसून येते व सामान्यजनांना अनुकरणासाठी एक आदर्श उपलब्ध होतो.

याच गावात दुसऱ्या दिवशी सकाळी बुवा कोरडी भिक्षा मागण्याकरिता एका घरी गेले असता, त्या घरातील बाईने बुवां-सारखा एक महापुरुष आपल्याकडे भिक्षा मागण्यासाठी आला आहे. हे आपले महद्‌भाग्य असून, त्यांची आपल्यावर कृपा असल्याचे द्योतक आहे असे समजून, त्यांना सूपभर तांदूळ भिक्षा घालण्याकरिता आणले. ते पाहताच बुवा त्या बाईंना असे म्हणाले की, "तुमच्या घरी येणाऱ्या प्रत्येक भिक्षेकऱ्याला तुम्ही सूपभर तांदूळ भिक्षा म्हणून घालता का ? जर आपण प्रत्येकाला इतके तांदूळ न देता फक्त मूठभरच तांदूळ भिक्षा म्हणून देत असाल; तर मलाही फक्त एक मूठभर तांदूळ भिक्षा म्हणून घाला." बुवांची ही निःस्पृहता व निर्लोभी वृत्ती पाहून त्या बाई अगदी थक्कच झाल्या. अधिक नको म्हणणारा भिक्षेकरी त्यांनी उभ्या जन्मात पाहिला नव्हता. हे सर्व अपूर्व होते. अलौकिक होते. सामान्यांना अगोचर व न पेलण्या-सारखे होते. बुवांच्या रूपाने या भूमीवर क्वचित् अगदी क्वचित्च असे दृश्य अवतरित होते. त्या भाग्यवान् बाईने ते अनुभविले.
"तरी विरक्तीवांचूनि कहीं। ज्ञानासि तगणेंचि नाहीं ॥१५·३६॥
हा श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी ज्ञानेश्वरीत प्रस्थापित केलेला अमर सिद्धान्त बुवांनी आपल्या कृतीने मूर्तिमंत साकार केला हेच खरे !

देवभक्तांचे माणगावला आगमन झाल्यानंतर तेथील मातीचा कणन् कण ईश्वर भक्तीने निनादू लागला. त्यानन्तर तेथे ईश्वर भक्तीच्या आनंदाचा जो बाजार भरला तो लुटण्यासाठी उत्सुक असलेल्या भक्तवृंदांचे अत्रिनंदन भगवान् श्रीदत्तात्रेय कल्याण करोत !

अध्याय नववा

भूवैकुंठ माणगाव :–

माणगावच्या श्रीदत्तमंदिरामध्ये कागलची मूर्ती स्थापन झाली. या मूर्तीवर होणारे सर्व सोपस्कार फक्त बुवा स्वतःच करीत. गर्भागारात इतरांना प्रवेश नव्हता. पालखीसाठी वेगळ्या मूर्तीची गरज भासू लागली तेव्हा आणखी एक मूर्ती बनवून घेण्यात आली. हीच उत्सवमूर्ती सध्या माणगावला आहे. ती सावंतवाडीमध्ये बनविण्यात आली होती. ही मूर्ती बनवीत असताना सुरुवातीसच विघ्न आले. ओतकाम करताना मूर्ती घडवावयाची मूसच फुटली. त्यामुळे श्रीशास्त्रीबुवांना फार वाईट वाटले. त्यावेळी मूर्ती पुन्हा तयार करताना विघ्न नको म्हणून त्यांनी श्रीदत्तमहारांजाची प्रार्थना केली. यावेळी ओतकाम व्यवस्थित होऊन उत्तम मूर्ती तयार झाली. स्वारीसाठी लागणारी पालखी, चवरी, मोरचेल, काठ्या इत्यादी सामान सावंतवाडीमध्येच तयार करून घेऊन मूर्ती त्या पालखीतून वाजत गाजत, समारंभपूर्वक माणगावला आणण्यात आली. नंतर मूर्तीची अर्चा म्हणजे प्राणप्रतिष्ठा करावयाचे ठरले. हा एक अत्यंत आवश्यक विधी होता. सर्व वैदिक व शास्त्रीमंडळी ठरलेल्या मुहूर्तापूर्वीच देवळात येऊन पोहोचली होती. या समारंभासाठी गावातील तसेच आजूबाजूच्या सावंतवाडी वगैरे गावातून प्रतिष्ठित मंडळी आली होती. मोठा जनसमुदाय जमला होता. अनेकांनी सुगंधी पुष्पमाला, सुगंधी द्रव्ये, इतर पूजा साहित्य, दक्षिणा व धनधान्य आणले होते. मूर्तीची विधिपूर्वक अर्चना झाल्यावर आपण आणलेली सामुग्री भक्तिपूर्वक देवाला अर्पण करण्याची संधी प्रत्येकजण पाहत होता. श्री. रामभाऊ सबनीस सर्व कार्यक्रमावर देखरेख करण्यासाठी सर्वांच्या पूर्वी हजर होते.

श्री. आणावकरही आले होते. सर्व तयारी झाली. आता श्रीशास्त्रीबुवा आचमन करून संकल्प करणार एवढ्यात श्री. आणावकर मोठ्याने बोलावयाला लागले. त्यावेळी ते बोलत नव्हते; तर त्यांच्या अंगात समंध येऊन तो असे सांगू लागला की, "या दुसऱ्या मूर्तीची स्वतंत्रपणे अर्चना करण्याचे कारण नाही." हे एकताच सर्वजण तटस्थ झाले आणि ऐकू लागले. सगळीकडे शांतता पसरली. श्री. आणावकरांच्या मुखातून येणारे शब्द स्पष्ट ऐकू येत होते. "अर्चकस्य तपोयोगादर्चनस्यातिशायनात्। अभिरूप्याच्चबिंबानां देवः सान्निध्यमृच्छति। या शास्त्रवचनाप्रमाणे येथें अर्चक श्रीवासुदेवशास्त्री सदाचार संपन्न आहेत आणि मंदिरातील अर्चनही आजपर्यंत यथाशास्त्र चालू असून मंदिरातील मूर्तीसुद्धा यथोक्त सौंदर्यसंपन्न आहे. त्यामुळे येथे निश्चितच देवांचा वास आहे. पूर्वस्थापित मूर्तीला या नवीन मूर्तीचा नुसता स्पर्श केला तरी पुरे आहे. अन्य कोणताही विधी करण्याचे कारण नाही."

हे शास्त्रवचन बुवांना काय ठाऊक नव्हते? शास्त्रवचनाप्रमाणे सर्व गोष्टी येथे चालू आहेत हे दुसऱ्या अधिकारी व्यक्तीच्या मुखातून येणे आवश्यक होते. श्री. आणावकरांच्या समंधाबद्दल श्रीशास्त्रीबुवांना आदर होता. तेथे जमलेल्या सर्व लोकांनाही त्यांच्याबद्दला आदर वाटत होता. समंधाने केलेली सर्व शास्त्रीय विधाने विद्वानांना मान्य होती. त्यामुळे समंधाच्या सांगण्याप्रमाणे मंडळींनी श्रीशास्त्रीबुवांची समजूत घातली व उत्सवमूर्तीचा अर्चाविधी न करता कागलच्या मूर्तीला नुसता स्पर्श करून "श्रीगुरुदेवदत्त" च्या गजरात नवीन मूर्तीची महापूजा झाली.

त्यानन्तर तिसऱ्याही एका मूर्तीची आवश्यकता भासू लागली. देवांनी माणगावला जणू भक्तीचा संसारच थाटावयाचा असा संकल्प केला होता. एक दिवस देवांनी बुवांना असा आदेश दिला

की, "प्रवासात पूजेसाठी एक वेगळी मूर्ती तयार करून घ्यावी." हा आदेश ऐकताच बुवांनी देवांना असे सांगितले की, "येथे श्रीदत्त-मंदिरामध्ये आपणास जे सर्व उपचार होतात त्याप्रमाणे प्रवासात सर्व उपचार करून आपली पूजा करणे शक्य होणार नाही." श्रीशास्त्रीबुवांचे हे म्हणणे ऐकताच देवांनी त्यांना असे सांगितले की, "प्रवासात मला फक्त स्नान घालून भस्म लावले तरी चालेल." आपले म्हणणे देवांनी मान्य केल्याचे पाहून त्यांना फार समाधान वाटले. त्यांनी देवांच्या आज्ञेप्रमाणे प्रवासातील तिसरी मूर्ती तयार करवून घेण्याचे ठरविले.

बुवांनी जरी तिसरी मूर्ती प्रवासातील पूजेसाठी करवून घ्यावयाचे ठरविले असले; तरी ही तिसरी मूर्ती त्यांच्याकडे अनायासानेच आली. त्याचे असे झाले. वालावलीचा एक सोनार वेदोक्त कर्म करीत असे. त्याला या कर्मापासून निवृत्त करण्याचा श्रीवासुदेव-शास्त्र्यांनी प्रयत्न केला; पण त्या सुवर्णकाराला त्यांचा सल्ला मानवाला नाही व तो आपल्या मर्जीप्रमाणे कर्म करीतच राहिला. एकदा चोरीचा माल आपल्या घरात लपवून ठेवण्याच्या आरोपावरून पोलिसांनी त्याला पकडले. त्यावेळी श्रीशास्त्रीबुवांचा सल्ला न मानल्याबद्दल त्याला पश्चात्ताप झाला. या आरोपातून आपली सुटका व्हावी म्हणून त्याने आपल्याला पकडून नेणाऱ्या शिपायांना पैसे देऊ करून ठाण्यावर जाण्यापूर्वी श्रीशास्त्रीबुवांची भेट घेतली व कृतकर्माबद्दल क्षमा मागितली. त्याला खरोखरच पश्चात्ताप झाल्याचे पाहून श्रीशास्त्रीबुवांनी त्याच्यावरील संकट निवारण होण्यासाठी देवांची प्रार्थना केली. त्यामुळे देवांच्या कृपेने तो त्या आरोपातून सुटला. नंतर एकदा तो कोल्हापूरला गेला असताना परत येते वेळी त्याने श्रीराम, श्रीकृष्ण व श्रीदत्तात्रेय यांच्या तीन मूर्ती आणल्या. तीनही मूर्ती बुवांकडे नेऊन तो त्यांना असे म्हणाला की, "बुवा!

या तीन मूर्तींपैकी आपणास आवडेल ती मूर्ती आपण स्वत:पाशी ठेवून घ्या." पण बुवांनी कोणतीही मूर्ती स्वीकारली नाही. त्या रात्री देवांनी बुवांना स्वप्नात असे सांगितले की, "प्रवासात वापरण्यासाठी दत्तमूर्ती त्या सोनाराकडून घ्यावी." अशा तऱ्हेने बुवांजवळ आता तीन श्रीदत्तमूर्ती झाल्या. याशिवाय देवळातील पादुका जोड व पालखीच्या वेळी डोक्यावर घ्यावयाचा वेगळा पादुका जोड, असे दोन पादुका जोडही होते. दर शनिवारी व उत्सवाच्या वेळी उत्सवमूर्तीवर बुवांचे बंधू श्री. हरिभट यांच्याकडून महापूजा करून घेण्यात येत असे. पुढे ज्यावेळी बुवांनी माणगाव कायमचे सोडले त्यावेळी कागलची मूर्ती व प्रवासात सोबत घ्यावयाची मूर्ती अशा दोन्हीही मूर्ती त्यांनी आपल्या बरोबर नेल्या.

माणगावला आता गाणगापूरसारखे माहात्म्य प्राप्त झाले होते. श्रीशास्त्रीबुवांना सांगूनच भगवान् श्रीदत्तात्रेय सात वर्षे वास्तव्य करण्यासाठी माणगावी आले होते. या सात वर्षातील एका आश्विन वद्य द्वादशीची म्हणजेच गुरुद्वादशीची ही गोष्ट आहे. श्रीपाद श्रीवल्लभ यांचा गमन दिवस म्हणून या दिवसाला श्रीदत्तसंप्रदयात फार महत्त्व आहे. माणगाव येथेही हा उत्सव दरवर्षी जसा मोठ्या प्रमाणावर साजरा होत असे तसा तो यावर्षीही होत होता.

त्या दिवशी भल्या पहाटेपासून श्रीदत्तमंदिरामध्ये धावपळ व गडबड चालू होती. शांत वृत्तीचे श्रीवासुदेवशास्त्री हे आज गडबडीमध्ये दिसले. दुपारी महापूजा होऊन समाराधना व्हावयाची होती. सकाळपासूनच लोकांची मंदिराकडे रीघ लागली होती. माणगावच्या मुख्य रस्त्यापासून श्रीदत्तमंदिराकडे जाणारी पाणंद लोकांनी भरून गेली होती. देवळाच्या कोठीमध्ये धान्याची, भाज्यांची, नारळसुपारीची आणि गुळाची रास येऊन पडत होती. एवढ्या लोकांना आवरून त्यांची सोय करता करता, भंडाऱ्याची व्यवस्था पाहता

पाहता आणि मंदिराच्या एकूण व्यवस्थेकडे नजर ठेवता ठेवता श्री. रामभाऊ सबनीसांची त्रेधा उडत होती. श्री. रामभाऊ ही व्यवस्था निःस्पृहपणे व सेवाभावाने करीत. त्यांच्या बरोबर सेवा करण्याची संधी मिळाली म्हणून आजूबाजूला कित्येक लोक मिळेल ते काम करावयाला तत्पर होते; पण एवढे असूनही जबाबदारीचे ओझे श्री. रामभाऊंच्या डोक्यावरून कमी होत नव्हते. नेहमीच्या उत्सवाला जेथे दहाहजारांपर्यंत जनसमुदाय जमत असे, त्या ठिकाणी गुरुद्वादशीसारख्या उत्सवाला केवढी गर्दी होणार या कल्पनेनेच श्री. रामभाऊंची छाती दडपून जात होती. एवढ्या लोकांसाठी प्रसाद म्हणून भंडारा शिजविण्यासाठी कितीतरी भक्तगण खपत होते. एरवीच्या उत्सवांच्या वेळी श्रीयक्षिणीदेवीच्या धर्मशाळेत स्वयंपाकाची सिद्धता होत असे; पण आज ही व्यवस्था तोकडी पडणार म्हणून देवीच्या मंदिराच्या बाजूला जमिनीमध्ये मोठा चर खणून त्याचा चुला बनविण्यात आला होता. त्या चरातील लाकडांच्या अखंड धगधगत्या आगीवर, एकापुढे एक अशी पितळेची मोठमोठी भांडी चढविण्यात आली होती. भात, वरण, खीर आणि जमा झालेल्या सर्व भाज्यांची मिश्रभाजी अशा हंड्या चुल्यावर चढल्या होत्या. एका बाजूला सुस्नात सवाष्ण बायकांपैकी कोणी नारळ खोवीत होत्या तर कोणी भाज्या चिरीत होत्या.

भाविक मंडळी येत होती. देवासमोर साष्टांग नमस्कार घालून सोबत आणलेला शिधा, नारळ, भाजीपाला व जे काही असेल ते देवापुढे ठेवून बाहेर जेथे मिळेल तेथे जागा धरून बसत होते. देवापुढे ठेवलेले जिन्नस गोळा करून कोठीमध्ये जमा करण्यात सेवेकरी तत्पर होते. उत्सवासाठी येणाऱ्या भाविकांमध्ये बायाबापड्या होत्या, म्हातारी कोतारी होती, लेकुरवाळ्या होत्या आणि सदा उत्साही मुले होती. सर्व मंडळी सकाळी स्नान करून,

मोठ्या उत्साहाने या सोहळ्यासाठी आली होती. मुलांच्या दृष्टीने मोठी यात्राच होती ती ! त्यांच्या उत्साहाला सीमा नव्हती. त्यांना सांभाळता सांभाळता त्यांच्या आयांची धांदल होत होती. श्रीशास्त्रीबुवांच्या दैनंदिन व्यवहारामध्ये मात्र कोणत्याच प्रकारचा बदल झाला नव्हता. थोडी अधीरता दिसून येत होती एवढेच ! त्यांच्याकडे बारकाईने पाहणारालाच हा बदल दिसून आला असता. सागरासारख्या धीरगंभीर प्रकृतीच्या श्रीशास्त्रीबुवांच्या मनाची चलबिचल करणारी अशी कोणती गोष्ट घडत होती ?

मंदिरामध्ये आणि मंदिराच्या परिसरात पावित्र्य राखण्याकडे बुवांचा मोठा कटाक्ष होता. बुवा जरी भक्तिप्रेमाने रंगून गेलेले होते; तरी ते तितकेच कडक शिस्तीचे व स्वच्छतेचे भोक्ते होते. प्रत्येक कार्य दक्षतेने, काळजीने, नीटनेटकेपणे, शुद्धतेने, स्वच्छतेने व अत्यन्त उत्तमरीतीने पार पाडले पाहिजे असा त्यांचा कटाक्ष असे. या बाबतीत त्यांना कोणीही व कसलीही हयगय किंवा गडबड केलेली खपत नसे. तेथील सर्व संबंधित मंडळींना हे माहीत असल्यामुळे प्रत्येकजण या बाबीकडे कटाक्षाने लक्ष देत होता. दररोजची गोष्ट वेगळी; पण आजच्या या अफाट जनसमुदायावर लक्ष कोण ठेवणार ? बिचाऱ्या लेकुरवाळ्या बायकांच्या हातून येथील शिस्तीला व नियमाला बाधा येईल अशा कितीतरी गोष्टी अपरिहार्यपणे घडून येत होत्या. त्यातच त्या गर्दीत कोणीतरी देवाजवळ काही घाण केली. ती पाहताच बुवांचे चित्त विचलित झाले. त्यांची शांती अखेर ढळली व ते एकदम संतप्त होऊन रागाने त्या लोकांना टाकून बोलताना असे म्हणाले की, " देवाच्या आवारात कसलीही घाण होणे उचित नाही. येथे येणाऱ्या प्रत्येकाने जातीने लक्ष देऊन येथे कोणत्याही प्रकारची घाण होणार नाही व

स्वच्छता राहील याकडे कटाक्षाने लक्ष दिले पाहिजे. एवढी साधी गोष्ट तुम्हा लोकांना कळू नये हे एक आश्चर्यच आहे." आपली चूक झाल्यामुळे बुवा आपल्याला बोलले हे लक्षात घेऊन मंडळी गप्प बसली.

श्रीगुरुद्वादशीच्या उत्सवाला जमलेल्या भक्त मंडळींना एवढे बोलणे भाग पडल्यामुळे बुवांचा जो मानसिक क्षोभ झाला त्यामुळे त्यांचे स्वास्थ्य पार बिघडून गेले. त्यांना असे वाटले की, आपण शिस्त, पावित्र्य व स्वच्छता याकरिता इतके कठोर बोलावयास नको होते; पण तसे न केल्यास या जागेचे पावित्र्य व येथील शिस्त कशी टिकून राहणार असे वाटून त्यांच्या मनात मोठा गोंधळ उडून गेला.

आपल्या एका भक्ताने आपल्याच दुसऱ्या भक्तांना रागाने बोलणे देवांना एकदम अमान्य होते; कारण आपल्या भक्तिप्रेमाने प्रेरित होऊन ही सर्व भक्त मंडळी उत्सवासाठी आलेली असल्यामुळे त्यांच्या हातून अनवधानाने जराशी शिस्त विघडली, थोडीशी घाण झाली व किञ्चितशी अव्यवस्था झाली; तर त्यासाठी आपल्या भक्तांच्या अंतःकरणाला लागेल असे बोलणे देवांना बिलकूल आवडले नाही.

यामुळे देवांनी बुवांना समज देण्याचे मनात आणले. एकाएकी मेघगर्जनेप्रमाणे गंभीर स्वरात पुढील शब्द श्रीशास्त्रीबुवांच्या कानावर आले. "अरे! येथे उत्सवासाठी जमलेल्या माझ्या भक्तमंडळींना थोड्याशा चुकीसाठी तू किती बोलतोस! त्यांच्या अंतःकरणाला झोंबेल अशा प्रकारे बोलणे चांगले नाही. ही सर्व भक्तमंडळी माझ्या भक्तीने प्रेरित होऊनच येथे आली आहेत. त्यांचा मला अभिमान आहे."

देवांनी गंभीरवाणीने अशी सूचना दिल्यामुळे श्रीवासुदेव-

शास्त्र्यांना फार वाईट वाटले. ते एकदम गंभीर व अंतर्मुख झाले. एकंदर सर्व घटनेवरून देवांनी आपली परीक्षा घेण्यासाठीच हा प्रसंग निर्माण केला होता याची त्यांना आता खात्री पटली. देवांच्या परीक्षेला आपण उतरलो नाही याचा त्यांना खेद झाला. त्या दिवशी हा सर्व सोहळा पूर्ण होईपर्यंत मग ते कोणाशी फारसे बोलले नाहीत. दुपारी अभिषेक पूजा झाल्यावर देवांना नैवेद्य अर्पण करण्यात आला. मंदिराच्या आवारात आणि श्रीयक्षिणीच्या देवळापर्यंतच्या परिसरात दुतर्फा पंगती बसल्या. सर्वांनी भंडाऱ्याचा महाप्रसाद आनंदाने व श्रद्धायुक्त अंतःकरणाने ग्रहण केला. शेवटची पंगत जेवून उठेपर्यंत दिवस मावळावयाला आला होता. हा महान् सोहळा स्वर्गातून देवगण आतुरतेने पाहत होते. या महाप्रसादातील एखादा कणतरी आपल्या वाट्याला यावा या इच्छेने त्यांनी आकाशात दाटी केली होती. असंख्य पक्षांच्या रूपाने त्यांनी लोकांनी जेवून टाकलेल्या उष्ट्या पत्रावळींवर झडप घातली. गावातील कुत्री-मांजरी सुद्धा जेवून तृप्त झाली. हा सोहळा संपेपर्यंत एकसारखा घंटा-नाद होत होता. हा घंटानाद श्रीदत्तमंदिरातील नव्हता किंवा तो श्रीयक्षिणीच्या देवळातील घंटानादही नव्हता. हा घंटानाद लौकिक नव्हता. तो अलौकिक होता. या परिसरात जमा झालेल्या ब्रह्म-निष्ठांच्या अस्तित्वाचा तो सूचक होता. तो सर्वांना थोडाच ऐकू येणार ? बुवांना तो ऐकू येत होता. त्यांनी जाणले की, कोणत्या ना कोणत्या तरी रूपाने आज येथे ब्रह्मनिष्ठांचे आगमन झाले आहे. पण एवढे होऊनही बुवांच्या वृत्ती उल्हसित झाल्या नाहीत. देवांच्या परीक्षेला आपण उतरलो नाही याचाच त्यांना खेद वाटत राहिला.

संध्याकाळी आरती झाल्यावर पालखी सजविण्यात आली. उत्सव-मूर्ती मोठ्या थाटाने पालखीत ठेवण्यात आली. एवढ्यात श्रीयक्षिणी देवीची पालखी श्रीदत्तमंदिरासमोर आली. पालखीपुढे " धन्यधन्य

हों प्रदक्षिणा सद्गुरुरायाची " हा प्रदक्षिणेचा अभंग सुरू झाला. मग एक दोन भक्तीपर पदे झाली. भलोबांनी तबल्यावर साथ धरली होती. पालखी दक्षिणेच्या बाजूला आली आणि थांबली. संगीत भजने आणि पदे म्हणावयाची चढाओढ लागली होती. भजने झाली, पदे झाली व अभंगही झाले. भक्तवृंदामध्ये देवांच्या पालखीपुढे संगीत सेवा करण्याची अहमहमिका लागली होती. पालखी देवळाच्या पश्चिम भागी आली. देवळाला एक पूर्ण प्रदक्षिणा घालावयाला काही तास लागले. अशा तऱ्हेने पालखीच्या तीन प्रदक्षिणा होऊन पहाटे दोन अडीच वाजता हा सोहळा संपला.

बुवांना आपल्या शिस्तीच्या व स्वच्छतेच्या आतिरेकामुळे आपल्या हातून घडलेल्या प्रमादाची जाणीव ज्या क्षणी " किती बोलतोस, इतके बोलणे चांगले नाही. " असे देवांनी सांगितले, त्या क्षणीच होऊन, त्या क्षणापासूनच त्यांनी मौन धारण केले. परंतु उत्सवाच्या गडबडीत ही गोष्ट कोणाच्या लक्षात आली नाही. मात्र उत्सव संपल्यावर जेव्हा ही गोष्ट सर्वश्री सबनीस, आणावकर यांच्या लक्षात आली तेव्हा त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला. ज्यावेळी त्यांनी या संबधी त्यांना विचारले त्यावेळी त्यांनी त्यांना पाटीवर असे लिहून दाखविले की, " प्रायश्चित्त व तप म्हणून आजपासून मौनव्रताचा अंगिकार केला असून वर्षभर हे व्रत चालू राहील व पुढील श्रीगुरुद्वादशीला ते पूर्ण करीन. " पुढे वर्षभरात लोकांना काही विशेष सांगावयाचे झाल्यास ते पाटीवर लिहून दाखवीत असत. कालौघात ज्यावेळी पुढील वर्षाची श्रीगुरुद्वादशी आली त्यावेळी आपणाकडून मागील वर्षी श्रीगुरुद्वादशीच्या दिवशी झालेल्या प्रमादाबद्दल देवांपुढे पुनःपुन्हा क्षमायाचना करून त्यांनी आपले मौनव्रत सोडले.

श्रीदत्तमंदिरामध्ये श्रीदत्तजयंतीचा उत्सव चालू होता. पारण्याच्या

दिवशीची गोष्ट. सर्वमंडळी प्रसादाच्या जेवणासाठी पानावर बसली होती." हरहर महादेव " म्हणून पाणी सोडले; पण काही ग्रामस्थ लोकांनी जेवण्यास विरोध दर्शविला. बुवांचे मौन होते. प्रश्नांकित मुद्रेने ते या मंडळींकडे पाहू लागले. गावकऱ्यांपैकी एकजण म्हणाला; "हे श्रीदत्तमंदिर माणगावमध्ये आहे. या श्रीदत्तमंदिरावर गावाचाही काही अधिकार आहे. या मंदिराचे ठोक उत्पन्न श्रीक्षेत्र नरसोबाच्या वाडीला जाते व किरकोळ उत्पन्नावर मंदिराचा खर्च चालतो. तरी या उत्पन्नाचा काही वाटा गावालाही मिळाला पाहिजे. ही अट मान्य असेल तरच आम्ही जेवणाला स्पर्श करू; अन्यथा पंगत न जेवताच उठल. "

माणगावचे मंदिर हे श्रीक्षेत्र नरसोबाच्या वाडीचाच एक भाग आहे, एवढेच नव्हे; तर आपल्या देवस्थानचा उगम तेथूनच असल्यामुळे या देवस्थानचे स्वतंत्र अस्तित्व मानावयाचे नाही, अशी श्रीशास्त्रीबुवांची भावना होती. त्यामुळे येथील खर्चाकरिता रुपयाच्या आतील उत्पन्न काढून घेऊन रुपयाच्या वर येणारे उत्पन्न ते श्रीक्षेत्र नरसोबाच्या वाडीला पाठवीत असत. अशा स्थितीत ग्रामस्थ मंडळींनी आपणाला देवस्थानच्या उत्पन्नातून काही वाटा मिळाला पाहिजे असा वाद उत्पन्न केल्यामुळे मोठा पेचप्रसंग निर्माण झाला. श्रीशास्त्रीबुवांचे प्रायश्चित्तार्थ वर्षभराचे मौन चालू असल्यामुळे तेही या प्रसंगी काही बोलू शकत नव्हते. सुदैवाने यावेळी सावंतवाडी संस्थानचे कारभारी वगैरे मोठी अधिकारी मंडळी तेथे हजर होती. या क्षणी काही गोष्टी आपल्या हातात घेऊन अधिकारवाणीने निर्णय घेणे भाग आहे, असा विचार करून कारभारीमंडळी त्या लोकांना उद्देशून असे म्हणाली की, "लोक हो ! तुम्ही म्हणता ते खरे आहे. श्रीदत्तमंदिर व श्रीशास्त्रीबुवा हे दोन्हीही माणगावचे व आमच्या संस्थानचे अत्यंत श्रेष्ठ असे भूषण आहेत. त्यामुळे माणगावचे

व पर्यायाने सावंतवाडी संस्थानचे नाव संपूर्ण महाराष्ट्राच्या मुखी झाले आहे. मात्र श्रीदत्तप्रभूंच्या इच्छेनेच या सर्व गोष्टी घडत आहेत हे आपण कधीही विसरणे योग्य होणार नाही. श्रीक्षेत्र नरसोबाच्या वाडीला येथून जी सेवा श्रीशास्त्रीबुवा रुजू करीत आहेत ती सर्व सेवा आपणा सर्वांतर्फे होणारी योग्य व उचित अशी सेवा आहे. या सेवेत खंड पाडून श्रीदत्तप्रभूंचा रोष आपण सर्वांनी आपल्यावर ओढवून घ्यावयाचा आहे काय? श्रीदत्तभूंचा रोष म्हणजे काय ते तुम्ही सर्वजण जाणता आहात. आम्ही तो स्पष्ट करून सांगण्याची आवश्यकता आहे असे वाटत नाही. म्हणून सध्या ज्याप्रमाणे सेवा चालली आहे तशीच ती याही पुढे चालू राहील. तुम्हा लोकांची या गोष्टीला काही हरकत नसावी अशी आमची इच्छा आहे. बोला, तुमचा निर्णय काय आहे?" हे ऐकताच पंगतीतील सर्व ग्रामस्थ मंडळी खाली मान घालून मुकाटचाने जेवावयाला लागली व हे प्रकरण येथेच संपले.

दुसरा असाच एक पेचप्रसंग आठव्या प्रकरणात वर्णन केल्या-प्रमाणे पालखी संबंधाने निर्माण झाला होता. श्रीदत्तमंदिरामध्ये पालखी काढावयाला सुरुवात झाल्यापासूनची अशी प्रथा होती की, गावच्या श्रीयक्षिणीदेवाची पालखी प्रथम श्रीदत्तमंदिराजवळ येऊन मग श्रींची पालखी प्रदक्षिणेसाठी बाहेर निघत असे.

श्रीशास्त्रीबुवांचे मौन सुटल्यानंतरची ही एका रात्रीची घटना आहे. श्रींच्या मिरणुकीसाठी पालखी सजून तयार होती. पालखीचा खांब विविध रंगांच्या सुगंधी पुष्पमालांनी सजविला होता. भालदार चोपदार हातामध्ये मानदंड घेऊन उभे होते. चवऱ्या ढळत होत्या. पालखीमध्ये उत्सवमूर्ती विराजमान झाली होती. पालखीमागे दहाहजारांचा जनसमुदाय श्रीदत्तनामाचा घोष करीत व भजन करीत उभा होता. नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे श्रीयक्षिणीदेवीची

पालखी श्रीदत्तमंदिरासमोर यावयाला आज विलंब लागला होता. तेथे जमलेले सर्व लोक मोठ्या उत्सुकतेने श्रीयक्षिणीदेवीच्या पालखीची वाट पाहत होते; परन्तु जेव्हा पालखी लवकर येईना, तेव्हा काही जण लगवगीने धावत श्रीयक्षिणीच्या मंदिराकडे गेले. श्रीयक्षिणीदेवीची पालखीसुद्धा सजून तयार होती. पालखी वाहणारे आणि देवीचे मानकरी पालखी भोवती स्तब्ध उभे होते.

त्यावेळी बोलवावयाला आलेले लोक त्या सर्वांना उद्देशून असे म्हणाले की, "मानकरी! चला चला, घाई करा. श्रींच्या पालखीला उशीर होत आहे. सर्व मंडळी देवीच्या पालखीची अधीरतेने वाट पाहत आहेत."

"देवीची पालकी आज जांवची नाय, भटाक जावन सांगा. जखिण देवी माणगावची ग्रामदेवता. दत्ताची पालकी अगोदर देवीकडे यौक व्हयी, देवी दत्ताकडे जावंची नाय."

हे ऐकताच सर्वजण अवाक् झाले. एवढ्या दिवसांची प्रथा आज बंद व्हावयाची वेळ आली होती. हजारो माणसांचा आज हिरमोड होणार होता. ही बातमी श्रीशास्त्रीबुवांच्या कानांवर गेली. बुवा लगेच देवीच्या देवळात गेले आणि देवीसमोर साष्टांग नमस्कार घालून तिला असे म्हणाले की, "माते! तुझ्याच प्रेरणेने आणि आशीर्वादाने आजपर्यंत ही सेवा चालली आहे. तू आणि भगवान् श्रीदत्तमहाराज यांना तर मी अभिन्नपणे पाहतो. आज हे हजारो लोक तुझी सेवा करण्यासाठी उत्सुकतेने येथे जमा झाले आहेत. त्यांच्या भक्तीची तुला आवड नसेल; तर तुझ्या इच्छेप्रमाणेच होऊ दे. तुझी इच्छा हीच आमची सर्वांची इच्छा."

बुवा त्याच पावली श्रीदत्तमंदिराकडे परत गेले. त्यांच्या चेहऱ्यावर रोषही नव्हता आणि चिंताही नव्हती. ते अगदी निर्विकार होते. त्या दिवशी मग देवांची पालखी देवीच्या पालखीशिवाय निघाली.

सर्वांना चुकल्या चुकल्या सारखे वाटले. पालखीच्या वेळी व्हावयाचे सर्व सोहळे झाले; पण आज लोकांचा नेहमीचा उत्साह दिसून आला नाही. पालखीच्या तीन प्रदक्षिणा आज नेहमीपेक्षा लवकर पूर्ण झाल्या. सकाळी नेहमीप्रमाणे बुवा आपल्या दैनंदिन कामाला लागले. आता ते बाहेर जाणार एवढ्यात देवीचे मानकरी धावत श्रीदत्तमंदिराकडे आले आणि श्रीशास्त्रीबुवांच्या पुढे त्यांनी लोटांगण घातले.

त्यानन्तर उभे राहून हात जोडून देवीचे मानकरी त्यांना असे म्हणाले की, "बुवा ! आमी तुमका शरण इलवसा. शरणागताक अभय आसाचा. आमची चुकी झाली. आमका क्षमा करा."

हे ऐकताच श्रीशास्त्रीबुवा त्यांना असे म्हणाले की, "उठा मानकरी, काय झाले ? तुम्ही असे घाबरलेले का दिसता ?"

त्यावेळी क्षमायाचना करताना सर्व मानकऱ्यांनी त्यांना असे वचन दिले की, "बुवा ! रात्री स्वप्नात देवीने आम्हांला दृष्टांत दिला. देवी आमच्यावर फार रागावली आहे. देवीच्या पालखीची आजपर्यंत जी प्रथा होती तशीच ती चालू ठेवावी अशी देवीची आज्ञा आहे. देवीने आम्हाला आपली क्षमा मागावयाला सांगितली आहे. आमच्या चुकीबद्दल आपण आम्हा सर्व गरिबांना क्षमा करावी. आम्ही आपणास असे वचन देतो की, आम्ही मूळची प्रथा पुढे चालवू. त्यात ढवळाढवळ करणार नाही." श्रीवासुदेवशास्त्र्यांना आदल्या रात्रीच या घटनेची माहिती देवांकडून कळली होती. त्यानंतर मात्र दरवेळी पहिल्याप्रमाणेच देवीची पालखी श्रीदत्त मंदिरासमोर प्रथम येऊ लागली.

श्रीवासुदेवशास्त्री नरसोबाच्या वाडीला होणाऱ्या प्रमुख तीन उत्सवांपैकी सवडीप्रमाणे कोणत्या तरी एक-दोन उत्सवांना दरवर्षी जात असत. त्यातील पहिला चैत्र अमावस्येला श्रीनारायणस्वामींचा

उत्सव, दुसरा आश्वीन वद्य द्वादशीला गुरुद्वादशीचा उत्सव व तिसरा मार्गशीर्ष पौर्णिमेला श्रीदत्तजयंतीचा उत्सव होत असे. अशाच एका उत्सवासाठी श्रीशास्त्रीबुवा आपल्या आईला घेऊन श्रीक्षेत्र नरसोबावाडीला गेले होते. तेथे ते श्रीनारायणस्वामींच्या देवळाला लागून जो धर्मशाळा होती तेथे उतरले होते. त्यावेळी ती धर्मशाळा अतिशय जुनी झालेली व मोडकळीस आलेली होती. ती केव्हा कोसळून पडेल याचा नेमच नव्हता. एके दिवशी रात्री देवांनी रमाबाईंच्या स्वप्नात येऊन असे सांगितले की, "ही जागा आता पडावयास झालेली असल्यामुळे ती दुरुस्त करावयाची आहे. तरी तुम्ही तावडतोब ही जागा सोडून दुसरीकडे राहावयास जा." सकाळी उठल्यावर रमाबाईंनी आपल्याला पडलेले स्वप्न श्रीशास्त्री-बुवांना सांगितले. ते ऐकताच ते आईला असे म्हणाले की, "जागा सोडण्याबद्दल देवांनी तुला स्वप्नदृष्टान्त देऊन सांगितले; पण मला काही तसे सांगितले नाही. जर देवांनी आपणास तसे सांगितले तरच आपण हे बिऱ्हाड दुसरीकडे हलवू, अन्यथा येथेच राहू." इतके बोलणे झाल्यानन्तर जागा सोडून देण्याचा व बिऱ्हाड हलविण्याचा विचार सोडून देऊन श्रीशास्त्रीबुवा स्वस्थ राहिले. इतकेच नव्हे; तर जागा ताबडतोब खाली करण्याचे काहीच प्रयोजन नाही असेच त्यांना वाटले.

इकडे बुवा स्वस्थ राहिले; तरी देवाला आपल्या भक्ताची-काळजी होती. आपल्या भक्ताच्या मातुश्रीला स्वप्नात सांगूनही ती ऐकत नाही हे पाहिल्यावर त्याच दिवशी रात्री देवाने श्रीशास्त्री-बुवांना त्याच्या आईप्रमाणेच ताबडतोब जागा खाली करण्याचा स्वप्नात आदेश दिला.

दुसऱ्या दिवशी सकाळी श्रीशास्त्रीबुवांनी आपले नित्याचे स्नान-संध्यादी अनुष्ठान आटोपून भोजन केल्यानंतर त्या धर्मशाळेतून

आपले सामान बाहेर काढण्यास सुरुवात केली. ते सर्व सामान बाहेर घेऊन येतात न येतात तोच ती धर्मशाळा कोसळून पडावयास सुरुवात झाली. धर्मशाळा कोसळत आहे व श्रीशास्त्रीबुवा आपले सामान घेऊन आईसह बाहेर आले आहेत हे पाहून तेथे बरीच मंडळी जमा झाली.

आपले सर्व सामान घेऊन ज्यावेळी श्रीशास्त्रीबुवा बाहेर आले त्यावेळी धर्मशाळेच्या समोरच्या कट्ट्यावर श्रीमौनीस्वामीमहाराज बसलेले होते. त्यांनी त्यावेळी श्रीशास्त्रीबुवांना एकदम असे विचारले की, "काय शास्त्रीबुवा ! सर्व सामान घेऊन आपण बाहेर आलात; पण येताना देव का आणले नाहीत ?" श्रीमौनीस्वामीमहाराजांचे हे म्हणणे ऐकताच श्रीशास्त्रीबुवांच्या लगेच असे लक्षात आले की, देवांचा संपुष्ट धर्मशाळेतच राहिला आहे. त्यावेळी तेथे जमलेल्या सर्व मंडळींची नजर चुकवून व लोकांच्या गडवडीचा फायदा घेऊन श्रीशास्त्रीबुवा मोठ्या धैर्याने देवांचा संपुष्ट आणण्याकरिता कोसळणाऱ्या धर्मशाळेच्या एका बाजूने आत गेले. त्यावेळी ज्या भिंतीला लागून देवांचा संपुष्ट ठेवला आहे, तेवढी भिंतच शिल्लक राहिली आहे, असे त्यांच्या लक्षात आले. ते पाहून त्या विलक्षण मनस्थितीतही त्यांच्या चित्ताला कमालीचे समाधान वाटले. ते चटकन् पुढे गेले व भिंतीपाशी असलेला देवांचा संपुष्ट घेऊन बाहेर आले. श्रीशास्त्रीबुवा देवांचा संपुष्ट घेऊन बाहेर येतात न येतात तोच इतका वेळ देवाच्या कृपेनेच केवळ तग धरून उभी असलेली ती भिंतही खाली कोसळली. देवांची ही अतर्क्य लीला पाहून तेथे जमलेली सर्व मंडळी तर कमालीची आश्चर्यचकित झाली होतीच; पण श्रीशास्त्रीबुवा सुद्धा देवांच्या या प्रेमपूर्ण व्यवहारामुळे मनोमन अगदी भारावून गेले होते. श्रीमौनीस्वामीमहाराजांकडून अचानक व अनपेक्षितपणे सूचना देऊन त्यांनी भक्तासाठी देव कसा धावून जातो हे सर्व जगाला

दाखवून दिले. देवांच्या या अपूर्व प्रेमामुळे श्रीशास्त्रीबुवा अगदी सद्‌गदीत होऊन गेले.

एका वर्षी पाऊस न पडल्यामुळे सर्वत्र अवर्षण पडले होते. कृष्णेचे पाणी पार आटून गेल्यामुळे लोक अगदी हवालदील झाले होते व शेतकऱ्यांची तोंडे पार सुकून गेली होती. आपल्यावरील संकट दूर होण्यासाठी सर्वांनी देवाकडे धाव घेतली. एकंदर सर्व परिस्थिती पाहून त्यावेळी अवर्षण दूर होऊन सर्वत्र पाऊस पडावा व सर्व समाजाचे कल्याण व्हावे म्हणून श्रीक्षेत्र नरसोबावाडी येथील पुजारी मंडळींनी श्रीदत्तपादुकांवर सन्ततधार अनुष्ठान म्हणजे सात दिवस रात्रंदिवस देवाला रुद्राभिषेक सुरू केला होता.

त्याच वेळी वरच्या बाजूला श्रीक्षेत्र नरसोबावाडीच्या पुजारी मंडळींनी सर्व लोकांच्या सहकार्याने नामसप्ताहही चालू केला होता. या नामसप्ताहाच्या ठिकाणी श्रीमौनीस्वामीमहाराज बसले होते. श्रीमौनीस्वामीमहाराज म्हणजे साक्षात् देवच अशी श्रीक्षेत्र नरसोबावाडीतील सर्व लहान-थोरांची भावना होती. त्यांचे मुलांशी अगदी प्रेमाचे नाते होते. ते मुलांमध्ये अगदी रंगून जात असत. ते मुलांना नेहमी खाऊ देत असल्यामुळे त्यांच्या सभोवार मुलांचा नेहमी घोळका असे.

असा हा दुहेरी कार्यक्रम चालू असताना जेथे श्रीमौनीस्वामीमहाराज नामसप्ताहास बसले होते तेथे काही मुले आली व त्यांनी आपल्या बालबुद्धीने त्यांना असे विचारले की, " स्वामीमहाराज ! आपल्या रूपाने येथे नामसप्ताहात साक्षात् देवच येऊन बसले आहेत; मग खाली संततधार कोणावर धरली आहे ? देव दोन ठिकाणी एकाच वेळी एकदम कसे राहतील ? " बालवृत्तीच्या श्रीमौनीस्वामीमहाराजांना त्यांचे म्हणणे एकदम पटले व ते त्या मुलांच्या समाधानाकरिता त्यांना असे म्हणाले की, " गड्यांनो !

तुम्ही म्हणता ते अगदी खरे आहे. तावडतोब आत्ताच्या आत्ता खाली जाऊन पुजाऱ्यांना संततधार बंद करावयाला सांगा" हे ऐकताच मुलांनी खाली जाऊन श्रीमौनीस्वामीमहाराजांची आज्ञा पुजारी मंडळींना सांगितली. पण एकदा संकल्पपूर्वक सुरू केलेले अनुष्ठान पुजारी मंडळी तरी मध्येच कसे बंद करणार? त्यांनी मुलांचे हे म्हणणे न ऐकता संततधार तशीच चालू ठेविली. आपल्या सांगण्याप्रमाणे संततधार अनुष्ठान बंद न होता तसेच चालू आहे हे जेव्हा श्रीमौनीमहाराजांना कळले तेव्हा श्रीमौनीस्वामीमहाराज एकदम रागाने असे म्हणाले की, "देव इकडे वरती नामसप्ताहास बसलेले असताना त्यांच्यावर तुम्ही तेथे संततधार धरून त्यांना त्रास देत आहात, तेव्हा पाऊसच पडणार नाही जा. काय करावयाचे असेल ते करा."

श्रीमौनीस्वामीमहाराजांचे हे उद्गार ऐकताच सर्वांचे धाबेच दणाणले. सर्व लोक एकदम हताश होऊन गेले. श्रीस्वामींची वाणी म्हणजे प्रत्यक्ष श्रीदत्तप्रभूंचीच वाणी आहे, हे सर्वांना अनुभवाने माहीत झाले होते. आता काय करावयाचे? असा प्रश्न सर्वांच्या पुढे उभा राहिला. त्यावेळी श्रीमौनीस्वामीमहाराजांची समजूत घालावयाला श्रीवासुदेवशास्त्री ही एकच व्यक्ती समर्थ होती. या प्रसंगाच्या वेळी त्यांचा मुक्कामही श्रीक्षेत्र नरसोबावाडीतच होता. श्रीस्वामींच्या सांगण्यामुळे हताश झालेले सर्व लोक व पुजारी मंडळी त्यांच्याकडे गेली व त्या सर्वांनी श्रीमौनीस्वामीमहाराजांची समजूत काढण्याची त्यांना विनंती केली.

श्रीमौनीस्वामीमहाराजांनी देवांची प्रार्थना केल्याशिवाय आता पाऊस पडणार नाही तेव्हा काहीतरी युक्ती केल्याशिवाय भागावयाचे नाही हे ओळखून श्रीशास्त्रीबुवांनी पुजाऱ्यांना असे सांगितले की, "श्रीस्वामींचे मर्मस्थान मुले हेच आहे. तरी तुम्ही सर्वजण

आपली लहान मुले घेऊन श्रीस्वामीमहाराजांकडे जा व मुलांना त्यांच्या पायावर घालून अशी विनंती करा की, "स्वामीजी! पाऊस पडत नसल्याने आम्ही चिंतेत आहोत. आता या मुलांचा सांभाळ आमच्या कडून होणे शक्य नाही. तेव्हा ही मुले आता आम्ही तुमच्या स्वाधीन करीत आहोत. आपणच आता त्यांचा संभाळ करा." त्याप्रमाणे सर्व पुजारी मंडळी आपल्या लहान मुलांना घेऊन श्रीमौनी-स्वामीमहाराजांच्याजवळ गेले व श्रीवासुदेवशास्त्र्यांनी सांगितल्या-प्रमाणे त्यांनी मुलांना श्रीस्वामीमहाराजांच्या पायावर घातले. एवढ्यात श्रीवासुदेवशास्त्रीही तेथे आले. ते श्रीमौनीस्वामीमहा-राजांना असे म्हणाले की, "आपली आज्ञा होण्यापूर्वीच सुरू केलेले संततधारेचे अनुष्ठान मध्येच कसे बंद करता येणार? तरी आता या बाळगोपाळांसाठी आपण श्रीदत्तप्रभूंना पाऊस पाडण्यासाठी प्रार्थना केली पाहिजे." बालोन्मत्तपिशाचवत् श्रीमौनीस्वामींना हेही म्हणणे पटले व ते सर्वांना घेऊन खाली श्रीपादुकांजवळ गेले. तेथे त्यांनी देवांची अशी करुणा भाकली की, "या बाळगोपाळांसाठी पाऊस पाहिजे; तरी आपण लवकर पाऊस पाठवा." या वेळी आकाशात पावसाचे कोणतेही चिन्ह नव्हते; पण श्रीमौनीस्वामीमहाराजांनी प्रार्थना करताच ढग जमून पाऊस पडावयाला सुरुवात झाली. त्यामुळे सर्वत्र आनंदी आनंद झाला.

हळूहळू वाडीतील पुजारी मडळी आणि इतर लोकही श्रीवासुदेव-शास्त्र्यांना एक सत्पुरुष म्हणून ओळखू लागले होते. सर्वजण त्यांचा आदरही करीत असत; पण केव्हा केव्हा श्रीशास्त्रीबुवांची मजा करण्याची पुजाऱ्यांना लहर येत असे. श्रीक्षेत्र नरसोबावाडीला असताना दररोज पहाटे उठून श्रीदत्तपादुकांना पाणी घालण्याचा श्रीशास्त्रीबुवांचा नियम होता. ते वारंवार वाडीला जात असल्या-मुळे त्यांचा हा नेम पुजाऱ्यांच्या ध्यानात आला होता. एकदा

श्रीशास्त्रीबुवांच्या या नेमामध्ये खंड पाडून त्यांचा नेम मोडावयाचा असा तेथील पुजारी मंडळींनी निश्चय केला.

श्रीशास्त्रीबुवांचा नियम मोडण्यासाठी एक दिवस ते स्नान करून श्रीपादुकांना पाणी घालण्यास येण्यापूर्वीच रोजच्यापेक्षा पहाटेची काकड आरती व पूजा लवकर उरकून घ्यावयाची असे पुजारी मंडळींनी ठरविले. एकीकडे श्रीशास्त्रीबुवांसारखे प्रेमी भक्त तर दुसरीकडे प्रेमी पुजारी होते. मोठा मजेशीर खेळ चालला होता. पुजारी-देवांचे लाडके आणि श्रीशास्त्रीबुवाही देवांचे लाडके होते. पण यावेळी देव सुद्धा "ईश्वरस्याप्यभिमानद्वेषित्वाद्दैन्यप्रियत्वाच्च।" या देवर्षी श्रीनारदमहर्षींनी भक्तिसूत्रात सांगितल्याप्रमाणे पक्षपातीपणे वागले. देवाला अभिमानाबद्दल द्वेषभाव वाटत असल्यामुळे अर्थात् त्याला अहंकार आवडत नसल्यामुळे आणि दैन्य म्हणजे निरहंकार वृत्तीच प्रिय असल्यामुळे त्यांनी स्वप्नामध्ये श्रीशास्त्रीबुवांना असे सांगितले की, "उद्या पहाटे लवकर उठून श्रीपादुकांवर पाणी घालवे." देवांच्या आज्ञेप्रमाणे दुसऱ्या दिवशी पहाटें श्रीशास्त्रीबुवा लगबगीने उठले व गडबडीने स्नान करून त्यांनी सर्वांचा अगोदर श्रीपादुकांवर पाणी घातले; परन्तु देवांनी आपणास असे का सांगितले व देवांची पूजा आज लवकर का होत आहे, हे काही त्यांना कळले नाही.

ज्यावेळी श्रीशास्त्रीबुवांनी सर्वांच्या अगोदर श्रीपादुकांवर पाणी घातलेले सर्व पुजारी मंडळींनी पाहिले त्यावेळी ते सर्वजण फार खजील झाले. त्यांनाही श्रीशास्त्रीबुवा आजच नेमके लवकर पाणी घालावयास कसे आले यातील रहस्य कळले नाही. मात्र त्या सर्वांना एकंदर सर्व प्रकारामुळे फारच पश्चात्ताप झाला व त्यांनी खरी हकीकत श्रीशास्त्रीबुवांना सांगितली. पुजारी मंडळींनी सांगितलेली सर्व हकीकत ऐकल्यावर देवांनी आपल्याला लवकर उठण्यास का सांगितले याचा श्रीशास्त्रीबुवांना उलगडा झाला. अशा प्रकारे आपल्यावरील

देवांचे अपूर्व प्रेम पाहून व आपला नियम मोडू नये, म्हणून देवांनी आपल्यासाठी स्वप्नद्वारा जे कष्ट घेतले ते पाहून त्यांचे अंतःकरण अगदी हेलावून गेले. जो जो भक्त देवाला समर्पित होत जातो तो तो देव त्याच्या अधीन होत जातो. या समर्पणाच्या व अधीनतेच्या रहस्यमय प्रक्रियेतूनच प्राकृत व अप्राकृत अशा देव-भक्तांच्या किंवा गुरु-शिष्यांच्या दिव्य लीलेचा उगम होत असतो. श्रीशास्त्रीबुवा देवाच्या अंतरंग लीलेचे श्रेष्ठतम अधिकारी महापुरुष होते, हे अशा प्रकारे घडलेल्या कितीतरी घटनांवरून स्पष्टपणे दृग्गोचर झाल्याचे दिसून येते. सामान्य मानवाची दृष्टी ही अत्यंत स्थूल व सीमित असल्याने त्याची बुद्धी जडत्वाला ओलांडून किंवा प्राकृताला पार करून जाऊ शकत नाही. त्यामुळे या अप्राकृत लीलांचे रहस्य त्याच्या हाती लागत नाही. पराभक्तीचे हे अप्राकृत असे गंभीर रहस्य हाती येण्यासाठी समर्पित किंवा सर्वार्थाने शरणागत जीवन कसे असावे लागते हेच श्रीशास्त्रीबुवांच्या जीवनाकडे पाहिले म्हणजे कळून येते.

श्रीक्षेत्र नरसोबाच्या वाडीतील मुक्कामात एकदा नरक-चतुर्दशीच्या दिवशी सकाळी श्रीगोविंदस्वामी, श्रीशास्त्रीबुवा व श्री. शिवराम अष्टेकर असे तिघेजण बहिर्दिशेला जाण्यासाठी म्हणून बाहेर पडले. जाताना रस्त्यात त्यांना कांही पुजाऱ्यांची मुले भेटली. त्या मुलांना त्या तिघांना पाहताच मोठा आनंद झाला व त्यांनी त्यांना आपल्या जवळील देवाचा प्रसाद देऊ केला. त्यावेळी श्रीगोविंदस्वामी त्या मुलांना असे म्हणाले की, "आम्ही शौचासाठी बहिर्दिशेला निघालो आहोत. सध्या आमचा प्रसाद मठात नेऊन ठेवा. आम्ही स्नान करून आल्यानंतर तो घेऊ."

श्रीगोविंदस्वामींचे हे म्हणणे ऐकताच मुलेही एकदम आग्रही बनली. ती हट्टाला पेटून त्यांना असे म्हणाली की, "तुम्ही जर आत्ताच्या आत्ता प्रसाद घेत असला तरच तो देऊ. मठात काही

नेऊन ठेवणार नाही."

मुलांनी असे सांगताच श्रीगोविंदस्वामींनी असा विचार केला की, या मुलांच्या रूपाने देवच आपली परीक्षा पाहावयाला आले आहेत. ठीक आहे ! काही हरकत नाही ! त्यांच्या इच्छेप्रमाणे होऊ द्या. या विचाराप्रमाणे त्यांनी त्या मुलांच्याकडून, प्राप्त परिस्थितीत शास्त्राला बाधा येणार नाही व मुलांच्या रूपातील देवाचेही समाधान होईल, असा फळांचा प्रसाद मागून घेतला व तो तात्काळ भक्षण केला. श्रीगोविंदस्वामींनी प्रसाद घेतल्यावर श्रीशास्त्रीबुवा थोडेच मागे राहणार ? त्यांनीही मुलांच्याकडून फळांचा प्रसाद घेऊन त्याचे सेवन केले.

या दोघांबरोबर असलेल्या श्री. शिवराम अष्टेकरांनी मात्र प्रसाद न घेतल्यामुळे एक प्रकारे त्यांच्याकडून प्रसादाच्या अव्हेर होऊन अनादरच घडला. आपण बहिर्दिशेला निघालो असल्यामुळे या अवस्थेत प्रसाद घेणे व खाणे योग्य होणार नाही असा विचार त्यांनी केला खरा; परन्तु अशा प्रकारे देवाच्या प्रसादाचा त्यांच्याकडून अनादर घडल्यामुळे ते घरी गेल्यावर तापाने भयंकर आजारी पडले. प्रसादाचा अव्हेर केल्याने देवाने त्यांना ही एक प्रकारे शिक्षाच दिली होती; पण तेही देवांचे भक्तच असल्यामुळे त्यांना बरे करणेही देवाला आवश्यकच होते. ज्याप्रमाणे आई चुकीबद्दल मुलांना सुधारण्यासाठी शिक्षा करते; पण तीच नंतर त्यांना प्रेमाने जेऊ-खाऊ घालते त्याप्रमाणेच येथेही घडले. देव म्हणजे भक्ताची आईच! माउलीच ! त्याला आईपेक्षा दुसरी उपमाच शोभणार नाही. या आईच्या प्रेमानेच देवाने श्री. अष्टेकर यांच्या पत्नीस स्वप्नदृष्टान्त देऊन असे सांगितले की, "प्रसादाचा अवमान केल्याबद्दल देवाची क्षमा मागावी व एक लघुरुद्र करावा म्हणजे पतीला बरे वाटेल." देवाच्या या आज्ञेप्रमाणे श्री. अष्टेकरांच्या पत्नीने

पतीच्या वतीने देवाची अंत:करणपूर्वक क्षमा मागितली व प्रायश्चित्त म्हणून एक लघुरुद्रही केला. त्यामुळे श्री. शिवराम अष्टेकरांची प्रकृती पूर्ववत् उत्तम झाली. मात्र उभ्या आयुष्यात ते कधीही प्रसादाचा महिमा काय असतो हे विसरले नाहीत. साधकाने देवाच्या प्रसादाविषयी किती आदराची भावना ठेविली पाहिजे व आपल्या मनातील सोवळ्या–ओवळ्याच्या कल्पना किंवा परिस्थिती सापेक्ष–निरपेक्ष विचार बाजूला ठेवून प्रथम प्रसादाचा आहे त्या अवस्थेत स्वीकार केला पाहिजे, हेच या कथेवरून लक्षात येते. ::

नेहमीप्रमाणे श्रीक्षेत्र वाडीचा मुक्काम संपवून श्रीशास्त्रीबुवा माणगावला परत आले. त्यांची पुन्हा नेहमीप्रमाणे माणगावला श्रीदत्तमंदिरात देवांची पूजा सुरू झाली. कागलहून आणून माणगाव येथे स्थापन केलेल्या श्रीदत्तमूर्तीचे सर्व सोपस्कार श्रीशास्त्रीबुवा स्वत:च करीत असत. पूजा करताना त्यांच्यावर वेळेचे बंधन कधीच नसे; पण आज पूजेला नेहमीपेक्षा कितीतरी अधिक वेळ लागला होता. त्यामुळे त्यादिवशी आरतीसाठी तयारीत असलेल्या लोकांच्या असे ध्यानात आले की, आज श्रीशास्त्रीबुवा पूजेमध्ये विशेष रंगले आहेत. तसे ते रोजच पूजेमध्ये रंगून जात. पण आजची पूजा पाहणाऱ्याला असे वाटत होते की, जणूकाही मूर्ती त्यांच्याशी बोलत आहे व त्यांची पूजा प्रत्यक्ष स्वीकारीत आहे! कोणी सांगावे आज भगवान् श्रीदत्तात्रेय ज्योतिर्मय स्वरूपात प्रकट होऊन त्यांची पूजा ग्रहण करीत असतील! अखेर पूजा संपली. देवांना महानैवेद्य अर्पण करण्यात आला. आरतीला सुरुवात झाली. नेहमीच्या आरत्या म्हटल्या जात होत्या.

एवढ्यात श्रीशास्त्रीबुवांच्या तोंडून उच्च स्वरात शब्द आले. "जय मायामय कायत्रयपर यतिवर्या" लोक श्रीशास्त्रीबुवांकडे

२६

आश्चर्याने पाहू लागले. जयमायामय ही आरती भक्तांनी यापूर्वी कधीच ऐकली नव्हती. आरतीच्या तालावर टाळमृदंगाचा ठेका चालू होता. श्रीशास्त्रीबुवांच्या सर्वांगाबरोबरच हातामध्ये धरलेली आरतीसुद्धा थरथरत होती. नेत्र अर्धवट मिटलेले होते. नेत्रातून अश्रु-धारा वाहत होत्या. मुखातून उच्चस्वरात आरतीचे शब्द येत होते. त्यानंतर हळूहळू ही नवीन आरती पूर्ण झाली. पूजाही पूर्ण झाली. दुपारी श्रीशास्त्रीबुवांचे भोजन झाल्यावर त्यांना सकाळी पूजेच्या वेळी अंतःस्फूर्तीने बाहेर पडलेल्या आरतीची आठवण झाली. त्यांनी ही आरती मग हळूहळू त्यातील एक एक चरण स्मरण करीत लिहून काढली. आरती लिहून पूर्ण झाल्यावर ज्यावेळी त्यांनी ती समग्र वाचून पाहिली त्यावेळी त्यांना असे आढळून आले की, या आरती-मध्ये अहं ब्रह्मास्मि, तत्त्वमसि, प्रज्ञानं ब्रह्म व अयमात्माब्रह्म या चारही महावाक्यांचा अर्थ समाविष्ट झालेला आहे. आरतीची ही अपूर्व रचना पाहून श्रीशास्त्रीबुवांना फार विस्मय वाटला व अत्यन्त समाधानही वाटले.

सत्पुरुषांची अंतःप्रज्ञा जागृत झाल्यावर ईश्वरी कृपेने व इच्छेने अशाच दिव्य साहित्याची निर्मिती होत असते. या निर्मितीवरून आर्षवाणी कशी असते व वेद हे अपौरुषेय का आहेत याची कल्पना येऊ शकेल. ऋषी–मुनींना वेद ध्यानात जसे दिसले तसेच ते त्यांच्या मुखातून बाहेर पडले म्हणून त्यांना द्रष्टे म्हटले जाते. ऋषीमुनींप्रमाणे श्रीशास्त्रीबुवाही महान् द्रष्टेच होते व त्यांच्यावर अलौकिक ईश्वरी कृपा होती हे या घटनेवरून सिद्ध होते.

ईश्वराच्या प्राप्तीसाठी साधक जी साधना करतो त्या साधनेची योग आणि भक्ती अशी दोन अंगे आहेत. ही दोन्ही अंगे एकमेकांना पूरक आहेत. जो योगी आहे तो ईश्वराचा अनन्य भक्त होतो व भक्ताला योग आपोआप प्राप्त होतो. या दृष्टीने विचार केला;

तर श्रीशास्त्रीबुवांना लहानपणापासूनच या दोन्ही साधनांगांचे विलक्षण आकर्षण होते हे त्यांच्या जीवनचरित्रावरून स्पष्ट होते. मात्र त्यांच्या सर्व ग्रंथांचे आलोडन केले व त्यांचे सच्छिष्य महायोगी सिद्धयोगाचार्यवर्य श्रीसंत गुळवणीमहाराज यांनी त्यांच्यासंबंधी वारंवार कथन केलेल्या आपल्या श्रीगुरुवर्यांच्या साधनाच्या स्वाभाविक कलाचा विचार केला; तर असे म्हणावेसे वाटते की, हठयोगाभ्यासाकडे त्यांचा विशेष कल होता. भगवान् श्रीदत्तात्रेयांनी त्यांच्याकडून पुढे जी योगसाधना करून घेतली त्यावरूनही हे स्पष्ट होते.

श्रीशास्त्रीबुवांना लहानपणापासूनच योगाचे फार आकर्षण होते. त्यामुळे त्यांचा नित्य योगाभ्यास चालूच असे. एकदा योगाभ्यास करताना श्रीशास्त्रीबुवांकडून काही चूक झाली. त्यामुळे त्यांना उचकी लागली. ती काही केल्या थांबेना. या उचकीच्या त्रासामुळे श्रीशास्त्रीबुवा फार हैराण झाले. काही झाले तरी औषध घ्यावयाचे नाही असा त्यांचा निश्चय होता. त्यांचा हा दृढनिश्चय पाहून श्रीदत्तप्रभूंनी त्यांना असे सांगितले की, " आपण करीत असलेल्या योगाभ्यासात काही चूक झाल्यामुळे आपणास उचकी लागली आहे. तरी आपण कापशी या गावी जावे. तेथे एक मोजणीदार राहतात. त्यांच्या घराशेजारी एक पिंपळाचे झाड आहे. त्यांच्या घराची ही खूण लक्षात ठेवून आपण त्यांच्या घरी जा. तुम्ही तेथे गेलात म्हणजे ते तुम्हाला तुमच्या उचकीचे कारण सांगून त्यावर उपायही सांगतील. "

देवांच्या आज्ञेप्रमाणे श्रीशास्त्रीबुवांनी कापशी गावात जाऊन त्यांनी सांगितलेल्या खुणेवरून मोजणीदाराचे घर शोधून काढले व आपण देवांच्या आदेशाप्रमाणे आलो आहोत असे सांगून आपल्या येण्याचे कारणही त्यांना सांगितले; पण मोजणीदाराने आपणास

योगाची काहीच माहिती नसल्याचे सांगून "तुम्ही भलत्याच ठिकाणी आला आहात" असे ते म्हणाले. श्रीदत्तात्रेयांचाच आदेश असल्यामुळे उचकीवर इलाज मिळेपर्यंत व यासंबंधी काही तरी निर्णय होईपर्यंत आपण घरी परतणार नाही असे सांगून श्रीशास्त्रीबुवा त्या रात्री गावातील एका मंदिरामध्ये झोपले. मोजणीदारास रात्री देवांचा असा स्वप्नदृष्टांत झाला की, "तुमच्याकडे पाठविलेल्या शास्त्रीबुवांचे काम करा." दुसऱ्या दिवशी सकाळी श्रीशास्त्रीबुवा मोजणीदाराकडे पुन्हा गेले तेव्हा त्यांनी त्यांना एकान्तस्थानी नेऊन उचकीचे कारण व त्यावर उपाय सांगितला आणि कबीर धर्मदास संवादात्मक एक हिंदी पुस्तक देऊन अडचणीच्या वेळी त्या पुस्तकाचा उपयोग करावयाला सांगितले. तसेच त्यांनी श्रीतुलसीदासकृत योगासंबंधी दोह्यांची एक प्रतही श्रीशास्त्रीबुवांना दिली, असे श्री. गंगाधरपंत वैद्यांनी लिहून ठेविले आहे.

हठयोगातील खेचरीमुद्रा साध्य होण्यासाठी जिव्हाबंधाचे अर्थात् जिभेच्या खालील भागी असलेल्या शिराबंधाचे छेदन करावे लागते. हा अत्यंत जोखमीचा विधी असल्यामुळे निष्णात गुरूच्या देखरेखीखाली तो करावा लागतो. श्रीशास्त्रीबुवांचा जिव्हाबंध छेदण्यासाठी प्रत्यक्ष श्रीदत्तप्रभूंनीच त्यांना एक वनस्पती दाखवून तिचा उपयोग करावयाला सांगितले. त्या वनस्पतीच्या वापरामुळे त्यांच्या जिव्हाबंधाचे छदन लवकर व निर्विघ्नपणे झाले. श्रीशास्त्रीबुवांना खेचरीमुद्रा लवकर सिद्ध व्हावी म्हणून साक्षात् परमेश्वरच त्यांच्या पाठीमागे उभा राहिला. त्यामुळे खेचरीमुद्राच काय; पण कोणतीच गोष्ट त्यांना अशक्य कोटीतील राहिली नाही.

या योगाभ्यासाच्या प्रभावानेच श्रीशास्त्रीबुवांना सर्व सिद्धी वश झाल्या होत्या. कोणीही मनुष्य त्यांच्याकडे काही कामाकरिता किंवा काही बाधा निवारण करण्याकरिता उपाय विचारावयाला आला

की, ते तो माणूस जवळ आल्याबरोबर त्याला त्याचे काम काय आहे व तो कशाकरिता आला आहे हे अगोदरच ओळखून त्याने आपले काम सांगण्यापूर्वीच त्याला सांगत असत. श्रीशास्त्रीबुवांनी असे सांगितले की, त्यांच्याकडे आलेल्या लोकांना फार आश्चर्य वाटत असे. त्यांच्या या अशा प्रकारच्या अचूक सांगण्यामुळे श्रीशास्त्री-बुवांनी अलीकडे कर्णपिशाच्चाचे साधन तर केले नाही ना अशी काही काही लोकांना शंका येऊ लागली होती. ही शंका त्यांनी चारचौघात बोलूनही दाखविली होती.

अशा प्रकारे सिद्धींच्या चमत्काराचा हा खेळ वर्षभर चालू होता. परन्तु एक दिवस देवांनी त्यांना अशी आज्ञा केली की, "हा सिद्धींचा बाजार कशाकरिता मांडला आहे? तो बंद करावा." श्रीशास्त्री-बुवांनी देवांची ही आज्ञा शिरसावंद्य मानून या सर्व गोष्टी तात्काळ बंद केल्या. एवढेच नव्हे; तर पुढे उभ्या आयुष्यात त्यांनी सिद्धींच्या-कडे व चमत्काराकडे ढुंकूनही पाहिले नाही.

उत्तर आयुष्यात श्रीस्वामीमहाराजांनी आपल्या काही शिष्यांच्या जिव्हाबंधाचे छेदन निष्णात डॉक्टरांकडून करून घेतले होते, असा उल्लेख श्री. गंगाधरपंत वैद्य यांनी केला आहे. श्रीशास्त्रीबुवांनी गृहस्थाश्रम स्वीकारल्यावर देवांच्या आदेशाप्रमाणे योगाभ्यास बंद केला. त्यावेळी त्यांना अतिसाराचाही त्रास होत असल्यामुळे योगा-भ्यासात व्यत्यय येऊ लागल्याने देवांनी त्यांना योगाभ्यास बंद करा-वयाला सांगितले.

"प्रारब्धकर्मणां भोगादेव क्षयः।" या शास्त्रवचनानुसार प्रारब्ध-भोग भोगूनच संपवावयाचे, त्यांचा कधीही प्रतिकार करावयाचा नाही, प्रारब्धानुसार आपल्या वाट्याला आलेली सुखदुःखे मुका-ट्याने सहन करावयाची व त्याबद्दल कसलीही तक्रार करावयाची नाही अशी श्रीशास्त्रीबुवांची पक्की विचारसरणी होती. "सहनं

सर्वं दुःखानां अप्रतिकारपूर्वकं । चिन्ता विलापरहितं सा तितिक्षा निगद्यते ।। " या न्यायानेच ते सर्व दुःखे अप्रतिकारपूर्वक, चिन्ता न करता व त्यासंबंधी कसलाही विलाप न करता सहन करीत. यालाच तितक्षा म्हणतात. अशा प्रकारची परमावधीची तितिक्षा त्यांच्या ठिकाणी होती. "नास्ति तितिक्षासम साधनम्" असे जे शास्त्र-कारांनी म्हटले आहे ते त्यांनी आपल्या आचरणाने अक्षरशः खरे करून दाखविले. तितक्षेसारखे म्हणजे सर्व काही सहन करण्यासारखे या भूतलावर दुसरे साधन नाही. जणू काही सर्व साधनांची परमावधी जी तितिक्षा तीच सर्व समाजासमोर आदर्श मार्ग-दर्शनासाठी उपस्थित व्हावी म्हणून त्यांच्या आश्रयाला येऊन साकार झाली होती.

या सर्व विचारसरणीमुळे आपण आजारी पडलो; तरी आपल्या व्याधींवर कधी उपचार करावयाचा नाही व औषधही कधी घ्यावयाचे नाही असा त्यांचा निश्चय होता. त्यांना वैद्यकीचे उत्तम ज्ञान होते. शिवाय आपणाला प्राप्त झालेल्या सिद्धींच्या बळावर त्यांनी अनेक लोकांचे आजार व इतर व्याधी बऱ्या केल्या होत्या व ते बऱ्या करीत होते; पण आपल्या शारीरिक पीडेवर त्यांनी कोणत्याही प्रकारचा उपचार न करता सर्व भोग स्वतः भोगले. संग्रहणीच्या विकाराने त्यांना आयुष्यभर छळले; पण त्या रोगावर त्यांनी कधी औषध घेतले नाही. माणगावचे खोरे हे तापसरीचे खोरे म्हणून त्यावेळी लोकांत प्रसिद्ध होते. एक वेळ श्रीशास्त्रीबुवांना सुद्धा या ज्वराचा काही दिवस उपद्रव झाला. ज्यावेळी श्रीशास्त्री-बुवांचे श्वशुर श्री. बाबाजीपंत गोडे यांना हे कळले तेव्हा त्यांनी जामातांच्या आजारावर सावंतवाडीहून वैद्याचे औषध आणले व हे औषध दवाखान्यातील नसून ते खाजगी वैद्याकडील चांगले व शुद्ध असल्यामुळे तुम्ही ते अवश्य घ्या असा श्रीशास्त्रीबुवांना आग्रह केला.

श्वशुरांचे मन मोडू नये म्हणून इच्छा नसतानाही त्यांनी ते औषध घेतले; पण लगेच एक उलटी होऊन ते बेशुद्ध पडले. सर्वजण घाबरले. श्री. बाबाजीपंत गोडच्यांनी आपण खोटें बोललो व औषध वैद्याकडचे नसून दवाखान्यातील होते असे कबूल केले. शेवटी त्यांनी देवांची करुणा भाकून क्षमाही मागितली. तेव्हा कुठे श्रीशास्त्रीबुवा शुद्धीवर आले. शुद्धीवर आल्यावर त्यांनी प्रथम कोणती गोष्ट केली असेल; तर स्नान करून पंचगव्य घेतले व प्रायश्चित म्हणून पवमानाच्या आवृत्त्या केल्या. पुढे एकदा गोकर्णाला जात असताना त्यांना फुरसे चावले. त्यावेळी सुद्धा औषधोपचार व मंत्रोपचार त्यांना लाभदायक न ठरता त्यामुळे उलट अधिकच त्रास झाला. सर्व उपचार बंद केल्यावरच फुरसे चावलेल्या पायाची सूज कमी झाली.

योगाभ्यास करावयाला लागल्यावर श्रीशास्त्रीबुवांना मूळव्याधी-सारखा त्रास होऊ लागला. प्रत्यक्ष मूळव्याध नव्हे; पण मलद्वार घट्ट होऊन सकाळी वेळेवर शौचाला होईना. त्यामुळे त्यांना पुनः पुन्हा शौचाला जावे लागे. त्यामुळे अनुष्ठानात व्यत्यय येऊ लागला. या वेळी मुंबईचे श्री. ढोरेशास्त्री म्हणून एक ब्राह्मण श्रीशास्त्रीबुवांकडे योगाभ्यास शिकण्यास येत असत. श्रीशास्त्रीबुवांची ही अवस्था त्यांच्या लक्षात आली व त्यांच्याजवळ जेव्हा या विषयासंबंधी चर्चा झाली तेव्हा त्यांना अशी चिंता वाटू लागली की, त्यामुळे कदाचित् श्रीशास्त्रीबुवांना मूळव्याध व्हावयाची शक्यता आहे. त्यामुळे त्यांनी श्रीशास्त्रीबुवांना असे सांगितले की, "आपण योगाभ्यास झाल्या-नंतर तूप खावे म्हणजे आपणास शौचास साफ होईल." श्री. ढोरे-शास्त्री यांचे हे म्हणणे ऐकून एक दिवस त्यांनी योगाभ्यास संपल्या-नंतर तूप खाल्ले; परंतु ज्यांच्या जीवनातील सर्वच गोष्टी भगवान् श्रीदत्तात्रेयांच्या इच्छेप्रमाणे होत असत, त्या श्रीशास्त्रीबुवांनी श्री ढोरेशास्त्र्यांचा सल्ला मानला ही गोष्ट देवांना रुचली नाही. त्यांनी

श्रीशास्त्रीबुवांना असे विचारले की, "ढोरेशास्त्री चांगला उपदेश देत होते नाही का?" पण देवांच्या बोलण्यातील उपरोध श्रीशास्त्रीबुवांच्या ध्यानात न आल्याने यासंबंधी काय बोलावे व उत्तर द्यावे हे त्यांना सुचले नाही. श्री. ढोरेशास्त्र्यांचा सल्ला मानून त्यांनी योगाभ्यासानन्तर तूप खाल्यावर दुसऱ्या दिवसापासून तावडतोव पोटात मुरडा होऊन त्यांना अतिसाराचा त्रास सुरू झाला. या त्रासामळे श्रीशास्त्रीबुवांना दिवसातून अनेक वेळा शौचाला जावे लागे व प्रत्येक वेळी ते स्नानही करीत असत.

अशा या आजारातच चैत्र महिना उजाडला. श्रीक्षेत्र नरसोवावाडीला श्रीनारायणस्वामींच्या उत्सवासाठी जाण्याची देवांची श्रीशास्त्रीबुवांना आज्ञा झाली. त्यावेळी त्यांना मोठा पेच पडला. अतिसाराच्या त्रासामुळे त्यांना कमालीचा अशक्तपणा आल्यामुळे एवढा लांबचा प्रवास कसा होणार व अशा अवस्थेमध्ये सह्याद्रीचा घाट ओलांडून आपण श्रीक्षेत्र नरसोवावाडीला कसे पोहोचणार असे त्यांना वाटू लागले. या विचारांमुळे त्यांच्यापुढे प्रश्न पडला; परन्तु देवांच्या आज्ञेप्रमाणे वागावयाचेच, मग जे काही व्हावयाचे असेल ते होईल, अशा कृतनिश्चयाने श्रीशास्त्रीबुवा श्रीक्षेत्र नरसोवावाडीला जावयाला निघाले.

माणगावाहून निघाल्यानन्तर काही अंतर चालून गेल्यावर त्यांना वाटेतच एक माणूस भेटला. त्याने श्रीशास्त्रीबुवांची ही अवस्था पाहून अतिसारावर औषध देऊन, हे घेतल्यावर आपणास होणारा त्रास दूर होऊन प्रकृती चांगली होईल व प्रवास व्यवस्थितपणे करता येईल असे सांगितले. त्यावेळी त्या माणसाने दिलेले औषध घ्यावे की घेऊ नये, अशी त्यांची द्विधा मनस्थिती झाली असता, देवांनी त्यांना असे सांगितले की, "औषध घ्यावे. त्यामुळे बरे वाटून वाडीस जाता येईल."

देवांची जरी औषध घेण्यासंबंधी आज्ञा झाली असली; तरी श्रीशास्त्रीबुवांच्या मनात ते घ्यावयाचे नसल्यामुळे, ते देवांना असे म्हणाले की, "प्रारब्धकर्माचे फल जर भोगलेच पाहिजे असे आहे; तर मग मी ते भोगूनच संपवितो. मला औषध नको; मात्र मी वाडीस जाऊन परत येईपर्यन्त हा विकार थांबला म्हणजे पुरे."

श्रीशास्त्रीबुवांनी असे सांगितल्यावरही देव त्यांना असे म्हणाले की, "ते काही नाही. औषध घेतलेच पाहिजे." देवांची ही आज्ञा ऐकताच आपल्या मनातील सर्व आग्रह दूर ठेवून व नियमांना मुरड घालून त्यांनी त्या माणसाने दिलेले औषध घेतले. त्यामुळे त्यांचा अतिसाराचा त्रास थांबला.

श्रीक्षेत्र नरसोबाच्या वाडीची ही यात्रा होईपर्यंत श्रीशास्त्रीबुवांना काही त्रास झाला नाही; पण तेथून माणगावला येताक्षणीच अति-साराचा विकार पुन्हा सुरू झाला. श्रीशास्त्रीबुवांनी पुढे हा त्रास काही दिवस भोगल्यानन्तर एक दिवस देवांनी त्यांना रागानेच असे विचारले की, "तूप खाऊन बरे वाटले की नाही." हे देवांचे बोलणे ऐकताच श्रीढोरेशास्त्र्यांचे सांगणे ऐकून आपण तूप खाल्ले त्याचा हा परिणाम आहे, हे श्रीशास्त्रीबुवांनी ओळखले; पण श्रीढोरेशास्त्र्यांना तरी दोष का द्यावयाचा? ते निमित्तमात्र झाले. फलोन्मुख झालेल्या प्रारब्धाचे फळ श्रीशास्त्रीबुवांना भोगणेच प्राप्त होते. नंतर देवांनी त्यांना दही व सुरण खाण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणे करताच अतिसाराचा विकार कमी झाला; पण नंतर त्याने पुन्हा डोके वर काढले व तो श्रीशास्त्रीबुवांना आयुष्यभर त्रास देत होता. तरी सुद्धा श्रीशास्त्रीबुवांनी त्यावर औषध म्हणून घेतले नाही. काही लोकांचे असे म्हणणे होते की, तेथील एका ब्राह्मणाने श्रीशास्त्रीबुवांची कीर्ती सहन न होऊन, अभिचारिक मंत्राचा प्रयोग करून हा विकार त्यांच्या

मागे कायमचा लावला होता. काहीही असो त्या विकारामुळे श्रीशास्त्रीबुवांच्या योगाभ्यासामध्ये व्यत्यय येऊ लागला आणि देवांनीही त्यांना असे सांगितले की, "आता यापुढे योगाभ्यास होणे शक्य नाही; तरी आता योगाभ्यास बंद करून गृहस्थाश्रमाला सुरुवात करावी." या आज्ञेप्रमाणे गृहस्थाश्रम स्वीकारल्यावर त्यांनी योगाभ्यास सोडून दिला.

त्यागाची परिसीमा काय असू शकेल हे आपणाला श्रीवासुदेव-शास्त्र्यांच्या चरित्रावरून दिसून येते. कोणत्याही गोष्टीचा मनाने त्याग केल्यावर आपल्या शरीरानेही तो त्याग स्वीकारला पाहिजे. मनाने एखाद्या गोष्टीचा त्याग केल्यावर शरीराने जर तो स्वीकारला नाही; तर शरीर त्या गोष्टीच्या मोहाला बळी पडणारच. सत्पुरुषांच्या बाबतीमध्ये त्यांनी मनाने एखाद्या गोष्टीचा त्याग केल्यावर त्यांचे शरीरही तो त्याग स्वीकारीत असते. श्रीरामकृष्ण परमहंसांच्या चरित्रातील श्रीस्वामीविवेकानंदांनी त्यांच्या बिछान्याखाली लपवून ठेवलेल्या नाण्याची हकीकत आणि मातृवियोगानंतर परमहंस तिच्यासाठी तर्पण करावयाला गेल्यावर त्यांच्या हाताची बोटे वेडीवाकडी होऊन त्यांच्या हातात पाणीच राहत नव्हते, या गोष्टी शरीराने आणि मनाने स्वीकारलेल्या त्यागाची उदाहरणे आहेत. शरीराने आणि मनाने स्वीकारलेल्या त्यागाची तशीच परिसीमा आपणास श्रीशास्त्रीबुवांच्याही बाबतीमध्ये दिसून येते. आपल्या शरीरभोगांवर औषध घ्यावयाचे नाही, असे त्यांनी एकदा ठरविल्यावर त्यांच्या पोटात चुकूनही जरी औषध गेले किंवा त्यांच्या व्याधीवर बाह्योपचार करण्यात आले; तर त्यांचे शरीर ते उपचार स्वीकारावयाला तयार होत नसे व उपचारांचा विपरीत परिणाम होत असे.

श्री. रामभाऊ सबनीसांच्या रूपाने देवांनी श्रीशास्त्रीबुवांना एक चांगला कारभारी दिला होता. तसेच श्री. नारोपंत उकिडव्यांच्या

रूपाने देवांनी त्यांना एक चांगला मित्र दिला होता. श्रीशास्त्रीबुवा आणि श्री. नारोपंत उकिडवे यांच्यातील संबंध पाहता या दोघांचे सुहृदांचे नाते होते असे म्हणावे लागते. श्री. नारोपंत उकिडवे हे सावंतवाडीचे राहणारे असून ते तेथेच संस्थानमध्ये नोकरी करीत होते. जातीने ब्राह्मण असूनही सरकारी नोकरीमध्ये असल्यामुळे म्हणा किंवा तथाकथित सुधारकांच्या संगतीमुळे म्हणा श्री. नारोपंतांचा देवाधर्मावर विश्वास व श्रद्धा नव्हती. एकाच गावात राहात असल्यामुळे श्री. आणावकरांच्या अंगात येणाऱ्या समंधाविषयी त्यांनी ऐकले होते; पण असल्या गोष्टींवर त्यांच्या विश्वास नव्हता. तरीसुद्धा ही काय भानगड आहे, ते पाहण्यासाठी ते मुद्दाम एका स्नेह्याबरोबर एकदा श्री. आणावकरांच्या घरी गेले होते. त्यांना दुरूनच येताना पाहून श्री. आणावकरांच्या अंगामध्ये समंधाने प्रवेश केला. श्री. नारोपंत घरात येताच श्री. आणावकरांच्या मुखातून समंध बोलू लागला. "या नारोपंत, भानगड काही नाही. तुम्हाला जे दिसत आहे ते सत्य आहे. बरे वाईट, खरेखोटे पडताळून पाहण्याचा तुमचा विचार आहे काय ? तुमचा तर देवाधर्मावर विश्वास नाही. विश्वास ठेवा, सर्व काही आहे ते तोच आहे. त्याच्या पलीकडे काहीच नाही. आपल्या पूर्वजांनी धर्म या नावाने जो अनमोल ठेवा ठेवला आहे त्याची तरी माहिती तुम्हाला कोठे आहे ? ती माहिती जाणून घेण्याचा तुम्ही कधी प्रयत्न केला आहे काय ? तुम्हाला चालता बोलता धर्म पाहावयाचा असेल; तर शेजारी माणगावला जा. तेथे श्रीवासुदेवशास्त्री म्हणून एक आश्चर्य आहे. त्यांना जाऊन भेटा. ते तुम्हाला देव दाखवून देतील."

या सरबत्तीने श्री. नारोपंत गार झाले. त्यांच्या मनावरची अश्रद्धेची आणि अविश्वासाची जळमटे गळून पडू लागली. त्यानंतर आणखी एकदोन वेळा ते श्री. आणावकरांकडे गेले आणि नवीन

विचार ग्रहण करण्याची त्यांच्या मनाची तयारी झाली. मग ते श्रीवासुदेवशास्त्र्यांना भेटावयाला माणगावी गेले. प्रथम श्रीशास्त्रीबुवांबरोबर " नमस्कार " या पलीकडे काही संभाषण झाले नाही. परंतु त्यानंतर ते वारंवार माणगावला जाऊ लागले. तेथे श्रीदत्तमंदिरात बसून ते श्रीशास्त्रीबुवांना जवळून पाहात असत. श्रीशास्त्रीबुवांचे तीव्र वैराग्य, देवावरील गाढ श्रद्धा आणि भक्ती व सर्वांभूती समभाव या सर्वच गोष्टी प्रकर्षाने त्यांच्या नजरेला येऊ लागल्या. त्यांना असे वाटू लागले की, या मंदिरामध्ये येऊन बसावे व या साधुपुरुषाच्या संगतीमध्ये काही काळ घालवावा. या ठिकाणी एक प्रकारची शांती व समाधान नांदत आहे, असा अनुभव त्यांना येऊ लागला.

एक दिवस श्री.नारोपंत श्रीअक्कलकोटस्वामीमहाराजांच्या एका शिष्याला घेऊन माणगावला जावयाला निघाले. देवांनी आदल्या रात्री श्रीशास्त्रीबुवांना असा आदेश दिला होता की, " उद्या येथे एक साधुपुरुष येणार आहेत. त्यांना पायस द्यावे." आपण पायस द्यावयाला सांगितले आहे तेव्हा पायसाची तयारीही आपणासच केली पाहिजे असे देवांनी ठरविले. दुसऱ्या दिवशी सकाळी त्या साधुमहाराजांना घेऊन श्री. नारोपंत श्रीदत्तमंदिरामध्ये आले. श्रीशात्रीबुवांनी त्यांचे यथोचित स्वागत केले. त्यांचे बोलणे होत आहे एवढ्यात एक शेतकरी आपली हरवलेली गाय केव्हा आणि कोठे सापडेल ते विचारावयाला श्रीशास्त्रीबुवांकडे आला. त्याने असा प्रश्न विचारताच, " तुझी गाय ती तेथे मंदिरामागे चरत आहे, घेऊन जा." असे श्रीशास्त्रीबुवांनी त्याला सांगितले. आपली हरविलेली गाय विशेष त्रास न पडता जवळच सापडली या आनंदाने त्या माणसाने तेथेच त्या गाईचे दूध काढून देवळात ते श्रीशास्त्रीबुवांना आणून दिले. त्यांनीही ते दूध तापवून व त्यात साखर घालून ते त्या साधूला

व श्री. नारोपंतांना दिले. दूध आणलेले पाहताच श्री. नारोपंत त्यांना असे म्हणाले की, "शास्त्रीबुवा! हा पायसाचा कार्यक्रम कशाला केला?"

हा प्रश्न ऐकताच "देवांनीच आपल्यासाठी हा प्रबंध केला होता," असे म्हणून श्रीशास्त्रीबुवांनी आदल्या रात्रीच्या स्वप्नाची हकीकत त्यांना सांगितली. श्री. नारोपंत उकिडव्यांनी आजपर्यंत पुष्कळ गोष्टी येथे पाहिल्या होत्या. त्यामुळे त्यांची श्रीशास्त्री-बुवांबद्दलची श्रद्धा दिवसेंदिवस वाढत होती. आज या प्रसंगाने ती दृढ झाली. यानंतर श्री. नारोपंतांचे आणि श्रीवासुदेवशास्त्र्यांचे असे काही दृढ संबंध निर्माण झाले की, माणगावमधील श्रीशास्त्री-बुवांच्या चरित्राचा श्री. नारोपंत उकिडवे हा एक पैलू होऊन राहिला.

यानंतर श्री. नारोपंत दर शनिवारी पालखीसाठी माणगावला येऊ लागले व सर्व उत्सवांना ते हजर राहू लागले. शनिवारच्या पालखीला श्री. नारोपंतांची उपस्थिती ही एक आवश्यक बाब होऊन बसली. पालखीची तयारी होऊन श्री. नारोपंतांना उशीर झाल्यास मंडळी त्यांची वाट पाहात खोळंबून बसत. ते आल्या-शिवाय पालखी निघत नसे. श्रीशास्त्रीबुवांचीही या गोष्टीला संमती होती. त्यांनाही श्री. नारोपंतांची उपस्थिती ही एक आव-श्यक बाब वाटत असे. त्यामुळे श्रींच्या पालखीचे श्री. नारोपंत हे एक प्रकारे मानकरीच होऊन बसले होते.

एका शनिवारी श्रींची पालखी निघावयाची वेळ झाली. सर्व तयारी झाली; पण श्री. नारोपंत अजून न आल्यामुळे मंडळी त्यांची वाट पाहात बसली होती. एवढ्यात श्रीशास्त्रीबुवा असे म्हणाले की, "आज नारोपंत येणार नाहीत. त्यांची वाट पाहू नका." लोकांनी मग श्री. नारोपंतांशिवाय पालखीचे काम आटोपून घेतले.

आपली शनिवारच्या पालखीची अनुपस्थिती श्री. नारोपंतांनाही बेचैन करीत होती. रविवारी सुट्टीचा दिवस होता. त्या दिवशी श्री. नारोपंत माणगावला गेले आणि श्रीशास्त्रीबुवांना असे म्हणाले की, " काल एक गृहस्थ मला भेटावयाला आले होते. त्यांनी विनाकारण पालखीला येण्यात अडचण निर्माण केली. सबंध रात्रभर मी बेचैन होतो. "

हे ऐकताच श्रीशास्त्रीबुवा त्यांना असे म्हणाले की, " नारोपंत ! देवांना तुमची केवढी काळजी आहे पाहा. सध्या रात्रीच्या वेळी तुमच्या मार्गामध्ये वाघाचा उपद्रव सुरू झाला आहे. तुम्हाला वाघापासून त्रास होऊ नये म्हणून देवांनीच काल त्या गृहस्थांना तुमच्याकडे पाठवून तुम्हाला इकडे येण्याला प्रतिबंध केला. "

बाहेर गावी जावयाचे झाल्यास देवांना सांगून घर सोडावयाचे अशी श्री. नारोपंतांची प्रथा होती. एकदा काही कामानिमित्त त्यांना इंदूरला जावयाचे होते. कामाच्या गडबडीमध्ये देवांची आज्ञा न घेता फक्त श्रीशास्त्रीबुवांना सांगून ते इंदूरला जावयाला निघाले. देव आपल्या भक्ताच्या प्रेमाचा केवढा भुकेला असतो पाहा ! आपल्याला न विचारता श्री. नारोपंत बाहेरगावी जावयाला निघाले याचा देवांना लटका राग आला. लटका झाला तरी रागच तो! श्री. नारोपंत गावाला जाण्यासाठी बाहेर पडले आणि त्यांच्या मार्गात अडचणी येऊ लागल्या व त्यांचे सात आठ दिवस मार्गातच फुकट गेले. शेवटी त्यांना असे जाणवले की, देवांची आज्ञा न घेता आपण निघालो, त्याचाच हा परिणाम असावा. त्याच पावली ते मागे परतले व त्यांनी माणगावचा रस्ता धरला.

शनिवारचा दिवस होता. पालखीची तयारी करून मंडळी प्रदक्षिणेला सुरुवात करणार एवढ्यात श्रीशास्त्रीबुवा त्यांना असे म्हणाले की, " जरा थांबा. नारोपंत पालखीला येणार आहेत. "

हे ऐकताच लोकांना आश्चर्य वाटले. श्री. नारोपंत इंदूरला निघून गेले त्याला बरेच दिवस झाले होते. ते आता यावेळी येथे कसे येणार ?" इत्यादी अनेक प्रश्न सर्व मंडळींच्या मनात उत्पन्न झाले; परन्तु श्रीशास्त्रीबुवांनी ते पालखीला येणार म्हणून सांगितल्यामुळे सर्वजण त्यांची वाट पाहत उभे राहिले. इतक्यात श्री. नारोपंत खरोखरच पालखीला उपस्थित झाले! देवांपुढे साष्टांग नमस्कार घालून ते म्हणाले, "प्रभो! भक्तवत्सला! चुकले माझे. आपली आज्ञा न घेताच इंदूरला जावयाला निघालो होतो. आपण तरी मला तसे थोडेच जाऊ देणार? आपल्या पायांपाशी पुन्हा घेऊन आलात. या बालकावरील आपल्या प्रेमाचा मी कसा उतराई होऊ? दयाघना! अशीच कृपा असू द्या!"

अशी प्रार्थना करून ते बाहेर आले. पालखी सुरू होऊन नेहमीप्रमाणे संपल्यावर जेव्हा सर्व मंडळी मंदिरात स्वस्थचित्त बसली तेव्हा श्री. नारोपंतांनी सर्व मंडळींना असे विचारले की, "मी इंदूरला गेलो आहे हे तुम्हाला माहीत असताना आज तुम्ही माझी वाट पाहात उभे कसे राहिला?" त्यांचा हा प्रश्न ऐकताच ती सर्व मंडळी त्यांना असे म्हणाली की, "श्रीशास्त्रीबुवांनी आम्हास आज पालखी सुरू होण्यापूर्वी असे सांगितले की, नारोपंतांना देवाची आज्ञा नव्हती; तरी ते इंदूरला गेले. त्यामुळे त्यांचे तिकडे जाणे न होताच ते आज पालखीस येतील. आपण सर्व मंडळी थोडी वाट पाहा म्हणजे झाले. त्यांनी असे सांगितल्यामुळे आम्ही सर्वजण आपली वाट पाहत थांबलो होतो." सर्व मंडळींनी असा खुलासा करताच श्री. नारोपंतांचा श्रीशास्त्रीबुवांच्या सामर्थ्याबद्दल असणारा आदर अधिकच वृद्धिंगत झाला.

एकदा आपणही योगाभ्यास करावा अशी श्री. नारोपंतांना इच्छा झाली; पण शिकविणार कोण? आपणास योगाभ्यास शिकवा

असे श्रीशास्त्रीबुवांना सांगावयाला त्यांना संकोच वाटला. योगावरचे एक पुस्तक मिळवून त्यावरूनच ते योगाभ्यास करू लागले. योगाचा अभ्यास निष्णात गुरूच्या मार्गदर्शनाखाली करावा लागतो. नाहीपेक्षा अभ्यासात चूक झाल्यास त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतात, याची श्री. नारोपंतांना कल्पना नव्हती. व्हावयाचे तेच झाले. प्राणायाम करताना चूक होऊन श्री. नारोपंतांना प्राणांतिक पोटशूळ सुरू झाला. हा चुकीच्या योगाभ्यासाचा परिणाम असेल असे त्यांना वाटले नाही. त्यांनी पोटशूळावर पुष्कळ वैद्यकीय इलाज केले; पण काही उपयोग झाला नाही. त्यांचा शेवटचा आधार श्रीशास्त्रीबुवा हेच होते. त्यांना त्यांनी आपल्या पोटशूळावर इलाज करावयाला सांगितले. पोटशूळाविषयी चौकशी केल्यावर श्रीशास्त्रीबुवांनी त्यांना असे विचारले की, "तुम्ही प्राणायाम करीत असता काय ?" श्री. नारोपंतांनी "हो" म्हणून कबूल केल्यावर व्याधीचे कारण त्यांच्या लक्षात आले. त्यांनी इलाज करून श्री. नारोपंतांचा पोटशूळ बंद केला व पुस्तकावरून प्राणायाम शिकू नये, असे सांगून त्यांना योगामध्ये स्वतः मार्गदर्शन केले.

एकदा श्रीदत्तमंदिरामध्ये मध्यान्हपूजेची धामधूम चालली होती. पूजेच्या कामात कोणतीही हयगय झालेली श्रीशास्त्रीबुवांना खपत नसे. श्री. नारोपंत उकिडवे घरच्या गायीचे दूध देवांच्या नैवेद्यासाठी घेऊन आले होते. गर्दीमुळे पुढे न येता ते एका बाजूलाच उभे राहिले. विदुराच्या घरच्या कण्या खाणारा देव श्री. नारोपंतांच्या घरच्या दुधासाठी तहानलेला होता. नैवेद्याची वेळ होताच देवांनी श्रीशास्त्रीबुवांना असे सांगितले की, "आज नारो पंतांच्या घरचे दूध नैवेद्याला पाहिजे. श्रीशास्त्रीबुवांना खात्री होती की, ज्याअर्थी देव श्रीनारोपंताच्या घरचे दूध मागत आहेत. त्याअर्थी त्यांच्या घरचे दूध नैवेद्यासाठी आलेले असणार. चौकशीअंती

श्री. नारोपंत दूध घेऊन बाहेर उभे असल्याचे कळले. श्रीशास्त्रीबुवांनी लगेच त्यांना आत बोलावून घेऊन त्यांच्याकडून दूध घेऊन त्याचा नैवेद्य देवांना दाखविला. देवांना दूध समर्पण झाले तेव्हाच ते संतुष्ट झाले. "देव भावाचा भुकेला" असतो हेच खरे आहे.

अशीच एक गोष्ट सावंतवाडीच्या न्यायकचेरीत काम करण्याऱ्या एका भक्ताच्या बाबतीत घडली. हे गृहस्थ दर शनिवारी माणगावला पालखीसाठी येत. कधी कधी ते रविवारच्या दिवशी माणगावला राहून दुसऱ्या दिवशी सोमवारी परस्पर कचेरीला जात असत. एकदा देवांच्या नैवेद्यासाठी घरच्या गायीचे दूध घेऊन ते मंदिरात आले, त्यावेळी त्यांनी असे पाहिले की, आणखी बरेच लोक देवांच्या नैवेद्यासाठी दूध घेऊन अगोदरपासूनच मंदिरात हजर होते. आपल्या घरचे दूध काही देवांच्या सेवेसाठी जात नाही असे त्यांना वाटले. पूजा आटोपून श्रीशास्त्रीबुवा मागे वळले व त्या गृहस्थांकडे पाहून असे म्हणाले की, "देवांना आज यांच्याकडच्या दुधाचा नैवेद्य होईल."

पुढे काही दिवसांनी या गृहस्थाच्या मनामध्ये वैराग्य उत्पन्न झाले व नोकरी सोडून परमार्थ करावा अशी त्यांना तीव्र इच्छा झाली. आपली इच्छा त्यांनी श्रीशास्त्रीबुवांच्या कानावर घातली. त्यांची ही इच्छा कळली तरी त्यावर श्रीशास्त्रीबुवा काहीच बोलले नाहीत. याचा अर्थच हा विचार त्यांना पसंत नव्हता असा होता. श्रीशास्त्रीबुवांनी मौनाने दिलेल्या नकारामुळे त्या गृहस्थांना फार वाईट वाटले व थोडा रागही आला. "यांना फक्त स्वतःला मोक्ष मिळवावयाला पाहिजे, आम्ही मात्र असेच कुजत पडलो तरी चालेल. आपण आपला विचार श्रीशास्त्रीबुवांच्या कानावर घातला आहे. आता त्यांची आज्ञा घेण्याची गरज नाही." असा मनात

विचार करून त्यांनी राजीनाम्याचा अर्ज लिहून एका माणसासोबत आपल्या कचेरीत पाठविला. भोजनोत्तर वामकुक्षी करीत असताना त्यांना झोप लागली. झोपेत त्यांना कोणीतरी दरडावून म्हटले, "ऊठ, निजलास काय ? कचेरीत जाऊन कामाला लाग." हे शब्द एकताच ते गृहस्थ घाबरून उठून, तोंड धुऊन लगबगीने कचेरीत गेले व कामाला लागले. उशीर झाल्याबद्दल त्यांना कोणी विचारले नाही. ज्या माणसाबरोबर राजीनामाम्याचा कागद पाठविला होता तो माणूस राजीनामा कचेरीत नेऊन द्यावयाला विसरला होता. त्यामुळे त्याला कसलाच त्रास न होता कचेरीत गेल्यावर त्याचे सर्व काम सुरळीत सुरू झाले. त्यानंतर तो गृहस्थ भेटल्यावर त्याने आपला राजीनामा परत मागून घेतला. पुढे आणखी काही वर्षे अशीच गेली. ते गृहस्थ माणगावला नियमितपणे दर्शनास येत असत. काही वर्षांनी त्यांची आई वारली. तिचे क्रियाकर्म उरकल्यावर ते माणगावला आले. तेव्हा श्रीशास्त्रीबुवा त्यांना असे म्हणाले की, "आता राजीनामा द्या. त्यावेळी दिला असता तर तुमच्या मातुश्रींचे पोषण कसे होणार होते ? मातृदेवो भव ! आईच्या सेवेत सर्वकाही आले."

भक्ताकडून आपले कोडकौतुक करून घेण्यासाठीच देव माणगावला आले होते. एकदा श्रीशास्त्रीबुवांच्या मनात देवांसाठी एक पलंग असावा असे आले. त्यांनी श्री. नारोपंताना तसे सहज बोलून दाखविले. त्यावेळी श्री. नारोपंत त्यांना असे म्हणाले की, "शास्त्रीबुवा ! पलंग मी बनवून आणतो." श्रीशास्त्रीबुवांनी होकार देताच श्री. नारोपंताना धन्य वाटले. देवांची सेवा करण्याचे भाग्य आपणास केवळ श्रीशास्त्रीबुवांमुळेच लाभत आहे, असा विचार त्यांच्या मनात आला. श्री. नारोपंत श्रीशास्त्रीबुवांना अधिक मानावयाचे की देवांना, याचा शोध उद्बोधक ठरला असता, किंबहुना ते श्रीशास्त्री-

बुवा व देव यांना अभिन्नपणे पाहत होते असेच म्हणावे लागेल. श्रीशास्त्रीबुवांचेही श्री. नारोपंतांवर प्रेम होते. हे प्रेम स्थूल स्वरूपाचे नसून अलौकिक व दिव्य असेच होते. भक्तश्रेष्ठ श्री. नामदेव आणि योगिराज ज्ञानदेव यांच्यातील परस्पर संबंधांसारखेच या दोन भक्तांचे संबंध होते. देवांचेही श्री. नारोपंतांवर किती प्रेम आहे. हे श्रीशास्त्रीबुवांना काय ठाऊक नव्हते ? श्री. नारोपंतांनी पलंग बनवून घेतला. पलंग फारच सुंदर झाला होता. त्याची रचना अत्युत्तम होती. श्रीशास्त्रीबुवांनाही तो आवडला. तेथे जमा झालेल्या सर्वांना तो आवडला. मोठ्या भक्तिभावाने श्री. नारोपंतांनी तो देवांना अर्पण केला. हा भाग्यसोहळा पाहण्यासाठी बरीच मंडळी जमा झाली होती. एक छोटासा समारंभच झाला होता तो म्हणाना ! त्यावेळी तेथे जमलेल्या मंडळींपैकी एकाने त्यांना असे विचारले की, "नारोपंत ! काय खर्च आला हो या पलंगाला ?"

हा प्रश्न ऐकताच "पलंगाचे पैसे द्यावयाचे नाहीत, तेव्हा खर्चाचा हिशोब ठेवला नाही." असे श्री. नारोपंत म्हणाले. परंतु हे ऐकताच तात्काळ श्रीशास्त्रीबुवा सर्वांना उद्देशून असे म्हणाले की, "या पलंगाला तेवीस रुपये बारा आणे खर्च आला आहे.

श्री. नारोपंतांनी प्रश्नार्थक मुद्रेने श्रीशास्त्रीबुवांकडे पाहिले. खरे म्हणजे त्यांनी खर्चाचा हिशोबच ठेवला नव्हता. श्रीशास्त्रीबुवांचे म्हणणे कितपत खरे आहे ते पाहण्यासाठी त्यांनी मनातल्या मनात खर्चाची जुळवणी केली. सव्वाचोवीस रुपयांचा आकडा झाला. आठ आण्यांचा हिशोब जुळेना. ते जादा होऊ लागले. त्यावेळी श्रीशास्त्रीबुवा त्यांना असे म्हणाले की, "हिशोब पुन्हा तपासून पाहा." तेव्हा श्री. नारोपंतांच्या असे लक्षात आले की, पलंगावरील कापड मुंबईहून आणण्यासाठी एका स्नेह्याला दोन रुपये दिले होते. त्याने दीड रुपयांचे कापड आणले; पण आठ आणे परत केले नाहीत.

आपण ते आठ आणेही खर्चात धरले म्हणून हिशोब चुकत होता. ते आठ आणे वजा केल्याबरोबर श्रीशास्त्रीबुवांनी सांगितलेला हिशोबच बरोबर आहे असे श्री. नारोपंतांनी सर्वांना सांगितले. श्रीशास्त्रीबुवांनी सांगितल्याप्रमाणे हिशोब बिनचूक असल्याचे पाहतच सर्व मंडळींना त्यांच्या सर्वज्ञतेबद्दल खात्री पटून मोठी धन्यता वाटली.

देवांची काही ना काही सेवा करण्याची संधी आपणाला वारंवा मिळावी अशी श्री. नारोपंतांची इच्छा असे. एकदा त्यांनी एका स्नेह्याला मुंबईहून चांगले आंबे घेऊन यण्यास सांगितले. आंबे आल्यावर त्यांचा नैवेद्य मोठ्या भावभक्तीने त्यांनी देवांना दाखविला. नैवेद्याचे आंबे आंबट आहेत असे देवांनी श्रीशास्त्रीबुवांना सांगितले. त्यांनी श्री. नारोपंतांना तसे सांगताच त्यांना आश्चर्य वाटले. वास्तविक पाहता त्यांनी मुद्दाम चांगले आंबे आणवून घेतले होते; मग असे कसे झाले? नैवेद्यातील एक आंबा खाऊन पाहताच तो आंबट असल्याचे त्यांना आढळून आले. आपण आंबट आंब्यांचा नैवेद्य देवांना अर्पण केला आणि देवांनी तो ग्रहण केला याचे श्री. नारोपंतांना राहून राहून वाईट वाटत होते.

माणगाव आता विद्वानांची काशी बनले होते. श्रीदत्तमंदिरामध्ये अधूनमधून वेदघोष होत असे. तसेच प्रवचने, निरूपणे व कीर्तनेही होत असत. वेदघोषाच्या वेळी श्रीशास्त्रीबुवा सर्वांना असे सांगत असत की, "म्हणणे सर्वांनी एकदम करावे. चर्चारूपाने नको; कारण चर्चारूपाने केल्यास अहंकार व एकमेकांबद्दल द्वेष आणि मत्सर या भावना जागृत होतील. असे वारंवार सांगितल्यामुळे सर्वांनी एकदम मिळूनच म्हणावयाचे असा तेथे प्रघातच पडून गेला होता. एकदा तर श्रीशास्त्रीबुवांनी एकट्यानेच संहिता स्वाहाकार केला. श्रीगुरुचरित्रातील कथेत कुमसी गावच्या त्रिविक्रम भारतीकडे जसे दोन गर्विष्ठ विद्वान् ब्राह्मण वादविवाद करून अजिंक्यपद

मिळविण्याच्या हेतूने आले होते व श्रीनृसिंहसरस्वतीस्वामीमहाराजांनी एका शूद्राकडून त्यांचे गर्वहरण करविले होते तसाच एक प्रकार माणगावमध्ये घडला. एक वैदिक ब्राह्मण गावोगाव वैदिक पंडितांशी वादविवाद करून त्यांना वादामध्ये हरवून त्यांच्याकडून विजयपत्रे घेत फिरत फिरत माणगावला आला. त्या रात्री श्रीदत्तमंदिरामध्ये वेदघोष व्हावयाचा होता म्हणून बरीच विद्वान् मंडळी जमली होती. त्यांच्या समोर या अहंकारी ब्राह्मणाने आपला अभिप्राय सांगितला. त्यावेळी कोणी काही बोलले नाही. त्याची श्रीदत्तमंदिरामध्ये आदरपूर्वक उतरण्याची व्यवस्था करण्यात आली. रात्री मंदिरामध्ये वेदघोष झाला व दुसऱ्या दिवशी श्रीशास्त्रीबुवांनी वेदातील काही भागावर पुराण सांगितले. या दोन्ही प्रसंगी तो ब्राह्मण तेथे हजर होता. श्रीशास्त्रीबुवांच्या मुखातून भगवान् श्रीदत्तात्रेयच बोलत होते. तेथे अहङ्काराचा काय पाडाव लागणार? श्रीशास्त्रीबुवांनी सांगितलेले पुराण ऐकताच त्या ब्राह्मणाचा गर्व नाहीसा झाला. तोही विद्वान्च होता. अहंकार गळून पडताच उरली फक्त विद्वत्ता आणि विनय! त्याने श्रीशास्त्रीबुवांना साष्टांग नमस्कार घालून त्यांच्या विद्वत्तेबद्दलचा आदर व्यक्त केला व त्यांची क्षमा मागितली.

अशाच एका प्रसंगी श्री. नारोपंतांच्या सांगण्यावरून श्रीशास्त्रीबुवांनी पुरुषसूक्ताचा वैदिक पद्धतीला अनुसरून सविस्तर अर्थ सांगितला. तो ऐकून श्री. नारोपंतांना आश्चर्य वाटले. ते म्हणाले, "शास्त्रीबुवा! या आपल्या बाजूला वेदांचा अर्थ सांगणारी मंडळी कमीच आहेत. बहुतेक नाही म्हटले तरी चालेल व तुम्हीही कोठे बाहेर वेदांचा अर्थ शिकावयाला गेला नाही. असे असताना तुम्हाला वेदांचा अर्थ कसा समजतो?" हे ऐकताच श्रीशास्त्रीबुवा त्यांना असे म्हणाले की, "मागे नरसोबाच्या वाडीहून परत येताना वाटेत एका गावी मुक्काम झाला. तेथे एक स्वामीमहाराज

पूजा करीत होते. त्या ठिकाणी मंत्रपुष्प झाल्यावर मी संहितेचा एक अध्याय म्हटला ! माझे म्हणणे त्या स्वामीमहाराजांना फार फार आवडले व त्यांनी वेदांचा अर्थ समजण्यासाठी काही अभ्यास केला आहे काय असे मला विचारले. मी नाही म्हणताच आपण अभ्यासाची दिशा दाखवू असे त्यांनी मला सांगितले. मी त्यांचे मार्गदर्शन आनंदाने स्वीकारले व तेथे काही दिवस मुक्काम केला. देवांनीच माझ्यासाठी हा योग जुळवून आणला अशी माझी भावना झाली. त्या स्वामीमहाराजांनी संहितेतील तीन अध्यायांचा अर्थ वैदिक परंपरेला अनुसरून चांगल्या प्रकारे समजवून दिला. त्यांचे मार्गदर्शन एवढे चांगले होते की, त्यांनी समजावून दिलेल्या भागावरून वेदांचा कोणताही भाग मला समजू लागला."

या ठिकाणी श्रीरामकृष्ण परमहंसांच्या चरित्रातील काही प्रसंगांची आठवण येते. परमहंसाना तंत्र साधनेची दीक्षा देण्यासाठी भगवती कालीने भैरवी ब्राह्मणीला दक्षिणेश्वरला मुद्दाम आणविले होते. परमहंसांच्या वेदान्त साधनेच्या वेळीही असेच घडले होते. त्यांगटा या संन्याशाकडून वेदान्तदीक्षा घ्यावी की घेऊ नये हे विचारण्यासाठी ते भगवती कालीकडे गेले तेव्हा देवीने त्यांना असे सांगितले की, "तुला वेदान्त शिकविण्यासाठीच त्या संन्याशाला येथे आणले आहे." भक्ताच्या योगक्षेमाची काळजी देवालाच असते. हे लक्षात आले म्हणजे त्यांना भेटलेल्या श्रीस्वामीमहाराजांच्या भेटीचे रहस्य उलगडेल. जो साधक सदाचाराने, निष्ठेने व भावभक्तीने ईश्वर आराधना करीत असतो त्याला तो कोणत्याही रूपाने भेटून अनायासाने दिव्यज्ञान देऊन कृतार्थ करतो हेच यावरून दिसून येते.

वेदाच्या उच्चारावरोबर अर्थाची निष्पत्ती होणे ही अलौकिक व एकमेवाद्वितीय अशी गोष्ट आहे. श्री. गंगाधरपंत वैद्य यांनी या विषयासंबंधीचा संवत् १९६९ चा उल्लेख करताना श्रीस्वामी:

महाराजांनी असे म्हटल्याचे लिहून ठेविले आहे की, "ज्यावेळी आपण वेदाध्ययन केले त्यावेळी वेदांचा अर्थ नीटसा लक्षात येत नव्हता. आता संवत् १९६९ मध्ये वेदांच्या उच्चाराबरोवर त्यांचा अर्थ लक्षात येतो. वेदातील उदाहरणे पाहून वाईट मनाचे (अनधिकारी) लोक आपली अवनती करून घेतात; पण त्याच उदाहरणांवरून चांगले लोक आपले कल्याण करून घेतात."

सावंतवाडीमध्ये श्री. नारोपंत उकिडव्यांचे एक श्रीदत्तमंदिर होते. तेथील श्रीदत्तमूर्तीची पूजा ते स्वतः करीत असत. एकदा काही कारणाने त्यांना बाहेर जावे लागल्यामुळे घरातील मंडळींपैकी कोणीतरी पूजा केली. मात्र त्या दिवशी स्नानासाठी मूर्ती ताम्हणात ठेवीत असताना त्या मूर्तीच्या पायाला घंगाळाचा जोरदार धक्का लागला. परंतु पूजा करणाऱ्याच्या स्थूल बुद्धीला त्यावद्दल काही वाटले नाही. देवाचे आणि त्याचे काही भावविभोर संबंध प्रस्थापित झाले नव्हते. त्यामुळे पूजा वाट्याला आली, ती केली, इतकेच झाले.

श्री. नारोपंतांचे मात्र देवाशी फार सख्य होते. "देवाच्या सख्यत्वासाठीं। पडाव्या जिवलगांसी तुटी। सर्व अर्पावे शेवटीं। प्राण तोही वेंचावा॥" अशी त्यांची उच्चतम स्थिती होती. त्यामुळे ज्या दिवशी देवाचा गुडघा घंगाळावर आपटला होता त्याच दिवशी त्यांच्या गुडघ्याला एकाएकी सूज येऊन तो पायही खूप दुखावयास लागला व चालताना त्यांना फार कष्ट होऊ लागले. तशाही स्थितीमध्ये ते श्रीशास्त्रीबुवांना भेटावयाला माणगावला गेले. श्री. नारोपंत चालताना लंगडत आहेत हे पाहून श्रीशास्त्रीबुवांनी त्यांची चौकशी केली. आपल्या गुडघ्याला कारण नसताना सूज येऊन तो ठणकत असल्याचे त्यांनी त्यांना सांगितले. श्रीशास्त्रीबुवांनी क्षणभर त्यांच्या गुडघ्याकडे नजर लावून त्यांना असे विचारले

की, "पूजा करताना कधी श्रीदत्तमूर्तीच्या गुडघ्याला धक्का लागला होता का ?"

श्रीशास्त्रीबुवांचा हा प्रश्न ऐकताच श्री. नारोपंत त्यांना असे म्हणाले की, "माझ्या हातून पूजा करताना असा काही अपराध घडल्याचे मला स्मरत नाही; परंतु घरातील कोणीतरी पूजा करताना असे काही घडले का या संबंधी चौकशी करून आपणास सांगतो." त्या दिवशी घरी गेल्यावर त्यांनी या प्रकारासंबंधी चौकशी केली तेव्हा त्यांना स्नानासाठी मूर्ती ताम्हणात खाली ठेवताना मूर्तीच्या गुडघ्याला घंगाळ लागल्याचे समजले.

दुसऱ्या दिवशी श्री. नारोपंतांनी माणगावला जाऊन श्रीशास्त्री-बुवांना झालेला सर्व प्रकार कथन केला. तो ऐकताच त्यांनी त्यांना असे सांगितले की, "देवाच्या सर्वांगाला तूप लावून ऊन पाण्याने स्नान घाला म्हणजे तुम्हाला बरे वाटेल." श्री. नारोपंतांनी त्या-प्रमाणे देवाला स्नान घालताच गुडघ्याची सूज उतरून त्यांचा पाय बरा झाला. देव भावाचा भुकेला असतो हेच खरे ! नामदेवाच्या हातचा प्रसादच काय; पण कोरडी भाकरीही देवाने खाल्ली. जनाबाई बरोबर देवाने दळणकांडण केले. ही काही कविकल्पना नाही. ही वस्तुस्थिती आहे. ती समजण्यासाठी नामदेव व्हावे लागते, जनाबाई व्हावे लागते, नारोपंत व्हावे लागते.


श्री. नारोपंत उकिडवे, श्री. रामभाऊ सवनीस या सर्व मंडळीं-बरोबर श्रीशास्त्रीबुवांचे अतिशय निकटवर्ती व जिव्हाळ्याचे संबंध होते. या दोघांनी आणि इतरही अनेकांनी श्रीशास्त्रीबुवांबरोबर, देवांच्या माणगावमधील सात वर्षांच्या लीलेमध्ये, बरोबरीने भाग घेतला होता. ते सर्वजण या लीलेचे एक आवश्यक घटक बनले होते. पण जेव्हा श्रीशास्त्रीबुवांनी दत्तप्रभूंच्या आदेशाप्रमाणे माणगाव अकस्मात् व कायमचे सोडले त्यावेळी या सर्वांचा श्रीशास्त्रीबुवांनी




श्रीक्षेत्र माणगाव येथील राणी इंदिराबाई होळकर यांनी स्थापन केलेली श्रीथोरल्यास्वामीमहाराजांची संगमरवरी मूर्ती. त्यांच्यासमोर चांदीच्या मखरात फुलाखाली झाकलेल्या श्रीस्वामीमहाराजांनी स्थापन केलेल्या एक इंच लांबीच्या श्रीदत्तात्रेयांच्या सोन्याच्या पादुका




श्रीदत्तमंदिर माणगाव येथील श्रीस्वामीमहाराजांच्या वेळची मिरवणुकीच्या वेळी पालखीत ठेवली जाणारी व सध्या मंदिरात पूजेसाठी विराजमान असलेली श्रीदत्तात्रेयांची उत्सवमूर्ती. (पृ. १८०, २८६)



पायांवरील योगचिन्हांसहित श्रीस्वामीमहाराजांच्या माणगाव येथील पादुका. या पादुका मागील पानावरील चित्रातील पहिल्या मंदिरात स्थापन केल्या आहेत.




श्रीस्वामीमहाराजांच्या वेळच्या औदुंबरवृक्षाच्या खाली असलेल्या श्रीदत्तात्रेयांच्या पादुका. या पादुका मागील पानावरील चित्रातील दुसऱ्या मंदिरात स्थापन केल्या आहेत.




श्रीदत्तमंदिराच्या शेजारील श्रीस्वामीमहाराजांच्या वेळचा औदुंबर व त्या खालील दोन मंदिरे. पहिल्या मंदिरात मागील पानावरील चित्रातील श्रीस्वामीमहाराजांच्या व दुसऱ्या मंदिरात श्रीदत्तात्रेयांच्या पादुका आहेत.

श्रीस्वामीमहाराजांचे हस्ताक्षर.

श्रीस्वामीमहाराजांचे हस्ताक्षर,




उजव्या बाजूने दिसणारे श्रीदत्तमंदिर, माणगाव.



समोरच्या बाजूने दिसणारे श्रीदत्तमंदिर, माणगाव.





माणगाव येथील श्रीदत्तमंदिराबाहेरील श्रीस्वामीमहाराजांच्या वेळी पिशाच्चग्रस्तांना सोडविणारे डाव्या व उजव्या बाजूचे दोन लाकडी खांब. या खांबांना हात लावला की, त्यावरील देवांचे गण त्या माणसांना बोलते करीत.

अशा तऱ्हेने निरोप घेतला की, जणूकाही त्यांचा आणि या सर्व मंडळींचा पूर्वी कधी संबंधच आला नव्हता; पण तो क्षण यावयाला अद्याप अवकाश होता. तोपर्यंन्त देवभक्तांच्या अलौकिक भक्तिलीलांचे रसपान करीत साधकभक्तांनी आपल्या जीविताच्या धन्यतेसाठी व कृतकृत्यतेसाठी अखंड वाटचाल केली पाहिजे.

भक्ताच्या संपूर्ण योगक्षेमाची जबाबदारी स्वतःवर घेऊन भक्तकामकल्पद्रुम भगवान् श्रीदत्तात्रेय टाकीचे घाव घालून श्रीवासुदेवशास्त्र्यांची भक्तोत्तम म्हणून मूर्ती घडवीत होते. पण शिल्पकाराचेच रूप त्या शिल्पात उतरले. अशा भगवान् श्रीदत्तात्रेयस्वरूप श्रीवासुदेवशास्त्री टेंबे यांनी आम्हा भक्तगणांचे इह–पर कल्याण करावे अशी त्यांच्या चरणी विनम्रभावाने अखंड प्रार्थना आहे.

अध्याय दहावा

भूवैकुंठ माणगाव (२) :–

मौंजीबंधन झाल्यापासून श्रीवासुदेवशास्त्र्यांनी आपले आचरण शास्त्रशुद्ध आणि पवित्र ठेवले होते. त्यांच्यासमोर त्यांचे आजोबा व वडील यांचा आदर्श होता. माणगावला श्रीदत्तमूर्ती आल्यापासून त्यांचे आचरण अधिकच काटेकोर होऊ लागले. आपल्याला पुढे असे दिसून येईल की, आयुष्यभर श्रीस्वामीमहाराजांनी जे आचरणात आणले तेच त्यांनी लोकांना सांगितले व आपल्या ग्रंथातून जनतेपुढे मांडले; किंबहुना त्यांनी लोकांना जे सांगितले तेच स्वतःच्या आचरणात आणले. " बोले तैसा चाले " ही जी संतांची लक्षणे सांगितलेली आहेत ती सर्व श्रीस्वामीमहाराजांमध्ये आपणाला दिसून येतात. श्रीदत्तमंदिरामध्ये सुद्धा आत्यंतिक शुचिता आणि पावित्र्य पाळण्यात येई. नकळत किंवा अनवधानाने एखादी चूक होऊन मंदिराच्या

पावित्र्यामध्ये कोणाकडूनही काहीही त्रुटी निर्माण झाली; तर ती देवांना खपत नसे. त्याबद्दल बुवांना तावडतोब सूचना होत असे आणि ज्याच्याकडून चूक झाली असेल त्याला प्रायश्चित्तही मिळत असे. एकदा देवांची पूजा झाल्यावर–"सूत, सूत, काढून टाक" असे शब्द श्रीशास्त्रीबुवांच्या कानावर आले. देवांना काय सुचवावयाचे होते ते त्यांच्या लक्षात येईना. दुसऱ्या दिवशी देवांवरील निर्माल्य काढीत असताना एका फुलाला सूत अडकून राहिलेले दिसले. काल ते फूल तसेच देवांना वाहिले गेले होते म्हणून देवांनी "सूत, सूत, काढून टाक" असे सांगितले होते, हे आता बुवांच्या लक्षात आले.

माणगावला आणखी एका अर्थाने गाणगापूरचे महत्त्व आले होते. गाणगापूरप्रमाणे येथेही पिशाच्चग्रस्त लोक दाटी करीत असत. अनेक लोक आपल्या आपल्या नातलगांबरोबर पिशाच्चबाधेतून मुक्त होण्यासाठी येथे सेवेला येऊन राहत असत. रत्नागिरीचा एक ब्राह्मण आपल्या पिशाच्चग्रस्त वहिणीला घेऊन माणगावला सेवेसाठी येऊन राहिला होता. त्याच्या बहिणीला समंधाची बाधा होती. एक दिवस देवळाला प्रदक्षिणा घालताना ती अस्पर्श झाली. त्यावेळी ही गोष्ट कोणाला कळली नाही; पण जेव्हा देवळात सगळीकडे सर्पविंचू निघू लागले तेव्हा काहीतरी चूक झाली आहे, ही गोष्ट श्रीशास्त्रीबुवांच्या ध्यानात आली. चौकशीअन्ती काय प्रकार घडला, ते त्यांना कळले. चार दिवस हा त्रास चालू होता. शेवटी स्थानशुद्धीसाठी उदकशान्ती केली तेव्हा तो त्रास बंद झाला.

एका दत्तजयंतीच्या उत्सवाच्यावेळी बुवांच्या दशाहातील एक बाई फार आजारी पडल्या. मंदिरामध्ये श्रीदत्तजयंतीची तयारी करावयाची होती म्हणून श्रीशास्त्रीबुवांच्या ऐवजी श्री.सीतारामपंत त्या बाईंच्या समाचारला गेले. दुर्दैवाने त्या बाईंना त्याच दिवशी देवाज्ञा झाली. त्यामुळे सर्व टेंबे कुटुंबालाच अशौच आले. त्यावेळी

श्री. सीतारामपंत यांच्या मनात असा विचार आला की, आपण आता माणगावला परत गेल्यास सुतक आल्याचे सांगावे लागणार. त्यामुळे श्रीदत्तजयंतीचा उत्सव बंद ठेवावा लागेल. हजारो लोकांचा हिरमोड होईल व उत्सवासाठी केलेली केवढी तरी तयारी फुकट जाईल. विशेष म्हणजे एवढी वर्षे चालू असलेला उत्सव बंद राहणार. तेव्हा आपण सध्या माणगावला परतूच नये. मग सुतक आल्याचे कोणाला कळणार नाही आणि उत्सवही सालाबादाप्रमाणे साजरा केला जाईल. असा विचार करून श्री. सीतारामपंत त्या दिवशी माणगावला परत न येता त्या गावीच राहिले.

दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणे पूजेसाठी बुवा देवळात गेल्याबरोबर "शिवाशिव" असे शब्द त्यांना ऐकू आले. हे ऐकताच बुवा बाहेर गेले व पुन्हा हातपाय धुऊन देवळात आले; तरी तेच शब्द पुन्हा त्यांच्या कानी आले. कुठे कसली शिवाशिव होत आहे किंवा झाली आहे ते त्यांच्या ध्यानात येईना. हतबुद्ध झाल्यासारखे ते तेथेच थांबले. शेवटी देवांनी स्पष्ट खुलासा केला. "तुम्हाला अशौच आले आहे. सबंध पूजा बंद." पुढे तपास केला तेव्हा त्या बाईंच्या मृत्यूमुळे अशौच आल्याचे कळले. त्यावर्षी माणगावच्या श्रीदत्तमंदिरामध्ये श्रीदत्तजयंतीचा उत्सव झाला नाही.

एकदा देवांच्या नैवेद्यासाठी केळ्यांची शिकरण केली होती. त्या दिवसांमध्ये नैवेद्य बऱ्याच मोठ्या प्रमाणावर करावा लागे. त्या दिवशी शिकरण मोठ्या भांड्यात केली होती. भांडे काठोकाठ भरले असल्यामुळे तळाला काय आहे ते चटकन् ध्यानात येण्यासारखे नव्हते. ज्यावेळी बुवा नैवेद्य दाखवू लागले, त्यावेळी "भांड्यात नरोटीचा तुकडा पडलेला आहे तो काढून टाकून नैवेद्य दाखवावा," असे शब्द श्रीशास्त्रीबुवांच्या कानावर आले. हे ऐकताच त्यांनी नैवेद्याचे भांडे बाहेर आणून आतील नरोटीचा तुकडा

काढून टाकण्यास येथील मंडळींना सांगितले. त्याप्रमाणे मंडळींनी खूप शोध केला; पण त्यांना नरोटीचा तुकडा सापडेना. मात्र ज्याअर्थी देवांनी स्पष्टच सांगितले आहे त्याअर्थी नरोटीचा तुकडा पात्रात असणारच अशी बुवांची खात्री होती त्यामुळे ज्यावेळी मंडळी पुन्हा तपास करूनही शिकरणीत काही नाही असे म्हणाली, तेव्हा बुवा त्या सर्वांना असे म्हणाले की, "नरोटी आहे म्हणून देवांची स्पष्ट आज्ञा झाली आहे; तरी आपण सर्वांनी पुन्हा चांगले तपासून पाहा." हे ऐकताच शेवटी शिकरण दुसऱ्या पात्रात हळूहळू ओतून घेताना तो नरोटीचा तुकडा आढळला.

माणगावी श्रीदत्तमंदिरात पूजाअर्चादी नित्य-नैमित्तिक कार्यक्रम ज्याप्रमाणे अगदी व्यवस्थित चालत असत त्याप्रमाणे बुवांचेही नित्य-नैमित्तिक कार्यक्रम अगदी विनचूक चालत असत. त्यात कधीही चूक होत नसे; कारण त्यांमध्ये खंड पडल्यास किंवा त्या पार पाडण्यात ढिलाई झाल्यास देवांना खपत नसे. एकदा दैनंदिन कार्यक्रम पार पाडताना बुवांना फार श्रम झाले. तेव्हा नित्यक्रम थोडक्यात आटोपून व लवकर पूर्ण करून ते विश्रांती घेण्याच्या विचाराने झोपावयाला गेले. त्यावेळी त्यांना एक विंचू चावला. त्यामुळे रात्रभर त्यांना झोप मिळाली नाही. विश्रांती मिळणे बाजूलाच राहिले; पण वेदना सहन करीत त्यांना रात्र जागून काढावी लागली. तसे मंदिरामध्ये विंचूच काय, सापही कधी कधी वावरत असत; पण त्यांपासून त्यांना कधी त्रास पोहोचत नसे. मात्र त्या रात्रीची गोष्ट वेगळी होती. दैनंदिन नित्यक्रमामध्ये ढिलाई केल्याबद्दल आपल्याला ही शिक्षा झाली आहे याची बुवांना जाणीव होऊन त्यावेळेपासून त्यांनी आपल्या नित्यक्रमात कधीही खण्ड पडू दिला नाही. अशा महापुरुषांना जेथे देव सोडत नाही. तेथे सामान्य साधकाची गोष्टच विचारावयाला नको. आपल्या नित्य-क्रमात

कधीही खंड पडणार नाही याची त्याने दक्षता घ्यावयाला हवी.

सगळे व्यवहार व विधी कितीही काटेकोरपणाने व डोळ्यात तेल घालून केले; तरी उत्सवाच्या वेळी गडबडीमध्ये काहीतरी न्यून राहून जात असे. सगळे उत्सव एवढ्या मोठ्या प्रमाणावर होत की, सर्व व्यवस्था ठेवता ठेवता माणूस तरी किती पुरा पडणार? कोठे तरी चूक होत असे; पण ते देवांना कसे खपणार? एका उत्सवाच्या वेळी कोणीतरी नैवद्यावर अन्नशुद्धी म्हणजे तूप न वाढताच तो नैवेद्य देवापुढे आणून ठेवला. ज्यावेळी बुवा तो नैवेद्य देवाला दाखवू लागले त्यावेळी त्यांच्या पाठीवर कोणाचा तरी जोराचा धक्का बसला. अशा प्रकारे जोराने धक्का बसताच ते अत्यंत घाबरले व त्यांच्या मुखातून एकदम "तूप, तूप" असे उद्गार जोराने व अकस्मात् बाहेर पडले.

हे उद्गार आपल्या तोंडून अकस्मात् बाहेर पडल्याबरोबर एकंदर सर्व प्रकार श्रीशास्त्रीबुवांच्या लक्षात आला. त्यांनी कोणाला तरी तूप आणण्यास सांगितले व ते नैवेद्यावर घालून तो देवाला समर्पण केला. आपल्या भक्ताकडून आपातत: घडलेली यत्किंचितही न्यूनता देवाला खपत नाही हेच यावरून दिसून येते. त्यामुळे अन्नशुद्धीवाचून समर्पण केलेला नैवेद्य देवांनी स्वीकृत न करता तो तूप घातल्यावरच स्वीकारला. शेवटी अनन्य भक्ताची न्यूनता देवच पूर्ण करतो हेच खरे आहे.

एका दीपावलीला नैवेद्यासाठी सर्वांनी दहीपोहे दिले. बुवांच्या घरातील पोहेसुद्धा त्यात मिसळलेले होते; पण ते कोरडेच होते. ही गोष्ट त्यावेळी कोणाच्याच लक्षात आली नाही; पण देवांनी श्रीबुवांना असे विचारले की, "आज आम्हाला कोरडे पोहे खाऊ घालणार की काय?" हे ऐकताच बुवा स्तंभितच झाले. त्यांनी यासंबंधी घरात चौकशी केली तेव्हा आपल्या घरचे पोहे आईने न पाठविता दुसऱ्या

कोणीतरी पाठविले होते असे त्यांना कळले. मात्र त्या दिवशी त्यांच्या आईचा गळा सुजला. "देवांसाठी नैवेद्य पाठवायचे काम आईचे नव्हते काय?" असा प्रश्न जरी त्यांच्या मनात आला; तरी शेवटी बुवांनी आईसाठी देवांजवळ क्षमा मागितली. त्यामुळे आईच्या गळ्याची सूज जाऊन तिला बरे वाटले.

खाजऱ्या सुरणाच्या नैवेद्याची अशीच मनोरंजक हकीकत आहे. एकदा कोणीतरी एक मोठा सुरण देवांना अर्पण केला. त्या दिवशी नैवेद्यासाठी त्या सुरणाची भाजी केली. भाजीचा नैवेद्य दाखविल्या-वर तेथे जमलेल्या सर्व मुलांना त्या नैवेद्याची भाजी प्रसाद म्हणून देण्यात आली. तो प्रसाद खाताच मुलांच्या घशाला खाज सुटून त्यांना फार त्रास झाला. त्यामुळे सुरण खाजरा होता हे बुवांच्या ध्यानात आले; परंतु राहिलेला नैवेद्य टाकून न देता किंवा दुसऱ्या कोणा-लाही न देता श्रीशास्त्रीबुवांनीच तो सर्व खाऊन टाकला. त्यामुळे त्यांच्या घशाला खाज सुटून तो सुजला व त्यांना फार त्रास झाला. देवाला खाजऱ्या सुरणाचा नैवेद्य दाखविल्याची कोणाला तरी शिक्षा भोगावी लागणार होती, ती बुवांनी स्वतःच भोगली. अखेर खाजऱ्या नैवेद्याची जबाबदारी त्यांचीच होती ना? वास्तविकपणे मुलांच्या घशाला खाज सुटल्यावरोवर सुरणाची भाजी खाणे ताप-दायक आहे हे त्यांच्या लक्षात आले होते; परंतु देवाला दाख-विलेला नैवेद्य टाकून देऊन त्याचा अनादर किंवा अवहेलना करा-वयाची नाही ही त्यांची जबरदस्त निष्ठा होती. या बाबतीतील त्यांचा सर्व भावच फार अपूर्व होता. जे देवाला तेच आपल्याला या न्यायानेच ते चालत होते.

या कथेवरून हे लक्षात येते की, साधक जो जो देवाच्या सख्यत्वा-साठी, त्याच्या प्राप्तीसाठी किंवा त्याच्याशी एकरूप होण्यासाठी अधिकाधिक प्रयत्न करतो तो तो देव साधकाची नाना तऱ्हेने

परीक्षा घेतच राहतो. अशा प्रकारचा संग्राम सर्व साधकांच्या आयुष्यात या ना त्या रीतीने उपस्थित होतोच होतो. श्रीसंत तुकाराममहाराजांनी अशा प्रकारच्या या संग्रामाचे वर्णन एका अभंगात करताना असे म्हटले आहे की–

रात्रीदिवस आम्हा युद्धाचा प्रसंग। अंतर्बाह्य जग आणि मन ।।
जीवाही अगोज पडती आघात। येऊनियां नित्य नित्य वारूं।
तुका म्हणे तुझ्या नामाचिया बळें। अवघीयांचें काळें केलें तोंड ।।

अशा रीतीने जेव्हा हा साधनसंग्राम चालत राहतो तेव्हा शेवटी देव त्या साधकाचीच आहुती मागू लागतो श्रीशास्त्रीबुवांसारखा जो अपार धैर्याने आपले सारसर्वस्व देवाच्या चरणी अर्पण करतो तोच या दिव्य संग्रामात यशस्वी होतो. या अपूर्व संग्रामाच्या स्थितीचे "एकवीस समासी किंवा जुना दासबोध" या ग्रंथात श्रीसमर्थ रामदासस्वामीमहाराज यांनी केलेले वर्णन समरसतेने वाचले म्हणजे श्रीशास्त्रीबुवांच्या जीवनात चाललेल्या देवभक्तांच्या दिव्य अंतरंग संग्रामातील काही कण तरी हाती येतील. इतकेच नव्हे ; तर त्यांच्या जीवनात घडलेल्या अपूर्व, अलौकिक व लोकोत्तर अशा अप्राकृत भक्तीच्या रहस्याचा अंशात्मक भेद झाल्याचे समाधान लाभेल. श्रीसमर्थ म्हणतात–

आत्मा साधावया जात। तो साधकाचाचि होय घात।
तेणें गुणें निवांत। निःशब्द राहे ।। २१.४३ ।।
व्हावया वस्तूची प्राप्ती। साधन साधक करिती।
तंव तंव वस्तु आहुती। साधकाचीच मागे ।। ४४ ।।
जेव्हा विवेकें आपुली। वस्तूसी आहुती दीधली।
तयांसीच वस्तु लाधली। येरां अप्राप्त ।। ४५ ।।
येथींचा विपरीत विचार। करितां आपुला संहार।
तेणें अक्षय्य अपार। सुख लाहे ।। ४६ ।।

जेणें जिवावरी उठावे । तेणें आनंदासी लुटावें ।
आनंदभोग लुटोनि असावे । कल्पकोटी ।। ४७ ।।
जो कां आपुली कुरवंडी । ओवाळूनी परती सांडी ।
तयासीच वस्तूची जोडी । इतरां न घडे ।। ४८ ।।
येथ मोठा लाभ होतो । आपुल्यासाठीं राम मिळतो ।
साटी केलिया मग तो । रामचि होय ।। ४९ ।।

बुवांचे सर्वच आचरण अत्यंत शास्त्रशुद्ध व कडकडीत असून ते स्वत: जसा सर्व आचारधर्म निष्ठेने पाळीत असत तसा तो इतरांनीही पाळावा व त्याप्रमाणे शास्त्रपूत आचरण करावे असा त्यांचा कटाक्ष असे. बुवांकडे बरेच विद्यार्थी वेदाध्ययनासाठी येत असत. ते मंदिरामध्येच राहत असत. त्या विद्यार्थ्यांच्या आचरणावर त्यांचे अत्यंत लक्ष असे. या सर्व वेदाध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी अत्यंत शुद्धतेने राहावे असा श्रीशास्त्रीबुवांचा दंडक असे. नाटकाला किंवा जत्रेला विद्यार्थ्यांनी जाऊ नये अशी त्यांनी त्यांना सक्त ताकीद दिलेली होती. इतकी कडक शिस्त लावली तरीही विद्यार्थ्यांकडून सर्वच गोष्टी पाळल्या जात नसत. सावंतवाडीला एखादी नाटक कंपनी आल्यास नाटक पाहण्यासाठी किंवा जवळपास जत्रा असल्यास जत्रेसाठी हे विद्यार्थी रात्रीच्या वेळी गुपचूप जात व पहाटे स्नान करून आपला पाठ म्हणण्यास येत असत. परंतु रात्रीच्या जागरणाचा परिणाम होऊन त्यांना झोप येत असे. अध्ययन करता करता झोप आली की, त्यांची लबाडी उघडकीला येत असे. मुलांनाही आपली चूक लक्षात येत असे व ते त्याबद्दल क्षमाही मागत असत; परंतु मुलांनी क्षमा मागितली तरीही शिक्षा म्हणून बुवा त्यांच्याकडून तेथल्या तेथे हजार गायत्री मंत्राचा जप करून घेत असत.

बुवांनी ज्याप्रमाणे अनेक लोकांना दु:खमुक्त होण्यासाठी साहाय्य केले त्याचप्रमाणे तेथील पोलीस खात्यालाही त्यांनी मदत केली

त्यामुळे पोलीस अधिकाऱ्यांच्या मनात त्यांच्याबद्दल आदर होता. वैयक्तिक अडचणीच्या वेळी हे अधिकारी बुवांकडे मदतीसाठी येत असत. असेच श्री. कंटक म्हणून एक अधिकारी त्यांचे भक्त होते. त्यांच्या बद्दलचा आपला आदर व कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी ते पाहात होते. कागलच्या श्रीदत्तमूर्तीला एखादा दागिना करावा अशी त्यांची इच्छा होती. त्यावेळी त्यांना पैशांची व्यवस्था करता आली नाही; पण खर्चाची चौकशी करून त्यांनी अंदाज करून ठेवला होता. पुढे काही दिवसांनी त्यांना सरकारकडून चांगल्या सेवेबद्दल पंचवीस रुपये रोख बक्षीस मिळाले. आपल्या मनातील इच्छा पूर्ण करण्याचा योग अशा तऱ्हेने आला याबद्दल त्यांना आनंद झाला. ते पंचवीस रुपये त्यांनी आपल्या मनातील देवाचा दागिना करण्याच्या संकल्पाची पूर्ती करण्याकरिता म्हणून बाजूला काढून ठेवले. पुढे अकस्मात् त्यांना फिरतीवर जावे लागले. तेथे त्यांचे दोन महिने मोडले. मध्यंतरीच्या काळात देवांनी बुवांना असे सांगितले की, "सावंतवाडीचे कंटक पंचवीस रुपये आणून देणार आहेत. त्या पैशातून मुकुट करावा." त्यांनी ही हकीकत श्री. रामभाऊ सबनीसांना सांगितली. श्री. कंटक फिरतीवरून परत आल्यावर त्यांच्याकडे श्री. रामभाऊंनी हा विषय काढला. त्यावेळी श्री. कंटकांना आपल्या संकल्पाची आठवण झाली व पंचवीस रुपये बाजूला काढून ठेवल्याचे त्यांना आठवले. या प्रसंगामुळे श्री.कंटकांची श्रीशास्त्रीबुवांवरील श्रद्धा अधिकच वाढली व देवांचेही आपल्या सेवेकडे लक्ष आहे याबद्दल त्यांना धन्यता वाटली. त्यानन्तर श्री. कटकांनी आपल्या जवळील पंचवीस रुपये बुवांच्याकडे आणून दिले. त्यांनी त्या पंचवीस रुपयांचे कोल्हापूरहून सोने आणवून देवांना मुकुट करवून घेऊन तो देवास घातला.

दीन, दुबळ्या, दुःखी व आर्त लोकांची दुःखे बुवांकडे आल्यावर

हलकी होत असत व लोकांना समाधान मिळत असे. त्यामुळे लोकांच्या हृदयामध्ये भक्तीचा उदय होऊ लागला. या कारणांमुळे माणगावला लोकांची गर्दी वाढू लागली व त्याला तीर्थक्षेत्राचे स्वरूप आले. लोकांच्या हृदयामध्ये श्रीशास्त्रीबुवा, भगवान् श्रीदत्तात्रेय व माण-गाव ही समाना अर्थाची नावे झाली होती. पापक्षालन करणारी अशी ही त्रिवेणी तेथें असल्यामुळे लोकांच्या दृष्टीने माणगावला प्रयाग क्षेत्राचा महिमा प्राप्त झाला होता.

माणगावचे श्री. शंकरभट साधले नावाचे एक गृहस्थ काही दिवसांपूर्वी कारण नसताना अकस्मात् घर सोडून निघून गेले होते. तीन-चार वर्षे शोध करूनही त्यांचा पत्ता लागला नव्हता. घरचा कर्ता पुरुष निघून गेल्यावर त्या घराची काय दैन्यावस्था होते ते सांगावयालाच नको. श्री. शंकरभटांची पत्नी डोळ्यात आसवे आणून नवऱ्याची वाट पाहात दिवस कंठीत होती. बुवांचे नाव सर्वांच्या तोंडी झाल्यावर श्री. शंकरभटांच्या आईने कर्ता मुलगा घर सोडून गेल्यामुळे कुटुंबाची कशी दैन्यावस्था झाली आहे हे त्यांना सांगितले व या परिस्थितीतून बाहेर पडण्याचा काही तरी मार्ग दाखवा अशी त्यांची प्रार्थना केली. बुवांनी तिला असे सांगितले की, श्री. शंकरभटजींच्या पत्नीने श्रद्धेने अश्वत्थाला एक लक्ष प्रदक्षिणा घातल्या तर तिचे सौभाग्य तिला परत मिळेल. बुवांच्या सांगण्याप्रमाणे श्रीशंकरभटजींच्या आईने आपल्या सुनेकडून एकलक्ष प्रदक्षिणेचा संकल्प पूर्ण करून घेतला. हा संकल्प पूर्ण झाल्याबरोबर श्री. शंकरभट आपण होऊन घरी परत आले.

माणगाव शेजारच्या गावी एका ब्राह्मणाच्या घरी पिशाच्च-बाधेने फार त्रास होत होता. अनेक मांत्रिक झाले; पण पिशाच्चाचा बंदोबस्त झाला नाही. शेवटी तो ब्राह्मण उपाय विचारण्यासाठी बुवांकडे आला. त्यावेळी प्रथम त्याची चांगली कानउघाडणी

करताना ते त्याला असे म्हणाले की, "ब्राह्मण असून तुम्ही आचार-धर्म सोडला हे बरे नाही. तुम्ही घरी नैवेद्य-वैश्वदेव करीत नाही. ज्या ठिकाणी धर्माला थारा नाही त्या ठिकाणी पिशाच्चबाधा होणार नाही तर काय होईल? घरात दररोज नियमाने नैवेद्य-वैश्वदेव करा व विष्णुसहस्रनामाच्या बाराशे आवृत्या करा. घरात धर्माप्रमाणे आचरण होऊ लागले की, पीडा बाहेर गेलीच म्हणून समजा." इतके सांगून बुवांनी त्या ब्राह्मणाला काही मंत्रजपाचा उपदेश करून त्याचेही अनुष्ठान करण्यास सांगितले. श्रीशास्त्रीबुवांच्या सांगण्याप्रमाणे त्या ब्राह्मणाने अनुष्ठान सुरू करताच त्याच्या घरची सर्व पीडा थांबली. अशा रीतीने त्या ब्राह्मणाची पीडा दूर होऊन त्याचे जीवन उत्तम सुधारले असले; तरी पुढे काही दिवसांनी त्या ब्राह्मणाने सर्व नियम व अनुष्ठान सोडून दिल्याबरोबर त्याला पूर्ववत् त्रास होऊ लागला. मनुष्य-स्वभाव किती स्खलनशील व सुखासीन आहे हेच यावरून दिसून येते:

सावंतवाडीमध्ये एका ब्राह्मणाला क्षयरोग झाला होता. त्याने पुष्कळ औषधोपचार केले; पण त्याला गुण येईना. एका सद्गृहस्थाने त्याला नियमाने श्रीगुरुचरित्र वाचावयाला सांगितले. श्रीगुरुचरित्राच्या वाचनाने तो व्याधिमुक्त झाला आणि त्याची प्रकृतीही सुधारली. कालान्तराने त्याला वेदान्त विषयाची गोडी निर्माण झाली व तो नियमाने वेदान्त श्रवण करू लागला. वेदान्ताचा तो अधिकारी नसल्यामुळे वेदान्तश्रवणाचा त्याच्यावर विपरित परिणाम झाला. कर्ममार्गावरील त्याची श्रद्धा नाहीशी झाली व त्याने आचारधर्म सोडून दिला. श्रीगुरुचरित्राचे वाचन बंद केले. त्याचा व्हावयाचा तोच परिणाम झाला. रोगाने पुन्हा उचल खाल्ली. शेवटी यावर काही उपाय विचारण्याकरिता तो बुवांकडे माणगावला गेला.

बुवांच्याकडे गेल्यावर त्याने आपली सर्व हकीकत त्यांना

सांगितली. त्याची सर्व हकीकत ऐकताच त्यांनी त्याची खूप निर्भ-र्त्सना केली व ते त्याला असे म्हणाले की, " तुम्ही ब्राह्मण जातीत जन्माला आलात खरे; परन्तु त्याला विहित अशी स्नानसंध्यादी नित्यकर्मे सोडून दिल्यामुळे तुम्हाला व्याधीची ही पीडा भोगावी लागत आहे. जर तुम्हाला वेदान्ताची आवड असली; तर त्याचा अभ्यास अवश्य करा. हा अभ्यास उत्तमच आहे. मात्र अशा रीतीने वेदान्ताचा अभ्यास केला; तरी यावज्जीव ईश्वराची व गुरूची सेवा ही केलीच पाहिजे. आपण वेदान्ताचा अभ्यास करतो, आता आपल्याला या गोष्टींची जरूरी नाही किंवा वेदान्त विचारांच्या दृष्टीने त्यांची आवश्यकता नाही असे गृहीत धरून त्यांना कधीही सोडता यावयाचे नाही. तुम्ही मात्र वेदान्ताच्या पाठीमागे लागून सर्व प्रकारे वर्णाश्रमधर्माचा त्याग केला आहे. त्यामुळे तुमच्यावर देवाची अवकृपाच झाली आहे यात काहीच शंका नाही. आपणा-करिता माझ्याकडे काहीही उपाय नाही. तुम्ही खुशाल तुम्हाला वेदान्त शिकविणाऱ्या गुरूकडे जा व निरोगी व्हा."

बुवांचे हे सर्व भाषण ऐकून तो ब्राह्मण फार उदास झाला. त्याने श्रीशास्त्रीबुवांनी आपणाला काहीतरी उपाय सांगावा म्हणून पुनःपुन्हा खूप विनंती केली; परन्तु अशा प्रकारच्या कर्मभ्रष्ट व आचारभ्रष्ट ब्राह्मणाला काहीही उपाय न सांगण्याच्या आपल्या निश्चयापासून ते अणुमात्र ढळले नाहीत. शेवटी तो ब्राह्मण मोठ्या खिन्नपणे तेथून निघून गेला. पुढे काही दिवसांनी त्या व्याधीमुळेच तो मृत्यू पावला.

एकदा माणगावातीलच एका ब्राह्मणाची पहिली पत्नी निवर्तल्या-मुळे त्याने दुसरे लग्न करावयाचे ठरविले त्यावेळी त्याच्यासाठी त्याच्या आईवडिलांनी मुलगी पाहिली. ती त्यांना पसंत पडली. आपल्या मुलाची व त्या मुलीची जन्मपत्रिका जुळते आहे का नाही

हे पाहण्यासाठी जेव्हा त्या मुलाच्या वडिलांनी तिची जन्मपत्रिका तिच्या वडिलांकडे मागितली तेव्हा ती मिळत नसल्याचे त्यांनी त्यांना सांगितले. असे असले; तरी मुलाचे लग्न करणे अत्यावश्यक असल्यामुळे त्याच्या आईवडिलांनी दोघांच्या पत्रिका जुळतात की नाही, हे न पाहताच मुलाचे लग्न ठरवून टाकले.

आपल्या मुलाचे लग्न आपण दोघांच्या पत्रिका जुळतात की नाही हे न पाहताच ठरविले याबद्दल मुलाच्या आईला हुरहूर लागून राहिली होती. त्यामुळे आपल्या मनातील किंतू दूर होण्यासाठी व त्यावर काहीतरी उपाय विचारण्यासाठी ती शेवटी बुवांच्याकडे गेली. तिने मुलाच्या द्वितीय संबंधाबद्दल आपणास निर्माण झालेली चिंता त्यांच्या कानावर घातली.

त्या माउलीचे सर्व म्हणणे ऐकताच बुवा तिला असे म्हणाले की, "त्या मुलीला मंगळ आहे; परन्तु आता लग्नाचे निश्चित झाले असल्यामुळे हा दोष दूर व्हावा म्हणून त्यावर काही उपाय सांगतो तो करा म्हणजे मुलीच्या मंगळाच्या दोषाचा परिहार होईल. एक तांबडा बैल दान करून मंगळाच्या मंत्राचा जप करा आणि ब्राह्मण सुवासिनी भोजन घालून सांगता करा." इतके सांगून बुवांनी त्या माउलीला दानाचा व जपाचा संकल्पपूर्वक विधी लिहून दिला. मुलाच्या आईवडिलांनीही बुवांनी सांगितल्याप्रमाणे श्रद्धेने सर्व विधी करून नंतरच मुलाचे लग्न केले. त्यामुळे त्या मुलाचा संसार पुढे उत्तमप्रकारे चालून तो सुखी झाला.

एका वर्षी ग्रस्तोदित चंद्रग्रहण आले होते. हे ग्रहण भारतात दिसणार नाही असे पंचांगात नमूद केलेले होते. जाणकार ज्योतिर्विदांचेसुद्धा तेच मत होते. त्यामुळे माणगावमधील सर्व लोक स्वस्थ व आपल्या नेहमीच्या उद्योगात गुंतलेले होते. आपले नेहमीचे अनुष्ठान उरकून बुवा भिक्षेसाठी निघाले; एवढ्यात देव त्यांना

असे म्हणाले की, "आज ग्रहण दिसणार आहे, म्हणून आज भिक्षा व नैवेद्य नाही." हे ऐकून ते मागे फिरले व तेथे असलेल्या सर्वांना "आज ग्रहण दिसणार आहे, सबब आज भिक्षादी होणार नाही." असे सांगितले. त्यामुळे सर्वजण आश्चर्यचकित झाले. सर्वांना असे वाटले की, आज अनेक वर्षे पंचांग छापले जात आहे व पंचांगात छापलेले कालमान, गणित आणि आकाशस्थ ग्रहांची, ताऱ्यांची व नक्षत्रांची स्थिती या सर्व गोष्टी आजपर्यंत अचूक आढळून आल्या आहेत. गणिताच्या साहाय्याने शेकडो वर्षांतील ग्रहांचे उदय आणि अस्त अगोदरच जाहीर करण्यात आलेले असतात व ते नेहमीच अचूक असल्याचे आढळून आलेले आहे. असे असताना बुवा आज हे काय विपरीत सांगत आहेत ? असे विचार मनात आले, तरी सर्वसाधारण लोक काही बोलले नाहीत ; पण सर्वांच्या मनात संशय निर्माण झाला होता. गावातील काही प्रतिष्ठित मंडळींनी मनातल्या मनात श्रीशास्त्रीबुवांचा उपहासही केला ; परंतु संध्याकाळी ग्रहणाच्या वेळी जेव्हा ग्रहण लागलेले दिसले तेव्हा सर्वांची तोंडे बंद झाली. ज्योतिष-शास्त्रातील विद्वानांनी तर बुवांच्या अंतर्ज्ञानाची प्रसंशाच केली.

कधीकधी श्रीशास्त्रीबुवांची परीक्षा पाहण्याचे देवांच्या मनात येत असावे. एकदा श्रीशास्त्रीबुवा ध्यानस्थ बसले असताना ध्यानामध्ये एक मनुष्य पालखी घेऊन आल्याचे त्यांना दिसले. तो मनुष्य त्यांना असे म्हणाला की, "तुमचे इहलोकीचे वास्तव्य संपले आहे. तुम्ही आता पालखीत बसा. आम्ही तुम्हाला न्यावयाला आलो आहोत." ध्यानावस्थेतच बुवा निर्विकारपणे पालखीत बसले आणि ते दृश्य नाहीसे झाले. त्याचप्रमाणे एकदा ध्यानामध्यें असताना श्रीशास्त्री-बुवांना देव असे म्हणाले की, "तुम्हाला कुष्ठरोग होणार आहे." ध्यानातून उठल्यावर श्रीशास्त्रीबुवांचा एक हात व एक पाय निश्चेष्ट पडला. आपणास खरोखरच कुष्ठरोग होत आहे असे बुवांना वाटले.

हा आपला प्रारब्धभोग आहे तो आपणास भोगलाच पाहिजे असे समजून तीनचार दिवसपर्यंत ती अवस्था त्यांनी सहन केली. पुढे त्यांचा हात व पाय आपोआप बरे झाले. याबद्दल देवांना विचारताच देव त्यांना हसून असे म्हणाले की, "तुमची परीक्षा घेतली व तुमचा निश्चय केवढा मोठा आहे ते पाहिले." अशा प्रकारे देव भक्ताची वारंवार परीक्षा घेऊन त्याचे धैर्य पाहत असतो; कारण आनंदाचे कैवल्यदान तोच भक्ताला करीत असतो. "सदा सर्वदा देव सन्निध्र आहे । कृपाळूपणे अल्प धारिष्ट पाहे ।।" असे जे श्रीसमर्थ रामदास-स्वामीमहाराजांनी मनाच्या श्लोकात म्हटले आहे, त्याचे श्रीशास्त्री-बुवांच्या उदाहरणावरून प्रत्यंतर आल्याशिवाय राहात नाही.

वेदशास्त्रात असे सांगितले आहे की, अवतारी पुरुषांच्या देहा-कडून होणाऱ्या बऱ्यावाईट कर्मांची फळे त्यांना भोगावी लागत नाहीत; कारण ज्या मनाच्या साहाय्याने देहभान ठेवावयाचे असते ते मन त्यांनी संपूर्णपणे ईश्वरचरणी वाहिलेले असते. त्यामुळे त्यांच्या देहाला कर्मबंधन राहत नाही. या अवस्थेमुळे त्यांच्या चांगल्या कर्मांची फळे त्यांची भक्ती व सेवा करणारे त्यांचे भक्त भोगतात आणि इतर कर्मांची फळे त्यांचा द्वेष करणाऱ्यांना भोगावी लागतात त्यामुळेच शास्त्रात असे म्हटले आहे की, "तस्यपुत्रा दायमुपयान्ति सुहृद: साधु-कृत्यां, द्विषत: पाप कृत्याम् ।"

माणगावमध्ये बुवांचे वाढते महत्त्व पाहून काही लोकांच्या मना-मध्ये असूया उत्पन्न झाली व त्यांना त्यांचा हेवा वाटू लागला. आपणही असेच एक दत्तमदिर बांधून तेथे भजन-पूजनाचा कार्यक्रम सुरू करावा म्हणजे आपलीही श्रीशास्त्रीबुवांच्याप्रमाणे कीर्ती वाढून आपल्याला मान, सन्मान व धनधान्यादी संपत्ती मिळेल असे वाईट वचार त्यांच्या मनात येऊ लागले. श्री. आत्मारामपंत साधले यांनी काही मंडळींच्या पुढाकाराने एक वेगळे श्रीदत्तमंदिर स्थापून बुवांच्या

श्रीदत्तमंदिराप्रमाणेच तेथे भजनपूजनाचा कार्यक्रम सुरू केला. इतर काही लोकांनीही आसपास त्या त्या ठिकाणी आपापली श्रीदत्तमंदिरे स्थापून तसेच कार्यक्रम सुरू केले; पण माणगावचे श्रीदत्तमंदिर श्रीशास्त्रीबुवांनी थोडेच स्थापन केले होते? ते तर भगवान् श्रीदत्तात्रेयांनी स्थापन केले होते. त्या मंदिरामध्ये देवांचे वास्तव्य होते. देवांची सेवा करणे एवढेच श्रीशास्त्रीबुवांना ठाऊक होते. दीनदुबळ्या व आपाद्ग्रस्त लोकांची सेवा करणे हा सुद्धा त्यांच्या दृष्टीने ईश्वर सेवेचाच एक भाग होता. या सेवेपासून त्यांना कसलीही अपेक्षा नव्हती. धनाची तर नव्हतीच नव्हती; पण मानाची सुद्धा नव्हती. या उलट ज्यांनी इर्षेला पेटून वेगळी श्रीदत्तमंदिरे स्थापन केली होती त्यांना सर्व काही पाहिजे होते: प्रतिष्ठा पाहिजे होती, पैसा पाहिजे होता व वैभव पाहिजे होते. मंदिरामध्ये देवाची भक्ती करावयाची असते, देवाचा बाजार मांडावयाचा नसतो, हे त्यांना ठाऊक नव्हते का? पण देवांच्या लाडक्या भक्ताच्या द्वेषावरच ती मंदिरे उभारली होती. जेथे द्वेष निर्माण होतो तेथे सारासार विचार नष्ट होतो. ज्या मंदिरांमध्ये द्वेषाची आराधना चालली होती ती टिकणार तरी कशी? "दया क्षमा शांती। तेथे देवाची वसती॥" या श्रीसंत तुकाराममहाराजांनी सांगितलेल्या न्यायाप्रमाणे इतर ठिकाणी स्थापन झालेल्या दुसऱ्या सर्व देवस्थानांची स्थिती नसल्यामुळे ती फार दिवस चालली नाहीत. इतकेच नव्हे; तर ज्या ज्या मंडळींनी पुढाकार घेऊन स्वतंत्र श्रीदत्तमंदिरे स्थापन करण्याचा उद्योग केला, त्या लोकांना काही ना काही तरी त्रास होऊन त्यांची अत्यन्त वाईट अशी अवस्था झाली. त्यातील काहीजणांना राजद्रोहाच्या आरोपावरून शिक्षा झाल्या; तर काहीजणांना वेड लागले. यामुळे ही सर्व मंदिरे आपोआपच ओस पडली. साधूंचा मत्सर किंवा द्रोह केला असता ते देवाला कदापीही आवडत नाही, हेच खरे आहे. त्यामुळे जे लोक

साधूंना त्रास देतात त्यांचे तोंड शेवटी काळे होते हे सांगताना श्रीसंत तुकाराममहाराजांनी असे म्हटले आहे की–

भुंकूनियां सुनें लागे हत्तीपाठीं। होऊनिया हिंपुटी दुःख पावे ।।
काय त्या मशकें तयाचें करावें। आपल्या स्वभावें पीडीतसे ।।
मातले माकड विटवी पंचानना। घेतलें मरणा धरणें तें ।।
तुका म्हणे सतां पीडितील खळ। येती तोंड काळें करूनियां ।।

वरील कथेत वर्णन केलेल्या अनेक स्पर्धकांपैकी व बुवांचा द्वेष, मत्सरादी करणाऱ्यांपैकी श्री. आत्मारामपंत साधले हे माणगावचेच राहणारे होते. त्यांनीही श्रीशास्त्रीबुवांशी स्पर्धा करण्याकरिता एक स्वतंत्र श्रीदत्तमंदिर बांधले होते इत्यादी संबंधीची सर्व हकीकत वर आलीच आहे. एकदा त्यांच्या सुनेचा प्रसूती काळ जवळ आला असताना तिला फार त्रास होऊ लागला. त्यांनी आपल्या सुनेचा त्रास कमी व्हावा व ती सुखरूप प्रसूत व्हावी म्हणून खूप उपाय केले; परंतु कशाचाही उपयोग झाला नाही. शेवटी सर्व मानापमान बाजूला ठेवून त्यांनी बुवांच्याकडे धाव घेतली.

श्री. आत्मारामपंत ज्यावेळी श्रीशास्त्रीबुवांच्या घरी आले त्यावेळी त्यांनी त्यांचे अत्यंत प्रेमाने व आपुलकीने स्वागत केले. श्री. आत्मारामपंतांनी बुवांना एकंदर सर्व हकीकत सांगून, त्यांनी त्यांना आपल्या घरी येऊन आपल्या सुनेची होत असलेल्या त्रासातून सुटका व्हावी व तिची प्रसूती सुखरूप व्हावी म्हणून काहीतरी दैवी उपाय करण्याबद्दल अत्यंत आग्रहाने विनवून सांगितले.

ही सर्व हकीकत बुवांनी शांतचित्ताने ऐकली. त्यांचे मन गंगेच्या पाण्याप्रमाणे निर्मळ होते. त्यांच्या मनाला कधीही कोणाबद्दल द्वेष मत्सर किंवा सूडाची भावना शिवली नाही. त्यामुळे आपले अनुष्ठान आटोपल्याबरोबर ते श्री. आत्मारामपंतांच्याबरोबर त्यांच्या घरी

जाण्यासाठी निघाले. ते अर्ध्या रस्त्यावर गेले असतील नसतील तोच देवांनी त्यांना असे सांगितले की, "मागे फिरा, आता पुढे जाण्याचा काहीही उपयोग होणार नाही."

देवांची ही आज्ञा ऐकताच बुवा रस्त्यातच थांबले व ते श्री. आत्मारामपंत यांना असे म्हणाले की, "तुम्ही घरी जा. आपण येऊन आता काहीही कार्य होण्यासारखे नसल्यामुळे आपण आता काही आपल्याकडे येत नाही." असे सांगून श्रीशास्त्रीबुवा श्रीदत्तमंदिरातील वास्तव्यस्थानाकडे परत आले. बुवा वाटेतच एकाएकी असे सांगून परत फिरल्यामुळे श्री. आत्मारामपंत मोठ्या खिन्न अंतःकरणाने घरी आले. मात्र ते घरी येऊन पोहोचण्यापूर्वीच सुनेचे प्राणोत्क्रमण झाले होते.

अर्जुनाची भगवान् श्रीकृष्णांशी सख्यभक्ती होती. मीरेने आपल्या गिरिधरलालाला आपल्या पतीच्या रूपातच पाहिले. श्रीरामकृष्ण परमहंसांनी भगवती कालीची मातेच्या स्वरूपात उपासना केली. श्रीवासुदेवशास्त्र्यांचा देवांशी सेवकभाव होता. त्यापेक्षा देवांशी अधिक जवळीक श्रीशास्त्रीबुवांनी कधी केली नाही; पण देवांनी मात्र श्रीशास्त्रीबुवांशी यापेक्षा अधिक जवळचा व प्रेमाचा भाव संपादन करण्याचा प्रयत्न केला, हे बुवांच्या चरित्रातील अनेक प्रसंगांवरून आपणास दिसून येते. खरे पाहता देव–भक्तांचे नाते नेहमी शब्दातीत असते. त्या दोघांमधील परस्पर प्रेमाचे वर्णन मानवी भाषेत करता येणे शक्य नाही. व्रजातील गोपींचे श्रीकृष्णांवर अप्राकृत, अलौकिक व लोकोत्तर प्रेम असल्यामुळेच देवर्षी नारदांना अशा दिव्यभक्तिप्रेमाचे उदाहरण देताना "यथा व्रजगोपिकानाम्" असेच म्हणावे लागले. याशिवाय दुसरे कोणतेही उदाहरण त्यांना देता आले नाही; कारण यासारखे दुसरे उदाहरण सापडणे या भूतलावर शक्य नाही. "मेरे तो गिरिधर गोपाल

दूसरो न कोई" असे म्हणणाऱ्या प्रेमवेडचा मीरेचे आणि तिच्या गिरिधर गोपाळाचे संबंध जरी लौकिक दृष्टीने अंध असले; तरी ज्यांचे प्रज्ञाचक्षू किंवा दिव्यचक्षू उघडले आहेत त्यांच्या दृष्टीने ते अपूर्व व अलौकिक असेच आहेत. भक्तशिरोमणी सूरदास आणि त्यांचा गोपाळकृष्ण यांच्यामधील नाते व भक्तिवेडे नामदेव आणि त्यांचा विठ्ठल यांच्या मधील दिव्य प्रेमाचे संबंध सामान्य प्राकृत माणूस कसे वर्णन करू शकणार? त्यासाठी पूर्णपणे कामगंधरहित होऊन व स्वार्थरहित होऊन, सर्वाभूती परमेश्वर पाहण्याच्या दिव्य दृष्टीनेच आम्ही पाहिले पाहिजे. श्रीशास्त्रीबुवांचे आणि भगवान् श्रीदत्तात्रेयांचे जे संबंध या सात वर्षात निर्माण झाले ते आपल्याला पूर्णत्वाने आकलन होणे कधीही शक्य नाही. "देवांनी बुवांना सांगितले," "देवांनी बुवांना दृष्टांत दिला" "देव बुवांशी बोलले" "श्रीवासुदेवशास्त्री देवांना म्हणाले" वगैरे विधानांचे खरे मर्म कधी आपल्याला कळेल असे वाटते का? खरेच का देव बुवांशी बोलत होते? खरेच का देव बुवांकडून आपले कोडकौतुक करून घेत होते? विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आम्हा आङ्ग्लविद्याविभूषित पिढीला देव माणसाशी बोलतो व माणूसही देवाशी संभाषण करतो हे पटणार नाही; कारण आमची दृष्टी प्रपंचात आणि भौतिक गोष्टींमध्ये एवढी गुरफटून गेलेली आहे की, त्या गुंत्यातून मोकळे होऊन, अर्जुनाला लाभलेल्या दिव्यदृष्टीची प्राप्ती करून घेऊन हे विश्वरूप पाहण्यास ती कधीच समर्थ होणार नाही असे वाटते. त्यामुळे "देव श्रीशास्त्रीबुवांना म्हणाले" हे वाक्य आम्ही वाचतो आणि पुढे जातो. त्या वाक्याच्या अर्थाचा साक्षात्कार आम्हाला होत नाही; परंतु आमच्या बुद्धीच्या संकुचितपणामुळे वस्तुस्थिती-मध्ये थोडाच फरक पडणार आहे!

भक्तांसाठी देवाने अनेक अवतार घेतले असे पुराणात आम्ही

वाचले आहे. द्रौपदीची भर सभेत विटंबना होत असलेली पाहून देवाने वस्त्रावतार घेतला. दामाजीची पावती पटविण्यासाठी तो महार झाला. त्याचप्रमाणे श्रीवासुदेवशास्त्र्यांसाठी देवांना एकदा व्याघ्रावतार घ्यावा लागला होता, हे आपण मागे पाहिलेच आहे. तसेच एकदा देवांनी श्रीशास्त्रीबुवांसाठी ब्रह्मचाऱ्याचा अवतार घेतला होता. त्याची कथा अशी. श्रीक्षेत्र नरसोबाच्या वाडीतील काही लोक अधून मधून माणगावला येत असत. एकदा एक विद्वान् ब्राह्मणशास्त्री वाडीहून माणगावला आले होते. बुवांचा व त्यांचा पूर्वपरिचय होता. त्याचप्रमाणे बुवा दररोज योगाभ्यास करतात व त्यांची योगामध्ये फार प्रगती आहे, हे वाडीच्या त्या शास्त्रीबुवांना माहीत होते. योगाबद्दल त्यांच्या मनात अनेक शंका व पूर्वग्रह होता. त्यामुळे या विषयासंबंधी बुवांबरोबर वादविवाद व चर्चा करण्याची त्यांची फार इच्छा होती.

एके दिवशी सवड पाहून "योगाभ्यासाची आवश्यकता व उपयोग काय आहे? योगाला शास्त्रीय आधार काय आहे? योग श्रेष्ठ का ज्ञान श्रेष्ठ?" इत्यादी नाना तऱ्हेचे प्रश्न विचारून त्यांनी बुवांच्याबरोबर वादविवादास व चर्चेस आरंभ केला.

श्री. वाडीकरशास्त्र्यांनी हे सर्व प्रश्न विचारले खरे; परंतु कोणत्याही कारणास्तव कोणाशीही वादविवाद करावयाचा नाही हा बुवांचा नियम असल्यामुळे त्यांनी त्यांना असे सांगितले की, "आपण योगाचा काही शास्त्राभ्यास वगैरे केलेला नसल्यामुळे आपणाशी वादविवाद किंवा चर्चा करण्यास व आपल्या प्रश्नांची उत्तरे देण्यास आपण असमर्थ आहोत."

अशा रीतीने श्री. वाडीकरशास्त्र्यांना उत्तर देऊन बुवा आपल्या नित्यकर्मात निमग्न झाले. बुवांनी आपल्या प्रश्नांची उत्तरे दिली नाहीत असे पाहून, आपण जिंकलो असा श्री. वाडीकरशास्त्र्यांन

अभिमान वाटला. श्रीशास्त्रीबुवांना योगाबद्दल काहीही माहिती नाही; मात्र त्यांची त्याबद्दल विनाकारणच प्रसिद्धी झाली आहे अशी श्री. वाडीकरशास्त्र्यांची गैरसमजूत झाली.

या प्रसंगानन्तर काही दिवसांनी श्री. वाडीकरशास्त्री माणगावाहून निघून दुसऱ्या एका गावी गेले. तेथे ते एका धर्मशाळेत उतरले त्यावेळी श्री. वाडीकरशास्त्रीबुवांच्या सर्व शंकाची उत्तरे देऊन समाधान करावे व आपले परमभक्त श्रीवासुदेवशास्त्रीबुवा यांच्याबद्दल त्यांच्या मनात उत्पन्न झालेले किल्मिष दूर करावे म्हणून भगवान् श्रीदत्तात्रेयांनी ब्रह्मचाऱ्याचे रूप घेतले. श्री. वाडीकरशास्त्री ज्या धर्मशाळत उतरले होते तेथे हे ब्रह्मचारी गेले व त्यांनी त्यांच्याजवळ योगाचा विषय काढला. अनेक शास्त्रीय ग्रंथांचे आधार देऊन त्या ब्रह्मचाऱ्यांनी योगाची आवश्यकता व उपयुक्तता त्यांना सयुक्तिकपणे पटवून दिली. त्यामुळे श्री. वाडीकरशास्त्रीबुवांचे समाधान झाले व ते माणगावला परत आले. तेव्हा आपल्या सर्व शंकाचे निरसन झाल्याचे श्रीशास्त्रीबुवांना सांगून शंका समाधान करणारे ते ब्रह्मचारी आपल्या परिचयाचे आहेत काय म्हणून त्यांनी त्यांना विचारले. बुवांनी देवांचा हा ब्रह्मचारी अवतार ओळखला व ते श्री. वाडीकरशास्त्र्यांना असे म्हणाले की, "शास्त्रीबुवा! अहो ते ब्रह्मचारी म्हणजे प्रत्यक्ष भगवान् श्रीदत्तात्रेयच होते. तुम्ही त्यांचे पाय धरावयाचे विसरून गेलात. केवढी दुर्भाग्याची गोष्ट!" हे ऐकताच श्री. वाडीकरशास्त्रीबुवांना अत्यंत वाईट वाटले.

माणगावमध्ये कागलची श्रीदत्तमूर्ती आल्यावर तेथे मंदिर बांधून. या मूर्तीची स्थापना केल्यापासून दिवसेंदिवस भरभराट होऊ लागली व सर्व प्रकारची समृद्धी नांदू लागली. शनिवारच्या पालखीच्या वेळी व उत्सवांच्या वेळी द्रव्याच्या रूपाने बरीच रक्कम जमा होत असे. तसेच धान्य, नारळ, गूळ, फळफळावळ वगैरे मोठ्या

प्रमाणात येत असे; पण बुवांनी स्वतःच्या उपयोगासाठी येथील द्रव्याला किंवा इतर कोणत्याही वस्तूला कधी स्पर्शही केला नाही. भिक्षान्नावरच त्यांचा दिवस जात असे. त्यांच्या घरीसुद्धा या वैभवाचा उपयोग होत नसे. श्रीशास्त्रीबुवा भिक्षुकी करीत असताना कुटुंबाला जी आवक होती तीही आता बंद झाली. धाकटे बंधू श्री. सीतारामपंत व श्री. हरिभट घरचा प्रपंच कसा चालवीत असत याचा कोठे उल्लेख आलेला नाही. त्यामुळे त्यांच्या घरची आता दैन्यावस्थाच होती असे म्हणावयाला हरकत नाही.

बुवा घरप्रपंच पाहात होते त्यावेळी घरगुती वापरासाठी आणलेल्या सामानाचे एक रुपया अकरा आणे एका दुकानदाराचे देणे राहून गेले होते. कसा कोण जाणे; पण बुवा हा व्यवहार पूर्णपणे विसरून गेल्यामुळे त्यांनी दुकानदाराचे देणे दिले नाही व त्या दुकानदारानेही ती रक्कम सूट म्हणून लिहून खाते बंद केले. काही दिवसांनी बुवा ध्यानाला बसले असताना ध्यानामध्ये अंतराय येऊन त्यांच्या अंतश्चक्षूंसमोर त्या दुकानदाराची खातेवही व त्या मधील एक रुपया अकरा आणे हा आकडा दिसू लागला. ही काय भानगड आहे ते प्रथम त्यांच्या ध्यानात येईना. त्यांनी आपल्या पूर्वीच्या खातेवाल्या दुकानदाराकडे चौकशी केली तेव्हा एक रुपया अकरा आण्यांची रक्कम आपण त्याला देणे लागतो; पण त्या रकमेची दुकानदाराने आपणास सूट देऊन आपले खाते बंद केले आहे असे बुवांना समजले. परंतु अशा तऱ्हेने सूट घेणे त्यांच्या व्यवहारात बसत नव्हते व तशी त्यांची इच्छाही नव्हती. आता त्यांनी व्यक्तिगत कमाई करण्याचे बंद केले असल्यामुळे ती रक्कम त्यांनी भिक्षा मागून आणून त्याला देऊन टाकली.

श्रीदत्तमंदिरातील वास्तव्यामध्ये एक दिवस एक गोसावी बुवांकडे धावळी मागू लागला. धावळी नसली तर आठ आणे तरी द्या असा

आग्रह त्याने धरला. सरळ स्वभावाच्या बुवांनी आपणापाशी यांपैकी कोणतीही वस्तू नाही असे त्याला सांगितले; पण तो आपला हट्ट सोडीना. दोघांचे असे बोलणे चालले असतानाच त्यावेळी तेथे औदुंबराला प्रदक्षिणा घालावयाला आलेल्या एका बाईने त्यांचे बोलणे ऐकून त्या गोसाव्याला आठ आणे देऊन वाटेला लावले. काही दिवसांनी बुवांच्या ध्यानामध्ये "गोसाव्याला दिलेले आठ आणे कोणाच्या नावावर लिहावयाचे" असे शब्द आले. याही वेळी त्यांनी एका गृहस्थाजवळ आठ आण्याची भिक्षा मागितली व ते पैसे त्या बाईला देऊन टाकले. वरील दोन गोष्टींवरून येथे ध्यानात ठेवण्यासारखे असे आहे की, या वेळी देवांसमोर दररोज पुष्कळ पैसा जमा होत असे; पण बुवांनी त्या पैशातून पैसे घेऊन आपल्या ऋणाची फेड केली नाही. त्याचप्रमाणे आपल्या परमप्रिय भक्ताला कोणाच्याही ऋणात ठेवण्याची देवाची इच्छा नसते हेच खरे आहे.

बुवांच्या या वृत्तीमुळे त्यांच्या घरी असलेल्या दैन्यावस्थेमुळे सौ. अन्नपूर्णाबाईंना मनासारखे दागिने व वस्त्र कधी मिळाले नाही. त्या माउलीनेही त्याबद्दल काही तक्रार केली नाही; परंतु स्त्रीसुलभ भावनेप्रमाणे त्यांनाही दागिन्यांची हौस होती. बुवांच्या स्वतःच्या गरजा अशा जवळ जवळ नव्हत्याच व दुसऱ्यांचे उपकार घेणे त्यांना कधीच पसंत पडले नाही. बुवांची काही तरी सेवा करता यावी असे इच्छिणारी बरीच मंडळी होती; पण त्यांचा स्वभाव सर्वांना ठाऊक असल्यामुळे त्यांना काही दान करण्याचे धाडस कोणाला झाले नाही. तरीसुद्धा त्यांच्याबद्दल आदर बाळगणाऱ्या एका गृहस्थाने एक दिवस सुवर्णाचा एक सौभाग्य अलंकार सौ. अन्नपूर्णाबाईंना आपल्या घरी नेऊन दान केला. तो दागिना घालून सौ. अन्नपूर्णाबाई देवळात आल्या तेव्हा तो अलंकार बुवांच्या नजरेला पडला. चौकशीअंती अलंकारदानाची गोष्ट त्यांना कळली. अर्थात्च त्यांना ही गोष्ट पसंत पडली

नाही. त्यांनी पत्नीला अंगावरील अलंकार उतरून देवळात यावयाला सांगितले. त्या साध्वीनेही पतीची आज्ञा शिरसावंद्य मानून, अलंकार उतरून एका फडक्यात बांधून घरात फेकून दिला व पूर्वीप्रमाणेच लंकेची पार्वती बनून त्या देवळात आल्या. त्या अशाप्रकारे आपली आज्ञा पाळून जेव्हा देवळात आल्या तेव्हाच कोठे बुवांना समाधान वाटले. श्रीशास्त्रीबुवांच्यासारखे भक्तश्रेष्ठ असेच पूर्णपणे निरिच्छ असतात व आपल्या बरोबर राहणाऱ्या लोकांनीही असेच अगदी निरिच्छ असावे अशी त्यांची इच्छा असते; किंबहुना ते जेव्हा असे वागतात तेव्हाच त्यांचे समाधान होते व त्यांची त्यांच्यावर पूर्ण कृपा होते.

श्री. नाना कोनकर हे एक उपद्व्यापी गृहस्थ होते. हे गृहस्थ बुवांच्या घरचा कारभार पाहत असत. त्यांचे लग्नही त्यांनीच कसे जमविले ही हकीकत मागे आलीच आहे. श्रीदत्तमंदिराच्या स्थापने-पासून बुवांच्या घरची तशी दैन्यावस्थाच होती. अत्यधिक दारिद्र्या-मुळे घरातील सर्वांनाच अन्नवस्त्राची चिंता होती. सासूसुनेचे न पटता सारखे खटके उडत असत. घरच्या दैन्यावस्थेवर इलाज म्हणून श्री. नाना कोनकरांनी सौ. अन्नपूर्णाबाईंना आंबोली गावी इचलकरंजीकरांच्या अन्नछत्रात स्वयंपाक करण्यासाठी पाठवावयाचे ठरविले. सौ. अन्नपूर्णाबाई कौटुंबिक दैन्यामुळे व दुःस्थितीमुळे अत्यंत निराश झाल्या होत्या. आपल्या पतीचे यश सर्वत्र पसरलेले असले व वैभवही चढते-वाढते असले; तरी आपली स्थिती मात्र काही सुधारत नाही व आईवरील प्रेमामुळे ते घरच्या भांडणात लक्ष घालीत नाहीत याचा सौ. अन्नपूर्णाबाईंना फार खेद वाटत होता. या नवीन सोयीमुळे चार दिवस तरी घरच्या कटकटीतून आपण बाजूला राहू शकू असा विचार करून त्यांनी या गोष्टीला रुकार दिला. रमाबाईंनीही श्री. नाना कोनकरांच्या या योजनेला

संमती दिली. त्यामुळे दुसऱ्या दिवशी अन्नछत्रात जाण्यासाठी त्याच दिवशी त्या श्री. नाना कोनकरांच्या घरी राहावयास गेल्या. मात्र या गोष्टीची बुवांना कसलीच गंधवार्ता नव्हती. ते आपल्या नित्य-कर्मात दंग होते व देवाच्या भक्तीत रंगून गेले होते.

रमाबाईंना मात्र, आपण आपल्या सौ. सूनबाईंना अन्नछत्रात कामाला जाण्यासाठी परवानगी दिली खरी; परंतु ही गोष्ट मुलाला मात्र कळविली नाही, या विचाराने अस्वस्थता वाटू लागली व त्यांना लोकापवादाचीही भीती वाटू लागली. त्यामुळे त्यांनी ही गोष्ट एका माणसाला श्रीशास्त्रीबुवांच्या कानावर घालण्यास सांगितले.

त्या दिवशी शनिवार होता. रात्री पालखी आटोपून बुवा स्वस्थ पडले होते. इतक्यात त्या माणसाने येऊन आईचा निरोप त्यांना सांगितला. तो ऐकताच निरोप आणणाऱ्या माणसास अत्यंत निर्विकार चित्ताने त्यांनी असे विचारले की, "आप्पा! आमच्या कुटुंबाने असे अन्नछत्रामध्ये स्वयंपाक करावयास जाणे तुम्हाला बरे वाटते का?" हा प्रश्न ऐकताच आप्पांनी "नाही" म्हणून सांगितले. त्यावेळी बुवांनी त्यांना असे सांगितले की, "आप्पा! तुम्ही देवांची प्रार्थना करा म्हणजे आमच्या कुटुंबाचे अन्नछत्रात जाणे रहित होईल." या सूचनेप्रमाणे आप्पांनी देवांची प्रार्थना केली व ते आपल्या घरी निघून गेले. दुसऱ्या दिवशी पहाटे श्री. नाना कोनकरांना अकस्मात् फुरसे चावल्यामुळे त्यांच्या पायाला सूज येऊन त्यांना चालणे अशक्य झाले व खूप त्रासही होऊ लागला. त्यामुळे सौ. अन्नपूर्णाबाईंचे इचलकरंजीकरांच्या अन्नछत्रात जाणे आपो-आपच रहित झाले. दुसऱ्या दिवशी सौ. अन्नपूर्णाबाई मुक्काटयाने उठून आपल्या घरी आल्या व आपले अन्नछत्रात जाणे कसे व का रहित झाले यासंबंधीची सर्व हकीकत त्यांनी आपल्या सासूबाईंना सांगितली.

देवच आपल्या भक्ताचा मान व्हावा व अपमान होऊ नये म्हणून अखंड जागृतपणे त्याचे संरक्षण कसे करीत असतो हे वरील गोष्टीवरून दिसून येते व देवाच्या मनात भक्ताबद्दल किती अपार प्रेम उचंबळत असते याची साक्ष पटते. मात्र भक्तीत रंगून गेल्यामुळे भक्ताला आपल्या मानापमानाची यत्किंचितही पर्वा नसते; किंबहुना असल्या गोष्टींबद्दल तो पूर्णपणे उदासीन असतो, हेच खरे आहे.

बुवांनी विवाह केला; पण अद्याप संसार केला नव्हता. विवाह जरी त्यांच्यावर लादण्यात आला होता; तरी तोही आपला प्रारब्धभोगच आहे या भावनेने त्यांनी विवाहाचा स्वीकार केला होता. विवाहानंतर लवकरच श्रीदत्तमंदिराची स्थापना झाली आणि तेथे पहिली गुरुद्वादशी साजरी झाल्यावर बुवांचा सर्व वेळ मंदिरातच जाऊ लागला. त्यांचा उदरनिर्वाह, नैवेद्यवैश्वदेव इत्यादी सर्व काही भिक्षान्नावरच होत असे. सौ. अन्नपूर्णाबाई सकाळी मंदिरामध्ये येऊन सडा संमार्जन व रांगोळी करून जात व दुपारी देवदर्शन करून देवांचा प्रसाद घेऊन जात. बुवांचा योगाभ्यास बंद पडला आणि देवांनी त्यांना गृहस्थाश्रमास आरंभ करण्याची आज्ञा केली.

ही आज्ञा होताच बुवांनी पहिली कोणती गोष्ट केली असेल; तर देवांची ही आज्ञा आपल्या मातुश्रींच्या कानावर घातली. मुलगा संसार करणार हे ऐकून रमाबाईंना आनंद झाला. देवळाच्या उत्तरेला एक पडवी काढून तेथे बुवांनी आपला गृहस्थाश्रम सुरू केला. बुवांचे जेवण तर मंदिरातच होत असे. सौ. अन्नपूर्णाबाई मात्र जेवावयाला घरी जात व संध्याकाळचे जेवण व कामं उरकून त्या देवळात परत येत असत. गृहस्थाश्रम सुरू झाल्यानंतर बुवांनी आपल्या पत्नीला योगाभ्यास शिकवावयला सुरुवात केली. सौ. अन्नपूर्णाबाईंनी योगामध्ये चांगलीच प्रगती केली होती. त्या या अभ्यासामुळे समाधी अवस्थेपर्यंत जाऊन पोहोचल्या होत्या.

अशीच एका रात्रीची गोष्ट. सौ. अन्नपूर्णाबाई रात्रीचे जेवण व घरकाम उरकून मंदिरातील आपल्या पडवीत गेल्या तेथे बुवा नव्हते म्हणून त्या मंदिरात गेल्या. त्यावेळी देवळाचे दार लावलेले होते. आत बुवा वाचीत बसलेले होते. सौ. अन्नपूर्णाबाईंनी बाहेरून दरवाजा वाजविल्यावर "कोण आहे ?" अशी बुवांनी आतून पृच्छा केली. "मी आले आहे." असे सांगून सौ. अन्नपूर्णाबाई तेथेच बंद दरवाजा-पाशी पायरीवर बसल्या. मागे एकदा एक बाई देवळात पुराण ऐकायला बसली असताना अस्पर्श झाली होती. त्यामुळे देवळाचे शुद्धीकरण करावे लागले होते. त्या दिवसापासून रमाबाईंखेरीज इतर कोणाही स्त्रीला देवळाच्या आत येऊ द्यावयाचे नाही असा नियम बुवांनी केला होता. त्यामुळे आता सौ. अन्नपूर्णाबाईंना बाहेर बसावे लागले होते. बुवा कोणता ग्रंथ वाचण्यात दंग झाले होते, कोण जाणे ? परंतु बाहेर आपली मंडळी आली आहेत याचे त्यांना स्मरण राहिले नाही. कदाचित् मागाहून ते समाधीलीन झाले असतील. बऱ्याच वेळाने दरवाजा उघडून ते बाहेर आले तेव्हा सौ. अन्नपूर्णाबाई पायरीवर बसल्याचे त्यांना दिसले. बुवा बाहेर आल्याची चाहूल त्यांना लागली नाही; तेव्हा बहुतेक त्यांना झोप लागली असावी असे समजून बुवा जवळ जाऊन पाहतात तो त्या गाढ समाधी अवस्थेमध्ये असल्याचे त्यांना दिसले. बुवांनी त्यांच्या शरीरावरची सर्व लक्षणे नीट तपासून पाहिली. "ही तर निर्विकल्प समाधी आहे !" असे उद्गार सहजच त्यांच्या मुखातून बाहेर पडले. आपल्या मंडळींची ही अवस्था पाहून बुवांना खरोखरच अतिशय आनंद झाला. जी परमोच्च अवस्था प्राप्त व्हावी म्हणून आपण एवढी वर्षे साधना करीत आलो ती अवस्था एका अनभिज्ञ स्त्रीला श्रीदत्तप्रभूंच्या कृपेने सहज प्राप्त झाली होती. हीच खरी ईश्वरी कृपा होय बुवांनी सौ. अन्न-पूर्णाबाईंना योग शिकविला होता; परंतु निर्विकल्प समाधी ही

दुसऱ्याने शिकवून थोडीच प्राप्त होत असते ? ती प्राप्त व्हावयाला ईश्वरी कृपाच व्हावी लागते. त्यानन्तर बुवांनी त्यांना हलवून सावध करण्याचा प्रयत्न केला; परन्तु त्या देहभानावर आल्या नाहीत. मग बुवांनी शास्त्रात सांगितलेल्या उपायांनी सौ. अन्नपूर्णाबाईंना समाधीतून जागृतावस्थेत आणले. समाधीतून उत्थान होताच सौ. अन्नपूर्णाबाई त्यांना असे म्हणाल्या की, "मी निरतिशय आनंदाचा उपभोग घेत होते, आपण मला उगीच सावध केलेत !"

सौ. अन्नपूर्णाबाईंच्या योगाभ्यासाविषयी आणखी एक गोष्ट सांगतात. श्रीदत्तमंदिरामध्यें कोणा एका बाईने काही सुवर्णालंकार देवांना अर्पण केले होते. ते सुवर्णालंकार बुवांनी एका ब्राह्मण स्त्रीला विधिपूर्वक दान केले. ही गोष्ट सौ. अन्नपूर्णाबाईंना आवडली नाही. स्त्रियांना दागिन्यांची थोडीतरी हौस असतेच; पण त्या काही बोलल्या नाहीत. त्याचा परिणाम असा झाला की, त्या योगाभ्यासाला बसल्यानंतर पुष्कळ वेळ देहभानावर येईनात. बुवांनी जवळ जाऊन पाहिले तेव्हा त्यांना असे आढळून आले की, सौ .अन्नपूर्णाबाईंच्या मस्तकातून वायू खाली उतरण्यास प्रतिबध झाला आहे. मग त्यांनी भजन करण्यास सुरुवात केली. भजनाचा आवाज कानात गेल्यावर या देहभानावर आल्या. ही हकीकत श्री. गंगाधरपंत वैद्यांनी लहून ठेवली आहे.

खालील हकीकत सुद्धा श्री. गंगाधरपत वैद्यांच्या स्मरणवहीतून घेतलेली आहे. एकदा बुवांना वानप्रस्थाश्रम घ्यावा असे वाटू लागले म्हणून ते पत्नीला घेऊन अरण्यात राहावयाला गेले. अरण्यातील वास्तव्यात एका रात्री सौ. अन्नपूर्णाबाई देहविधीसाठी बाहेर गेल्या असताना एक पिशाच्च त्यांना भीती दाखवू लागले. तेव्हा परत आल्यावर त्यांनी बुवांना बोटाने स्पर्श करून जागे केले व पिशाच्च भीती दाखवीत असल्याचे सांगून ते जेथे होते त्या जागेचा निर्देश

केला. वानप्रस्थाश्रमात रात्री शय्येवर पतीपत्नींनी एकमेकांना स्पर्श करू नये व स्पर्श टाळण्यासाठी दोघांच्यामध्ये दंड ठेऊन झोपावे असा दंडक आहे. पिशाच्चाच्यामुळे हा नियम भंग झाल्यामुळे बुवांना फार वाईट वाटले. त्या रात्री त्यांना असे स्वप्न पडले की, " कलियुगात वानप्रस्थाश्रम असाध्य आहे. आता घरी जावे. तेथेच या आश्रमाची सिद्धी होईल. " देवांची ही आज्ञा शिरसावंद्य मानून बुवा दुसऱ्या दिवशी घरी परत आले.

श्रीवासुदेवशास्त्री कधीही आई, भाऊ, वहीण किंवा पत्नी यांच्या नात्यात गुरफटून राहिले नव्हते. आता त्यांना जगाचा संसार करावयाचा होता. त्यांच्यावर आता स्वकुटुंबीयांचा हक्क नव्हता; तर देवांचा हक्क होता. एकदा या गोष्टीची प्रचीती रमाबाईंना आली. त्या वेळेपासून त्यांनी बुवांना आपल्या नात्यात अडकवून ठेवण्याचा प्रयत्न केला नाही. त्याचे असे झाले.

" अवश्यमेव भोक्तव्यं कृतं कर्म शुभाशुभम् । " या न्यायाने श्रीशास्त्रीबुवा जीवन व्यतीत करीत असत. त्यामुळे पूर्वजन्मी किंवा जन्मजन्मान्तरी केलेल्या कर्माचे फळ आपण अवश्य भोगले पाहिजे, असा त्यांचा निश्चय होता. एकदा श्रीशास्त्रीबुवांच्या मातुश्री रमाबाई यांनी महाशिवरात्रीकरिता श्रीक्षेत्र गोकर्णमहाबळेश्वर येथे जाण्याचे ठरविले. या यात्रेच्या वेळी आपल्या बरोबर कोणीतरी सोबतीला असावे म्हणून व यात्रेत कोणीतरी मुलगा बरोबर असावा असे शास्त्र असल्यामुळे त्यांनी आपल्या इतर सर्व मुलांना त्यासंबंधी विचारले; परन्तु सर्व मुलांनी त्यांच्या बरोबर जाण्यास नकार दिला. इतर सर्व मुले नाही म्हणाली तरी शेवटी बुवा आपले निश्चित ऐकतील व ते आपल्या बरोबर खात्रीने येतील असे वाटल्यामुळे त्यांनी त्यांना आपल्याबरोबर या यात्रेस येण्यास सांगितले.

मातुश्रींनी अशा प्रकारे यात्रेस येण्यास सांगितल्यावर बुवा त्यांना

असे म्हणाले की, " देवांची आज्ञा झाल्याशिवाय ही जागा सोडून आपण दुसरीकडे कोठेही जाऊ शकत नाही. तरी मला आपल्या आज्ञेचे परिपालन करता येत नाही याबद्दल क्षमा करावी. देवांच्या इच्छेशिवाय मी स्वतंत्रपणे काहीही करण्यास समर्थ नाही. "

बुवांचे हे उत्तर ऐकताच रमाबाई अत्यंत निराश झाल्या. बुवांसारख्या आज्ञाधारक मुलाकडूनही नकार आल्यामुळे त्यांच्या अंतःकरणाला धक्काच बसला. आपणास इतकी मुले असूनही त्यापैकी एकाही मुलाचा आपणास उपयोग होत नाही हे पाहून त्यांना कमालीचे वाईट वाटले. त्यामुळे त्यांच्या मनाची मोठी विकल स्थिती झाली.

एकीकडे बुवांची देवाच्या आज्ञेशिवाय काहीही करावयाचे नाही अशी संपूर्ण शरणागतीची उत्कट भावना, तीव्र भक्ती व पराकोटीची श्रद्धा होती, तर दुसरीकडे " मातृदेवो भव " या वेदोक्त न्यायाप्रमाणे काहीही झाले; तरी आईला कोणत्याही प्रकारे न दुखविता तिला संतोष होईल असे वागून स्वकर्तव्यात यत्किंचितही कसूर करावयाची नाही अशी निष्ठा होती. अशा द्विविधावस्थेत बुवा सापडले. एकीकडे देवांच्या आज्ञेशिवाय माणगाव सोडणे योग्य होणार नाही असे वाटत होते; तर दुसरीकडे आईची निराशा त्यांना पाहवत नव्हती. शेवटी कर्तव्याने शरणागतीवर मात केली.

आपल्या तीर्थरूप मातुश्रीची उद्विग्नता व खिन्नता पाहून तिला समाधान वाटावे म्हणून बुवा तिला असे म्हणाले की, " आई ! मी तुझ्या बरोबर गोकर्णमहाबळेश्वराच्या यात्रेला येतो. यात्रेची सर्व तयारी कर. " अशा प्रकारे बुवांनी बरोबर येण्याची तयारी दाखविल्याबरोबर रमाबाईंना अत्यंत आनन्द झाला. त्यांनी यात्रेला निघण्याची सर्व तयारी केली. त्यावेळी इतरही काही मंडळी त्यांच्याबरोबर जाण्यास निघाली.

प्रथम सर्व मंडळी सर्वसाधारणपणे सायंकाळच्या सुमारास माण-गावाहून निघून सावंतवाडीस जाण्यास निघाली, त्यावेळी जाता जाता बुवांच्या पायास एक फुरसे चावले. या वेळेपर्यन्त पुष्कळच अंधार पडल्यामुळे, आपल्या पायाला काय चावले याची त्यांना कल्पनाच आली नाही. त्यांनी आपला पाय एकदा जोराने झटकला व कोणासही काहीही न सांगता ते सर्वांच्या बरोबर वाट चालू लागले. बरोबरच्या इतर लोकांना तर वाटेत काय प्रकार घडला याचा पत्ताच नव्हता.

रात्रीच्या वेळी सर्व मंडळी सावन्तवाडीस पोहोचली. त्यांनी श्री. उकिडवे यांच्या श्रीदत्तमंदिरात मुक्काम केला. रात्री देवाचे तीर्थ सर्वांनी घेतल्यावर उरलेले सर्व तीर्थ पात्रात तसेच ठेवून देण्यास बुवांनी श्री. नारोपंतांना सांगितले.

हळूहळू बुवांना विष चढू लागले. पायाला खूप सूजही आली आणि कळाही फार येऊ लागल्या. त्यावेळी ज्या जागेवर फुरसे चावले होते तेथे बुवांनी तीर्थ लावावयाला सुरुवात केली. ही गोष्ट तेथे जमलेल्या सर्व लोकांनी पाहिली. त्यातीलच एका माणसानें बुवांचे हे कृत्य पाहून तात्काळ श्री. नारोपंतांच्या घरी जाऊन त्यांना ही सर्व हकीकत सांगितली.

ही सर्व हकीकत ऐकताच श्री. नारोपंत धावतच मंदिरात आले. त्यांनी श्री. रामभाऊ सवनीसांनाही हे वृत्त कळवून मंदिरात लवकर येण्यास सांगितले. ज्यावेळी दोघांनी पायाला काय झाले म्हणून बुवांना विचारले तेव्हा त्यांनी येताना वाटेत फुरसे चावल्याचे सांगितले.

या लोकांना इतके सांगून झाल्यावर आपला त्रास थांबविण्या-साठी बुवा समाधी लावून बसले. त्यावेळी सर्व त्रास थांबला; परंतु समाधीतून उठल्याबरोबर पुन्हा विष चढू लागून पूर्ववत् सर्व त्रास

होऊ लागला. हे पाहताच श्री. रामभाऊ सबनीस यांनी एका मांत्रिकाला बोलावून आणले; पण त्या मांत्रिकाकडून कोणत्याही प्रकाचा इलाज करून घेण्यास बुवा तयार झाले नाहीत.

शेवटी श्री. नारोपंत व श्री. रामभाऊ यांनी आग्रह करून पायाला औषध लावले; परंतु त्यामुळे उतार पडण्याऐवजी सूज मात्र अधिक वाढली व वेदनाही पूर्वीपेक्षा असह्य अशा होऊ लागल्या. शेवटी जखमेवर लावलेले औषध जेव्हा धुऊन टाकले तेव्हाच कोठे वेदना थोड्या कमी झाल्या व सूजही उतरली. या सर्व प्रकारामुळे दोन-तीन दिवस श्री. उकिडव्यांच्या मंदिरातच सर्वांचा मुक्काम झाला; पण पायाची सूज काही उतरेना व वेदनाही थांबेनात.

मुलाला होणाऱ्या यातना पाहून आपणच याला कारणीभूत आहोत व आपल्यामुळेच हा दुर्धर प्रसंग त्याच्यावर कोसळला या जाणिवेने रमाबाईंना फार वाईट वाटले. आता गोकर्णाला वेळेवर पोहोचता येणे शक्य नाही हे जाणून त्या बुवांना घेऊन घरी परत आल्या. त्याच दिवशी रात्री देवांनी बुवांचा सुजलेला पाय दाबून आत रुतून बसलेला फुरशाच्या दाताचा तुकडा काढून टाकला. पुढे दोन तीन दिवसांनी हळूहळू सूज कमी होऊन बुवांचा पाय पूर्ववत् उत्तम झाला.

त्यानंतर एके दिवशी ते आपल्या मातुश्रींना असें म्हणाले की, "आपण गोकर्णाला जाऊ नये म्हणूनच देवांनीच हे विघ्न उपस्थित केले. याकरिता देवांच्या आज्ञेवाचून कोठेही जाणे किंवा काहीही करणे चांगले नाही."

ही सर्व कथा वाचली म्हणजे "संतुष्टः सततं योगी यतात्मा दृढनिश्चयः । मय्यर्पितमनोबुद्धिर्यो मे भक्तः स मे प्रियः ।।१२.१४।।" या श्रीमद्भगवद्गीतोक्त वचनाची प्रकर्षत्वानें स्मृती होते व त्याचा श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी जो भावार्थ प्रकट केला आहे तो वाचला म्हणजे श्रीथोरल्यास्वामीमहाराजांच्यासारख्या अलौकिक, अद्वितीय,

लोकोत्तर व आवडत्या भगवद्भक्ताची कथाच जणूकाही साररूपानें व तत्त्वरूपाने आपण वाचीत आहोत असे वाटते. आपल्या आवडत्या भक्ताची गोष्ट हा केवळ मला भुरळ पाडणारा मंत्रच असल्यामुळे ही बोलून दाखविण्यासारखी गोष्ट नाही; परंतु भक्ताविषयीची आवडच आमच्याकडून त्याचे वर्णन करविते हे सांगताना ते असे म्हणतात की –

वार्षियेवीण सागरु । जैसा जळें नित्य निर्भरु ।
तैसा निरुपचारु । संतोषी जो ॥१२.१५१॥
वाहूनि आपुली आण । धरी जो अंत:करण ।
निश्चया साचपण । जयाचेनि ॥१५२॥
जीवु परमात्मा दोन्ही । बैसऊनि ऐक्यासनीं ।
जयाचिया हृदयभुवनीं । विराजती ॥१५३॥
ऐसा योगसमृद्धि । होऊनि जो निरवधि ।
अर्पी मनोबुद्धी । माझ्या ठायीं ॥१५४॥
आंतु बाहेरि योगु । निर्वाळलेयाहि चांगु ।
तरी माझा अनुरागु । सप्रेम जया ॥१५५॥
अर्जुना तो भक्तु । तोचि योगी तोचि मुक्तु ।
तो वल्लभा मी कांतु । ऐसा पढिये ॥१५६॥
हें ना तो आवडे । मज जीवाचेनि पाडें ।
हेंही एथ थोकडें । रूप करणें ॥१५७॥

वरील गोष्ट घडल्यानंतर त्या दिवसापासून एक गोष्ट रमाबाईंच्या ध्यानात आली की, वासुदेव आता काही आपला नाही. तो श्रीदत्त-महाराजांचा आहे. पण आईच्या अपत्यप्रेमाला सीमा कोठे आहे? बालकृष्णाच्या मुखामध्ये निखिल ब्रह्मांडाचे दर्शन होऊनही श्रीकृष्ण हा आपला मुलगाच आहे ही यशोदा मातेची भावना काही कमी झाली नाही. रमाबाईंनाही मुलाबद्दल तसेच वाटावयाचे.

बुवा घरचे काही खात नसत. त्यांची गुजराण भिक्षान्नावरच होत असे. एकदा घरात लाडू केले होते. रमाबाईंना वाटले मुलाने आपल्या हातचा एखादा लाडू खावा. त्यांनी बुवांना बोलावून एक लाडू खावयाला दिला. लाडू खाल्ल्यावर त्याचे परिणाम काय होतील याची पूर्ण कल्पना बुवांना होती. त्यामुळे प्रथम त्यांनी लाडू खाण्यास नकार दिला; परंतु मातेच्या आग्रहापुढे बुवांचे काही चालेना. शेवटी बुवांनी आईचे मन दुखवू नये म्हणून लाडू मोडून त्याचा एक लहानसा तुकडा तोंडात टाकला मात्र; तोच लाडवाच्या तुकड्याचा घास घशातच अडकून बसला. तो घशाखाली जाईना की बाहेर पडेना. बुवांचे डोळे पांढरे झाले. त्यामुळे त्यांच्या आईची पाचावर धारण बसली. हा प्रकार कशामुळे घडला याची रमाबाईंना कल्पना आली. त्यामुळे अत्यंत पश्चात्ताप होऊन त्यांनी देवांची करुणा भाकली व क्षमा मागितली आणि "यापुढे वासुदेवाला कधीही कोणताही जिन्नस खाण्याचा आग्रह आपण धरणार नाही," असे देवाजवळ कबूल केले. त्याचप्रमाणे "या वेळी आपणास क्षमा करून वासुदेवाला बरे करावे," अशी त्यांनी देवांची विनवणी केली. त्यानंतर बुवांच्या घशाखाली तो घास उतरला व त्यांना आराम वाटला.

असाध्य व्याधींनी ग्रस्त झालेले लोक वैद्यकीय इलाज करून थकल्यावर श्रीक्षेत्र नरसोबावाडी किंवा श्रीक्षेत्र गाणगापूर येथे राहून मिळेल ती सेवा करीत व श्रीदत्तनामस्मरण करीत कालांतराने व्यधिमुक्त होऊन परत जातात असा आजही लोकांचा अनुभव आहे. त्याचप्रमाणे माणगावलाही व्याधिग्रस्त लोक सेवाभावाने राहून व मिळेल ती सेवा करून व्याधिमुक्त होत असत. एक कुष्ठरोगी बुवांच्या सांगण्याप्रमाणे देवांना लांबून प्रदक्षिणा घालण्याची सेवा करीत असे. काही दिवसांनी तो बरा झाला व श्रीगुरुद्वादशीच्या उत्सवासाठी

श्रीक्षेत्र नरसोबावाडीला जावे असे त्याला वाटू लागले. त्याप्रमाणे त्याने आपली इच्छा बुवांना सांगितली; परंतु " अद्याप तुझी येथील सेवा पूर्ण झालेली नसल्यामुळे तुला येथून जाण्याबद्दल देवांची आज्ञा झालेली नाही; तरी तुला माणगाव सोडून जाता येणार नाही, " असे सांगून बुवांनी त्याला येथून जाऊन नको म्हणून सांगितले. पण त्या माणसाला ही गोष्ट पटली नाही. श्रीक्षेत्र नरसोबाच्या वाडीला जाण्याचा त्याने हट्टच धरला. त्यामुळे त्याच रात्री त्याचे सर्वांग उंदरांनी कुतरडून खाल्ले. दुसऱ्या दिवशी रडत रडत तो बुवांकडे गेला. त्या कनवाळू साधुपुरुषाने देवांचे तीर्थ शिंपडून त्याला बरे केले. बुवा फार कनवाळू होते; पण प्रसंगी ते फार कठोर होत. काही दिवसांनी बुवांना न विचारताच तो माणूस श्रीक्षेत्र नरसोबाच्या वाडीला निघून गेला. मात्र त्याने वाडीच्या हद्दीत पाऊल टाकताच त्याचे सर्वांग पुन्हा कुष्ठरोगाने भरून गेले. त्याच दिवशी पुजाऱ्यांना दृष्टान्त होऊन देवांनी त्यांना असे सांगितले की, " या कुष्ठरोग्याला वाडीतून हाकलून द्या. " देवांच्या या आज्ञेप्रमाणे पुजाऱ्यांनी त्याला वाडीतून हाकलून दिले. त्यामुळे शेवटी नाइलाजाने तो माणूस पुन्हा माणगावला आला. त्यावेळी देवांनी बुवांनाही दृष्टान्त देऊन असे सांगितले की, " याला येथेही राहू न देता हाकलून द्यावे. " देवांच्या या आज्ञेनुसार बुवांनी त्याला थारा न देता तेथून हाकलून दिले. शेवटी तो कुष्ठरोगी आपल्या गावी परत गेला व या रोगातच त्याचा अंत झाला.

ही गोष्ट वाचली म्हणजे " अहो ज्या नरा रामविश्वास नाहीं। तया पामरा बाधिजे सर्व कांहीं॥ " असे जे श्रीसमर्थ रामदासस्वामीमहाराजांनी मनाच्या श्लोकात म्हटले आहे त्याची प्रचीती आल्याशिवाय राहत नाही. यासाठी साधकाने " देवाच्या आज्ञेने वर्तावे। " हेच खरे आहे. त्यातच त्याचे कल्याण असते. असे न

करता जो साधक उपरोक्त कथेतील गृहस्थाप्रमाणे वागतो त्याची स्थिती "जरी भाव असला मायिक। तरी देव होय महाठक। नवल तयाचें कौतुक। जैसाशि तैसा" ॥ दासबोध ॥३.१०.१४॥ अशी झाल्याशिवाय राहत नाही.

एकदा असाच एक गृहस्थ संकटायोगिनीचे दशेने ग्रस्त झाल्यामुळे या दशेतून मुक्त होण्यासाठी माणगावला येऊन बुवांकडे या दशेतून मुक्त होण्याचा उपाय विचारू लागला. बुवांनी त्याची या पिडेतून सुटका व्हावी म्हणून त्यास राहूचा मंत्र देऊन त्या मंत्राचा घरी जाऊन एक विशिष्ट संख्या होईपर्यंत जप करण्यास सांगितले. बुवांनी सांगितल्याप्रमाणे अनुष्ठान करण्यासाठी तो आपल्या गावी परत आला.

घरी आल्यावर त्याने मंत्रजपाला आरंभ करताच त्याचा घसा एकाएकी फार सुजल्यामुळे त्याला मंत्रजप करता येईना. ही गोष्ट त्याने आपला एक मनुष्य माणगावी पाठवून बुवांच्या कानावर घालण्याची व्यवस्था केली. ही सर्व हकीकत ऐकताच बुवा आलेल्या माणसावरोबर त्या गृहस्थाच्या गावी गेले व त्यांनी स्वतः सर्व विरुद्ध शक्तींचा बंदोबस्त करून त्याला जप करण्यास सांगितले.

या कथेवरून हे लक्षात येते की, एखादा मनुष्य पिडेतून मुक्त होण्यासाठी जपादी अनुष्ठाने करू लागला की, तत्संबंधीच्या यावत् विरुद्ध शक्ती कार्यरत होऊन त्याच्या मार्गात नाना तऱ्हेने अडथळे उपस्थित करतात किंवा कधी कधी देवाच्या मनातच सेवा घ्यावयाची नसली; तर त्या सेवेकऱ्याच्या सेवेच्या मार्गात अनेक प्रकारे विघ्ने येत राहतात. मात्र अशावेळी जर बुवांसारखे सामर्थ्य संपन्न व ज्ञाते मध्यस्थ असतील; तर यावत् विरुद्ध शक्तींना ते रोधून धरू शकतात व देवतेच्या कोपाचे उपशमन त्याच्या उपासनेने अर्थात् सेवेने होऊन तो भक्त कृतकार्य होतो, यात काहीच शंका नाही.

एकदा वेंगुर्ले येथील एका ब्राह्मणाचा पंधरा वर्षांचा मुलगा एकाएकी बोलावयाचा बद झाला. त्याची वाचा गेल्यामुळे त्याने खाणेही वर्ज्य केले. चारपाच वर्षे मंत्रतंत्रादी व वैद्यकादी उपचार करूनही मुलाच्या प्रकृतीमध्ये काही फरक पडेना. त्यामुळे त्याचे वडील पार थकून गेले. शेवटी कोणाच्या तरी सांगण्यावरून त्या मुलाचे वडील मुलाला घेऊन माणगावी बुवांच्याकडे आले.

त्यांनी आपली सर्व हकीकत बुवांना सांगितली ती ऐकताच बुवांनी मुलाला देवांना प्रदक्षिणा घालावयाला सांगितले; पण मुलगा काही केल्या प्रदक्षिणा घालावयाला तयार होईना. शेवटी मुलाच्या वडिलांनी त्याला हाताला धरून जबरदस्तीने प्रदक्षिणा घातल्या. मग काही दिवसांनी तो मुलगा स्वतःच प्रदक्षिणा घालू लागला. पुढे काही दिवसांनी बुवांनी त्याला श्रीगुरुचरित्र वाचावयास सांगितले. सुरुवातीला याही गोष्टीला त्याने विरोध दर्शविला; परंतु पुढे तो श्रीगुरुचरित्र वाचण्यास तयार झाला. एक सप्ताहपर्यंत त्याने मनातल्या मनात वाचन केले. पुढे तो हळूहळू व थोडे थोडे बोलू लागला व इतरही सर्व व्यवहार उत्तम रीतीने करू लागला. तिसरा सप्ताह पूर्ण होताच तो पूर्वीप्रमाणे स्पष्ट बोलू लागला. त्यानंतर देवांची आज्ञा झाल्यावर त्याला मंडळींनी घरी नेले.

एकदा एका गुरुद्वादशीच्या उत्सवासाठी आलेल्या काही लोकांना बुवांनी दिवाळीसाठी चारपाच दिवस माणगावला ठेऊन घेतले. त्या मंडळीमध्ये सावंतवाडीचे कीर्तनकार श्री. भागवत होते. ते पक्वान्नांचे चांगलेच भोक्ते असल्यामुळे, आपण उगाच येथे राहिलो असे त्यांना वाटले. घरी असतो तर चांगली पक्वान्ने खावयाला मिळाली असती असे विचार त्यांच्या मनामध्ये वारंवार येऊ लागले.

कीर्तनकारांच्या मनात असे विचार येताच देवांनी बुवांना असे सांगितले की, “आज उत्तमातल्या उत्तम पक्वान्नांचा बेत करा.”

त्याप्रमाणे बुवांनी त्या दिवशी उत्तम पक्वान्नांचा बेत केला. त्यामुळे देवळात घरच्यापेक्षाही उत्तम पक्वन्नांचे भोजन झाल्यामुळे श्री. भागवत कीर्तनकार फार संतुष्ट झाले. त्याच वेळी माणगावच्या एका पुराणिक बुवांनाही बुवांनी जेवण्यास आमंत्रण दिले होते; पण आपण परान्न घेत नाही, अशी काहीतरी सबब सांगून ते जेवण्यास आले नाहीत. अशा प्रकारे ते उत्तम सुग्रास जेवण झाल्यावर श्री. भागवत कीर्तनकारांनी सकाळी आपल्या मनात आलेले विचार सर्वांना अगदी मोकळेपणाने सांगितले. त्यांची ही हकीकत ऐकून सर्वांना आश्चर्य वाटले व देवांनी आपणास आज पक्वान्न करण्यास का सांगितले याचा बुवांना उलगडा झाला. सर्वसाक्षी परमात्म्याची व त्याच्या भक्तांची लीला अचिन्त्य आहे हेच खरे!

तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविक लोक देवदर्शन करून व साधु-संतांचे दर्शन घेऊन पुण्य संपादन करतात; पण दुर्दैवी लोक यात्रेकरूंचे सामान चोरून त्यावर आपले पोट भरतात तर दुसरे काही अभागी लोक यात्रेकरूंच्या पैशांची व दागिन्यांची चोरी करून त्यावर आपला उदरनिर्वाह चालवितात. एकदा माणगावला एका उत्सवासाठी परगावची एक बाई नवीन वस्त्रे व अलंकार लेऊन आली होती. आजही कोकणातील लोक यात्रेला जाताना नवीन कपडे करून व दागदागिने घालून जातात. स्नान करून, शुचिर्भूत होऊन काही देवकार्य करावे म्हणून बाई मंदिरासमोरील विहिरीवर स्नानासाठी गेली. तिने स्नानापूर्वी अंगावरील दागिने उतरून एका रुमालात बांधून आपल्या कपड्यांखाली विहिरीच्या बाजूला ठेवले. दुसरी एक बाई या यात्रेकरूबाईच्या मागावर पूर्वीपासूनच होती. तिने दागिने बांधलेला रुमाल पाहून ठेवला व ती बाई स्नानाला गेल्यावर तिने ते सर्व दागिने पळवून आपल्या घरी नेऊन जमिनीमध्ये खड्डा करून त्यात पुरून ठेवले. दागिन्यांची मालकीण स्नान करून

कपडे वदलावयाला गेली. त्यावेळी दागिने वांधलेला रुमाल तेथे नसल्याचे तिला आढळले. तिने आजूवाजूला शोधले व इतरांकडे चौकशी केली; पण दागिन्यांचा काही पत्ता लागला नाही. शेवटी ती रडत रडत बुवांजवळ गेली व घडलेली सर्व हकीकत तिने त्यांच्या कानावर घातली. त्यावेळी बुवांनी तिला असे सांगितले की, "संध्याकाळपर्यंत तुझे सर्व दागिने मिळतील. तू रडू नकोस." माणगावसारख्या जागृत देवस्थानाच्या ठिकाणी चोरी कशी पचणार? तेथे आलेल्या यात्रेकरूंना अभय द्यावे अशी बुवांनी देवांची करुणा भाकली व देवांच्या गणांना चोरीचा शोध लावण्यास सांगितले. चोरी करणारी बाई आपल्या घरी जाऊन वसली होती. त्यावेळी तिच्यासमोर एक अक्राळविक्राळ शरीराचा पुरुष येऊन तिला भीती दाखवू लागला व तिचा पाठलाग करू लागला. अखेर संरक्षणासाठी ती बाई देवळात बुवांपाशी आली. बुवांनी हीच गुन्हेगारबाई हे ओळखले व तिला असे सांगितले की, "चोरलेले दागिने जोपर्यंत तू येथे आणून देत नाहीस तोपर्यंत तुझा पाठलाग करणारा तुला सोडणार नाही." तू ते दागिने मुकाट्याने घेऊन ये. वाईने गुन्हा कबूल केला व आपल्या अपराधावद्दल बुवांच्या जवळ क्षमा मागितली. त्यानंतर त्या बाईने घरी पुरून ठेवलेले दागिने बुवांच्या समोर आणून ठेवले. त्यावेळी तिला भीती दाखविणारा पुरुष निघून गेला व ती वाई निर्भय झाली. नंतर दागिन्यांच्या मालकिणीला ते सर्व दागिने बुवांनी परत दिले.

माणगावच्या देवस्थानाची महती बुवांनी लोकांना अनेक वेळा सांगितली होती. ते लोकांना नेहमी असे सांगत असत की, "हे स्थान फार जागृत आहे. येथे केलेली चोरी किंवा अन्य कोणताही गुन्हा खपणार नाही. अपराध्याला योग्य शासन होईल. नरसोबाच्या वाडीप्रमाणे येथे योगिनी वगैरे परिवार देवता नाहीत; पण देवांचे

गण येथे भक्तांचे रक्षण करण्यासाठी सदैव तत्पर असतात. येथे भक्तांचे सगळेच मनोरथ पूर्ण होतील असे नाही; पण प्रत्येकाला त्याच्या श्रद्धेचे योग्य फळ मिळेल." येथे सदैव वास करणाऱ्या देवांच्या गणांचे अस्तित्व अनेक वेळा सिद्ध झाले होते. वर उल्लेख केलेल्या बाईच्या दागिन्यांच्या चोरीच्या बाबतीमध्ये जसा त्यांच्या अस्तित्वाचा अनुभव आला तसाच अनुभव एकदा एका बाईने देवांपुढचे चार आणे चोरले त्यावेळी आला. कदाचित् घरच्या गरिबीमुळे तिने पैसे चोरले असतील; पण चोरी ती चोरी. देवांच्या गणांनी तिच्या शरीरात शिरून तिला त्रास द्यावयाला सुरुवात केली. शेवटी घाबरून तिने चोरी कबूल केली व चोरलेले पैसे देवांपुढे आणून ठेवले.

सावंतवाडीच्या वर घाटात आजरे नावाचे एक गाव आहे. तेथील मारुतीच्या देवळात श्री. आजरेकरबुवा म्हणून एक हनुमान भक्त राहात असत. हे मंदिर त्यांनी स्वतःच बांधले होते. श्री. आजरेकर-बुवा शरीराने धिप्पाड असून त्यांच्या वयाचा कोणाला पत्ता नव्हता. ते गौड कनोजी ब्राह्मण होते. या पलीकडे त्यांच्याविषयी अधिक माहिती कोणासही नव्हती. त्यांनी उग्र तपश्चर्या करून मारुतीरायाला प्रसन्न करून घेतले होते. श्री. मारुतीच्या कृपेने त्यांना वाचासिद्धी प्राप्त झाली होती. त्यामुळे ते बोलतील ते खरे होत असे. मारुतीचे स्मरण करताच मारुती त्यांना प्रसन्न होत असे व बुवा देहभान विसरून जात. त्या अवस्थेमध्ये ते शेरदोनशेर शेंदूर तेलात कालवून प्राशन करीत असत. तसेच या अवस्थेमध्ये ते आपल्या झोळीत हात घालून लोकांना इच्छित वस्तू काढून देत असत. त्यांच्या शरीरात श्रीमारुतीचा आवेश झाला म्हणजे ते एका झाडावरून दुसऱ्या झाडावर, वानराप्रमाणे उड्या मारीत जात. लोक त्यांना आजऱ्याचे मारुतीबुवा असेही म्हणत असत. त्यांनी माणगावलाही श्रीदत्त-

मंदिराजवळ द्रोणागिरी पर्वत उचललेल्या मारुतीची मूर्ती स्थापन केली होती. ते शेवटी श्रीक्षेत्र नरसोबाच्या वाडीला जाऊन राहिले होते. तेथेच त्यांचे देहावसान झाले.

बुवांना नरसोबाच्या वाडीला जाताना आजरे गावावरून जावे लागत असे. अशा वेळी पुष्कळदा त्यांना आजरे गावी मुक्काम करण्याचा प्रसंग येत असे. त्यांचा मुक्काम मारुतीबुवांच्या हनुमान मंदिरात होत असे. श्री. आजरेकर बुवांची श्रीवासुदेवशास्त्र्यांच्या ठिकाणी निष्ठा होती आणि श्रीशास्त्रीबुवांनाही त्यांची संगती आवडत असे. साधूच्या खुणा साधूलाच कळतात या न्यायाने दोघेही एकमेकांना ओळखून होते. श्री. आजरेकरबुवा वारंवार बुवांना भेटण्यासाठी माणगावी जात असत. उरलेली त्यांच्या संबंधीची हकीकत मागे आलीच आहे.

एकदा जवळच्या डोंगरातील एक जागा कामानिमित्त साफ करून ती खोदावयाला सुरुवात केल्यावर तेथे बुजलेला पाण्याचा झरा वर आला व त्या झऱ्यातून धोधो पाणी वाहू लागले. सगळीकडे हाकाटी झाली की, डोंगरात गंगा आली. गंगेत स्नान करण्यासाठी भाविक लोकांच्या झुंडीच्या झुंडी धावू लागल्या. संकल्प सांगण्यासाठी ब्राह्मण मंडळीही तेथे जमा झाली. हा हा म्हणता तीसचाळीस रुपये जमले. लोकांच्या श्रद्धेचा अशा तऱ्हेने गैरफायदा घेतला जात आहे हे बुवांना कळताच ते स्वतः त्या जागी गेले. तेथे जमलेल्या सर्व ब्राह्मण मंडळींना बोलावून आणून त्यांनी ही बुवाबाजी व हा मांडलेला बाजार बंद करण्यास सांगितले आणि तेथे जमा झालेल्या पैशांचा विनियोग श्री. आजरेकरबुवांनी स्थापन केलेल्या मारुतीसाठी करावयाला लावला.

पाडगावला एक पुरातन श्रीदत्तमंदिर होते. ते पडून गेले होते

व मंदिरातील श्रीदत्तमूर्तीसुद्धा बाजूला जाऊन पडली होती. श्री. आजरेकरबुवा पाडगावला आले असताना हे पडके मंदिर त्यांच्या नजरेला आले. त्यांना देवळाची दैन्यावस्था पाहून फार वाईट वाटले. त्यांच्या दर्शनाला आलेल्या ग्रामस्थांना त्यांनी देवळाचा जीर्णोद्धार करून श्रीदत्तमूर्तीची पुन्हा प्रतिष्ठापना करण्यास सांगितले. गावकऱ्यांनी ते मान्य केले. कामाला सुरुवात झाली. मंदिराची डागडुजी होईपर्यंत श्री. आजरेकरबुवा पाडगावलाच राहिले. देवळाची दुरुस्ती झाल्यावर श्रीदत्तमूर्तीची स्थापना श्रीवासुदेवशास्त्र्यांच्या हस्ते व्हावी अशी इच्छा लोकांनी व्यक्त केली. श्रीवासुदेवशास्त्र्यांना आमंत्रण करण्यात आले. श्रीशास्त्रीबुवाही या कामासाठी आनंदाने पाडगावला आले. ग्रामस्थांचा उत्साहही दांडगा होता. आजऱ्याचे श्रीमारुतीबुवा आणि माणगावचे श्रीशास्त्रीबुवा हे दोन सत्पुरुष त्यांना उत्तेजन देत होते. स्थापनेच्या दिवशी मोठा भंडारा करण्यात आला व गावातील सर्व लोकांना प्रसादासाठी बोलाविण्यात आले. मात्र झालेली ही गोष्ट तेथील जहागिरदार गोसावी यांना आवडली नाही; कारण गावचे प्रथम नागरिक असूनही या कामाबद्दल त्यांना कोणी विचारलेही नव्हते. त्यामुळे त्यांना मोठेपणाचा मान मिळाला नाही. याचा सूड म्हणून स्थापनेच्या दिवशी जहागिरदारांनी वाजंत्री वाजविणाऱ्यांना वाजंत्री वाजाविण्यास प्रतिबंध केला. देवाच्या कार्यात हे मोठेच विघ्न आले; कारण शुभकार्यामध्ये मंगलवाद्ये आवश्यक होती. या प्रतिबंधामुळे अकस्मात् गावामध्ये महामारीचा रोग सुरू झाला व वाजंत्री वाजविणारांपासूनच रोगाची लागण सुरू झाली. त्यामुळे ते लोक घाबरले आणि त्यांनी बुवांचे पाय धरले. बुवांनी त्यांना अंगारा खावयाला देऊन वाजंत्री वाजविण्यास सांगितले. वाजंत्री वाजवावयाचे कबूल केल्यावर ते या रोगातून मुक्त झाले.

जहागिरदारांना ही गोष्ट कळताच त्यांनी या समारंभात भाग घेणाऱ्या गावातील ब्राह्मणांना वाळीत टाकण्याची धमकी दिली. त्यामुळे कोणीही ब्राह्मण भंडाऱ्याचे जेवण जेवावयाला आला नाही. मोठ्या प्रमाणात शिजविलेले अन्न इतर लोकांना वाटून टाकावे लागले. या गोष्टीचे श्री. आजरेकरबुवांना फार वाईट वाटले. देवकार्यातसुद्धा व्यत्यय आणणारे पापी लोक ज्या गावात आहेत त्या गावात राहावयाचे नाही असे म्हणून श्री. आजरेकरबुवा गाव सोडून रानात जाऊन बसले. त्यामुळे गावकऱ्यांचा विरस झाला त्यांना फार वाईट वाटले. गावावर सत्पुरुषाचा कोप म्हणजे देवाचाच कोप हे जाणून त्यांनी श्रीवासुदेवशास्त्र्यांना अशी विनंती केली की "तुम्ही आजरेकरबुवांना भेटून त्यांचे मन वळविल्यास ते पुन्हा गावात येतील. ते दुसऱ्या कोणाचेही ऐकणार नाहीत."

लोकांच्या विनंतीला मान देऊन बुवा रानात गेले व श्री. आजरेकरबुवांचे मन वळवून त्यांना घेऊन गावात आले. त्यामुळे लोकांना फार आनद झाला. श्री. आजरेकरबुवा गावात परत आले हे कळताच जहागिरदार त्यांची निंदा करू लागले व त्यांना अद्वातद्वा बोलू लागले. त्यामुळे श्री. आजरेकरबुवा फार संतापले व हातामध्ये भस्म घेऊन जहागिरदारांना शाप द्यावयाला सिद्ध झाले. श्री. आजरेकरबुवांच्या तोंडून बाहेर पडलेले शब्द खरे होतात हे सर्वांना ठाऊक होते. आता जहागिरदाराचे दिवस भरले असे सर्वांना वाटले. तेवढ्यात शांततेचे मेरुमणी श्रीशास्त्रीबुवा पुढे आले व श्री. आजरेकरबुवांचा हात धरून त्यांना असे म्हणाले की, "क्रोधरूपी सैतान आपल्या शरीरात शिरला आहे. तपस्व्याचा क्रोधासारखा दुसरा मोठा शत्रू नाही. तेव्हा आपण आता स्नान करू या. शाप दिल्याने आपल्य तपाचा भंग होईल. दुष्कृत्याचे फळ ज्याचे त्याला भोगावेच लागते. त्यासाठी आपण आपले तपोबल का कमी करून घेता? त्याला

आपल्या कर्माची फळे भोगू द्या." हे ऐकून श्री. आजरेकरबुवा शांत झाले. त्यानंतर खरोखरच ते कोणावर कधीही रागावले नाहीत.

सावंतवाडी संस्थानचे कारभारी श्री. बावडेकर हे प्रथम नास्तिक व सुधारणावादी होते. भूतपिशाच्च असल्या गोष्टींवर त्यांचा विश्वास नव्हता. श्री. बावडेकरांच्या मुलाचे लग्न मोठ्या धूमधडाक्याने झाले. श्रीमंताच्या घरचे लग्न असल्यामुळे कित्येक दिवस सोहळा चालला होता; पण या आनंदोत्सवात अकस्मात् विघ्न आले. नववधू एक दिवस एकाएकी बेशुद्ध पडली. औषधोपचार झाले; पण गुण आला नाही. श्री. आणावकरांच्या समंधाकडे कोणीतरी चौकशी केली तेव्हा त्याने तिला पिशाच्चबाधा झाली असून तिला ताबडतोब माणगावला दत्तमंदिरामध्ये घेऊन जाण्यास सांगितले. नाक दाबल्यावर तोंड उघडते या म्हणीप्रमाणे श्री. बावडेकरांची अवस्था झाली. त्यांनी सुनेला माणगावला बुवांकडे नेले. बुवांनी तिला अंगारा दिला व तो जपून ठेवण्यास सांगितले. त्याचप्रमाणे श्रीदत्तजयंतीच्या वेळी तिला पुन्हा घेऊन येण्यास सांगितले. बुवांनी सांगितल्याप्रमाणे अंगारा लावल्यावर ती शुद्धीवर आली व तिला आराम वाटला. त्यामुळे श्री. बावडेकरांच्या घरामध्ये आनंदी आनंद झाला.

पुढे श्रीदत्तजयंती आली; परंतु सुनेला त्या दिवशी माणगावला घेऊन जावयाचे राहून गेले व ती पुन्हा बेशुद्ध पडली. ताबडतोब डॉक्टरांना बोलाविण्यात आले. डॉक्टर येताच सावध होऊन ती डॉक्टरांच्याच अंगावर धावून गेली व त्यांना असे म्हणाली की, "मला औषध द्यावयाला आलास काय? ओळखलेस मी कोण आहे ते? दे तर औषध, पाहू तुझा केवढा पराक्रम आहे तो." या सरबत्तीने बिचारा डॉक्टर गार झाला व आपली औषधाची पेटी घेऊन निघून गेला. लोक श्री. बावडेकरांना असे म्हणाले की, "तुम्ही सुधारणावादी! तुम्ही भूतपिशाच्च वगैरे काही मानीत नाही; पण आता ते

तुमच्या घरातच शिरले आहे. आता बुवांना शरण जा, म्हणजे सुनेला बरे वाटेल." बुवांच्या सांगण्याप्रमाणे आपण सुनेला श्रीदत्तजयंतीच्या दिवशी माणगावला नेले नाही म्हणून श्री. वावडेकर खजील झाले होते. त्यांनी नोकराच्या हस्ते माणगावला देवळात पाच रुपये व साखर पाठविली व बुवांकडून मुदत मागून घेण्यास सांगितले. बुवांनी पैसे व साखर आलेल्या नोकराजवळ परत पाठवून देऊन त्याच्या बरोबर असा निरोप दिला की, "देवापुढे लाच देऊन काहीही उपयोग होणार नाही. परत असा लाच देण्याचा प्रयत्न करू नका." असा हा बुवांनी पाठविलेला निरोप मिळताच श्री. वावडेकर सुनेला घेऊन बुवांकडे आले आणि त्यांनी बुवांची क्षमा मागितली. त्यावेळी "तुमचा पिशाच्चावर विश्वास नाही; मग तुम्ही येथे कशाला आलात?" असे बुवांनी त्यांना विचारले व रात्री पालखी झाल्यावर श्री. आणावकरांचा समंध याविषयी खुलासा करील असे सांगितले. परंतु त्या दिवशी पालखीनंतर श्री. आणावकरांच्या अंगात समंध आलाच नाही. दुसऱ्या दिवशी तो आला आणि त्याने "श्रीक्षेत्र नरसोबाच्या वाडीला एक अश्वत्थवृक्षाला पार बांधून एक सहस्र ब्राह्मण भोजन घाला," असे श्री. बावडेकरांना सांगितले. हे एकताच श्री. बावडेकर असे म्हणाले की, "इतके सर्व करण्याची माझी शक्ती नाही." त्यांचे हे म्हणणे ऐकताच त्यावर "शंभर ब्राह्मणांना भोजन द्यावे." असा बुवांनी निर्णय दिला. त्यानंतर नरसोबाच्या वाडीला जाऊन श्री. बावडेकरांनी बुवांच्या आज्ञेप्रमाणे ब्राह्मण समाराधना करताच त्यांची सून पूर्णपणे बरी झाली.

सावंतवाडीमध्ये पाडगावकर म्हणून एक सधन गृहस्थ होते. एका वर्षी त्यांच्या कुटुंबातील दोन तीन माणसे अकस्मात् मरण पावली. तेव्हा त्यांनी माणगावला जाऊन बुवांना असे होण्याचे कारण विचारले. त्यावेळी बुवा त्यांना असे म्हणाले की, "तुमचे

घर शापित आहे. तरी तुम्ही आपले राहते घर पाडून नवे बांधा म्हणजे मग आपण त्या बाबतीत आणखी काय करावयाचे ते करू."

माणगावकरांची आणि आजूबाजूच्या गावातील लोकांची अशी खात्री होती की, बुवांच्या मुखातून बाहेर पडलेले शब्द खरे होतात. बुवांच्या सांगण्याप्रमाणे श्री. पाडगावकरांनी आपले राहते घर पाडून नवीन घर बांधले व बुवांच्या आज्ञेप्रमाणे गृहप्रवेश करण्यापूर्वी वास्तुशांती केली. मात्र जो संरक्षण विधी करावयाचा होता तो बुवा स्वतःच करणार होते. त्यामुळे वास्तुशांती झाल्यावर सर्वजण बुवांची वाट पाहात बसले होते. ज्यावेळी रात्र बरीच झाली त्यावेळी श्री. पाडगावकरांनी बुवांना बोलाविण्यासाठी व त्यांच्या सोबतीसाठी एक माणूस माणगावला पाठविला. त्यांची आणि त्या माणसाची जांभळीची आड या डोंगराच्या पायथ्याशी गाठ पडली.

त्यावेळी त्या माणसाने बुवांना असे सांगितले की, "आपल्याला बोलाविण्यासाठी आणि सोबत करण्यासाठी पाडगावकरांनी मला पाठविले आहे." त्याचे हे म्हणणे ऐकताच "आम्हाला दुसरी सोबत काय करावयाची ? त्याची काही आवश्यकताच नाही. तो पाहा आमच्या सोबतीकरिता कोण आला आहे ते." असे म्हणून बुवांनी अंगुलीनिर्देश करताच त्या माणसाने तिकडे पाहिले. त्यावेळी त्याला एक भला मोठा नाग तेथे असल्याचे दिसले.

त्यानंतर बुवांनी त्या नागाला तेथेच थांबावयास सांगून ते आलेल्या माणसाबरोबर श्री. पाडगावकरांच्या घरी गेले. तेथे आवश्यक तो संरक्षणविधी उरकून ते परत निघाले. माणगावाला परत येतानाही श्री. पाडगावकरांनी आपल्या माणसाला बुवांना सोबत करण्यासाठी पाठविले होते. पूर्वीच्या जागी येताच तो नाग तेथेच त्यांची वाट पाहात थांबलेला होता. मग बुवांनी आपल्या बरोबर आलेल्या श्री. पाडगावकरांच्या माणसाला परत पाठविले

व ते त्या नागावरोबर देवळात परत आले.

श्री. पाडगावकरांप्रमाणेच सखाराम नावाचा एक नवशिक्षित माणूस देवधर्म, पिशाच्च वगैरे गोष्टी मानीत नसे. तत्कालीन आधुनिक शिक्षण घेतल्यामुळे देवधर्माची आणि देवधर्म मानणाऱ्यांची टवाळी करण्यात सखारामला भूषण वाटत असे; परंतु दुर्दैवाने त्याला स्वतःलाच एकदा पिशाच्च बाधा झाली व ती बाधा निवारण व्हावी म्हणून तो माणगावला श्रीदत्तमंदिरामध्ये सेवेसाठी येऊन राहिला.

सखारामचा मेव्हणा त्याच्यापेक्षाही सुधारक होता. तो एल्‌एल्‌ बी. झालेला होता. तो देवधर्म या गोष्टी तुच्छ मानीत असे. एकदा सखारामला भेटण्यासाठी तो माणगावला गेला व तेथे तो सखारामची थट्टा करू लागला. त्यावेळी तो त्याला असे म्हणाला की, "पिशाच्च, पिशाच्च हे काय खूळ घेऊन बसला आहेस? डॉक्टरांकडे जा आणि इलाज करून घे." त्याची ही थट्टा ऐकताच सखारामच्या शरीरात असलेले पिशाच्च त्याच्या मेव्हण्याला असे म्हणू लागले की, "काय रे! आमची थट्टा करतोस काय? तुला इंगा पाहावयाचा आहे काय?" त्यावेळी तो पिशाच्चाला असे म्हणाला की, हो, हो हे कितपत खरे आहे ते मला पाहावयाचे आहे. तू जर माझ्या शरीरात शिरून प्रत्यक्ष मला त्रास देऊन आपले अस्तित्व मला पटवून देशील; तर मी पिशाच्च योनी खरी मानीन. नाहीपेक्षा हे सर्व थोतांड आहे असे मी समजेन." तेव्हा ते पिशाच्च त्याला असे म्हणाले की, "ज्याच्याकडे आमचे काही येणे लागते त्याच्या शरीरात प्रवेश करून आम्ही त्याला त्रास देतो. मात्र इतर कोणालाही आम्ही त्रास देत नाही."

हे ऐकल्यावर सखारामच्या मेव्हण्याला अधिकच जोर चढला. त्याने देवाची, पिशाच्चांची, बुवांची व तेथील सर्वांचीच थट्टा

करण्यास सुरुवात केली. ही थट्टा ऐकताच सखारामच्या अंगातील पिशाच्चास राग येऊन त्याने आपल्या बरोबरीच्या दुसऱ्या एका पिशाच्चाला सांगून सखारामच्या मेव्हण्याचा चांगला समाचार घेण्यास व त्याला कायमचा धडा शिकविण्यास सांगितले.

त्याबरोबर त्या पिशाच्चाने सखारामच्या मेव्हण्याच्या अंगात प्रवेश करून त्याला इतका चोप दिला की, त्यामुळे तो बेशुद्ध व अगदी मरणोन्मुख होऊन पडला. ज्यावेळी तो थोडा सावध झाला त्यावेळी सखारामच्या अंगातील पिशाच्च त्याला असे म्हणाले की, "काय रे ! तू आता का ढोंग करीत आहेस? तुझा जो काही शहाणपणा आहे तो आता दाखव की !" अशा प्रकारे त्या पिशाच्चाने त्या नास्तिक माणसाची चांगली हजेरी घेतली व ते पिशाच्च बुवांकडे वळून त्यांना असे म्हणाले की, "बुवा! आपण या माणसाची या त्रासातून सुटका करू नका." इतके म्हणून त्याने बुवांना एकंदर घडलेली सर्व हकीकत सांगितली; कारण ही सर्व घटना घडताना बुवा तेथे उपस्थित नव्हते.

पुढे जेव्हा सखारामचा मेव्हणा घरी गेला तेव्हा घरच्या लोकांना ही हकीकत कळली. त्यावेळी ती सर्व मंडळी माणगावला आली व त्यांनी त्याची या त्रासातून सुटका व्हावी म्हणून बुवांची प्रार्थना केली. त्यावेळी बुवा त्या लोकांना असे म्हणाले की, "देवांच्या दरबारात हा अपराधी आहे. याने देवांची सुद्धा निंदा केली आहे. याकरिता काही दिवस येथे राहून याने सेवा केल्याशिवाय हा पिशाच्चबाधेतून मुक्त होणार नाही." शेवटी नाईलाजाने त्याला माणगावी यावेच लागले. बुवांच्या सांगण्याप्रमाणे तेथे काही दिवस राहून त्याने श्रद्धेने देवांची सेवा केली व बरे वाटल्यावर बुवांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानून तो घरी गेला.

नवीन घर बांधल्यापासून श्री. पाडगावकरांची बुवांच्या ठिकाणी

फार श्रद्धा जडली होती. या श्रद्धेमुळेच त्यांनी माणगावच्या श्रीदत्त-मंदिरास काही मदत केली होती. अडीअडचणीला ते बुवांकडे धाव घेत असत. श्री. पाडगावकरांच्या विश्वासातला एक नोकर सावंत याला पोटशूळाची असह्य अशी व्यथा होती. एकदा श्री. पाडगाव-करांनी त्याला बुवांकडे नेले आणि त्याच्या व्याधीवर उपचार करण्याची त्यांना विनंती केली.बुवांनी त्याला नित्य नामस्मरण करीत मंदिराला प्रदक्षिणा घालण्यास सांगितले. ही सेवा करता यावी म्हणून तो माणगावमध्येच राहून भक्तिभावाने नामस्मरण करीत देवाला प्रदक्षिणा घालीत असे व इतर पडेल ती सेवा करीत असे. त्यामुळे त्याची पोटशूळाची व्यथा हळूहळू कमी होऊ लागली.

श्रीक्षेत्र नरसोवाच्यावाडीप्रमाणे माणगावाच्या श्रीदत्तमंदिरामध्ये शेजारतीनंतर कोणी राहावयाचे नाही असा नियम होता. एक दिवस रात्रीच्या वेळी देवळात सहज पडल्या पडल्या सावंताला झोप लागली. शेजारती होऊन गेली होती. झोपेत सावंताला स्वप्न पडले. स्वप्नामध्ये त्याला कोणीतरी असे सांगितले असे की, "तुझा मालक मेला आहे. तू तावडतोव सावंतवाडीला जा." सकाळी सावंताने हे स्वप्न बुवांना सांगितले. त्यावेळी बुवा त्याला असे म्हणाले की, "हे काही देवाचे स्वप्न नाही, पिशाच्चाचे आहे. तेव्हा तू देवांची आज्ञा घेतल्यावाचून हे स्थान सोडून सावंतवाडीला जाऊ नकोस." पण त्याला राहवले नाही. मालकावर त्याची फार निष्ठा असल्या-मुळे बुवांना न सांगताच तो सावंतवाडीला गेला. तेथे त्याचे मालक खुशाल असून उत्तम स्वास्थ्य भोगीत असल्याचे त्याने पाहिले तेव्हा त्याला आश्चर्य वाटले. त्यानेही झालेला प्रकार मालकास सांगितला. बुवांची आज्ञा भंग केल्याबद्दल श्री. पाडगावकर त्यांच्यावर रागावले व त्यांनी त्याला पुन्हा माणगावला जावयाला सांगितले.

मालकाने सांगितल्याप्रमाणे सावंत परत येण्यास निघाला ; परंतु पिशाच्चाने त्याला वाटेतच गाठून पुन्हा इतका असह्य पोटशूळ उत्पन्न केला की, त्यातच त्याचा अंत झाला.

या गोष्टीवरून हे लक्षात येते की, देवाची आज्ञा कोणती व इतरांची आज्ञा कोणती हे निश्चितपणे समजावून सांगण्यास महापुरुषच समर्थ असतात. त्यामुळे ते सांगतील त्या वचनावर विश्वास ठेवून वागण्यातच मनुष्याचे पूर्ण कल्याण असते. मात्र महापुरुषांचे न ऐकता ज्यावेळी तो आपली स्वत:ची स्थूल व प्राकृत बुद्धी चालवितो त्यावेळी त्याचे अपरिमित नुकसान होते. याकरिता स्वत:ची बुद्धी न चालविता महापुरुषांच्या सांगण्याप्रमाणे मार्गक्रमण करणेच श्रेयस्कर ठरते.

बुवांच्या अत्यंत साध्या राहणीमुळे व तपादिकांनी कृश झालेल्या शरीरामुळे त्यांची पारख प्रथमदर्शनी कोणालाच होत नसे. या साधेपणाच्या राखेखाली विद्वत्तेचा आणि ज्ञानाचा धगधगता अग्नी आहे हे सुरुवातीला कोणाला कळून येत नसे. म्हणून तर श्रीक्षेत्र नरसोबावाडीच्या पहिल्या भेटीमध्ये पुजाऱ्यांनी त्यांना पादुकांवर पाणी घालू दिले नाही. अशीच एक गोष्ट कोल्हापूरला घडली. कोल्हापूरची महालक्ष्मी ही स्वामींची कुलदेवता होती. श्रीक्षेत्र नरसोबाच्यावाडीहून माणगावला परत येताना महालक्ष्मीचे दर्शन घ्यावयाचे असा बुवांचा नियम होता. एकदा ते कोल्हापूरच्या श्री. ठकारभटजींकडे उतरले होते. बुवांची विद्वत्ता श्री. ठकारभटजी जाणून होते. गावातील विद्वानांचा बुवांशी परिचय करून द्यावा या हेतूने श्री. ठकारभटजींनी कोल्हापुरातील एका शास्त्रीबुवांना आपल्या घरी बोलाविले. ते शास्त्रीबुवा ठकारांच्या घरी आले तेव्हा बुवा घरात आतल्या बाजूला अनुष्ठान करीत बसले होते. मळकट पंचा नेसलेली बुवांची ती (त्यांच्या दृष्टीने) गबाळ मूर्ती पाहून कोल्हापूरचे शास्त्री श्री.

ठकारभटजींना उपहासगर्भ स्वरात असे म्हणाले की, "हे असले रत्न आपण कोठून पैदा केले? यांनाच भेटावयाला का आम्हाला मुद्दाम बोलावून आणले?" त्या शास्त्रीबुवांना सर्व शास्त्रे अवगत झाली असतील ; पण "विद्या विनयेन शोभते" हे मात्र ठाऊक नसावे. श्री. ठकारभटजींनी हाताने खूण करून त्यांना गप्प राहावयास सांगितले. थोड्या वेळाने बुवा अनुष्ठान उरकून बाहेर आले. नमस्कार चमत्कार झाले व ओघाओघाने काही शास्त्रीय चर्चा सुरू झाली. बुवांचे ज्ञान अजमाविण्यासाठी कोल्हापूरकर शास्त्र्यांनी ही चर्चा मुद्दामच घडवून आणली होती. बुवांच्या मुखातून सुरू झालेल्या ज्ञानगंगेच्या ओघात कोल्हापूरकर शास्त्र्यांचा दुरभिमान आणि गर्व कोठल्याकोठे वाहून गेला. त्यांनी आपल्या सुरुवातीच्या बोलण्या-बद्दल श्री. ठकारभटजींकडे दिलगिरी व्यक्त केली.

वरील कथा वाचली म्हणजे संतश्रेष्ठ श्रीचोखामेळा यांच्या अभंगात या कथेचे तात्पर्य प्रगट झाले आहे याची स्पष्टपणे जाणीव होते. ते म्हणतात–

ऊस डोंगा परी रस नव्हे डोंगा।
काय भुललासी वरलिया रंगा ॥१॥
कमान डोंगी परी तीर नोहे डोंगा।
काय भुललासी वरलिया रंगा ॥२॥
नदी डोंगी परी जल नव्हे डोंगे।
काय भुललासी वरलिया रंगें ॥३॥
चोखा डोंगा परी भाव नव्हे डोंगा।
काय भुललासी वरलिया रंगा ॥४॥

माणगावची ख्याती दूरवर पसरल्यामुळे श्रीमंत, गरीब अशी सर्व आर्त भक्तमंडळी तेथे सेवा करण्याकरिता येऊन राहात व कृतकार्य होऊन आपल्या गावी परत जात असत. एकदा सावंतवाडी

संस्थानच्या राणीसाहेबांना काही पिशाच्च बाधा झाली. राजवाड्यातील एका स्वयंपाक्याचे पैसे त्यांच्याकडे राहिले होते. ते पैसे परत देण्यापूर्वीच तो मरण पावला. त्या पैशात त्याची वासना अडकून राहिल्यामुळे तो पिशाच्च होऊन त्यांना त्रास देऊ लागला.

आपला त्रास दूर होण्यासाठी त्यांनी माणगावला येऊन बुवांना उपाय विचारला. बुवांनी त्यांना सांगितल्याप्रमाणे त्या श्रीदत्तमंदिराला प्रदक्षिणा घालीत व नित्य धूपारतीच्या समयी उपस्थित राहून सामान्य माणसाप्रमाणे सेवा करीत. सायंकाळी धूप घातल्यावर आरतीच्या वेळी त्यांच्या अंगात पिशाच्चाचा संचार होऊन अस्ताव्यस्त अवस्थेत त्या चाळे करीत व मंदिराबाहेरच्या खांबाला चिकटून राहात. राजेसाहेबसुद्धा वेळोवेळी श्रीदत्ताच्या दर्शनाला येत. बुवांच्या सांगण्याप्रमाणे, ब्राह्मणांकडून महारुद्र, श्रीगुरुचरित्र सप्ताह इत्यादी उपाय केल्यावर राणीसाहेबांची पिशाच्चबाधेतून मुक्तता झाली व त्या आनंदाने सावंतवाडीला परत गेल्या.

एकदा बुवा श्री. नारोपंतांना भेटण्यासाठी सावंतवाडीला श्री. उकिडव्यांच्या श्रीदत्तमंदिरामध्ये गेले होते. ही बातमी राजवाड्यात समजली व बुवांना राजवाड्यात बोलाविण्याचे ठरले. या गोष्टीची कुणकुण बुवांच्या कानी जाताच त्यांनी देवळातील आपला मुक्काम लगेच हलविला व श्री. नारोपंतांना गावाबाहेर येऊन भेटावयास सांगितले. श्री. नारोपंताची भेट झाल्यावर ते ताबडतोब माणगावला परतले.

या गोष्टीवरून हे लक्षात येते की, मानसन्मानापासून व प्रसिद्धीपासून बुवा नेहमी दूर राहात असत. याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे अशा तऱ्हेने वागून आयुष्याच्या सुरुवातीपासून अखेरपर्यंत त्यांनी अत्यंत धगधगित वैराग्याचा आश्रय करून त्याचा परमादर्श समाजापुढे उभा केला; कारण "तरी विरक्तीवांचूनि कहीं। ज्ञानासि तगणेंचि

नाही ।। ज्ञानेश्वरी १५.३६ ।। " हे त्यांना सप्रमाण व सोदाहरण दाखवून द्यावयाचे होते आणि श्रीमद्भगवद्गीतेत भगवन्तांनी "वैराग्यं समुपाश्रितः ।।१८.५२।।" असे सांगून वैराग्याचा जो अतीव गौरव केला आहे, ते वैराग्य साधकांसाठी व सिद्धांसाठीही किती आवश्यक आहे, हे त्यांना आपल्या स्वतःच्या मूर्तिमंत आदर्शाने सर्वांपुढे उपस्थित करावयाचे होते. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी उपरोक्त वैराग्याचे आपल्या भावार्थात जे स्पष्टीकरण केले आहे, ते वाचले म्हणजे बुवांनी आजीवन वैराग्याचे पालन का व कसे केले याचा उलगडा होतो.

आणि ध्यान योग दोन्ही । इये आत्मतत्त्वज्ञानीं ।
पैठी होआवया निर्विघ्नीं । आधींचि तेणें ।।१८.१०४२।।
वीतरागतेसारिखा । जोडूनि ठेविला सखा ।
तो आघवियाचि भूमिका– । सवें चाले ।।१०४३।।
पहावें दिसे तंववरी । दिठीतें न संडी दीप जरी ।
तरी कें आहे अवसरी । देखावया ।।१०४४।।
तैसें मोक्षीं प्रवर्तलया । वृत्ती ब्रह्मीं जाय लया ।
तंव वैराग्य आथी तया । भंगु कैंचा ।।१०४५।।
म्हणौनि सवैराग्यु । ज्ञानाभ्यासु तो सभाग्यु ।
करूनि जाला योग्यु । आत्मलाभा ।।१०४६ ।।

माणगावचे श्रीदत्तमंदिर स्थापन होण्यापासूनच श्रीवासुदेवशास्त्र्यांची उत्तम ज्योतिषी, विद्वान् पंडित व साधुपुरुष म्हणून माणगाव परिसरात ख्याती झाली होती. आता श्रीदत्तमंदिराच्या स्थापनेपासून ती शतगुणांनी वाढली होती; पण यामुळे पुष्कळ लोक त्यांचा हेवा करीत व आपणालाही प्रसिद्धी लाभावी अशी त्यांची इच्छा असे. बुवांना मात्र या प्रसिद्धीचा कंटाळा होता. प्रसिद्धीच्या शिखरावर चढूनही त्यांच्या साध्या राहणीमध्ये व आचार-विचारात फरक पडला नाही. नेसावयाला एक पंचा व जेवावयाला भिक्षान्न

एवढ्याच त्यांच्या अल्पशा गरजा होत्या. त्यांच्या दैनंदिन आचरणामध्येही काही फरक झाला नाही.

खरे म्हणजे प्रसिद्धीमुळे बुवांना उपद्रवच फार होऊ लागला होता. उत्सवांच्या गर्दीमुळे त्यांना नेहमीचे अनुष्ठान करण्यासही स्वस्थता व वेळ मिळेना. देवांच्या दैनंदिन सेवेमध्येही काही कमी करून चालत नसे; कारण तसे झाल्यास बुवांना त्याचे प्रायश्चित्त भोगावे लागत असे. या सर्व परिस्थितीला कंटाळून बुवांनी देवांची अशी प्रार्थना केली की, " येथे येणाऱ्या मंडळींची गर्दी कमी करून मला स्वास्थ्यलाभ करून द्यावा."

बुवांनी अशी प्रार्थना केली खरी; परन्तु दोन वर्षेपर्यन्त देवांनी त्याच्याकडे लक्ष न दिले नाही. नेहमीप्रमाणे माणगावला गर्दी लोटतच होती. परंतु जेव्हा दोन वर्षांनन्तर देवांचे समाधान झाले तेव्हा त्यांनी एके दिवशी, " तुम्ही मागे केलेल्या प्रार्थनेप्रमाणे व तुमच्या इच्छेप्रमाणे हा बाजार बंद केला आहे." असे बुवांना सांगितले. त्यानन्तर तेव्हापासून मात्र लोकांची ये-जा कमी झाली.

देवांच्या आज्ञेने बुवांचा गृहस्थाश्रम सुरू झाला होता. सौ. अन्नपूर्णाबाईंना गर्भधारणा झाली. सर्वांना आनंद झाला. पौत्रमुख पाहावयाला मिळणार म्हणून रमाबाईंना आनंद झाला; पण त्यांनी सुनेला जाच करावयाचे आपले शस्त्र काही खाली ठेविले नाही. त्यावेळी रमाबाईंनी त्यांना खूपच त्रास दिला. एकदा तर त्या त्यांना असे म्हणाल्या की, " आता तुझे बाळंतपण कोणी करावयाचे ? माझी तर तुझे बाळंतपण करावयाची काही ताकद नाही. बाळंतपण ज्याचे त्यानेच करावे. "

माणगावमध्ये भरलेला सात वर्षांच्या आनंदाचा बाजार मोडण्याची वेळ आता येऊन ठेपली होती. भगवान् श्रीदत्तात्रेयांच्या माणगावमधील वास्तव्याचा काळ आता संपत आला होता. हजारो

शक्त आता निराधार होणार होते. माणगावमधून देव अंतर्धान पावून तेथील मंदिर आता रिकामे होणार होते. ज्या माणगावच्या रस्त्यावर दररोज शेकडोशे भाविकांच्या पायांची धूळ उडून आसमंत सदा धूसर दिसत होते ते रस्ते आता निर्जन होणार होते.

बदलणाऱ्या परिस्थितीची पहिली चाहूल श्री. नारोपंत उक्किडव्यांना प्रथम लागली.ती बुवांनासुद्धा कळली नाही.श्री.नारोपंत एक प्रकारे देवांचे लाडके होते. बुवांना माणगावमध्ये राहण्याचा मोह कधी नव्हताच. देवांच्या आग्रहास्तव ते सात वर्षे तेथे टिकून राहिले होते. त्यांची संन्यास घ्यावयाची इच्छा अत्यंत प्रबळ होती; पण आपणाला अगदी लवकर येथून जावे लागणार याची त्यांनाही अद्याप कल्पना नव्हती. देवांनी श्री. नारोपंतांना रात्री स्वप्नात असे सांगितले की, " बुवा माणगाव सोडून अन्यत्र जावयाची तयारी करीत आहेत. " हे स्वप्न पडताच श्री. नारोपंतांना राहवले नाही. उजाडताच ते माणगावला गेले आणि त्यांनी बुवांना असे विचारले की, " आम्हाला कोणाला न सांगता मध्येच माणगाव सोडण्याचे विचार आपल्या मनात चालू आहेत काय ? " त्यावेळी " तूर्त तरी आमचा तसा विचार नाही," असे जरी बुवांनी श्री. नारोपंताना सांगितले तरी त्यांच्या मनाचे समाधान झाले नाही; कारण त्यांना श्रीदत्तप्रभूंनीच तसे सांगितले होते. शेवटी आदल्या रात्री आपणास पडलेले स्वप्न त्यांनी बुवांना सांगितले व ते सावन्तवाडीस परत गेले.

देव तरी किती नाटकी पाहा ! माणगावला स्वतः येऊन राहावयाचे हे त्यांनी नाट्यमय रीतीने घडवून आणले. संसाराला कंटाळलेल्या श्री. वासुदेवशास्त्र्यांना त्यांनी आपल्या इच्छेखातर सात वर्षे माणगावला डांबून ठेवले. माणगावमध्ये सात वर्षे आनंदाचा बाजार भरला तोही देवांच्याच इच्छेने आणि आता प्रयाणसुद्धा त्यांनी नाट्यमय रीतीने बुवांना कळविले.

ज्या दिवशी सात वर्षे पूर्ण झाली त्या दिवशी पूजा आटोपताच "आज माणगाव सोडून निघून जावयाचे आहे." असे देवांनी बुवांना सांगितले; पण देवांच्या येथील वास्तव्याला सात वर्षे पूर्ण झाली नाहीत असा विचार बुवांच्या मनात आला. त्यावर देव असे म्हणाले की, "चांद्रमानाप्रमाणे आज सात वर्षे पूर्ण झाली आहेत. आज आपल्याला जावयाचे आहे."

देवांची ही आज्ञा ऐकताच बुवांच्या मनात असे आले की, ही आज्ञा करून देव जणू काही आपल्याला असे सुचवीत असावेत की, "काय हा बाजार मांडला आहेस ? हे सर्व टाकून दे आणि पुढच्या मार्गाला लाग. त्रितापाने पोळलेल्या जीवांना दुःखमुक्त करून ईश्वरभक्तीकडे लावावयाचे तुझे येथील कार्य संपले. निष्काम कर्मयोगाचा आदर्श तू लोकांसमोर ठेवला आहेस. निष्काम कर्मयोगाची पुढची पायरी संन्यास. आता तुला संन्यासधर्माचे आचरण करून लोकांसमोर ज्ञान आणि वैराग्याचा आदर्श ठेवावयाचा आहे. चल ऊठ ! हा पसारा येथेच टाक आणि पुढील मार्गाला लाग."

बुवा म्हणजे मूर्तिमंत वैराग्य होते. त्यांना पुन्हा काही सांगण्याची आवश्यकताच नव्हती. त्यांनी माणगाव सोडावयाची सर्व तयारी केली. त्यावेळी देवांनी त्यांना पुन्हा अशी आज्ञा केली की, "देव व कुटुंब यांना बरोबर घेऊन निघावे."

ही आज्ञा ऐकताच त्यांनी सौ. अन्नपूर्णाबाईंना देवांची आज्ञा सांगितली व माझ्या बरोबर येणार असल्यास तात्काळ चल असे ते तिला म्हणाले. बुवांचे हे म्हणणे ऐकताच एका क्षणाचीही वाट न पाहता त्या वैराग्यमूर्तीची ती तेजस्वी प्रभावळ त्यांच्याबरोबर जावयास निघाली. त्यावेळी ते तिला असे म्हणाले की, "तुझ्या अंगावर जे काही दागिने असतील ते काढून ठेव. एका मंगळसूत्रावाचून काहीही बरोबर घेऊ नकोस." बुवांनी असे सांगताच सौ.

अन्नपूर्णाबाईंनी आपल्या नाकातील एक लहान नथ व कानांतीलही एक लहान बुगडीजोड घरात काढून ठेवला.

त्यानन्तर बुवांनी कागलची एक व प्रवासातील एक अशा दोन श्रीदत्तमूर्ती, पंचायतनाचा संपुष्ट व एक तांब्या इतक्याच गोष्टी आपल्यावरोबर घेतल्या. सौ. अन्नपूर्णाबाईंनी एक लुगडे व एक धोतर एवढेच बरोबर घेतले. याशिवाय त्यांच्याजवळ काहीही नव्हते.

संसारात रमलेल्या लोकांना जीवनातील प्रत्येक घटनेकडे प्रापंचिक दृष्टिकोनातून पाहावयाचीच सवय असते. त्या घटनेचा आणखी काही वेगळा अर्थ असू शकेल याची त्यांना कल्पनाच नसते. एका अर्थी ते बरोबर आहे. अशी जाणीव होण्यासाठी लोकांच्या बुद्धीवर मायेचा जो पडदा आलेला असतो, तो क्षणभर तरी दूर व्हावयाला नको काय ? अनेक वेळा बालकृष्णाच्या दैवी अवताराची ओळख पटूनही गोकुळातील लोकांना तो नंदयशोदेचा पुत्र आहे असेच वाटे. यशोदेला कृष्णाच्या मुखात अखिल ब्रह्मांडाचे दर्शन झाल्यावर क्षणभर "हे रोकडे परब्रह्म आहे" असे वाटले; पण क्षणभरच ! ईश्वरी मायेच्या प्रभावाने तो आपला मुलगा आहे ही तिची भावना पुन्हा पूर्वीसारखी कायमच राहिली. श्रीसंत तुकाराममहाराजांनी वैकुंठ गमनापूर्वी आपल्या पत्नीला असे सांगितले की, "आवले ! आम्ही आज वैकुंठाला जाणार. तूही आमच्या बरोबर चल !" पण त्या भोळ्या स्त्रीला आपल्या "बैरागी" नवऱ्याचे हे नेहमीचेच उद्गार आहेत असे वाटले. त्याचप्रमाणे जेव्हा श्रीवासुदेवशास्त्र्यांनी मातुश्रींना वंदन करून "आम्ही दोघेजण देवांच्या सांगण्याप्रमाणे आज माणगाव सोडणार," असे त्यांना सांगितले, तेव्हा मुलाच्या बोलण्याचा अर्थ त्यांच्या ध्यानात आला नाही. उलट मुलाच्या बोलण्यावर त्या काही वेडेवाकडेही बोलल्या; पण बुवांनी तिकडे

लक्ष दिले नाही.

बुवांनी माणगाव सोडण्याची तयारी चालविली आहे ही बातमी माणगावमध्ये वाऱ्याच्या वेगाने पसरली. बुवा माणगाव सोडून जात आहेत ही गोष्ट कोणालाही प्रथम खरीच वाटेना. ज्या लोकांनी बुवांवर ते वयानें आपल्यापेक्षा लहान असूनही आपल्या पित्याप्रमाणे प्रेम केले होते, ते सर्व लोक आता आर्त होऊन श्रीदत्तमंदिराच्या रोखाने धावू लागले. यात्रा नसूनही आज माणगावातील सर्व लोक श्रीदत्तमंदिरात आले होते. पण लोकांच्या चेहऱ्यावर आज यात्रेचा आनंद नव्हता. आपल्या देवाच्या चिरवियोगाच्या दुःखाची आसवे त्यांच्या डोळयातून वाहात होती. बुवांची माणगाव सोडण्याची तयारी पूर्ण झाली होती. त्यांच्या काखेला संपुष्टात देव आणि हातात तांब्याभांडे होते. बुवांशिवाय माणगाव ही कल्पनाच करवत नव्हती. परंतु बुवा निघाल्यावर त्यांच्या मागे सौ. अन्नपूर्णाबाई खाली मान घालून पतीच्या पावलांवर पाऊल ठेऊन निघाल्या आणि त्यांच्या मागून अश्रूने भरलेल्या नेत्रांनी अलोट जनसमुदाय त्यांना गावाच्या सीमेपर्यंत पोहोचविण्यासाठी निघाला. ते दृश्य अत्यंत कारुण्यपूर्ण होते. श्रीशास्त्रीबुवांचा चेहरा तेवढा निर्विकार होता. "आम्ही जातो आमुच्या गांवा ! आमुचा रामराम घ्यावा" असे सांगून श्रीसंत तुकाराममहाराजांनी जेव्हा देहूगावाचा निरोप घेतला तेव्हा असाच कारुण्यपूर्ण प्रसंग निर्माण झाला असेल. त्यावेळी व्याकुळ झालेला असंख्य लोकांच्या नेत्रातून वाहणाऱ्या विरहाच्या अश्रूंचा पाट इंद्रायणीला जाऊन मिळाला असेल. आज लोकांच्या अश्रूंनी माणगावच्या वाटा भिजत होत्या.

श्रीशास्त्रीबुवा व सौ. अन्नपूर्णाबाई यांच्यासह सर्व मंडळी गावाच्या शिवेपाशी आली. तेथे थांबून बुवांनी "आपले येथे काहीही नाही, आता पुन्हा कधीही आपले इकडे येणे होईल असे वाटत

नाही," असे सर्वांना सांगून, "परत जा" असे सांगितले व एकदाही मागे वळून न पाहता ते पुढे चालू लागले.

अशा प्रकारे देवांनी आज्ञा दिल्यावर एका क्षणात सर्व वैभवाचा त्याग करून, आपले येथे काहीही नाही असे म्हणून, पुन्हा मागे वळूनही न पाहता सर्व सोडून जाण्याइतकी अपूर्व व लोकोत्तर गोष्ट दुसरी कोणती असू शकेल? "निर्मानमोहा जितसंगदोषा" म्हणजे मान अर्थात् अहंकार किंवा गर्व आणि मोह म्हणजे अविवेक हे दोन्ही दोष त्यांच्यापासून निघून गेले होते व संग म्हणजे आसक्ती हा दोष त्यांनी पूर्णपणे जिंकला होता. त्यामुळेच "जया पुरुषांचें कां मन। सांडोनि गेलें मोह मान। वर्षांतीं जैसें घन। आकाशातें॥ ज्ञानेश्वरी। १५·२८५॥" या न्यायानुसार सर्व जग दिपून जाईल अशी ही लोकोत्तर महापुरुषाची दिव्यता व भव्यता त्यांच्या ठिकाणी प्रकट झाली. श्रीस्वामीमहाराजांच्या जीवनातील ही सर्व घटनाच अत्यंत निरुपमेय व निस्तुल अशी आहे हेच खरे! त्यामुळेच त्यांचे सच्छिष्य श्रीमान् सिद्धयोगाचार्यवर्य महायोगी श्रीगुळवणीमहाराज "श्रीथोरल्यास्वामीमहाराजांच्या चरित्रातील ही माझ्या आवडीची व सर्वात् प्रिय अशी गोष्ट आहे," असे सांगत असत.

बुवांना जड अंतःकरणाने निरोप देऊन माणगावची मंडळी आपापल्या घरी गेली. इकडे बुवा व सौ. अन्नपूर्णाबाई सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास सावंतवाडीला श्री. उकिडवे याच्या श्रीदत्त-मंदिरात येऊन पोहोचले. श्री. नारोपंत धडधडत्या अंतःकरणाने बुवांची वाट पाहात होते. त्यांनी बुवांना मिठी मारली व त्यांचे अंग आपल्या अश्रूंनी भिजवून टाकले. बुवांनीही त्यांना प्रतिबंध केला नाही. मध्यान्ह झाली. बुवांनी नित्याप्रमाणे भिक्षा मागून आणली व स्वयंपाक केला. अन्नपूर्णाबाई श्री. नारोपंतांच्या घरी जेवावयास गेल्या. सर्वश्री सवनीस, आणावकर, आळवणी, वैद्य वगैरे मंडळी

भेटावयाला आली होती. बुवा त्यांचे सुहृद होते आणि इतर नाती नंतरची होती. आपल्या सुहृदाच्या वियोगाच्या दुःखाने त्या सर्वांची भूक नाहीशी झाली होती.

त्या दिवशी संध्याकाळी बुवा श्रीक्षेत्र नरसोबावाडीच्या वाटेला लागले. श्री. नारोपंतांनी व्यवस्थित काखेला लावता येईल असा, देव ठेवण्यासाठी, एक करंडा आपली आठवण म्हणून बुवांना दिला. त्यांच्या आईने सौ. अन्नपूर्णाबाईंना एक मुकटा व एक तांब्या आग्रहाने दिला. लोकांनी साश्रू नयनांनी बुवांचा निरोप घेतला. बुवा चालू लागले. लोकांचा पाय मागे वळेना. तरुण, म्हातारे, बायाबापड्या व मुले असे सर्व जण बुवांच्या मागून चालले होते. करुणरसही तेथे आटून गेला होता. एखादा नामदेव असता; तर त्याने तो प्रसंग "समाधीच्या अभंगा" सारखा काव्यात अमर करून ठेवला असता. पण श्री. नारोपंत कवी नव्हते. ते बुवांचे भक्त होते. सुहृद होते. बुवांच्या विरहाने त्यांचे हृदय विदीर्ण झाले होते. त्यांची प्रतिभा अश्रुरूपाने डोळ्यातून बाहेर पडत होती.

शके १८११ च्या पौष मासात बुवांनी माणगाव सोडले. भगवान् श्रीकृष्णाने गोकुळामध्ये बाललीला करून गोकुळवासीयांची हृदये कृष्णमय करून टाकली होती. गोकुळवासीच काय; पण तेथील वृक्षलता व रस्त्यावरील धूळसुद्धा कृष्ण कृष्ण असा घोष करीत असे. गोकुळातील गवळ्यांनी आणि गोपिकांनी आपले सर्वस्व कृष्णावरून ओवाळून टाकले होते. कृष्ण त्यांचा प्राण होता. बाललीला करून वासुदेव कृष्णाने वयाच्या दहाव्या वर्षी गोकुळ सोडले आणि तो गोकुळात परत आला नाही. श्रीवासुदेवशास्त्र्यांनी वयाची छत्तीस वर्षे माणगावात राहून तेथील लोकांची हृदये काबीज केली होती. आता आपला तेथील लीलांचा उपसंहार करून माणगावला पुन्हा कधीही न येण्यासाठी ते उत्तरेला गेले.

ज्या अनंतकोटी ब्रह्मांडनायकाच्या अधिष्ठानामुळे माणगावमध्ये सात वर्षे भक्तीची गंगा वाहात होती आणि ज्यांनी संन्यासधर्माचा उच्च आदर्श लोकांसमोर ठेवण्यासाठी सर्वस्वाचा त्याग करून आता उत्तरेला प्रयाण केले आहे, ते श्रीवासुदेवशास्त्रीटेंबेस्वरूप भगवान् श्रीदत्तात्रेय आम्हा आर्त मुमुक्षूजनांना अंतिम सत्याचा मार्ग दाखवोत.

अध्याय अकरावा

गृहस्थाश्रमाच्या उपसंहाराची पूर्वतयारी :–

देव निघून गेले आणि देव्हारा तेवढा मागे राहिला. देव येताना सात वर्षांची बोली करून माणगावला आले होते. आनंदाचे दिवस आले की, ते कधी संपतात ते कळत सुद्धा नाही. बुवांच्या निकट वर्तीयांना ठाऊक होते की, हा आनंदाचा काळ, ही दिवाळी फक्त सात वर्षेच टिकणार आहे. पण जेव्हा अखेरचा निरोप घ्यावयाचा निर्वाणीचा दिवस आला तेव्हा सर्वांना आश्चर्य वाटले की, ही सात वर्षे संपली तरी कधी ? एखाद्या सुखद स्वप्नातून दुःखद जाणिवेत जाग यावी तसे सर्वांना झाले. देव जाणारच होते; पण जेव्हा बुवासुद्धा गेले तेव्हा ते दुःख लोकांना सहन झाले नाही. लोकांनी बुवांमुळे देवांवर प्रेम केले होते; पण त्यांच्या दृष्टीने देव ही एक कल्पना होती. बुवांसाठी मात्र तो वस्तुस्थिती होती. बुवांच्या प्रेमाने, भक्तीने, भावपूर्ण नृत्याने, भजनाने व उत्कट पूजेने भारावून जाऊन त्यांनी आपला जीव बुवांवरून ओवाळून टाकला होता. त्यामुळे बुवांच्या विरहाचे दुःख त्याना असह्य झाले. श्रीदत्तमंदिरातील कागलची मूर्ती श्रीशास्त्रीबुवा घेऊन गेले. त्या मूर्तीबरोबर बुवांच्या सर्व लीला घडल्या होत्या. त्या मूर्तीने बुवांचे लाड केले होते

व प्रसंगी कठोर होऊन शिक्षाही केली होती. ती मूर्ती बुवांबरोबरच राहणार होती यात काय नवल ! आता मंदिरामध्ये फक्त उत्सव-मूर्ती राहिली. ही उत्सवमूर्तीच कागलच्या श्रीदत्तमूर्तीच्या जागी मंदिरात ठेवून श्रीस्वामीमहाराजांचे बंधू श्री. हरिभट हे पूजाअर्चा करीत असत. एखाद्या स्थानाचे महत्त्व त्या स्थानामध्ये वास करणाऱ्या महात्म्याशी निगडीत असते. तो महात्मा त्या स्थानात असेपर्यंतच त्या स्थानाचे महत्त्व असते; मात्र त्या महात्म्याबरोबर तेथील महात्म्यही जाते. हा इतिहास पुष्कळ ठिकाणी घडलेला आहे व आजही घडत आहे. माणगावमधून बुवा निघून गेल्यानंतर तेथील महात्म्यही हळूहळू कमी होऊ लागले. नेहमीची दर्शनार्थींची गर्दी ओसरू लागली. शनिवारच्या पालखीला येणाऱ्या लोकांचा उत्साह मावळू लागला व गर्दीही रोडावू लागली. त्यामुळे अखेर पालखी बंद करावी लागली. श्रीशास्त्रीबुवांच्या पश्चात् त्यांच्या हाताखाली तयार झालेले त्यांचे बंधू श्री. हरिभट देवांची अर्चना वगैरे करीत व सर्व व्यवस्था पाहत असत. देवालयाचे उत्पन्न घटू लागल्यावर गुरुद्वादशी, दत्तजयंती वगैरे उत्सव अगदी थोडक्यात, पाच दहा ब्राह्मण बोलावून करावे लागत. श्री हरिभटांनी अर्चना करण्याचे काम अखेरपर्यंत सांभाळले. पुढे श्रीस्वामीमहाराजांचा ब्रह्मावर्त येथे चातुर्मासानिमित्त मुक्काम असताना श्री. हरिभट त्यांना भेटा-वयाला गेले होते. त्यावेळी श्रीस्वामीमहाराजांनी त्यांना "येथेच श्रीगंगातीरी राहून देहाचे सार्थक करावे" असा उपदेश केला होता; पण श्री. हरिभटांच्या प्रारब्धामध्ये वेगळेच लिहिलेले होते. प्रापंचिक विवंचनेने त्यांना घरी आणले. तेवढ्यात मातुश्री रमा-बाईसुद्धा फार आजारी पडल्या व त्यांनी श्री. हरिभटांच्या मांडी-वर डोके ठेऊन देह ठेवला. अखेरपर्यंत त्यांची स्मृती जागृत होती. "माझा अंतकाळ जवळ आला आहे, सर्वांची जेवणे झाली ना ?"

अशी चौकशी करून त्यांनी देह ठेवला. मातुश्रीचे उत्तरकार्य अर्थात् श्री. हरिभटांनीच केले. पुढे काही वर्षांनी श्री. हरिभट वारले. त्यांची पत्नी सधवाच गेली होती. श्री. हरिभटांना चार पाच वर्षांचा एक मुलगा होता. तोही पुढे दोन वर्षांनी वारला. त्यानंतर श्री. हरिभटांचे जामात श्री. दत्तोपंत धुपकर हे मंदिराची सर्व व्यवस्था पाहात असत. ते माणगावला येऊन राहिले होते. देवस्थानाची व्यवस्था पुढे चांगल्या प्रकारे चालावी म्हणून त्यांनी देवस्थानचे विश्वस्तपत्र केले. पुढे श्रीस्वामीमहारांच्या भक्त, इंदूरच्या राणी इंदिरादेवी होळकर, यांच्याकडून देवळास वार्षिक स्थावर उत्पन्न मिळाले व मासिक मदतही होऊ लागली. जीर्ण झालेल्या मंदिराचा श्री. धुपकरांच्या हयातीत जीर्णोद्धार करण्यासाठी राणीने तीन हजार रुपये दिले होते. त्या रकमेतून जीर्णोद्धाराचे काम मंदिराच्या पायापर्यंत झाले होते. श्री. धुपकरांच्या मागून पंचमंडळी देवस्थानची व्यवस्था पाहत असत. श्री. धुपकरांचे कुटुंब त्यांच्यानंतर हयात होते. त्यांचे वास्तव्य बुवांच्या घरातच होते. ते घर मोडकळीस आल्यावर बुवांचे देव घेऊन श्री. धुपकरांचे कुटुंब धर्मशाळेत येऊन राहिले. राणीने पुन्हा सहा हजार रुपये खर्च करून देवळाचे बाकी काम पूर्ण करून घेतले व वैशाख शु १३ शके १८६० या दिवशी श्रीकाशीक्षेत्रनिवासी श्रीब्रह्मानंदसरस्वती यांच्याकडून मंदिरामध्ये श्रीदत्त, श्रीमदाद्यशंकराचार्य, श्रीसरस्वतीदेवी व प. प. श्रीटेंबेस्वामीमहाराज यांच्या मूर्ती वसविल्या. तसेच श्रीस्वामींचे जुने घर पाडून त्या ठिकाणी पक्के एक मजली घर बांधून दिले.

श्रीशास्त्रीबुवांच्या जीवनाचे एक पर्व संपले. आता दुसऱ्या पर्वाला सुरुवात होत होती. ब्रह्मचर्याश्रमापासून गृहस्थाश्रमात असेपर्यंत त्यांनी जी साधना केली, त्या साधनेमुळे कोकणाला "बुवा" मिळाले. बुवांमुळे माणगावला सात वर्षे भूस्वर्गाचा महिमा प्राप्त झाला. या

सात वर्षांमध्ये टाकीचे घाव सहन करून घडलेली बुवांची मूर्ती आता एका वेगळ्या रूपामध्ये आपल्या समोर येणार आहे. बुवा आत्ता-पर्यंत माणगावचे होते. आता "बुवां"चे श्रीस्वामीमहाराज होणार आहेत व ते साऱ्या महाराष्ट्राचे होणार आहेत; नव्हे ते अखिल भारताचे होणार आहेत. त्यांचे जीवन आता विश्वमय होणार आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा शेवटचा अत्यंत देदिप्यमान पैलू निर्माण होण्यासाठी आता शेवटचा टाकीचा घाव पडणार आहे. हा घाव त्यांच्या पत्नीच्या मृत्यूच्या रूपाने पडणार असून त्यानंतर अनेक पैलू असलेल्या तेजस्वी हिऱ्यासारखे त्यांचे व्यक्तिमत्व आपली आभा आसेतुहिमाचलापर्यंत पसरविणार आहे. त्यागाचा, वैराग्याचा, संन्यासधर्माचा असा एक आदर्श ते जगापुढे ठेवणार आहेत की त्या आदर्शाच्या तेजाने जगाचे डोळे दिपून जाणार आहेत. श्रीमदाद्य-शंकराचार्यांनंतर संन्यास धर्माचा एवढा उच्च आदर्श श्रीटेंबेस्वामी-महाराजांशिवाय दुसरा झाला नाही असे विद्वानांचे मत आहे. सनातन धर्माच्या नवजागरणासाठी श्रीमदाद्यशंकराचार्यांनी जी अनन्यसाधारण कामगिरी केली तशीच व तेवढीच उज्ज्वल कामगिरी प. प. श्रीटेंबेस्वामीमहाराजांनी केली.

सर्वश्री नारोपंत, रामभाऊ सवनीस, आणावकर वगैरे निकट-वर्तीयांना व हजारो भक्तांना दुःखाच्या सागरात लोटून देवांच्या आदेशाप्रमाणे श्रीशास्त्रीबुवा जेव्हा सपत्नीक नरसोबाच्या वाडीला जावयाला निघाले. त्यादिवशी आकाश ढगळलेले होते. वातावरणा-मध्ये एक प्रकारची उदासीनता भरलेली होती. एरवी सुस्वर गाणारे पक्षीसुद्धा आज स्तब्ध होते. जणू काही ते बुवांना असे म्हणत होते की. "जरा थांबा, आणखी काही दिवस थांबा. तुम्ही गेल्यावर आम्ही कोणत्या देवासाठी कूजन करावयाचे?" रस्त्याच्या दुतर्फाची झाडेसुद्धा शांत होती. आपले विरहदुःखाचे श्वास या

सत्पुरुषाच्या कानी पडून, ज्या महान् कार्यासाठी ते निघाले आहेत, त्या कार्यात अडथळा निर्माण न होवो असे त्यांना वाटत असावे.

संध्याकाळची वेळ होती. श्रीशास्त्रीबुवा एकेक पाऊल धीमेपणाने टाकीत आपला मार्ग आक्रमण करीत होते. त्यांच्या मागून सौ. अन्नपूर्णाबाई, पतीच्या पावलावर पाऊल टाकीत, आपल्या गर्भात वाढणाऱ्या आपल्या पतीच्या अंकुराचे चिंतन करीत चालल्या होत्या. स्त्रीच्या जीवनातील अत्युच्च सुख म्हणजे मातृपद प्राप्ती होय. ते सुख आता आपणाला प्राप्त होणार असून त्यापेक्षा आणखी कोणत्याही सुखाची आपणाला इच्छा नाही, असे त्यांना वाटत होते. मातृपद शिरी मिरवीत आपला देह पतिसेवेत झिजवावा, अशा तऱ्हेचे विचार त्यांच्या मनात येत असावेत.

या मार्गातील पहिला मुक्काम आजऱ्याला हनुमान मंदिरात पडला. श्रीवासुदेवशास्त्री माणगाव कायमचे सोडून चालले आहेत ही हकीकत श्री. आजरेकर बुवांना कळली तेव्हा त्यांनी ती निर्विकार मुद्रेने स्वीकारली. त्यांचेही जीवन विश्वमय झालेले होते. एक विश्वमय झालेले जीवन दुसऱ्या विश्वमय झालेल्या जीवनात मिळून गेलेले असताना व दोन्ही एकरूप झालेली असताना, कोणी कोणाच्या विरहाचा शोक करावयाचा ? ताटातूट नाही किंवा विरहही नाही. दोन्ही दिव्यात एकच ज्योत प्रज्ज्वलीत झालेली होती. दोहोंचे तेज एकच होते. आजऱ्याहून बुवा दुसऱ्या दिवशी पुढील मार्गाला लागले. श्रीक्षेत्र नरसोबाच्यावाडीला पोहोचेपर्यंत बुवा श्रीदत्तनामस्मरणात स्वतःला विसरून आजूबाजूच्या सृष्टीशी एकरूप होऊन चालले होते.

त्यांच्या या वृत्तीमध्ये विघाड करणारी एकच गोष्ट मार्गात घडली. घाटातून प्रवास चालला होता. घाटातील रस्त्यावरून सामानाची वाहतूक बैलगाडीतून होत असे. लांबचा पल्ला असल्यास

बैलगाड्या दहादहा, पंधरापंधराच्या तांड्याने जात असत; कारण रस्त्यावर हिंस्र श्वापदांची व चोराचिलटांची भीती असे घाटातील रस्ता अरुंद होता. बुवा या रस्त्यावरून जात असताना पुढे एक बैलगाड्यांचा तांडा चालला होता. बैलगाड्या वाट अडवून चालल्या असल्यामुळे बुवांना पुढे जाता येईना. त्यांच्या बरोबर रक्षणासाठी श्रीदत्तात्रेयांचे गण होते. ते या प्रकारामुळे क्षुब्ध झाले व त्यांनी समोरची एक गाडी उचलून फेकून दिली. त्यामुळे गाडी मोडली, बैलांना लागले व गाडीवानालाही दुखापत झाली. या प्रकारामुळे बुवांना फार वाईट वाटले व नरसोबाच्यावाडीला पोहोचताच देवांचे गण देवांच्या ताब्यात द्यावयाचे असे त्यांनी ठरविले.

दरमजल करीत उभयता पति-पत्नी श्रीकृष्णापंचगंगासंगमावरील त्रिभुवनैक पवित्र अशा श्रीक्षेत्र नरसोबावाडीला सुखरूप येऊन पोहोचले. बुवांना माहेरी आल्याचे समाधान झाले. देवांच्या आज्ञेने आता एक वर्षभर येथे राहावयाचे होते. आता वर्षभर पर्वणी होती. श्रीगोविंदस्वामी व श्रीमौनीस्वामी यांच्या संगतीमध्ये त्यांचे एक वर्ष जाणार होते. वाडीला पोहोचताच पतिपत्नीने कृष्णामाईच्या घाटावर हातपाय धुतले, देवदर्शन केले व पत्नीला श्रीनारायण-स्वामींच्या धर्मशाळेत ठेऊन बुवा श्रीगोविंदस्वामी व श्रीमौनीस्वामी यांच्या दर्शनाला गेले. त्या दोघा सत्पुरुषांना साष्टांग नमस्कार घालून, देवांच्या आज्ञेने आपण वाडीला सहकुटुंब आलो आहोत आणि देवांच्याच आदेशाप्रमाणे वर्षभर येथे राहाणार आहोत असे बुवांनी त्यांना सांगितले.

दुसऱ्या दिवसापासून वाडी येथील कार्यक्रमास सुरुवात झाली. बुवा दररोज कोरान्न भिक्षा मागून आणीत असत. ते तांब्यामध्ये तांदूळ व झोळीत जोंधळे घेत. त्या भिक्षेचा स्वयंपाक होऊन त्यावर नैवेद्यवैश्वदेव होत असे. श्रीगोविंदस्वामींच्या सहवासात

बुवांचे दिवस आनंदामध्ये जात होते. आपल्या जवळील शाळिग्राम व उपनिषदांच्या पोथ्या बुवांना द्याव्यात असे श्रीगोविंदस्वामींच्या मनात होते. त्यांनी तसे बुवांना सांगितल्यावर पत्नीचा प्रसूतिकाळ जवळ आला आहे तेव्हा जननाशौच संपल्यावरच आपण त्या वस्तू स्वीकारू असे बुवांनी त्यांना सांगितले.

पुढे सौ. अन्नपूर्णाबाई यथाकाळी श्री. गोखल्यांच्या ओवरीत प्रसूत झाल्या. त्यांना मुलगा झाला. पुत्र जन्माची वार्ता कळताच मुलाचे जातकर्म करण्यासाठी बुवा पुढे आले; पण टेंब्यांच्या वंशाचा हा दिवा मृत अवस्थेतच जन्माला आला होता. निर्माण होऊ घातलेला एक पाश अशा तऱ्हेनें तुटला. सौ. अन्नपूर्णाबाईंचे बाळंतपण दुर्गामावशीने केले. या दुर्गामावशी रमाबाईंच्या दूरच्या नातलग होत्या. श्री. गणेपंतांच्या मृत्यूनंतर काही दिवस त्या माणगावला रमाबाईंबरोबर राहात होत्या. पुढे देवाच्या सेवेला वाहून घेण्यासाठी त्या श्रीक्षेत्र नरसोबाच्यावाडीला येऊन राहिल्या होत्या. श्रीनारायणस्वामी ज्या जागेवर बसून संध्या करीत ती जागा दुर्गा मावशी दररोज झाडून, धुऊन साफ करून ठेवीत असत. हीच त्यांची सेवा होती. या सेवेमुळे श्रीदत्तप्रभू त्यांच्यावर प्रसन्न होते. देवांच्या कृपेने दुर्गामावशींना चांगले मरण आले. दुर्गामावशी जिभेच्या तिखट होत्या; पण त्या सेवाभावी होत्या. " माणगावला आईला त्रास देऊन आता हा येथे मला त्रास द्यावयाला आला आहे. यांचे कष्ट कोणी करावे, " असे त्या बुवांना उद्देशून नेहमी म्हणत असत. अर्थात् ही बोलणी सौ. अन्नपूर्णाबाईंसाठी असत; पण सौ. अन्नपूर्णाबाईंना याहीपेक्षा कठोर बोलणी ऐकून घ्यावयाची सवय झाली होती. मावशीच्या शब्दांमागे राग नसून जिव्हाळा आहे हे बुवांना ठाऊक असल्यामुळे मावशीच्या शब्दांकडे ते लक्ष देत नसत. नंतर बुवांनी श्रीब्रह्मा-नंदांच्या माडीवर आपले स्मार्ताग्नीकुंड स्थापिले व तेथे आपला

गृहस्थाश्रम सुरू केला. अथिती अभ्यागतांची गृहस्थाश्रमाला उचित अशी सेवा करून श्रीवासुदेवशास्त्री आपला काळ घालवीत होते.

त्या दिवसांमध्ये श्रीक्षेत्र नरसोवाच्यावाडीत श्री. लक्ष्मणशास्त्री दीक्षित नावाचे चारित्र्यसंपन्न ब्राह्मण राहत होते. श्रीवासुदेवशास्त्री भोजनोत्तर दुपारी श्री. लक्ष्मणशास्त्र्यांच्या घरी श्रीभागवत पुराण वाचण्यास जात. या श्री. लक्ष्मणशास्त्र्यांचा मुलगा नारायण हा आङ्ग्लविद्याविभूषित असूनही त्याला अकस्मात् वैराग्य प्राप्त झाले होते. तो एखाद्या तपस्व्यासारखा राहत असे. आपल्या मुलाला योग्य मार्गदर्शन करणारा गुरू लाभावा अशी श्री. लक्ष्मणशास्त्र्यांची इच्छा होती. असेच एकदा दुपारचे भागवत वाचन झाल्यावर श्री. लक्ष्मणशास्त्री श्रीवासुदेवशास्त्र्यांना असे म्हणाले की, "शास्त्री-बुवा ! आमचा नारायण अकाली वैराग्य धारण करून ऐहिक व्यवहारापासून अलिप्त राहत आहे. त्याला आपल्या स्वाधीन करावे अशी इच्छा आहे. या मुलाला आपल्यासारखा गुरू लाभला; तर त्याचा उद्धार होईल." श्रीवासुदेवशास्त्र्यांनी मुलाला पाहण्याची इच्छा व्यक्त केली. श्री. लक्ष्मणशास्त्र्यांनी मुलाला हाक मारून बाहेर बोलाविले. नारायणाने बाहेर येऊन श्रीवासुदेवशास्त्र्यांना नमस्कार केला. श्रीवासुदेवशास्त्र्यांनी नारायणाला पाहिले आणि त्याला ओळखले. धगधगत्या वैराग्याने त्याचा चेहरा उजळून गेला होता. श्री. रामकृष्ण परमहंसानी नरेन्द्राला प्रथमदर्शनीच ओळखले होते; पण ते तसे काही बोलले नाहीत. आपला माणूस सापडल्याचा त्यांना आनंद झाला होता. श्रीवासुदेवशास्त्र्यांनी नारायणाला पाहिले तेव्हा त्यांनाही असेच वाटले. आपला आध्यात्मिक वारस सापडल्याचा त्यांना आनंद झाला; पण त्यावेळी ते काही बोलले नाहीत. त्यांनी नारायणाचा शिष्य म्हणून आनंदाने स्वीकार केला.

श्रीवासुदेवशास्त्र्यांनी नारायणाला दुसऱ्या दिवशी ब्रह्मानंदांच्या

मठात भेटावयाला सांगितले. ज्याप्रमाणे श्रीशास्त्रीबुवांनी दृष्टी पडताच नारायणाला ओळखले त्याचप्रमाणे नारायणाच्या हृदया-मध्ये श्रीशास्त्रीबुवांच्या दर्शनाने गुरुभक्ती व गुरुप्रेम जागृत झाले. त्याला वाटले आपला उद्धारकर्ता आज आपणास भेटला. दुसऱ्या दिवशी सकाळी नारायण श्रीवासुदेवशास्त्र्यांच्या दर्शनासाठी ब्रह्मा-नंदांच्या माडीवर गेला. देवाच्या आणि सत्पुरुषाच्या दर्शनाला रिक्त हस्ते जाऊ नये म्हणून काही फळे घेऊन तो गेला होता. जणू काही समित्पाणि होऊन म्हणजे हातात फळांच्या समिधा घेऊन तो आपल्या उद्धारकर्त्या गुरूच्या दर्शनाला गेला होता.

ब्रह्मानंदांच्या मांडीवर नारायणाला पहिले दर्शन आपल्या गुरु-पत्नीचे झाले होते. सौ. अन्नपूर्णाबाईंना पाहताच आपली माताच दुसरे रूप घेऊन आपणासमोर उभी आहे असे नारायणाला वाटले. गुरुपत्नीला नमस्कार करून तो एका बाजूला उभा राहिला. श्रीवासुदेवशास्त्री आपल्या नित्यकर्मामध्ये होते. नारायणाची चाहूल लागल्यावर त्यांनी बाहेर येऊन त्याला बसावयाला सांगितले. गुरु-देवांच्या दर्शनाने नारायणाचे अष्टसात्त्विक भाव जागृत झाले होते. त्यावेळी त्यांनी त्याला असे विचारले की, "काय काय अध्ययन झाले आहे? सध्या कोणत्या ग्रंथाचे अध्ययन चालू आहे!" हा प्रश्न ऐकताच नारायणाने त्यांना असे सांगितले की, "तसे विशेष अध्ययन झालेले नाही. सध्या शिवगीतेवरील श्री. हंसराज यांनी केलेली वेदेश्वरी ही टीका वाचतो."

वेदेश्वरीच्या वाचनाने सर्व जग मिथ्या आहे अशी साधकाची भावना होते. नारायणामध्ये ही भावना दृढ झाली होती. त्याच-बरोबर गुरुकृपेशिवाय ब्रह्मज्ञान होणे शक्यच नाही, अशीही त्याची खात्री झाली होती. त्या दिवसापासून नारायणाच्या शिक्षणाला प्रारंभ झाला. श्रीवासुदेवशास्त्र्यांनी त्याला लघुवासुदेवमनन सांगून

आत्मज्ञानाचा उपदेश केला व क्रमाक्रमाने संध्योपासना, पूजा, ब्रह्मयज्ञ, वैश्वदेव वगैरे ब्रह्मकर्म शास्त्रशुद्ध रीतीने करावयाला शिकविले. त्याचप्रमाणे विष्णुसहस्रनाम, गीता, स्वशाखेचे उपनिषद, रुद्र, पुरुषसूक्त वगैरे सांगितले.

पुढं कालौघात नारायणाचे लग्न झाल्यावर त्याला स्मार्ताग्नी देऊन स्मार्ताग्नीहोम ठेवावयाला लावला व श्रीदत्ताची उपासना करावयाला शिकविले. श्रीदत्ताची उपसना सांगत असताना श्रीवासुदेवशास्त्र्यांचे अष्टसात्त्विक भाव जागृत झाले. आपल्या वडिलांनी आपणाला ज्यांच्या स्वाधीन केले ते आपले गुरुदेव थोर भगवद्भक्त आहेत हे पाहून नारायणाचेही हृदय भरून आले.श्रीवासुदेवशास्त्र्यांनी त्या अवस्थेमध्ये नारायणाला आलिंगन दिले व आपणामधील भक्तीचा तो उत्कट भाव त्याच्यामध्ये संक्रमित केला. यालाच शक्तिपात किंवा कृपा असे म्हणतात. श्रीसमर्थ रामदासस्वामीमहाराजांना भगवान् श्रीरामचंद्रांच्या कृपेचा लाभ अशाच प्रकारे झाला होता. श्री. शंकर कृष्ण देव यांनी लिहिलेल्या श्रीसमर्थ चरित्रातील पहिल्या खण्डात यासंबंधी त्यांनी असे लिहिले आहे की, "मग प्रभूने नारायणाला जवळ घेतले, कुरवाळले आणि त्याच्या हाती निजमुद्रांकित एक पत्र दिले. नारायणाची वृत्ती पालटली, सर्वांगाला कंप सुटला, जिभेची बोवडी वळली, घाम सुटला, तो कावरावावरा झाला. क्षणात हसे, क्षणात रडे, चकित होऊन क्षणात उड्या मारू लागे."

श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी सुद्धा अर्जुनाला भगवान् श्रीगोपालकृष्णनाथांकडून ही शक्तिपातायुक्त कृपा कशी प्राप्त झाली याचे पुढीलप्रमाणे फार सुंदर वर्णन केले आहे.

मग सांवळा सकंकणु । बाहु पसरोनि दक्षिणु ।
आलिंगिला स्वशरणु । भक्तराजु तो ।।१८.१४१८।।
न पवता जयातें । काखे सूनि बुद्धितें ।

बोलणें मागौतें। वोसरलें ॥१४१९॥
ऐसें जें कांहीं एक। बोला बुद्धीसिही अटक।
तें द्यावया मिष। खेवाचें केलें ॥१४२०॥
हृदया हृदय येक जाले। ये हृदयींचे ते हृदयीं घातलें।
द्वैत न मोडितां केलें। आपणाऐसें अर्जुना ॥१४२१॥
दीपें दीप लाविला। तैसा परिष्वंगु तो जाला।
द्वैत न मोडिता केला। आपणपें पार्थु ॥१४२२॥

श्रीशास्त्रीबुवांच्या अंगसंगामुळे नारायणाची काय अवस्था झाली त्याचे वर्णन कसे करता येणार ? ; कारण त्या स्पर्शाने नारायणाचे देहभानच नष्ट झाले होते. त्याक्षणी तो तदाकार झाला होता.

दोघेही गुरुशिष्य या अध्ययन–अध्यापनामध्ये एवढे रंगून जात की, वेळ कसा निघून गेला हे त्यांना कळत नसे. नारायण आता जेवणापुरताच घरी जात असे. कधीकधी तो गुरुगृहीच जेवण्यासाठी थांवत असे. अशावेळी श्रीवासुदेवशास्त्री त्याला आपल्या पंगतीला घेऊन बसत. अध्ययनातून फावल्यावेळी नारायण गुरुपत्नीला स्वयंपाकासाठी बाजारातून वस्तू आणून देणे वगैरे कामे करीत असे. पुष्कळदा देवांचे पुजारी व श्रीगोविंदस्वामी वगैरे मंडळी श्रीवासुदेवशास्त्र्यांकडे जेवावयाला येत असत. अशा वेळी त्यांची सुद्धा सेवा करण्याची संधी नारायणाला मिळत असे. उत्सवांच्या वेळी देवांची हलकीसलकी कामे नारायण करीत असे.

नारायणाच्यारूपाने श्रीवासुदेवशास्त्र्यांना योग्य असा शिष्य मिळाला होता. जी ध्येयधोरणे उराशी बाळगून त्यांच्या पूर्तीसाठी त्यांनी आत्तापर्यंतचे आयुष्य खर्ची घातले होते, ती आपल्या निष्ठेची, धर्मावरील अढळ श्रद्धेची आणि वेद व शास्त्रे यांवरील नितान्त विश्वासाची पताका पुढे चालविण्यास हा लायक शिष्य आहे हे श्रीवासुदेवशास्त्र्यांनी ओळखले होते. त्यांनी नारायणाला जे जे

शिकविले ते ते सर्व त्याने विनाविलंब आत्मसात केले. ते पाहून श्रीवासुदेवशास्त्र्यांना फार समाधान वाटले; कारण "असाच शिष्य मिळावा ! दृष्टी पडता कृतार्थ व्हावा" ही उक्ती नारायणाच्या बाबतीत अगदी यथार्थ होती.

अशा तऱ्हेने हे आनंदाचे दिवस जात होते. श्रीक्षेत्र नरसोबाच्या-वाडीमध्ये भगवान् श्रीदत्तात्रेय आता श्रीगोविंदस्वामी, श्रीमौनी-स्वामी व श्रीवासुदेवशास्त्री या त्रिमूर्तींच्या रूपाने वावरत होते. लोक त्यांना आपली सुख दुःखे सांगत होते. असे दिवस जात असले; तरी आनंद काय किंवा दुःख काय, त्यालाही कोठेतरी मर्यादा असतेच. श्रीगोविंदस्वामी आजारी पडले. आपला समाधिकाळ जवळ आला आहे असे पाहून त्यांनी श्रीशास्त्रीबुवांना बोलावून त्यांना दशोपनिषदे सांगितली व त्या पोथ्या आणि आपल्या जवळील पूजे-तील शाळिग्राम त्यांना दिला. त्यानंतर एकदा त्यांनी पडल्या पडल्या आपल्याला "मनन" ऐकवावे असे श्रीशास्त्रीबुवांना सांगितले. त्यांचीच पोथी घेऊन श्रीशास्त्रीबुवांनी श्रीगोविंदस्वामींना मनन वाचून दाखविले. त्यावेळी श्रीगोविंदस्वामींनी या ग्रंथातील रहस्यार्थ श्रीशास्त्रीबुवांना समजावून सांगितला. मनन ऐकण्याचे निमित्त करून श्रीस्वामींना आपणास मननाचा रहस्यार्थ सांगावयाचा होता हे श्रीशास्त्रीबुवांनी ओळखले. मननाची पोथी श्रीशास्त्री-बुवांना देऊन श्रीगोविंदस्वामींनी त्यांना पूर्ण आशीर्वाद दिला. आपणास उपनिषदांचा रहस्यार्थ समजावून सांगणारा व प्रेमाने पूर्णाशीर्वाद देणारा असा ब्रह्मनिष्ठ गुरू लाभला म्हणून श्रीशास्त्री-बुवांनी श्रीगोविंदस्वामींना साष्टांग नमस्कार घालून आपली गुरु-निष्ठा व्यक्त केली.

श्रीगोविंदस्वामी निर्याणापूर्वीची आवराआवर करीत होते. त्यांच्या समाधिकाळाच्या पूर्व दिवशी देवांनी श्रीशास्त्रीबुवांना

स्वप्नात असे सांगितले की, "गोविंदस्वामी उद्या देह सोडणार आहेत." त्या दिवशी श्रीशास्त्रीबुवा श्रीगोविंदस्वामींच्या अगदी निकट वसून राहिले. जराही दूर गेले नाहीत. देवांनी सांगितल्या-प्रमाणे त्या दिवशी श्रीगोविंदस्वामींचे निर्याण झाले व बिन्दू सिंधू-मध्ये विलीन झाला. ते निजरूपी जाऊन मिळाले. अशा तऱ्हेने एका थोर सत्पुरुषाच्या जीवनाचा पट गुंडाळला गेला. वाडीमध्ये कित्येक वर्षे लीला करून या लीला-पुरुषोत्तमाने आज सर्व वाडीला दुःख सागरात लोटले. श्रीमौनीस्वामींसारख्या जीवन्मुक्तालाही आपला विरहशोक लपविता आला नाही. श्रीगोविंदस्वामी संन्यासी होते. संन्यासधर्माच्या नियमाप्रमाणे त्यांच्या देहाला कृष्णामाईच्या निर्मळ डोहात जलसमाधी देण्यात आली. श्रीमौनीस्वामींच्या इच्छेप्रमाणे श्रीवासुदेवशास्त्र्यांनी श्रीगोविंदस्वामींचा समाराधनाविधी केला. यानंतर संन्यास घेण्याचे विचार श्रीवासुदेवशास्त्र्यांच्या मनात तीव्रतेने येऊ लागले. यापूर्वी देवांनी त्यांना संन्यास घ्यावयाला एक वर्षाचा अवधी आहे असे सांगितले होते व श्रीगोविंदस्वामीसुद्धा तसेच म्हणाले होते.

एक दिवस श्रीमौनीस्वामी श्रीवासुदेवशास्त्र्यांना असे विचारू लागले की, "बुवा! आज तुमच्याकडे कोणी स्वामी भिक्षेला येणार की नाही?" तसे काहीच पूर्वनियोजित नसल्यामुळे "आज कोणी स्वामी भिक्षेला यावयाचे नाहीत. तसे आज कोणाला सांगितलेले नाही," असे बुवा त्यांना त्यावेळी म्हणाले. "आज सर्वच स्वामी तुमच्याकडे भिक्षेला येणार आहेत, लवकर स्वयंपाक करा." असे श्रीमौनीस्वामींनी त्यांना सांगितले. श्रीमौनीस्वामींची वृत्ती बालक-सदृश होती. बोलणेही तसेच होते; पण आपल्याबरोबर श्रीमौनी-स्वामी विनोद करतात असे बुवांना वाटले नाही. ते लगेच भिक्षेला

बाहेर पडले. त्यांनी भिक्षा आणली आणि स्वयंपाक करून ते अतिथींची वाट पाहू लागले. त्या दिवशी गावात पुजारी मंडळींना अशौच आल्यामुळे सर्व स्वामी श्रीवासुदेवशास्त्र्यांकडे भिक्षेला आले. त्यावेळी श्रीमौनीस्वामी सकाळी आपणास जे म्हणाले त्याचा अर्थ त्यांच्या लक्षात आला.

बुवांचा एक वर्षाचा काळ वाडीमध्ये आनंदात गेला. दररोज कृष्णेमध्ये स्नान, देवदर्शन, पादुकांना प्रदक्षिणा, श्रीगोविंदस्वामी व श्रीमौनीस्वामी या सत्पुरुषांचा सहवास व नारायण दीक्षितांना शिकविणे यामध्ये त्यांचा वेळ जात होता. यापैकी श्रीगोविंदस्वामी काही दिवसांपूर्वी समाधिस्थ झाले होते. वर्षाचा काळ संपत आला हे बुवांना कळले सुद्धा नाही; पण देवांनी कालगणना ठेवली होती. वर्ष संपताच देवांनी बुवांना वाडी सोडून उत्तरेकडे जाण्याची आज्ञा दिली. बुवांनी निघण्याची तयारी केली.

ही बातमी लोकांना समजली. वर्षभरामध्ये बुवांनी वाडीकरांची मने आपलीशी करून घेतली होती. लोक श्रीगोविंदस्वामींचा चिरवियोग नुकताच कुठे विसरत होते. आता हा दुसरा आघात होत होता. श्रीशास्त्रीबुवांचे वाडीला प्रथमच पाय लागले त्यावेळचे श्रीगोविंदस्वामींचे भाकित खरे ठरले होते. श्रीवासुदेवशास्त्र्यांनी आपल्या व्यक्तिमत्वाचा ठसा श्रीक्षेत्र नरसोबाच्यावाडीवर कायमचा उठविला होता; पण श्रीवासुदेवशास्त्र्यांच्या ठिकाणी मात्र कोणाही व्यक्तिबद्दल अथवा स्थानाबद्दल जखडून राहण्याएवढे ममत्व जडले नाही. ज्या निर्विकार मनाने ते माणगावचा सात वर्षांचा आनंदाचा बाजार मोडून वाडीला आले होते त्याच निर्विकार मनाने आता ते वाडी सोडून जावयाची तयारी करू लागले. श्रीक्षेत्र नरसोबाची-वाडी या क्षेत्राबद्दल त्यांच्या मनामध्ये नितान्त श्रद्धा होती; पण त्यांचा जीव तेथे अडकून पडला नव्हता. वाडीकरांचा जीव मात्र

श्रीशास्त्रीबुवांमध्ये गुंतून राहिला होता. सध्यातरी काही दिवस बुवांनी वाडी सोडू नये म्हणून लोकांनी आग्रह धरला; पण "देवांच्या आज्ञेबाहेर जाता येत नाही," असे बुवांनी त्यांना समजावून सांगितले. शेवटी सर्वांनी श्रीमौनीस्वामींना अशी विनंती केली की, त्यांनी श्रीशास्त्रीबुवांना काही दिवस वाडीमध्ये राहण्याची गळ घालावी. लोकांच्या समाधानासाटी " ठीक आहे, मी त्यांना जाऊ नका असे सांगतो, " असे श्रीमौनीस्वामी म्हणाले; पण त्यांना ठाऊक होते की, भगवान् श्रीदत्तात्रेयांची आज्ञा मोडता येणार नाही.

वाडीचा निरोप घ्यावयाची तयारी झाल्यावर श्रीशास्त्रीबुवा श्रीमौनीस्वामींच्या दर्शनाला गेले. त्यावेळी श्रीमौनीस्वामींनी त्यांना असे विचारले की, " काय बुवा ! आता कोठे जाणार ?" हा प्रश्न ऐकताच बुवांनी त्यांना असे सांगितले की, " कोल्हापुरला जाणार आहे. " त्यांचे हे उत्तर ऐकून श्रीमौनीस्वामी त्यांना असे म्हणाले की, " ठीक आहे; पण कोल्हापुरला दोन दिवसांपेक्षा अधिक काळ राहू नका म्हणजे झाले. " हे त्यांचे म्हणणे ऐकताच ज्याअर्थी पुन्हा वाडीला परत या असे श्रीमौनीस्वामींनी सांगितले नाही त्याअर्थी श्रीस्वामींच्या मुखाने ही देवांचीच आज्ञा झाली आहे हे पाहून त्यांना फार बरे वाटले.

त्यानंतर श्रीपादुकांना वंदन करून व त्यांची प्रार्थना करून ते वाडीहून निघाले बरोबर सौ. अन्नपूर्णाबाई होत्याच. प्रवास करीत ते दोघंजण कोल्हापुरला पंचगंगेच्या घाटावर येऊन पोहोचले.

बुवांचे शिष्य श्री. नारायण दीक्षित वाडीतच राहिले. श्री. नारायण दीक्षितांना आपले प्रतिनिधी म्हणून वाडीमध्ये ठेवून बुवा उत्तरेकडे निघून गेले मध्यंतरीच्या काळात गुरूकडून घेतलेले ज्ञान पूर्णपणे पचवून श्री. नारायण दीक्षित गुरूने घालून दिलेल्या आचारा-प्रमाणे वागू लागले. त्यांच्या या आचरणामुळे वाडीतील लोक त्यांना

"दुसरे टेंबेस्वामी" असे मानू लागले व त्यांचा आदर करू लागले. वडिलांच्या मृत्यूनंतर श्री. नारायण दीक्षित आपल्या गुरूंची पत्रद्वारे अनुज्ञा घेऊन शुक्लवृत्तीवर राहू लागले. त्यावेळी श्रीस्वामीमहाराज उत्तरेमध्ये संचार करीत होते. त्यांनी श्री. नारायण दीक्षितांना पाठविलेल्या पत्रामध्ये त्यावेळच्या जनरीतीचे मार्मिक वर्णन केले आहे.

"आपली इच्छा चांगली आहे. शुक्लवृत्ती घ्यावी. आमची परवानगी आहे. पण भिक्षा मागू लागल्यानंतर ग्रामस्थ मंडळी तुम्हाला हसतील. ते सहन करण्याची ताकद असेल तर शुक्लवृत्ती धरावी. जे प्रथम हसतील तेच लोक पुढे स्तुतीही करतील. दोन्ही समानच मानावी. किंवा निंदा ही सुधाच होय व स्तुती हे विष होय असे समजून स्वहिताला लागावयाचे धैर्य असल्यास इच्छेप्रमाणे करा. आमचा पूर्ण आशीर्वाद आहे."

पुढेपुढे श्री. नारायण दीक्षितांची वृत्ती जशी गुरुदेवांकडून घेतलेल्या साधनेमध्ये रंगून जाऊ लागली तशी शुक्लवृत्तीही त्यांना जमेना. तेव्हा शेवटी ते अयाचित वृत्तीवर राहू लागले. शके १८२६ च्या सुमारास वाडीमध्ये जी प्लेगची साथ सुरू झाली त्या साथीमध्ये श्री. नारायण दीक्षितांची पत्नी सौ. वाराणसी व मुलगा बळी पडल्यावर वयाच्या अडतीसाव्या वर्षी कुरुंदवाडच्या घाटावर राहणारे तपस्वी ब्राह्मण श्रीदत्तभटजी यांच्याकडून त्यांनी संन्यास घेतला.

यस्यास्ति माहुरे निद्रा निवासः सिंहपर्वते ।
प्रातःस्नानं च गंगायां ध्यानं गंधर्वपत्तने ।।
कुरुक्षेत्रे चाचमनं धूतपापेश्वरे तथा ।
विभूतिधारणं प्रातःसंध्या च करहाटके ।।
कोलापुरेस्य भिक्षा च पांचालेऽपि च भोजनं ।
तिलको विठ्ठलपुरे तुंगापानं दिने दिने ।।

पुराणश्रवणं यस्य नरनारायणाश्रमे ।
विश्रामो रैवते सायंसंध्या पश्चिमसागरे ॥

असा ज्यांचा दैनंदिन कार्यक्रम आहे ते भगवान् श्रीदत्तात्रेय श्रीवासुदेवशास्त्र्यांच्या प्रेमामध्ये सापडून सात वर्षे माणगावला राहिले. यापुढे आपल्या दैनंदिन कार्यक्रमात खंड पडू नये म्हणून देव आता उत्तरेला त्या त्या ठिकाणाकडे जावयाला निघाले आहेत. दक्षिणेतील आपली लीला संपवून आता भक्तिप्रेमाची लाट उत्तरेला घेऊन निघालेले भगवान् श्रीदत्तात्रेयस्वरूप श्रीवासुदेवानंदसरस्वती-टेंबेस्वामीमहाराज आपणा सर्व भक्तवृंदांचे कल्याण करोत.

अध्याय बारावा

गृहस्थाश्रमाचा उपसंहार आणि संन्यासाश्रमाचा स्वीकार--

श्रीवासुदेवशास्त्र्यांना माणगावचे लोक बुवा म्हणत, श्रीक्षेत्र नर-सोबाच्यावाडीतील पुजारी त्यांना वासुदेवशास्त्री किंवा शास्त्रीबुवा म्हणत आणि श्रीगोविंदस्वामी व श्रीमौनीस्वामींसारखी निकटवर्ती मंडळी त्यांना बुवा म्हणूनच संबोधित; पण श्रीक्षेत्र नरसोबाची-वाडी सोडल्यावर श्रीवासुदेवशास्त्री व सौ. अन्नपूर्णाबाई हे इतरांना एक अनामिक दांपत्य होते. त्यांना ओळखणारे कोणी नव्हते. शरीराने कृश, तप्तताम्रवर्णाचे, एक मळकट पंचा नेसलेले, तशाच प्रकारचे उत्तरीय परिधान केलेले आणि काखेला देवांचा संपुष्ट अशी ही श्रीवासुदेवशास्त्र्यांची मूर्ती तशी कोणाच्याही नजरेत भरणारी नव्हती. सौ. अन्नपूर्णाबाईंच्या अंगावर एक विटलेले लुगडे— कदा-चित् अनेक ठिकाणी फाटलेलेही असेल आणि डाव्या काखेला जुन्या धोतरात गुंडाळलेले एक गाठोडे होते. त्या खाली मान घालून, थोड्या अडखळत, नवऱ्याच्या पावलावर पाऊल टाकीत चालल्या होत्या. कोणाच्याही नजरेत न भरणारे असे ते दांपत्य होते. पण जर का

कोणी श्रीशास्त्रीबुवांच्या चेहऱ्याकडे क्षणभर निरखून पाहिले असते; तर त्यांना साधेपणाच्या राखेखाली ज्ञान आणि वैराग्य यांचा धगधगता अग्नी दिसून आला असता.

दुसऱ्या दिवशी सकाळी श्रीवासुदेवशास्त्री कोल्हापूरच्या पंचगंगेच्या घाटावर आन्हिक करीत बसले होते. बाजूला सौ. अन्नपूर्णाबाई बसल्या होत्या. त्यांचा चेहरा विचारमग्न होता. त्यांच्या मनात कोणते विचार येत होते ? माणगावमधील आपल्या घराचे, श्रीदत्तमंदिराचे, सग्या-सोयऱ्यांचे, आपल्या मृत पुत्राचे की पुढील अनिश्चित भविष्य काळाचे ? माणसाचे मन आरशासारखे असते; तर किती छान झाले असते ! त्याच्या मनात येणारा प्रत्येक विचार या आरशात दिसला असता. सौ. अन्नपूर्णाबाईंच्या मनाच्या आरशात वरीलपैकी कोणताचविचार न दिसता तेथे अंधुक व अस्पष्ट अशी एका अवलियाची आकृती दिसली असती. कोल्हापुरात त्यावेळी श्री. कुंभारस्वामी म्हणून एक सत्पुरुष राहत होते. अवलियाच होते ते ! सौ. अन्नपूर्णाबाईंनी त्यांच्याबद्दल ऐकले होते. त्या सत्पुरुषांचे दर्शन व्हावे असे त्यांना यावेळी वाटत होते. बुवा आपल्या आन्हिकामध्ये निमग्न होते. एवढ्यात कोठूनतरी एक वेड्यासारखे दिसणारे गृहस्थ सौ. अन्नपूर्णाबाईंच्या रोखाने धावत आले आणि काय घडते आहे याची त्यांना कल्पना येण्यापूर्वीच त्यांनी बाईंच्या हातातील तांब्या हिसकावून घेऊन ते तसेच नदीवर गेले व तांब्या भरून नदीचे पाणी घटाघटा पिऊ लागले. या अकस्मात् घडलेल्या प्रकारामुळे अवाक् होऊन अन्नपूर्णाबाई त्यांच्याकडे पाहतच राहिल्या. एवढ्यात तांब्या घेऊन ते परत आले व तो तांब्या अन्नपूर्णाबाईंच्या हातात देऊन ते आले तसे पळत निघून गेले. "ते कुंभारस्वामी होते," असा जेव्हा श्रीशास्त्रीबुवांनी खुलासा केला तेव्हा सकाळी आपल्या मनात आल्याप्रमाणे श्री. कुंभारस्वामींनी आपली इच्छा

ओळखून आपण स्वतःच येथे येऊन आपल्याला दर्शन दिले हे पाहून सौ. अन्नपूर्णाबाईंना अत्यंत समाधान व आनंद वाटला.

आन्हिक उरकून श्रीशास्त्रीबुवा श्रीमहालक्ष्मी देवीच्या दर्शनाला गेले. श्रीमहालक्ष्मी त्यांची कुलदेवता होती. श्रीदेवीला साष्टांग नमस्कार घालून त्यांनी तिची स्तुती केली. सौ. अन्नपूर्णाबाईंनी देवीला हळद-कुंकू वाहिले. श्रीशास्त्रीबुवा दोन दिवस देवीच्या धर्मशाळेत राहिले. श्रीमौनीस्वामींनी कोल्हापूरमध्ये दोन दिवसांपेक्षा जास्त राहू नकोस अशी त्यांना आज्ञा केली होती. त्यामुळे श्रीशास्त्रीबुवा तेथे अधिक काळ न थांबता भिलवडी गावाला जावयाला निघाले. भिलवडीला, श्रीगुरुचरित्रात उल्लेख असलेले, श्रीभुवनेश्वरी देवीचे मंदिर आहे. कृष्णानदीच्या दक्षिण तीरावर भिलवडी गाव व उत्तरेला श्रीक्षेत्र औदुंबर आहे. श्रीदेवीचे दर्शन घेऊन श्रीवासुदेवशास्त्री पैलतीराला औदुंबर क्षेत्री श्रीदत्तपादुकांचे दर्शन घ्यावयाला गेले. श्रीक्षेत्र औदुंबर व श्रीक्षेत्र नरसोबाचीवाडी या दोन्हीं रम्य ठिकाणी दत्तावतार प. प. श्रीमन्नृसिंहसरस्वतीस्वामीमहाराजांनी तपश्चर्या केली होती. श्रीक्षेत्र औदुंबर येथे कृष्णानदीला खालच्या भागात छोटेसे धरण बांधल्यामुळे भरपूर पाणी राहत असल्यामुळे व दुतर्फा दाट झाडी असल्यामुळे हा परिसर अत्यंत रमणीय झाला आहे.

श्रीक्षेत्र औदुंबरला श्रीशास्त्रीबुवांनी मुक्काम केला नाही. ते पंढरपूरच्या वाटेला लागले. श्रीवासुदेवशास्त्र्यांनी कधीही कोणत्याही प्रकारच्या वाहनातून प्रवास केला नाही. पुढे संन्यास घेतल्यावर त्यांना वाहन निषिद्धच होते. त्यांचा सर्व संचार पायीच होत असे. सौ. अन्नपूर्णाबाई सोबत असतानासुद्धा ते पायीच प्रवास करीत होते. त्यांच्या बरोबर चालताना सौ. अन्नपूर्णाबाईंना किती कष्ट पडत असतील याची आपण कल्पना करू शकतो. श्रीशास्त्रीबुवांची

चाल जलद होती, असे ज्यांनी त्यांना पाहिले होते, अशा महाभागांनी नमूद करून ठेवले आहे. सौ. अन्नपूर्णाबाई एका पायाने साधारण अधू होत्या. त्यांना बुवांबरोबर अनवाणी चालणे फार कठीण जात असेल. सौ. अन्नपूर्णाबाईंना मात्र हे कष्ट कधी जाणवले नाहीत. आपल्या स्वामींच्या पावलावर पाऊल टाकून आपण चाललो आहोत यात त्याना आनंद होत होता. आता त्या माणगावमध्ये सासूची बोलणी खाणाऱ्या साध्याभोळ्या सौ. अन्नपूर्णाबाई राहिल्या नव्हत्या; तर आता त्या एका सत्पुरुषाच्या अर्धांगिनी होत्या.

मजल दरमजल करीत ते दोघेजण श्रीक्षेत्र पंढरपूर येथे येऊन पोहोचले. पंढरपूर हे चंद्रभागानदीच्या उत्तर तीरावर वसलेले क्षेत्र आहे. हे महायोगाचे अर्थात् सिद्धयोगाचे पीठ आहे. एकाहून एक श्रेष्ठ अशा भगवद्भक्तांच्या पायधुळीने पवित्र झालेल्या चंद्रभागेच्या वाळवंटातील वाळूच्या कणाकणांमध्ये पांडुरंगाची भक्ती भरून राहिली आहे. येथील हवासुद्धा स्वर्गातील हवेशी स्पर्धा करणारी असल्यामुळे हे तीर्थक्षेत्र भूवैकुंठच आहे असे या क्षेत्राचे वर्णन करण्यात आले आहे. विठ्ठलाच्या भक्तीने वेड्या झालेल्या भक्तांचे तेथं पाय लागताच त्यांना भक्तीचे अधिकच भरते येऊन ते देहभान विसरतात. संतश्रेष्ठ श्रीज्ञानदेव, श्रीनामदेव, श्रीचोखामेळा, श्रीगोराकुंभार, श्रीसावतामाळी व अशा कितीतरी भाग्यवान् संतांनी पंढरीची भूमी पवित्र केली आहे. पंढरपूरच्या वाळवंटावर पाऊल टाकताच श्रीशास्त्रीबुवांना या सर्व संतांना उराउरी भेटल्याचा आनंद झाला. चंद्रभागेमध्यं स्नान करून ते पांडुरंगाच्या दर्शनाला गेले. त्या " समचरणांवर " मस्तक ठेवून दोघेही पतिपत्नी धन्य झाली. पांडुरंगाचे दर्शन घेऊन श्रीशास्त्रीबुवा मंदिराबाहेर पडले तेव्हा महाद्वारामध्ये एक ब्राह्मण त्यांना देवाचा प्रसाद म्हणून डाळं देऊ लागला. श्रीशास्त्रीबुवांनी तो प्रसाद घ्यावयाचे नाकारले; तेव्हा

सौ. अन्नपूर्णाबाई त्यांना असे म्हणाल्या की, "हा प्रसाद आहे; पाहिजे तर आता खाऊ नका; पण तो घेऊन बांधून ठेवा." त्यांच्या सांगण्याप्रमाणे श्रीशास्त्रीबुवांनी तो प्रसाद फडक्यात बांधून ठेवून दिला. मात्र त्यांनी तो ग्रहण केला नाही.

उभयतांनी एका धर्मशाळेत मुक्काम केला होता. रात्री स्वप्नात पांडुरंगाने येऊन त्यांना असे विचारले की, "आमचा प्रसाद तुम्ही का ग्रहण केला नाही?" हे ऐकताच बुवा असे म्हणाले की, "तो प्रसाद बाजारच्या भाजलेल्या डाळयांचा होता. असे बाजारातील ओले करून भाजलेले डाळे ब्राह्मणाने खाऊ नये असे शास्त्राने सांगितले असून, हे शास्त्र आपणच निर्माण केले आहे. आम्ही ते पाळतो. आपल्या शास्त्र पालनासाठी आपल्या हातच्या प्रसादाचा अवमान करावा लागत आहे याबद्दल क्षमा असावी; पण शास्त्रपालनाचे ब्रीद आम्ही सोडणार नाही." "बरे तर! नका खाऊ." असे म्हणून देव अदृश्य झाले. सकाळी जागे झाल्यावर बुवांनी प्रसादाची पुरचुंडी शोधली; पण ती नाहीशी झाली होती. देवांनी आपला प्रसाद परत नेला होता.

अशा प्रकारे श्रीस्वामीमहाराजांनी उभ्या आयुष्यभर कटाक्षाने व काटेकोरपणाने शास्त्र परिपालन केले. या बाबतीत त्यांनी माणसांशी तर नाहीच नाही; परतु देवांशीही कधी तडजोड केली नाही आणि ते आपल्या निश्चयापासून कधीही ढळले नाहीत. या दृष्टीने "तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ। ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि ॥१६.२४॥" हे श्रीमद्भगवद्गीतोक्त वचनच त्यांना पराकोटीचे शिरोधार्य होते, हे त्यांचे सर्व जीवनचरित्र पाहिले म्हणजे दिसून येते. कर्तव्य आणि अकर्तव्य यांच्या निश्चयाविषयी अर्थात् त्यांची व्यवस्था लावण्याविषयी तुला शास्त्र हेच प्रमाण आहे असे समजून शास्त्रविधानाने नेमलेले कर्मच

(कर्तव्य किंवा धर्म) करणे तुला योग्य आहे अशी त्यांची जीवनधारणा पक्की दृढ झाली होती किंवहुना उपरोक्त श्लोकाचा श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी जो भावार्थ प्रकट केला आहे तेच त्यांच्या जीवनाचे गंभीर रहस्य आहे असे म्हटले; तर त्यात यत्किंचितही अतिशयोक्ती होणार नाही.

या कारणें पैं बापा । जया आथी आपुली कृपा ।
तेणें वेदांचिया निरोपा । आन न कीजे ।। १६.४५५ ।।
पतीचिया मता । अनुसरोनि पतिव्रता ।
अनायासें आत्महिता । भेटेचि ते ।। ४५६ ।।
नातरी श्रीगुरुवचना । दिठी देतु जतना ।
शिष्य आत्मभुवना–। माजीं पैसे ।। ४५७ ।।
हें असो आपुला ठेवा । हाता आथी जरी यावा ।
तरी आदरें जेवीं दिवा । पुढां कीजे ।। ४५८ ।।
तैसा अशेषांही पुरुषार्था । जो गोसावी हो म्हणे पार्था ।
तेणें श्रुतिस्मृति माथां । बैसणें घावे ।। ४५९ ।।
शास्त्र म्हणेल जें सांडावे । तें राज्यही तृण मानावें ।
जें घेववी तें न म्हणावें । विषही विरु ।। ४६० ।।
ऐसिया वेदैकनिष्ठा । जालिया जरी सुभटा ।
तरी कें आहे अनिष्टा । भेटणें गा ? ।। ४६१ ।।
पैं अहितापासून काढिती । हित देऊनि वाढविती ।
नाहीं गा श्रुतिपरौती । माउली जगा ।। ४६२ ।।
म्हणौनि ब्रह्मेंशीं मेळवी । तंव हे कोणें न सांडावी ।
अगा तुवांही ऐसीचि भजावी । विशेषेंसीं ।। ४६३ ।।

पंढरपुराहून श्रीशास्त्रीबुवा बार्शीला अंबरीषवरदाचे दर्शन घ्यावयाला गेले. येथे माणगावचे श्रीदत्तूशास्त्री साधले राहत होते. त्यांनी श्रीशास्त्रीबुवांना पाहिले. आपल्या मातृभूमीच्या सुपुत्राची भेट

झाली म्हणून त्यांना आनंद झाला. श्रीवासुदेवशास्त्र्यांनी काही दिवस आपल्या घरी राहावे असा श्री. साधल्यांनी त्यांना आग्रह केला. त्याप्रमाणे ते तीन दिवस त्यांच्या घरी राहिले. त्याकाळात एके दिवशी श्री. साधले बुवांना वाटखर्चासाठी सहा रुपये देऊ लागले; पण त्यांनी ते पैसे घेण्याचे नाकारले. शेवटी बुवा बाहेर गेल्याचे पाहून श्रीदत्तूशात्र्यांनी ते पैसे बुवांच्या नकळत त्यांच्या करंड्यात ठवले. बुवा बाहेरून येताच ते श्री. दत्तूशास्त्र्यांना असे म्हणाले की, " आमच्या देवांना आता द्रव्यसंग्रह करावा असे वाटू लागले आहे." हे ऐकून आपल्या अपरोक्ष घडलेल्या गोष्टीसुद्धा जाणण्याच्या श्रीशास्त्रीबुवांच्या सामर्थ्यावद्दल श्रीदत्तूशास्त्र्यांना फार आश्चर्य वाटले.

बार्शीहून श्रीवासुदेवशास्त्री पत्नीला घेऊन गोदावरीच्या तीरावर गंगाखेड येथे गेले. तेथे त्यांचा काही दिवस मुक्काम झाला. तेथे एका रात्री बुवांना असा स्वप्नदृष्टांत झाला की, " आजपासून चौथ्या दिवशी तुम्हा दोघांना नेण्यासाठी आम्ही येणार आहोत." त्यावर देवांना बुवा असे म्हणाले की, "आपणास संन्यास घ्यावयाचा असल्यामुळे आपण येणार नाही. तुम्हाला वाटल्यास मंडळींना घेऊन जा. त्याला आपली काहीही हरकत नाही." त्यानंतर सौ. अन्नपूर्णाबाईंना ताप येऊ लागला व महामारीचा उपद्रव सुरू झाला. या आजारात सौ. अन्नपूर्णाबाई फार अशक्त झाल्या. त्यामुळे त्यांची वस्त्रे धुणे, त्यांना नेसवणे वगैरे कामे श्रीशास्त्रीबुवाच करीत असत. या आजारात त्या दिवसेंदिवस थकत गेल्या व वैशाख वद्य १४, शके १८१३, शुक्रवारी दुपारी त्यांचे देहावसान झाले. त्या साध्वीने आयुष्यात फक्त कष्टच सहन केले. बापाच्या घरी न खपणारी मुलगी म्हणून त्यांची हेटाळणी होत होती. पुढे टेंब्यांच्या घरात नावडती सून म्हणूनच त्या आल्या व पुढील सर्व आयुष्य त्यांनी कष्ट आणि दारिद्र्य यात काढले. श्रीशास्त्रीबुवांनी गृहस्थाश्रम सुरू केल्यापासून

सौ. अन्नपूर्णाबाईंची एक प्रकारे तपश्चर्याच सुरू झाली होती. सतीचे वाण घेतल्याप्रमाणे त्या राहिल्या व वागल्या ! सौ. अन्नपूर्णाबाई त्याला कधी कमी पडल्या नाहीत. परिसाच्या स्पर्शाने लोखंडाचे सोने व्हावे तसे श्रीशास्त्रीबुवांच्या सहवासात सौ. अन्नपूर्णाबाईंची अध्यात्मात फार प्रगती झाली होती. योगात समाधी अवस्थेपर्यंत त्यांचा अभ्यास झाला होता व देवांच्या कृपेने निर्विकल्प समाधीचाही अनुभव त्यांनी घेतला होता हे आपण मागे पाहिलेच आहे. प्रत्येक हिन्दू पत्नीला मातृपद प्राप्ती व सधवा मरण या दोन गोष्टींची इच्छा असते. सौ. अन्नपूर्णाबाईंना या दोन्ही गोष्टींचा लाभ झाला होता. तृप्त मनाने त्यांनी देह ठेवला. पत्नीच्या मृत्यूमुळे बुवांच्या मागचा अखेरचा पाश तुटला. संन्यास घ्यावयाला आता ते मोकळे झाले होते. या वेळचे त्यांच्या हातचे एक पत्र आहे.

"गंगाखेड. श्रींचे आज्ञेनें उत्तराखंडीं जाणें होत असतां गोदावरीतीरीं वैशाख वद्य १४ शुक्रवारी दुपारी सौभाग्यवतीला देवाज्ञा झाली. क्रिया करून नंतर उत्तरपंथीं जाणे होईल. चि. दत्तु व भालु यांस वरील मजकूर प्रविष्ट व्हावा. इहपर भयानें सत्कालक्षेप करावा. मातोश्री आईस मानसिक वंदन असावे. यावर आता भेट होणें प्रारब्धाधीन आहे. परंतु सदैव चरणकमल हृदयीं ठेवले आहे. तेथील सर्व हृष्ट स्पृष्ट कृतोपकार मंडळींचें स्मरण आहे. हा मजकूर ती. बाबाजीपंत गोडे यांस प्रविष्ट व्हावा."

मृत्यूचे बोलाविणे येण्याचे प्रकार श्रीशास्त्रीबुवांच्या आयुष्यात अनेकदा घडले; पण संन्यास ग्रहण केल्याशिवाय आपण मरण स्वीकारावयाला तयार नाही ही श्रीशास्त्रीबुवांची भूमिका होती. ज्या ज्या वेळी त्यांना मृत्यूने येतो असे म्हटले त्या त्या वेळी त्याला रिक्त हस्तेच परत जावे लागले. पत्नीच्या मृत्यूनंतर अशौचात असताना सहाव्या दिवशी श्रीशास्त्रीबुवांना स्वप्नामध्ये रक्तवस्त्र

परिधान केलेली विधवा स्त्री दिसली. ती स्वप्नात शिवून त्यांना स्पर्श करू लागली तेव्हा स्वप्नातच श्रीशास्त्रीबुवा तिला "आपणास शिवू नको " असे सांगत असताना बुवांचा गुडघा घट्ट पकडून ती त्यांना असे म्हणाली की, "आता मी तुम्हाला घेऊन जाणार आहे." मरणकाल जवळ आल्याची लक्षणे श्रीस्वामीमहाराजांनी श्रीदत्त-माहात्म्य या आपल्या ग्रंथात सांगितली आहेत. वरील स्वप्न मरण जवळ आल्याचे सूचक होते. जागे झाल्यावर आपली अवस्था आपल्या पत्नीप्रमाणेच होणार व संन्यास न घेता अशौचातच आपणाला इहलोक सोडावा लागणार या कल्पनेने श्रीशास्त्रीबुवांना फार वाईट वाटले. देवांचाही यावेळी त्यांना इतका राग आला की, त्यांनी त्यामुळे देवांची निंदा करण्यास आरंभ केला. ते असे म्हणू लागले की, "इतके दिवस हाताला धरून देवांनी आपला प्रतिपाळ केला. कधी चुकीचे पाऊल पडू दिले नाही. आपल्याकडून कधी शास्त्रविरुद्ध वर्तन घडू दिले नाही. आणि आता आपली संन्यास ग्रहणाची इच्छा पूर्ण होऊ न देताच देव आपणाला अशौचात देहत्याग कारावयाला लावीत आहेत, हे देवांना शोभते का? आजपर्यंत देवांची कधी अवज्ञा केली नाही; पण देवांनी मात्र अशा तऱ्हेने आपली उपेक्षा करावी हे देवांच्या ब्रीदाला कलंक लावणारे आहे. आत्तापर्यंत संन्यास घेण्याची इच्छा तीन वेळा देवांजवळ व्यक्त केली. आता ती व्यर्थ जाणार असे दिसते. देव लबाड आहेत असे श्रीमौनीस्वामी म्हणत असत ते काही खोटे नाही; पण मी सुद्धा देवांना असे निक्षून सांगतो की, संन्यास घेतल्याशिवाय हा देह मी सोडणार नाही!" बालकाचा हट्ट आई पुरविणार नाही तर दुसरे कोण पुरविणार? आणि हट्ट तरी कसला? काही लौकिक गोष्टींसाठी का हा हट्ट होता? नाही. मृत्यूला आला तर येवो; पण तो येण्यापूर्वी या देहावर संन्यास धर्माचे संस्कार व्हावेत, हाच तो हट्ट होता. हट्टही

अलौकिक, तो धरणाराही अलौकिक आणि तो पुरविणाराही अलौकिक ! यावेळी बुवांचा अपमृत्यू होता तो टळला ; मात्र स्वप्नात त्या विधवाबाईने बुवांना जेथे स्पर्श केला होता तेथे गुडघ्याला गजकर्णासारखा एक चट्टा पडला.

श्रीशास्त्रीबुवांनी पत्नीच्या और्ध्वदेहिक क्रिया करावयाला नवव्या दिवसापासून सुरुवात करून तेराव्या दिवसापर्यन्ताच्या सर्व क्रिया यथाविधी केल्या. त्यानंतर "अनाश्रमी न तिष्ठेत" या वचनाप्रमाण त्यांनी चौदाव्या दिवशीच संन्यास घ्यावयाचे ठरविले. उत्तरायणामध्यें एकादशीला किंवा द्वादशीला संन्यास घ्यावा अथवा अमावस्या किंवा चतुर्दशी पाहून ज्याप्रमाणे पर्वणीचे ठायी प्राजापत्य इष्टी येईल त्याप्रमाणे संन्यास ग्रहणास आरंभ करावा असे शास्त्रात सांगितले आहे. श्रीवासुदेवशास्त्र्यांनी पत्नीच्या मृत्यूनंतर चौदाव्या दिवशी, म्हणजे शके १८१३, उत्तरायणात ज्येष्ठ शुद्ध १२ रोजी संन्यास घेण्यास सुरुवात केली. दुसऱ्या आश्रमातून एकदम चतुर्थाश्रमात जावयाचे होते. "यदहरेव विरजेदहरेव प्रव्रजेत्" या शास्त्रवचनाप्रमाणे त्यांना आता चतुर्थाश्रमात जावयाला कोणतीच हरकत नव्हती. ब्रह्मचर्याश्रम संपल्यावर संन्यास घेण्याचा विचार त्यांच्या मनात वारंवार येत असे. लग्नानंतर हा विचार अधिक तीव्रतेने येऊ लागला होता; पण त्यावेळी संन्यास घेण्यास देवांची आज्ञा नव्हती. आता मात्र ते सर्व पाशातून मोकळे झाले होते. देवांच्या वचनातूनही ते मोकळे झाले होते.

श्रीवासुदेवशास्त्री यावेळी संन्यास ग्रहण करण्यासाठी योग्य अधिकारी होते; पण शास्त्राज्ञेचे उल्लंघन करणे त्यांच्या स्वभावात नव्हते, म्हणून संन्यास ग्रहण करण्याचा अधिकार सिद्ध होण्यासाठी त्यांनी स्वतःची नऊ श्राद्धे, शोडष मासिके व सपिंड ही पार्णव विधीने करून यथाविधी प्रायश्चित्त केले. (त्यांनी स्वतःची श्राद्धे द्रव्याच्या

अभावी मागाहून केली असा उल्लेख काही ठिकाणी सापडतो.) यावेळी गावातील सर्व ब्राह्मण मंडळींना त्यांनी गोदावरीकाठी बोलाविले होते. श्रीशास्त्रीबुवांनी गोदावरीमध्ये स्नान करून संन्यासग्रहण विधीला प्रारंभ केला. प्रथम देशकाळाचे संकीर्तन करून "परमहंसादि संन्यासग्रहण करिष्ये" असा संकल्प केला व श्रीगणेशपूजन, पुण्याह-वाचन व मातृकापूजन करून नांदीश्राद्ध केले. नंतर केशवपन करून सावित्रीप्रवेश केला व आहवनीय अग्नी प्रज्वलित करून हवन केले. सायंकाळचा होम व वैश्वदेव झाल्यावर कृष्णाजिनावर ब्रह्मासना-मध्ये बसून त्यांनी रात्री जागरण केले.

रात्री स्वप्नामध्ये किंवा अर्धजागृतीत श्रीगोविंदस्वामींनी त्यांना प्रणवाचा उपदेश केला. "या पुढ प्रणवाचा अभ्यास करून माधुकरीचे अन्न घ्यावे; मात्र मठभिक्षा करू नये." अशी त्यांना आज्ञा करून श्रीगोविंदस्वामी अंतर्धान पावले. श्रीगोविंदस्वामींच्या रूपाने भगवान् श्रीदत्तात्रेयांनीच आपणास संन्यास दिला हे श्रीवासुदेवशास्त्री समजून चुकले. ज्याप्रमाणे श्रीनृसिंहसरस्वतीस्वामीमहाराजांनी श्रीनारायण-स्वामींना कृष्णापंचगंगेच्या संगमामध्ये संन्यास दिला होता त्याप्रमाणे आज श्रीगोविंदस्वामीस्वरूप भगवान् श्रीदत्तात्रेयांनी श्रीशास्त्री-बुवांना स्वप्नात प्रणवोपदेशाने संन्यासच दिला होता; पण संन्यास ग्रहणाचा विधी लौकिक दृष्टीने सर्व लोकांसमक्ष व्हावा अशी श्रीवासुदेवशास्त्र्यांची इच्छा होती.

ती रात्र सरली आणि दुसरा दिवस उजाडला. जे व्रत घेण्यासाठी श्रीवासुदेवशास्त्री एवढे दिवस आतुर झाले होते, त्या संन्यास-ग्रहणाच्या व्रताला आता सुरुवात झाली. गोदावरी तीरावरील वृक्ष, लता, पशु, पक्षी इत्यादी सारे गंभीर होऊन श्रीवासुदेवशास्त्र्यांवर होणारे सर्वस्व त्यागविधीचे संस्कार पाहू लागले. प्रातःकालचा होम सुरू झाला. त्या होमाच्यावेळी उच्चारल्या जाणाऱ्या मंत्रांचे ध्वनी

आसमंतामध्ये पसरून तेथील वातावरण अधिकच गंभीर झाले. संन्यास धर्मामध्ये अधिकार प्राप्त करून देणारी प्राजापत्य इष्टी सुरू झाली. या इष्टीच्या योगाने श्रीवासुदेवशास्त्र्यांनी आपल्यापाशी असलेल्या सर्व ऐहिक वस्तूंचा विधिपूर्वक त्याग केला. आता त्रिसुपर्ण मंत्राला सुरुवात झाली. "ॐ ब्रह्ममेतु माम्। मधुमेतु माम्। ब्रह्ममेव मधुमेतु माम्।" परब्रह्म तत्त्वाची मला प्राप्ती होवो. परमानंद लक्षणांनी युक्त मधुर अशी वस्तू मला प्राप्त होवो. अखंडैकरस मधुमय ब्रह्मवस्तू मला प्राप्त होवो. परमेश्वरा! माझ्यामध्ये द्वैतामुळे भासमान होणाऱ्या संसाररूप मोहाचा नाश कर. तुझ्या प्रीतीला पात्र असा मी बालक आहे. मी आपल्या सर्व प्राणवृत्तींची तुझ्यामध्ये आहुती देऊन, सर्व इंद्रियांचा निरोध करून तुझ्यामध्येच एकचित्त झालो आहे. ज्ञानप्रतिबंधक सर्व मलिनता माझ्या मधून काढून टाक. शुद्ध तत्त्वज्ञानाची मला प्राप्ती होईल असे कर. शरीर व मन शुद्ध होऊन तत्त्वज्ञान धारणेची योग्यता प्राप्त व्हावी म्हणून अग्निरूप तुझ्यामध्ये मी आहुती देत आहे. तू प्रसन्न हो."

यानंतर संन्यासाश्रमामध्ये प्रवेश करण्याचा मुख्य विधी जो विरजा होम त्याला सुरुवात झाली. "प्राणापानव्यानोदानसमाना मे शुद्धताम्"—माझ्यामधील प्राणपंचक शुद्ध होवोत. माझ्यामधील पंचमहाभूतांचे अंश शुद्ध होवोत. माझ्यामधील शब्द, स्पर्श, रूप, रस, गंधप्रसूत सर्व विषय–संस्कार शुद्ध होवोत." नंतर गुरुमुखातून ऐकलेल्या ज्ञानाची आपल्यामध्ये नीट धारणा व्हावी म्हणून त्यांनी अग्निरूप परमेश्वराची प्रार्थना केली. त्यानंतर पुरुषसूक्ताने विराट परमेश्वराची स्तुती करण्यात आली. पुत्रेषणा, वित्तेषणा वगैरे ऐहिक लाभाच्या वासनांची अग्नीमध्ये पुढील मंत्राने आहुती देऊन त्यांनी सर्व प्राणिमात्राला आपल्यापासून अभयाचे आश्वासन दिले.

" न मे कश्चिन् । नाहं कश्चचित् । पुत्रेषणा लोकेषणा सर्वेषणा मया परित्यक्ता अभयं सर्वं भूतेभ्यो मत: स्वाहा !"

यानंतर श्रीवासुदेवशास्त्र्यांनी शिखा–सूत्राचा त्याग करून गोदावरीमध्ये स्नान केले व " त्राहि मां सर्वलोकेश वासुदेव सनातन। सन्यासं मे जगद्योने पुंडरीकाक्ष मोक्षद। युष्मच्छरणमापन्नं पाहि मां पुरुषोत्तम।" अशी प्रार्थना करून, दिगंवर होऊन ते पाच पावले उत्तराभिमुख गेले. नंतर संन्याशाला उचित अशा कौपिन, कमंडलू व आसन इत्यादिकांचा स्वीकार करून, समित्पाणि होऊन त्यांनी आचार्यांना नमस्कार केला व गरुडासनावर बसून त्यांची प्रार्थना केली. " त्रायस्व भो जगन्नाथ गुरो संसार वन्हिना। दग्ध मां काल दृष्ट च त्वामहं शरणागत:।" त्यानंतर त्यांनी उजवा गुडघा जमिनीला टेकून आचार्यांचे चरण धरले आणि " आपण ब्रह्मरूप आहात" अशी त्यांची स्तुती केली. नंतर पाण्याने भरलेला शंख बारा प्रणवमंत्रांनी अभिमंत्रित करून त्या पवित्रजलाने आचार्यांनी श्रीवासुदेवशास्त्र्यांना अभिषेक केला व शांतिपाठ करून, त्यांच्या मस्तकावर हात ठेवून पुरुषसूक्ताचा जप केला व " मम व्रते हृदयं ते दधामि"–असे म्हणून त्यांच्या उजव्या कानात प्रणवाचा उपदेश केला व त्याचा अर्थ सांगितला. नंतर त्यांना पंचीकरणाचा बोध केला.

वरील सर्व विधी गावातील विद्वान् आचार्यांच्या हस्ते करून घेण्यात आले. विरजा होम समाप्त झाल्यावर सर्वांच्या समक्ष एकदा प्रेषोच्चार होणे बरे असे मनात येऊन प्रेषोच्चारासाठी म्हणजे महावाक्याचा बोध करण्यासाठी कोणीतरी संन्यासी मिळाल्यास चांगले होईल असे श्रीवासुदेवशास्त्र्यांना वाटले. सत्पुरुषाचीच इच्छा होती ती ! ती पूर्ण होण्यास वेळ किती व कसा लागणार ! त्याच वेळी समोरून गोदातीरावरून एक तेजस्वी तरुण व काषायवस्त्रधारी

संन्यासी येताना दिसले. श्रीवासुदेवशास्त्री त्यांना सामोरे गेले व साष्टांग नमस्कार घालून, कृतांजली होऊन विनम्र भावाने असे म्हणाले, की, "स्वामिन्! आताच सर्वकर्मपरित्यागपूर्वक पवित्र असा चतुर्थाश्रम मी स्वीकारला आहे. शास्त्राप्रमाणे महावाक्याचा उपदेश घ्यावयाचा आहे. याप्रसंगी महावाक्याचा उपदेश करावयाला आपणाहून अधिक योग्य व अधिकारी व्यक्ती कोण आहे? आपणाकडून हा उपदेश मिळाल्यास मी स्वत:ला धन्य समजेन. कृपावन्त होऊन आपण मला महावाक्याचा उपदेश करा." त्या तेजस्वी तरुण संन्याशाचे याच पवित्र कार्यासाठी तेथे आगमन झाले होते. प्रेषोच्चार सांगावयाला त्याने आनंदाने होकार दिला.

श्रीवासुदेवशास्त्र्यांनी हरीचे स्मरण केले व उभे राहून, वर भुजा करून आणि देवांना साक्षी करून—

ॐ भू: सन्यस्तं मया।
ॐ भुवः सन्यस्तं मया।
ॐ स्व: सन्यस्तं मया।

या मंत्राचा मंद, मध्य व उच्च स्वरात उच्चार केला. नंतर अगोदरच प्रज्वलित केलेल्या पवित्र होमकुंडाजवळ बसवून नवागत संन्यासी श्रीवासुदेवशास्त्र्यांना सनातन धर्मातील अत्युच्च अशा ज्ञानाने भरलेल्या महावाक्याचा बोध करू लागले.

"तत्त्वमसि"—"ते सर्व व्यापक ब्रह्म तूच आहेस." "हे चराचर विश्व ज्याच्या अधिसत्तेने निर्माण झाले आहे, हे अखिल विश्व ज्यांची प्रतिकृती आहे, ते ब्रह्म तूच आहेस, अशी भावना कर."

संन्याशाच्या मुखातून उच्चारलेल्या त्या महावाक्याच्या बोधाने श्रीवासुदेवशास्त्र्यांना असे वाटले की, आपल्या शरीराला कंप सुटून आपणास एक प्रकारची बधिरता येत आहे. त्याच वेळी त्यांना असेही अनुभवाला आले की, आपली जाणीव अतिशय सूक्ष्म होत

असून आपल्या सभोवतालचे जग एका मोठ्या आवर्तामध्ये सापडल्याप्रमाणे गरगर फिरत आहे. आपल्या सभोवतालच्या व्यक्तिव्यक्तीमधील व वस्तुवस्तूमधील भेद मावळून सगळीकडे एकमात्र अखंड चैतन्याचे अस्तित्व भासमान होत आहे व आपणही या अस्तित्वाचा एक अविभाज्य भाग आहोत असे त्यांना वाटले. हळूहळू हे अस्तित्वही एका विश्वव्यापी व दिव्य प्रकाशाच्या रूपाने सगळीकडे भरून राहिले आहे आणि हा दिव्य प्रकाश खाली, वर व चहूबाजूंना भरून राहिला आहे अशी त्यांना अनुभूती आली. पुढे तर "खाली, वर" हा दिशाबोधही लोप पावत आहे, आपलेच अस्तित्व या दिव्यप्रकाशाच्या रूपाने सगळीकडे पसरले आहे, आपणाव्यतिरिक्त आणखी काहीसुद्धा नाही असे त्यांना वाटले. मग कालान्तराने हळूहळू त्यांना आपल्या शरीराची व सभोवतालच्या जगताची जाणीव झाली. नंतर कटिसूत्र व कौपिन धारण करून, प्रेषोच्चार सांगणाऱ्या संन्याशांच्या आज्ञेने उच्चासनावर बसून त्यांनी वेदान्तविषयक उपन्यास केला. नंतर त्या संन्यासी महाराजांनी श्रीशास्त्रीबुवांच्या मस्तकावर शंखोदकाने पुरुषसूक्ताचा अभिषेक केला. त्यानंतर श्रीशास्त्रीबुवांनी "नारायण" असे म्हणून उच्चासनावरून उठून, त्या आसनावर संन्याशांना बसविले व त्यांना नमस्कार केला.

संन्यास दीक्षा घेतल्यावर संप्रदायाला अनुसरून संन्याशाला नाव दिले जाते. गंगाखेडला संन्यास घेतल्यावर श्रीवासुदेवशास्त्र्यांना आश्रमोचित नाव दिल्याचा उल्लेख नाही. मात्र ज्या दिवशी संन्यास दीक्षा झाली त्याच दिवशी देवांनी त्यांना स्वप्नामध्ये "वासुदेवानंद सरस्वती" असे नाव दिले होते व तेच नाव त्यांना उज्जयिनीला दंड ग्रहण केल्यावर श्रीनारायणानंदसरस्वतीस्वामीमहाराजांनी दिले होते. त्यामुळे आत्तापर्यंतच्या वर्णनामध्ये त्यांचा श्रीवासुदेवशास्त्री,

श्रीशास्त्रीबुवा किंवा श्रीटेंबेस्वामी असा उल्लेख केला आहे. आता त्यांची ही सर्व नावे जाऊन ते श्रीस्वामीमहाराज किंवा श्रीमहाराज या नावानेच ओळखले जाऊ लागले.

श्रीवासुदेवशास्त्री टेंब्यांच्या नावात, ज्याप्रमाणे श्रीवासुदेव-शास्त्री टेंबे, श्रीशास्त्रीबुवा, बुवा, प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वती, श्रीस्वामीमहाराज किंवा श्रीटेंबेस्वामीमहाराज असे बदल होत गेले त्याचप्रमाणे त्यांच्या आयुष्यातही स्थित्यंतरे होत गेली. क्रमाक्रमाने ती सर्व आपण पाहणार आहोत. असो.

सर्व विधी आटोपून श्रीस्वामीमहाराज व सर्व ब्राह्मणमंडळी गावात आली. गावात आल्यावर त्यांना आठवण झाली की, ज्या संन्याशांनी आपणास प्रेषोच्चार सांगितला, त्यांना भिक्षेसाठी आमंत्रण करावयाला आपण विसरलो. त्यामुळे ते दीक्षा-विधी झालेल्या जागी पुन्हा गेले; पण ते संन्यासीमहाराज कोठेच दिसेनात. आपण त्यांना भिक्षेसाठी आमंत्रण देऊ शकलो नाही याचे सर्वांना व श्रीस्वामीमहाराजांना फार वाईट वाटले. मात्र ते संन्यासीमहाराज तात्काळ कोठे निघून गेले याचा ठावठिकाणा न लागल्यामुळे सर्वजण फारच आश्चर्यचकित झाले.

श्रीस्वामीमहाराजांना त्या दिवसापासून देवांच्या व श्रीगोविंद-स्वामींच्या आज्ञेप्रमाणे माधुकरीवर राहावयास पाहिजे होते; पण सर्व ब्राह्मणमंडळीनी असा आग्रह धरला की, त्या दिवशी तरी श्रीस्वामी-महाराजांनी सर्वांबरोबर मठभिक्षा करावी. सर्वांच्या आग्रहाला मान देऊन त्या दिवशी त्यांनी मठभिक्षा केली. " मठभिक्षा नको." या देवांच्या आज्ञेचे श्रीस्वामींना विस्मरण झाले नव्हते; परंतु तेथे जमलेल्या ब्रह्मवृंदांचे मन मोडण्यापेक्षा मठभिक्षा करून होईल ती शिक्षा भोगावी असा विचार त्यांच्या मनात आला असेल. अखेर व्हावयाचे तेच झाले. भोजनानंतर त्यांना अतिसाराचा उपद्रव सुरू

झाला. ब्राह्मणमंडळींच्या आग्रहास्तव आज्ञाभंग करावा लागला असे सांगून श्रीस्वामींनी देवांची क्षमा मागितली तेव्हा तो विकार बंद झाला.

श्रीस्वामींना सन्यास दीक्षा मिळाली; पण त्यांच्या मनाचे अद्याप समाधान झाले नव्हते. योग्य गुरूंकडून दंड घेतल्याशिवाय त्यांना समाधान लाभणे शक्य नव्हते. आपल्या लाडक्या भक्ताचे सर्व मनोरथ पूर्ण करण्यासाठी कटिवद्ध झालेल्या भगवान् श्रीदत्तात्रेयांनी त्यांना दंडग्रहणासाठी उज्जयिनीला जाण्याचा आदेश देऊन असे सांगितले की, "उज्जयिनीला जाऊन नारायणानंदसरस्वतींकडून दंड घ्यावा."

श्रीस्वामीमहाराज देवांच्या या आज्ञेप्रमाणे उज्जयिनीला, दंड देणाऱ्या गुरूच्या शोधार्थ निघाले. गंगाखेडहून उमरखेड, माहूर, ॐकारेश्वर वगैरे तीर्थे करीत त्यांनी उज्जयिनीला जाण्याचे ठरविले. वाटेत वाशीम गावावरून त्यांना पुढे जावयाचे होते. या गावी त्यांच्या मार्गात विघ्न आले. चांगल्या कार्याला निघाल्यावर मार्गात येणाऱ्या विघ्नांकडे बघून चालत नाही. आपले उद्दिष्ट चांगल्या प्रकारे पार पडो एवढीच इच्छा करावयाची असते. वाशीम गाव निजाम-शाहीच्या सरहद्दीवर असल्यामुळे तेथे पोलीस चौकी होती. सरहद्द ओलांडणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची येथे चौकशी होत असे व नाव गाव लिहून द्यावे लागत असे. येथे हिन्दू साधुसंन्याशांवर विशेष डोळा असे. चौकीतील शिपायांनी श्रीस्वामींना नावगाव विचारले. श्रीस्वामींनी नुकताच संन्यास घेतला होता. पूर्वाश्रमातील नावाचा त्यांनी त्याग केला होता. नवीन नाव अद्याप मिळालेले नव्हते. शिपायांना काय नाव सांगावे असा त्यांच्यापुढे पेच निर्माण झाला. ज्यावेळी वाशीमच्या पोलीसांनी त्यांना नावगाव विचारले, त्यावेळी श्रीस्वामीमहाराज त्यांना असे म्हणाले की, "आम्ही संन्यासी!

आम्हाला नावगाव कुठले ? जेथे जाऊ तो आमचा गाव." पण श्रीस्वामीमहाराजांची भाषा त्या आडमुठ्या शिपायांना कशी कळणार? त्यांनी श्रीस्वामींना चौकीवर अडवून ठेवले. श्रीस्वामी-महाराजांच्या मनात असे आले की, येथे डांबून पडण्यापेक्षा पूर्वाश्रमीचे नाव लिहून द्यावे व सुटका करून घ्यावी; पण शिपाई आता त्यांचे बोलणे मानावयाला तयार होईनात. त्यांना श्रीस्वामींविषयी संशय येऊ लागला. श्रीस्वामी स्वस्थ चित्ताने चौकीमध्ये जप करीत बसून राहिले. त्या रात्री चौकीचा वरिष्ठ अधिकारी अकस्मात् चौकीला भेट द्यावयाला आला. या अधिकाऱ्याचे पूर्व सुकृत चांगले असावे; कारण श्रीस्वामींना मदत करण्याची संधी त्याला प्राप्त झाली. श्रीस्वामींकडे पाहताच एका सत्पुरुषाला आपल्या लोकांनी विनाकारण डांबून ठेवून त्रास दिला याची त्याला जाणीव झाली. निर्दोष माणसाला डांबून ठेवल्याबद्दल त्याने चौकीदाराची कडक शब्दात हजेरी घेतली व श्रीस्वामींची सुटका केली. संन्यासधर्माचे व्रत घेतलेले श्रीस्वामी त्याला असे म्हणाले की, "प्रारब्धभोग म्हणून आम्हाला चौकीत डांबून पडावे लागले. त्यात चौकीदाराचा दोष नाही. त्याला शिक्षा करू नये."

पुढे वरील प्रसंगाची आठवण झाली की, श्रीस्वामीमहाराज सांगत, "उभ्या हयातीत सरकारी अधिकाऱ्यांकडून अटकाव होण्याचा एवढाच प्रसंग आला. एरवी देशीपरदेशी चळवळ, क्वारंटाईन वगैरे जागोजागी असताना आपणास कुठेही कसली अडचण पडली नाही की त्रास झाला नाही."

वाशीमहून स्वामी उमरखेडला आले. त्या दिवशी चंद्रग्रहण होते म्हणून ते उमरखेडला श्रीगोचरस्वामींच्या मठात राहिले. श्रीगोचर-स्वामी नुकतेच समाधिस्थ झाले होते. ते मोठे सत्पुरुष होते. श्रीगोचरस्वामी नवसाला पावतात अशी लोकांची श्रद्धा होती.

नवस फेडण्यासाठी त्यांच्या अंगावर घातलेले अलंकार व विशेषत: हातामध्ये चढविलेली कांकणे यांनी त्यांचा देह भरलेला असे. श्रीगोचरस्वामी भिक्षेला गेले म्हणजे गोमयाने जमीन सारवून त्यावर त्यांना भिक्षा वाढीत व ती भिक्षा ते गायीप्रमाणे मुखाने भक्षण करीत. ते हातांचा वापर करीत नसत. त्यामुळे त्यांचे नाव गोचरस्वामी असे पडले होते. प्रसिद्ध सत्पुरुष श्रीतुकाराममहाराज येहळेगावकर हे श्रीगोचरस्वामीचे गुरुबंधू होत. श्रीगोचरस्वामी आजारी असताना त्यांना संन्यास देण्यात आला होता. आता आजारातून आपण बरे होणार नाही या विचाराने त्यांनी आतुर संन्यास घेतला असावा; पण आजारातून ते बरे झाले. त्यामुळे पूर्वाश्रमात त्यांनी सहस्रब्राह्मण भोजन घालण्याचा केलेला संकल्प अपुरा राहिला. संकल्प तर पूर्ण करणे भाग होते; पण संन्यासी सहस्रब्राह्मण भोजन कसे घालणार? शेवटी त्यांनी काही काळ असा नियम केला की, त्यांना कोणी भिक्षेला बोलावले; तर "माझ्या-बरोबर अकरा ब्राह्मणांना भोजन घालत असाल तरच तुमच्या घरी भिक्षेला येईन." असे बोलविणाऱ्याला सांगावयाचे. या नियमामुळे त्यांचा सहस्रब्राह्मण भोजनाचा संकल्प लवकरच पूर्ण झाला.

उमरखेडहून श्रीस्वामी माहूरला जावयाला निघाले. माहूर किंवा मातापूर हे रेणुका मातेचे स्थान आहे. जमदग्नी ऋषी आणि रेणुका यांचा पुत्र भगवान् परशुराम होय. माहूरला रेणुका सती गेली. त्यावेळी भगवान् श्रीदत्तात्रेय आचार्य होते. पुत्रवत्सल रेणुका मातेने या ठिकाणी सती गेल्यानन्तर श्रीदत्तप्रभूंच्या सांगण्यावरून आपले मुख भूमीतून वर काढून आपल्या प्रिय पुत्राला चुंबन दिले होते. असे हे माहूर क्षेत्र आहे.

येथे रेणुकामाता व भगवान् श्रीदत्तात्रेय यांचे दर्शन घेऊन श्रीस्वामी खांडवा, वढवाईमार्गे ॐकारेश्वरला पोहोचले. ॐकारे-

श्वर हे नर्मदेचे नाभिस्थान आहे. श्रीस्वामींनी येथे एका धर्मशाळेत मुक्काम केला. दुर्दैवाने या मुक्कामात त्यांना नवज्वर झाला. या ज्वरामध्ये थंड पाण्याचे स्नान व अंगावरून वाहणारा वारा या गोष्टी टाळावयाच्या असतात; पण स्नानसंध्या वगैरे नित्यकर्म बंद कसे ठेवावयाचे ? कोणतेही नित्यकर्म बंद केले किंवा त्यामध्ये फेरफार केला; तर तो देवांना चालत नसे. किंबहुना तसा बदल केला तर श्रीस्वामींना प्रायश्चित भोगावे लागत असे. आणि आता तर त्यांनी यतिधर्म स्वीकारला होता. धर्मशाळेत निवाऱ्याची जागा नव्हती. तरीही नर्मदेमध्ये तिन्ही त्रिकाळ थंड पाण्याने स्नान करून ते उघड्यावर पडून राहत असत. अशा तऱ्हेने त्यांनी चारपाच दिवस धर्मशाळेतच काढले. ज्वर कमी होण्याची चिन्हे दिसेनात. हे पाहून गावातील ब्राह्मणांना चिंता पडली. गावात संन्यासी आजारी पडल्यास त्याची जबाबदारी गावच्या ब्रह्मवृंदावर पडते. एका ब्राह्मणाने आग्रह करून श्रीस्वामींना धर्मशाळेतून आपल्या घरी नेले. अंगामधील ज्वराच्या ग्लानीमुळे बहुधा काय घडत आहे याची श्रीस्वामींना जाणीव नसावी. चारपाच दिवसांनी घाम येऊन ताप उतरला व त्याना थोडे देहभान आले. अशक्तपणा मात्र फारच वाढला होता.

अशा परिस्थितीमध्ये एक दिवस " चुकलो, चुकलो ! या पुढे कोणाच्या घरात राहणार नाही. " असे श्रीस्वामी मोठमोठ्याने बडबडू लागले वास्तविक यावेळी त्यांचा ज्वर उतरला होता. बडबडण्यासारखे काहीच कारण नव्हते, असे घरमालकाला व इतर लोकांना वाटले; परंतु यतीने तीन दिवसांपेक्षा अधिककाळ गृहस्थाच्या घरी वास करू नये असा नियम आहे. या नियमाचा भंग केल्याबद्दल देवांनी श्रीस्वामींना शिक्षा केली होती. अशी ही शिक्षा झाल्यावर श्रीस्वामीमहाराज तेथून पुढे जाण्यासाठी त्या ब्राह्मणाच्या घरातून बाहेर पडले.

श्रीस्वामीमहाराज ॐकारेश्वराहून हळूहळू मंडलेश्वरला येऊन पोहोचले व धर्मशाळेच्या रोखाने निघाले. त्यावेळी मंडलेश्वरच्या या धर्मशाळेमध्ये श्रीकैवल्याश्रम म्हणून स्वामी राहात होते. त्यांनी श्रीस्वामीमहाराजांना समोरून येताना पाहिले. श्रीस्वामीमहाराज वयाने तरुण होते. ते शरीराने कृश असले; तरी त्यांचा चेहरा तेज:पुंज होता. त्यांच्या डोळ्यातील चमक, त्यांनी आत्मसात केलेले ज्ञान किती खोल होते, याची साक्ष देत होती. मूर्तिमंत वैराग्यच आपल्या रोखाने येत आहे असे श्रीकैवल्याश्रमस्वामींना वाटले. हे संन्यासी आहेत; पण यांनी दंड घेतलेला दिसत नाही असे त्यांच्या लक्षात आले. श्रीकैवल्याश्रमस्वामींनी नवागताचे स्वागत केले. धर्मशाळेत आल्यावर श्रीस्वामीमहाराजांनी आपल्या नित्यक्रमाला सुरुवात केली. श्रीकैवल्याश्रमस्वामी त्यांचे सर्व व्यवहार बारकाईने पाहत होते. संध्याकाळी दोघाही स्वामींचे बोलणे झाले. यांच्या सारखा तेजस्वी शिष्य आपणास लाभला; तर आपली परंपरा चालविण्यास योग्य व्यक्ती मिळेल असे श्रीकैवल्याश्रमस्वामींना वाटले. आपली परंपरा श्रीस्वामीमहाराजांना सांगून "आपण माझ्याकडून दंड घ्यावा." असे त्यांनी सांगितले आणि श्रीस्वामीही त्या गोष्टीला कबूल झाले. ते दंड घेण्यासाठी एवढे अधीर झाले होते की, दवांनी त्यांना दंड घेण्यासाठी उज्जयिनीला जाण्याची आज्ञा केली होती, ही गोष्ट ते बहुधा विसरले असावेत; पण देव कोठे विसरले होते? श्रीस्वामींना रात्री असा स्वप्नदृष्टांत झाला की, "माझी आज्ञा मोडतोस वाटते? दंड उज्जयिनीच्या श्रीनारायणानंदसरस्वतीस्वामींकडूनच घ्यावा; दुसऱ्या कोणाकडूनही घेऊ नये." दुसऱ्या दिवशी सकाळी श्रीस्वामींनी श्रीकैवल्याश्रम स्वामींजवळ देवांनी दिलेल्या आज्ञेचा खुलासा केला व आपणाकडून दण्ड ग्रहण

करता येत नसल्याबद्दल सांगितले. नंतर त्यांची अनुज्ञा घेऊन ते उज्जयिनीला जावयाला निघाले.

मंडलेश्वराहून श्रीस्वामीमहाराज बलवाडा येथे आले. यावेळी ते एकटयानेच यात्रा करीत होते. त्यांच्या कीर्तीचा सौरभ अद्याप उत्तरेला पसरलेला नव्हता. ते शक्यतो जनसंपर्कापासून दूरच राहत असत. वाटेत जेथे आवश्यक असेल तेथेंच ते मुक्काम करीत काषाय-वस्त्रे परिधान केल्यापासून एक गोष्ट त्यांच्या नजरेला आली होती की, ज्या रात्री श्रीदत्तप्रभूंनी श्रीगोविंदस्वामींच्यारूपात स्वप्नामध्ये प्रणवाचा उपदेश करून चतुर्थाश्रम घेण्यास अनुज्ञा दिली,त्याचवेळी काही गोष्टी पाळण्याची देवांनी आपणाला आज्ञा केली. त्या आज्ञांचे पालन झालेच पाहिजे. देवांच्या आज्ञेचा भंग होऊन चालणार नाही. प्राण जावयाचा प्रसंग आला तरी चालेल; पण नियमांचे उल्लंघन होऊ देता कामा नये. ॐकारेश्वरी नवज्वर झाला त्यावेळीच ही गोष्ट स्पष्ट झाली होती. त्यामुळें लोकांच्या आग्रहास्तवसुद्धा देवांची आज्ञा भंग करण्याचा प्रसंग येऊ नये म्हणून ते लोकवस्तीपासून शक्यतो दूर राहत असत; पण प्रसंगी लोकांना मार्गदर्शन करण्याचा किंवा साहाय्य करण्याचा प्रसंग आल्यास श्रीस्वामींसारखा प्रेमळ आणि भूतदयावादी महात्मा आपल्या कर्तव्यापासून थोडाच दूर राहणार !

बलवाडा येथील गोष्ट. श्रीस्वामींनी माधुकरी मागून आणली आणि एखाद्या निवांत व योग्य जागी जाऊन भिक्षा सोडणार एवढयात मागून "स्वामी महाराज" अशी हाक आली. थांबून श्रीस्वामींनी मागे वळून पाहिले. एक सद्गृहस्थ त्यांच्या मागून येत होते. ते हात जोडून त्यांना असे म्हणाले की, "आपणासारख्या यतिवर्यांनी या गरिबाच्या झोपडीत भिक्षा केल्यास आम्ही धन्य होऊ; आमची झोपडी पावन होईल. आपणापाशी आणखी काही मागण

नाही. माझे घर जवळच आहे." श्रीस्वामी काही एक न बोलता त्यांच्या मागून गेले. त्यावेळी त्यांच्या घरी एक यात्रेकरू ब्राह्मण जेवावयाला आला होता. यजमानाच्या संभाषणावरून त्यांना असे कळले की, ते स्वत: वलवाड्याला ठाणेदार आहेत. त्यांना पाहिल्यावर हा माणूस सज्जन आहे हे ओळखूनच श्रीस्वामीमहाराज त्यांच्या घरी जावयाला कबूल झाले होते. माणूस अधिकारी असून सौजन्यशील होता. सौजन्याच्या पोटीच धार्मिकवृत्ती जन्म घेत असते. श्रीस्वामीमहाराज त्याच्या घरी एका बाजूला भिक्षा सोडावयाला बसले. ठाणेदाराच्या वैभवाला साजेशा थाटात सभोवर रांगोळी काढलेल्या पाटावर अतिथी ब्राह्मण बसला होता. ठाणेदार हात जोडून त्यांच्या समोर उभे होते. अतिथी महाशय आपोशन घेण्याच्या तयारीत होते; पण त्यांचा नूर काही वेगळा दिसत होता. यजमानांचा हुद्दा, त्यांच्या घरची समाधानकारक परिस्थिती वगैरे पाहून तो त्यांना असे म्हणाला की, " माझी एक अट आहे. ती पुरी करीत असाल; तरच मी जेवतो. दोनशे ब्राह्मणांना पुरेल एवढा शिरापुरीच्या शिधा देण्याचे मान्य करा. नाहीतर मी उठून चाललो. " ऐन मध्यान्हीची अतिथी सत्काराची वेळ ! अशा वेळी भरल्या पानावरून अतिथी उठून गेला; तर आपले सत्त्व घेऊन जाईल या भीतीने ठाणेदार व त्यांची पत्नी यांची गाळण उडाली. त्यावेळी ते ठाणेदार गृहस्थ त्या ब्राह्मणाला मोठ्या अजीजीने असे म्हणाले की, " महाराज ! कृपा करून असे काही करू नका. एवढ्या लोकांचा शिधा देण्याची खरोखरच माझी ऐपत नाही. माझे सत्त्व हरण करू नका." पण छे, दुर्वास महाराज रुसले होते. ठाणेदाराने आपल्या सत्त्वाचा प्रश्न उपस्थित केल्यामुळे त्यांना अधिकच चेव आला. शेवटी निरुपाय म्हणून ठाणेदाराने त्यांना दहा ब्राह्मणांचा शिधा देण्याचे कबूल केले; पण हाती उदक घेऊन शाप द्यावयाला सिद्ध झालेला तो

आधुनिक दुर्वास काही केल्या एवढ्यावर संतुष्ट होईना.

श्रीस्वामीमहाराज एका बाजूला बसून हा सर्व प्रकार पाहात होते. ब्राह्मण असूनही ब्राह्मणत्वाला न शोभेल असे वर्तन त्या अतिथीकडून होत होते. मोठा पेचप्रसंग निर्माण झाला होता; पण श्रीस्वामीमहाराज काहीसुद्धा बोलले नाहीत. एवढ्यात ठाणेदार सपत्नीक श्रीस्वामीमहाराजांपुढे आला व त्याने त्यांना अशी विनंती केली की, " या प्रसंगातून बाहेर पडावयाला मला काहीतरी मार्ग सुचवा. आपणापाशी काही मागणार नाही असे सांगून मी आपल्याला येथे भिक्षा सोडा असे आमंत्रण दिले खरे; पण भगवान् आज माझी परीक्षाच पाहत आहे. "

श्रीस्वामींना राहवले नाही. त्यांनी सौम्य पण स्पष्ट शब्दात त्या अतिथीला असे सांगितले की, " तुम्ही अगोदर काहीसुद्धा न सांगता ऐनवेळी असा त्रागा करता हे योग्य नाही. यजमानाचे आमंत्रण स्वीकारण्यापूर्वी तुमच्या अटींची कल्पना तुम्ही त्यांना द्यावयाला हवी होती. आता भरल्या पानावरून उठून जाणे हे तुमच्या ब्राह्मणधर्माला शोभत नाही. "

हा कोण आगंतुक मध्येच आपले तोंड खुपसतो आहे अशा मुद्रेने आतिथीने श्रीस्वामीमहाराजांकडे पाहिले. त्यांच्या चेहऱ्यावरील तेज पाहून त्यांना तो काही प्रत्युत्तर करू शकला नाही; पण आपला हट्ट न सोडता तो तसाच पाटावर बसून राहिला. मग मात्र श्रीस्वामीमहाराजांनी उग्रावतार धारण केला व ते त्याला असे म्हणाले की, "तुम्ही स्वतःला ब्राह्मण म्हणविता; पण आता जे आचरण तुम्ही करीत आहात ते तुमचा लोभीपणाच दाखविते. तुमच्या सारख्या दुराग्रही, लोभी व हेकेखोर ब्राह्मणाला दान देण्यास शास्त्राची आज्ञा नाही. तुम्हाला एकाही पानाचा शिधा मिळणार नाही. जेवावयाचे असेल तर आनंदाने व मुकाट्याने जेवा. मात्र तुमच्या

सारखा अथिती पानावरून उठून गेला; तरी यजमानाला काहीसुद्धा दोष लागणार नाही याची खात्री वाळगा."

काषायवस्त्रे परिधान केलेल्या श्रीस्वामीमहाराजांच्या मुखातून शास्त्रच बोलत आहे हे जाणावयाला त्या ब्राह्मणाला वेळ लागला नाही. मुकाट्याने भोजन उरकून तो निघून गेला. श्रीस्वामीमहाराजांना पाहिल्याक्षणीच ही कोणी तरी असामान्य व्यक्ती आहे हे ठाणेदाराने ओळखले होते. आत्ताचे त्यांचे वर्तन पाहून व त्यांनी आपल्याला या धर्मसंकटातून वाचविले हे पाहून त्याच्या मनातील श्रीस्वामीमहाराजांबद्दलचा आदर शतगुणीत झाला.

श्रीस्वामीमहाराजांची ही उत्तरेकडची पहिलीच यात्रा होती. यापूर्वी कधीही त्यांनी महाराष्ट्राची भूमी सोडली नव्हती. त्यांची पावले श्रीदत्तप्रभूंच्या मार्गदर्शनानुसार पडत होती. काषायवस्त्रे परिधान केलेला हा यती श्रीदत्तनामस्मरण करीत आपला मार्ग आक्रमीत होता. त्यांच्याकडे पाहून व त्यांच्या चेहऱ्यावरचे ब्राह्मतेज पाहून कित्येक जणांना कुतूहल व आश्चर्य वाटले असेल. वाटेत कोणी नमस्कार केल्यास "नारायण" असा यतिधर्मानुसार आशीर्वाद देण्यापलीकडे श्रीस्वामीमहाराज कधीही कोणाशी बोलत नसत. त्यांना एकच ध्यास लागून राहिला होता. आता उज्जयिनी गाठावयाची व आपले होणारे दंडगुरू श्रीनारायणानंदसरस्वतीस्वामीमहाराज यांच्यापाशी जाऊन त्यांना साष्टांग नमस्कार करावयाचा. श्रीदत्तप्रभूंच्या आज्ञेप्रमाणे या स्वामींकडून दंड ग्रहण केल्यावर आपल्या आयुष्याचे खरेखुरे सार्थक होईल. नंतर कर्तव्य म्हणून आपणास काहीच शिल्लक राहणार नाही. पुढे श्रीदत्तप्रभू हाती धरून चालवतील तसे चालावयाचे ! असे विचार त्यांच्या मनात येत होते. वास्तविक संन्यास दीक्षा व दंड ग्रहण या गोष्टी देवांच्याच इच्छेने होत होत्या. श्रीस्वामींना संन्यास घ्यावयाची इच्छा ब्रह्म-

चर्याश्रमापासूनच झाली होती; पण ती देवांचीच प्रेरणा आहे असे त्या वयात त्यांना वाटले नसेल. काही असो, आपली एकमेव इच्छा संन्यास घेऊन दंडग्रहण करणे ही आहे व ती आता पूर्ण व्हावयाची वेळ आली आहे असे त्यांना वाटले. आता या शेवटच्या टप्प्यासाठी ते फार आतुर झाले होते.

उज्जयिनी हे स्वामींचे गंतव्य ठिकाण होते. उज्जयिनीच्या सीमेत त्यांनी प्रवेश केला आणि त्यांचे सर्वांग पुलकित झाले. उज्जयिनी हे क्षिप्रानदीच्या तीरावर वसले आहे. पूर्वीच्या उज्जैन संस्थानच्या राजधानीचे हे शहर आहे. या संस्थानचे राजे शिंदे हे पेशव्यांचे सरदार होते. त्यामुळे मराठी संस्कृतीचा फार मोठा पगडा उज्जयिनी शहरावर आहे. ज्याप्रमाणे महाराष्ट्र व मध्यप्रदेश या दोन संस्कृतींचा छानदार मिलाफ येथील देवालये, वाडे यांमधून दिसूत येतो त्याच-प्रमाणे पुढील उत्तर प्रदेशाच्या संस्कृतीची छापही येथील लोकांवर पडलेली स्पष्ट दिसून येते. येथील माणूस मराठी बोलता बोलता आपल्या वाक्याचा उत्तरार्ध अशा सहजपणे हिन्दीमध्ये आणून संपवील की, त्यामुळे त्याचे ते बोलणं कानाला गोड व सहजसुंदर वटाते. उज्जयिनी शहर नेहमीच साधुसंत आणि संन्यासी यांचे आश्रयस्थान होऊन राहिले आहे. यथा राजा तथा प्रजा या न्यायाने येथील राजघराणेच महाराष्ट्राची धार्मिकता घेऊन आलेले असल्या-मुळे, प्रजेमध्ये साधुसंतांचा व बैरागीमहात्म्यांचा आदर करण्याची सहज प्रवृत्ती निर्माण झालेली आहे.

चौकशीअंती क्षिप्रा नदीच्या तीरावरील श्रीदत्तमंदिरामध्ये श्रीस्वामीनारायणानंदसरस्वती नावाचे एक श्रेष्ठ यती आहेत असे श्रीस्वामींना कळले. त्यांनी अत्यंत आतुरतेने श्रीदत्तमंदिर गाठले. ते क्षिप्रा नदीच्या काठावरच आहे. त्यांनी क्षिप्रेवर हातपाय धुतले व श्रीनारायणानंदसरस्वतींची भेट घेतली. आपल्या भावी गुरूपुढे

साष्टांग नमस्कार घालून ते हात जोडून उभे राहिले. प्रत्यक्ष श्रीदत्तप्रभूंनीच ज्यांच्याकडून दंड घ्यावा अशी आज्ञा केली त्यांची योग्यता केवढी असणार! "नारायण" असे म्हणून आशीर्वाद देऊन नंतर श्रीनारायणानंदांनी कोण, कोठून आला वगैरे चौकशी केली. श्रीस्वामींनी आपला परिचय थोडक्यात करून दिला व नुकतीच संन्यास दीक्षा घेतल्याचे सांगून श्रीदत्तप्रभूंनी आपणाकडून दंड घ्यावा अशी आज्ञा केल्याचे सांगितले. श्रीनारायणानंदसरस्वती पेचात पडल्यासारखे झाले. आपण कोणाच्या आज्ञेने यांना दंड द्यावा आणि दंड ग्रहण करण्यास हे खरोखरच अधिकारी आहेत किंवा नाहीत असे विचार त्यांच्या मनात आले. ज्याअर्थी दंडग्रहण करण्याची आज्ञा भगवान् श्रीदत्तात्रेयांकडून झाल्याचे हे सांगत आहेत. त्याअर्थी ही गोष्ट आपले गुरू श्रीअनिरुद्धानंदसरस्वती यांच्या कानी घालणे योग्य ठरेल असा विचार करून ते श्रीस्वामींना असे म्हणाले की, "श्रीदत्तात्रेयांच्या आज्ञेविरुद्ध जाण्याची माझी इच्छा नाही; पण माझे गुरुदेव श्रीअनिरुद्धानंदसरस्वतीस्वामीमहाराज येथेच असतात. आपली विनंती त्यांच्या कानावर घालतो. त्यांनी अनुज्ञा दिली; तर मी आपणास आनंदाने दंड देईन." श्रीअनिरुद्धानंदसरस्वती हे सुद्धा अधिकारीच होते. त्यांच्या कानावर श्रीस्वामींची विनंती जाताच त्यांनी श्रीस्वामींना दंड देण्यास श्रीनारायणानंदसरस्वतींना अनुज्ञा दिली. त्यानंतर योग्य दिवस पाहून श्रीनारायणानंदसरस्वतींनी श्रीस्वामींना विधिपूर्वक दंड दिला.

श्रीनारायणानंदसरस्वतींनी श्रीस्वामींच्या कानापर्यंत पोहोचेल एवढ्या उंचीचा पळसाचा दंड घेऊन त्यावर काळ्या गायीच्या केसांच्या दोरीचे चार अंगुळे वेष्टन करून तो श्रीस्वामींना दिला व "सखे मा गोपाय" या मंत्राने श्रीस्वामींनी तो ग्रहण केला.

त्यानंतर ते त्यांना असे म्हणाले की, " चतुर्थाश्रमात प्रवेश केलेल्या आपण आता संन्यास धर्मातील पवित्र असा दंड ग्रहण केला आहे. या दंड ग्रहणामुळे आपल्यावर जी बंधने येतात त्यांची आपण यती असल्यामुळे आपणास पूर्ण जाणीव आहे. सर्वसंग-परित्याग केलेल्या ब्रह्मज्ञानी अशा आपणास आज परमहंस ही संज्ञा प्राप्त होत आहे. " असे म्हणून श्रीस्वामीनारायणानंदांनी वस्त्र वर धरून " पश्चामि देवान् " या मंत्राने श्रीस्वामींना " वासुदेवा-नंदसरस्वती " असे नाव दिले व ते उच्चस्वराने श्रीस्वामींच्या कानात सांगितले. भगवान् श्रीदत्तात्रेयांनी जेव्हा श्रीस्वामींना स्वप्नामध्ये संन्यास दीक्षा दिली होती त्यावेळी यतिधर्माला अनु-सरून " वासुदेवानंदसरस्वती " हेच नाव त्यांच्या कानात सांगितले होते. इत:पर अधिकारी माणसालाच संन्यास द्यावा, योगपट्ट करावा व ज्येष्ठ यतीला नमस्कार करावा असा अधिकार श्रीनारायणा-नंदसरस्वतींनी आपले नूतन शिष्य श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामी-महाराज यांना दिला. गुरूने शिष्याला दंड दिल्यानंतर संप्रदाया-नुसार त्यांनी श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराजांना नमस्कार केला. नंतर " नारायण " असे म्हणून श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामी महाराजांनी आपल्या गुरूला उच्चासनावर बसवून त्यांना नमस्कार केला व मग तेथे उपस्थित असलेल्या इतर यतींना नमस्कार केला.

परमहंस परिव्राजकाचार्य श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहा-राज यांचे दंडगुरू प. पं श्रीनारायणानंदसरस्वतीस्वामीमहाराज हे दत्तावतार श्रीमन्नृसिंहसरस्वतीस्वामीमहाराज यांच्या वंशातील कारंजा गावचे शुक्ल यजुर्वेदीय माध्यंदिन शाखेचे ब्राह्मण असून ते समर्थ संप्रदायातील होते. त्यांचे गुरू श्रीअनिरुद्धानंदसरस्वती-स्वामीमहाराज व त्यांचे गुरू श्रीअच्युतानंदसरस्वतीस्वामीमहाराज अशी ही गुरुपरंपरा आहे. पुढे श्रीनारायणानंदसरस्वती आजारी

पडले. त्यावेळी देवांच्या आज्ञेप्रमाणे श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामींनी उज्जयिनीला जाऊन श्रीगुरुस्वामींची शिष्यधर्माला अनुसरून सेवा केली. ही हकीगत श्रीस्वामीमहाराजांचा दहावा चातुर्मास संपल्यानंतरची, शके १८२३ मधील आहे. श्रीस्वामी नारायणानंदसरस्वतींनी शेवटी चाफळ मुक्कामी प्रभू रामचंद्रासमोर समाधी घेतली. आपल्या गुरूच्या संप्रदायाप्रमाणे श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराज गुरूच्या स्मरणार्थं दरवर्षी दासनवमीचा उत्सव करीत असत.

दंड ग्रहण केल्यानंतर श्रीस्वामीमहाराजांनी तेथे असलेल्या सर्व संन्यासी मंडळींना मठभिक्षेचे आमंत्रण देऊन त्यांना मठभिक्षा दिली व आपण स्वत: देवांनी घालून दिलेल्या नियमाप्रमाणे माधुकरीला जाण्यासाठी श्रीगुरुस्वामींकडे अनुज्ञा मागण्यास गेले. आपल्या या शिष्याचा अधिकार केवढा मोठा आहे याची श्रीनारायणानंदस्वामींना कल्पना नव्हती. आपल्या शिष्याच्या माधुकरी मागावयाला जाण्यामागे यापूर्वी जो इतिहास घडलेला होता तो त्यांना कसा ठाऊक असणार? त्यामुळे त्यांनी श्रीस्वामीमहाराजांना माधुकरीला जाण्यासाठी अनुज्ञा न देता "तुम्ही आजच दंडग्रहण केला आहे, तेव्हा आज आम्हा सर्वांबरोबर मठभिक्षा करणेच उचित होईल." असा आग्रह धरला. त्यावेळी "देवांच्या आज्ञेविरुद्ध आपणाला मठभिक्षा करता येणार नाही." असे सांगून आपण मठभिक्षा न करता माधुकरी मागण्याचे कारण काय आहे हे श्रीस्वामीमहाराजांनी श्रीगुरुस्वामींना सांगितले; पण त्यांना ते पटले नाही. उलट त्यांनी आग्रह धरला की, "आज तुम्ही आमच्याबरोबर मठभिक्षा केली नाही; तर आम्ही कोणीसुद्धा भिक्षा घेणार नाही." श्रीस्वामीमहाराजांना इकडे आड आणि तिकडे विहीर अशी

परिस्थिती निर्माण झाली. गुरूंची आज्ञा मोडवेना आणि श्रीदत्त प्रभूंच्या आज्ञेविरुद्ध जाता येईना. पण शेवटी कोणता तरी एक पर्याय स्वीकारणे भाग होते. त्यामुळे देवांच्या आज्ञेविरुद्ध वागून स्वत: शिक्षा भोगणे त्यांनी पसंत केले. त्यादिवशी त्यांनी सर्वांच्या आग्रहास्तव मठभिक्षा केली. याचा परिणाम काय होणार याची त्यांना कल्पना होती. भिक्षा झाल्यावर त्यांना एकाएकी उलटचा होऊ लागल्या व ते कासावीस झाले. काही उपाय चालेना. आज्ञाभंगाची ही शिक्षा होतीच; पण आपल्या शिष्याचा काय अधिकार आहे हे श्रीनारायणानंदसरस्वतींच्या ध्यानी यावे असाही देवांचा ही शिक्षा करण्यामागे उद्देश असावा. श्रीनारायणानंदांनी आपल्या शिष्याला ओळखले. मंदिरात जाऊन श्रीदत्तमूर्तीसमोर हात जोडून गद्‌गद् स्वरात त्यांनी देवांची प्रार्थना केली. "प्रभो ! मी खरा अपराधी आहे. आपल्या आज्ञेचा भंग वासुदेवानंदांनी नाही, मी केला आहे. तो प्रमाद माझ्या हातून घडला. आपण माझ्याकडून त्यांना दंड देवविला म्हणून मीच त्यांना व्यवहारास अनुसरून येथे भिक्षा घेण्यास भाग पाडले. मीही त्यांच्याप्रमाणेच आपला भक्त व शिष्य आहे. मीही आपलाच आहे. माझ्या अपराधासाठी त्यांना शिक्षा देऊ नका. अत:पर मी त्यांना आपल्या आज्ञेविरुद्ध काहीसुद्धा करण्यास सांगणार नाही. यावेळी मला क्षमा करून त्यांच्या उलटचा बंद करा." याप्रमाणे श्रीगुरुस्वामींनी प्रार्थना केल्यावर श्रीस्वामीमहाराजांच्या उलटचा थांबून त्यांना बरे वाटले.

प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामीमहाराजांनी उज्जयिनी येथे शके १८१३ मध्ये दंड ग्रहण केला. दंड ग्रहण केल्यानंतर काही दिवस त्यांचा मुक्काम उज्जयिनीमध्येच होता. उज्जयिनीच्या क्षितिजावर नुकतीच कोठे अरुणप्रभा फाकत होती. सूर्योदय व्हावयाचा होता. प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराजांची

विद्वत्ता, शास्त्रातील व्युत्पन्नता, चेहऱ्यावरील प्रखर ब्राह्मतेज व असामान्य व्यक्तिमत्व या गोष्टी उज्जयिनीमधील विद्वान्, शास्त्रप्रेमी व ईश्वरभक्त लोकांच्या नजरेला यावयाला आता सुरुवात होणार होती. श्रीस्वामीमहाराजांनी दंडग्रहण केल्यानंतर श्रीदत्तप्रभूंनी त्यांना अशी आज्ञा केली की, " आज सर्वत्र वर्णाश्रमधर्माचा लोप झालेला आहे; तरी यापुढे सर्व भरतखंडात पायीच संचार करून सर्व लोकांना उपदेश करावा व धर्ममार्गाची स्थापना करून ईश्वरनिष्ठा व स्वधर्मनिष्ठा जागृत करावी. "

सनातन वैदिक धर्मावर आत्तापर्यन्त अनेक आक्रमणे झाली होती व आहेत. ती वेळोवेळी श्रीमदाद्यशंकराचार्य, श्रीकुमारिलभट्ट, श्रीमन्नृसिंहसरस्वतीस्वामीमहाराज यांच्यासारख्या लोकोत्तर पुरुषांनी थोपवून सनातन वैदिक धर्माची भारतवर्षामध्ये पुनःप्रतिष्ठापना केली. तीच परंपरा आता श्रीस्वामीमहाराजांना चालू ठेवावयाची होती.

भक्तवत्सल भक्ताभिमानी अत्रिनंदन भगवान् श्रीदत्तात्रेयांनी श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराजांच्या रूपाने सनातन वैदिक धर्माची पताका हातात घेऊन धर्मप्रसार करावयाला एक आदर्श यती निर्माण केला. यापुढे श्रीमदाद्यशंकराचार्यांची परंपरा पुढे चालविणारे प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वतीटेंबेस्वामीमहाराजस्वरूप भगवान् श्रीदत्तात्रेय आम्हा भक्तवृंदांचे कल्याण करोत.

साधनाखंड अर्थात् पूर्वार्ध समाप्त

॥ श्रीगुरु:शरणम् ॥

परमहंस परिव्राजकाचार्य श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामीमहाराज यांचा अमृतोपदेश-

सगुणोपासना, भजन व भक्ती :-

★ "सगुण परमेश्वराची उपासना करून मनुष्याने कृतार्थ व्हावे. सगुण उपासना केल्यावाचून ब्रह्मसाक्षात्कार होणार नाही. राजाला जसा आपल्या शिक्कामोर्तबाचा आणि कायद्याचा अभिमान असतो, तसाच देवाला आपल्या सगुणरूपाचा व वेदशास्त्रांचा अभिमान आहे. शिक्कामोर्तब म्हणजे राजा नाही, हे खरे; पण शिक्कामोर्तबाशिवाय राजाचा व्यवहार होऊ शकत नाही आणि राजाशिवाय नुसत्या शिक्कामोर्तबालाही महत्त्व नाही. प्रजाजनांनी राजाचे कायदे पाळले म्हणजे राजाला जसा संतोष होतो तसाच संतोष शास्त्रनियम पाळल्याने ईश्वराला होतो. करिता शास्त्राज्ञे-प्रमाणे वागून ईश्वराची सेवा करा व आपले कल्याण करून घ्या."

★ "ईश्वर व गुरू यांची पूजा यावज्जीव केलीच पाहिजे."

★ "ग्रंथ वाचीत असताना तो प्राकृत आहे की संस्कृत आहे या बाह्यांगाचा विचार करू नये. त्याच्या अर्थाकडे अनुसंधान ठेवावे. कलियुगात आचारधर्म लुप्तप्राय झाल्याने नुसत्या वेदपठणाचा व्हावा तसा उपयोग होत नाही. पण साधुपुरुषांनी केलेल्या प्रासादिक प्राकृत ग्रंथांचा या वेळी फार मोठा उपयोग होण्यासारखा आहे... श्रीज्ञानेश्वरी, श्रीनाथभागवत व श्रीदासबोध हे प्रासादिक ग्रंथ आहेत. त्यांच्या नित्य पठणाने मन शुद्ध होऊन भक्ती उपजेल व शेवटी मुक्तीही लाभेल."

★ "प्रभूची सेवा अनन्यभावाने करा. एकीने राहून नित्य दिगंबराचे भजन करा."

साररूप उपदेश :-

★ " आजपर्यंत जो प्रत्यक्ष उपदेश केला व ग्रंथ लिहिले त्या सर्वांचे सार आज सांगावयाचे आहे. मुक्तीचा लाभ करून घेणे हे मनुष्यजन्माचे मख्य कर्तव्य आहे. त्याकरिता प्रथम मन स्थिर व्हावे या उद्देशाने वर्णाश्रमविहित धर्मांचे यथाशास्त्र आचरण झाले पाहिजे. वेदान्ताचे श्रवण, मनन व निदिध्यासन नित्य करावे. मुख्यतः श्रवणाकडे अधिक लक्ष द्यावे. त्यामुळे मनातील आसक्ती कमी होईल. सात्त्विक प्रवृत्तीनेच मानवांची उन्नती होते. सात्त्विक प्रवृत्ती होण्याकरिता आहार हा हित, मित व मेध्य म्हणजे पवित्र असण्याकडे लक्ष दिले पाहिजे. आपली प्रकृती सात्त्विक झाली हे ओळखण्याची खूण अशी की, स्वधर्मावर दृढ श्रद्धा बसून स्नानसंध्या, देवपूजा, पंचमहायज्ञ हे वेळेवर करणे; अतिथिसत्कार, गोसेवा, व मातापितरांची सेवा ही हातून घडणे; कथा-कीर्तन, भजन, पुराण यांचे श्रवण होणे; सर्वांबरोबर गोड बोलणे; दुसऱ्याचे नुकसान होईल असे न वागणे; स्त्रियांनी सासरी राहून सासूसासरा व इतरही वडील माणसे यांच्या आज्ञेत पतीची दृढनिष्ठेने सेवा करणे इत्यादी गुण आपल्यामध्ये येणे. आपली प्रकृती सात्त्विक बनल्याची ही चिन्हे आहेत. उदरनिर्वाहाकरिता व्यापार, शेती, नोकरी कोणताही धंदा केला; तरी वेदविहित कर्म व गुर्वाज्ञापालन हे कधीही सोडू नये. स्वकर्म केले तरच अंतःकरण शुद्ध होते. अंतःकरण शुद्ध झाले तर उपासना स्थिर होते. उपासना स्थिर झाली तर मनाला शांती मिळते आणि मनाची गडबड थांबली म्हणजे आत्मज्ञान होऊन मोक्षाचा लाभ होतो......हे सर्व थोडक्यात सांगितले आहे. याप्रमाणे जो वागेल तो शेवटी पूर्ण सुखी होईल."

दिनचर्या :-

॥ श्रीगुरुःशरणम् ॥

सप्रेम आशीर्वाद विशेष

माझे मित्र श्री. शंकरराव आजेगांवकर यांना श्रीगुरुमहाराजांनी दिनचर्या लिहून दिली होती ती अशी :-

" प्रातःकाळी उठून चूळ टाकून आचमन करून प्रातःस्मरण म्हणून अजपा संकल्प करून ' सोऽहं ' जप करावा. चार दिवसांचे अंतराने बस्ति, धौति, नेति करावी. नंतर स्नान केल्यावर मानसपूजा, जप, अभ्यास करावा. गुरुचरित्र वाचून यथाशक्ती प्रदक्षिणा कराव्या. भोजन झाल्यावर ग्रंथ वाचावे. मध्ये मध्ये सवड मिळेल-तेव्हा ' श्रीगुरुदेव दत्त ' असे नामोच्चारण करावे. सायंकाळी मानसपूजा, जप, अभ्यास करून पंचपदी भजन शेजारतीपर्यंत करून कर्म समर्पण करून निजेपर्यंत नामस्मरण करीत असावे. सर्वकाळ मी असंग, कूटस्थ, साक्षी, निर्विकार ब्रह्म आहे अशी पुनः पुनः भावना करावी. त्रिविध ताप, दुख किंवा कोणी छळ केल्यास विषाद मानू नये. मी कर्मफळ भोगीत आहे असा विचार करावा. जडभार देवावर घालू नये असे वागावे."

याप्रमाणे दिनचर्या ठेवण्याचा प्रयत्न करावा.

कळावे हे आशीर्वाद.

आपला

वा. द. गुळवणी

सिद्धयोग प्रकाशन

२६/२०२ लक्ष्मीनगर, पुणे ९.
पिन ४११००९

★ प्रकाशित ग्रंथ ★

१)	महायोगी गोरक्षनाथ विरचित योगबीज	१०-००
२)	स्पंदशास्त्र अर्थात् सिद्धयोग साधन पद्धती	३०-००
३)	ज्ञानसंकलिनीतंत्र	५-००
४)	शक्तिपातयोगाने दिव्यचक्षूंचे उन्मीलन	२०-००
५)	सिद्धसिद्धान्तसंग्रह (मूळ संस्कृत व मराठी अर्थासह)	१०-००
६)	शिवसंहिता (मूळ संस्कृत व मराठी अर्थासह)	२०-००
७)	श्रीललितासहस्रनामस्तोत्र (,,)	३०-००
८)	शक्तिपातयोगरहस्य अर्थात् सिद्धमहायोगशास्त्र	२०-००
९)	स्वामी अवधूत श्रीनिरंजन रघुनाथ (चरित्र)	१०-००
१०)	श्रीश्रीसद्गुरुसंग (खंड पहिला)	२०-००
११)	ज्ञानेश्वरी : सिद्धयोग दर्शन	१५०-००
१२)	विद्यारण्यस्वामी विरचित सद्गुरुप्रार्थना (मूळ संस्कृत व मराठी अर्थासह)	२-००
१३)	गोष्टीरूप वेदान्त (खण्ड पहिला)	३०-००
१४)	श्रीसत्यदत्तव्रतपूजाकथा	५-००
१५)	श्रीगोरक्षगीता	३-००
१६)	महायोगी श्रीसिद्धगोरक्षनाथ विरचित अमरौघशासन (मूळ संस्कृत, मराठी अर्थ व विवरणासह)	२०-००
१७)	महायोगी श्रीसिद्धगोरक्षनाथ विरचित अमरौघप्रबोध (मूळ संस्कृत, मराठी अर्थ व विवरणासह)	२०-००
१८)	नित्यउपासनाक्रम आणि महायोगी सद्गुरु श्रीगुळवणीमहाराज यांच्या विविध आरत्या व प्रार्थना	४-००

१९) घोरसंकटनिवारणपूर्वक श्रीदत्तप्रीतिकारकस्तोत्र (मूळ संस्कृत, मराठी अर्थ व विवरणासह) २-००
२०) सार्थश्रीदत्तात्रेयकवच (मूळ संस्कृत, मराठी अर्थ व विवरणासह) २-००
२१) श्रीदत्तस्तवस्तोत्र (मूळ संस्कृत, मराठी अर्थ व विवरणासह) २-००
२२) अपराधक्षमापनस्तुतिस्तोत्र (मूळ संस्कृत. मराठी अर्थ व विवरणासह) ३-००
२३) मंत्रात्मक श्लोक (मूळ संस्कृत, मराठी अर्थ व विवरणासह) ३-००
२४) चंचलचित्त स्थिर करणारे सार्थ श्रीदत्तस्तोत्र (मूळ संस्कृत, मराठी अर्थ व विवरणासह) २-००
२५) शक्तिसूत्रे (मूळ संस्कृत, मराठी अर्थ व विवरणासह) २-००
२६) श्रीकुण्डलिनीस्तुतिस्तोत्र (मूळ संस्कृत व सुबोध मराठी भाषांतरासह) २-००
२७) श्रीनिरंजनरघुनाथ स्वामीमहाराज विरचित ज्ञानेश्वरी : दृष्टान्त परिभाषा टीका १००-००
२८) अद्वयतारकोपनिषद् (मूळ संस्कृत, मराठी अर्थ व विवरणासह) ५-००
२९) अमृतबिन्दूपनिषद् अथवा ब्रह्मबिन्दूपनिषद् (मूळ संस्कृत, मराठी अर्थ व विस्तृत विवरणासह) १०-००
३०) श्रीललितापञ्चरत्नस्तोत्र (मूळ संस्कृत व मराठी अर्थासह) १-००
३१) देवर्षी श्रीनारद विरचित सार्थ शत्रुनाशकर श्रीदत्तात्रेयस्तोत्र (मूळ संस्कृत व मराठी अर्थासह) १-००
३२) मूळस्तंभ – मराठी १०-००
३३) श्रीथोरलेस्वामीमहाराज – प. प. श्रीवासुदेवनंदसरस्वती टेंबेस्वामीमहाराज यांचे चरित्र (खण्ड पहिला) ५०-००

